ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जुलै ते सप्टेंबर २०२१

कवयित्री शांता शेळके यांच्या जन्मशताब्दी निमित्त

विनम्र अभिवादन



असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या, उद्या हसेल गीत हे

## मसापचा डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार डॉ. अंजली सोमण यांना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते प्रदान.



## मसाप दिवाळी अंक स्पर्धेची पारितोषिके डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते देण्यात आली.





महाराष्ट्र
साहित्य
परिषद


महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

- अंक क्र. ३७५,
- जुलै ते सप्टेंबर २०२१

- संपादक

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

- प्रकाशक

**प्रकाशक पायगुडे**
प्रमुख कार्यवाह



- **महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**

टिळक रस्ता, पुणे ४११०३०.
दूरभाष । ०२०–२४४७५९६३

- संकेतस्थळ । www.masapapune.org
- ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.०० दुपारी १२.००
दुपारी ४.३० ते रात्री ८.००

**मसाप पत्रिका ।**
**जुलै ते सप्टेंबर २०२१ अंक**


मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स, एल. एल. पी.**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**



या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.




# अंतरंग | मसाप पत्रिका । जुलै ते सप्टेंबर २०२१ अंक


- फिटे अंधाराचे जाळे... । डॉ. पुरुषोत्तम काळे । ६
- शांताबाई शेळके यांची कविता । मधु जामकर । ८
- गेल ऑम्वेट यांच्या लेखनातील संत परंपरा आणि सांस्कृतिक राजकारण : पहिले वाचन । डॉ. अनिल सपकाळ । १३
- अनुताई वाघ यांचे शैक्षणिक व साहित्यिक योगदान । प्रा. क्रांती हरेश पैठणकर । १७
- प्रा. ग. प्र. प्रधानः सात्त्विक वृत्तीचे कृतिशील विचारवंत । प्रा. बाळकृष्ण कवठेकर । २३
- आठवणीतले फडकुले । सुहास पुजारी । २८
- कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचे जीवन आणि समग्र वाङ्मय । साधना सुखदेव जाधव । ४१
- अस्तित्वलोपाची कादंबरी- पाचोळा । डॉ. नीतिन दत्तात्रय आरेकर । ४४
- 'पधारो म्हारो देस' समृद्ध संवेदनशील प्रवासानुभव । सुस्मिता खुटाळे । ५३
- धालवली (देवगड), मालवणी कविता आणि भारतीय ज्ञानपीठकार विंदा करंदीकर- एक अनुबंध । डॉ. बाळकृष्ण लळीत । ५६
- आख्यायिका : स्वरूप, परंपरा व प्रकार । डॉ. नवनाथ शिंदे । ६१
- मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील स्त्री-पुरुष समानता । डॉ. मनीषा खैरे । ६८
- जी. ए. कुलकर्णी यांची कथा : 'निळासावळा'च्या निमित्ताने । प्रा. नानासाहेब गव्हाणे । ७९
- सातपाटील कुलवृत्तांतः भारतीय समाजजीवनाचा मूळ चेहरा । डॉ. गजानन भोसले । ८३
- रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीतील निवडक प्रमुख केंद्रीय व्यक्तिरेखा । डॉ. जयराम खाडे । ८९
- बा. द. सातोस्कर यांच्या कादंबरीतील कलावंत समाजाचे चित्रण । शुभांगी अनंत आसोलकर । १०१
- तमोहरा - अंधारातील प्रकाशधारा । डॉ. रामचंद्र देखणे । १०८
- शतकभरातील काव्यसमीक्षेचा चिकित्सक व सर्जनशील आविष्कार । डॉ. सुजाता शेणई । ११२
- मनाचा तळ शोधणारा 'डोहतळ' । राजेंद्र भोसले । ११६
- निमित्त-अवस्थांतराच्या कविता । दा. गो. काळे । ११९
- 'तूर्तास तरी' या कवितेची प्रवर्तक बाजू दुर्लक्षित राहू नये म्हणून...! । अरविंद सुरवाडे ।१२३
- गंमत गाणी ते जीवनाचं सूत्र सांगणाऱ्या कविता । नामदेव माळी। १२६
- विवेकवेलीची लावणी । प्रा. केदार जोशी । १२९
- माझ्यातला कवी मरत चाललायः उजेडाचे चारित्र्य बदलविणारी कविता । डॉ. अक्रम. ह. पठाण । १३४
- मिथक : स्वरूप आणि संकल्पना । डॉ. राजश्री देशपांडे । १४२
- मराठी भाषा, साहित्य निर्मिती आणि व्यावसायिक संधी समृद्ध करणारे 'मराठी व्याकरण समग्र आणि सोपे' । डॉ. अशोक नामदेव शिंदे । १४६
- 'झोळी' आत्मकथन : डवरी गोसाव्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक दस्तावेज । डॉ. सुदाम राठोड । १५१
- परिवर्तनाची दिशा सूचित करणाऱ्या कथा । डॉ. वासुदेव मुलाटे । १५५
- शाखा कार्यवृत्त । १५८



# फिटे अंधाराचे जाळे...

## डॉ. पुरुषोत्तम काळे

गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यापासून जगात पसरलेल्या करोना महासाथीचा प्रभाव कमी होत असून सर्व सामाजिक व्यवहार पूर्वपदावर येत आहेत. मंदिरे, ग्रंथालये, सिनेमा–नाट्यगृहे निर्बंधासहीत का होईना पुन्हा सुरू झाली आहेत ही समाधानाची बाब आहे. वर्षभराहून अधिक काळ साहित्य– संस्कृती व्यवहार, कार्यक्रम दूरस्थ पद्धतीने आंतरजालावर झाले. अजूनही होत आहेत. वातावरणात–वैचारिक विश्वात जे साचलेपण आले होते ते कमी होईल, निराशेचे मळभ दूर होऊन पुन्हा सर्व पूर्वपदावर येईल अशी आशा वाटते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखांनी आव्हानात्मक करोना काळात आंतरजालावर काव्यसंमेलने–व्याख्याने इ. साहित्यिक कार्यक्रम आणि विविध साहित्यविषयक स्पर्धा घेतल्या. या सर्व शाखांचे पदाधिकारी अभिनंदनास पात्र आहेत.

नुकतेच साहित्य अकादमीचे पुरस्कार जाहीर झाले. अनुवादासाठीचा पुरस्कार सोनाली नवांगुळ यांनी अनुवादित केलेल्या ‘मध्यरात्रीनंतरचे तास’ या कादंबरीला जाहीर करण्यात आला. सलमा यांच्या मूळ तमिळ भाषेतील कादंबरीचा हा अनुवाद आहे. सोनाली नवांगुळ यांनी ऑस्कर पिस्टोरिअस या दोन्ही पाय नसताना वेगवान धावू शकणाऱ्या धावपटूच्या ‘ड्रीमरनर’ या आत्मकथनाचा अनुवाद केला. मुक्त पत्रकार म्हणून त्यांनी विविध वृत्तपत्रांत आणि नियतकालिकांत लेख लिहिले आहेत. या प्रतिभावान लेखिकेचे स्वतंत्र लिखाणही अकादमी पुरस्कार मिळण्याच्या पात्रतेचे आहे. डॉ. प्रकाश आमटे यांच्या ‘प्रकाशवाटा’ या आत्मकथनपर पुस्तकाच्या संस्कृतमधील अनुवादासाठी डॉ. मंजुषा कुलकर्णी यांनाही साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. ख्यातकीर्त दिग्दर्शक प्राजक्त देशमुख यांच्या ‘देवबाभळी’ या नाट्य–संहितेला साहित्य अकादमीचा युवा साहित्य पुरस्कार जाहीर झाला. रखुमाई आणि संत तुकारामांची पत्नी आवली यांच्या मनातील दुःखाला वाट करून देणारे संवाद रसिक प्रेक्षक आणि वाचकांना भावविवश करतात. या तीनही प्रतिभावान लेखकांचे अभिनंदन आणि त्यांचे साहित्यिक कर्तृत्व उत्तरोत्तर बहरत राहो या शुभेच्छा!

हे वर्ष ख्यातनाम कवयित्री शांता शेळके यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. कविता, गीते, चित्रपटगीते, कथा, कादंबरी, बालसाहित्य अशा अनेक साहित्यप्रकारांत लेखन केलेल्या शांताबाईंची

शंभरावर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. सुरुवातीला माधव ज्युलियन आणि कुसुमाग्रजांच्या प्रभावात काव्यलेखन केलेल्या शांता शेळके यांनी 'गोंदण' या काव्यसंग्रहापासून स्वतःच्या काव्यलेखनाची वेगळी वाट निर्माण केली. त्यांच्या कवितेला नवा चेहरा मिळाला आणि ती अनुकरणापासून मुक्त झाली. 'वर्षा' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाला त्यांचे गुरू प्रा. रा. श्री. जोग यांनी प्रस्तावना लिहिली. त्यामध्ये त्यांनी शांताबाईंच्या वृत्तबद्ध काव्यलेखनाची प्रशंसा केली आहे. वृत्तबद्ध कवितेबरोबरच शांताबाईंनी गीते, बालगीते, सुनीते आणि मुक्तछंद रचनाही केली. उत्कृष्ट भावानुकूल चित्रपट गीतलेखनामुळे रसिकांच्या हृदयात स्थान मिळवलेल्या शांताबाईंची गीते आजही भावविभोर करतात. 'चौघीजणी, मेघदूत' यांसारखे मूळ साहित्यकृतीइतकेच श्रेष्ठ अनुवाद शांताबाईंनी केले. चिंतनशीलता आणि सौंदर्यान्वेषक दृष्टी लाभलेल्या शांताबाईंनी जीवनाविषयी अपार कुतूहल आणि मानवी स्वभावाविषयीची उत्सुकता आपल्या ललितलेखनातून व्यक्त केली. या चतुरस्त्र आणि प्रातिभ काव्यलेखन करणाऱ्या कवयित्रीस अभिवादन करताना मंचर येथे शांताबाईंचे वास्तव्य असलेला वाडा आज मोडकळीस आलेला असून त्याचे जतन व्हावे आणि तेथे शांताबाईंचे यथोचित स्मारक व्हावे ही अपेक्षा व्यक्त करतो. मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी शांता शेळके यांच्या स्मारकाच्या उभारणीत लक्ष घालावे आणि जन्मशताब्दी वर्षात हे स्मारक पूर्ण व्हावे, ही विनंती.

ख्यातकीर्त समाजशास्त्रज्ञ गेल ऑम्वेट, प्रतिभावान नाटककार जयंत पवार आणि मराठी रसिकांना आपल्या विनोदी कथाकथनाने खळखळून हसायला लावून दुःख- चिंता विसरायला लावणारे प्रा. द. मा. मिरासदार यांचे नुकतेच निधन झाले. द. मा. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळालेल्या कार्यकारिणीत काम करता आले याचा अभिमान वाटतो. द. मा. लोकप्रिय होतेच; परंतु रसिकांमध्ये रमणारे होते. ते जिथे असायचे तेथे रसिकांचा वेढा त्यांना पडायचा आणि मैफल सुरू व्हायची. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रसन्नता आणि माणसांना आकर्षून घेण्याची क्षमता यांचा मनोहर संगम होता. कायम जनांत रमणारे द. मा. या करोनाकाळात एकाकी पडले असावेत. अन्यथा अजूनही ते आपल्यात असते. वरील तीनही दिवंगत मान्यवरांना भावपूर्ण आदरांजली!

गेल ऑम्वेट यांच्या लेखनावरील प्रा. अनिल सपकाळ यांचा लेख, शांता शेळके यांच्या कवितेवरील मधु जामकर यांचा लेख, डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्यावरील डॉ. सुहास पुजारी यांचा लेख, प्रा. ग. प्र. प्रधानांवरील बाळकृष्ण कवठेकर यांचा लेख, पाचोळा या कादंबरीच्या ५० वर्षपूर्तीनिमित्त नितीन आरेकर यांचा लेख, ख्यातकीर्त कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यांवरील दोन लेख, डॉ. राजश्री देशपांडे यांचा मिथकावरील संशोधनलेख आणि काव्यसंग्रहांवरील परीक्षणे ही या अंकाची वैशिष्ट्ये आहेत.

महाराष्ट्र साहित्य पत्रिका ही सध्या पी. डी. एफ. स्वरूपात प्रकाशित होते. ती नियमित मुद्रित स्वरूपात प्रकाशित व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सध्या पत्रिका परिषदेच्या वेबसाईट वर आणि सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात येते. सर्व रसिक वाचकांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा. हा दीपोत्सव निराशेचे, अंधाराचे मळभ दूर करणारा ठरो आणि सर्वांचे जीवन सुखा-समाधानाच्या प्रकाशाने उजळून जावो या शुभेच्छा!

संपादक

◆◆



# शांताबाई शेळके यांची कविता : १९२२-२००२

**प्रख्यात कवयित्री, गीतकार शांताबाई शेळके यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने त्यांच्या कवितेतील सौंदर्यस्थळांचे विश्लेषण करणारा लेख.**

**मधु जामकर**

शांताबाई शेळके हे नाव महाराष्ट्रात घरोघरी परिचित आहे. त्यांनी लिहिलेली मधुर गीते, चित्रपट गीते, द्वंद्वगीते, भावगीते, कोळी गीते वेगवेगळ्या प्रहरात आकाशवाणीवरून ऐकवली जातात. महाराष्ट्राच्या ख्यातनाम गायकांनी गायिलेली, प्रतिभावंत संगीत-दिग्दर्शकांनी स्वरबद्ध केलेली ही कित्येक गीते अनेकांना आवडतात; परंतु गीतलेखन करू लागल्याच्या अगोदर त्या काव्यरचना करीत आहेत, त्या प्रथम चांगल्या कवयित्री आहेत आणि नंतर उत्तम गीतकार आहेत. एवढेच नव्हेतर कविता आणि गीत यांच्या सीमारेषा त्यांनी आपल्या या लेखनात मिटविल्या आहेत. शांताबाईच्या नावे वर्षा १९४७, रूपसी १९५६, गोंदण १९७५, अनोळख १९८६, जन्मजान्हवी -१९९० पूर्वसंध्या १९९६, आणि इत्यर्थ १९९६ अशा एकूण सात संग्रहांतून त्यांनी लिहिलेल्या कविता वाचकांसमोर आलेली आहे.

त्यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे, की त्यांनी गीत आणि कविता असा भेद संपविला. त्यांनी आपल्या सर्व रचनांना, गीतांना काव्याचे परिमाण मिळवून दिले. त्यांच्या कवितांना पोथीनिष्ठ समीक्षक आणि त्यांचे सांकेतिक निकष लावता येत नाहीत. हे सारे कविता लेखन अभिजात काव्याच्या परिशीलनाने घडविले आहे. संत, पंडित आणि शाहिरी काव्याचे खोल संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत. ज्ञानदेव-तुकारामांच्या अव्वल दर्जाच्या अभंगवाणी इतकीच मोरोपंताच्या संस्कृतप्रचुर विदग्ध कवितेची त्यांना गोडी होती. मराठी मनाची म्हणून जी ध्येय धारणा आहे, पारंपरिक संस्कृती आहे ती त्यांनी आपल्या गीतांप्रमाणेच कवितांमधूनही जपली आहे. त्यांचे हे भावसंचित त्यांच्या समग्र कवितेतून आले आहे. शेळके यांना शब्दसिद्धी जन्मजात होती. तसेच शब्दव्रती म्हणून त्यांचा लौकिक होता. कोणतीही अनुभूती असो. तिला रूपवंत करणारे शब्द जणू त्यांच्यापुढे उभे असत. या भाषेला एकीकडून संस्कृतच्या व्यासंगाने विदग्धतेचा स्पर्श झालेला होता, तर दुसरीकडून ग्रामीण शब्द संपत्तीने तिला श्रीमंत केले होते. सुंदर शब्द चित्रांनी आपली चित्रपट गीते जिवंत करणारी कवयित्री. कवितेला चित्रलाघव दाखवून देताना अंतरीच्या खूण पटविणाऱ्या सूक्ष्म आत्मदर्शी अस्सल कविता त्यांच्या आहेत. प्रसन्न शब्दकळा, चित्रदर्शी वर्णने, चिंतनात्मकता, नाट्यमयता या साऱ्या हा आहे. पुन्हा त्यात त्यांच्या प्रतिभेचा हा पारिजात फुलतो आहे. त्यात दरवळणारा सुगंध आहे. त्यांच्या कवितेचा आस्वाद घेताना तिचे आर्त मधुर सूर अंतराला दुखावतात. मराठमोळी भाषा लिहिणाऱ्या दुर्मिळ कवितेत ही कवयित्री प्रतिभेतून नव्याने उभी राहते. यामुळेच तिच्या कवितेत जिव्हाळ्याचे आणि अतूट नाते निर्माण झाले आहे. त्या सतत चांगल्या कवयित्री म्हणून उत्तम गीतकार आहेत.

शांता शेळके यांच्या कवितेची रविकिरण मंडळातील कवींचा फार मोठा प्रभाव होती. शांता शेळके यांच्या कवितेच्या धूळपाटीवर रविकिरण मंडळातील कवींचा फार

मोठा प्रभाव होती. माधव-ज्युलिअन आणि यशवंत यांच्या कवितांचे संस्कार त्यांच्या कवितेवर झाले होते, की त्यांच्या या कवितेत प्रथम पुरुषी थाटाचा 'मी' दिसून आला. या काळात त्या अंतर्बाह्य कवितेच्या वातावरणात बुडून गेल्या होत्या. कविता लिहिणे, त्या छापून आलेल्या बघणे या त्यांच्या अनिवार भुका होत्या. त्याप्रमाणे कवितांबद्दल सतत बोलत राहणे, आवडलेल्या कवितांच्या ओळी बडबडत राहणे ही एक प्रखर अशी त्यांची भूक होती. या वातावरणातूनच त्या पुढे आपल्या कलाकृतीतले दोष जाणून घेऊ लागल्या. या काळातील त्यांच्या कवितेत व्याकरणशुद्धता आणि शैलीचा रेखीवपणा आला. त्यांचे गुरू रा. श्री. जोग यांनी त्यांच्या कवितेची अभिरुची घडविली. रविकिरण मंडळाच्या छायेतून ओढून काढून काव्यविषयक नव्या जाणिवांच्या वातावरणात वास्तवाच्या प्रखर आणि कठोर उन्हात ओढून आणण्याचे कार्य ज्या मर्ढेकर कवीने केले त्यांचा जिवंत प्रभाव शांताबाईंवर पडला. कविता लिहिणे हा नुसता छंद नाही, नुसती कारागिरी नाही, घटकेचा गमतीदार विरंगुळा नाही. ती एक काळजाला झोंबणारी, जीवन व्यापून टाकणारी, स्वतःकडे आणि जगाकडे बघण्याची अगदी वेगळी दृष्टी देणारी एक शक्ती आहे. तो आनंद आहे तशीच ती वेदना आहे हे त्यांना केशवसुतांच्या कवितेनंतर मर्ढेकरांच्या कवितेतून कळू लागले. शांताबाई प्रारंभीच्या काळात रविकिरण मंडळाच्या कवींच्या कविता खर्ड्याप्रमाणे गिरवित होत्या. त्यात आत्मप्रत्यय नव्हता. केवळ अनुकरणाचा भाव होता. या काळात त्यांनी अनेक कविता नष्ट केल्या. या अनुकरणातील कवितेतही खऱ्या भावभावना, तारुण्यसुलभ कोवळी हुरहूर व अनोखी स्वप्ने, निसर्गाची ओढ त्या कवितेतून धडपडू लागली. साहजिकच या कवितांत भाबडेपणाबरोबर एक निर्मळ लाजरेपणा प्रकट होऊ लागला. याच काळात कविता हे पहिलेवहिले आणि उत्कट असे प्रेमस्थान त्यांच्या कवितेत दिसू लागले. पुढे शांताबाईनी भाराभर लिहिले-वाचले तरी अक्षरब्रह्माशी प्रथम ओळख दिलेल्या धूळपाटीचे महत्त्व त्या सतत समोर ठेवत असत.

शांताबाईंच्या या काळातील एकूण कवितेत मोकळा शृंगार पुष्कळ असला तरी त्यात लिंगसंप्रदाय नाही जो अलीकडे कविता लेखनात बोकाळलेला आहे. तो केवळ, सरळ, शुद्ध निरागस आत्माविष्कार आहे. ती असामान्यांसाठी लिहिलेली नसून ती सामान्यांच्या करिताच लिहलेली आहे. उदा. द्यायचे असल्यास असे.

'उद्दाम उधळिते सुगंध श्वासातुनी
तो गुलाब कलिका नाही की मानिनी
लाजुनिया बसते लपून पूर्णान्तरी
मी साधीभोळी तुळशीची मंजिरी' (वर्षा पृष्ठ २५)

खिन्न उदास होणारे, स्वप्नामध्ये रमणारे, अमूर्त ध्येयाचा ध्यास घेणारे काव्यवेडे मन त्यात प्रतिबिंबित झालेले दिसते. त्या आपल्या या काळातील एकूण कवितांना उद्देशून म्हणतात-

'प्रिय सखये! तव संगतीत मी
रंगविले अवघे मम जीवन
स्निग्ध जिव्हाळा तुझा लाभता
पाझर फुटले पाषाणातून'

शांताबाईंची ही नितळ पारदर्शी प्रामाणिक अभिव्यक्ती आहे. सारी कविता वृत्तबद्ध आहे. त्यांनी गीत गझल, सुनीत असे प्रकार सफाईने हाताळले आहेत. यातूनच शांताबाई परंपराप्रिय असल्याचे, प्रयोगशील नसल्याचे कळते. सौंदर्यवादी वृत्तीचा आविष्कार त्यात दिसून येतो. पुढे अस्सल मराठीपण दाखवीत कविता, संस्कृत भाषेपासून दुरावलेली कविता त्या लिहू लागतात त्या अशा-

'गच्च अनोळपणाची सुटो मिठी जीवघेणी
वाचा स्वयंभू प्रकटो सारी उतरून लेणी
नको शब्दाची आरास नको निरर्थ सोहळा
एक सूर खरा लागो उंच चढवून गळा' (गोंदण)

शांताबाईंच्या कवितेने वेगवेगळी वळणे घेतली आहेत. या वळणांबरोबर ही कविता भरकटत गेली नाही. स्वतःच्या जाणिवा आणि त्याची अभिव्यक्ती या बाबतीत मात्र ती स्वतःशी अत्यंत प्रामाणिक आहे. इतर कशाचा वा कुणाच्याही अनुकरणाचा मोह तिला पडलेला नाही. जसे

'गाठ स्नेह असला तरी कधी येतात असे क्षण
दोघांच्याही मनांमध्ये दाटून येते एकटेपण' (गोंदण)

शांताबाईंची कविता वाचकांना अस्वस्थ करीत नाही. स्वतःचे उघडे वाघडे दुःख, अपमान, वंचना, पराभव या साऱ्या गाठ आणि गोष्टी कवितेत नाहीत. ही कविता १९४० पासून शेवटपर्यंत या काळातील राजकीय-

सामाजिक विचारप्रवाहापासून दूर राहिली. या काळातील वैचारिक प्रवाहापासूनही ती दूर राहिली. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानापासूनही ती कोसो मैल दूर राहिली.  त्यांच्याच शब्दांत सांगायचे, तर 'स्वतःच्या कवितेची वाट सापडण्यासाठी आणि नको त्या वाटा टाळण्यासाठी समकालीन कवितेचा उपयोग मी केला नाही. माझ्या अनुभूतीशी मी प्रामाणिक राहिले.' सारांश, या कवितेचे जीवितध्येय स्वतःशी आणि स्वतःपुरते असणे एवढेच आहे. शब्द हा शांताबाईंच्या चिंतनाचा विषय आहे. शब्दामागे अर्थ उभा असतो. शब्द त्यांना खेळवतात, कधी त्या शब्दांशी खेळतात. कोणतीही भावना, जाणीव, मनोमन अनुकरणे सोपे असते मात्र ती शब्दांतून व्यक्त करणे कष्टप्रद असते. शांताबाईंचा शब्दाशी 'निकट रक्तसंबंध' आहे.

शांताबाईंच्या कवितेत स्त्रीविषयक जाणिवा वा अनुभव व्यक्त होतात;  परंतु ती स्त्रीवादी उग्र प्रगतीची नसून परंपराप्रिय नवतेकडे झुकणारी आहे. ती स्मरणरंजन दाखवते. शांताबाईंच्या कवितेत रचनेचा साक्षेप आहे. पसरटपणा, लांबण, प्रतिमांचा किंवा अलंकाराचा किंवा छान छान शब्दांचा सोस दिसत नाही. ही कविता कमी बोलणारी, संदिग्ध आहे. मात्र ती दुर्बोध नाही. छंदोबद्ध वृत्तरचना कालबाह्य ठरली असे  शांताबाई मानत नाहीत. सुनीते त्यांनी मनःपूर्वक लिहिली. ही वृत्तबद्ध रचना निर्दोष आणि अचूक आहे. शांताबाईंचे शब्द प्रभुत्व निर्विवाद आहे. मराठी काव्यपरंपरेत रुजलेले रचनाबंध उधळून शांताबाईंनी त्यातून नवी जीवन जाणीव व्यक्त केली. ही कविता स्वतःची कविता आहे. आपल्या सुखदुःखाचे पाठबळ घेऊन ती उभी आहे. ती सौंदर्यवादी, निर्भरशील व्यक्तित्वाचे सर्व विशेष मुखर करणारी कविता आहे. स्वतःच्या स्वभावधर्मानुसार ती आपली वाट चोखाळते. ती आत्मपर पण आत्मरत नाही. लोकप्रिय-पण लोकरंजन करणारी नव्हे. परंपराप्रिय पण नवविमुख जुनाट नव्हे, अशी सत्त्वशील, प्रसन्न आणि हृदयस्पर्शी असते. शांताबाईंच्या या एकूण कवितेचे, त्यांच्या वृत्तीचे अभ्यासपूर्ण, अचूक असे रेखाटन आजच्या घडीला आणि पुढेही मार्गदर्शक ठरेल. ते प्रभा गणोरकर यांच्या शब्दांत सांगायचे असल्यास 'शांताबाईंची कविता अस्तंगत होत असलेल्या त्या आधुनिक-मराठी काव्याच्या परंपरेची शेवटची खूण आहे.' प्रभा गणोरकरांच्या या चिंतनाला आजतरी तोड



छायाचित्र । ल.म. कडू

नाही.

त्यांचे गीत लेखन हे एक स्वतंत्र दालन आहे. गीत लेखनाचे विविध अनुभव सांगताना तसेच विविध गीत दिग्दर्शकांचे प्रेरणादायी अनुभव रसिकांसमोर ठेवताना त्यांच्या लेखनाला नव्याने हुरूप येतो. तसे पाहता शांताबाईंचे गीतलेखन त्यांच्या कवितेपासून वेगळे करता येत नाही. गीत लेखनातील काव्य आणि कवितेतील गीत या उभयतांना या कवयित्रीने समान पातळीवर नेऊन त्यांची समानरेषा दाखविली आहे. ही गीते नाट्यगीते, चित्रपट गीते, स्वतंत्र गीते आपल्या अंगभूत गेयतांनी समृद्ध झाली आहेत. वस्तुतः मागणी तसा पुरवठा किंवा संगीत दिग्दर्शकांनी दिलेल्या चालीनुसार गीतलेखन यात कमालीची कारागिरी असते; परंतु शांताबाई त्यातली नेमकी अभिजात कलाकृती वाचक नव्हे रसिकांपुढे ठेवतात. शांताबाईंना लहानपणीच आपल्या घरातून श्लोक किंवा देवांची प्रार्थना, स्तोत्रे तोंडपाठ होती. त्यातली लयबद्धता त्यांनी पुढे आपल्या या गीत लेखनातून कलापूर्ण केली. शिवाय शांताबाईंना मिळालेले गान दिग्दर्शक हे अभिजात कलाकृतींची निर्मिती करणारे असल्याने एकूणातच त्यांच्या कवितांत या प्रकारात दुधात साखर

**शांताबाईंचा संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास भरपूर होता. त्यांनी 'काव्यप्रकाशात' वाचलेला 'यः कौमारहस्स एवहिवरः ता एव चैत्र क्षणाः' या श्लोकाचे मराठी अनुवादात 'तोच चंद्रमा' या शीर्षकाने नवे गाणे बाबूजींना दिले. त्यांनी या गीताची चाल, शब्दांची फेक,भावनांचा आविष्कार सारे काही सुंदर, निर्दोष उत्कट केले. रसिकांना गाण्यातले काही कळत नसूनही हे गाणे लोकप्रिय झाले. इथे काही रसिकांनी त्यांच्यावर वाङ्मयचौर्याचा आरोप केला; परंतु मूळ भाषेपेक्षा शांताबाईंचा अनुवाद अधिक चांगला वठला होता. या अनुवादानी निर्मितीच्या जवळपास येणारा निखळ, कलात्मक आनंदही खूप मोठ्या प्रमाणात मिळवून दिला.**

पडून माधुर्य अधिक वाढले. एखाद्या गीताला चाल लावणे कलेच्या दृष्टीने सोपे नसते. कवींच्या शब्दकलेवर स्वरांचा संस्कार करायचा असतो आणि तो तितक्याच तन्मयतेने गायचा असतो. कविता, दिग्दर्शकाची चाल, अर्थपूर्ण शब्दांचे सामर्थ्य आणि गायक-गायकी ह्या सर्वांचे एक माधुर्याने भरलेले रसायन रसिकांसमोर प्रगट झाले पाहिजे. शांताबाई या दृष्टीने भाग्यवान होत्या तर काहीवेळा संगीत दिग्दर्शकही. ही सारी किमया रसिकांना भुलवू लागली. ग. दि. माडगूळकरांच्या गीतात निवेदने दीर्घ असल्याने त्यांची गीते दीर्घ व कंटाळवाणी होतात. मात्र शांताबाईंची गीते आपला नेमका अनुभव गीतात टिपत असल्याने ती विस्तारापासून दुरावतात. चित्रपटातील गीतेही त्यांनी याच अंगानी लिहिली आहेत. गीत हे रसिकापुढे साध्या बोलायच्या भाषेत जणू आपण एकमेकांशी बोलतो आहेत अशा भाषेत असले पाहिजे. शांताबाईंनी नेमके हे पथ्य पाळून आपल्या गीतांचे मोल दाखविले. सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर, जितेंद्र अभिषेकी, श्रीनिवास खळे, आनंदघन,वसंत पवार इ. संगीत दिग्दर्शक शांताबाईंच्या गीतप्रतिभेचा विलास झालेले आहेत. गीत लिहून घेण्याची त्यांची चिकाटी, त्यांचा साधा व हट्टी स्वभाव त्यांना नवे अनुभव देऊन गेला. त्यांनी सांगितलेली सुधीर फडके यांची एक आठवण आपल्या दृष्टीने महत्त्वाची आहे. शांताबाईंचा संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास भरपूर होता. त्यांनी 'काव्यप्रकाशात' वाचलेला 'यः कौमारहस्स एवहिवरः ता एव चैत्र क्षणाः' या श्लोकाचे मराठी अनुवादात 'तोच चंद्रमा' या शीर्षकाने नवे गाणे बाबूजींना दिले. त्यांनी या गीताची चाल, शब्दांची फेक,भावनांचा आविष्कार सारे काही सुंदर, निर्दोष उत्कट केले. रसिकांना गाण्यातले काही कळत नसूनही हे गाणे लोकप्रिय झाले. इथे काही रसिकांनी त्यांच्यावर वाङ्मयचौर्याचा आरोप केला; परंतु मूळ भाषेपेक्षा शांताबाईंचा अनुवाद अधिक चांगला वठला होता. या अनुवादानी निर्मितीच्या जवळपास येणारा निखळ, कलात्मक आनंदही खूप मोठ्या प्रमाणात मिळवून दिला. त्यांच्यामते गीत अनुवादात नुसता आशय-उतरवायचा नसतो, तर तो तिची लय, विशिष्ट व नादाच्या पुनरावृत्तीने येणारे सूक्ष्म अंतः संगीत, अर्थाचे बारीक कंगोरे हे ही, या गीतात, त्याबरोबर अनुवादात आले पाहिजे. शब्दाला अर्थाबरोबर भावनात्मक आशयाचे वलय असावे लागते व नवा आशय संगीताला ढळ पोहोचू देत नाही. इथे मुळातली भावनिक आणि सांस्कृतिक अर्थवत्ता शांताबाईंच्या अनुवादात व बाबूजींच्या गायनात आली आहे. तसेच जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत दिग्दर्शन केलेले आणि स्वतः गायलेले 'काटा रुते कुणाला' हे नाट्यगीत (बंध रेशमाचे) असेच वळणाने अनुवादातून प्रसिद्ध झाले आहे. इथे तो अनुवाद, त्यांच्या मूळच्या कलाकृतीशी परिचय नसताना स्वतंत्रपणे आपल्याला आस्वाद्य वाटतो. तो जणू आपल्याच भाषेत लिहिलेला वाटतो. रसिकांना अशा गायनातून आनंद मिळतो. शांताबाईंची अशी काही गीते व कविता स्वतंत्र सर्जनशील निर्मितीइतकेच दर्जेदार उतरली आहेत.

शांताबाईंनी कवितालेखन आणि गीतलेखन एकाच वळणाने कलाबद्ध केले आहे. या उभयतांत कसलाच भेद नाही. हृदयनाथ मंगेशकरांबरोबर जी गीते त्यांनी गीतकार म्हणून दिली त्यात सर्जनशीलता व प्रतिभा आहे. हृदयनाथांनी जी शांताबाईची गीते दिग्दर्शित केली त्यात 'जिवलगा दूर राहिले घर माझे', 'शालू हिरवा पाचू नि मरवा', 'जाईन विचारीत रानफुला' आणि 'ही वाट दूर जाते' या खरे म्हणजे शांताबाईंच्या कविता होत्या. त्या मधली गायनानुकूलता ओळखून त्यांना सुंदर चाली

हृदयनाथांनी दिल्या. काही गीते अगोदर हृदयनाथांनी चाल दिली व त्या चालीबरोबर शांताबाईंनी शब्दबद्ध केली आहेत. 'डोलकर, डोलकर', 'राजा सारंगा' आणि 'वादळवारं सुटलं गं' ही गीते लताबाईंनी गाऊन अमर केली आहेत. इथे कवयित्री, गायिका व संगीत दिग्दर्शक असा अप्रतिम त्रिवेणी संगम पाहायला मिळतो. जितेंद्र अभिषेकी यांच्याकडे भरपूर संगीत चिजा होत्या. त्यांची स्वतंत्र विचारसरणी, साहित्याची मार्मिक चोखंदळ जाण, संस्कृत अध्ययनामुळे आलेले रेखीव सुंदर शब्दोच्चार आणि सर्जनशील प्रतिभा यामुळे अभिषेकींच्या चालींमध्ये वेगळे वैशिष्ट्य दिसून येते. शांताबाईंनी त्यांच्याबरोबर 'हे बंध रेशमाचे' या नाटकांतील गाणी केली व ती गाजली. त्यात 'काटा रुते कुणाला' हे गीत कमालीचे गाजले आहे. गायक वसंतराव देशपांडे यांनी गायलेले 'छेडियल्या तारा, ते गीत येईना जुळून' या गीतालाही अर्थपूर्ण प्रसिद्धी मिळाली आहे. संगीतकार भास्कर चंदावरकरांनी शांताबाईंच्या कवितांतल्या काही सुट्या ओळी कुशलपणे गायल्या आहेत. त्यातली सुरांची बांधणी डोळ्यापुढे नवे चित्र उभे करते. संगीत दिग्दर्शक अनुभवी असो की अननुभवी असो, गाणे यशस्वी झालेले असो की संपूर्ण अयशस्वी झालेले असो या साऱ्यातून शांताबाई काही तरी नवे मिळवीत होत्या. त्यांच्यातला कवी इथे नव्याने घडविला जात असे. संगीतकार श्रीनिवास खळे यांनी शांताबाईंची बालगीते, त्यातल्या निरागसतेबरोबर माधुर्य आणि प्रासादिक अंगाने गायली आहेत. ती आजही ताजीतवानी वाटतात. शांताबाईंना गीत या कविता प्रकारावर मनापासून श्रद्धायुक्त आनंद मिळतो. त्यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास 'असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे

फुलाफुलांत येथल्या, उद्या हसेल गीत हे'


त्यांचेच हे गीत आपली नजर नव्याने त्यावर केंद्रित होते- 'तोच चंद्रमा'-(पृष्ठ ११८) शांताबाईंचा एकूण वाङ्‌मय घटना प्रवास मागे वळून पाहिला, तर त्यात त्या ब्राह्मणेतर जातीत जन्मल्या असल्या तरी त्यांना आपल्या काळात जातीयतेची झळ कधी अनुभवायला मिळाली नाही. प्रा. माटे, प्रा. वाटवे, प्रा. जोग हे त्यांचे गुरू ब्राह्मण होते, यांपैकी कुणीही त्यांना वेगळी वागणूक दिली नाही. उलट प्रा. जोग यांनी त्यांची कवी प्रतिभाच नव्या वळणाने अभिरुचीसंपन्न केली. हीन किंवा विशेष सवलत देऊन या गुरूंनी त्यांना वागविले नाही. त्यांच्या आयुष्यात

**कविता लिहिणे, त्या छापून आलेल्या बघणे या त्यांच्या अनिवार भुका होत्या. त्याप्रमाणे कवितांबद्दल सतत बोलत राहणे, आवडलेल्या कवितांच्या ओळी बडबडत राहणे ही एक प्रखर अशी त्यांची भूक होती. या वातावरणातूनच त्या पुढे आपल्या कलाकृतीतले दोष जाणून घेऊ लागल्या. या काळातील त्यांच्या कवितेत व्याकरणशुद्धता आणि शैलीचा रेखीवपणा आला. त्यांचे गुरू रा. श्री. जोग यांनी त्यांच्या कवितेची अभिरुची घडविली. रविकिरण मंडळाच्या छायेतून ओढून काढून काव्यविषयक नव्या जाणिवांच्या वातावरणात वास्तवाच्या प्रखर आणि कठोर उन्हात ओढून आणण्याचे कार्य ज्या मर्ढेकर कवीने केले त्यांचा जिवंत प्रभाव शांताबाईंवर पडला.**

जवळपास पन्नास वर्षे शांताबाईंनी जी वेगवेगळ्या प्रकारची कविता लिहिली तीत हे सर्व स्वभाव विशेष कायम राहिले. या सर्व वाटचालीत ही कविता सखोल, अर्थगंभीर, परिपक्व आणि विकसित होत गेली; पण तिने आपले मूळ गुणधर्मही आश्चर्यकारकपणे टिकवून ठेवले, त्यात कधीही बदल केला नाही. उलट कवितालेखनातून कृतार्थतेचे क्षण मिळविले. मुख्य म्हणजे छंदातून धंदा आणि धंद्यातून अलग होऊन पुन्हा साचलेले छंदाचे साफल्य असा हा प्रवास घडत गेला आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, 'महत्त्व आहे ते पुन्हा माझ्या छंदाचे. आनंद आहे, कृतार्थता आहे ती त्याच्या आनंद साधनेत, सतत पाठपुराव्यात. हा पाठपुरावा कधी संपू नये असे वाटते. आणि तो संपणारही नाही असे वाटते, (धूळपाटी, पृष्ठ २१६) जन्मशताब्दीनिमित्त त्यांना अभिवादन!

**मधु जामकर**
दिलासा, स्नेहनगर, परळी, वैजनाथ, बीड. ४३१५१५
चलभाष : ९८५०२९४६८६

◆◆



# गेल ऑम्वेट यांच्या लेखनातील संत परंपरा आणि सांस्कृतिक राजकारण : पहिले वाचन

डॉ. अनिल सपकाळ

**ख्यातकीर्त समाजशास्त्रज्ञ आणि विचारवंत गेल ऑम्वेट यांच्या लेखनातील संत परंपरा आणि सांस्कृतिक राजकारण यामधील परस्परसंबंधांवर प्रकाश टाकणारा संशोधन लेख.**

आधुनिक मूल्यव्यवस्था स्वीकारून वासाहतिक काळातील जी वैचारिक मांडणी पुढे आली ती पाश्चिमात्य अभ्यासकांची परंपरा निर्माण करणारी होती तशीच एतद्देशीय अभ्यासकांची होती. प्रादेशिकतेचा अभ्यास मोठ्या प्रमाणात सुरू झाला आणि पाश्चिमात्य अभ्यासकांनी भारताच्या अभ्यासाला महत्त्व दिले. हा अभ्यास दोन क्षेत्रात विभागला गेला, एक गौरवपर आणि दुसरा चिकित्सक. प्राय: वसाहतवादी कालखंडातील हा अभ्यास संस्कृतीनिष्ठ अभ्यास म्हणून पुढे आला. भारताविषयीची पुढे आलेली ही मांडणी ऐतिहासिक भौतिकवादाच्या अनुषंगाने गेल ऑम्वेट आणि एलिनॉर झेलिएट यांनी पुढे नेली. गेल ऑम्वेट यांचे सांस्कृतिक हस्तक्षेपाचे राजकारण, तसेच एलिनॉर झेलिएट यांचे सांस्कृतिक भांडवल आणि सांस्कृतिक पुनर्मूल्यांचे राजकारण आहे. या दोन्ही अभ्यासकांनी जागतिक स्तरावर फुले, आंबेडकरी विचारव्युहाला अवकाश प्राप्त करून दिला. गेल ऑम्वेट यांनी वसाहतवादी काळातील ज्ञानव्यवहाराची चिकित्सक हस्तक्षेपाची चौकट विस्तीर्ण केली.

गेल ऑम्वेट यांनी 'वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड' या आपल्या प्रबंधापासून प्रादेशिक अभ्यासाचे जात, वर्ग, स्त्रीदास्यान्ताचे भौतिक आणि सांस्कृतिक आधार शोधायला प्रारंभ केला. मध्ययुगीन कालखंड ते समकाल हा त्यांचा अभ्यासाचा विषय. गेल ऑम्वेट यांचा वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, (भाषांतर – पी. डी. दिघे, सुगावा प्रकाशन, पुणे) हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ. भारतातील ब्राह्मणेतर चळवळीचे त्यांनी भौतिक दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण करत या ग्रंथात गेल ऑम्वेट, भौतिक आधारांबरोबर सांस्कृतिक आधारही चिकित्सेला घेतले आहेत.

भक्तिमार्ग चळवळ हे पारंपरिक सांस्कृतिक बंडाचे महाराष्ट्रीय स्वरूप होते; परंतु त्यातील सर्वांत लोकप्रिय व टिकून राहिलेला असा वारकरी पंथ केवळ सनातन धर्माविरुद्धच नव्हे, तर जास्त पुरोगामी चळवळीविरुद्धही काही काळ झगडा करूनच यशस्वी झाला. यादवांच्या सत्तेच्या काळात विविध प्रकारच्या अनेक धार्मिक चळवळींनी, ब्राह्मण सनातन धर्माच्या सांस्कृतिक वर्चस्वाविरुद्ध महत्त्वाची आव्हाने उभी केली होती. बौद्धधर्माचे अवशेष लोप पावू लागले होते; परंतु जैनधर्म जोरात होता. कानडी भाषिकांतील लिंगायत, मराठी भाषिकांतील नाथपंथी आणि महानुभावी जातीयता–संप्रदाय विरोधी गट, जनतेत पाठिंबा मिळविण्याकरिता एकमेकांशी स्पर्धा करीत होते. अशी त्या मांडणी करतात. (पृ.०७, महाराष्ट्रः जनता व तिचा इतिहास, वासाहतिक



समाजातील सांस्कृतिक बंड, गेल ऑम्वेट, भाषांतर-पी. डी. दिघे, सुगावा प्रकाशन, पुणे) प्रस्तुत ग्रंथात केवळ वारकरी संप्रदायच नव्हे तर पंथाकडे चिकित्सक पद्धतीने त्या पाहतात आणि त्यातील द्वंद्व अधोरेखित करतात.

वारकरी पंथामध्ये वस्तुतः एकमेकांशी संघर्ष असलेल्या अशा जातीपद्धतीचा सनातनीपणा आणि जातीविरोधी समतावादी प्रेरणा अशा दोन विचारसरणींमधील बऱ्याच अंशी तडजोड घडवून आणणारा एक मिलाप झालेला होता. (पृ.०८,महाराष्ट्रः जनता व तिचा इतिहास, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, गेल ऑम्वेट, भाषांतर-पी.डी.दिघे, सुगावा प्रकाशन, पुणे)

संत तुकोबांच्या अभंगातील जाती विरोध, सांसारिक जीवन याविषयी लिहितानाच त्या रामदासांनी शिवाजी महाराजांना स्फूर्ती दिली याला फारच थोडा तुटपुंजा पुरावा आहे असे निरीक्षण नोंदवतात. (पृ. ११). संत तुकोबा आणि संत रामदास या एकमेकांशी संघर्ष करणाऱ्या सांस्कृतिक विचारधारा होत्या अशी भूमिका घेतात.

महाराष्ट्रातील भक्तिमार्गाची चिकित्सा करताना महादेव गोविंद रानड्यांची आणि सरदेसाई यांची भूमिका विशद करतात, भक्तिमार्ग परंपरा, निवांत व बिनराजकीय उद्दिष्टे व तितक्याच प्रमाणात ब्राह्मणांची कर्मकांडे यामुळेच शास्त्र व धर्मनिरपेक्षता यांपासून सामान्य जनता लांब गेली. या सरदेसाई यांच्या विवेचनाचा आधार देत पुढे लिहितात की, पेशव्यांनी पार पाडलेल्या भूमिकेसंबंधी आणि भक्तिमार्गाच्या नकारात्मक भूमिकेसंबंधी त्या काळाच्या सनातन विचाराच्या परंपरेचा वरचष्मा राहिला. म्हणजेच भक्तिमार्ग पुढच्या टप्प्यात निष्क्रिय झाला असे नमूद करतात. उलट वारकरी पंथ हा सत्यशोधक समाजाला पर्याय म्हणून पुढे आल्याचे त्या निरीक्षण नोंदवतात. याला आधार देण्यासाठी ब्राह्मणेतर सांस्कृतिक क्रांतिकारक ही संकल्पना वापरतात. वारकरी पंथाच्या सनातनी भूमिका घेण्याने ब्राह्मणेतर मंडळीस सांस्कृतिक हस्तक्षेपास वाव मिळाला. ज्यातून बहुजन समाज तयार झाला असे गेल ऑम्वेट म्हणतात. तसेच जाती नष्ट करण्याचा झगडा हे सांस्कृतिक बंड आहे असे त्या प्रतिपादतात. पाश्चात्त्य अभ्यासकांनी सांस्कृतिक उठावाकडे जास्त दुर्लक्ष केले आहे त्या ऐवजी राष्ट्रवादी उच्चवर्णीयांच्या परंपरा आणि आधुनिकता यांचा मिलाफ करण्याच्या प्रयत्नावर भर दिला. (३४२) यातील लोकहितवादी, गोपाळ गणेश आगरकर, अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा वेगळा विचार करता येईल.

सारांश, वारकरी चळवळ स्वतंत्र सांस्कृतिक चळवळ असली तरी तिचे ब्राह्मणीकरण होत गेले असे पाहावयास मिळते, सत्यशोधक चळवळ वारकरी चळवळीपेक्षा भिन्न आहे असे दिसते. ती जाती विरोध करणारी आहे. वारकऱ्यांचा जाती विरोध करणारा तुकाराम हा सत्यशोधकांचा ब्राह्मणेतर सांस्कृतिक क्रांतिकारक होतो, असे प्रतिपादन गेल ऑम्वेट यांच्या विवेचनाचे सूत्र आहे; परंतु सत्यशोधकी चळवळीचा जाती अंताचा कार्यक्रम होता का? आणि तो पूर्ण झाला का? याविषयी त्या भूमिका घेत नाहीत. वारकरी संप्रदायाची चिकित्सा करताना संत चोखामेळा यांच्या विटाळाच्या अभंगाचा दाखला देत वारकरी संप्रदायातील जातीयता स्पष्ट करत भालचंद्र नेमाडे म्हणतात, 'एकूण ही कर्मठ जातीयतेची कीड वारकरी तत्त्वज्ञानाला मुळापासूनच पोखरत आली आणि चोखामेळा ही मराठी संस्कृतीची जन्मखूण ठरली. पुढे आंबेडकरी भीमटोला बसून ह्या उदारमतवादी देखाव्याचा शेवट झाला आणि वारकऱ्यांनी वाळवंटी मांडलेला हा समतेचा खेळ संपुष्टात आला.' (प्रस्तावना, श्री संत चोखामेळा चरित्र आणि अभंग, शब्दालय प्रकाशन,

**बुद्धिझममुळे भक्ती चळवळ प्रभावीत झालेली आहे. या चळवळी सनातनी ब्राह्मणांच्या विरोधात प्रोटेस्ट मुव्हमेंट आहेत. (१८७ ) तुकारामांच्या संदर्भात त्या 'बरे झालो देवा कुणबी केलो' ही भूमिका मांडतात. कुणबी होणे म्हणजे जमिनीशी नाते जोडणे. भूमिस्पर्शी असणे. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या 'विद्रोही तुकाराम'च्या आधारे त्या आपली मांडणी पुढे नेतात. संत तुकाराम हे भिक्खू आहेत या श्री. जावळे यांच्या विधानाचा विस्तार करताना त्या लिहितात,** "Tukaram for instance, was trying meditation, which was not in the Varakari tradition. "But,through he describes many mystical experiences throughout his poem his real 'enlightenment' seems to have come many years later, towards the end of his life, when he sat for 15 days and achieved an illumination which in many ways is as mysterious as that of the Buddha.'

दुसरी आवृत्ती १९९८)

'जाति का ऐतिहासिक भौतिकवादी पहला सिद्धांत फुले का था और बीसवी शताब्दी में उपन्न होनेवाले दलित तथा गैर ब्राह्मण आंदोलनोंके लिए इस सिद्धांत ने कई विचार दिए (१६) महात्मा फुले यांनी आर्यवादी सिद्धांताचे प्रजातीय परिप्रेक्ष्यात प्रयोग केले, असे गेल ऑम्वेट 'दलित आणि प्रजातान्त्रिक क्रांती' या आपल्या ग्रंथात प्रतिपादतात. फुलेवादी विचार क्रांतीचे बीज घेऊन त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित आंदोलनाची ऐतिहासिक चिकित्सा करतात. हिंदू भारत ते बौद्ध भारत हे सूत्र अधोरेखित करतात. हे सिद्धांतन सांस्कृतिक मूल्य व्यवहारासंदर्भात विशेषतः भक्ती परंपरेच्या संदर्भात येते. इथे आर्थिक, सामाजिक प्रश्नांची चर्चा अधिक केंद्रवर्ती आहे. या ग्रंथामध्ये आंबेडकरवाद दलित मुक्ती का सिद्धांत मांडताना गेल ऑम्वेट बौद्ध धर्म आणि साम्यवाद यांची चर्चा करतात. (२४०) या ग्रंथात संक्षिप्त स्वरूपात आलेली 'बुद्धिझम इन इंडिया: चॅलेन्जेस ब्राह्मनिझम अँड कास्ट' या ग्रंथात विस्ताराने येते. बौद्ध मताची मांडणी करत गेल ऑम्वेट बौद्ध धर्मानंतर आलेल्या भक्ती परंपरेचा वेध घेतात. (२००३) भारतातील विविध प्रदेशांतील भक्ती परंपरेचा वेध घेत आपल्या वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड या पहिल्या ग्रंथात बौद्ध परंपरेला न जोडलेली भक्ती परंपरा बौद्ध धर्माला जोडतात. त्या लिहितात, बुद्धिझममुळे भक्ती चळवळ प्रभावीत झालेली आहे. या चळवळी सनातनी ब्राह्मणांच्या विरोधात प्रोटेस्ट मुव्हमेंट आहेत. (१८७ ) तुकारामांच्या संदर्भात त्या 'बरे झालो देवा कुणबी केलो' ही भूमिका मांडतात. कुणबी होणे म्हणजे जमिनीशी नाते जोडणे. भूमिस्पर्शी असणे. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या 'विद्रोही तुकाराम'च्या आधारे त्या आपली मांडणी पुढे नेतात. संत तुकाराम हे भिक्खू आहेत या श्री. जावळे यांच्या विधानाचा विस्तार करताना त्या लिहितात, 'Tukaram for instance, was trying meditation, which was not in the Varakari tradition. "But,through he describes many mystical experiences throughout his poem his real 'enlightenment' seems to have come many years later, towards the end of his life, when he sat for 15 days and achieved an illumination which in many ways is as mysterious as that of the Buddha.' गेल ऑम्वेट तुकारामाच्या अभंगाचा दाखला देतात, 'मीचि मज व्यालो/पोटा आपुलिया आलो/१/ आता पुरले नवस / निरसोनी गेली आस /धृ / जालो बरा वळी/ गेलो मरोनि तेकाळी /२/ दोहींकडे पाहे / तुका आहे तैसा आहे.//३// Here the emphasis on own experience and on passions and their control appears Buddhistic.'

तुकारामांच्या अभंगाशिवाय गेल ऑम्वेट तुकाराम शिष्या बहिणाबाई यांच्या काव्याचे संदर्भ देतात. तसेच बहिणाबाईने अनुवादित केलेल्या अश्वघोषाच्या वज्रसूचीचे संदर्भ अधोरेखित करतात. बहिणाबाईच्या काव्याचे विविध तपशील देतात, त्या बौद्ध मत अधोरेखित करतात. सीकिंग बेगमपुरा (२००८) या आपल्या लेख संग्रहात गेल ऑम्वेट बहिणाईवर स्वतंत्र लेखन करतात. भक्तिमार्गाचा विरोध हा ब्राह्मणवाद, जात आणि पितृसत्ता यांना आहे असे त्या नमूद करतात. (२१५) सीकिंग बेगमपुरा या ग्रंथात भक्ती परंपरेची सूत्रे मांडताना त्या संत नामदेव यांच्या अभंगांच्या अनुषंगाने आपली मते नोंदवतात.

तुकोबा हा गेल ऑम्वेट यांच्या जिव्हाळ्याचा विषय. 'द सॉग्ज ऑफ तुकोबा' हे २०१२ मध्ये प्रकाशित झालेले त्यांचे पुस्तक. हा तुकोबांच्या निवडक अभंगाचा अनुवाद. गेल ऑम्वेट आणि भारत पाटणकर यांनी तो केला आहे. तुकाराम, पुन्हा तुकाराम भालचंद्र नेमाडे आणि दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचे अभ्यास. कवक कवी तुकाराम यांचे इंग्रजी भाषेतील अभ्यासकांसाठी, वाचकांसाठी त्यांचे निरुपण त्यात केलेले आहे. तुकाराम दर्शन, विद्रोही तुकाराम आणि गेल ऑम्वेट भूमिका हाही अधिक चिंतनाचा विषय होऊ शकतो. हा अभ्यास करण्यासाठी द सॉग्ज ऑफ तुकोबाची ढोबळ मांडणी पाहावी लागेल. प्रस्तावना आणि विषयानुसार निवडक अभंगाचे अनुवाद हा रचनाबंध स्वीकारला आहे.

तुका झालासे कळस या बहिणाबाईच्या काव्याच्या पंक्तीचा आधार घेत गेल आणि भारत तुकोबाची पुनर्मांडणी करतात. तुकोबाच्या अभंगाची वैयक्तिक / आत्मकथनात्मक, शिवाजी महाराजांच्या भेटीस नकार, आम्ही वारकरी, सामाजिक आणि धार्मिक चिकित्सा, धार्मिक प्रश्न आणि इतर अभंगांमध्ये विभागणी करून वेगळा तुकोबा अनुवादित करतात.

तुकोबा ब्राह्मणी परंपरेविरुद्ध विद्रोह करतो आणि संघर्ष उभा राहतो त्याचे सामाजिक अन्वयार्थ गेल ऑम्वेट आणि भारत पाटणकर आपल्या विवेचनात आणतात. बंडखोर ते विद्रोही मांडणी अधोरेखित करतात. डॉ. आ. ह. साळुंखे आपल्या विद्रोही तुकाराम या ग्रंथात (१९९७) तुकोबाच्या विद्रोहामुळे, तुकोबाने ज्ञानाच्या क्षेत्रात हस्तक्षेप केल्यामुळे तुकोबाला मृत्युदंडाला सामोरे जावे लागल्याचे प्रतिपादतात. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या या विचारांचा धागा पुढे नेत गेल ऑम्वेट आणि भारत पाटणकर 'द साँग्ज ऑफ तुकोबा' त आपल्या विवेचनाचा रचनाबंध उभा करतात. कवीची बांधिलकी आणि कवीने केलेला ज्ञान व्यवहारातील हस्तक्षेप अधोरेखित करतात. तो अलौकिक-पारकौकिक पदार्थ विषय बनवीत नाहीत, तर लौकिक जीवनातील जात-वर्ग-स्त्रीदास्याची समर्थ मांडणी उभा करतो. तो तौलनिक सांस्कृतिक राजकारणातून उभा राहतो. शिवाजी महाराजांनी रामदास स्वामींची नाकारलेली भेट कथन करत असताना महिपतीच्या काव्याचा दाखला देऊन गेल ऑम्वेट आणि भारत पाटणकर अंतर संहिता वाचन करतात. अनुवादक म्हणून आपले वेगळेपण 'A Note on language and our translation' आणि 'on translation' या विवेचनात करतात. त्यांनी अनुवादासाठी निवडलेल्या अभंगात एक अभंग आहे, पंढरीचे बा भूत मोटे / आल्या गेल्या झडपी वाटे / तेथे जाऊ नका कोणी / गेले नाही आले परतोनि / तुका पंढरीसी गेला / पुन्हा जन्मा नाही आला ।

Two essays on caste मध्ये भारतातील भक्ती परंपरेची चिकित्सा करताना गेल ऐतिहासिक भौतिक वादाची मांडणी स्वीकारतात. भक्ती परंपरेचा आलेख रेखाटताना त्या म्हणतात, 'भारताच्या विविध भागात भक्ती आंदोलन उभे राहिले. या आंदोलनांनी ब्राह्मणवाद आणि जाती व्यवस्था यांच्यापुढे आव्हान उभे केले. हे आव्हान होते मानवी जीवनातील सममूल्य संकल्पनांचे आणि दिव्य आनंदाचे.' (गेल २०१३)

संतांनी पुरोहित संस्कार नाकारले आणि समानतेचा उपदेश केला. संतांचा हा कृतिशील वारसा १३ व्या शतकात सुरू झाला. भारतातील विविध प्रदेशांतील संतांचा अन्वयार्थ लावत गेल आपला अधिक भर सतराव्या शतकातील कुणबी असलेल्या तुकोबावर देतात. त्या वर्ण आणि जातीचा गौरव विसरणे ही भूमिका घेणाऱ्या विद्रोही तुकोबाला आपल्या विवेचनाचे केंद्र करतात. १८ व्या शतकातील समन्वय अथवा अनुकुलीकरण आणि शोषण प्रक्रियेची प्रक्रिया रूढीवादी चौकट घेते. तो त्यांचा महत्त्वपूर्ण वारसा होता, असे गेल ऑम्वेट म्हणतात. हा वारसा वसाहतवादी काळातील हस्तक्षेपाशी आणि त्यानंतर आंबेडकरी धम्म जाणिवांशी जोडतात. भारतीय संस्कृती अभ्यासाचा व्यापक अवकाश आपल्या ज्ञान व्यवहाराचा भाग बनवून जागतिक स्तरावर हस्तक्षेपाची नवी व्यूहरचना करतात.

**डॉ. अनिल सपकाळ,**
प्राध्यापक, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
चलभाष : ८३५५९३१०९२
email : dranilsapkal@mu.ac.in

◆◆

(सदर लेख 'परिवर्तनाचा वाटसरू' या नियतकालिकामध्ये
१ ते १५ सप्टेंबर २०२१ च्या अंकात प्रकाशित झालेला आहे.)

# अनुताई वाघ यांचे शैक्षणिक व साहित्यिक योगदान

प्रा. क्रांती हरेश पैठणकर

**ख्यातकीर्त समाजसेवक, आदिवासींच्या विकासासाठी झटणाऱ्या विचारवंत अनुताई वाघ यांच्या साहित्यिक आणि शैक्षणिक कार्याची माहिती देणारा लेख.**

प्रबोधनाची परंपरा महाराष्ट्राला फार प्राचीन काळापासून असलेली आपणास दिसते. संतांनीसुद्धा भक्ती बरोबरच समाज प्रबोधन केलेले दिसून येते. इंग्रजांच्या आगमनानंतर ही परंपरा अधिक गतिमान व व्यापक झालेली दिसते. क्रांतिबा ज्योतिबा फुले यांनी प्रथम भारत वर्षामध्ये बहुजनांच्या मुलांसाठी शिक्षणाची मुहूर्तमेढ रचलेली दिसून येते. सावित्रीबाई फुले यांनीही ज्योतिबांच्या खांद्याला खांदा लावून ही परंपरा पुढे नेली म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील उत्तरार्ध व विसावे शतक प्रबोधनाचे युग म्हणून ओळखले जाते. अशा समाजसुधारकांच्या कामाने प्रेरित होऊन, विचारांनी प्रेरित होऊन हजारो लाखो भारतीय व्यक्ती वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपले योगदान देऊ लागल्या. विशेषतः सामाजिक सुधारणा, स्त्री मुक्ती व शिक्षण या क्षेत्रामध्ये अनेक तरुण तरुणी त्याकाळी हिरिरीने भाग घेऊन उतरलेले दिसतात. इंग्रजांनी सुरू केलेल्या औपचारिक शिक्षणाची भारतीय समाजाला सवय नव्हती म्हणून भारतातल्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये जातीय समूहांमध्ये शिक्षण देत असताना त्यात वेगवेगळे बदल करणे गरजेचे होते. असे शिक्षणामध्ये वेगवेगळे प्रयोग करत, बदल करत सामान्यातल्या सामान्य माणसापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे काम अनुताई वाघ यांनी आपल्या जीवनामध्ये केलेले दिसते.

**अनुताई यांचे शैक्षणिक कार्य–**

अनुताई वाघ या बालविधवा होत्या. त्यांच्या आई–वडिलांनी त्यांना वाचनाची आवड लावली व त्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. अर्थातच शिक्षणामुळे होणारा बदल याची अनुभूती अनुताईंनी स्वतः घेतली होती. पुढे ताराबाई मोडक यांच्या सान्निध्यात आल्यानंतर त्यांच्या मनात असलेल्या शिक्षणाच्या ठिणगीने अखंड तेवणाऱ्या समईचे रूप घेतलेले आपणास दिसते. शिक्षक म्हणजे नेमके काय, विद्यार्थ्यांना शिक्षित करणे म्हणजे काय? सर्वांगीण शिक्षण देणे म्हणजे काय? आदिवासी पाड्यांमध्ये शिक्षण कसे दिले जावे? शिक्षणाकडे विद्यार्थ्यांना व पालकांना सकारात्मकदृष्ट्या कसे सामील करून घेतले जाते? भारतासारख्या विविध जाती, पंथ, प्रदेश यांसारख्या विभागलेल्या समाजाला, की ज्यांच्या वेगवेगळ्या बोलीभाषा आहेत त्यांना नेमके कसे शिक्षण दिले पाहिजे? अध्यापनाची परिभाषा, अध्यापनाचे विषय, अध्यापनाच्या पद्धती, अध्यापनाचे ठिकाण यात कोणते व कसे बदल केले पाहिजेत? या सर्वांची उत्तरे अनुताईंच्या कार्यातून आपणास मिळतात.

'कोसबाडच्या टेकडीवरून' हे त्यांचे आत्मचरित्र

१९८० ला प्रकाशित झाले. त्यातून त्यांच्या कार्याचा, प्रयोगाचा व एका आदर्श शिक्षकाचा प्रवास पाहावयास मिळतो. १९५६ साली त्या कोसबाडला आल्या. या अगोदर त्यांनी चांदवड, पिंपळगाव बसवंत व पुण्यातील नामांकित अशा हुजूरपागा शाळेत अध्यापनाचे काम केले होते. १९४२ च्या चले जाव आंदोलनात स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनुताईंच्या बहिणीने सक्रिय सहभाग घेतला होता व तुरुंगवासही भोगला होता. त्या वेळी आपण या लढ्यात उतरलो नाही याची खंत अनुताईंना सतत वाटत होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्र उभारणीत बलिदानाची आहुती दिली पाहिजे, तरच स्वातंत्र्याला काही एक अर्थ प्राप्त होईल या ऊर्मीने भारून इतरांबरोबरच अनुताईसुद्धा अशाच उपेक्षित व आदिवासी समाजापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे या आंतरिक ऊर्मीतून बोर्डी व कोसबाडसारख्या दुर्गम व मागासलेल्या भागात अध्यापनाची सेवा करण्यासाठी गेल्या.

अनुताई यांचे शैक्षणिक प्रयोग–

कोसबाडच्या त्या माळरानावर आदिवासींसाठी वेगवेगळे अभिनव असे उपक्रम, नावीन्यपूर्ण अशा अध्यापन पद्धती निर्माण करत आदिवासी मुलांना त्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आत्यंतिक अशा देशप्रेमातून हे शक्य झाले. आपले ध्येय, आपल्या निष्ठा देशाप्रति समर्पित करणाऱ्या अनुताईंनी देशसेवा करते याचे स्तोम माजवलेले मात्र दिसत नाही. पदरमोड करून, प्रसंगी हुजूरपागा येथील मानाची नोकरी सोडून त्यांनी हा खडतर मार्ग पत्करला. अनुताईंनी नोकरीसाठी नोकरी न करता या आदिवासींच्या जीवनाचा एक भाग होत, त्यांच्यामध्ये राहून, त्यांच्यात मिसळून ही परिवर्तनाची लढाई मोठ्या जिद्दीने लढली, म्हणूनच त्या केवळ शिक्षिका म्हणून नाही तर या वारली आदिवासींच्या आई म्हणून पुढे आलेल्या दिसून येतात.

बोरिवली येथील शिबिराने अनुताईंच्या आयुष्याला एक वेगळेच वळण मिळालेले दिसून येते. या शिबिरानंतर काही काळ अनुताईंनी मुंबईला ताराबाई मोडक यांच्या शिशुविहारमध्ये काम केले. याच काळात विक्रम साराभाई यांच्या माता सरलादेवी यांनी त्यांच्यावर अनेक संस्कार केले. सप्टेंबर १९४५ साली ताराबाई मोडक यांनी अनुताईंना आघाडीच्या सैनिक म्हणून पूर्वतयारीसाठी



बोर्डीला पाठवले. याविषयी बोलताना अनुताई म्हणतात, 'अशा रीतीने सांधा पूर्णपणे बदलून माझ्या आयुष्याची गाडी बोर्डीच्या रुळावर आली. मी बोर्डीला गेले आणि माझ्या जीवनाचा सूर मला सापडला.'

१९४५ ते १९५६ अशी बारा वर्षं अनुताई बोर्डीला होत्या. त्यांच्या सामाजिक कामाचा आरंभही येथेच झाला. अनुताई ताराबाईंच्या शिष्या. त्यांच्यातील गुरू शिष्याचा भावही इथेच फुललेला दिसतो. बालवाडी कशी चालवावी हा प्रयोग करण्यासाठीच अनुताई आणि त्यांचे सहकारी बोर्डीला आलेले होते. यादरम्यान घडलेल्या अनेक घटना–प्रसंगांमुळे अनुताईंच्या जीवनाला कलाटणी मिळाली. १९४६ साली पहिला प्रशिक्षण वर्ग बोर्डीला सुरू झाला. अचानक अनुताईंवर बालवाडी शिक्षिका व गृहमाता अशा दोन मुख्य कामांची जबाबदारी आली. या अनपेक्षित अशा जबाबदारीने अनुताईंचे भावविश्व बदलले. त्या म्हणतात, 'अखिल भारतामधून आलेल्या या विद्यार्थिनींकडूनही खूप शिकायला मिळाले. चालीरीती, भगिनींवरील अन्याय, देशाचे दारिद्र्य व इतर प्रश्नांची जवळून ओळख झाली.' एकूणच या प्रशिक्षण वर्गामुळे किंवा गुजरातमधील बालमंदिरांचे निरीक्षण करण्याची जबाबदारीही ताराबाईंनी अनुताईंवर

सोपवल्यामुळे बालवाडी या क्षेत्रात अनुताईंनी भरीव कार्य केले. त्यांची पायाभरणी या कामामुळे, त्यातील अनुभवांमुळे झालेली दिसून येते.

बोर्डी– कोसबाडसारख्या दुर्गम, सामाजिकदृष्ट्या विकासप्रवाहापासून कोसो दूर असलेल्या, शिक्षणाचा अभाव व आरोग्याचे अज्ञान असलेल्या आदिवासी मुलांसाठी, आदिवासी बंधू–भगिनींसाठी अनुताईंनी अपार कष्ट घेतले. या मुलांना शाळेपर्यंत आणणे हेच मोठे दिव्य; पण तेही त्यांनी लीलया पेलले. बोर्डी व नंतर कोसबाड येथे बालशिक्षणाचे विविध प्रयोग त्यांनी केले. आदिवासींचे प्रश्न समजून घेत त्यादृष्टीने बाल शिक्षणाच्या प्रवाहात अनेक नवनव्या संकल्पना त्यांनी राबविल्या. बालांची वाडी असलेली वाडी म्हणजे 'बालवाडी' तर मुले शाळेच्या अंगणात येत नाही म्हणून आपणच त्यांच्या अंगणात जायचे यातून आकाराला आली 'अंगणवाडी.' पाळणाघरे, बालवाड्या व त्यांना जोडून प्राथमिक शाळा यातून साकार झाली ती 'विकास वाडी.' इतकेच नाही तर कोसबाड परिसरातील आदिवासी महिलांसाठी 'प्रौढ शिक्षण योजना महिला मेळावे' व विकास वाडी चालविणारे शिक्षक तयार करण्यासाठी 'विकासवाडी अध्यापक विद्यालय', 'कुरणात गुरे चारावयाला जाणाऱ्या मुलांसाठी 'कुरणशाळा', 'रात्रीची स्वयंभू शाळा', 'किसान शाळा', पाळणाघरे व शाळांना जोडून असणारी 'आरोग्य प्रकल्प केंद्रे' इत्यादी अनेक नवनव्या अध्यापन पद्धती व नावीन्यपूर्ण व उपयुक्त असे उपक्रम अनुताईंनी बोर्डी व कोसबाड परिसरात राबविले. हे सर्व उपक्रम, अध्यापन पद्धती कुठल्या पुस्तकातून किंवा कुठल्या अभ्यासक्रमातून अनुताईंनी उचलल्या नाहीत तर त्यांना हे कार्य करताना ज्या समस्या आल्या, अडचणी जाणवल्या त्यावर मात करताना ध्येयवादी, तत्त्वनिष्ठ, समर्पणशील वृत्तीच्या अनुताईंच्या विचारांतून, प्रयोगांतून त्या आकाराला आलेल्या दिसतात.

कोसबाडसारख्या दुर्गम भागात आदिवासींच्या जीवनाला आकार देण्याचे, दिशा देण्याचे काम करणाऱ्या अनुताईंनी अनंत अडचणींवर मात करत आदिवासींमध्ये मिसळून, त्यांची होऊन, त्यांची मने जिंकत शिक्षणाचा व आनंदी जीवनाचा वसा असा घराघरात पेरला. अगदी त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर, 'अडचणी जेवढ्या बिकट तेवढा आमचा उत्साह दांडगा हा आमच्या ताईंचा स्थायिभाव, त्यांचा आदेश पाळणे हा आमचा स्थायिभाव' एकूणच ताराबाईं मोडक यांची प्रेरणा व खंबीर पाठिंबा यामुळे अनुताईंनी कोसबाडच्या टेकडीवर शिक्षणाची आनंदाची बाग फुलवली. या प्रवासात आलेल्या अनंत अडचणींनी, अनुभवांनी त्यांच्या जीवनाला कलाटणी दिली. अनुताई केवळ  शिक्षिकाच नाहीतर गृहमाता, ग्रामसेविका, आरोग्यसेविका व या आदिवासी मुलांच्या आईही झाल्याचे दिसून येते.

**अनुताईंना आलेल्या समस्या व त्यातून काढलेले मार्ग–**

कुटुंबातून मिळालेला देशसेवेचा वसा व झोकून देऊन काम करण्याची वृत्ती यामुळे अनुताईंनी बोर्डी व कोसबाडसारख्या दुर्गम भागात आदिवासींच्या विकासासाठी भरीव अशा स्वरूपाचे कार्य केलेले दिसते. हे कार्य करत असताना अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागले. या दुर्गम भागात शिक्षणाविषयीची अनास्था तर होतीच; पण याहीपेक्षा बिकट असे प्रश्न आ वासून उभे होते. आदिवासींचा आहार, त्यांचे जीवनमान, राहणीमान, त्यांचे आरोग्य, अंधश्रद्धा, रूढी परंपरा, समजुती इत्यादी अनेक गोष्टींना अनुताईंना तोंड द्यावे लागले. बोर्डीला बालवाडीला लागूनच हरीजनांची वस्ती होती. हरीजनांची मुले शाळेत येतात, शिवाशिव होते म्हणून सवर्णांची मुले शाळेत येईनात. एकदा भंग्यांची  मुले शाळेत आली म्हणून, हरीजनांची मुले घरी निघून गेली. हा स्पृश्यास्पृश्यतेचा प्रश्न सोडवताना एकदा चिडून अनुताई ताराताईंना म्हणाल्या, 'ताई आपण गाव बदलू या!' त्यावर ताईंनी शांतपणे सांगितले, 'मुळीच नाही. मळलेल्या पायवाटेने कुणीही जाईल. आपल्याला नवी पायवाट पकडायची आहे. तेथे काटेकुटे, खाच–खळगे, झाडेझुडपे असणारच! विषारी जनावरे आणि हिंस्त्र पशूही असणार. विचाराने आणि निर्धाराने आपण पावले टाकीत गेलो तर ही जागा नंदनवन होईल.' हा ताराताईंचा बहुमोल मंत्र अनुताईंनी आजन्म सांभाळून ठेवला व या ठिकाणी लोकांची मने  जिंकून घेत बालशिक्षण क्षेत्रात अनेक प्रयोग यशस्वीपणे राबविलेले दिसतात.

मुले शाळेत येऊ शकत नाहीत म्हणून शाळाच मुलांच्या अंगणात न्यायची यातून अंगणवाडीचा जन्म

झाला. या अंगणवाडी कार्यक्रमामुळे अनुताईंना आदिवासींचे जीवन जवळून पाहायला मिळाले. मुले शाळेत का येत नाहीत? याची कारणे समजली व मुलांच्या गरजा पुरवणारी शाळा असावी या अनुताईंच्या चिंतनातून साकार झाली विकासवाडी, म्हणजेच पाळणाघर तान्ह्या मुलांसाठी, तीन ते सहा वर्षांच्या मुलांसाठी बालवाडी आणि शाळेचे नावही न ऐकलेल्या आठ ते दहा वर्षे वयाच्या मुलांसाठी इयत्ता पहिली अशी पाळणाघर, बालवाडी व प्राथमिक शाळा एकत्र असणारी अभिनव शाळा अनुताईंनी साकार केलेली दिसते.

निसर्गाच्या सान्निध्यात राहणारी ही आदिवासी मुले भूगोलाच्या नावाने मात्र बिचकायची. येथेही अनुताईंनी प्रात्यक्षिकातून शिक्षण देऊन ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. यासाठी त्यांनी अष्टदिशांवर आधारित कवायत व खेळ घेतले. बोर्डीच्या गुरुवारच्या साप्ताहिक बाजारास भेट दिली. मुलांना स्टेशन दाखवले, पोस्ट ऑफिस, दवाखाना, कचेरी मुलांनी प्रत्यक्ष पाहिली. उठावाचे मातीचे नकाशे अंगणात करून घेतले. डहाणू तालुका, ठाणे जिल्हा, त्यावेळेचा मुंबई इलाखा आणि भारत. याविषयीची आठवण सांगताना अनुताई म्हणतात, 'माननीय श्रीमती इंदिराजी या भारताचा नकाशा पाहत असतानाचा फोटो आमच्याकडे आहे. त्या वेळी त्यांच्याबरोबर राहून नकाशा दाखविण्याचा मान मला मिळाला हे माझे केवढे भाग्य!'

तेथील भगिनींसाठी अनुताईंनी सकस आहार प्रशिक्षण वर्ग सुरू केले; पण प्रत्यक्ष सभेला मात्र कोणीही महिला येईनात. या समस्येचे उत्तर शोधताना अनुताईंनी प्रात्यक्षिकांची नवी रीत अवलंबिली व या समस्येवर मात केली त्या म्हणतात, 'मी दहाही गावी हिंडले. तेथील महिला मंडळ अध्यक्ष यांना भेटले. कोणी सभेला येत नाही अशी निराशा दिसून यायची; पण माघार कशी घेणार? प्रात्यक्षिकांची वेगळी रीत काढली. उन्हाळ्याचे दिवस आंब्याचे पन्हे, कैरीचे लोणचे, मुरंबा, आंब्याची डाळ, खमंग काकडी वगैरेंची प्रात्यक्षिके ठेवली. आश्चर्याची गोष्ट की पुष्कळांना लिंबू पिळण्याचे यंत्र, किसणी यांसारख्या वस्तू माहीत नव्हत्या.' इतकेच नाही तर सकस आहाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी अनुताईंनी चैत्रगौरीपुढे सकस आहार योजनेतील सर्व प्रकारचे पदार्थ ठेवत सर्वांत वर पूर्णान्नाचे ताट ठेवले. त्यांच्याच रूढी-परंपरांद्वारे आपला विषय त्यांच्यापर्यंत पोहोचवला. समाजात मिसळून, नव्या समाजरचनेचे प्रयोग करणाऱ्या प्रयोगशील अनुताई सर्वार्थाने मोठ्या वाटतात.

बालवाडीत मुलांचे शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढू लागले. ती मुले अनियमित का येतात? याचा विचार करता अनुताईंना कळले की, ही बरीच मुले मोलमजुरी करून जगतात. या समस्येला उत्तर शोधताना अनुताई जयंतराव पाटील यांना भेटून, 'बालवाडीत येणाऱ्या मुलांनाच काम द्या. पैसे वाटण्याचे काम माझ्याकडे द्या.', अशी मागणी करतात. या समस्येचे उत्तर शोधताना उद्योग आणि शिक्षण यांची सांगड घालण्याचा नवा उपक्रम त्या सुरू करतात. शाळेच्या इमारतीचे बांधकाम चालू होते तिथेच या लहान- लहान मुलांनी खडे वेचणे, मातीची भर टाकणे अशा तऱ्हेची कामे मजुरीवर करायला सुरुवात केली. 'शाळेत येणाऱ्यालाच काम' अनुताईंचा हा प्रयोग यशस्वी होतो व मुलांचे लोंढेच्या लोंढे शाळेकडे येऊ लागतात. लहान लहान पाड्यावर राहणाऱ्या आदिवासींवर 'सामुदायिक सहजीवन' या गुणाचा विकास व्हावा, संस्कार व्हावा या दृष्टिकोनातून पाच पाच मुठी तांदूळ गोळा करून एकत्र भात शिजवायचा व एकत्र बसून खायचा, कोणतीही वस्तू सगळ्यांनी वाटून घ्यायची व एकत्र बसून खायची यांसारखे विविध प्रयोग अनुताईंनी केलेले दिसतात. कोसबाडमधील तपस्विनी अनुताई वाघ यांच्याबद्दल बोलताना डॉ. स्वाती कर्वे म्हणतात, 'कोसबाड येथील आदिवासी वस्तीत पूर्व प्राथमिकच्या शिक्षणाच्या रूपाने नंदनवन फुलविणाऱ्या अनुताई वाघ यांचे जीवन आणि कर्तृत्व म्हणजे समर्पित जीवनाचा एक आदर्शच म्हणता येतो.'

**अनुताईंचे साहित्यिक योगदान-**

आठ - आठ ओळींत रचना, साधी सुलभ भाषा, उपमा, अलंकार, प्रतिमा- प्रतीके यांचा वापर न करता साध्या सरळ भाषेमध्ये अनुताईंनी काव्य रचना केलेली दिसते. शक्यतो एका ओळीतसुद्धा तीन किंवा चार शब्द योजलेले दिसतात. ही सर्व बडबड गीते आदिवासी लहान मुले यांना समोर ठेवून रचलेली दिसतात. यातून लहान लहान संदेश संस्कार केलेले दिसतात, उदा-नमन या बालगीतात त्या म्हणतात,

जमीन आईला नमन
पाऊस देवाला नमन
चला, चला, शाळेत जाऊ
लिहू, वाचू ,गाणे गाऊ
शाळा शिकून शहाणे होऊ

शाळेचे महत्त्व पटवून देताना त्यांनी अनेक बडबड गीते रचली आहेत. हवे या गीतात त्या म्हणतात,

गावात पाळणाघर हवे
गावात बालवाडी हवी
गावात मुलांची शाळा हवी
आई-बाबांसाठी शाळा हवी
गावात दवाखाना हवा
गावात वाचनालय हवे
खेळायची जागा हवी
गाव कसे छान हवे

आदिवासी समाजाची गरज ओळखून, त्यांच्या अंधश्रद्धा पाहून या अंधश्रद्धेतून त्यांना बाहेर काढण्यासाठी अनुताई त्यांच्या गीतातून सोप्या सोप्या शब्दांचा, कथानकांचा चपखलपणे वापर करताना दिसतात. औषध या कवितेत त्या म्हणतात,

'छबूला ताप आला आहे
खूप खोकला झाला
भगताला बोलावू का?
नको, नको, औषध आणू
आपली रमाताई औषध देते
ताप -खोकला बरा होतो
अंगारा, धुपारा नको
आपण काही अडाणी नाही '

तसेच काही व्यक्तींचाही परिचय त्या आपल्या काव्यातून करून देतात. माळीन बाई या कवितेत त्या म्हणतात,

'मी आहे माळीन बाई
बागेत फुलली जाई जुई
सकाळीच फुले तोडते
दाट गजरे करते
शहरात जाऊन विकते
मीठ, मिरच्या घेऊन येते
झाडांना खत पाणी
मुलाबाळांसह भाकर पाणी'

याचबरोबर किसान, गवंडी, डॉक्टर इत्यादी व्यक्तींचा त्या परिचय करून देतात, तसेच ग्रामपंचायत, लोकराज्य दवाखाना, पोस्ट ऑफिस अशा शासनमान्य लोक उपयोगी संस्थांचाही त्या मुलांना कवितेच्या माध्यमातून परिचय करून देतात. एकाअर्थी 'चला गाऊया चला शिकूया' हा मंत्रच इथे त्या जपताना दिसतात. या काव्याची शीर्षकेसुद्धा एक किंवा दोन शब्दांची अशी आहेत व शीर्षकच काव्यामध्ये या ना त्या कारणाने आलेले दिसते प्रतीकात्मक शीर्षक एकही नाही तर सरळ सरळ शीर्षक पाहून मुलांना आकलन व्हावे, की आपण कोणत्या विषयाची कविता म्हणत आहोत. या बडबड गीतांचे वैशिष्ट्य हे की, ती एका लयीमध्ये लिहिलेली आहेत, त्यामुळे गाण्यास, लक्षात राहण्यास व आकलन होण्यास सोपे जाते. यासाठी की काय त्यांनी आदिवासी जीवन व्यवहारातील शब्दांची निवड कविता करताना केलेली आहे त्यामुळे गाण्यातून हसत खेळत शिक्षण अनुताईंनी दिले. नृत्य, गाणे हा आदिवासींच्या जीवनाचाच एक भाग आहे. त्यामुळेच रानावनात भटकणारी मुले या गाण्यांच्या चालीवर वर्गात स्थिर झाली असतील. अनुताईंची गाणी मात्र नक्कीच आदिवासी बहुल परिसरामध्ये शिक्षणासाठी उपयुक्त ठरली. अनुताईंच्या साहित्य लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा पिंड हा साहित्यिकाचा नाही; पण त्या हाडाच्या शिक्षिका आहेत. त्यांच्यातील हाडाच्या शिक्षिकेने मुलांसाठी त्यांच्याकडून काव्य लिहून घेतले. लहान मुलांसाठी लिहिणे ही सर्वांत अवघड गोष्ट असते. त्यातही ग्रामीण आदिवासी, वंचित समूहातील मुलांसाठी लिहिणे फारच कठीण कारण या मुलांचे शब्दांचे आकलन, शब्दसाठा फारच कमी असतो. अनुताईंनी मात्र त्यांच्या समस्या जाणवल्यामुळे, त्यांच्या शिक्षणातील अडचणी समजून घेतल्यामुळे, त्यांच्याशी समरस झाल्यामुळे, त्यांचे पालकत्व स्वीकारल्यामुळे ते साहित्यलेखन सहजपणे केलेले दिसते. आपण पाहतो की, मनातील भावना, विचार, इच्छा व्यक्त करण्यासाठी साहित्याची निर्मिती केली जाते. सदर साहित्य अशा कोणत्याही कारणाने निर्माण न होता शैक्षणिक गरजेतून निर्माण झाले आहे, तेही उपमा, अलंकार, प्रतिमा, प्रतीके न वापरता, त्यामुळे सदर लेखनाचे कोणतेही वाङ्मयीन मूल्य कमी होताना दिसत नाही. त्यांचे साहित्य मराठी साहित्य विश्वात साहित्याची प्रेरणा, साहित्याची रचना या अनुषंगाने अनोखे ठरले आहे म्हणून त्यांच्या साहित्याला 'शिक्षण गाथा' असेही म्हणता

येऊ शकते. शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्यातून आलेल्या विविध अनुभवांच्या आधारे अनुताईंनी विविध प्रकारचे लेखन केले. त्यांच्या जीवनाची कहाणी सांगणारे आत्मचरित्र म्हणजे 'कोसबाडच्या टेकडीवरून' हे होय. 'स्त्री साहित्याचा मागोवा' या खंडात अनुताईंच्या या आत्मचरित्राविषयी बोलताना विनया खडपेकर म्हणतात, 'एका थोर कार्यकर्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण आणि कर्तृत्वाचे ओझरते दर्शन या आत्मचरित्रात होते.' अनुताईंच्या बालवाडी कशी चालवावी या पुस्तकाची मराठीबरोबर गुजराती, हिंदी, इंग्रजी भाषांमध्ये भाषांतरे झालेली आहेत. कुरण शाळा, अजब सातभाई, आटपाट नगरात, विकासाच्या वाटेवर, शिक्षण मित्र माला, सकस आहार गीते इत्यादी पुस्तके अनुताईंनी लिहिली. बालवाडीतील गोष्टी, बडबड गीते, कृती गीते या पुस्तकांचे त्यांनी संपादन केले. ताराबाई मोडक यांचे कार्य अनुताई वाघ यांनी अत्यंत निष्ठेने पुढे चालू ठेवले. शिक्षण पत्रिका व सावित्री या दोन शैक्षणिक मासिकांचे संपादन त्यांनी केले.

**अनुताईंना मिळालेले मानसन्मान व पुरस्कार–**

कोसबाडच्या अनुताई वाघ अशी ओळख तयार झालेल्या अनुताई वाघ यांच्या निःस्वार्थी कार्याचा गौरव अनेक मानसन्मान व पुरस्कार देऊन केला गेला. महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच दलित मित्र म्हणून सन्मान त्यांना प्राप्त झाला. फाय फाऊंडेशन इचलकरंजी या संस्थेद्वारे दहा हजार रुपयांचा पुरस्कार, तसेच बालक वर्षानिमित्त बालकल्याण पुरस्कार, सावित्रीबाई फुले पहिला पुरस्कार, केंद्र सरकारचा केंद्र सरकार पुरस्कार, महिला व बालकल्याण या क्षेत्रातील प्रशंसनीय अशा कार्याबद्दल जमनालाल बजाज पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. अनुताईंनी प्रौढ साक्षरता प्रचारार्थ लिहिलेल्या पुस्तकास केंद्र सरकारचे पहिले पारितोषिक प्राप्त झाले, आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारने त्यांना १९८५ साली पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित केले.

**समारोप–**

'ज्ञान बनो कर्मशील कर्म ज्ञानवान' या आपल्या विद्यापीठ गीतातून अपेक्षा व्यक्त केलेली आहे, त्याचे मूर्तिमंत रूप उत्तम उदाहरण म्हणून अनुताई वाघ त्यांच्या कार्याकडे पाहता येते. अनुताई वाघ यांचे शैक्षणिक कार्य व साहित्यिक योगदान एवढे विशाल आहे, की वैचारिक पातळीवर, तात्त्विक पातळीवर, मानवतेच्या पातळीवर ते पूर्णपणे उतरणारे असेच आहे. त्यांच्या कार्यातून वेगवेगळ्या मानवतावादी विचारांचा जन्म होताना दिसतो. त्यांनी केलेल्या प्रयोगांतून नावीन्यता, समाज उभारणीसाठीची कुशाग्रता या सर्वांचा वस्तुपाठच आपल्याला मिळतो. काहीही न बोलता मानवी विकासासाठी अहोरात्र निरपेक्ष हेतूने केलेल्या कर्माचा लेखाजोखा मांडताना ज्ञानाचा साक्षात्कार व्हावा, ज्ञानाचे मार्ग दृष्टिपथात पडावे असेच काहीसे अनुताईंच्या या कार्याचा अनुभव घेत असताना वाचकाला होऊन जाते. स्वतःसाठी नोकरी न करता समाजासाठी सेवा करावी. स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी, लोकांच्या मनातील ज्ञानज्योत पेटवण्यासाठी साहित्य लिहावे असे असंख्य संदेश मुक्तपणे काहीही न सांगता त्यांचे कार्य सांगून जाते. संत तुकारामांच्या शब्दात सांगायचे म्हटले, तर 'येथे कर माझे जुळती' असा भाव मनामध्ये उत्पन्न होतो. भारताच्या उभारणीमध्ये पायाभरणीचे प्रचंड काम करणाऱ्या व्यक्ती कशा प्रकारे देश उभारणीचे ध्येय घेऊन जगल्या याचा परिचय आपणास होतो. हा विकासाचा प्रवास थांबता कामा नये, आपणही या पायवाटेवरचा एक दगड व्हावा अशी भावना मनात जन्म घेते.

**संदर्भ ग्रंथ–**


१) वाघ अनुताई, कोसबाडच्या टेकडीवरून, ऋचा प्रकाशन, तृतीय आवृत्ती एप्रिल १९९२

२) स्त्री साहित्याचा मागोवा, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुणे, खंड २ प्रथमावृत्ती डिसेंबर २००२

३) कर्वे स्वाती, 'कर्तृत्ववान स्त्रिया', उत्कर्ष प्रकाशन पुणे प्र.आ.ऑगस्ट २०१२



**प्रा. क्रांती हरेश पैठणकर**

चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर

चलभाष : ९८५०८६६५३९

krantigosavi 6 @gmail com



◆◆

# प्रा. ग. प्र. प्रधान : सात्त्विक वृत्तीचे कृतिशील विचारवंत

प्रा. बाळकृष्ण कवठेकर

**समाजवादी विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कर्तृत्वाचा परिचय करून देणारा लेख.**

डॉ. सदानंद मोरे यांनी लिहिलेली प्रस्तावना आत्ताच वाचून संपवली. खरे तर मी 'इष्ट तेच बोलणार'ही आगरकरांच्या जीवनावर प्रकाश पाठक यांनी लिहिलेली कादंबरी वाचत होतो; पण हे पुस्तक आले आणि ती बाजूला ठेवून किमान प्रस्तावना तरी वाचू असा विचार केला आणि ती वाचली. एक महत्त्वाचे कारण असे की, या दोन्ही लेखकांचा स्नेह मला लाभला होता. भागवत सरांचा १९६९ साली ते हैदराबादहून कोल्हापूरला परत आले तेव्हा. प्रधान सरांना मी १९५६-५७सालापासून ओळखत होतो. १९५६ साली टिळकांची जन्मशताब्दी उत्साहात साजरी झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथमच एखाद्या महान स्वातंत्र्यसेनानीची जन्मशताब्दी साजरी करण्याचा तो पहिलाच प्रसंग. शासन आणि समाज या दोन्ही घटकांनी उत्साहाने साजरा केला. त्या वेळी मी आठव्या इयत्तेत होतो. आमचे आवडते, साहित्यप्रेमी शिक्षक प्रा. द. पं. जोशी यांनी म. सा. प. ची शाखा तुळजापूरमध्ये स्थापन केली होती. ते समाजवादी. सेवादलाचे सदस्यही असावेत. त्यांनी प्रधान सरांना टिळक जन्मशताब्दीच्या निमित्ताने तुळजापूरला बोलावले. एक व्याख्यान आमच्या शाळेत आणि त्याच दिवशी संध्याकाळी दुसरे व्याख्यान मसाप च्या वतीने, अशी प्रधानांची व्याख्याने झाली. शाळेत प्रधानांचा परिचय करून देण्याचे काम माझ्याकडे सोपवले. प्रधानांची माहिती दपंनीच मला सांगितली होती. मी ती लिहून घेतली, त्यात या टिळक चरित्राचाही उल्लेख होता, आणि मी वक्तृत्वपूर्ण शैलीत परिचय करून दिला. प्रधानांचे भाषण उत्तमच झाले; पण मला लक्षात राहिले ते,भाषणानंतर प्रधानांनी मला बोलावून घेऊन केलेले माझे कौतुक. खाकी चड्डी, वर इस्त्री केलेला पांढरा शर्ट, डोक्यावर टोकदार टोपी. सरांनी माझ्या दोन्ही खांद्यावर हात ठेवून थोडेसे दाबल्यासारखे केले, म्हणाले, 'छान करून दिलास तू परिचय. नाव काय तुझे?' उपचारच; पण अंतःकरणाची ओल असणारा. स्पर्शही बोलके असतात याची जाणीव मला त्या वेळी पहिल्यांदा झाली. संध्याकाळच्या भाषणालाही मी होतोच. सगळ्याच नियतकालिकांनी टिळक विशेषांक काढले होते. आमच्याकडे केसरी हे द्विसाप्ताहिक, विविध वृत्त हे साप्ताहिक व सह्याद्री, अमृत ही मासिके येत असत. त्यांचे विशेषांक मी वाचले होते. त्यामुळे मला संध्याकाळचे भाषण थोडे समजले, बरेचसे डोक्यावरून गेले. भाषणानंतर प्रधानांच्या भोवती गर्दी जमा झाली. मीही रेंगाळत होतोच. प्रधानांचे लक्ष माझ्याकडे गेले, त्यांनी ओळखल्याचे स्मित केले व इतरांशी बोलण्यात ते गर्क झाले. ही प्रधानांची झालेली पहिली भेट. मी पाहिलेला पहिला प्राध्यापक. खादीची पांढरी पॅन्ट, काळसर हिरव्या रंगाचा खादीचा कोट, डोळ्यावर जाड भिंगांचा चष्मा, त्यातून दिसणारे प्रसन्न, बोलके डोळे, हसरे ओठ, सात्त्विक



छायाचित्र । जयदीप कर्डे

सोज्ज्वळ भाव असणारा चेहरा असे प्रधान माझ्या लक्षात राहिले. प्रभावित करणारे. साने गुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांपैकी एक असावेत, तसे वाटले. भाषण मला पूर्णपणे समजले नाही, तरी प्रधान सरांचे वक्तृत्व प्रभावी आहे, हे मला त्या वयातही जाणवले.  त्या नंतर बरीच वर्षे गेली. मीही प्राध्यापक झालो. कोल्हापूरला राजाराम महाविद्यालयात आलो. तिथे अविनाश सप्रे हा माझ्या सहवासात आला. तो बी. ए. फायनलला होता. चारू, दिलीप यांच्या सारखीच  त्याची माझी जवळीक झाली. एक वर्ष साताऱ्याला विवेकानंद संस्थेच्या कॉलेजात काम केल्यावर तो सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात आला आणि स्थिरावला. साताऱ्याला असतानाही तो कधी कधी आमच्या बरोबर  वाईला येई, माझ्या लेक्चर्सना बसे, नंतर गप्पागोष्टी करत जेवण होई, आणि आमच्या बरोबर परत यायला निघे. दरम्यानच्या काळात माझे लेखन म.टा., समाज प्रबोधन पत्रिका, प्रतिष्ठानमध्ये प्रसिद्ध होऊ लागले. प्रसिद्धी व साहित्य क्षेत्रातील मान्यता दोन्ही मिळू लागली. विलिंग्डनच्या प्रा. हातकणंगलेकरांशी स्नेह निर्माण झाला. एकदा मला सांगलीच्या आकाशवाणी केंद्रावर रेकॉर्डिंगसाठी जायचे होते, ते सप्रेला मी सांगितले. तर तो म्हणाला, 'येणारच आहात, तर सकाळी विलिंग्डनमध्ये एक भाषण द्या मग ध्वनिमुद्रणासाठी आ.केंद्रात जा.' मला नाही म्हणायचे कारण नव्हते. हातकणंगलेकरांनीही या, असा निरोप पाठवला. मी गेलो. विलिंग्डनच्या स्टाफरूममध्ये गेलो तर हातकणंगलेकर तर होतेच; पण प्रधान सरही होते. हातकणंगलेकरांनी माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. मी त्यांना ओळखत होतोच. त्यांनी मला ओळखणे शक्यच नव्हते. १७ वर्षे झाली होती भेट होऊन. मीही त्याची आठवण करून दिली नाही. प्रधानांचे भाषण नुकतेच झाले होते. माझेही भाषण आहे असे समजल्यावर ते म्हणाले, 'चला, मीही येतो ऐकायला. इथे बसून तरी करणार?' मला आश्चर्यही वाटले, आणि दडपणही आले. कुठे ते कुठे मी. मानपान, मोठेपणा वयाचा आणि योग्यतेचा, ज्ञानसाधनेचा आणि लोकमान्यतेचा, सगळे बाजूला ठेवून ते सहजपणे माझ्यासारख्या नवख्या प्राध्यापकाचे भाषण ऐकायला येतो असे म्हणत होते. मी भाषणासाठी विषय घेतला होता 'समकालीन लघु अनियतकालिकांतील कविता' त्या काळात लिट्ल मॅगझिन्सची चळवळ  मराठीत जोरात होती. चंद्रकांत पाटील हे माझे मित्र आणि ढाले, ढसाळ यांसारखे माझे परिचित त्यात आघाडीवर होते. प्रस्थापित साहित्य, साहित्यिक, व साहित्य मूल्ये यांच्या विरोधात ही चळवळ होती. मला त्यांची विरोधाची रीत मान्य नव्हती. ती मांडणी मला करायची होती. भाषणाच्या सुरुवातीलाच मी प्रधानांचा उल्लेख 'महाराष्ट्रातील कृतिशील विचारवंत' असा केला, आणि माझी भूमिका मांडताना मी प्रस्थापितांना विरोध करावासा वाटणे स्वाभाविक असल्याचे मान्य केले; पण असे करताना पर्यायी जीवन व वाङ्मयीन मूल्ये यांची मांडणी करणे आवश्यक असते, केवळ अभद्र शब्दप्रयोग वा  वाक्प्रयोग करणे पुरेसे नसते असे सांगून काही कवितांचे विश्लेषण केले, त्यांतील शब्दांच्या प्रयोजनाविषयी प्रश्न उपस्थित केले. या कवितेतील दुर्बोधता अकारण असल्याचे मतही मी उदाहरणासहित स्पष्ट केले. 'सत्यकथेची' होळी करून सत्यकथेची भूमिका संपणार नाही. त्यासाठी पर्यायी मूल्यसरणी व पर्यायी वाङ्मयीन संस्कृती निर्माण करावी लागेल, असे विवेचन केले. चाळीस मिनिटे मी बोललो. हातकणंगलेकरांनी समारोप केला आणि कार्यक्रम संपला, आणि प्रधान सरांनी माझे हात हातात घेऊन माझे कौतुक करायला आरंभ केला. माझे वक्तृत्व, भाषाशैली यांची स्तुती केली, हे सगळे मला संकोचून टाकणारे होते. प्रधान सरांना मी तसे म्हटले, तेव्हा ते फक्त हसले, त्यातला

निर्मळपणा जाणवण्याइतका स्पष्ट होता. तेच मला म्हणाले, 'तुम्ही मला कृतिशील विचारवंत म्हणालात खरे; पण मी विचारसंगत अशी काय कृती करतोय' असा प्रश्न मला काही वेळा पडतो.' हे बोलणे उपचार म्हणून नव्हते, हे, उच्चारण व अंतरंगदर्शी मुद्रा यांतून सहजच लक्षात येणारे होते. माझ्यासारख्या सर्वच दृष्टींनी लहान असणाऱ्या तरुणाचे मनापासून व तोंड भरून कौतुक करणारे प्रधान मी पाहत होतो. लिट्ल मॅगेझिनच्या मराठीतील चळवळीची, त्यांच्यात लिहिणाऱ्या लेखकांविषयी ते कुतूहलाने चौकशी करत होते. मराठी साहित्यातील या नव्या प्रवृत्ती समजून घेतल्या पाहिजेत, असे त्यांना वाटत होते. प्रौढ, प्रतिष्ठित, अशा या विद्वान प्राध्यापकाचे कुतूहल जागृत होते. हे सगळेच मला प्रभावित करणारे होते. माझ्या वयाच्या १३व्या वर्षी माझे कौतुक करणारे प्रधान व आता ३१ व्या वर्षी कौतुक करणारे प्रधान एकच होते, फरक होता तो कौतुकाच्या कारणाचा आणि त्यांतून प्रकट होणाऱ्या त्यांच्या वृत्तीचा. पहिले कौतुक वयाचे होते, दुसरे विचारांचे व भाषेचे होते. दोन्हींतून प्रकट होणारी मनःपूर्वकता व प्रामाणिकता मात्र एकच होती. आता मागे वळून पाहताना मला ते महत्त्वाचे वाटते कारण आता ते दुर्मिळ झाले आहे. या प्रसंगानंतर मात्र प्रधान सरांनी मला लक्षात ठेवले. त्या नंतर आमच्या राजाराम महाविद्यालयात १९८१ साली मी प्रधान सरांना व्याख्यानासाठी निमंत्रित केले. मी निमंत्रण देण्यासाठी गेलो, तेव्हा ते म्हणाले, 'कॉलेजात भाषण देणे म्हणजे होम पिचवर खेळणेच होय. मी अवश्य येतो.' त्यांचे भाषण खरेच उत्तम झाले. ते तर मला आवडलेच; पण होमपिच ही प्रतिमा मला फार आवडली. त्यानंतर काही दिवसांनी प्रधानांची 'साता उत्तराची कहाणी' ही राजकीय कादंबरी प्रकाशित झाली. ती मला आवडली. स्वातंत्र्यप्राप्ती ते संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व नंतरचा काही काळ, यातील(महाराष्ट्र केंद्रस्थानी ठेवून) राजकारणाचे– विचारसरणी व चळवळीतील दोन्हींचे एकमेकांचे मित्र असणाऱ्या सात प्रतिनिधींच्या भेटीगाठी, चळवळी, आणि मुख्यतः त्यांच्या राजकीय चर्चा, यांचे दर्शन घडवणारी ही कादंबरी वेगळ्या प्रकारची कादंबरी आहे.'माझे रामायण' ही दत्तो अप्पाजी तुळजापूरकर यांची, 'प्रतिनिधी'ही वसंत वरखेडकरांची, 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या अरुण साधू यांच्या कादंबऱ्या राजकीय कादंबऱ्या म्हणून ओळखल्या जातात; पण 'साता उत्तराची कहाणी' ही त्या सगळ्यांपेक्षा वेगळी कादंबरी आहे. तिच्यावर कोल्हापुरात म. सा. प. व काही समाजवादी मंडळी यांनी एक परिसंवाद ठरवला. दसरा चौकातील शाहू स्मारक मंदिरातील या परिसंवादात मी, आमदार त्र्यं. सी.कारखानीस, व आणखी एक असे वक्ते होते. स्वतः प्रधान सरही या परिसंवादात सहभागी होऊन चर्चेला उत्तर देणार होते. शाहू स्मारक मंदिर पूर्णपणे भरले होते. त्यांत करवीर मतदार संघातून निवडून आलेले समाजवादी आ. शंकर धोंडी पाटील, कोल्हापुरातील समाजवादी विचाराचे प्राचार्य एम.डी.देशपांडे, व समाजवादी व शे.का.प.चे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात हजर होते. आ.कारखानीस यांनी या कहाणीमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक सीमाप्रश्नाला पुरेसे स्थान मिळालेले नाही, अशी तक्रार केली. बेळगाव व अन्य मराठी बहुल भाग महाराष्ट्रात आणण्यासाठी झालेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तिसऱ्या वक्त्यांनीही राजकीय इतिहास म्हणूनच 'कहाणी'चा विचार केला. या पार्श्वभूमीवर मी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले की, मी कहाणी कडे एक साहित्य कृती म्हणून पाहणार आहे; पण तसे करताना मी वाङ्मयीन भूमिकेसह सामाजिक आणि राजकीय भूमिकांतूनही या कृतीचा विचार करणार आहे. माझ्या या पहिल्या वाक्यालाच प्रधान सरांनी 'करेक्ट'असे म्हणून दाद दिली. मग मी ३०मिनिटे या कादंबरीवर विस्ताराने मांडणी केली. माझे हे भाषण प्रथम आलोचना या केवळ समीक्षा लेखन प्रसिद्ध करणाऱ्या मराठी मासिकात लेख स्वरूपात प्रसिद्ध झाले. नंतर माझ्या 'प्रतिसाद'या लेखसंग्रहात मी ते समाविष्ट केले. त्यामुळे ते इथे विस्ताराने देत नाही; पण एवढे सांगतो की, ते श्रोते व खुद्द प्रधान सरांना फार आवडले. मी समाजवादी नेत्यांबद्दल बोलताना असे विधान केले, की समाजवादी नेते ब्राह्मणत्वाच्या अपराध गंडाने पछाडले गेले आहेत, अशी शंका येते, ते ऐकल्यावर शंकर धोंडी पाटील हात वर करून मोठ्याने म्हणाले, 'अगदी बरोबर आहे. मीही हेच सांगत असतो.' प्रधानांनी या कादंबरीचे हस्तलिखित कोणी कोणी वाचले याची यादी दिली होती. हैदराबाद मुक्तिसंग्रामात सहभागी झालेल्या शेकापच्या श्रीपतरावांना एक स्त्री भेटते, ते व ती एकमेकांच्या प्रेमात पडतात, याचा उल्लेख करून मी असे म्हणालो, 'इतक्या सगळ्यांच्या बारीक नजरा चुकवून ती श्रीपतरावांना भेटलीच कशी,

याचे आश्चर्य वाटते.' यावर सभागृहात मोठाच हशा पिकला. हे लेखन उत्तम असले तरी त्याला कादंबरीचा घाट मात्र प्राप्त होऊ शकलेला नाही, असेही मत मी मांडलेले. परिसंवाद संपल्यानंतर प्रधानांनी माझी मनापासून स्तुती केली. श्रोत्यांनीही भेटून माझे कौतुक केले. मुख्य म्हणजे प्रधान सर माझ्या आकलन,अभ्यास व वाङ्मयीन समज यावर विश्वास ठेवू लागले. याचे प्रत्यंतर एक-दीड महिन्यानंतर मला आले. एके दिवशी संध्याकाळी मी राजारामपुरीत गेलो होतो. सहाव्या गल्लीच्या मुख्य रस्त्यावर प्रधान सर मला भेटले. मी नमस्कार केल्यावर अत्यंत आपुलकीने ते बोलू लागले. नवव्या गल्लीत त्यांच्या भगिनी राहत होत्या. त्यांच्या यजमानांचे निधन झाले होते. त्यांना भेटायला सर आले होते. सर मला म्हणाले, 'चला, घरी जाऊ.' नको,कशाला सर, त्या त्यांच्या दुःखात असतील,' मी म्हणालो. 'ती सावरलीय आता. फक्त चहा घेता येणार नाही.' ते म्हणाले. मग आम्ही देशपांडे, सरांच्या बहिणीच्या यजमानांचे आडनाव, यांच्या घराकडे निघालो. ''काय नवीन प्रचलित आहे मराठीत,'' प्रधानांनी विचारले. मी इलियट व रेने वेलेक आणि ऑस्टिन वॉरेन यांची नावे सांगितली. मग माझ्या 'त्या' भाषणातील एका मुद्द्याकडे प्रधान वळले. मी एक मुद्दा असा मांडला होता की, महाराष्ट्रातील, एकूणच भारतातील राजकारणातील जातीयतेला आलेल्या महत्त्वाविषयी त्या कादंबरीत काहीच आलेले नाही, असे विधान केले होते. त्याबद्दल ते मान्य करून प्रधान म्हणाले, 'मला आमच्या पक्षातही ते जाणवते. खरे तर मी पक्षात सिनीयर; पण प्रांताध्यक्षपद... यांना मिळाले. तो एक नकोसा पण अटळ भाग आहे. आपल्या लिहिण्याने त्याला पुष्टी मिळू नये म्हणून मी ते लिहिणे टाळले,' असे आणखीही बोलणे झाले. मी निरोप घेऊन निघालो. १९९४ साली मी उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मराठी अभ्यास मंडळाचा अध्यक्ष झालो. इयत्ता ९वी ते १२वी ची पाठ्यपुस्तके आम्ही संपादित करत होतो. कुठल्या तरी पुस्तकात 'कोलंबसाचे गर्वगीत' ही कविता आम्ही घेतली होती. पाठ्यपुस्तकात कविता घेतल्यानंतर ती विद्यार्थ्यांना समजावी म्हणून शब्दांचे अर्थ, संदर्भ वगैरे द्यावे लागतात. या कवितेतील 'नाविक आम्ही सदैव फिरतो सात नभांखाली' या ओळीतील 'सात नभांखाली' याचा अर्थ देताना आम्ही अडलो. सात समुद्र हे आम्हाला माहीत होते; पण सात नभ? मी प्रधान सरांना फोन केला. त्यांना ही कविता पाठच होती; पण सात नभांखाली पाशी तेही अडले. म्हणाले, 'तुम्ही वसंताला विचारा.' आम्ही बापटांना फोन लावला; पण त्यांच्याशी आमचे बोलणे होऊ शकले नाही. शेवटी आम्हाला आमच्या विद्यापीठातील उर्दूच्या जाणकाराकडून तो अर्थ मिळाला; पण विशेष हे की, दुसऱ्या दिवशी प्रधान सरांनी फोन करून मला 'अर्थ मिळाला का?' असे विचारले. प्रधानांच्या या विचारण्याचे मला फार अप्रूप वाटले. ज्ञानक्षेत्रातील कामाविषयीची ही आस्था अलीकडे दुर्मिळ होत चालली आहे.

१९८४ साली मी औरंगाबादला बदलून गेलो. ९४ साली विद्यापीठात गेलो. नंतर एका वर्षी प्राध्यापकांच्या उद्बोधन वर्गाचे प्रभारीपद माझ्याकडे आले. मी उद्घाटनासाठी प्रधान सरांना निमंत्रित केले. तेही आले.मी त्यांचा परिचय करून दिला, प्रास्ताविक केले. प्रधान सरांचे भाषण नेहमीप्रमाणेच उत्तम झाले. भावनाप्रधान वृत्तीचे सर मला म्हणाले, 'कवठेकर, तुम्ही पुण्याला या. माझे तुमच्यावर प्रेम आहे. आपण एकत्र जेवण करू.' मी भारावून गेलो. सरळ, भावनाशील, ध्येयवादी प्रधान सरांविषयीचा आदर दुणावला. हा प्रधान सरांना माझ्याविषयी वाटणाऱ्या आत्मीयतेचा परमोच्च बिंदू व क्षणही होता. त्याच वेळी माझे पत्रकार मित्र दिवंगत श्री. रमेश राऊत मला म्हणाले की, 'प्रधानांची तयारी असेल तर, आपण 'मीट द प्रेस' असा एक कार्यक्रम ठेवू.' मी प्रधान सरांना तसे विचारले, तर ते म्हणाले, 'नको, मी आता काही सक्रिय राजकारणात नाही. मी पत्रकारांना नवीन काय सांगणार? त्यांना राजकारणात अधिक रुची असते.' मग तो विषय संपला.

औरंगाबादला सन १९९९ मध्ये समरसता साहित्य परिषद या रास्व संघाने स्थापन केलेल्या साहित्य संस्थेचे दुसरे संमेलन झाले. अध्यक्ष होते, माझे ज्येष्ठ स्नेही, लोक साहित्य व लोक संस्कृतीचे ज्येष्ठ संशोधक व अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे. त्यांनी मला त्या संमेलनात आग्रहाने सहभागी करून घेतले. माझ्या वडिलांपासूनच हिंदुत्वनिष्ठेची पार्श्वभूमी होती. माझे वडील सावरकर व हिंदू महासभा यांचे अभिमानी होते. सर्व ज्येष्ठ हिंदुत्ववादी नेते आणि कार्यकर्ते आमच्या घरी येऊन गेले होते. माझ्यावरही त्याचा प्रभाव होताच. मीही हिंदुत्वनिष्ठेकडे

झुकलेलाच होतो. या संमेलनामुळे ती परत एकदा जागृत झाली. सावरकरांच्या साहित्यावर व विचारसृष्टीवर मी एक पुस्तकही लिहिले होते. या संमेलनातील माझे भाषण व सहभाग खूपच प्रभावी ठरला. इतका की, तिसऱ्या संमेलनाचा अध्यक्ष म्हणून माझी निवड झाली. ते अध्यक्षीय भाषण मोठ्याच चर्चेचा विषय ठरले. वसंत पळशीकर यांनी एक मोठा लेख नवभारतमध्ये लिहून त्याचा प्रतिवाद केला. इकडे मराठवाडा सा.प.मध्येही मी कार्यरत होतो. मराठवाडा सा. संमेलनात माझी भाषणे गाजत होती. अ.भा. साहित्य संमेलनातील परिसंवादात कधी अध्यक्ष, तर कधी वक्ता म्हणून माझी भाषणे होतच होती. नंतर तर मी अ.भा. मराठी साहित्य महामंडळाचा उपाध्यक्ष झालो व साहित्य संमेलनाच्या स्वरूपनिश्चितीमध्येही माझा प्रमुख सहभाग असू लागला. हे सगळे मी माझा मोठेपणा सांगण्यासाठी सांगत नाही, तर समरसता सा.परिषदेत सहभागी झाल्यामुळे मला कोणी वर्ज्य मानले नाही किंवा दूरही केले नाही. मात्र प्रधान सरांच्या बाबतीत मात्र मला अनपेक्षितपणे वेगळा अनुभव आला. त्याने मला धक्काच बसला. त्याचे असे झाले की,बेळगाव साहित्य संमेलनात य.दि.फडके यांनी सीमाप्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी साहित्यिकांनी मुंबईच्या आझाद मैदानावर एक दिवसाचे धरणे धरावे, अशी सूचना केली, त्या वेळी मी साहित्य महामंडळाचा सदस्य होतो. त्यामुळे मीही त्या धरण्यात सहभागी होतो. प्रधान सरही तिथे होतेच. त्यांना पाहिल्यावर मी आदराने व आपुलकीने त्यांच्या जवळ गेलो. त्यांना नमस्कार केला. त्यांनीही हसून प्रतिसाद दिला; पण त्यात पूर्वीची आत्मीयता नव्हती. अलिप्त कोरडेपणा होता. ते काहीच बोलले नाहीत. मीच बोलत राहिलो. साता उत्तराची कहाणीचा पुढील भाग कधी लिहिणार सर, असे मी विचारले, त्यावरही ते केवळ हसून माझ्याकडे पाहत राहिले. माझ्या लक्षात आले की, मी संघप्रणित साहित्य परिषदेत गेलो, हे त्यांना रुचलेले नव्हते. प्रधान सरांसारख्या सहृदय व उदारमतवादी विचारवंताकडून असा प्रतिसाद मला अपेक्षित नव्हता. बरे मी माझ्या भाषणात मांडलेली भूमिका अत्यंत उदार, समतावादी, सर्वसमावेशक अशी होती. तरीही असे का? मी हिंदुत्ववादी झालो होतो, हे खरे; पण प्रत्येक हिंदुत्ववादी हा हिंदुराष्ट्रवादी असतोच असे नाही. अटलबिहारी वाजपेयी हे कुठे हिंदू राष्ट्रवादी होते? आणि विवेकानंद? हिंदुत्ववादी होणे म्हणजे अन्य धर्मियांचा द्वेष वा राग राग करणे नव्हे. भारत हा बहुधार्मिक देश, राष्ट्र आहे, हे मला मान्यच होते व आजही आहे. हिंदूंच्या इतकेच अन्य धर्मीयही भारतीयच आहेत, असेच माझे मत होते, आजही आहे. प्रधान सरांनीही हे लक्षात घेऊ नये याचे मला फार दुःख झाले. अनंतराव भालेराव यांच्यासारख्या थोर समाजवादी संपादकांनीही माझ्या विचारांसहित मला स्वीकारून मदत केलेली होती. प्रधान दुखावले गेले, याचे मला वाईट वाटले. ती एक खंतच माझ्या मनात राहिली; पण प्रधान सरांविषयीचा आदर मात्र माझ्या मनात कायमच राहिला. त्यानंतर औरंगाबादला रा. ग. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलन झाले. त्या वेळी जाधव एका पत्र्याच्या खोलीत राहत होते, हे समजल्यावर भावनाशील प्रधान सरांचे मन कळवळले, आणि या विद्वान माणसाला पुण्यात निवासासाठी एक सदनिका मिळवून द्यावी तीही साहित्यिकांनी निधी जमा करून द्यावी, असे त्यांना वाटले. अनेक लेखकांना, रसिकांना त्यांनी पत्रे पाठवली. मलाही त्यांचे पत्र आले. त्यात मायना म्हणून प्रिय, माझे नाव, त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले होते व खाली तुमचा असे लिहून, सही केली होती. ते पत्र वाचून मला आनंद झाला. मनात आले, सरांनी आपल्याला दूर केलेले नाही. काही झाले तरी मोठ्या मनाचेच आहेत ते! त्यानंतर मात्र प्रधानांशी माझा कधी संबंध आला नाही. त्यांनी आपले घर साधना साप्ताहिकाला दिले व ते साने गुरुजी रुग्णालयात राहायला गेले, हे मी वाचले. पक्षीय राजकारणातून ते दूर झाले. पुणे व एकूणच महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ, आदरणीय व्यक्ती हे त्यांचे स्थान अखेरपर्यंत कायम राहिले. वार्धक्य व आजारपण यांमुळे एके दिवशी त्यांनी देह ठेवला. बातमी वाचली व काही वेळ अस्वस्थ झालो. एक सत्पुरुष आपल्यातून गेला होता. हे सगळे आठवले ते भागवत व प्रधान यांनी लिहिलेल्या टिळक चरित्राचे मराठी भाषांतर आले, त्यावरून. योगायोगाने हे प्रधान सरांच्या जन्म शताब्दीचे वर्ष आहे. त्या निमित्ताने त्यांना अभिवादन करतो आणि थांबतो.

**प्रा. बाळकृष्ण कवठेकर**

बी-२३, रोहन प्रार्थना, गांधी भवनसमोर, कोथरूड, पुणे ४११०३८

चलभाष: ९८९०१६४५४६

◆◆

# आठवणीतले फडकुले

**ज्येष्ठ साहित्यिक, प्रख्यात वक्ते, मर्मज्ञ समीक्षक आणि विचारवंत मा. निर्मलकुमार फडकुले यांच्या आठवणींना उजाळा देणारा लेख.**

**डॉ. सुहास पुजारी**

निर्मलकुमार फडकुले यांना जाऊन आता पंधरा वर्षे झाली. या पंधरा वर्षांत अनेक वेळा त्यांच्या आठवणींनी मनात फेर धरला. शब्दसृष्टीची आराधना करणाऱ्या प्रत्येक लहान-थोर जीवाला फडकुले यांचा मोठा आधार वाटत असे. त्यांच्या जाण्याने लिहिण्याचे, बोलण्याचे, जगण्याचे बळ देणारा आणि पाठीवरून फिरणारा एक प्रेरक हात नाहीसा झाला.

मला आजही आठवते, निर्मलकुमार फडकुले गेले तो दिवस होता २८ जुलै २००६ चा. वार शुक्रवार. त्यांच्या व्याख्यानासंबंधी, वक्तृत्वासंबंधी मी माझ्या विद्यार्थ्यांना सांगत होतो, 'महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेच्यावतीने आम्ही एक व्याख्यान आयोजिले आहे. निमित्त आहे, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीचे. कथाकार अण्णा भाऊ साठे या विषयावर डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे व्याख्यान होणार आहे. हे व्याख्यान तुम्ही चुकवू नका, अशी संधी पुन:पुन्हा मिळत नाही. फडकुले यांच्या प्रसन्न वक्तृत्वाचा तुम्ही अनुभव घ्या. त्यांच्या वेधवती वाणीचे साक्षीदार व्हा.' त्यामुळे फडकुले यांच्या वक्तृत्वाविषयी, व्याख्यानाविषयी विद्यार्थ्यांच्या मनात उत्कंठा निर्माण झाली होती. त्यांचे कुठे व्याख्यान असले, की त्याविषयी विद्यार्थ्यांना मी माहिती द्यायचो. त्यातूनच काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्याख्यानांचा अनुभव घेतला होता. त्यांच्या वक्तृत्वशैलीने प्रभावित झालेल्या विद्यार्थ्यांनी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन या वर्षी त्यांच्याच व्याख्यानाने व्हावे, असा आग्रह धरला होता. मलाही तो आवडला होता.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेचा कार्याध्यक्ष या नात्याने फडकुले यांना त्यांच्या व्याख्यानाच्या काही निमंत्रण पत्रिका द्याव्यात आणि संगमेश्वर कॉलेजातील वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनासाठी आपण यावे, अशी विनंती त्यांना करावी या उद्देशाने महाविद्यालयातले आपले कामकाज पूर्ण करून त्या दिवशी मी बाहेर पडलो होतो. बाबुराव मैंदर्गीकरांकडे जाऊन व्याख्यानाच्या कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका हाती घेतली. ती पत्रिका मी पाहत होतो इतक्यात बाबुरावांना एक दूरध्वनी आला. 'सरांना अस्वस्थ वाटत आहे. चिकुनगुनियाचा त्रास त्यांना होतोय...आणि त्यांना अश्विनी रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेण्यात येत आहे.' दूरध्वनीचा रिसीव्हर खाली ठेवत बाबुराव मला हे सांगताहेत तोच दुसरा दूरध्वनी खणखणला. 'सर गेले!' हे धक्कादायक वृत्त देणारा तो दूरध्वनी होता. त्या अनपेक्षित वृत्ताने क्षणभर काहीच सुचेनासे झाले. फडकुले यांना देण्यासाठी म्हणून हाती घेतलेली त्यांच्याच व्याख्यानाची निमंत्रण पत्रिका अशी क्षणार्धात आपला अर्थ हरवून

बसली. त्या निमंत्रण पत्रिका तिथेच टाकून मी आणि बाबुराव उठलो. अश्विनी रुग्णालय गाठले. चौकशी केली तर तेथे फडकुले यांना आणण्यात आले नाही असे समजले. हे सारे वृत्त खोटे ठरावे, अशी मनोमन प्रार्थना करीत त्यांचे घर गाठले; तर सारे काही संपले होते. फडकुले अनंताच्या प्रवासाला केव्हाच निघून गेले होते. ७८ वर्षे चाललेल्या एका अखंड ज्ञानयज्ञाची सांगता झाली होती.'हे व्याख्यान तुम्ही चुकवू नका. अशी संधी पुन:पुन्हा मिळत नाही.' असे नेमके त्याच दिवशी मी विद्यार्थ्यांना का सांगत होतो? ज्या वेळी मी हे विद्यार्थ्यांना सांगत होतो, तेव्हाच तर त्यांची दृष्टी पैलतीराकडे लागली होती. हा कसला योगायोग म्हणायचा? फडकुले यांचे असे जाणे सर्वांना अनपेक्षित होते; परंतु त्यांना मात्र मृत्यूची चाहूल लागली होती असे वाटते. पैलथडीच्या खुणा त्यांना दिसल्या होत्या का? म्हणूनच की काय जीवनावर झडझडून प्रेम करणाऱ्या या शब्दप्रभूने मृत्यूचे स्वागतही तितक्याच सहजतेने केलेले होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेने सोलापुरातील दिवंगत साहित्यिकांच्या निवासस्थानांवर त्यांच्या नावाचा नीलफलक लावण्याचा उपक्रम तेव्हा चालविला होता. २३ जुलै २००६ रोजी कवी संजीव यांच्या नवी पेठेतील निवासस्थानावर असा नीलफलक लावण्यात आला होता. या नीलफलकाचे अनावरण फडकुले यांच्या हस्ते झाले. या छोटेखानी समारंभात त्यांचे छोटेसे भाषण झाले. त्या दिवशी ते खुर्चीत बसून बोलले होते. समारंभ कवी संजीव यांच्या घरासमोरील रस्त्यावर आयोजिलेला होता. सर्व श्रोते उभे होते. फडकुले यांना मात्र प्रकृति अस्वास्थ्यामुळे खुर्चीत बसून बोलावे लागत होते. याची खंत त्यांना होती. त्यांच्या निधनापूर्वी केवळ पाच दिवस अगोदर झालेला हा कार्यक्रम. या कार्यक्रमातले त्यांचे भाषण दीर्घकाळ स्मरणात राहावे असे होते. वयाच्या ७८ व्या वर्षी प्रकृती फारशी साथ देत नसतानाही त्यांची वाणी स्वच्छ होती. विचारांच्या मांडणीत देखण्या शिल्पाकृतीचे सौंदर्य होते. कवी संजीवांची अत्तराच्या फायासारखी गंधवती कविता हळुवारपणे उलगडत, त्यांच्या काव्यकर्तृत्वाचा परिचय करून देत, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही मनोहर विशेषही फडकुले यांनी तेव्हा सांगितले होते. 'मृत्युशय्येवर असतानाही या कवीचे साहित्यावरचे प्रेम आटले नाही. मृत्यूचे भय त्यांना कधी वाटले नाही. कवी संजीव हे मृत्यूचे स्वागत करणारे कवी होते. त्यांची कविता कालजयी कविता आहे.' अशा प्रकारचे विचार त्यांनी मांडले होते. असे विचार मांडणारे फडकुले अवघ्या पाच दिवसांत जेव्हा मृत्यूला सामोरे गेले, तेव्हा या समारंभातील त्यांचे बोलणे अधिकच गहिरे वाटत राहिले. मृत्यूची चाहूल त्यांना लागली असेल का? काळाची पावले त्यांना ऐकायला आली असतील का ?

असे वाटण्यामागे आणखीही एक कारण होते. २२ नोव्हेंबर हा प्रा.त्र्यं.वि.सरदेशमुख यांचा, तर १६ नोव्हेंबर हा डॉ.निर्मलकुमार फडकुले यांचा जन्मदिवस. २२ नोव्हेंबर २००५ रोजी प्रा.त्र्यं.वि. सरदेशमुख यांच्या सोलापुरातील निवासस्थानी आम्ही साहित्यक्षेत्रातली मंडळी जमलो होतो.–ठरवून योजून नव्हे –जो तो सरदेशमुखांवरील प्रेमामुळे स्वयंप्रेरणेने आलेला. त्यात प्रा. निशिकांत ठकार होते, डॉ. इरेश स्वामी होते, अरुण खोरे, हेमकिरण पत्की होते, लक्ष्मण काटे होते. फडकुलेही आले होते. त्यांनी शाल व श्रीफल देऊन त्र्यं.वि.सरदेशमुखांचे अभीष्टचिंतन केले. 'शतायुषी व्हा, बापूसाहेब!' असे म्हणून वंदन केले. मोठा हृद्य प्रसंग होता तो. सरदेशमुखांच्या शेजारी ते बसले, तेव्हा सरदेशमुख म्हणाले, 'तुमचा वाढदिवस गत आठवड्यात झाला. मी आपणाकडे नाही येऊ शकलो. घराबाहेर पडणे आता फारसे होत नाही; पण माझ्या शुभेच्छा तुम्हाला आहेत. 'तुम्ही शतायुषी व्हा !' तेव्हा फडकुले म्हणाले – 'नाही बापूसाहेब... नाही, हे वर्ष जाईल असे वाटत नाही.' त्यांचे हे विधान त्यांच्या जाण्याइतकेच आम्हाला अनपेक्षित होते कारण मरणालाही जीवनाचे गाणे गायला लावणारा आशावाद त्यांच्या लेखनांतून, भाषणांतून आणि एकूणच जीवनातून आम्ही अनेक वेळा पाहिला, ऐकला होता. म्हणूनच तेव्हाचे त्यांचे ते वाक्य अगदी अनपेक्षित आणि अस्वस्थ करणारे होते. त्यानंतर आम्ही सारेच शांत, गंभीर झालो होतो. अगदी सरदेशमुख देखील! दुर्दैवाने हे दोन्ही प्रतिभावंत शतायुषी होण्यापूर्वीच गेले.

त्र्यं.वि.सरदेशमुख यांची प्राणज्योत १२ डिसेंबर रोजी २००५ दुपारी ११. ४५ वाजता, तर निर्मलकुमार फडकुले यांची २८ जुलै रोजी २००६ दुपारी१२.१५ वाजता मालवली. शतकाकडे वाटचाल करणाऱ्या या दोन प्रतिभावंतांचा जीवनसूर्य असा भर माध्यान्ही मावळला.

**स्वच्छ वाणी, स्पष्ट आणि ढंगदार उच्चारण, अर्थ सौंदर्याचे तरंग उमटवणारी पर्यायवाचक शब्दांची जाणीवपूर्वक केलेली फेक, धनुष्यातून सुटलेल्या बाणाप्रमाणे बिनचूक लक्ष्य साधणारी वाक्यरचना, विटेवर वीट ठेवत जावी आणि त्यातून एखादी देखणी वास्तू उभी राहावी त्याप्रमाणे विषयाची केलेली सूत्रबद्ध मांडणी, प्रतिपादनासाठी आवश्यक ते दाखले देण्याची अंगभूत हातोटी, सभेची नाडी ओळखण्याची विलक्षण क्षमता, विचारांमधले प्रवाहीत्व अखंड ठेवण्याची योजकता, शब्दांची केलेली अचूक, अन्वर्थक निवड, कमालीचे प्रसंगावधान, हजरजबाबीपणाचा हेवा वाटावा असा गुण या सामग्रीने त्यांचे वक्तृत्व शोभिवंत झालेले असायचे.**

आपल्या जाण्याचे सूतोवाच फडकुले यांनी असे का केले असेल? कोणती प्रेरणा त्यामागे होती? की नियतीच त्यांना हे बोलायला लावीत होती? फडकुले गेले! यावर अजूनही विश्वास ठेवावा असे वाटत नाही. प्रात:समयी सोलापूर आकाशवाणीवरून ऐकायला येणारे संतवाणीवरील त्यांचे विवेचन अजूनही त्यांच्या असलेपणाच्या जाणिवेला आधार देत राहते. खास त्यांचा असा तो आवाज ऐकला, की ते आपल्यात नाहीत, हा एक भ्रम आहे असे वाटू लागते; पण त्यांच्या वाणीतील ते विचारपुष्प सरले की मनात उरतो तो केवळ आठवणींचा दरवळ! फडकुले गेले! हे आता स्वीकारावेच लागेल. त्यांचे शैलीदार वक्तृत्व त्यांच्या पुढ्यात बसून ऐकण्याचे भाग्य सरले. मृत्यूच्या एका पूर्णविरामाने त्यांच्या जीवनभरच्या ज्ञान साधनेला, त्यांच्या वक्तृत्व साधनेला विराम मिळाला. प्रबोधनासाठी 'चरैवेतिचरैवेति' हा मंत्र जपत बाहेर पडलेल्या पावलांना विसावा मिळाला. त्यांच्या जाण्याने वक्तृत्वाचा, विचारांचा एक गंगौघ आटला. मृत्यूच्या एका पूर्णविरामाने पुन्हा ती वाणी जिवंत स्वरूपात कधी ऐकता येत नाही म्हणून तर मरणाचे भय सर्वदूर. पं. बिस्मिल्ला खाँ यांची सनई ऐकता येईल; पण त्यातून वाहणारा पंडितजींचा स्वर्गीय स्वर पुन्हा ऐकायला मिळेल का? बालगंधर्वांचे रूप सौंदर्य आणि स्वर सौंदर्य पुन्हा पाहायला, ऐकायला मिळेल का? नाही! तसेच फडकुले यांचे. खास त्यांच्या शैलीतला तो वाणीचा विलास आता अनुभवणे शक्य नाही म्हणून तर त्यांचे जाणे मन अजूनही स्वीकारू शकत नाही. मरणाच्या एका स्पर्शाने ते सर्व काळाच्या पडद्याआड नाहीसे झाले.

फडकुले यांनी आपल्या आयुष्यात समाजाला भरभरून दिले. सहज मनात असा विचार येतो, की त्यांच्याकडे असणारी वैखरीची श्रीमंती, विद्येचा व्यासंग संक्रमित करण्याची – ट्रान्सफर करण्याची – सोय असती तर ? ...तर त्यांनी हे शब्द धन, विचारधन आनंदाने दान केले असते; पण विधात्याने तशी सोय ठेवली नाही. ते योग्यही असेल. विद्या व्यासंगाकरिता, वैखरीच्या श्रीमंतीकरिता आयुष्य वेचावे लागते. विद्याधनाची लॉटरी कधी लागत नसते. व्यासंगाचे धनादेश दुसऱ्याच्या अकाउंटवर कधी ट्रान्सफर करता येत नाहीत. म्हणून तर साधनेचे, कलेचे मोल कशानेही करता येत नाही. तरीही प्रतिभावंताने, कलावंताने इहलोकीचा निरोप घेतला तरी त्यांच्यामागे त्यांचे कार्य राहतेच. ते काळालाही पुसता येत नाही. लोकमनाला त्यांचे कार्य, त्यांचे विचार रिझवत राहतात, आवाहन करीत राहतात. फडकुले यांच्या बाबतीतही असेच म्हणता येईल.

निर्मलकुमार फडकुले यांच्या वाणीने आणि लेखणीने सबंध मराठी जगताला मोहिनी घातली. त्यांच्या उपहासगर्भ, तरीही प्रसन्न लेखनाने लोकमनाला अंतर्मुख केले. त्यांच्या रसाळ शैलीतील व्याख्यानांनी अनेकांच्या मनात साहित्यविषयक अभिरुची पालवली. संतांच्या आणि आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या कार्यावर आणि त्यांच्या जीवनदृष्टीवर त्यांनी आपल्या समीक्षालेखनांतून, व्याख्यानांतून प्रकाश टाकला. या प्रकाशधारांमुळे प्रबोधनाच्या पाऊलखुणा अधिक सुस्पष्ट झाल्या. फडकुले यांचे कर्तृत्व असे चौफेर आणि सर्वस्पर्शी आहे. सोलापुरातील संगमेश्वर महाविद्यालयात फडकुले यांनी दीर्घकाळ मराठीचे अध्यापन केले. या महाविद्यालयातून शिकून बाहेर पडलेले आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे त्यांचे अनेक विद्यार्थी आहेत; पण लौकिकार्थाने त्यांचे विद्यार्थी नसलेले तरीही मनोमन त्यांना आचार्य मानणारे असे अनेक विद्यार्थी सर्वदूर पाहायला मिळतात. डॉ.

फडकुले यांच्यासारखे आचार्य हे केवळ महाविद्यालयापुरते सीमित नसतात तर ते सबंध समाजाचे, महाराष्ट्राचे असतात. हे त्यांच्या कर्तृत्वाने सहज लक्षात येण्यासारखे आहे. लोकहितवादींच्या काल आणि कर्तृत्वाचा वेध घेता घेता ते खऱ्या अर्थाने लोकहिताचा विचार करणारे लोक शिक्षक झाले. फडकुले यांच्याकडून समाजातील नानाविध क्षेत्रांतील लोकांनी एकलव्याच्या वृत्तीने अनेक गोष्टी शिकल्या, आत्मसात केल्या. काहींनी आदर्श वक्तृत्वाचा वस्तुपाठ त्यांच्याकडून घेतला. काहींनी त्यांची प्रसन्न लेखनशैली अनुसरली. काहींना त्यांचे विनयशील व्यक्तिमत्त्व भावले, तर काहींना त्यांची तटस्थ साक्षेपी समीक्षा दृष्टी जवळची वाटली. तर कितीएकांना ते आपल्या चळवळीचे मार्गदर्शक प्रवक्ते वाटले. डॉ. फडकुले असे संपूर्ण समाजाचे झाले.

फडकुले यांनी केवळ भाषा आणि साहित्याचे अध्यापन केले नाहीतर वाङ्मयीन अभिरुची घडवण्याचे, विचारांची बैठक पक्की करण्याचे आणि माणसातील देवत्वाला हात घालण्याचे अपूर्व कार्य केले. साहित्याविषयी आणि ते साहित्य निर्माण करणाऱ्या प्रतिभावंतांविषयी त्यांच्या मनात उत्कट प्रेम आणि आदरभाव असायचा. कुसुमाग्रजांविषयी पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांसमोर बोलताना ते एकदा म्हणाले होते, 'नाशिकला एक दैवत आहे. कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर त्याचं नाव. कधी नाशिकला गेलात, तर या दैवताचे दर्शन घ्या. त्याला वंदन करा.' फडकुले यांच्या अशा विधानांतून प्रतिभावंतांविषयी, ज्येष्ठांविषयी त्यांच्या मनात कसा पूज्यभाव असायचा हे सहज ध्यानी यावे. त्यांचे अध्यापन हा विद्यार्थ्यांसाठी अमूल्य ठेवा असायचा. त्यांचे अध्यापन कार्य सुरू झाले की, विषय कोणताही असो त्या विषयाचा मोगरा फुलायचा. मध्ययुगीन आणि आधुनिक साहित्य ते सारख्याच समरसतेने शिकवायचे. 'ज्ञानोबा-तुकोबा' हे तर त्यांच्या आस्थेचे आणि हृदयीच्या हृदयीचे विषय. महाराष्ट्र संस्कृतीच्या या दोन उत्तुंग शिखरांना त्यांनी आपल्या प्रज्ञेच्या आणि प्रतिभेच्या साह्याने न्याहाळले, नमिले. मला आठवते, ते एकदा म्हणाले होते, 'आपल्याकडे भक्तीचा बाजार मांडला जातो. ते मला कधीच रुचले नाही... म्हणून मला तीर्थाटने करावी वाटत नाहीत. माणसातला देव मला अधिक जवळचा वाटतो; परंतु पंढरपूरच्या पांडुरंगाच्या समचरणावर मी माझे मस्तक श्रद्धाभावाने टेकवले आहे कारण सातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वर नावाच्या एका कोवळ्या पोराने, तत्त्वज्ञ कवीने, संत श्रेष्ठाने या पांडुरंगाच्या चरणावर माथा टेकवला असेल. तो ज्ञानदेवांचा संजीवक स्पर्श आपण अनुभवावा असे मला वाटले. तो रोमांचक अनुभव मी घेतला आहे.' या भावनेतून त्यांच्या स्वभावाच्या नितांत सुंदर खुणा आपल्यासमोर व्यक्त होतात.

'का फळलिया तरुची शाखा। सहजे भूमीसी उतरे देखा' अशी विनम्रता फडकुले यांच्याठायी होती. त्यांच्या घरी येणाऱ्या प्रत्येक लहान-थोरांशी ते सारख्याच आत्मीयतेने वागत. सामान्यातल्या सामान्य माणसालाही निरोप देताना ते आपल्या निवासस्थानाच्या फाटकापर्यंत येत. त्यांच्या दृष्टीत सामान्य असामान्य असा भेद नव्हता. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' ही दृष्टी त्यामागे होती. ते केवळ ज्ञानेश्वर, तुकाराम शिकवत-सांगत नव्हते तर त्यांच्या कृती-उक्तीत ही ज्ञानेश्वर-तुकाराम दर्शन होते.

फडकुले यांनी आपल्या ललित लेखनांतून 'जगायचं कशासाठी?' हे सांगितले. सृष्टीत पावलोपावली जीवनाचा जयजयकार होताना दिसतो, या विचारांची मांडणी त्यांनी आपल्या ललित लेखनांतून सातत्याने केली. जीवनवादी दृष्टिकोन त्यांच्या संपूर्ण साहित्याला व्यापून राहिला आहे. एक अदम्य आशावाद त्यांच्या साहित्यातून अखंड निनादत राहतो. साहित्य समाज आणि जीवन अशा विविध विषयांच्या अनुषंगाने येणाऱ्या 'चिंतनाच्या वाटा' त्यांच्या लेखनात पाहायला मिळतात. हे चिंतनगर्भ ललित लेखन वाचत असताना एका समृद्ध आणि जीवनावर मनस्वी प्रेम करणाऱ्या लेखकाशी आपला संवाद होतोय आणि आपणही समृद्ध होत जातोय, असा प्रत्यय येऊ लागतो. मरणावर मात करणारी जीवनेच्छा त्यांना सुंदर वाटते. म्हणून जीवनाचं गाणं अत्यंत रसज्ञ वृत्तीने त्यांनी गायले आहे. त्यामागे रसदृष्टी आहे, जीवनदृष्टी आहे. 'जगायचं कशासाठी?' या आपल्या रसिकप्रिय ठरलेल्या लेखात ते म्हणतात, 'जगणं ही मुळातच एक काव्यमय अद्भुत प्रक्रिया आहे. ऊन-पावसातून आणि सुख-दुःखातून जीवन वाहत राहते ते वाहू द्यावे. कधी ते वाहवतही जाते. त्यातही एक प्रकारचं सौंदर्य आहे. माणसाच्या मनाची पानं हिरवी असली आणि आयुष्याच्या मुळाशी घातलेल्या दुःख-वेदनांच्या खत पाण्यातूनच सत्त्व शोषून घेण्याची शक्ती असली म्हणजे ही हिरवी पानं उन्हात चमकतात. वाऱ्यावर

डुलतात. निळ्या आभाळाला आमंत्रण देतात. केव्हातरी ती पिवळी होतात. गळूनही पडतात; पण कुणी काही म्हटलं तरी जीवन मरणाची ही रीत अर्थपूर्ण आहे. हा इहलोक लोभस आहे.' (जगायचं कशासाठी?, पृ.३९) अशा त्यांच्या रसाळ आणि चिंतनगर्भ लेखनातून इहवादी जीवनदृष्टीचा मनोरम आविष्कार घडतो.


'जगायचं कशासाठी?' या प्रश्नाचे उत्तरही त्यांनी अत्यंत मार्मिक असे दिले आहे. ते लिहितात, 'जगायचं कशासाठी ?' असा प्रश्न मला कुणी विचारला, तर मी फक्त हसतो. हसणं हेच या प्रश्नाला उत्तर आहे, असं मला वाटतं.' जीवनाचे सगळे तत्त्वज्ञान या उत्तरात दडले आहे, असेच कुणीही म्हणेल !

जीवनाच्या वाटेवरील 'काटे आणि फुले' त्यांनी अनुभवले होते. आजच्या समाज जीवनात सर्व मूल्ये निर्वासित होऊ लागली आहेत. भ्रष्टाचाराची मुळं शेषाच्या टाळूपर्यंत गेली आहेत. शिक्षण वाढलं आणि माणुसकी आटत चालली आहे. माणसाची जात नव्या-नव्या जाती शोधून काढण्यात निष्णात झाली आहे. महापुरुषांच्या मूर्ती जपून ठेवल्या जात आहेत; त्यांचे संदेश मात्र विसरले जात आहेत. ही खंत त्यांच्या लेखनांतून व्यक्त होत राहिली आहे. जीवनातील 'प्रिय आणि अप्रिय' अशा दोन्ही बाजू त्यांच्या चिंतनाचा विषय ठरतात. समाजातील अप्रियतेवर, दांभिकतेवर त्यांनी आपल्या उपरोधपूर्ण शैलीत प्रहार केला आहे. त्यामुळे डॉ.फडकुले यांचे लेखन वाचताना देहूच्या वाण्याची आठवण झाल्याखेरीज राहत नाही.

मिस्कीलपणा, मार्मिक कोटी आणि उपरोधपूर्ण शब्दकळा ही फडकुले यांच्या अभिव्यक्तीची काही वैशिष्ट्ये होती. प्रसन्न आणि वक्तृत्वपूर्ण शैलीमुळे त्यांच्या लेखनाची खुमारी वाढली आहे. लोक प्रबोधन करणे, त्यासाठी लोकहिताचा विचार समाजासमोर ठेवणे आणि नव्या शुभंकर विचारांची पेरणी करणे ही त्यांच्या लेखनामागची भूमिका आहे. त्यातूनच दांभिकतेचा बुरखा फाडताना त्यांच्या शैलीचा मनोज्ञ नखरा पाहायला मिळतो. एका दांभिक पुढाऱ्याचे शब्दचित्र रेखाटून त्यावर केलेली ही कोटी पाहा. 'ज्या मार्गाने त्यांची गाडी गेली; त्याला नगरपालिकेने आधीच 'गांधीमार्ग' असे नाव दिले होते. त्यामुळे पुढारी गांधी मार्गानेच गेले. (प्रिय आणि अप्रिय, पृ. १२९)

अज्ञान, अंधश्रद्धा याचाही फडकुले यांनी अतिशय उपरोधपूर्ण शैलीत समाचार घेतला आहे. ज्यांच्याकडे विवेक नाही, ते तर्कशुद्ध रीतीने कार्यकारण भाव जाणून घेऊ शकत नाहीत. अशी माणसे अंधश्रद्धेच्या जाळ्यात सापडतात. हे सांगताना त्यांनी एक उदाहरण दिले आहे. 'निवडणुकीत दोन-तीन वेळा प्रचंड मतांनी पराभूत झालेले एक सुशिक्षित उमेदवार मला म्हणाले, 'मागील खेपेस माझे ग्रह अनुकूल नव्हते. आता ते या वेळी माझ्यावर प्रसन्न आहेत. आमच्या महाराजांनी 'मी एक लाख वेळा 'राम' हा शब्द लिहावा म्हणजे मी यशस्वी होईन.' असं सांगितलं आहे; तुमचं काय मत आहे?' त्या प्रसिद्ध राजकारण्याचा प्रश्न ऐकून मला आश्चर्य वाटलं. मी म्हणालो, 'माझं मत ऐकून तुम्ही रागवाल. लाख वेळा 'राम' शब्द लिहून तुमचं अक्षर सुधारेल; निवडणुकीत त्यामुळे यश मिळेल असं वाटत नाही.' अशा संवादी शैलीत ते आपला विचार वाचकांपर्यंत पोहोचवतात. अंधश्रद्धेला धक्का देत असताना मनातल्या श्रद्धेला मात्र तडा जाणार नाही याची दक्षता घेऊन अत्यंत मार्मिक असे विश्लेषण ते करायचे. याच उदाहरणासंदर्भात ते पुढे अतिशय सयुक्तिक असे भाष्य करतात, ते असे -'वस्तुतः राम हे पुरुषार्थाचं प्रतीक आहे. सैन्य जमवून आणि सेतू उभारून त्यानं लंकेवर झेप घेतली. रावणाला पराभूत केलं. न्यायाची ध्वजा उभारली. सत्य आणि न्याय यशस्वी व्हायचे असतील तर त्यांच्यामागे सामर्थ्य उभं केलं पाहिजे, हा सुसंगत बुद्धिवादी विचार रामचंद्रानं केला होता. त्याचा विजय सामर्थ्यामुळे व दुर्दम्य महत्त्वाकांक्षेनं झाला. तो नवस-सायासानं झालेला नाही.' (दीपमाळ, पृ.१९,२०) अज्ञान, अन्याय, अत्याचार, शोषण याविरुद्ध त्यांची लेखणी आणि वाणी काही वेळा आक्रमक रूप धारण करते. सुधारकाच्या निधडेपणाने ती त्यावर प्रहार करू लागते. इष्ट असेल ते बोलणार आणि इष्ट असेल ते करणार हा आगरकरी बाणा त्यामागे होता.

फडकुले यांच्या लेखनाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यातून प्रकट होणारी त्यांची चिंतनशीलता. त्यांच्या चिंतनशील वृत्तीचा गंध लाभलेली कितीतरी सुवचने त्यांच्या ललित लेखनात आढळतात. त्याची ही काही उदाहरणे. 'सौजन्याचा शब्द माणसाच्या संस्कारित व्यक्तित्वावर प्रकाश टाकतो.' (चिंतनाच्या वाटा), 'सौजन्य आणि मृदुता मनात असली म्हणजे ती भाषेत



उतरते.' (चिंतनाच्या वाटा), 'विवेकशून्य माणसांच्या हातात नेतृत्व जाणे ही एक भयानक आपत्ती असते.' (चिंतनाच्या वाटा), 'एकदा गेलेले तारुण्य पुन्हा कधीही येत नाही आणि एकदा आलेलं म्हातारपण पुन्हा कधी जात नाही.' (चिंतनाच्या वाटा), 'सुगंधातच विषाला मारण्याची शक्ती असते.' (सुखाचा परिमळ), 'भक्ती ही एक कधीच न संपणारी बेहोषी असते.' (सुखाचा परिमळ), 'सत्याला आणि पावित्र्याला या जगात अनेक वेळा वनवास भोगावा लागतो.' (सुखाचा परिमळ), 'मोलाचे आयुष्य मोहाच्या वाऱ्यावर पाला-पाचोळ्यासारखे उधळून देण्यात पुरुषार्थ नाही.' (सुखाचा परिमळ), 'महापुरुषांवर फुले उधळावीत पण या फुलांतून येणारा गंध जाणिवेचा, ज्ञानाचा असावा.' (सुखाचा परिमळ), 'फुलण्यासाठी आतून उलावं लागतं.' (सुखाचा परिमळ), 'पराक्रमाचा आणि पौरुषाचा इतिहास दुःखाच्या आणि नैराश्याच्या वाटेनं वळणं घेत घडत असतो.' (प्रिय आणि अप्रिय), 'साधु पुरुषांची योग्यता ओळखायलाही साधुत्वाचे आकर्षण असावे लागते.' (प्रिय आणि अप्रिय), 'फुलपाखरानं मोह घालणं आणि आपण मोहवश होणं हे सुद्धा सुखाचं आणि दुःखाचं सुंदर रूपच आहे.' (प्रिय आणि अप्रिय), 'आकाशाचे सौंदर्य त्यात आनंदानं हे झेपावणारे पक्षी आहेत तोपर्यंत अभंग आहे.' (दीपमाळ), 'हसणं हे जीवनाचं अन्न आहे.' (दीपमाळ), 'पश्चात्तापाच्या अश्रूनं आयुष्याचं सुकलेलं फूल पुन्हा उमलत नाही.'(दीपमाळ)

फडकुले यांची भाषा 'हिरव्या वाटां' प्रमाणे रम्य आहे. या वाटेवरून चालत राहण्याचा मोह रसिक वाचकाला झाला नाही तरच नवल. निर्झराप्रमाणे स्वच्छ आणि प्रवाही अशी ही भाषा सहज सुंदर अशी संवादी शैली धारण करते. आशयघन अवतरणे, सु-वचनांची सुंदर पखरण, महापुरुषांच्या जीवनातील समर्पक दृष्टांत आणि वक्तृत्वपूर्ण शैली यामुळे विचार सौंदर्याचा एक सुंदर गोफ त्यांच्या लेखनात पाहायला मिळतो.

फडकुले यांच्या ललित प्रतिभेपुढे शब्द हात जोडून उभे राहतात. 'शब्दांनो मागुते या' असे आर्जव करण्याची गरज त्यांना भासत नाही. त्यांच्या विचारदर्शनासाठी शब्दपाखरे अलवारपणे अवतरतात म्हणूनच त्यांच्या ललित लेखनाचा आस्वाद घेताना रसिक मनातली आनंदाची डहाळी झुलू लागते. त्यांच्या लेखनाच्या 'हिरव्या वाटां'वरून चालत राहण्यासाठी मन आसावते. त्यांच्या ललितगद्य संग्रहाची नावे सांगणे हा देखील एक आनंदानुभव वाटू लागतो. 'सुखाचा परिमळ', 'हिरव्या वाटा', 'अमृतकण कोवळे', 'आनंदाची डहाळी', 'संतवीणेचा झंकार', 'प्रिय आणि अप्रिय', 'जगायचं कशासाठी ?', 'कल्लोळ अमृताचे', 'चिंतनाच्या वाटा', 'मन पाखरू पाखरू', 'दीपमाळ', 'अजून जग जिवंत आहे', ही काही नावे.

वाचन, मनन, चिंतन, निरीक्षण, परिशीलन, खंडन-मंडन असे अनेक पैलू फडकुले यांच्या ललित गद्यातून प्रकटले आहेत. त्यातून एक गुणग्राहक, संवेदनशील रसिक मन व्यक्त झाले आहे. शिक्षण, साहित्य, समाज, राजकारण अशा जीवनाच्या बहुविध पैलूंवर त्यांनी केलेले मुक्तचिंतन त्यातून रसिकांसमोर आले. यात 'ज्ञानेश्वरांशी हितगुज' आहे. 'तुकोबांशी संवाद' आहे. 'विठ्ठलाशी वाद आणि संवाद' आहे. 'गांधीजी परत येऊ नका' अशी व्यथित मनाने केलेली विनवणी आहे. 'कारागृहाच्या भिंती' आहेत. 'कॉलेजातले दिवस' आहेत. 'स्वातंत्र्य सैनिकाचे अश्रू' आहेत. 'मुलखावेगळी माणसे' आहेत. 'काळ पुरुषाची भेट' आहे. 'संतत्वापुढे विनम्र होण्याचा आनंद' आहे. 'निष्काम कर्मयोगाचा अर्थ' आहे. 'आयुष्याच्या वस्त्रातले आनंदाचे धागे' आहेत.

‘चारित्र्याचा अवीट सुगंध’ आहे. ‘ज्ञानानंद आणि जीवनानंद’ आहे. ‘साहित्यातील प्रकाशधारा’ आहेत. ‘साहित्यातील नंदादीप’ आहेत. ‘व्याख्यानाचं आख्यान’ आहे. ‘निधर्मवादाची कहाणी’ आहे. ‘नियतिवादाचे तुणतुणे’ आहे, आणि संत महात्म्यांच्या विचारांतील ‘सुखाचा परिमळ’ आहे. ‘शिवछत्रपतींशी संवाद’ आहे. ‘पुतळ्यांची कथा आणि व्यथा’ आहे. ‘मीरेची प्रेमकहाणी’ आहे. खरे तर फडकुले यांचे ललितलेखन म्हणजे जीवनदर्शनाची एक भव्य अशी ‘दीपमाळ’ आहे. त्यांच्या लेखांची – पुस्तकांची – ही शीर्षके जरी पाहिली तरी त्यातल्या विचारविश्वाची सहज कल्पना येऊ शकते. चिंतनशील प्रकृतीचा लेखक वाचकनिष्ठ असण्यापेक्षा विचारनिष्ठ असतो, याची प्रतीती त्यांच्या ललितगद्याच्या आस्वादातून येते. फडकुले यांचे ललितलेखन सद्भावपूजक आणि मूल्यप्रेरित आहे. आजच्या समाजजीवनातून सर्व मूल्ये नाहीशी होत असताना हा मूल्यांचा दीप विवेक विचारांच्या पदराआड जपला पाहिजे, ही प्रेरणा त्यामागे आहे. समीक्षात्मक लेखनामागेही ही दृष्टी उभी असल्याचे दिसते.

लोकहितवादींच्या साहित्याचा, त्यांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास पीएच.डी.च्या संशोधनाच्या निमित्ताने फडकुले यांनी केला. समाजविषयक चिंतन हा त्यांच्या व्यक्तित्वाचा मूळचा गुण विशेष होता. त्यातूनच ते प्रबोधनवादी विचारांकडे ओढले गेले. प्रबोधनाच्या भाष्यकाराची भूमिका त्यांनी आयुष्यभर निष्ठेने जपली. सुधारणेच्या कार्यावर आणि त्यासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या समाजसुधारकांच्या जीवनदृष्टीवर त्यांनी आपल्या लेखनांतून प्रकाश टाकला. त्यांच्या ललित लेखनाप्रमाणेच त्यांनी समीक्षात्मक लेखनातूनही ‘प्रबोधनाच्या पाऊलखुणा’ दाखविल्या. ‘लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व’, ‘परिवर्तनाची चळवळ : काल आणि आज’, ‘संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी’, ‘संत तुकाराम : एक चिंतन’, ‘संत तुकारामांचा जीवनविचार’, ‘साहित्यवेध’ यांसारख्या ग्रंथांतून त्यांनी आपल्या परिवर्तनवादी विचारांचा ध्वज उंच धरला. संतांच्या जीवन विचारांवर आणि त्यांच्या कवितेवर त्यांनी जे भाष्य केले आहे ते एका रसविमर्शकाच्या दृष्टीने जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच –किंबहुना त्याहूनही अधिक – ते प्रबोधनवादी विचारांच्या दृष्टीने महत्त्वाचेआहे. ‘काही रंग काही रेषा’, ‘साहित्यवेध’, ‘साहित्यातील प्रकाशधारा’ यांसारख्या ग्रंथांतून त्यांनी साहित्यविषयक विचारांची मूलगामी चर्चा केली. पूर्वग्रहविरहित, अभिनिवेशरहित आणि तटस्थ भूमिकेतून त्यांनी साहित्यविषयक विचारांची चिकित्सा केली आहे. ना.सी.फडके यांच्या साहित्यावर सर्व बाजूंनी टीकेची झोड उठत असतानाही, मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील फडके यांचे स्थान नाकारता येत नाही. मराठी भाषेला शैलीची देणगी त्यांनी दिली आहे, हे विसरता येत नाही, असे मत ते अशा नि:पक्षपाती भूमिकेमुळेच मांडू शकले. आपली दृष्टी स्वच्छ असेल आणि मन निरोगी असेल तर पूर्णत्वाचा शोध घेता येतो, हा विचार त्यांनी आपल्या साहित्यातून आणि समीक्षेतून दाखवून दिला. त्यांनी संपादित केलेल्या ग्रंथातून हीच दृष्टी प्रतिबिंबित झाली आहे.

फडकुले यांच्या वक्तृत्वाविषयी काय बोलावे? त्यांनी बोलत राहावे आणि आपण ऐकत राहावे...! असे ते असायचे. फुलांचे सुकुमारपण न्याहाळावे, त्याचा रंग-गंध अनुभवावा, त्याची चिकित्सा कशासाठी? ‘आनंदाचे डोही आनंद तरंग’ असा अनुभव घेतल्यानंतर ‘काय सांगू बुवा काहीचिया बाही’ अशी आपली अवस्था व्हावी, असे ते होते. स्वा. सावरकर, शिवरामपंत परांजपे, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, प्रा. ना. सी. फडके, श्री. म. माटे, आचार्य अत्रे अशा थोर वक्त्यांच्या परंपरेत शोभून दिसावे, असे फडकुले यांचे वक्तृत्व होते. वक्तृत्वाची एक ठसठशीत अशी मुद्रा त्यांनी मराठी रसिकांच्या मनावर उमटवली. भावगर्भता आणि विचारप्रवणता यांचे अनोखे मिश्रण त्यांच्या वक्तृत्वात झालेले असायचे. प्रसन्न, उपहासगर्भ, मिस्कील तरीही मन आणि बुद्धीला आवाहन करणारे शैलीदार असे त्यांचे वक्तृत्व असे. मराठी वक्तृत्वाला स्वतंत्र वळण लावणारे एक शैलीदार वक्ते म्हणून त्यांची कीर्ती सर्वदूर झाली होती. शब्दांचे उच्चारण कसे असावे, शब्दां-शब्दांतील आरोह-अवरोह कसा असावा, शब्द लावण्याबरोबरच विचारांचे भक्कम सूत्र आपल्या प्रतिपादनात कसे असावे याचा वस्तुपाठ म्हणजे त्यांचे व्याख्यान असे. शब्दांना रूप, रस, गंध,नाद आणि स्पर्श असतो याचे भान त्यांचे व्याख्यान ऐकताना येऊ लागायचे. ज्ञानदेव म्हणतात त्याप्रमाणे सर्व इंद्रियांना तृप्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीत होते. त्यांचे व्याख्यान म्हणजे क्षणाक्षणाने फुलत

**कामतांनी फडकुले यांना त्यांच्या प्रकृतीविषयी विचारले. तेव्हा ते त्यांच्या प्रकृतीप्रमाणे हसत बोलले. म्हणाले, 'त्रिकूटांशी लढतो आहे. मधुमेह, रक्तदाब आणि अलीकडे संधिवाताचा त्रास सुरू झाला आहे.' असा खुलासा त्यांनी केला. तेव्हा, 'हे आजार आनुवंशिकतेच्या स्वरूपात आले आहेत का? आपल्या आई वडिलांपैकी कोणास हे आजार होते का?' अशी विचारणा कामतांनी केली. तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता फडकुले म्हणाले, 'छे, छे! हे सर्व स्वकष्टार्जित आहे.' जीवनाचे गाणे गाणाऱ्या फडकुले यांनी आपल्या दुखण्यावरही अशा खोडकर वृत्तीतून केलेले भाष्य त्यांच्या मरणावर मात करणाऱ्या जीवनेच्छेचेच दर्शन घडवत नाही काय ?**

राहणारे, घडत जाणारे 'शब्दशिल्प'च असायचे. त्यांच्या व्याख्यानाचा आनंद घेणाऱ्या श्रोत्यांना आपण श्रवण सुखाच्या गंगेत न्हाऊन निघतो आहोत असा अनुभव यायचा. त्यांच्या शैलीदार वक्तृत्वाने लोकमनाला अंतर्मुख केले. सभागृहाला खळखळून हसायला लावले. ज्ञानोबांपासून-तुकोबांपर्यंत, आगरकरांपासून सावरकरांपर्यंत, नागर साहित्यापासून ते ग्रामीण साहित्यापर्यंत विषय कोणताही असो, अशा अनेक विषयांना त्यांनी आपल्या असाधारण वक्तृत्वाने न्याय दिला. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील उल्लेखनीय व्यासपीठांवरून फडकुले यांच्या वक्तृत्वाचे मळे फुलले. केवळ मराठीतूनच नव्हे तर हिंदी भाषेतूनही त्यांनी व्याख्याने दिली. जाणकार रसिक श्रोत्यांच्या पसंतीस ती उतरली. कुसुमाग्रजांसारख्या कविश्रेष्ठानेही आपल्या एका गौरव समारंभात फडकुले यांना निमंत्रित करण्याची इच्छा प्रकट केली होती. यावरूनही त्यांच्या वक्तृत्वाची उंची सहज कळून यावी.

स्वच्छ वाणी, स्पष्ट आणि ढंगदार उच्चारण, अर्थ सौंदर्याचे तरंग उमटवणारी पर्यायवाचक शब्दांची जाणीवपूर्वक केलेली फेक, धनुष्यातून सुटलेल्या बाणाप्रमाणे बिनचूक लक्ष्य साधणारी वाक्यरचना, विटेवर वीट ठेवत जावी आणि त्यातून एखादी देखणी वास्तू उभी राहावी त्याप्रमाणे विषयाची केलेली सूत्रबद्ध मांडणी, प्रतिपादनासाठी आवश्यक ते दाखले देण्याची अंगभूत हातोटी, सभेची नाडी ओळखण्याची विलक्षण क्षमता, विचारांमधले प्रवाहीत्व अखंड ठेवण्याची योजकता, शब्दांची केलेली अचूक, अन्वर्थक निवड, कमालीचे प्रसंगावधान, हजरजबाबीपणाचा हेवा वाटावा असा गुण या सामग्रीने त्यांचे वक्तृत्व शोभिवंत झालेले असायचे. शब्द उच्चारल्यानंतर पुन्हा माघार घेत -वाक्य अर्धवट टाकून - नवेच वाक्य त्यांनी सुरू केले आहे, असा अनुभव अपवादानेही कधी येत नसे. हा देखील त्यांच्या वक्तृत्वाचा एक लक्षणीय विशेष म्हणावा लागेल.

फडकुले खरेच शब्दप्रभू होते. भाषा प्रभू होते. शब्द, भाषा त्यांच्या वाग्विलासासाठी सदैव तत्पर राहत. त्यांच्या शब्दांना त्यांच्या व्यक्तित्वाचा, रसिकतेचा, विद्वत्तेचा परीसस्पर्श झालेला असे. त्यामुळे ते शब्द अधिक श्रीमंत, आशयघन होऊन श्रोत्यांपर्यंत पोहोचत. त्यांच्या वक्तृत्वाला त्यांची अशी लय होती. वक्तृत्वाच्या क्षेत्रात आपल्या शैलीदार वक्तृत्वाने त्यांनी आपले असे घराणे निर्माण केले. विलक्षण, सहज, उत्कट, प्रेरक, महनीय, प्रमत्त, बलोद्धत, रहस्य, जतन असे कितीतरी शब्द त्या शब्दांतील नादलावण्य घेऊन अवतरत असत. त्यात भावपूर्णता होती. नाट्य होते. मन:चक्षू समोर चित्र उभे करण्याचे सामर्थ्य होते. त्यांच्या प्रसन्न वाणीला प्रबोधनाची धार असायची. वाणीला आलेला अभिनिवेशाचा मोहोर असायचा. आवाजातले मधुर संगीत असायचे. त्यामागे त्यांचे असे आरोह-अवरोह असायचे. एका अर्थाने त्यांचे वक्तृत्व म्हणजे एक गद्य काव्यच असायचे, चढत-रंगत गेलेली मैफल असायची म्हणूनच त्यांचे शब्द दीर्घकाळ रसिकांच्या मनात घुमत राहत. श्रवण सुखाचे राणीव उभे करणारी त्यांची वक्तृत्वकला रसिकांच्या मनात दीर्घकाळ रुणझुणत राहील, यात शंका नाही.

फडकुले यांची किती व्याख्याने ऐकली त्याचा हिशेब मला देता येणार नाही. मी महाविद्यालयीन विद्यार्थी होतो तेव्हा त्यांचे एक व्याख्यान अचलेर या माझ्या गावी, - विद्या विकास हायस्कूलमध्ये - आयोजिले होते. विषय होता 'ज्ञानेश्वरीतील सौंदर्य स्थळे.' श्री ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी सुरू होती. माझ्या वडिलांनीच फडकुले यांना भेटून या व्याख्यानाचे निमंत्रण दिले होते. फडकुले

यांच्याविषयी मी ऐकून होतो. वडिलांकडूनही त्यांच्याविषयी ऐकायला मिळाले होते. आता प्रत्यक्ष त्यांना ऐकायचे होते. माझ्या वडिलांनी ते भाषण मला ऐकायला सांगितले. माझ्यासाठी तो एक झपाटून टाकणारा असा वक्तृत्वानुभव होता. फडकुले यांच्या रसाळ शैलीतील वक्तृत्वामुळे ज्ञानदेवांच्या व्यक्तित्वाची, कवित्वाची मोहिनी तर माझ्यावर पडलीच; पण फडकुले यांच्या वक्तृत्वाचीही एक विलक्षण मोहिनी त्या संस्कारानुकूल वयात माझ्या मनावर पडली. आज इतक्या वर्षांनंतरही त्यांच्या व्याख्यानातील काही ओळी मला जशाच्या तशा आठवतात. फडकुले म्हणाले होते – 'ज्ञानेश्वर नावाच्या एका महान कलावंतानं मानव जातीच्या अंतःकरणातील सतारीवर आपल्या कलावान बोटानं अशी काही गुदगुली केली आणि त्यातून मधुर, प्रेरक, उत्स्फूर्त, अशा स्वरूपाचा जो एक स्वर बाहेर पडला, तो स्वर गेली सातशे वर्षे झाली, तुमच्या आमच्या मनाला एक नवी जागृती देत आहे.' अशी कितीतरी पल्लेदार, वक्तृत्वपूर्ण वाक्ये आजही आठवतात. त्यांची पल्लेदार परंतु तितकीच शैलीदार वक्तृत्वकळा श्रोत्यांना शब्दा-शब्दांगणिक विचारांच्या प्रवाहाबरोबर पुढे घेऊन जायची. त्यांचा शब्दोत्सव हा विचारोत्सव झालेला असे आणि विचारोत्सव शब्दोत्सवात न्हाऊन निघालेला असे. डॉ. फडकुले हे शब्दप्रभू होते हे खरेच; परंतु त्यांच्या शब्द प्रभुत्वामागे विचारांचे स्वस्तिक होते.

पुलंच्या स्मृतिदिनानिमित्त सोलापुरात आयोजिलेल्या एका समारंभात फडकुले अवघे आठ ते दहा मिनिटे बोलले होते; परंतु ते त्यांचे भाषण विलक्षण भाव मधुर होते. पुलंची थोरवी, पुलंचे माणूसपण त्यांनी कमी अवकाशात पण प्रभावी रीतीने मांडले होते. फडकुले कधी नव्हे ते त्या दिवशी बोलताना काहीसे सद्गदित झाल्यासारखे वाटले होते. त्यांना याबाबत मी नंतर एकदा विचारलेही; परंतु त्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली नाही.

ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित कन्नड साहित्यिक द.रा. बेंद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सोलापुरातील दयानंद कॉलेजात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फडकुले प्रमुख वक्ते होते. समारंभाच्या ठिकाणी मेजावर एका बाजूस द.रा. बेंद्रे (अंबिकातनयदत्त) यांची प्रतिमा ठेवण्यात आली होती. शेजारच्या खोलीत भूगोलविषयाची प्रयोगशाळा होती. तेथून पृथ्वीचा गोल घेऊन द.रा. बेंद्रे यांच्या प्रतिमेला त्याचा आधार दिला होता. या पार्श्वभूमीवर फडकुले यांनी अत्यंत मार्मिक अशी टिप्पणी केली होती. ते बोलायला उभे राहिले आणि म्हणाले, 'महाकवी द.रा. बेंद्रे यांच्या सारखे प्रतिभावंत हे केवळ एका भाषेचे राहत नाहीत तर ते संपूर्ण समाजाचे असतात. अवघ्या मानवजातीचे असतात. त्यांचे व्यक्तित्व आणि साहित्य भाषेच्या, प्रदेशाच्या कुंपणात कधीच कोंडले जाऊ शकत नाही. सगळी बंधने मागे टाकून ते वैश्विक पातळीवर पोहोचलेले असते कारण त्यांच्या साहित्यात, जीवनदृष्टीत विश्वाचे आर्त असते. त्यांच्या साहित्याला, जीवन दृष्टीला विश्वाचा आधार असतो. म्हणूनच की काय संयोजकांनीही महाकवी द.रा. बेंद्रे यांच्या प्रतिमेला विश्वाच्या गोलाचा आधार देऊन हेच सूचित केले आहे.' फडकुले यांनी आपल्या भाषणाची सुरुवात अशी केली आणि श्रोत्यांनी त्यांना मुक्तपणे दादही दिली. पुढे त्यांनी द.रा. बेंद्रे यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा नेटकेपणाने परिचय घडवला.

सोलापुरातील संगमेश्वर कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून डॉ. फडकुले यांनी बत्तीस वर्षे कार्य केले. वीस वर्षांपूर्वी म्हणजे त्यांच्या सेवा निवृत्तीनंतर बारा वर्षांनी 'प्रज्ञा २००१' या संगमेश्वर कॉलेजच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यासाठी त्यांना आम्ही बोलावले होते. संगमेश्वर कॉलेजच्या मराठी विभागात प्राध्यापक म्हणून मी सेवेत असल्याने या अंकाच्या प्रमुख संपादकपदाची जबाबदारी माझ्याकडे होती. या वार्षिक अंकाच्या मुखपृष्ठावर पर्यावरणीय प्रबोधनाच्या जाणिवेतून पृथ्वीच्या रक्षणाचा विचार चित्ररूपात सूचित केला होता. पृथ्वीला ओंजळीत अलवारपणे धरले आहे, असे ते चित्र होते. फडकुले या अंकाचे प्रकाशन करताना म्हणाले, 'हे जग प्रज्ञावंतांच्या हातात सुरक्षित आहे. प्रज्ञावंत हात जगाच्या उत्कर्षाला साहाय्यभूत ठरतात.' फडकुले यांच्या अशा उत्स्फूर्त बोलण्याने श्रोते विस्मित आणि हर्षभरीत झालेले मी अनेक वेळा पाहिले.

ते गेले, त्याच्या अगदी आठ-दहा दिवस अगोदर त्यांना चंद्रशेखर कपाळे साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. सहा वाजता सुरू झालेल्या या समारंभात

अनेकांची भाषणे झाली. प्रथेप्रमाणे जगद्गुरूंचे अमृत वचन शेवटी होणार होते. तत्पूर्वी फडकुले यांचे भाषण होते. अनेकांची भाषणे झाल्यानंतर रात्रीचे नऊ वाजत आले असतील तेव्हा त्यांचे भाषण सुरू झाले. पाच-दहा मिनिटे झाली होती. श्रोते फडकुले यांच्या विचार विश्वात, त्यांच्या वक्तृत्वात रंगून गेले होते....आणि अचानक विद्युत प्रवाह खंडित झाला. संपूर्ण सभागृह अंधारात बुडाले. अशा वेळी फडकुले यांनी आपले भाषण पुढे चालू ठेवले. ... आणि श्रोत्यांचा अंदाज घेत 'आपणाला ऐकायला येतेय ना?' अशी विचारणा केली. श्रोते ऐकायला उत्सुक होते. त्यांनी आनंदाने फडकुले यांच्या प्रश्नाला होकाराने प्रतिसाद दिला. तेवढ्यात त्यांनी एक वाक्य उच्चारले. ते म्हणाले, 'नाही तर अंधाराचा फायदा घेऊन सभागृहातून बाहेर पडाल.' हे वाक्य उच्चारताच श्रोते अंधारासह हास्यकल्लोळात बुडाले आणि त्यांनी वक्त्यांच्या प्रसंगावधानाचे कौतुक म्हणून टाळ्यांच्या कडकडाटातून आपला आनंद व्यक्त केला. फडकुले यांचे वक्तृत्व असे अंधारालाही पराजित करणारे होते. त्यानंतर काही क्षणांत विद्युत प्रवाह सुरू झाला आणि त्यांच्या भाषणाने श्रोते मनोमन सुखावले.

नवे पुस्तक आले, की त्याची एक प्रत मला ते आवर्जून भेट द्यायचे. ... आणि म्हणायचे, 'वाचा !' त्यावर काही लिहावे असा त्यांचा आग्रह नसे. त्यांच्याकडून असे नवे पुस्तक माझ्या हाती आले, की मी ते वाचायचो आणि त्या संग्रहाचा परिचय करून देणारा लेख लिहून एखाद्या दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीकडे पाठवायचो. अनेक वेळा त्यांच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात बोलण्याचा योगही आला. 'मन पाखरू पाखरू', 'सुखाचा परिमळ' ही त्यापैकी काही. याला जोडूनच एक आठवण आहे. ६ जुलै २००५ रोजी त्यांच्या तीन ललितगद्यसंग्रहांचे प्रकाशन होणार होते. 'दीपमाळ', 'अजून जग जिवंत आहे', 'प्रिय आणि अप्रिय (द्वि.आ.)हे ते तीन संग्रह. या संग्रहांच्या प्रकाशन सोहळ्याची तयारी सुरू होती. प्रकाशकाने फडकुले यांना विचारले की, 'पुस्तकांविषयी कोण बोलणार? कोणाला निमंत्रित करायचे? तेव्हा त्यांनी सांगितले, 'डॉ. सुहास पुजारी बोलतील.' त्यांनी सुचविल्याप्रमाणे मला ते निमंत्रण मिळाले. मला आनंद होणे स्वाभाविक होते; परंतु त्या आनंदातही आश्चर्याची काहीशी भावना होती कारण महाविद्यालयीन जीवनापासून ज्यांच्या वाणी व लेखणीवर आपण मनस्वी प्रेम केले त्यांच्या पुस्तकाविषयी आणि एकूणच लेखनाविषयी त्यांच्या उपस्थितीत बोलण्याची संधी अशी अवचित मिळेल, असे नव्हते वाटले. आपण काही लिहावे. त्याचे पुस्तक व्हावे. त्या पुस्तकाविषयी डॉ. फडकुले यांनी काही बोलावे. ते आपण काना-मनात साठवून घ्यावे, असे स्वप्न पाहण्याचे ते दिवस होते, आणि इथे तर थेट त्यांच्याच पुस्तकावर बोलण्यासाठी मला निमंत्रित केले जात होते. मी माझी भावना प्रकट करण्यासाठी त्यांना भेटलो. म्हणालो, ''सर, हे काय ? आम्ही एखादे पुस्तक लिहावे, त्यावर आपण उमेद वाढवणारे, आशीर्वादपर काही बोलावे, हे सयुक्तिक आहे. ... तेव्हा तुमच्याविषयी, तुमच्या लेखनाविषयी मी काय बोलणार?'' ते म्हणाले,'का बोलणार नाही? तुम्ही चांगले अभ्यासक आहात. साहित्याची तुमची समज चांगली आहे. तुम्ही छान लिहिता आणि बोलताही. तेव्हा तुम्ही उत्तम बोलाल असा मला विश्वास आहे. म्हणूनच मी तुमचे नाव सुचवले आहे.' नियोजनाप्रमाणे समारंभ पार पडला. त्या समारंभात मी त्यांच्या 'दीपमाळ' या ललितगद्य संग्रहाविषयी आणि एकूणच त्यांच्या लेखनाविषयी बोललो. व्यासपीठावर स्वतः डॉ.फडकुले, आंध्र प्रदेशचे तत्कालीन राज्यपाल सुशीलकुमार शिंदे, माजी आमदार मा.पं.मंगुडकर, डॉ.गो.मा.पवार, डॉ. इरेश स्वामी, रामदास फुटाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. फडकुले यांच्याविषयी मी आत्मीयतेने बोललो. त्यांच्या ललित लेखनाविषयीची माझी निरीक्षणे नोंदवली. 'अजून जग जिवंत आहे' या संग्रहाविषयी प्रा.राजेंद्र दास बोलले. आमची भाषणे झाल्यानंतर फडकुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यातून त्यांच्या वाणीचा मनोज्ञ नखरा श्रोत्यांना अनुभवता आला. ते म्हणाले, 'पुजारी आणि दास हे माझे विद्यार्थी आहेत. त्यांनी माझ्याविषयी, माझ्या साहित्याविषयी अतिशय उदार अंतकरणाने आपला अभिप्राय प्रकट केला आहे. दोघांनीही काहीशा अधिक प्रमाणात माझा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. त्यामुळे मी थोडासा संकोचून गेलो असलो तरीही मला त्यात काही चुकीचे आहे असे वाटत नाही कारण अतिशयोक्ती अलंकार मी त्यांना शिकवला आहे. माझ्या या विद्यार्थ्यांनी तो चांगला समजून घेतला आहे. अवगतही केला आहे... आणि याचा मला आज मनोमन

**आपल्या जाण्याचे सूतोवाच फडकुले यांनी असे का केले असेल? कोणती प्रेरणा त्यामागे होती? की नियतीच त्यांना हे बोलायला लावीत होती? फडकुले गेले! यावर अजूनही विश्वास ठेवावा असे वाटत नाही. प्रात:समयी सोलापूर आकाशवाणीवरून ऐकायला येणारे संतवाणीवरील त्यांचे विवेचन अजूनही त्यांच्या असलेपणाच्या जाणिवेला आधार देत राहते. खास त्यांचा असा तो आवाज ऐकला, की ते आपल्यात नाहीत, हा एक भ्रम आहे असे वाटू लागते; पण त्यांच्या वाणीतील ते विचारपुष्प सरले की मनात उरतो तो केवळ आठवणींचा दरवळ! फडकुले गेले! हे आता स्वीकारावेच लागेल. त्यांचे शैलीदार वक्तृत्व त्यांच्या पुढ्यात बसून ऐकण्याचे भाग्य सरले.**

आनंद झाला आहे.' फडकुले यांनी आपल्या भावना श्रोत्यांसमोर ठेवल्या आणि सभागृहामध्ये हास्याची एकच लाट उसळली. पाठोपाठ टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सभागृहातील सर्वांना वक्तृत्वाचा एक देखणा अनुभव मिळाला.

फडकुले यांचे व्यासपीठावरचे बोलणे असे मोहिनी घालणारे होते. तसे त्यांचे खासगी बैठकीतले बोलणेही वेधक होते. दैनिक संचारच्या 'इंद्रधनु' या रविवार पुरवणीच्या संपादनाची जबाबदारी माझ्याकडे होती. फडकुले यांना सदर लिहिण्याची विनंती मी केली. त्यांनी लिहिण्याचे मान्य केले. सदराच्या नावाविषयी विचारलं तेव्हा ते म्हणाले, 'तुम्हाला जे सुचेल ते द्या.'मी म्हणालो, 'जे सुचेल ते?' ते म्हणाले, 'होय. अगदी जे सुचेल ते.' ...झाले. 'जे सुचेल ते' हे सदराचे नाव निश्चित झाले. त्यांचे बोलणे असे सहज, सुंदर आणि अर्थपूर्ण होते. त्यांना 'जे सुचेल ते' असे छान सुचायचे. वर्षभर अखंड त्यांनी हे साप्ताहिक सदर लिहिले. त्यातून विविध विषयांवर त्यांनी वाचकांशी मुक्त संवाद साधला. पुरवणीतील प्रत्येक सदरात लेखकांची छायाचित्रे त्या त्या सदर लेखकांच्या सदरात आम्ही छापायचो. फडकुले यांनाही त्यांचे छायाचित्र द्यावे, अशी विनंती केली. त्यांना मात्र आपले छायाचित्र सदरात छापले जावे असे मुळीच वाटत नव्हते; पण सर्व सदर लेखकांची छायाचित्रे दिली जात आहेत अन् एकाच सदर लेखकाचे छायाचित्र दिले न जाणे हे बरोबर नाही, ही आमची अडचण लक्षात घेऊन त्यांनी आपले छायाचित्र दिले. ते आम्ही वापरले. त्यानंतर मी एक-दोन दिवसांनी त्यांना भेटलो. तेव्हा ते म्हणाले, 'अहो पुजारी, माझे छायाचित्र सदरात वापरू नका. ते छायाचित्र प्रकाशित झाले आणि मला डॉ. राजेंद्र बीडकरांचा दूरध्वनी आला. म्हणाले, 'लेख आवडला. छानच आहे. पण तुमच्याऐवजी कोणाचा तरी दुसऱ्याचाच फोटो छापलेला दिसतो आहे.' त्यावर हलकेसे स्मित करीत पुढे म्हणाले, 'बरे झाले ते छायाचित्र बीडकरांना दुसऱ्या कोणाचे तरी आहे असे वाटले. तेव्हा या पुढे ते छायाचित्र वापरू नका. तुम्ही वापरणार असाल तर माझा लेख काही मिळणार नाही.' अशा वक्रोक्तीपूर्ण शैलीत ते बोलायचे. त्यांचे ते बोलणेही कायमचे स्मरणात राहणारे असे.

गोव्याचे श्रीराम पांडुरंग कामत यांना त्यांच्या विश्वचरित्र कोशाच्या कार्याबद्दल सहकार महर्षी साहित्य पुरस्कार जाहीर झाला होता. हे श्रीराम पांडुरंग कामत म्हणजे कवी बा.भ.बोरकर यांचे जावई. ते पुरस्कार घेण्यासाठी सोलापुरात आले. माझा त्यांचा स्नेह असल्याने त्यांनी माझ्याशी संपर्क साधला. डॉ. फडकुले यांना मला भेटायचे आहे असे सांगितले. फडकुले यांना मी तसे कळवले आणि कामतांना घेऊन त्यांच्या घरी गेलो. प्राथमिक बोलणे सुरू होते. कामतांनी फडकुले यांना त्यांच्या प्रकृतीविषयी विचारले. तेव्हा ते त्यांच्या प्रकृतीप्रमाणे हसत बोलले. म्हणाले, 'त्रिकूटांशी लढतो आहे. मधुमेह, रक्तदाब आणि अलीकडे संधिवाताचा त्रास सुरू झाला आहे.' असा खुलासा त्यांनी केला. तेव्हा, 'हे आजार आनुवंशिकतेच्या स्वरूपात आले आहेत का? आपल्या आई वडिलांपैकी कोणास हे आजार होते का?' अशी विचारणा कामतांनी केली. तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता फडकुले म्हणाले, 'छे, छे! हे सर्व स्वकष्टार्जित आहे.' जीवनाचे गाणे गाणाऱ्या फडकुले यांनी आपल्या दुखण्यावरही अशा खोडकर वृत्तीतून केलेले भाष्य त्यांच्या मरणावर मात करणाऱ्या जीवनेच्छेचेच दर्शन घडवत नाही काय ?

सोलापुरातील एका समारंभासाठी प्रमुख पाहुण्याचे

नाव निश्चित करण्यासाठी म्हणून एक बैठक बोलावली होती. त्या बैठकीस मी उपस्थित होतो. प्रत्येक जण वेगवेगळी नावे सुचवत होते. त्यात एक दोघांनी तर काळाच्या पडद्याआड गेलेल्या लेखकांची नावे सुचविली होती. या बैठकीनंतर मी त्यांच्याकडे गेलो तेव्हा त्यांनी सहज विचारले. 'काय ठरले बैठकीमध्ये ?' मी म्हणालो, 'काही निश्चित होऊ शकले नाही; परंतु काहींनी हयात नसलेल्या लेखकांची नावे सुचवली. तेव्हा तो सगळा प्रकारच हास्यास्पद वाटतो आहे.' तेव्हा ते म्हणाले, 'अहो पुजारी, ज्यांनी अशी नावे सुचवली त्यांनाच त्या पाहुण्यांना निमंत्रण देण्यासाठी पाठवून द्यायचे नाही का?' त्यांची अशी मार्मिक आणि उत्स्फूर्त प्रतिक्रिया ऐकून खळखळून हसण्याखेरीज मी काय करू शकणार होतो.

'सावरकरांचा बुद्धिवाद' हा ग्रंथ त्यांना हवा होता. शिवाय आणखीही काही ग्रंथ त्यांना संदर्भासाठी हवे होते. त्याप्रमाणे ग्रंथालयातून हवी ती पुस्तके मिळवून मी त्यांच्याकडे गेलो. 'सावरकरांचा बुद्धिवाद' हा ग्रंथ माझ्याकडे होता. तोदेखील नेला. 'सावरकरांचा बुद्धिवाद' हा ग्रंथ मिळाला याचे समाधान त्यांना वाटले. ते म्हणाले, 'अहो, माझ्याकडे हा ग्रंथ होता. तो स्वतः प्रा.शेषराव मोरे यांनी मला भेट दिला होता. माझ्या परिचयातल्या एका व्यक्तीने तो वाचण्याकरिता म्हणून माझ्याकडून घेतला. काही दिवसानंतर जेव्हा मी त्या ग्रंथाविषयी विचारलं, तेव्हा ती व्यक्ती म्हणाली, की 'मी घेतलेच नाही ते पुस्तक'. तेव्हा सावरकरांच्या बुद्धिवादाची ही देखील एक शोकांतिकाच आहे, असे समजून मी शांत राहिलो. काय म्हणणार?' फडकुले यांचे बोलणे असे नेमके, प्रसंगी उपरोधपूर्ण असे.

स्वा. सावरकर, पं. नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, यशवंतराव चव्हाण अशा नेत्यांच्या आठवणी ते सांगायचे. कधी विद्यापीठातल्या राजकारणाविषयी गमतीने बोलायचे, तर कधी राजकारणातल्या विद्यावंतांविषयी सांगायचे. अशा वेळी श्रवणसुखाचा आनंदानुभव मी घेत असे. फडकुले प्रसन्न मनाने आणि मोकळेपणाने बोलायचे त्यामुळे त्यांना भेटायला जाताना किंवा त्यांच्या घरी गेल्यानंतर कधी संकोच वाटला नाही.

फडकुले यांच्या अशा किती एक आठवणी सांगता येतील. 'अंतरी निर्मळ । वाचेचा रसाळ ।' हे तुकारामांचे वचन त्यांना अगदी चपखलपणे जुळणारे आहे. ते नावाप्रमाणे निर्मळ होते आणि त्यांची वाणी रसाळ होती. त्यांच्याशी विविध विषयांवर मुक्त संवाद करण्यातला आनंद मी घेतला आहे. केव्हाही त्यांच्या घरी गेलो की ते आनंदाने स्वागत करायचे. पांढरा पायजमा, खादीचा नेहरू शर्ट परिधान केलेले फडकुले प्रसन्न दिसायचे. ते बोलू लागले, की आमची श्रवणभक्ती सुरू व्हायची. सर्वांशी उदारवृत्तीने वागण्याची सुजनवृत्ती त्यांच्या ठायी होती. मी ती अनुभवली आहे. जोग, सरदार, सहस्रबुद्धे या गुरुवर्यांबद्दल त्यांच्या मनात नितांत आदर होता. भाऊसाहेब खांडेकर, तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या विषयी त्यांच्या मनात अशीच आदराची भावना होती. प्रा.ना.सी.फडके, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री.के.क्षीरसागर, चित्रपती भालजी पेंढारकर, यशवंतराव चव्हाण, कर्मयोगी अप्पासाहेब काडादी, प्राचार्य के.भोगीशयना, अप्पासाहेब पवार अशा अनेकांच्या आठवणी त्यांच्याकडून ऐकायला मिळाल्या. कधी कधी त्यांचा आपण फार वेळ घेतो आहोत असे वाटून मला थोडेसे अपराध्यासारखे वाटायचे, तेव्हा ते पुन्हा बसायला लावायचे. वहिनींना चहा द्यायला सांगायचे... आणि पुन्हा त्यांच्या नानाविध क्षेत्रांतील आठवणीत मी रंगून जायचो. त्यांच्याशी होणाऱ्या संवादातून मिळणारा आनंद हा एखाद्या भावसमृद्ध ग्रंथ वाचनातून जसा आनंद मिळत राहतो तसा असायचा. त्यांच्या सान्निध्यातले क्षण असे मंतरलेले असायचे. त्यांचे निर्मल आणि तेवढेच समृद्ध व्यक्तिमत्त्व त्यातून दिसायचे.

फडकुले विविध विषयांवर बोलायचे, व्यक्तींविषयी बोलायचे; पण कुणाच्या निंदेचा बदसूर त्यात कधी नसायचा. ते सर्वांविषयी उदार मनाने बोलायचे. एखाद्याची त्याच्या तोंडावर अवाजवी स्तुती करायचा त्यांचा स्वभाव नव्हता; पण ते गुणज्ञ होते. संगमेश्वर कॉलेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी एकदा पाहुणे म्हणून ते निमंत्रित होते. ज्या महाविद्यालयात त्यांच्या आयुष्यातील सुवर्णकाळ त्यांनी व्यतीत केला होता, त्याच महाविद्यालयात हा समारंभ होता. त्यांचा परिचय करून देण्याची जबाबदारी माझ्यावर होती. ज्यांच्या वक्तृत्वावर, लेखनावर आणि व्यक्तित्वावर आपण मनःपूर्वक प्रेम केले त्यांचा परिचय करून देण्याची जबाबदारी मी आनंदाने स्वीकारली. त्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर त्यांचे भाषण झाले. विद्यार्थी आणि

प्राध्यापक वर्ग त्यांच्या वक्तृत्वाने मंत्रमुग्ध झाला. कार्यक्रम संपवून घरी गेल्यानंतर फडकुले यांनी आमच्या महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य नरेश बदनोरे यांना दूरध्वनी करून कार्यक्रमाच्या सुंदर नियोजनाचे कौतुक केले. पुजारी यांनी माझा परिचयही फारच छान करून दिला, अशी प्रतिक्रिया नोंदवली. प्राचार्यांनी ती माझ्यापर्यंत पोहोचवली. त्यानंतर काही दिवसांनी त्यांची भेट झाली. बोलणे झाले. अर्थातच कार्यक्रमाचाही विषय निघाला. तेव्हा त्यांनी परिचयपर भाषणाचे कौतुक केले. ते ही नेमक्या शब्दांत. मला ते शब्द आठवतात. ते म्हणाले होते, 'अनेक वेळा आमचा जो परिचय करून दिला जातो तो आम्हाला सहन करावा लागतो. तुम्ही करून दिलेला परिचय मात्र आम्ही ग्रहण केला.' त्यांनी दिलेली ही दाद मला आजही प्रेरक वाटते.

फडकुले यांच्या संबंधीचा एक संस्मरणीय अनुभव कथन करण्याचा मोह मला टाळता येत नाही म्हणून सांगतो. रविवारचा दिवस होता. सकाळीच त्यांचा दूरध्वनी आला. 'तुम्हाला वेळ असेल तर घरी या.' सरांनी बोलावले आहे म्हटल्यानंतर सगळी कामे बाजूला ठेवून मी त्यांना भेटायला जायचो. असे अचानक का बरे बोलावले असेल, असा विचार करीतच मी त्यांचे घर गाठले. घरात बैठकीच्या खोलीत एका बाजूला पुस्तके काढून ठेवलेली. सरांनी आत बोलावलं. अगदी खाली बसून त्यांनी एक एक पुस्तक मला दाखवण्यास सुरुवात केली. मी देखील त्यांच्या शेजारी बसून एकेक पुस्तक पाहू लागलो. चाळू लागलो; पण ही पुस्तके ते मला का दाखवत आहेत, – ते ही घरी बोलावून– काही समजेना. शेवटी फडकुले म्हणाले, 'ही पुस्तके मी अनेक वेळा वाचली आहेत, अभ्यासली आहेत. ती इथे पडून राहण्यापेक्षा तुम्ही ती घेऊन जा. तुमच्यासाठी मी ती काढून ठेवली आहेत.' मी सरांकडे पाहतच राहिलो. समोर अनेक साहित्यकृती होत्या, समीक्षेची पुस्तके होती, चरित्रे आणि वैचारिक ग्रंथ अशा विविध विषयांवरची आणि वेगवेगळ्या प्रकारांतली अनेक पुस्तके होती. खरं तर महाविद्यालयीन जीवनात त्यांचे शब्द ऐकत आणि वाचीत आम्ही आमची साहित्यविषयक अभिरुची वाढवली. ग्रामीण भागात राहून शिक्षण घेत असताना वाचनाची उपासमार होणाऱ्या त्या काळात त्यांच्या वाणीने आणि लेखणीने आमच्या अभिरुचीचे पोषण केले. ज्यांच्याकडून विचारांचे, शब्दांचे धन आम्ही अमाप घेतले. त्यांच्याकडून प्रेमाने मिळणारी ही ग्रंथ पुण्यसंपत्ती पाहून मन भरून आले. तरीही मी म्हणालो, 'सर, तुम्हाला लागतील तर...' मला थांबवत ते म्हणाले, 'नाही. म्हणून तर ती तुमच्यासाठी काढून ठेवली आहेत. त्यांचा तुम्ही चांगला वापर करू शकाल. संदर्भासाठी तुम्हाला ती उपयुक्त ठरतील... आणि या पुस्तकांची मला कधी गरज भासलीच तर मी तुमच्याकडून ती घेईन. तुम्हाला ती पुस्तके दिली आहेत. तरीही ती माझ्याच घरी असल्यासारखी आहेत.' यानंतर मी काय बोलणार? मी इतकेच म्हणालो, 'ती सर्वार्थाने तुमच्याच घरी आहेत.' (तेव्हा सुख स्वप्न अपार्टमेंटमधील त्यांच्याच निवासस्थानी मी राहत होतो.)

फडकुले यांच्या अशा प्रेमपूर्ण आठवणींनी मी आजही रोमांचित होतो. लौकिक अर्थाने मी त्यांचा कधीही विद्यार्थी नव्हतो; परंतु मला खूप काही त्यांच्याकडून शिकता आले. माझ्यावरील प्रेमामुळेच त्यांनी हे शब्दांचे धन माझ्या पदरी घातले. ही पुस्तके मला देताना ते म्हणाले होते, 'वाचनालयाची श्रेणी उंचावण्यापेक्षा माणसांची श्रेणी उंचावणे मला अधिक महत्त्वाचे वाटते. तुम्ही प्राध्यापक आहात. ही पुस्तके तुमच्या हाती पडली, तर त्यातील विचार अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील.' म्हणूनच त्यांनी दिलेली पुस्तकेही मला कोणत्याही सन्मानांपेक्षा अधिक मोलाची वाटतात. आजही ही पुस्तके हाती धरली, की त्यांचे स्मरण जागवतात. फडकुले यांच्याविषयी असे खूप काही सांगता येईल. त्यांचे जीवनच असे सुंदर होते. के.रं. शिरवाडकरांनी तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या जीवनाविषयी जसे म्हटले अगदी तसेच म्हणायचे झाले तर असे म्हणता येईल, तो प्रवास सुंदर होता!

**प्रा. डॉ. सुहास पुजारी,**
'अक्षर पान', ७/८, मंत्री-चंडक इस्टेट,
किल्लेदार सांस्कृतिक भवनाजवळ,
होटगी रस्ता परिसर, सोलापूर ४१३००३
चलभाष :- ९९६०२७२०३१, ९४२०८७००६५
suhaspujari18@gmail.com

◆◆



# कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचे जीवन आणि समग्र वाङ्‌मय

**साधना सुखदेव जाधव**

**कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांच्या वाङ्‌मयीन कर्तृत्वाचा परिचय करून देणारा लेख.**

कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी हे भाषा शास्त्रज्ञ, व्युत्पत्तीकार व संशोधक म्हणून ओळखले जातात. संस्कृत व मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. महाविद्यालयाचे प्राचार्यपदही त्यांनी सांभाळले आहे. हे अध्ययन व अध्यापनाचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांनाही ते मार्गदर्शन करीत असत. ते सतत व्याख्याने देत असत. महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार मंडळाचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले आहे. ते शुद्धलेखन मंडळाचे कार्यवाहक होते. याबरोबरच इतिहास संशोधनाचे कार्य त्यांनी केले आहे. १९५२ सालच्या अंमळनेर येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. तसेच अनेक लहान मोठ्या सांस्कृतिक, साहित्यिक मंडळांचे अध्यक्षपदही त्यांनी सांभाळले आहे. ते सतत वाचत व लिहीत असत. त्यातून त्यांनी अनेक वेगवेगळ्या प्रकारचे लेखन केले आहे. अनेक पुस्तके, कोश व संशोधनपर लेख लिहिले आहेत. भाषाशास्त्रज्ञ म्हणून त्यांची ओळख आहे.

**कृ.पां.कुलकर्णी यांचे जीवन आणि कार्य :**

कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचा जन्म ५ जानेवारी १८९२ मध्ये झाला. त्यांचे मूळ गाव इस्लामपूर. त्यांचे बालपण इस्लामपूर येथेच गेले. बालपणातील त्यांचे दिवस फार दारिद्र्यात गेले. त्यांचे वडील वकिलांच्या हाताखाली (कारकून म्हणून) लेखनिकाचे काम करत असत. त्यातून ते आपला घर खर्च कसातरी भागवत असत. त्यांची आई शेजारच्या बायकांना कुरडई, पापड बनवायला मदत करत असे व घराला हातभार लावत असे. लेखकांना एक बहीण व एक लहान भाऊ होता. त्यांचा भाऊ लहान असतानाच वारला होता व घरातील खायचे एक तोंड कमी होईल म्हणून बहिणीचे लग्न लहान वयातच लावून दिले होते. तेव्हा घरात लेखक आणि त्यांचे आई-वडील असे तिघेच राहत असत. तरीही त्यांना चणचण भासत असे. तेव्हा त्यांच्या मामांनी त्यांना पूर्ण सहकार्य केले. लेखक लहान असतानाच त्यांची आई त्यांना सोडून देवाघरी निघून गेली. तेव्हा त्यांच्या मामांनी त्यांचा सांभाळ केला. त्यांना शिकविले. लेखकांच्या आईच्या मताप्रमाणे त्यांच्या मामांनी आपल्या मुलीशी लेखकांचे लग्न लावून दिले. पुढे ते बी.ए ला असताना त्यांचे वडील वारले. त्यामुळे नोकरी करून आई-वडिलांना सुखात ठेवायचे त्यांचे स्वप्न अपूर्णच राहिले. त्यांचे प्राथमिक शिक्षण इस्लामपूर मध्येच झाले. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूल येथे घेतले. पदवीचे शिक्षण त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात घेतले. हे शिक्षण घेत असताना त्यांना स्कॉलरशिप मिळत होत्या. घरची गरिबी असल्याने त्यांचे खूप हाल झाले. त्यांना मिळत असलेली स्कॉलरशिप व त्यांच्या मामांची त्यांना मिळणारी मदत यावर त्यांनी कसेबसे बी.ए. पर्यंत आपले शिक्षण पूर्ण केले. बी.ए.झाल्यानंतर फर्ग्युसन कॉलेज मध्येच त्यांनी एम.ए. ला प्रवेश घेतला. एम.ए. करत असतानाच ते पुण्यातीलच एका

शाळेत शिक्षकाची नोकरी करत होते. पुढे त्यांनी बी.टी. ची पदवी घेतली. ते सरकारी हायस्कूलमध्ये नोकरीस लागले. या काळात त्यांनी धुळे, सातारा, पुणे, अहमदाबाद, मुंबई अशा ठिकाणी नोकरी केली. या काळात त्यांनी शिक्षक, प्रोफेसर, प्राचार्य व शाळा तपासनीस अशी पदे सांभाळली.

त्यांना तीन मुली व तीन मुले अशी सहा मुलं होती. आजारपणाच्या कारणाने त्यांची बायको त्यांना अर्ध्यावरच सोडून गेली. तेव्हा त्यांच्या सासूबाईंनी त्यांचा अर्धा संसार सांभाळला. त्यांच्या मित्रांचीही त्यांना चांगली साथ होती. अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांतले त्यांचे मित्र होते. संपूर्ण आयुष्यभर ते सतत लेखन वाचन करीत होते. लेखणीनेच त्यांना सावरले. १२ जून १९६४ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. ७२ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांना भारताचा इतिहास याविषयी अजून खूप काही लिहायचे होते; परंतु त्यांचे ते स्वप्न अपुरेच राहिले.

**कृ.पां. कुलकर्णी यांचे भाषाविषयक कार्य :**

कृ.पां. कुलकर्णी हे भाषाशास्त्रज्ञ होते. त्यांनी मराठी भाषा विषयावर सात महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. (१)लेखनदीपिका : यामध्ये सुरुवातीला त्यांनी लेखनदीपिका हा ग्रंथ लिहिला. हायस्कूलमध्ये नोकरी करत असताना त्यांना असे जाणवले की, मराठी विषयावर खूप कमी लेखन झाले आहे. तसेच शिकविण्यासाठी पुस्तके उपलब्ध नव्हती. कशाही पद्धतीने शिकवले जात असे. या काळात १९२९ मध्ये लेखकांनी लेखनदीपिका हे पुस्तक लिहिले. व्याकरणदृष्ट्या मराठी लेखन पद्धती योग्य कशी आहे, हे त्यांनी या पुस्तकातून सांगितले आहे. यामध्ये निबंधलेखन, पत्रलेखन, कल्पनाविस्तार, सारांशलेखन, संवादलेखन याविषयीची जुनी पद्धत व नवीन पद्धत, तसेच काही उतारे दिले आहेत. या पुस्तकामुळे मराठी भाषेच्या अभ्यासकांची चांगली सोय झाली, असे स्वतः प्र.के. अत्रे यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. (२) मराठी भाषा : उद्गम व विकास : हे एक महत्त्वपूर्ण असे पुस्तक आहे. पदवीच्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश केला गेला होता. यामध्ये मराठी भाषेची उत्पत्ती कशी झाली, वर्णांची उच्चारप्रक्रिया, शब्दांची अर्थप्रक्रिया, भाषा अभ्यास पद्धती, भाषेचा इतिहास, मराठी भाषेचे कलिक व प्रांतिक भेद, मराठीचे व्याकरण याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. (३) भाषाशास्त्र व मराठी भाषा : या पुस्तकामध्ये भाषाशास्त्र म्हणजे काय? भाषेची उत्पत्ती, प्रत्ययांचा उगम, भाषा आणि तिच्या पोटभाषा, भाषेचे प्रकार, भाषेच्या जाती, इतर भाषांचा मराठीवर झालेला परिणाम यांविषयी सविस्तर माहिती दिली आहे. (४)शब्द : उद्गम विकास : यामध्ये शब्द कसे तयार होतात? शब्दांना अर्थ कसा प्राप्त होतो? शब्दांच्या शक्ती, शब्दांत वाढ कशी होते? याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. (५) व्याकरणाचे व्याकरण : यामध्ये वर्णविचार, संधी, शब्दांच्या जाती, प्रत्यय, काळ, प्रयोग, वाक्यविचार यांविषयी सविस्तर माहिती दिली आहे. (६)अर्वाचीन मराठी व्याकरण व लेखन : यामध्ये मराठी व्याकरण, गद्यलेखन रचना प्रकार, काव्यरचना, प्राचीन मराठी वाङ्मय, अर्वाचीन मराठी वाङ्मय यांविषयी सविस्तर माहिती दिली आहे. (७) कोकणी-अहिराणी समितीचा वृतांत : या पुस्तकामध्ये मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीने कोकणी व अहिराणी या बोलीभाषा मराठी भाषेच्याच उपभाषा आहेत, हे विविध उदाहरणांतून सिद्ध केले आहे.

**कृ.पां.कुलकर्णी यांचे कोश वाङ्मय :**

यामध्ये (१)मराठी व्युत्पत्तीकोश : या ग्रंथाचे लेखन त्यांनी केले आहे. त्यासाठी त्यांना बक्षीसही मिळाले होते. ऐतिहासिक, तौलनिक व भाषाशास्त्रीय स्वरूपात याचे लेखन केले आहे. हा कोश तयार करण्यासाठी त्यांनी ज्युल्स ब्लोक, टर्नर, यांच्या कोशांपासून प्रेरणा घेतली आहे. (२)मराठी धातुकोश : हा त्यांचा संपादित कोश आहे. वि.का.राजवाडे यांनी संकलित केलेले धातू व त्यांच्या उत्पत्ती यांचा अभ्यास करून त्यांनी हा कोश तयार केला आहे. यामध्ये मूळ धातू, त्याचे मराठीतील अर्थ व त्याचे वेगवेगळे शब्द दिले आहेत. वि. का. राजवाडे हे त्यांचे गुरू होते. त्यांच्याकडून सतत काहीतरी ते शिकत असत

**कृ.पां. कुलकर्णी यांचे ललित लेखन :**

यामध्ये त्यांच्या 'कृष्णाकाठची माती' या आत्मचरित्राचा समावेश होतो. यामध्ये त्यांचा जन्म, गाव, बालपण, गावाजवळून वाहणाऱ्या कृष्णा नदीचे, तिच्या पाण्याचे, तिथल्या मातीचे अतिशय समर्पक शब्दांत वर्णन केले आहे. तसेच त्यांचे शिक्षण, नोकरी, कुटुंब व कुलाचार, कॉलेजचे मित्र, साहित्यिक मित्रांच्या सान्निध्यातील काही आठवणी, पेशवे दप्तरातील त्यांचे कार्य, सेवानिवृत्तीनंतरचे दिवस, स्वतःचे तत्त्वज्ञान, वाङ्मयीन मते यांविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

**कृ.पां.कुलकर्णी यांचे इतर लेखन :**

यामध्ये त्यांचे संपादित लेखन, अनुवादित लेखन, ऐतिहासिक लेखन, संशोधनात्मक लेखन, समीक्षात्मक

लेखन, याबरोबरच मराठी व इतिहास या विषयांवरील संशोधनात्मक लेख यांचा समावेश होतो.

(१)वाग्यज्ञ : साहित्य, भाषा आणि इतिहास या विषयांवर समीक्षक या मासिकामध्ये 'धन्वंतरी' या नावाने त्यांनी काही लेख लिहिले होते. ते सर्व लेख एकत्र करून त्याचे वाग्यज्ञ हे संपादित पुस्तक तयार केले आहे. यामध्ये काव्यानंदाची उपपत्ती, विक्रमाच्या कथा तसेच राजवाडे, टिळक, आगरकर अशा अनेक महत्त्वपूर्ण व्यक्तींची माहिती दिली आहे. (२)आचार्य अत्रे विविधदर्शन : या पुस्तकात आचार्य अत्रे यांच्याविषयी अनेक लेखकांची मते लेख स्वरूपात एकत्र केली आहेत. आचार्य अत्रे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा विनोद, साहित्य, राजकारण, समाजकारण, काव्य, चित्रपट, शिक्षक या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगाविषयी अनेक लेखकांनी आपापली मते मांडली आहेत. ती सर्व एकत्र करून लेखकांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे. (३) महाराष्ट्र गाथा : हे पुस्तक जेव्हा महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली १९६० ला या प्रसंगाची आठवण म्हणून तयार केले गेले. पंडित नेहरू यांना या पुस्तकाची प्रथम प्रत भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यामध्ये महाराष्ट्र देश, महाराष्ट्रीय लोक, मराठी भाषा, मराठ्यांचा इतिहास, महाराष्ट्रातील साहित्य व कला यांविषयी सविस्तर माहिती दिली आहे. हे त्यांचे संपादित पुस्तक आहे. (४) ऐतिहासिक पत्रव्यवहार : या पुस्तकामध्ये काही ऐतिहासिक कागदपत्रांचा समावेश केला गेला आहे. पेशवे दप्तराचे संशोधन करताना त्यांना बाहेरून मिळालेली ही ऐतिहासिक कागदपत्रे आहेत. इतिहास संशोधकांसाठी हे महत्त्वपूर्ण असे संपादित पुस्तक आहे. (५) पेशवे दप्तराचे ४५ खंड : पेशवे काळातील पत्रव्यवहार, काही महत्त्वपूर्ण कागदपत्रे, विविध प्रसंगांची माहिती यामध्ये समाविष्ट आहे. (६) श्रीमुकुंदराज कृतं श्रीविवेकसिंधू : संशोधित व संपादकीय अशा स्वरूपातील हा महत्त्वपूर्ण असा ग्रंथ आहे. भाषाशास्त्र व पाठचिकित्साशास्त्र या दोन्ही पद्धतींनी या ग्रंथाची मूळ संहिता निश्चित केली आहे. त्यासाठी त्यांनी जवळजवळ शंभर हस्तलिखित पोथ्यांचा अभ्यास केला. (७)धर्म उद्गम व विकास : हा त्यांचा अनुवादित ग्रंथ आहे. यामध्ये धर्माची पूर्व अवस्था, आत्मा, जीवतत्त्व, देवदेवतांची उत्पत्ती, नीती, धर्म, मोक्ष, मरणोत्तर अवस्था, धर्म आणि वेदांत यांविषयी माहिती दिली आहे. (८)भारताचा नवा इतिहास : या पुस्तकामध्ये जगाच्या प्राचीन इतिहासापासून ते स्वतंत्र भारताच्या इतिहासापर्यंत सर्व सामाजिक व राजकीय घटनांची माहिती दिली आहे.

तसेच त्यांनी काही समीक्षणात्मक लेखही लिहिले आहेत. साहित्य, भाषा व इतिहास या विषयांवरील त्यांचे जवळजवळ सत्तर लेख प्रसिद्ध आहेत. याशिवाय त्यांच्या मराठी भाषाविषयक ग्रंथांवर मोडक, देसाई यांनी समीक्षात्मक लेख लिहिले आहेत. याबरोबरच त्यांचे मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषण प्रसिद्ध आहे. तसेच त्यांनी विविधज्ञानविस्तार या मासिकामध्ये 'मराठी लिपी' याविषयी अनेक लेख लिहिले आहेत. कवी गोविंद यांची कविता या काव्यसंग्रहाची प्रस्तावना लिहिली आहे. सानेगुरुजी लिखित राजवाडेंच्या चरित्रामध्ये राजवाडेंचे भाषाशास्त्रातील कार्य हा त्यांचा लेख छापला आहे.

याशिवाय महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यालय मुंबईहून पुण्यात आणण्यात लेखकांचा मोठा हातभार आहे. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या परीक्षा समितीत त्यांची निवड झाली होती. त्यामध्ये भाषाशास्त्र या विषयावर त्यांनी प्रश्नपत्रिका काढली होती. त्यांच्या मराठी भाषा विषयावरील अनेक पुस्तकांचा समावेश शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात झाला आहे. याबरोबरच त्यांनी इयत्ता पहिली ते दहावीची इतिहासाची पाठ्यपुस्तके तयार केली होती. त्यांचे इंग्रजीतील 'संस्कृत नाटके व नाटककार' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. याबरोबरच मराठी साहित्य संशोधन पत्रिका व महाराष्ट्र साहित्य परिषद यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. अशा प्रकारे सतत आयुष्यभर त्यांनी ज्ञानदानाचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. व्यक्तिमत्त्वातील धैर्य, व्यासंग, चिकाटी या गुणांमुळे त्यांनी भाषाशास्त्रज्ञ, संशोधक, समीक्षक अशी स्वतःची ओळख निर्माण केली.

**संदर्भ :**

(१) कुलकर्णी कृ.पां. : कृष्णाकाठची माती, भारती प्रकाशन, मुंबई, १९६१.
(२) कुलकर्णी कृ.पां. : लेखनदीपिका, महाराष्ट्र पब्लिशिंग हाउस, पुणे, १९२९.
(३) कुलकर्णी कृ.पां. : वाग्यज्ञ, ग.पां.परचुरे प्रकाशन, मुंबई, १९५२.
(४) कुलकर्णी कृ.पां. : भाषाशास्त्र व मराठी भाषा, ओरिएंटल बुक एजन्सी, पुणे, १९२५

**साधना सुखदेव जाधव**
संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
गुरुविश्व अपार्टमेंट, सी-९, यश ढाब्याच्या मागे, कोंडावे, सातारा, चलभाष : ९६६५७१०७५२
shrisadhana6@gmail.com

# अस्तित्वलोपाची कादंबरी- पाचोळा

डॉ. नीतिन दत्तात्रय आरेकर




'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना एखाद्या प्रदेशातील जीवनातून निर्माण झालेल्या साहित्याकरिता योजिली जाते. ग्रामीण साहित्य या शब्दप्रयोगातील 'ग्रामीण' हे विशेषण नेमके काय सुचविते? भाषाविज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहता नागर किंवा 'शहरी' या विशेषणाला व्याघात करणारे हे विशेषण आहे. अर्थात 'प्रादेशिक' ही संकल्पना अधिक व्यापक अशी आहे, कारण प्रादेशिक म्हटल्यावर त्या प्रदेशातील सर्व काही असा अर्थ अभिप्रेत असतो; पण ग्रामीण साहित्य असा शब्दप्रयोग मराठी साहित्यासंदर्भात केला जातो तेव्हा ग्रामीण जीवनाचा भौगोलिक व सामाजिक संदर्भ तेथे अभिप्रेत असतो. ग्रामीण जीवन पद्धती ही शहरी जीवन पद्धतीपेक्षा, शहरी परंपरेपेक्षा वेगळी असते. या जीवन पद्धतीचे, परंपरेचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडावे हे अपेक्षित असते.

ग्रामीण जीवनातील जगण्याची पद्धत, रीतीरिवाज, परंपरा शेती, निसर्गाशी असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ असा वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली प्रादेशिक वैशिष्ट्यपूर्णता, त्या त्या प्रदेशातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून निर्माण होणारे प्रश्न, कालौघात या सर्व परिस्थितीत होत जाणारी स्थित्यंतरे, या स्थित्यंतराचे विविधांगी स्वरूप, लोकस्वभाव, समाजजीवनातील अनेक स्तरीय रचना, या विविध स्तरांमधील संघर्ष-सहकार्याचे नाते अशा अनेक गोष्टींनी ग्रामीण साहित्याचे स्वरूप निश्चित केले आहे.

'ग्रामीण साहित्य' हे खास भारतीय, त्यातही मराठी साहित्याचे वैशिष्ट्य आहे. मराठी साहित्यात निर्माण

झालेल्या ग्रामीण साहित्याचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता तीन ठळक प्रवाह निर्माण झालेले दिसतात (अ) म. ज्योतिबा फुले व त्यांच्या प्रेरणेमधून निर्माण झालेले ग्रामीण लेखन. म. फुलांच्या शेतकऱ्याचा आसूड, गुलामगिरी, चौदावे रत्न यासारख्या लेखनातून तत्कालीन ग्रामजीवन, त्या ग्रामजीवनातील विविध संदर्भ, समस्या अडचणी ठळकपणे स्पष्ट होतात. म. फुल्यांच्या प्रभावातून कृष्णराव भालेराव, विठ्ठल रामजी शिंदे यांनीही लेखन केले. या लेखनाचे स्वरूप वैचारिक होते. हरिभाऊ आपट्यांनीही 'काळ तर मोठा कठीण आला' सारख्या ललित लेखनातून तत्कालीन ग्रामजीवन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. (ब) ग्रामीण साहित्यातील दुसरा प्रवाह स्वप्नरंजनवादी ग्रामीण साहित्याचा. याला आपण व्याज ग्रामीण साहित्य असेही संबोधू शकतो. या प्रवाहातील ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामजीवनातील रोजचे प्रसंग रंजकतेने रंगवून सांगितले गेले आहे. या प्रवाहातील बहुतेक सारे लेखन वर्णनपर, माहितीच्या पातळीवर असते. शेती, पिके, निसर्ग, मोर, सुगी, पेरणी, सकाळ-संध्याकाळचे मोहक वातावरण, पती-पत्नी, प्रियकर-प्रेयसीचे हळवे प्रेम, सांकेतिकता इ. विषयावरील लेखन या प्रकारच्या ग्रामीण साहित्यात आढळते. बऱ्याचदा लेखकाच्या शहरी मध्यमवर्गीय कल्पना तो ग्रामीण लेखनात आरोपित करताना दिसतो. कवी चंद्रशेखर, द.ग. जयवंत, भ.श्री पंडित, वि.स. सुखटणकर, मायदेव, लक्ष्मणराव सरेदसाई प्रभृतींचे ग्रामीण साहित्य या प्रवाहात येते. (क) ग्रामीण साहित्यातील तिसरा ठळक प्रवाह वास्तवाचे भान आलेल्या ग्रामीण साहित्याचा. १९४५ च्या सुमारास ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन यथार्थपणे मराठी वाङ्मयात होण्यास सुरुवात झाली. श्री.म. माटे यांनी प्रथमतः ग्रामीण जीवनातील प्रत्यक्षातील समस्या, रोजच्या जीवनातील छळणारे प्रश्न, दारिद्र्य, अज्ञान, माणुसकी आपल्या लेखनातून मांडली व हा प्रवाह वाहू लागला. र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ यांनी हा प्रवाह बलिष्ठ केला. ह्या प्रवाहांतर्गत आपल्याला तीन प्रवृत्ती निर्माण झालेल्या दिसतात. (१) पहिल्या प्रवृत्तीमधील लेखन गो.नी. दांडेकर, श्री. ना. पेंडसे यांनी केले आहे. त्यांनी ग्रामीण जीवनाचा अनुभव समृद्धपणे आविष्कृत केला. नव्या-जुन्यांच्या संघर्षातील जुन्याचा पराजय, जीवनमूल्यांची जोपासना, मांगल्यावरचा विश्वास, अफाटतेची स्वप्ने वस्तुस्थितीत आणण्याची रोमँटिक वृत्ती या लेखनातून स्पष्ट होताना दिसते. (२) दुसरी प्रवृत्ती १९५० ते १९०० या काळातील व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार, शंकर पाटील यांच्या लेखनाची. या प्रवृत्तीचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण जीवनानुभवातील बारकावे, अनुभवाचा सच्चेपणा व वैविध्य, ग्रामीण माणसा-माणसातील संबंध, संघर्ष, मानवी जीवनातील संघर्ष, आंदोलने यांचे यथार्थ चित्रण हे आहे. ग.दि.माडगूळकर, अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, हमीद दलवाई, उद्धव शेळके यांच्या लेखनात ही प्रवृत्ती आढळते. (३) तिसरी प्रवृत्ती १९७० नंतरच्या दशकातील लेखकांच्या लेखनात आढळते. ग्रामीण साहित्य ही एक चळवळ आहे असे मानणाऱ्या लेखकांचा हा वर्ग आहे. आनंद यादव, रा.रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, राजन गवस, भास्कर चंदनशिव, रंगनाथ पठारे, विश्वास पाटील प्रभृती लेखक या गटात येतात. स्वातंत्र्योत्तर काळातले बदललेले प्रश्न, बदलत्या महाराष्ट्रातल्या असंख्य समस्या, ग्रामीण समाजजीवनातील परिवर्तनामुळे ग्रामीणांची होणारी ससेहोलपट आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा भ्रमनिरास या साऱ्या गोष्टींचा प्रत्यय या प्रवृत्तीतील लेखनात दिसतो. ग्रामीण साहित्याचा विचार करताना आपणास हे सारे प्रवाह, प्रवृत्ती विचारात घ्यावे लागतात.

साहित्य व समाज यांचेमध्ये अन्योन्य संबंध असतो. हा विचार भारतीय व पाश्चात्त्य साहित्यशास्त्रामध्ये प्राचीन काळापासून रूढ आहे. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रामध्ये येणारा लोकधर्मीचा उलेख, प्लेटोचा अनुकृती सिद्धांतातील साहित्याचा, कलेचा सत्ताशास्त्रीय स्थानाविषयीचा विचार याची साक्ष देतात. मात्र फ्रेंच साहित्यज्ञ तेन याने त्याच्या History of English Literature या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये साहित्य व समाज यांच्यामधील संबंध स्पष्ट करणारी सुसूत्र अशी पद्धती प्रथमतः मांडली. तेनच्या मते साहित्य हे वंश (race), युगप्रवृत्ती (moments) आणि परिस्थिती (millue) या तीन घटकांच्या परिणामांमधून निर्माण होत असते. तेनप्रणित 'वंश' या कल्पनेत एखाद्या मानवसमूहाला जन्मजात व वारसा म्हणून प्राप्त झालेली वैशिष्ट्ये, स्वभावधर्म, शरीररचना इ. चा समावेश आहे. हा मानवी समूह वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्तिगतरीत्या नहात असला तरीही त्याच्यावर मूलभूत साच्याच्या काही खुणा

राहातातच. त्याला साधारणपणे आपण एखाद्या समाजाचा राष्ट्रीय स्वभाव म्हणू. प्रत्येक युगात काही प्रभावी कल्पना असतात, शतकानुशतके टिकणारे काही बौद्धिक बंध असतात. हे बंध व्यक्त करणारी माणसाविषयीची विशिष्ट संकल्पनात्मक भूमिका म्हणजे युगप्रवृत्ती (moment), असे तेन म्हणतो. तर विशिष्ट प्रदेशाचे हवामान, भूगोल इ. बाबींचा समावेश त्याने परिस्थिती (millue) या घटकात केला आहे. साहित्यातून व्यक्त होणारा जीवनाशय, साहित्याची आविष्कार पद्धती, प्रवृत्ती या साऱ्यांना सामाजिक संदर्भ असतो. साहित्यकृती निर्माण करणारा लेखक आणि प्रत्यक्ष साहित्यकृती यांचा समाजाशी संबंध असतो व या संदर्भ संबंधातून साहित्यातील सामाजिकता स्पष्ट होत असते. लेखक म्हणजे खरं तर साहित्यनिर्मिती करण्याची क्षमता असणारी व्यक्ती; पण साहित्यिकाचा विचार करताना एका प्रतिभावंत व्यक्तीबरोबरच सभोवतालच्या परिस्थितीचा ज्याच्यावर परिणाम होतो असा एक सामाजिक घटक म्हणूनही त्याच्याकडे पाहिले पाहिजे. लेखकाच्याच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक सुखदुःखाला सामाजिक परिस्थितीचे परिमाण असते. लेखक ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजाच्या काही परंपरा, काही धर्मकल्पना, रूढी, तत्त्वप्रणाली, विचारसंकेतव्यूह, जीवन जगण्याच्या पद्धती असतात. या पद्धती एकसंघ व एकाच स्वरूपाच्याच असतात असे नाही. त्यांमध्ये वैविध्य असतेच. कित्येकदा एकाच समाजघटकामध्ये अनेक समाजघटकही वसत असतात. हे विविध समाजघटक कला, शिक्षण, तत्त्वज्ञान, धर्म इ. कारणांमुळे बनत असतात. लेखक हा या समाजघटकांपैकीच एक असतो. त्यामुळे त्याच्यावर सभोवतालच्या परिस्थितीचे संस्कार होत असतात. हा लेखक एकतर परिस्थिती आहे तशीच स्वीकारतो वा तिच्यातील आव्हाने स्वीकारून तीमध्ये अंशतः बदल करण्याचा प्रयत्न करतो किंवा त्या परिस्थितीस पूर्णपणे नकार देऊन नवीन घडी बसविण्याचा प्रयत्न करतो. लेखकाची ही क्रियाशीलता केवळ व्यक्तिगत असते असे नाही तर तिला सामाजिक वास्तवाचा आधार असतो. सामाजिक परिस्थितीत घडत असलेल्या बदलांमागे आर्थिक, सामाजिक कारणे असतात. प्रत्येक काळाच्या संदर्भात जीवनमूल्ये, कलामूल्ये बदलत असतात. या बदलांमुळे सामाजिक परिस्थितीत बदल होत असतो. साहित्य हे सामाजिक घटित असल्यामुळे साहित्यामध्ये हे बदल येत असतात. साहित्य निर्माण करणारा साहित्यिक हाही एक सामाजिक घटितच असतो. त्यामुळे त्याच्या जीवनविषयक, साहित्यविषयक दृष्टिकोनावरही या बदलांचा परिणाम होत असतो. साहित्यिक हा सर्वसामान्यांपेक्षा अधिक संवेदनाशील असल्यामुळे तो या बदलांचा अधिक नेमकेपणाने, संवेदनशीलतेने वेध घेऊ शकतो. काळाबरोबर किंवा काळाच्या पुढे जाऊन भविष्यात घडू शकणाऱ्या बदलांचा वा त्यामागील कारणांचा तो विचार करू शकतो आणि हा विचार साहित्याच्या माध्यमातून व्यक्तही करू शकतो. त्यामुळे लेखकाच्या भूमिकेमध्ये (लेखकत्वाच्या संकल्पनेतही) परिस्थितीसापेक्ष परिवर्तन होऊ शकते. जसं, भारतीय स्वातंत्र्यायुद्धाच्या काळातील वाढत्या गांधीवादाचा प्रभाव समकालीन साहित्यिकांच्या दृष्टिकोनात वा त्यांच्या साहित्य निर्मितीमध्ये आलेला दिसतो. (वि. स. खांडेकर, ग.त्र्यं. माडखोलकरांचे साहित्य) किंवा मानवी अस्तित्वाचा विचार मार्क्सवादाच्या परिचयानंतर एका वेगळ्या परिमाणात होऊ लागला व तो विसाव्या शतकाच्या मधल्या काही दशकांमधील मराठी साहित्यात स्पष्टपणे दृग्गोचर झालेला दिसतो. (मुक्तिबोध, विंदा करंदीकर, अनंत काणेकर, नारायण सुर्वे यांचे तत्कालीन साहित्य). उपरोल्लेखित सर्व विचार लक्षामध्ये घेऊन एक सामाजिक घटिताचा वेध घेणारी, विसाव्या शतकाच्या मध्यकालात हरवत चाललेल्या भारतातील ग्रामीण मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा विचार मांडणारी कादंबरी या नात्याने आपणास पाचोळा या रा. रं. बोराडे लिखित कादंबरीचा वेध घ्यावयाचा आहे.

'पाचोळा' ही मौज प्रकाशनाने १९७१ साली प्रकाशित केलेली रा.रं. बोराडे यांची पहिलीच कादंबरी आहे. या कादंबरीचे एक ग्रामीण कादंबरी असे वर्णन आपणास करता येईल. प्रकाशित झालेली कादंबरी ही मूळ लेखनाचा चौथा खर्डा आहे असे खुद्द लेखकानेच नमूद केले आहे. (पाचोळा कादंबरीची जन्मकथा – रा. रं. बोराडे, परिशिष्ट पाचोळा आ. दुसरी १९७३, आ. सहावी, २००१) १९७१ सालापर्यंत भारतास ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे लोटली होती. या २५ वर्षांत भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. या काळात औद्योगिक बदल झपाट्याने घडत होते; पण तरीही एका

बाजूला सर्वसामान्य माणसाचा भ्रमनिरास झाला होता. – स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुखासमाधानाचे दिवस येतील, संपन्नता येईल. सर्वांस उत्पनाच्या संधी मिळतील ही कल्पना सुरुवातीच्या काळातच कोसळली होती. लोकसंख्येचा स्फोट, अज्ञान, अंधश्रद्धा आणि वाढती बेकारी यांनी भीषण रूप धारण केले होते. चीनचा विश्वासघात, पाकबरोबरची प्रत्यक्ष व छुपी युद्धे यामुळे अर्थव्यवस्थेची दुरावस्था झाली. याचवेळी औद्योगिक प्रगतीचाही परिचय भारतीय समाजास होऊ लागला होता. त्यामुळे समाजमानस संदिग्ध बनले होते. एका बाजूला वेगाने शहरीकरण होऊ लागले होते; पण हे शहरीकरण घडताना भारतीय समाजव्यवस्था त्याला योग्य तो प्रतिसाद देण्यास सक्षम नव्हती. एतद्देशीय स्थितिशील समाजमानसावर यंत्रव्यवस्थेचे कलम करण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. त्यामुळे भारतीय समाजजीवन पूर्णपणे ढवळले गेले. त्यात प्रचंड उलथापालथ झाली. या उलथापालथीमध्ये सर्वसामान्य कनिष्ठ आर्थिक स्तरावरील जीवन जगणारा माणूस होरपळला गेला. त्याच्याजवळ नवी यंत्रे आली; पण त्यासाठी लागणारे तंत्र, कौशल्ये आत्मसात करण्यात हा माणूस अपयशी ठरला. शासकीय पातळीवरील प्रयत्नही नवे शिक्षण व पारंपरिक जीवन पद्धती यांची सांधेजोड करण्यात अपयशी ठरले. त्यामुळेच पारंपरिक जीवन जगणारा सर्वसामान्य भारतीय माणूस स्वतःच्याच अस्तित्वापासून दूर गेला. त्याच्यावर अस्तित्वलोपाचीच पाळी आली आणि हेच सूत्र पाचोळाच्या लेखनामागे आहे.

या विषयाला आणखी एक पैलू आहे व तो आहे अर्थव्यवस्थेचा. भारतीय अर्थव्यवस्थेने इतिहासात तीन वेळा हादरे स्वीकारले. पहिला हादरा ग्रीकांच्या आगमनाने दिला. तेव्हा पहिल्यांदा भारतातील प्रचलित वस्तुविनिमयाला नाण्यांच्या स्वरूपातील आर्थिक देवघेवीचा पर्याय लाभला; परंतु, कालौघात हा हल्ला भारतीय अर्थव्यवस्थेने पचवला आणि दुहेरी (वस्तुविनिमय आणि चलनी नाण्यांची देवघेव) अर्थव्यवहारपद्धती स्वीकारली. दुसरा हादरा ब्रिटिशांनी दिला. त्यांनी सर्वच व्यवहार आर्थिक व्यापारी दृष्टीने व पैशाच्या स्वरूपात करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आपल्या येथील समाजरचना, अर्थकारण पूर्णपणे बदलून गेले. आपल्या समाजव्यवस्थेतील बारा बलुतेदारांचे

**१९४५ च्या सुमारास ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन यथार्थपणे मराठी वाङ्मयात होण्यास सुरुवात झाली. श्री.म. माटे यांनी प्रथमतः ग्रामीण जीवनातील प्रत्यक्षातील समस्या, रोजच्या जीवनातील छळणारे प्रश्न, दारिद्र्य, अज्ञान, माणुसकी आपल्या लेखनातून मांडली व हा प्रवाह वाहू लागला. र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ यांनी हा प्रवाह बलिष्ठ केला. ह्या प्रवाहांतर्गत आपल्याला तीन प्रवृत्ती निर्माण झालेल्या दिसतात. (१) पहिल्या प्रवृत्तीमधील लेखन गो.नी. दांडेकर, श्री. ना. पेंडसे यांनी केले आहे. त्यांनी ग्रामीण जीवनाचा अनुभव समृद्धपणे आविष्कृत केला.**
**नव्या–जुन्यांच्या संघर्षातील जुन्याचा पराजय, जीवनमूल्यांची जोपासना, मांगल्यावरचा विश्वास, अफाटतेची स्वप्ने वस्तुस्थितीत आणण्याची रोमँटिक वृत्ती या लेखनातून स्पष्ट होताना दिसते.**

महत्त्व कमी होऊ लागले. नवा कामगार वर्ग, कारकून वर्ग, मध्यमवर्ग येथे वृद्धिंगत होऊ लागला. भारतीय अर्थव्यवस्थेवरचा तिसरा हल्ला यंत्राच्या आगमनामुळे आणि बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे झाला व तो निर्णायक ठरला. यंत्राच्या वाढत्या प्रसारामुळे पारंपरिक व्यवसाय व तो व्यवसाय करणारे व्यावसायिक देशोधडीला लागले. त्यांचे शेतमजुरांत, वेठबिगारांत किंवा अकुशल कामगारांत रूपांतर झाले. शेतीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या ग्रामीण भागात वाढली; पण शेतांचे आकार मात्र तेवढेच राहिले. परिणामी शेतीव्यवस्थेवर मोठा ताण पडला. अनुत्पादक शेतमजुरांची संख्या वाढली. या युगाच्या आगमनानंतर खेड्यांचे रूपांतर अर्धशहरात होऊ लागले. हे रूपांतर सर्वसामान्य जीवनव्यवस्था स्वीकारू न शकल्याने समस्यांची उकल होण्याऐवजी त्या वाढतच गेल्या. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने छोटे छोटे उद्योजक, शेतकरी, यांना कमी व्याजदराने पैसा मिळू लागला; पण त्यामुळे अर्थव्यवस्था सुधारण्याऐवजी हा पैसा बुडित खात्यात जाऊ लागला आणि परिणामस्वरूप ग्रामजीवन

अधिकाधिक उद्ध्वस्ततेच्या मार्गी जाऊ लागले. या सामाजिक – आर्थिक घटितांच्या बदलांचा परिणाम मूल्यव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात झाला. माणुसकी, जगा आणि जगू द्या यांसारखी मूल्ये हरवून त्यांच्या जागी कोणत्याही मार्गाने अर्थार्जन, पैशासाठी सर्व काही अशा प्रकारची क्रूर वाटणारी मूल्यव्यवस्था यांत्रिकीकरणाच्या, शहरीकरणाच्या रेट्यातून निर्माण झाली. त्याचा दुहेरी परिणाम झाला. (अ) शहरीकरण अटळ झाले आणि त्यामुळे भौतिक सुख-सोयींचे आगमन ग्रामजीवनात मोठ्या प्रमाणात झाले आणि भौतिकता हे जगण्याचे मूल्य बनले. (ब) शोषणाच्या परंपरागत पद्धतीऐवजी नवे शोषक, नव्या शोषणपद्धती ग्रामजीवनात आल्या. त्यामुळे तोवर एकात्म असलेले ग्रामजीवन विघटित, विस्कळीत व उद्ध्वस्त होऊ लागले. परिणामी एक वेगळाच गोंधळ निर्माण झाला. या साऱ्या गोष्टींचे चित्रण आपणास समकालीन साहित्यामध्ये दिसू लागले. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, रा.रं. बोराडे, आनंद यादव, भास्कर चंदनशिव, रणजित देसाई, रंगनाथ पठारे, नामदेव ढसाळ, विश्वास पाटील, राजन गवस, नागनाथ कोत्तापले प्रभृती लेखकांनी त्यांच्या साहित्यातून याचे चित्रण केले आहे.

शहरीकरणाच्या या रेट्यामुळे खेड्यांचा तोंडवळा वेगाने बदलत गेला. दळणवळणांच्या साधनांच्या प्रगतीमुळे शहरापासून दूर असलेली आणि बव्हंशी स्वयंपूर्ण जीवन जगणारी खेडी ही शहराजवळ वेगाने ओढली गेली. या वेगाला सामोरे जाणे हे ग्रामीण जीवनातील सर्वसामान्य कारागिरांना कठीण जाऊ लागले. शिंपी, सोनार, न्हावी अशा पारंपरिक घटकांना हे शहरीकरण पेलणे अवघड झाले. त्यांचा धंदा त्यांच्याकडे वंश परंपरेने चालत आला होता. त्यांची आपल्या धंद्याकडे पाहण्याची दृष्टी धंदा यापेक्षा धर्म हीच होती. त्यामुळे कोणतीही कुरकूर न करता बिनबोभाटपणे ही कारागीर मंडळी आपल्या वाट्याला आलेला धंदा सांभाळून होती. ही जबाबदारी त्यांच्या बरोबरीनेच त्यांच्या अवतीभोवती असणारी गावकरी मंडळी जपून होती. हे सारे कारागीर आपले आहेत. ते आपल्यासाठी राबतात ही जाणीव त्यांच्याही मनात होती म्हणूनच, तेही आपल्या मिळकतीतील काही हिस्सा बलुतेदारांचाही आहे हे मानून त्यांना सांभाळून घेत असत. शहरीकरणाच्या प्रचंड रेट्यामुळे या भावनेला तडा गेला. शहरीकरणाच्या संपर्काबरोबरच धंद्यांना व्यवहार चिकटला. शहरीकरणातील सुबत्ता व सुबकता खेड्यापाड्यांना आकर्षित करू लागली आणि ग्रामजीवन ढवळले जाऊ लागले. स्वयंपूर्ण खेडी शहरावलंबी झाली, खेड्यातील कारागिरांकडे, बलुतेदारांकडे स्थानिकांनी पाठ फिरवण्यास सुरुवात केली. त्यातून नव्या ग्रामव्यवस्थेचा जन्म होऊ लागला. या व्यवस्थेमधून, जे नव्या बदलांशी जुळवू शकत नाहीत वा शकले नाहीत ते फेकून दिले जाऊ लागले. किंवा ते कसेबसे तगून राहू लागले. पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या संस्कारांमुळे आपल्या येथील ग्रामजीवनाची घडी निश्चित बसलेली होती. ही घडी संस्कारक्षम असल्याने तिला मूल्यांची कदर होती; पण शहरांशी जवळीक वाढताना या मूल्यव्यवस्थेला नवनवे कंगोरे निर्माण होऊ लागले. परिणामी माणसामाणसातील नातेसंबंध दुरावले, त्यांना नवे परिमाण लाभू लागले. त्यातून निर्माण झालेल्या संघर्षाचे एक रूप रा. रं. बोराडे यांच्या पाचोळामधून व्यक्त होते. बदलत्या, यंत्रयुगीन परिस्थितीशी जुळवून न घेता आल्यामुळे जगण्याचा संघर्ष करताना सामान्य, मर्यादित कुवतीचा माणूस कसा ढासळतो, कोलमडून पडतो, त्याचे घर कसे कोसळते व अंतिमतः त्याच्या स्वतःच्या अस्तित्वाचा लोप होतो याचे चित्रण करणारी ही कादंबरी आहे.

आधुनिकीकरणाच्या, यांत्रिकीकरणाच्या आणि भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या वाढत्या छाया ग्रामीण भागावर पडू लागताच तिथले शांत, संथ जीवन ढवळून निघते. या आक्रमणापुढे सामान्य, मर्यादित कुवतीचा माणूस जीवाच्या आकांताने उभा राहण्याचा प्रयत्न करतो; पण अंतिमतः तो स्वतःच कोसळून पडतो, त्याच्या अस्तित्वाचाच लोप होतो. हा पराभव त्याचा वैयक्तिक पराभव जास्त असतो तसाच तो ज्या सामाजिक परिस्थितीचे, वास्तवाचे प्रतिनिधित्व करतो त्या वास्तवाचा, त्या परिस्थितीचाही तो पराभव असतो. या आशयसूत्राभोवती पाचोळा या कादंबरीचे कथानक उभे राहते. परंपरागत सरंजामी व्यवस्थेचे बलुतेदारी जीवन, त्याचा कायम असणारा पीळ आणि त्याच्याशी टक्कर देण्याचा प्रयत्न करीत नव्या व्यवस्थेशी जुळवून घेण्याचा आटापिटा करणारा सर्वसामान्य दुर्बल मनुष्य यांच्यातील संघर्ष या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. या कादंबरीचे

निवेदन पारबतीच्या रूपाने प्रथम पुरुषी एकवचनी तंत्राने केले आहे. त्यामुळे या कादंबरीतील घटिताला पारबतीच्या दृष्टिकोनाचा परिप्रेक्ष्य लाभला आहे. निवेदनासाठी तिची योजना करून लेखकाने कलात्मक यश मिळविले आहे. बदलत्या परिस्थितीशी सामना करणाऱ्या सामान्य माणसाची धडपड त्याच्या पत्नीच्या तोंडून ऐकविण्याचे दोन उद्देश साधले गेले आहेत. पहिला म्हणजे स्त्री हा पुरुषप्रधान मानवी जीवनातील सोशिक अत्याचाराच्या बळींचा एक नमुना आहे, त्यामुळे या कादंबरीतील निवेदनाला कारुण्याची जोड मिळाली आहे; व दुसरा उद्देश म्हणजे या निवेदनतंत्रामुळे पारबतीच्या मनातील सर्व भावना, विचार, संवेदना मांडण्याची लवचिकता निवेदनाला प्राप्त झाली आहे. पारबती ही ग्रामीण स्त्री आहे. तिची स्वतःची खास बोली आहे. एखादी खेड्यातील स्त्री आपल्या पती-मुलाबाळांविषयी - संसाराविषयी ज्या सहजतेने बोलते ती सहजता लेखक या निवेदन पद्धतीला देऊ शकला आहे. अशा प्रकारच्या निवेदन तंत्राची वापर केलेली पाचोळा ही पहिली ग्रामीण कादंबरी निर्माण झाली आहे.

'पाचोळा' चे कथानक पारबतीच्या निवेदनातून पुढे सरकते. या कादंबरीतील महत्त्वाच्या घटना आपणास पुढीलप्रमाणे पाहता येतील. सारं काही ठीक चाललं असताना गरडाचा आगाऊ मुलगा गंगाराम शिंप्याला फाटक्या धोतराला दंड लावायला अपमानास्पद भाषेत सांगतो. हा अपघात सहन न होऊन गंगाराम त्याला हाकून लावतो. त्याचा बदला घेण्यासाठी गरड हा जातीव्यवस्थेतील खालच्या पातळीवरचा पण पैशाने मालदार माणूस, दुसरा मिशिनवाला लातूरातून गावात आणून ठेवतो. तो मिशिनवाला आल्यामुळे गंगारामच्या धंद्यावर मोठा परिमाण होतो. नवा शिपी गंगारामला लागट बोलतो. त्यामुळे गंगाराम चिडतो व त्याची त्या नव्या शिंप्याशी हातापायी झडते. परिस्थितीत घडणाऱ्या या एकूण बदलाचा खूप विचार करून गंगाराम बदलायचे ठरवितो व स्वत:च्या मुलाचे-भानाचे शिक्षण बंद करून त्याला लातूरला नव्या फॅशनचे शिंपीकाम शिकायला पाठवतो. भानाची खरं तर शिक्षण सोडायची तयारी नाही. दोनदा तो काही ना काही कारण काढून परत येतो. अखेरीस परिस्थितीशरण गंगाराम स्वतःच नव्या फॅशन व शिंपीकाम शिकायला लातूरात येतो. तेथे अहोरात्र कष्ट करतो, नव्या पद्धतीनं काम शिकविणाऱ्या शिंप्याने फसवले म्हणून तो मारामारी करतो, पारबती त्याला सोडवून आणते. त्याच्या मनाला उभारी द्यायचा प्रयत्न करते. इकडे भानाचे शिक्षण बंद झाल्याने तो कावतो व घरात काहीही न करता भटकत राहतो. दरम्यान गंगारामच्या दुकानातील शिलाई मशीनचे ढोक चोरीला जाते. परत एकदा ते विकत आणायचे या निश्चयाने गंगाराम लातूरास जातो. अहोरात्र कष्ट करतो, तहानभुकेची पर्वा तो करीत नाही. परिणामी त्याला क्षय होतो. पुन्हा पारबती त्याला घरी आणते. त्याची शुश्रुषा करते. त्याला उभारी देण्याचा प्रयत्न करते. या व्यापात घरामध्ये छोटी दोन वर्षांची तानी, तिच्यावर अवलंबून असणारी आहेच, त्याच पारबतीला पुन्हा एकदा दिवस जातात. भानाच्या हे लक्षात येते. तो बिथरतो. त्यात एके दिवशी जयराम कोळी त्याच्या पोरीची भानाने छेड काढली म्हणून तक्रार घेऊन येतो. आधी गरड, मग कोळी अशी तथाकथित जातीव्यवस्थेच्या निम्न स्तरावरील माणसं आपल्यामागे हात धुवून लागलेली पाहून ते आपल्या दुर्दैवाला कारणीभूत ठरतात, हे पाहून आधीच चिडचिडा झालेला गंगाराम पिसाटतो, भानाला जाब विचारतो त्यांच्यात शब्दाशब्दी होते. भाना कोळ्याच्या पोरीने आधीच छेड काढल्याचे सांगतो व तोही आता मोठा झाला असल्याची जाणीव करून देतो. रागाच्या भरात भाना आपल्या आईला दिवस गेल्याची जाणीवही त्याला आहे हे रागीट शब्दात बापाला सांगतो. त्यामुळे संतापाच्या भरात गंगाराम त्याला उभा-आडवा मारतो आणि हा ताण असह्य झाल्याने रात्री झोपेमध्ये अंथरुणातच मरून जातो. वर वर पाहता हे कथानक साधे, सरळ वाटते; पण त्या कथानकात बदलत्या जीवनाचे ताणेबाणे आणि त्या बदलत्या स्थितीला सामान्य ग्रामीण माणसाचे कष्टाने सामोरे जाणे चित्रित झाले आहे.

'बरं चालू व्हतं. कुनाचं एक न्हवतं का दोन न्हवतं' या वाक्याने पाचोळाची सुरुवात होते. त्यातूनच पुढे घडू शकणाऱ्या विनाशाचे सूचन होते. एक सरळमार्गी, अल्पसंतुष्ट जगणे काहीतरी विपरीत गोष्टींनी उद्ध्वस्त होते, हे येथे जाणवते. गरडाजवळ प्रचंड अशी अर्थशक्ती आहे. यंत्रयुगाचे आगमन होवो वा आणखी कोणत्या, सरंजामी शक्ती वेगवेगळे रूप धारण करतात व त्या दुर्बल घटकांवर अन्याय करतातच. गरडाच्या आगाऊ पोराला शिवणासाठी गंगारामने नकार देताच या शक्ती जाग्या

होतात, आणि या शक्तींपुढे गंगाराम व त्याचं कुटुंब पाचोळ्यासारखं उडून जातं. इथे दिसतो तो एक वेगळ्याच प्रकारचा संघर्ष, भौतिक सुखसोयींचे आगमन होते आहे, त्यांचा स्वीकारही झपाट्याने होतो आहे; पण त्यामागील तंत्रे आत्मसात न करता आल्यामुळे अकुशल कामगार वर्ग त्यात भरडतो आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे समाजातील भौतिक शक्ती झपाट्याने बदलतात; परंतु सामाजिक शक्ती मात्र तेवढ्या झपाट्याने बदलत नाहीत. त्या हळूहळू बदलतात. गंगाराम शिंपी आहे आणि दरिद्री आहे तर गरड हा जातीव्यवस्थेनुसार शिंप्याच्या खालच्या जातीचा आहे; परंतु तो श्रीमंत आहे. गंगारामने गरडाच्या मुलावर चिडण्याचे दोन पैलू होते. (१) खालच्या जातीतला असल्याने त्याने आपला अपमान केला हा गंगारामचा जातिनिविष्ट अपमान तर (२) खालच्या जातीचा असूनही तो श्रीमंत आहे व परिस्थितीत बदल घडवून आणण्याची त्याची क्षमता आहे, त्याच्यापुढे आपण खूप कमी आहोत ही जाणीव झाल्यानंतर गंगारामला कळून चुकलेली अगतिकता. गरड या कादंबरीत प्रत्यक्षात कुठेच येत नाही; पण त्याचे अस्तित्व साऱ्या कादंबरीला व्यापून टाकणारं बनतं. गरडाने गावात लातूरचा फॅशनवाला शिंपी आणल्यानंतर या पाताळयंत्री डावपेचाला गंगाराम त्याच्या पद्धतीने उत्तर शोधतो. त्याच्या उत्तराची धडपड शाळेत नेहमी पयला नंबर काढणाऱ्या भानाला शाळेतून काढून लातूरला शिंपीकाम शिकण्यासाठी धाडण्यात परिणत होते. गंगारामच्या या इच्छेला पारबती विरोध करते; पण अखेरीस मानही देते. भाना यामुळे पूर्णपणे उद्ध्वस्त होतो व बापापासून मनाने दूर जातो. इथे गंगारामला एकाचवेळी मानसिक संघर्ष, कुटुंबातील संघर्ष आणि कुटुंबाच्या एकूण अस्तित्वाचा संघर्ष असे संघर्षाचे अनेक पदर सोसावे लागतात. ते सोसण्याचा तो आटोकाट प्रयत्न करतो. अशी परिस्थिती उद्भवण्यास त्याचा स्वभाव हेच एकमेव कारण नाही तर परिस्थितीत घडणारा बदल हेही एक कारण आहे. ही परिस्थिती आज ना उद्या यांत्रिकीकरणामुळे त्याच्यासमोर उद्भवणार होतीच. गरडाचा पोर व गंगारामचा तापटपणा हे एक निमित्त ठरले एवढेच. नवी फॅशन शिकायला भानाला पाठवायचा त्याचा निर्णय प्राप्त परिस्थितीत योग्यच वाटतो. त्याची जिद्द आणि तेवढ्याच जिद्दी स्वभावाचा भाना यांच्यात संघर्ष उभा राहतो. त्यांच्यातील ताण सतत वाढत जातो. लातूरला गेलेला भाना गरडाच्या पोराच्या फितवण्यामुळे बार्शीला पळून जातो व अखेरीस गंगाराम 'तो मला मेला व मी त्याला मेलो' अशी भावना व्यक्त करतो. पोराच्याकडून अपेक्षाभंग झालेला, दुखावलेला गंगाराम स्वतःच लातूरला नवं शिंपीकाम शिकण्यासाठी जाण्याचा निर्णय घेतो. त्याच्या जिद्दी स्वभावाला ही घटना पोषकच ठरते. लातूरात गंगाराम ज्या शिंप्याकडे शिकत असतो त्यानेच त्याला फसवल्यावर तो मारामारी करतो. पोलीस त्याला पकडून नेतात. पारबती त्याला सोडवून आणते. तोवर त्याचे पोट ज्याच्यावर अवलंबून आहे असे मशीनचे डोकेच चोरीला जाते आणि गंगारामचेही डोके कामातून जाते. मशीन ही त्याची रोजी रोटी देणारी लक्ष्मीच, ही त्याची भावना. ही लक्ष्मी परत आणण्यासाठी तो लातूरला जाऊन उरफोड काम करतो व क्षयाचा रोगी बनतो. या साऱ्या घटनाक्रमात भाना मात्र अलिप्त असतो. आपल्याला शाळा सोडावी लागली याला बापच जबाबदार ही त्याची भावना कादंबरीच्या घटनाक्रमानुसार विकसित होत जाते. म्हणूनच तो बापाविरुद्ध बंड म्हणून लातूरातून बार्शीला पळून जातो. खरं तर हे नव्या पिढीचे परंपरेविरुद्धचे बंडच आहे. आपली व आपल्या कुटुंबाची होरपळ होण्यास आपला बापच जबाबदार आहे ही जाणीव त्याला होते व तो सतत वैराची भूमिका बापाबरोबर घेतो. त्याचे पौगंडावस्थेतील वय, अन्यायाची भावना, शिक्षण सोडावे लागल्याचे दुःख अशा वेगवेगळ्या कारणांनी भानाची स्वभावप्रकृती उग्र बनत जाते. त्याच्या मनाचे पीळ पक्के बनत जातात. त्याच्या या वृत्तीला गरडाच्या पोरासारखी भोवतालची मंडळी पाणी घालत जातात. गंगारामने तानीला मारणे, तिला घरात कोंडून ठेवणे, चुलीत पाणी ओतणे, सगळ्यांच्या भुका बंद असे फर्मान काढणे आणि त्यावर कळस म्हणजे नवा भाऊ येणार हे कळणे, या साऱ्या घटनाक्रमामुळे भाना अधिकाधिक संतापी बनत जातो. जयराम कोळ्याने त्याच्याविषयी तक्रार करताच त्याच्या भावनांचे उग्र रूप तीव्रतर बनते त्यातूनच तो बापाच्या तोंडाला तोंड देतो, बाप त्याला मारतो. अशा वेळी हा ताण असह्य होऊन रक्ताची उलटी होऊन बाप झोपेतच मरतो आणि भाना न रडता गुडघ्यात डोके खुपसून बसून राहतो. एकीकडे पोटच्या पोराची साथ न मिळाल्यामुळे धुमसणारा, भडकू डोक्याचा, आपण बसून खात असल्याने सारे आपल्याला बोलतात असं

समजणारा नवरा आणि दुसरीकडे बापाच्या अशा वागण्यामुळे आपल्या शिक्षणाचे एक वर्ष फुकट गेले अशा समजुतीतून रागानं खदखदणारा, तापट आणि ताठर मुलगा यांच्या कात्रीत पारबती सापडली आहे. पारंपरिक पतिनिष्ठा आणि पुत्रप्रेम अशा दुहेरी पेचात, दुहेरी मानसिक कुतरओढीत पारबती सापडली आहे. सणकी पतीला सांभाळणे, तितक्याच सणकी मुलाला चुचकारणे आणि या ओढाताणीत ढासळणारा संसार सांभाळणे या साऱ्या गोष्टी सांभाळताना तिची तिहेरी कसरत चालू आहे. गरडाच्या आर्थिक सामर्थ्याची भीती, पळून गेलेल्या पोराविषयी ममता आणि नवऱ्याच्या ससेहोलपटीचे दु:ख अशा विलक्षण परिस्थितीत पारबती सापडते, कोणीही अशा स्थितीत हेलपाटला असता; पण तरीही या स्थितीला तोंड देण्याचा ती आटोकाट प्रयत्न करते. त्यातून पारंपरिकतेचे एक प्रतीक म्हणून पारबती उभी राहते. परिस्थितीतील दुबळेपणा आणि जिद्दी तापट स्वभाव यांच्यातून तडजोडीचा मार्ग काढत आयुष्य सरळ मार्गाने जगण्याचा प्रयत्न करणारी पारबती आपल्या दृष्टिकोनातून कादंबरीतील घटनाक्रमाचे निवेदन करते. त्यामुळेच तिच्या अंतरंगात घडणाऱ्या वादळाची उकल होत राहते. त्यातून सतत उभे राहते ते तिचे भाववाही, उत्कट आणि सरळमार्गी मन. रोजच्या अडी-अडचणींना सामोरं जाणार तिचं संस्कारशील मन, प्रत्येकवेळी कधी गंगारामची, कधी भानाची तर कधी कुटुंबाची प्रेरणा बनणारी पारबती पारंपरिक स्त्रीचंच एक प्रतीक ठरते. लग्नाआधी मामा मामीच्या जाचात अडकलेली पारबती लग्नानंतर एका विशिष्ट परिस्थितीच्या, नवरा-मुलाच्या संघर्षाच्या कात्रीत अडकते. एक पत्नी, एक माता, एक स्त्री आणि एक मनुष्य अशा विविध भूमिकांमधून ती ठामपणे उभी राहते.

पारबतीची रांगती, अजाण मुलगी तानी, तिच्या या स्थितीला नियतीचे रूप देते. प्रत्येक अडीअडचणीच्या प्रसंगात तानीचे जर्मनची वाटी आपटत द्दे द्दे म्हणून भूक सांगणे चाललेले असते. परिस्थितीची सर्वांना गिळू पाहणारी भूक आणि तानीची बाळभूक यांचे एक नातेच आहे. घराची धूळधाण करणाऱ्या अनेक बाह्य प्रवृत्तीबरोबरच तानी ही एक मूक प्रवृत्ती म्हणूनच उभी राहते. जेव्हा जेव्हा उत्कट, हळवे, अडचणीचे क्षण उभारतात तेव्हा तेव्हा तिची दूध काल्याची भूक जागी होते व त्या क्षणांची तीव्रता वाढते. तिच्या जर्मनच्या वाटीला सारखी आपटल्याने चीर जाते, जशी पारबतीच्या संसाराला जाते. जसे चीर पडलेल्या वाटीतून दूध गळून जाते तसे पारबतीच्या संसारातून सुख गळून जाते, गळणाऱ्या वाटीला भाकरीकाल्याचा चुरा गंगारामच्या सांगण्यावरून लावणारी पारबती संसारालाही लागलेल्या गळतीला थांबविण्याचा आटोकाट प्रयत्न करते. येथे भाकरीचा काला, चीर गेलेली वाटी, तानी, पारबती एका अर्थी प्रतीकाचे कार्य करताना दिसतात. यंत्रयुगाचे आगमन, या आगमनाची सूचना देणारे गरडाचे वागणे, त्याचे जीवन मशीनवाला गावात आणणे, त्यातून निर्माण होणाऱ्या विपरीत परिस्थितीशी असेल नसेल त्या सामर्थ्याने झगडणारा गंगाराम शिंपी यांच्यातील संघर्ष हा खरे तर समतोल संघर्षच नाही. सामर्थ्यशाली, कठोर, क्रूर परिस्थिती आणि या परिस्थितीला तोंड देताना कोसळणारी दुबळी सामान्य माणसे यांच्यातील हा संघर्ष म्हणजे खरे तर या सामान्य, पूर्वज माणसांचे अस्तित्वच लोपून टाकण्यासाठी परिस्थितीने खेळलेला अत्याचारी, अन्यायी व जीवघेणा खेळ आहे, असे वाटत राहते.

रा. रं. बोराडे या लेखकाच्या जडणघडणीचा काळ हा साधारणतः १९६०-७० च्या दशकातील आहे. या दशकामध्ये भारतीय समाजव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल होत होते. ग्रामीण जीवन व्यवस्थेवर आधुनिक पद्धतीने आक्रमण होत होते. दलित चळवळ जोर धरत होती. एकंदर जीवनमूल्येच बदलत होती. समाजात माणूस केंद्रस्थानी असण्याचा काळ सरत होता, आणि परिस्थितीशरण माणूस हा नवा घटक महत्त्वाचे स्थान स्वीकारू पाहत होता.

लातूर या शहरानजीकच्या खेड्याचे शहरीकरण घडण्याचा क्षण लेखकाने येथे अचूक टिपला आहे. यांत्रिकीकरणाची सुरुवात त्या खेड्यात होण्यासाठी गरडाचा मुलगा व गंगाराम शिंपी यांच्यातील वाद हा केवळ एक निमित्त ठरले आहे. त्यातून उभा राहतो तो परिस्थितीशी जुळवू पाहणारा; पण त्यात अयशस्वी ठरणारा दुर्बल माणसाचा संघर्ष, ही कादंबरी कोणा गंगाराम, पारबती वा भाना यांची नाही, ते ज्या परिस्थितीत वावरत आहेत, त्या परिस्थितीला केंद्रस्थान देणारी आहे. आधुनिक जीवनव्यवस्थेत परिस्थितीकेंद्रितता हेच मूल्य बनले आहे. नेमके हेच वास्तव रा. रं. बोराडे यांनी पाचोळा मध्ये टिपले आहे. येथे नायकत्वाची कल्पना बदललेली

दिसते. गंगाराम, पारबती यांना तेथे नायकस्थान नाही तर गंगारामच्या कुटुंबाची एकूण फरपट करणारी परिस्थिती इथे नायकाची जबाबदारी पार पाडताना दिसते. नवी फॅशन, नवा कारागीर, नवी पद्धती, नवे जीवन हे तर अपरिहार्यपणे येणारच होते. गंगाराम व त्याच्यासारख्या लोकांची परवड होणार होतीच. गंगाराम, पारबती, भाना, तानी, येऊ पाहणारे नवे पोर साऱ्यांच्या प्राक्तनात एक तर बदलत्या परिस्थितीबरोबर बदलणे किंवा उद्ध्वस्त होणे एवढाच पर्याय उपलब्ध होता. पारबती त्या दृष्टिकोनातून भानाला घडविण्याचा आटोकाट प्रयत्न करते. नवे युग हे शिक्षितांचे युग आहे हे ती जाणून आहे म्हणूनच हुशार भानाच्या शिक्षणासाठी ती संघर्षही करते; पण अखेरीस पतिनिष्ठेचे परंपरागत जोखड तिला वाकवतेच, तिला नवऱ्याच्या, भानाचे शिक्षण बंद करून त्याला लातूरला पाठवण्याच्या, निर्णयापुढे मान झुकवावीच लागते. गंगाराम त्याच्या दृष्टीनेच विचार करतो. त्यामुळे स्वतःच्या अस्तित्वाचा संघर्ष आपल्या पोरानेही लढवावा हा त्याचा दुराग्रह बनतो आणि तो हा संघर्ष त्याच्यावर लादतो. येथे पुन्हा एकदा दोन पिढ्यांमधील सनातन संघर्ष उभा राहतो. बदलत्या सामाजिक वास्तवाचे परिणाम आपल्याला या साऱ्या घटनांमधून दिसतात. वास्तव विघटनाबरोबरच कुटुंबसंस्थेचे होणारे विघटन येथे दिसते. आपल्या मामाचे घर, नवऱ्याचे घर, गाव कधीच न सोडलेल्या पारबतीच्या समजूतदार दृष्टिकोनातून ह्या कादंबरीचे निवेदन केलेले असल्यामुळे रा.रं. बोराडे यांनी लातूर परिसरातील ग्रामीण मराठवाडी बोली प्रथमपुरुषी निवेदनाकरिता स्वीकारली आहे. त्यामुळे ग्रामजीवनातील अनुभवाच्या अनेक विश्व परिमाणांना आकार देणारी ग्रामीण बोली हा पाचोळाच्या परिणामकारकतेचा महत्त्वाचा पैलू आहे. स्थानिक बोलीतील या 'आधीच नारं न त्यात गेलं वारं, 'उफराटी फळी लावणं,' 'ना बोलून दोडं व्हायचं' यांसारख्या खास ग्रामीण म्हणी, वाक्प्रचारांचा वापर येथे मोठ्या प्रमाणात केला गेला आहे. छोटी छोटी वाक्यरचना या निवेदनाचा प्रवाह ओघवता ठेवते. पारबतीची स्त्रीसुलभ निवेदनशैली तिच्या स्त्री सुलभ भावनांची जशी अभिव्यक्ती करते तशीच ती ग्रामीण स्त्रीच्या संपूर्ण अस्तित्वालाही अभिव्यक्त करते. परिस्थितीचा कोंडमारा, त्यामुळे पडणाऱ्या मर्यादा, ग्रामीण जीवनातले स्त्रीचे स्थान, तिच्यावर झालेले विविध संस्कार, त्या संस्कारांमुळे तिच्यावर पडणारी विविध बंधने, तिची अगतिकता अशा साऱ्या घटकांमुळे ग्रामीण जीवनातील स्त्री तिच्या सर्व वैशिष्ट्यांसह पारबतीच्या रूपाने उभी राहते.

वास्तवाचे भान आलेल्या ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाला व्यंकटेश माडगूळकरांनंतर निर्णायक वळण देण्याचे काम रा.रं. बोराडे यांच्या पाचोळा या कादंबरीने केले आहे, ज्याप्रमाणे मेणबत्ती स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी स्वतः जळत जळत नष्ट होते किंवा एखादी वेश्या स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी देहविक्रय करीत स्वतःचे पूर्ण अस्तित्वच लोपून टाकते त्याप्रमाणेच बदलत्या वास्तवात आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी, टिकवून ठेवण्याची धडपड करताना गंगाराम, पारबती, भानासारख्या सामान्य दुर्बल माणसांचे स्वतःचे अस्तित्वच लोपून जाते. बदलत्या समाजस्थितीचा हा भेदक आणि अस्वस्थ करणारा अनुभव देणारी पाचोळा ही कादंबरी आहे.

**संदर्भ:**


१) थोरात हरिश्चंद्र, कादंबरीविषयी, पद्मगंधा प्रकाशन, २००६
२) द.दि. पुंडे आणि धायगुडे सुरेश, तेन यांचा वाङ्मयसिद्धांत, रोहन, २०१९
३) बडवे सतीश, साहित्याची सामाजिकता, शब्दालय प्रकाशन, २०१३
४) बोराडे, रा.रं., पाचोळा, मौज, १९७२
५) बोराडे, रा.रं., ग्रामीण साहित्य, संस्कृती प्रकाशन, २००७
६) रसाळ सुधीर आणि इतर, साहित्य: अध्यापन आणि प्रकार- प्रा. वा.ल. कुळकर्णी गौरव ग्रंथ, पॉप्युलर आणि मौज प्रकाशन, १९८७




**डॉ. नीतिन दत्तात्रेय आरेकर,**
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती चांदीबाई हिंमथमल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर, जिल्हा ठाणे- ४२१ ००३
चलभाष : ८८० ५५५ ००८८
email : nitinarekar@gmail.com

# ‘पधारो म्हारो देस’ समृद्ध संवेदनशील प्रवासानुभव

सुस्मिता खुटाळे

**विष्णू पावले यांच्या ‘पधारो म्हारो देस’या राजस्थानाच्या प्रवासवर्णनपर पुस्तकावरील परिचय लेख.**




पुस्तकाचे नाव : **पधारो म्हारो देस** (प्रवासर्णन)
लेखक : **विष्णू पावले**
प्रकाशक: **अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे**
**पृष्ठे** : **१५७**
मूल्य : **२०० रुपये**

‘केल्याने देशाटन’ वा प्रवास, भटकंतीला जगभरच्या परंपरेत विशेष महत्त्व आहे. गावाची वेस ओलांडण्याला फार वेगवेगळे अर्थ आहेत. चार गावं फिरून, बारा गावाचं पाणी पिऊन आलेल्याला गावात मानही मिळतो. देशोदेशीच्या माणसांच्या जगण्याच्या चालीरीती, रीतीभाती कळतात. प्रवास माणसाला समृद्ध करतो. बघण्याच्या, समजून घेण्याच्या, ऐकण्याच्या, टिपण्याच्या नि शिकण्याच्या उद्देशाने एखादा प्रदेश बघितला, तर तुमची समज अधिक विस्तारते. असेच एक आगळेवेगळे प्रवासवर्णन अक्षरवाङमय प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे.

पधारो म्हारो देस हा विष्णु पावले यांच्या राजस्थान भेटीचा वृत्तांत. हा नुसता वृत्तांत नाही तर, राजस्थानमधील भौगोलिक, भिन्न भाषिक, समाज सांस्कृतिक नि वाङ्मयीन प्रदेशाचं संवेदनशील लेखक मनानं टिपलेलं गद्यचित्रण आहे. ऐतिहासिकदृष्ट्या संपन्न राजस्थानचं, ओघवत्या नि प्रवाही बोलीतून गद्य चलतचित्र रेखाटले आहे; जे फक्त माहितीपर नाही तर दृश्य परिणामांची मालिका रेखाटणारे गद्य आहे. लेखकाला आपल्या बत्तरबाळ्या जगण्यात उंच विहरण्याचं स्वप्न पडण्यातून सुरू झालेली प्रवाससफर या प्रवासवर्णनात आहे.

गावदेवी आणि गावपांढरीला हात जोडून लेखकाची पावलं अनाम प्रदेशाच्या वाटेकडे चालायला लागतात नि

सुरू होतो एक प्रवास. एका नव्या भौगोलिक समाजाच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या जगण्याची ओळख विष्णू पावले यांनी करून दिली आहे. रेल्वेत बसल्यापासूनच जाणवणारा नि दिसणाऱ्या, भेटणाऱ्या प्रत्येकाचा प्रवास, त्याची लेखक मनानं टिपलेली कारणं दिसतात. प्रवासातील बोचरी थंडी, वाटेतील गव्हाची शेती, पिवळीधमक मोहरी, विस्तीर्ण सपाट प्रदेश, उंच टेकड्या, काटेरी खुरट्या बाभळी-वनस्पतींचा प्रदेश ओलांडत लेखक सूर्योदयी उदयपूरला पोहचतो, नि पधारो म्हारो देसची गोष्ट सुरू होते. रस्ते, गावं आणि भवतालाची बारकाव्यासह वर्णनं अत्यंत बारकाईने देतो. राजस्थानच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष असणाऱ्या खुणा, चौथरे, स्तंभ, देवी देवतांची चित्रं, भिंती, ऐतिहासिक वास्तू, स्थापत्यशैलीची वर्णनं आहेत. योद्ध्यांची चित्रे, युद्धवीरांच्या प्रतिमा या वास्तू महापुरुषांचा, राजघराण्यांचा या प्रवास पाहणीतील इतिहास प्रवासभर जाणवतो. महाराणा प्रताप, राणी पद्मिनी, मीरा यांच्या जीवनकथा या पत्थरांतून लेखक जिवंत करतो. महाराणा कुम्भ, महाराजा सवाई मानसिंग यांच्या कारकिर्दीची माहिती, किल्ले, मंदिरांचे इतिहास नि सद्यस्थितील वर्णनं. उदयपूर, चित्तोडगड, अजमेर व जयपूर या ठिकाणच्या ऐतिहासिक वास्तू पाहतानाही त्यांच्या स्थापत्यकलेचीही माहिती लेखक देतो. भूगोल, इतिहास आणि वर्तमानाचे दृश्यचित्र याची बेमालूम मिसळण त्यांच्या गद्यशैलीत आहे. शिस्तशीर वसवलेल्या शहरातील गल्ल्या, रस्ते, दुकानं, वाहतूकव्यवस्था, पांढऱ्या इमारती, चित्रपटगृह, जलमंदिर, प्याऊ. प्रवासात दिसलेले सामान्य कपड्यांतले, रापलेले, किडकिडीत देहाचे सायकलरिक्षावाले, संपूर्ण प्रवासभर दिसलेल्या नवख्या प्रदेशातील स्त्री-पुरुषांची प्रसंगानुरूप, त्यांच्या पोशाख, देहबोलीसह लेखकानं टिपलेली चित्रदर्शी वर्णनं. लेखक आपण बघत असलेला प्रदेश, स्थळ, व्यक्ती नि वस्तूंना आपल्या प्रदेशाशी, आपल्या जगण्यातील प्रतिमा, प्रतीकांशी जोडून पाहतो. भिन्न संस्कृतीला आपल्या सांस्कृतिक अनुभवविश्वाशी जोडून घेणारी निरीक्षणे त्यात आहेत. हे प्रवासवर्णन वाचताना दोन वेगवेगळ्या भाषिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाची अनुभूती येते. संपूर्ण प्रदेश न्याहाळताना आपल्या गावपांढरीचा, शेती, समाज, संस्कृती, भाषारूपांचा, बोली संवेदनांचा धागा, तुलनात्मक संदर्भ त्यांच्या मनात आहे.

राजस्थानमधील वाङ्मयीन जगताचे चित्रण हा या लेखनाचा एक विशेष आहे. राजस्थानच्या काही साहित्यिकांच्या भेटीचे वर्णन त्यात आहे. या भेटींची सुरुवात भाषेचा नवखेपणा नि त्याच्या अवघडलेपणातून सुरू होते नि नंतर गप्पांमध्ये परावर्तित होते. हे अवघडलेपण कुठेही न झाकता सांगितले आहे. डॉ. के. के. शर्मा यांच्या भेटीच्या वर्णनात तोफगोळा वादळावा अशी झालेली गत लेखक नि:संकोचपणे सांगतो. राजस्थान साहित्य अकादमी, कवी मेहरा यांची भेट, डॉ. भाणावत यांच्याशी झालेली महाराष्ट्र आणि राजस्थानाच्या लोकसाहित्यावरची विस्तृत चर्चा आली आहे. हे वाङ्मयीन संवाद सत्र महत्त्वाचे आहे. चित्तोडगडचे कवी डॉ. भगवतीलाल व्यास, गीतकार अब्दुल जब्बार, शिवमृदुल, रामेश्वरलाल पाण्डे, डॉ. मयंक, पत्रकार व्यास यांच्यासोबतची चर्चा व काव्य मैफिल आणि पाहुणचाराचा अनुभव विस्ताराने सांगितला आहे. त्याचबरोबर कवी, लेखकांचा प्रवास व वाङ्मयीन वाटचालीचेही वर्णन आहे. अजमेरच्या बान्द्रा सिन्द्री येथील केंद्रीय विद्यापीठातील व्यवस्था, पाहुणचार आणि कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे सरांची भेट, लेखकाच्या प्रवासाचा शीण भरून काढणारी व पाठबळ देणारी ठरली. तिथे भेटलेल्या जयसिंगचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या जगण्याची लढाई, व्यवस्थेनं मोडलेली त्याची स्वप्नं, त्याचं मातृप्रदेशापासून तुटणं नि लांब जाणं, या भावावस्थेचे संवेदनशील मनाने चित्रण केले आहे.

जयपूरच्या काही कवी लेखक मंडळींच्या भेटीचा वृत्तांत आहे. डॉ. हेतू भारद्वाज, गोविंद माथुर, कथालेखिका उमा, दुष्यंत कुमारांची भेट नि साहित्याची भाषा, साहित्यातील प्रादेशिक भाषा वापर यावर झालेली चर्चा, महाराष्ट्र मंडळाच्या भेटीचा वृत्तांत प्रत्ययकारी आहे. सवाई माधवपूरला मूळ गावाच्या शोधात त्याला दिसलेली थम्बोर राजाच्या पुतळ्यावर नि त्याच्या इतिहासावर चढलेली धुळीची पुटं, गावाची माहिती घेता घेता मिळालेली माहिती, दिसलेलं गाव बघून शिणून कलत्या दुपारी परतीच्या ओढीनं घेतलेला परतण्याचा निर्णय. साहित्यिकांच्या भेटी, मुलाखती, चर्चेतून राजस्थानच्या वाङ्मयीन संस्कृतीची ओळख करून देणारे हे प्रवासवर्णन आहे.

राजस्थानच्या खाद्य संस्कृतीची ओळख,

माधवपूरच्या हातगाडीवरील डाल की बड़ी, दालबाटीची दिसलेली आटावाटी नि मांसाहारी जेवणाच्या शोधात लागलेला नवाच बड़े का शोध या खानपान नि पाहुणचाराचे मिश्किल कथन प्रवासवर्णनात आहे. राजस्थानच्या लोककला, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ हे प्रसंग, घटना, माहिती वाचनीय आहे. राजस्थानच्या लोकसंस्कृतीच्या माहिती कथनातून त्या त्या प्रदेशविषयीची आत्मीयता प्रकट होते. प्रवाही बोलीतील कथनशैलीने स्थळ, वस्तू, व्यक्ती वर्णनाला जिवंतपणा व दृश्यमयता लाभली आहे.

एकीकडे भिडलेल्या प्रदेशाच्या ऐतिहासिक वैभवाची नि सद्य वर्तमानाची तटस्थ मनानं टिपलेली निरीक्षणं. सामाजिक कंगोऱ्यांची; शिवताशिवतची नुसतीच का होईना पण झालेली तोंडओळखही दिसते. पांढऱ्याशुभ्र, प्रमाणशीर इमारती, शिस्तशीर गल्ल्या नि त्याचवेळी लेखकाला दिसलेल्या ओसाड,उजाड माळावर, शहरांच्या कोपऱ्यावर राजस्थानच्या एका खूप मोठ्या श्रमजीवी वर्गाचं खुरटलेलं वर्तमान वास्तव अभिव्यक्त झाले आहे. परतीच्या प्रवासात विवाह पद्धतीवरच्या एका टिप्पणीने राजस्थानच्या समाजातील विदारक वास्तवाची जाणीव प्रकटली आहे. ती अस्वस्थ करणारी आहे. राजस्थानच्या वाङ्मयीन जगाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक जनजीवनाचं, ऐतिहासिक वारशाचे चित्र रेखाटले आहे.

गुलाबी थंडी अशी ओळख असलेल्या राजस्थानच्या मारकुट्या थंडीचा मारा सहन करत पूर्ण केलेली ही यात्रा आहे. हा प्रवास एका भिन्न सांस्कृतिक पर्यावरणाचा संवेदनशील मनाने घेतलेला धांडोळा, तितक्याच समर्थ लेखणीतून साकारला आहे. राजस्थानचे शब्दचित्र म्हणून पधारो म्हारो देसकडे निश्चित पाहता येते. एका गावखेड्यातील तरुणाने आपल्या भौगोलिक सीमांपार जाऊन समाज सांस्कृतिक संचिताचा घेतलेला हा शोध आहे. लेखकाच्या मनाची अवस्था, अस्वस्थता अनेक ठिकाणी दिसून येते. नव्या गोष्टीचे कुतूहल आहे. जाणून घेण्याची इच्छा आहेच; पण त्याच वेळी आपण आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडून अनाम प्रदेशाला जाणून घेण्याच्या शक्यता आहेत. या वेळात नि प्रवासात फक्त ठरवलेल्या गोष्टींचाच, शहरांचाच प्रवास होतो असे नाही तर आपल्या आत्तापर्यंतच्या अनुभवविश्वात न आलेल्या अनेक नव्या गोष्टी ओलांडण्याचाही प्रवास आहे, त्याच मज कळो आले। जगाचे जीवन । हा अनुभव । दिव्य ऐसा ।। या शब्दांतून व्यक्त झाल्या आहेत. गावं, शहरं, भौगोलिक सीमा, इतिहास, समाजव्यवस्था बदलत राहते; ती कितीही बदलली तरी सामान्य माणसाचं जगणं नि त्याच्या जगण्याची लढाई मात्र सारखीच राहते, हे वास्तव लेखकाने अंतर्मुखपणे मांडले आहे.

पावले यांच्या कथनशैलीवर वारकरी पंथाचा प्रभाव जाणवतो. लेखकाच्या जाणीव घडणीत लोकपरंपरेतील कथांचे, वातावरणाचे संदर्भ आहेत. ग्रामीण बोलीतील शब्द, म्हणी, वाक्प्रचारांनी ते कथनशैलीला मिश्किल, प्रवाही नि काव्यात्म करतात. उसुशी, दमसास, घंगऱ्याघोळ असे शब्द, अर्धकच्ची झोप, पोटात कावळ्यांचा दंगायोट, अजमेरकडं कूच करणारी वाघीण, लहान पोरासारखं रडणारं कुलूप, गाडीची धिमाई म्हणजे दरडानं म्हाताऱ्यानं चालावी अशी, साठीचा सांगावा घेऊन येणाऱ्या आजीबाई, प्रश्नांची घागर आडात सोडली, वाणीचा हिलाल विझला, हुमाण सुटलं, सीएसटीला अजगरणीनं उसासा टाकला अशी वैशिष्ट्यपूर्ण भाषासमृद्धी या गद्यलेखनात आहे. कधी न मिळं गाटदिशी गिळं, बड़ी आफ़त मर चुकी अशा म्हणी. अतीव गोड नि गुंतवणारी, बोलीचे प्रवाहीपण टिकवणारी भाषाशैली आहे. लेखकानं काही ठिकाणी ध्वन्यानुकारी शब्दांची हेतुपूर्वक योजना केली आहे. (कॅमेऱ्याचा टुई टुई, मोबाईलचा ट्यांव ट्यांव आवाज).

मराठीत प्रवासवर्णने ही वृत्तकथन, संवादात्म, पत्ररूपात, रोजनिशीवजा किंवा आठवणी स्वरूपात लिहिली आहेत. विशिष्ट विषयाच्या शोधस्वरूप असेही त्याचे स्वरूप आहे. नव्या प्रदेशाची नवी माहिती, इतिहास भूगोलाचे तपशील, घटनाक्रम, वृत्तांत, रटाळ व्यक्तीवर्णने आढळतात. त्यात कलात्मकतेचा अभाव जाणवतो, तर काही प्रवासवर्णने रंजक वर्णनांमुळे बहुश्रुत झाली. या पार्श्वभूमीवर विष्णू पावले गोष्टरूप कथनशैलीचा वापर करतात; एखाद्या लहान मुलाला गोष्ट सांगावी अशी, समवयस्क मित्राला अनुभव सांगणारी ही कथनशैली आहे. प्रवासवर्णनाच्या या वैशिष्ट्यतेमुळे पधारो म्हारो देस हे प्रवासवर्णन लक्षणीय वेगळे ठरते.

**सुस्मिता आनंदा खुटाळे.**
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# धालवली (देवगड), मालवणी कविता आणि भारतीय ज्ञानपीठकार विंदा करंदीकर- एक अनुबंध

**डॉ.बाळकृष्ण लळीत**

**धालवली गाव, मालवणी कविता आणि गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांचा अनुबंध उलगडून दाखवणारा संशोधन लेख.**

सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी 'कोंकणनायक' या नावाच्या साप्ताहिकाचे संपादन कणकवलीचे पत्रकार माधव कदम करत होते. त्यात कविवर्य विंदाच्या धालवली गावी भेट देऊन एक लेख लिहिला होता...!. यानंतर पंचवीस वर्षांपूर्वीचे त्या लेखातील तपशील मलाही विंदांच्या गावी घेऊन गेले. आजवर अनेकांना अज्ञात असलेली ही माहिती येथे या शोध लेखात देत आहे.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विंदा करंदीकर हे आजच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील धालवली या गावचे. त्यांचा जन्म, बालपण, शिक्षणही या परिसरात झाले. अनेक कारणांमुळे विंदा प्रथम रत्नागिरी व नंतर मुंबईत स्थायिक झाल्यावर आपल्या जन्मभूमीशी प्रत्यक्ष संपर्क ठेवू शकले नाहीत, हे वास्तव असले तरी वाचक, रसिक यांना कवीच्या, प्रतिभावंताच्या जन्मभूमीबद्दल उत्सुकता असतेच. तशीच ती विंदांना पण होती.

नोव्हेंबर १९९६ मध्ये माधव कदम व त्यांचे मित्र सहकारी गजानन मोरये धालवली गावी गेले. खरे तर विंदांचे मूळगाव म्हणजेच बाळशास्त्री जांभेकरांचे पोंभुर्ले. या गावच्या वेशीवरच्या 'वेसवीवाडी'त करंदीकरांच्या घरात 'विंदां'चा जन्म झाला. आम्ही तेथे गेलो तेव्हा ते घर पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले होते आणि ते ठिकाणही नंतर दुसऱ्याच्या मालकीचे झाले होते. विंदांचे जन्मघर होते, त्या जागी नव्या जागा विकत घेतलेल्या मालकाने गुरांचा गोठा उभारला होता... हे पाहताना मनाना वेदना झाल्या.
त्यांचे प्राथमिक शिक्षण धालवली लगतच असलेल्या 'कोर्ले' गावातील शाळेत झाले होते. आम्ही शाळा पाहायला गेलो... तर 'ती' शाळा गावातील जुगाई देवी व सोमेश्वर मंदिर यांच्या मध्यभागी होती. दुर्दैवाने १९६१ सालच्या पुरात 'त्या' शाळेची इमारत कोसळली... वाहून गेली. नंतर शाळा दुसऱ्या जागेत बांधली गेली..!

विंदा म्हणजे छोटा गोविंद ज्या शाळेत जात असे ती जागा कोर्ले गावचे वयोवृद्ध नारायण सदा शिवतथा नाना पेंढारकर व धालवली माध्यमिक शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक भालचंद्र गोविंद कुलकर्णी यांनी आम्हाला दाखवली. ती यांच्या पूर्ण स्मरणात होती. आम्ही मनोमन त्या भूमीला वंदन केले नि पुढे निघालो.

'विंदांचे एक घर खुद्द 'पोंभुर्ले' गावात होते, आता आम्ही ते पाहायला निघालो, गावचे माजी सरपंच श्रीरंग पडवळ यांनी 'ते' घर दाखवले, त्या घराचीही पडझड झाली होती.. आश्चर्य म्हणजे विंदा पुढे मुंबईत स्थायिक झाले; पण त्यांचे वडील विनायक काका शेवटपर्यंत पोंभुर्ले गावातील 'साखरवाडी' गावातील आपल्या घरात राहत

होते. ते पडझड झालेले घर पाहताना वेदना या झाल्याच.

या घराशेजारी विनायक करंदीकर यांनी पावणाई देवीचे एक छोटे मंदिर उभारले होते. दुर्दैवाने त्या वेळी (१९९६) या मंदिराची पडझड झालेली नजरेने टिपली. आम्ही निदान पडझड झालेल्या घराच्या भिंती पाहिल्या आता तेथे काय शिल्लक आहे माहीत नाही. पुढे ही जमीन व मालमत्ता विंदांनी बक्षिसपत्राने कुणा जवळच्या नातेवाईकांना दिली, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.

अशा प्रकारे कविवर्य विंदा आपल्या जन्मभूमीपासून दूर गेले. शिक्षणासाठी ते पुढे कोल्हापूर, मुंबईत गेले. नंतर गावी फारसे फिरकलेच नाही; पण त्यांच्या साहित्यातून मात्र हा परिसर येतो. संदर्भ येतात. 'तिमन मळा, आठवली, देवीची मळी, धोंड्या न्हावी, खाडी पलीकडील 'प्रिंदावन' गाव, अनेक मालवणी-कोकणी बोलीतील कविता त्यांची पाठराखण करतात. विशेषतः,

'दणदणता सर, फिरता नांगर
चिकल् झाली हा पूरी
लाव गो लावणी पोरी..!'

'विंदा' असे आपल्या गावातल्या आठवणींतून, लिखाणातून आपल्याला भेटत राहतात. माझे मोठे भाग्य सावंतवाडीला १४-१५ डिसेंबर १९९६ मध्ये झालेल्या कोमसापच्या चौथ्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. एका परिसंवादात मी 'मालवणी-कोकणी' वर बोलत होतो नि समोर पहिल्या रांगेत मधुभाई, प्र. श्री. नेरूरकर आणि मध्ये साक्षात कविवर्य विंदा माझे भाषण ऐकत होते. आयुष्यातील मोठा रोमहर्षक क्षण मी अनुभवत होतो. हे संमेलन पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडीजवळ जे जनरल जगन्नाथराव भोसले उद्यान आज आहे त्या शेजारच्या मोकळ्या जागेत एका भव्य मंडपात संपन्न झाले होते.

माधवराव कदम यांच्यामुळे विंदांच्या जन्मभूमी संदर्भात माहिती उपलब्ध झाली. ती या निमित्ताने वाचकांपर्यंत पोहोचवता आली, याचा आज आनंद होत आहे. 'कोकणनायक'च्या डिसेंबरच्या विशेषांकात माधव कदम यांनी यावर एक लेख प्रकाशित केला होता व काही छायाचित्रे प्रसिद्ध केली होती.

धालवली. या गावी दि.२४ ऑगस्ट १९१८ रोजी विनायक ऊर्फ 'दादा आणि यांना पुत्ररत्न झाले नाव 'गोविंद' असे ठेवले..!

या मुलाने पुढे इंग्रजीचा प्राध्यापक झाल्यावर मराठी साहित्य क्षेत्रात अतुलनीय कार्य केले. २००३ साली त्यांना ज्ञानपीठ या पुरस्काराने सन्मानित केले गेले.

'स्वेदगंगा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९४१ साली प्रसिद्ध झाला. त्याला अनंत काणेकर यांनी प्रस्तावना लिहिली होती.

या संग्रहाच्या शेवटी 'भरतीच्या लाट', 'चिकलीनंतर','माज्या घरी', 'भुताबाईच्या राईंत', 'मोती, आणि 'मुंबयची चाकरी'अशा एकूण सहा कविता मालवणी बोलीत आहेत. करवीर, मुंबई, तासगाव व मुंबई येथे असताना त्या-त्या लिहिलेल्या आहेत व त्या१९४० ते १९४८ दरम्यानच्या आहेत.

कवितेतील शेतकरी 'घो' आपल्या नव्या नवलाईच्या 'बायलेला' काय म्हणतो ते पहा...

'चिकली नंतर'---
'दणदणू तासर,फिर्ता नांगर;
चिकल् झाली हा पुरी; लाव् गो लावणी पोरी !
'मी नायू येवूचंय,लावणी लावूचंय;
चिकूलांत काटे भारी.'
'चिकूल त लोण्यासारी !'
'माकां नायू व्हवूचां,
चिकूलात् जावचां; माजी चोळि भर्जरी.'
'चिकूल माजि सोनेरी !'
'मी पोर् कवूळी; वारो हा जौळी; थर्थरी माज्या उरीं.'
'इलि घराच्या सारीं.'
'आये माजि पाटलिण, बाप् माजो पाटिल; पाट्लाचि पोर्मी न्यारी !'
' घोव मी तुजो शेतकरी !'

तर दुसऱ्या 'मुंबयची चाकरी' या कवितेत त्यांनी 'मला गावी.. घरी सोडून मुंबयक चाकरेक जाव नको!' असा आग्रह करणारी आवस आसा. 'भंगो ती तुजी चाकरी मिया म्हातारी हंय गावाक एकटी!'
असे म्हणणाऱ्या आईला मुलगा कसे नि कोणत्या शब्दांत समजूत घालतो पहा..!

मुंबयची चाकरी-
जाउ नको र झिला मुंबय का सोडुन् माका घरीं;
मी म्हातारी, येकुलतो तूं, भंगोती चाकरी !'
'ह्यां काय बोल्तस् आय्ये येडां, बेगुन् व्होशी बरी;
सरायिचीं भातां कापूकां येवूचंय मी माघारी.

कर्जाखाली शेता गेलीं, सावकार धरणांधरी;
धरण उपाशी तूंबी तैशी; छे कर्तय चाकरी.
गिरणीचां काम मिळात माकां निदान् रात तरी;
भिती वाटता तुका कशाची ? नायू पडाचय् आजारी.
इश्वास तुजो का नायू इतको? शपत् गळ्याची तरी :
मी नायू पिवचंय, मी नाय शिवचंय, दारु इकाच्या सारी.
इलीस रायी, लेक परततां होवोन दुकणेकरी;
'आय्ये !' म्हणूतां दार उगडतां घरण येकली घरीं.

सुमारे ८५ वर्षापूर्वी विंदांना कोणत्याही 'कोकणी – मालवणी' बोलीचे कवितेतील अभिव्यक्ती सामर्थ्य ध्यानी आले होते एवढेच नव्हे तर या 'अस्सल' ग्रामीण विषयावरील ग्रामीण बोलीतील कविता आहेत; पण दुर्दैव पाहा एकाही ग्रामीण साहित्याच्या समीक्षकाने या कवितांची साधी नोंद घेतली नाही आणि त्यापेक्षाही दुर्दैव असे की, मालवणी कविता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात लावणाऱ्या विद्वानांनीही या अस्सल मालवणी कवितांना स्थान दिले नाही..!

एखादी बोली प्रगत होत असताना त्या बोलीतील लिखित साहित्याची नोंद ही नुसती घेणेच आवश्यक नसते, तर त्या भाषेतील प्रथितयश मातब्बर प्रतिभावंत जेव्हा ती बोली आपल्या अभिव्यक्तीसाठी वापरतात तेव्हा तो त्या बोलीचा नुसता गौरव नसतो तर तो तिच्या अभिव्यक्ती सामर्थ्याचा एक पुरावा असतो; पण नेमके येथेच आपण मार खातो नि एक संधी घालवून बसतो.

कविवर्य विंदा करंदीकर यांनी 'माझ्या घरीं' अत्यंत गाजलेली मालवणी–कोकणी कविता त्यांनी करवीर येथे असताना लिहिली. (स्वेद गंगा..पॉप्युलर प्रका. १९९४,पृ.२०१) ही कविता १९४१ दरम्यान लिहिली असावी.

या सोळा ओळींत विंदांनी अख्ख्या मालवणी मुलखाची निसर्ग समृद्धी उभी केली आहे... 'चेडवा येगो माझ्या घरी' अशी घातलेली साद हा मोठा 'चकवा'आहे. प्रत्येक दृश्य प्रतिमेवर खूप काही लिहिता येईल. मुरडणारा मळा नित्यात आंबे मोहराचे डुलणे नि..दरीचे घमघमणे..! हे सारे मानवी भाव भावनांना साद तर घालतेच; पण आता पुढे काय.?
.. याचे उत्तर कविश्रेष्ठ रसिकांवर सोपवतात.. दर्याचे म्हणजे सागराचे 'गरजणे' तालावरचे गाणे. प्रत्येकाने आप आपल्या कुवतीनुसार 'समजून' घ्यावे..
एक श्रेष्ठ मालवणी कविता..! म्हणूनच मी नेहमी म्हणतो. 'मालवणी.. मराठीची एक प्रगत बोली. ..!' ही एक श्रेष्ठ दर्जा असलेली मालवणी बोलीतील कविता आहे.
असो! आता विंदांच्या कविता, लघुनिबंधाविषयी जाणकार काय म्हणतात? ते पाहू. पुढील लेखन, संदर्भ हे संकलित केलेले आहे.

'स्वातंत्र्योत्तर कविता' या लेखात रवींद्र घवी लिहितात.. 'वसंत बापट, मंगेश पाडगावकर, या कवींपैकी विंदा करंदीकर नव कवितेच्या प्रभावातूनच निर्मिती करू लागलेले. 'रांगडे चैतन्य आणि जोमदारपणा' ही त्यांच्या व्यक्तित्वाची वैशिष्ट्ये. चिंतनशीलता आणि प्रायोगिकता हेही त्यांचे विशेष. 'स्वेद गंगा' (१९४९) व मृद्‌गंध (१९५४) या काळात त्यांचे मन साम्यवादी क्रांतीच्या आवेशाने भारावून गेले होते. काणेकर, कुसुमाग्रज, मुक्तिबोध यांच्या काव्यातून आलेल्या या 'लाल' धारेला विंदांच्या काव्यानेही जोम दिला. मराठी समाजाच्या मध्यम वर्गातून पुढे येऊन साम्यवादाचा स्वीकार केलेला करंदीकर हा अखेरचा प्रतिभावंत असे म्हणावे लागेल. 'वाटाड्या (१९५९) या कवितेपासून ते साम्यवादापासूनही दुरावले. डाव्या किंवा उजव्या ठाम विचारांनी जीवनाला सामोरे जाण्यात अर्थ नाही, हे त्यांना उमगले असावे. त्यामुळे 'मृद्‌गंध'मधील समाजविषयक भावना पुढे पुढे क्षीण होत गेली. मुक्त सुनीते, तालचित्रे, विरुपिका इ. आकृती विषयक प्रयोगांत ते रमू लागले. सामाजिक, राजकीय विषयापासून काव्याला सुरुवात करून अमूर्त संवेदन क्षमतेकडे त्यांच्या प्रयोगशील कवितेचा प्रवास चालू आहे.' जोमदार, बेदरकार शब्दकळा भावनेची उत्कटता आणि प्रयोगशील नावीन्य या अंगांनी विंदांनी मराठी कवितेला पुढे नेली. वसंत बापट ( बिजली, सेतू, सकिना, मानसी) हे ही आरंभी समाजवादी विचारसरणीचे आणि समाजाभिमुख वृत्तीचे कवी. जुनी शाहिरी ढंगाची शब्दकळा आणि नवी समाजवादी जाणीव याचा मेळ त्यांच्या कवितेत साधलेला दिसेल. कवी कुसुमाग्रजांशी त्यांचे अंशतः प्राकृतिक नाते होते. नाट्यमय मांडणीच्या अंगानेही हे नाते दाखवता येईल. करंदीकरांप्रमाणेच त्यांच्याही कवितेतला समूहभाव पुढे ओसरत गेला. त्यांचा स्वतःचाच असा नाटकी भाव

कमी झाला आणि 'मानसी'च्या रूपानं संयत, उत्कट मालिका कविता निर्माण झाली. सूक्ष्म संवेदना, सखोल चिंतन किंवा नव्या जाणिवा हे बापटांचे विशेष कधीच नव्हते; पण मोहक, अस्सल मराठमोळी शब्दकळा आणि नाट्यपूर्ण रचनाबंध या दृष्टीने त्यांची कविता लक्षणीय ठरली, लोकप्रिय ठरली हे तर उघडच आहे.'(पृ.१९)

करंदीकरांच्या लघुनिबंधावर डॉ. आनंद यादव लिहितात, 'करंदीकरांच्या लघुनिबंधातील विचार आणि चिंतन हा ही एक महत्त्वाचा पैलू आहे. त्यांचे चिंतन हे अनुभवाचाच एक भाग म्हणून येत असते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, राग-लोभाचा, वृत्ती प्रवृत्तींचा त्याला स्वाभाविक स्पर्श असतो. विचारांनाही त्यांनी एक नवे परिमाण मिळवून दिलेले आहे. ते असे की एखादा अनुभव आल्यावर माणूस त्याचा कसा कसा विचार करीत राहतो, कोणकोणत्या शक्यता त्यात पाहत राहतो, कोण कोणत्या दिशांनी त्याच्या विचारांचे बारीकसारीक धागे निघत राहतात?

'त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काव्यात्मवृत्तीचा घटक महत्त्वाचा आहे. कमी-अधिक प्रमाणात तो पुष्कळ लघुनिबंधात विखुरलेला दिसतो. सूचकता, प्रतिमा, प्रतीकरूपता, उत्कटता यांसारखे अनेक गुण त्यामुळे करंदीकरांच्या लघुनिबंधाला प्राप्त होतात. 'पहिला पाऊस', 'स्पर्शाची पालवी', 'आम्रयोग', 'या माझ्या पाऊल वाटा' 'पहिला' 'आकाशाचा अर्थ' हे लघुनिबंध त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

'भावावस्था ही करंदीकरांच्या बहुतेक निबंधांना लाभलेली असते. असे असले तरी प्रत्येक वेळी भावावस्थेने तो लघुनिबंध नियंत्रित असेलच असे नाही. एकाच भावावस्थेने नियंत्रित असलेले असे काही थोडेच लघुनिबंध आहेत. 'स्पर्शाची पालवी', 'पहिला पाऊस', 'या इथे', 'आकाशाचा अर्थ', 'सूर्य उगवत नसतो तेव्हाचा पाऊस', 'शिरावर भार ढगांचा' यांसारखे लघुनिबंध 'मी' च्या कोणत्या ना कोणत्या एका भाववृत्तीने नियंत्रित झालेले दिसतात. ती भाववृत्ती इतकी तीव्र व उत्कट असते की, जणू ती स्वतःला व्यक्त करण्यासाठीच अनुभवांना आपले रूप देत आहे असे वाटते. करंदीकरांच्या अगोदर कुसुमावतींचे लघुनिबंध सोडले, तर असे भाववृत्तीने नियंत्रित झालेले लघुनिबंध आपणास अपघातानेच पाहावयास मिळतात. करंदीकरांनी याबाबतीत शिखरावस्था गाठलेली आहे. करंदीकरांची खास मांडणी असलेले आणखी एका प्रकारचे लघुनिबंध आहेत. अगदी आरंभापासून तोपर्यंत विचार प्रक्रियांचा एकजीव झालेला रांधा त्यात व्यक्त झालेला असतो, असे लघुनिबंध विचार सघन वाटतात.' (पृ.३२४ .३२५)

**विंदा करंदीकर यांची साहित्य संपदा**

कविता -'स्वेदगंगा' (१९४९) 'मृद्गंध' (१९५४) 'धृपद' (१९५९) 'जातक' (१९६८) 'विरूपिका' (१९८१) कवितांची संपादित संकलने 'संहिता', (१९७५) संपादक - मंगेश पाडगांवकर, 'आदिमाया' (१९९०) संपादक - डॉ. विजया राजाध्यक्ष, बाल कविता 'राणीची बाग' (१९६१) 'एकदा काय झाले' (१९६१) 'एटू लोकांचा देश'(१९६३) 'सशाचे कान, (१९६३) 'परी ग परी' (१९६५) 'अजबखाना' (१९७४) 'सर्कसवाला' (१९७५) 'पिशीमावशी आणि तिची भुतावळ' (१९८१) 'अडम् तडम्' (१९८५) 'टॉप' (१९९३) 'सात एके सात' (१९९३) 'बागुलबोवा' (१९९३) 'अक्षख बिलंदर' (२००६)

ललितनिबंध- 'स्पर्शाची पालवी' (१९५८)'आकाशाचा अर्थ' (१९६५)'करंदीकरांचे समग्र लघुनिबंध', (१९९६)

समीक्षा- 'परंपरा आणि नवता'(१९६७) 'उद्गार' (१९९६)

अनुवाद- 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र, (१९५७) 'फॉउस्ट' भाग,१ (१९६५) 'राजा लियर', (१९७४) 'संत ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवाचे अर्वाचीन मराठीत रूपांतर',(१९८१)

इंग्रजी समीक्षा - 'लिटरेचर ॲज ॲच व्हायटल आर्ट,' (१९९१) साहित्य अकादमीची संवत्सर व्याख्याने' ॲक्रिटीक ऑफ लिटररी व्हॅल्यूज' (१९७७)

अन्य भाषांत भाषांतरित - गुजराती विंदा करंदीकर (१९७७) : निवडक कवितांचा डॉ. जया मेहताकृत अनुवाद 'अरिस्टॉटलनु काव्यशास्त्र' (१९८५) अनुवादक : डॉ. जया मेहता आणि डॉ. जसवंती दवे. 'इंग्रजी पोएम्स ऑफ विंदा'- (१९७६) 'सम मोअर पोएम्स ऑफ विंदा'(१९८३), 'त्रिमूर्ती' (१९७९) 'तीन मुख्य कविता ओंकार' (१९९६) 'चार प्रतिनिधिक कविता,' 'द सेविड हेरिस' (१९९८): 'निवडक कविता' (सर्व इंग्रजी अनुवाद

स्वकृत) हिंदी– 'यह जनता अमर है' (२००१) 'निवडक कविता' – अनुवादक : चंद्रकांत बांदिवडेकर

## विंदांना प्राप्त झालेली पारितोषिके, पुरस्कार व सन्मान पुढीलप्रमाणे –

'केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाची आणि एन.सी. ई. आर. टी. ची चार पारितोषिके', महाराष्ट्र शासनाचे दहा पुरस्कार (केशवसुत काव्य पुरस्कारासह), 'ललित' पारितोषिक समितीतर्फे, समीक्षकांचा पुरस्कार (१९६७) सीनिअर फुल ब्राइट पुरस्कार (१९६७) 'सोव्हिएत लँड नेहरू वाङ्मय पुरस्कार' (१९७०) 'कुमारन् आसन् पुरस्कार (१९८२) महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पारितोषिक (१९८५) कविराज कुसुमाग्रज पुरस्कार (१९८७) कबीर सन्मान (१९९१ : अखिल भारतीय कवितेसाठी दिला जाणारा राष्ट्रीय पुरस्कार) जनस्थान पुरस्कार (१९९१) कोनार्क सन्मान (१९९३) सन्माननीय डी. लिट् (१९९४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ) साहित्य अकादेमीचा सर्वोच्च सन्मान, महत्तर सदस्यता (१९९६) महाराष्ट्र फाउण्डेशनचा गौरव पुरस्कार (१९९७) भारतीय भाषा परिषदेचा 'सह्याद्री' पुरस्कार (१९९९) गंगाधर राष्ट्रीय काव्य पुरस्कार (१९९९) डॉ. लाभसेटवार साहित्य पुरस्कार (१९९९) भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार (२००२)

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविराज विंदा म्हणजे प्राध्यापक गोविंद विनायक करंदीकर. ते कोकणातील देवगड तालुक्यातील धालवल या गावाचे असल्याने तरुणपणी एम. ए. पास झाल्यानंतर आपल्या धालवल येथील वृद्ध वडिलांजवळ राहायला मिळावे म्हणून रत्नागिरीच्या र. प. गोगटे कॉलेज ऑफ ऑर्ट व सायन्स असे नाव असणाऱ्या महाविद्यालयात इंग्रजीच्या प्राध्यापकांची नोकरी स्वीकारली होती. हे महाविद्यालय जून १९४५ मध्ये स्थापन व सुरू झाले होते. १९४७ ते १९५१ या दरम्यान रत्नागिरीत प्रा. गो. वि. करंदीकर संस्थेचे संस्थापक व कार्यवाह असणाऱ्या श्री. ज .वा.तथा बाबुराव जोशी यांच्या 'मधुवन' या बंगल्यात राहत होते. महाविद्यालयाच्या प्रारंभापासून असणारे रसायनशास्त्राचे प्रा. द. मो. कुलकर्णी हे त्यांच्या शेजारी राहत. पुढे संस्थेचे सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य झाले ते प्रा. करंदीकर यांच्या शेजारच्या खोल्यात राहत असत. आता या 'मधुवन' बंगल्यात रत्नागिरीचे एल. आय. सी. चे नवेकोरे कार्यालय बांधले गेले आहे, आणि एका लेडी डॉक्टरांचे क्लिनिक पण आहे. रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या दुसऱ्या संस्थापक सौ.मालतीबाई जोशी या महिला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका होत्या. श्री.बाबुराव जोशी, सौ. मालतीबाई यांनीच रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी, महिला विद्यालय आणि शिर्के हायस्कूल या संस्थांची स्थापना केली होती. विंदा करंदीकरांच्या पत्नी सुमाताई या महिला विद्यालयात शिक्षिका म्हणून काम करू लागल्या. त्या काळात विंदा करंदीकरांच्या कविता वेगवेगळ्या मासिकात छापून येत. महिला विद्यालयात नोकरी करीत असल्यामुळे जो पगार सुमाताईंना मिळत होता, त्या पैशातून विंदा करंदीकरांचा पहिला 'स्वेदगंगा' हा कवितासंग्रह रत्नागिरीत प्रकाशित झाला होता... यानंतर ते मुंबईला गेले... असा हा प्रवास आहे....

असे आपले 'अष्टदर्शने' घडवणारे... आणि या एकाच कलाकृतीला 'भारतीय ज्ञानपीठ' मिळवून देणारे सिंधुरत्न ज्ञानपीठ विजेते लेखक कवी विंदा करंदीकर होते.

शिरूरला माझ्या कुंभवडे गावचे 'सिमधाडे' व ख्यातनाम ललित लेखक रवींद्र पिंगे आले होते, तेव्हा विंदांच्या कोकणी स्वभावाचे अनेक मासले त्यांनी मला ऐकवले होते. त्याची ही आठवण या निमित्ताने होत आहे. आपण कधीतरी विंदांच्या गावी जाऊ या नि त्यांनी अनुभवलेला निसर्ग डोळे भरून पाहू या.

या शोध लेखातून धालवली गाव, मालवणी कविता आणि कविवर्य विंदा करंदीकर याचा असलेला अनुबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ –**

१.कोकण नायक, (सं.) माधव कदम,
१४/१२/१९९६. पृ.,२३.
२. समाज माध्यमांवरील लेखातील अंश (साभार).
३.रवींद्र घवी.. आनंद यादव यांच्या संदर्भग्रंथ व
समीक्षा लेखनातून साभार.

**डॉ. बाळकृष्ण लळीत**
सी. टी. बोरा महाविद्यालय शिरूर, जि. पुणे
चलभाषः ९६६५९९६२६०

# आख्यायिका : स्वरूप, परंपरा व प्रकार

डॉ. नवनाथ शिंदे

**लोकसाहित्यातील 'आख्यायिका' या कल्पित गोष्टीविषयी मूलगामी विवेचन करणारा संशोधन लेख.**

लोकजीवनात आख्यायिकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मराठी मनात हा पूर्वदिव्य भूतकाळ घर करून आहे. त्याला साद घालण्याचे व गोंजारण्याचे काम दंतकथांनी केले आहे. त्याचे आकर्षण मराठी मनाला आजही आहे. एखादी आख्यायिका मनात खूप खूप कुतूहल जागवते. तिचा मूळ अर्थ काय, ही आख्यायिका कधी, कशी निर्माण झाली असेल, असे नाना प्रश्न सतत सतावत राहतात; पण समर्पक उत्तर मिळतेच असे नाही. मात्र जनमानसात आख्यायिकांनी पक्के स्थान मिळविले असते. दंतकथेला इंग्रजीमध्ये Legends, संस्कृतमध्ये 'आख्यायिका', हिंदी भाषेत 'अवदान'[१] अशी संज्ञा आहे. 'मराठी दंतकथेला असत्यकथा, भाकडकथा अशा अर्थाने संबोधले'[२] जाते. मराठी आख्यायिकांतील वर्ण्य विषयाचे क्षेत्र अत्यंत विस्तृत आहे. पुराणकाळापासून ते अर्वाचीन काळापर्यंतचा प्रदीर्घ काळ त्यात सामावलेला आहे. त्या त्या काळातील अनेक व्यक्तींची, घटनांची क्वचित काही प्राणी व वनस्पतींचीही स्मृती लोकमानसाने कथांच्या रूपाने कायम ठेवली आहे. प्रत्येक देशात आख्यायिका वैपुल्याने ऐकावयास मिळतात. समूहमनाला सामाजिक, धार्मिक आणि लोकाचाराच्या दृष्टीने सांकेतिक स्वरूपात बांधून ठेवण्याचे कार्य ह्या सांगोवांगीच्या आख्यायिका करतात. या सर्व कथांना मानवी जीवनात पाठीच्या कण्याइतके महत्त्व असते.

**१. 'आख्यायिका' म्हणजे काय ? :**

शब्दकोशातील अर्थानुसार 'आख्या म्हणजे अखंड, संपूर्ण आणि आख्यायिका म्हणजे दंतकथा होय.''[३] जनश्रुतीच्या आधारावरील कल्पित गोष्ट, कथा, कहाणी, हकिकती असाही अर्थ घेतला जातो. 'पारंपरिक गोष्ट म्हणजे आख्यायिका'[४] प्राचीन ठिकाण, नगरी, मंदिर बांधकाम, पूजाविधी, देवस्थाने, तीर्थक्षेत्रे, वास्तु, किल्ला, प्राणी, पक्षी, झाड, नद्या, लोकोत्तर स्त्रिया, लोकनेते, ग्रामदैवते, विविध मातृदैवते, ऐतिहासिक सत्य घटना तसेच सामान्य व्यक्तीसुद्धा उल्लेखनीय कार्यामुळे कालांतराने लोकजीवनात आख्यायिकांचा विषय बनतात. एखादी व्यक्ती तिचे जीवन संपल्यानंतर किती काळ समाजमनावर प्रभाव टिकवून असते, यावर तिचे आख्यायिका होणे-न होणे अवलंबून असते. 'आख्यायिका' होण्यासाठी ती व्यक्ती गेल्यानंतर तिच्यासंबंधी जनमानसात तिची राहिलेली प्रतिमा, त्या व्यक्तीचे मूळ प्रवाहाविरुद्ध पोहणे, तिच्या गुणावगुणांची गोळाबेरीज, निधनानंतरसुद्धा पुढच्या पिढीच्या मनात रुजलेली तिच्याबद्दलची परमादराची भावना, नव्या पिढ्यांना त्याच्याकडून त्याच्या निधनानंतरही मिळत राहिलेली शिकवण... या साऱ्यांचा एकंदर प्रभाव तिला, आख्यायिका बनवते. 'परंपरेने चालत आलेली लोकप्रिय, चमत्कृतिप्रधान आणि कल्पनाचातुर्य असणारी गोष्ट[५]

म्हणजे आख्यायिका' अशीही व्याख्या आढळते. 'आख्यायिका म्हणजे असामान्यतेच्या तत्त्वावर जतन केलेली लोकस्मृती.'[६] यावरून आख्यायिका ह्या लोकांची निर्मिती असतात हेच सिद्ध होते. 'ज्ञात किंवा सत्य विषयाचे प्रतिपादन करणारी ती आख्यायिका.'[७] आख्यायिकेच्या आकाराविषयी निश्चित स्वरूप नसले तरी आकाराने त्या लघु असतात. 'आख्यायिका या गूढ आकर्षणातून निर्माण होतात.'[८] सत्यकथेच्या कोशातून या कथा बाहेर पडतात आणि लोकमानसातील संस्कार घेऊन त्यांच्या आख्यायिका तयार होतात.

अगदी प्राचीन काळापासून मानवी मनाला अद्‌भुततेचे आकर्षण असलेले दिसते. त्यातूनच जे जे विलक्षण, चमत्कारी, अचाट, अनन्यसाधारण त्या गोष्टीचे स्मरण आख्यायिकांनी सातत्याने राखले आणि पुढच्या पिढ्यांपर्यंत प्रवाहित ठेवले. आख्यायिका हा शब्द प्रारंभीच्या वैदिक वाङ्मयात सापडत नाही. उत्तरकाळात तैत्तिरीय-आरण्यकात (१:६:३) एकदाच येतो; पण तिथे तो कुठल्या अर्थाने वापरलेला आहे हे नीट समजत नाही. महाभारतापासून मात्र हा शब्द कथा या अर्थी रुळलेला दिसतो. 'राज्यकर्त्यांच्या वंशाची गद्यरूपाने प्रशंसा करणे, तसेच कन्याहरण, संग्राम, विप्रलंभ इ. प्रसंग उच्छवास, परिच्छेद यांनी विभागून विस्तारपूर्वक सांगणे म्हणजे आख्यायिका होय'[९] असेही अग्निपुराणात सांगितले आहे. तृतीय भीष्माचार्य (इ.स.१६४९) यांनी आनेराजण्यास यांच्या लक्ष्मणरत्नाकर या ग्रंथावर टीपग्रंथ लिहिला. त्यात लीळावाक्याची व्याख्या देताना आख्यायिकेचा संदर्भ दिला आहे.

'जेथे गोष्टी मातु कथा वार्ता आख्यायिका ते लीळावाक्य बोलिजे. (पृ.५३)'[१०]

जगातल्या चरित्र वाङ्मयात तसेच मध्ययुगीन मराठी साहित्यात अनेक आख्यायिका सर्वत्र प्रचलित असलेल्या दिसतात. इंग्लंडमधील राजा ऑर्थर ही व्यक्तिरेखा अनेक आख्यायिकांचा विषय झालेली दिसते. जागतिक पातळीवर काव्य- नाटकादी साहित्यकृतीत आख्यायिकांचा वापर फार मोठ्या प्रमाणात केलेला आढळून येतो. विश्वनाथाच्या 'साहित्यदर्पण', डॉ. दुर्गा भागवत यांच्या 'लोकसाहित्याची रूपरेखा' तसेच डॉ. प्रभाकर मांडे यांच्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात आख्यायिका शब्दाविषयीचे विवेचन आले असून प्रा. नवनाथ शिंदे 'माणकेश्वरचे शिव-सटवाई' या शोधग्रंथात आख्यायिकांची सोदाहरण माहिती स्पष्ट करताना म्हणतात, 'लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली, प्रसिद्ध अशी पारंपरिक गोष्ट, कहाणी, जिचा आधार एखादी घडलेली सत्य घटना-प्रसंग असतो, मात्र तिचा लवचिकपणा हा विशेष असल्यामुळे मौखिक परंपरेने (जनश्रुती) ती संक्रमित स्वरूपात नकळत बदलत असते. तिला आख्यायिका म्हणावे.'[११] प्रचलित आख्यायिकांच्या आधारे केलेल्या उत्खननात मोहेंजोदारोसारखे महत्त्वाचे स्थळ सापडले. समुद्रात बुडालेली द्वारका, रामसेतू सापडला, असे महत्त्वाचे उल्लेख या संदर्भात करता येतात. आख्यायिका म्हणजे अशी लोकस्मृती जी एखाद्या व्यक्तीशी, घटनेशी, स्थळाशी, पशू, पक्षी वा वृक्षाशी संबंधित असते व ती कोणत्या तरी असामान्य गुणावर, चमत्कार, अद्‌भुतता, कीर्ती, मोठेपणा, महान कामगिरी अशा घटकांवर आधारलेली असते. एवढेच नव्हे तर हे घटकच ती आख्यायिका एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित करण्यात व शतकानुशतके प्रवाही ठेवण्यास कारणीभूत असतात. लोकवाङ्मयातील दंतकथा ह्या कुठल्यातरी सत्यावर आधारलेल्या असतात.

**२. आख्यायिका : स्वरूप, परंपरा व प्रकार –**

आख्यायिका ही असामान्य तत्त्वावर आधारलेली असते. एखादी चमत्कृतिपूर्ण बाब, वेगळेपण, वैशिष्ट्यपूर्णता लोकमानसाला आकर्षित करते. तिच्या अनन्यसाधारणपणामुळे ती लक्षात ठेवावी वाटते. तसेच वैशिष्ट्यपूर्ण म्हणून इतरांनाही सांगावी वाटते, अशा प्रकारे आख्यायिकांची निर्मिती लोकमानसामध्ये घडून येते. एखादी छोटी घटना, प्रसंग, गुणवैशिष्ट्य मग ते व्यक्तीच्या, स्थळाच्या, वृक्षाच्या वा प्राणिमात्रांच्या संदर्भात का असेना, जतन केले जाते. कथेप्रमाणे तिचा आकार मोठा नसतो. प्रसंग वा घटना तपशीलवार सांगण्यात तिला स्वारस्य नसते, तर त्या प्रसंगातही चमत्कृती सांगण्यात, नेमके असाधारणत्व सांगण्याचाच तिचा प्रयत्न असतो. त्यामुळे तिच्या आशयाचे स्वरूप अतिशय बांधीव असते, नेमके असते. कथेप्रमाणे जरासाही अघळपणा तिला सहन होत नाही. आख्यायिका ह्या माहात्म्य सांगणाऱ्या जशा असतात, तशाच स्पष्टीकरण देणाऱ्याही असतात. कधी-कधी निषेध सांगणाऱ्याही

असतात. निसर्गात घडून येणाऱ्या असामान्य घटना, भुते-खेते, पिशाच्च यांसारख्या अतिमानवी योनी, पूर्वजांविषयी आदर व भीती यावरूनही आख्यायिकांची निर्मिती होते.

लोकसाहित्यातील बराचसा भाग लोककथा, दंतकथा आणि आख्यायिकांनी व्यापलेला आहे. अशा आख्यायिकांनी फार प्राचीन काळापासून जगभरातील मानव समूहास वेढलेले दिसते. मराठी आख्यायिकांकडे एक दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसून येते की, प्राचीन काळापासून गावोगाव अनेक व्यक्ती, देव-देवता, सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, भूत-पिशाच, डोंगर, पर्वत, झाडे, नद्या, ओढे, विहिरी, स्थळे, वास्तु इत्यादी घटकांशी असंख्य आख्यायिका जोडल्या गेलेल्या आहेत. उपलब्ध वा प्रकाशित लोकसाहित्यामध्ये आजही नोंद न झालेल्या असंख्य आख्यायिका मौखिक परंपरेने समाजात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत आलेल्या आहेत. मराठी आख्यायिकांची सामाजिकता आणि वाङ्मयीन गुणवत्ता समजून घेण्याच्या दृष्टीने प्रथम आख्यायिकांचे वर्गीकरण अभ्यासणे आवश्यक ठरते. लोकसाहित्याच्या आजपर्यंतच्या अभ्यासकांनी आख्यायिकांचा आंतरभाव, 'लोककथा' या प्रकारामध्येच केलेला दिसतो. अपवाद म्हणजे 'लौकिक दंतकथा'[१२] हा ग्रंथ होय. डॉ. प्रभाकर मांडे यांनी 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथात लोककथांच्या वर्गीकरणातील अडचणी मांडल्या आहेत. तथापि त्यांनी लोककथांचे स्थूल वर्गीकरण दिले आहे ते असे- १. दैवतकथा, २. उत्तत्तीकथा, ३. परीकथा, ४. दैवतकथा आणि आख्यायिका, ५. बोधकथा आणि प्राणिकथा, ६. हास्यकथा, ७. वीरकथा किंवा पराक्रमकथा आणि ८. अनुभवकथा या वर्गीकरणाच्या आधारे आख्यायिकांचा प्रांत स्वतंत्र मानावयास हरकत नाही.

'आख्यायिका हा शब्द प्रारंभीच्या वैदिक वाङ्मयात सापडत नाही. उत्तरकाळातल्या-तैत्तिरीय-आरण्यकात (१:६:३) एकदाच तो येतो; पण तिथे तो कुठल्या अर्थाने वापरलेला आहे ते नीट समजत नाही. महाभारतापासून मात्र हा शब्द कथा या अर्थी रुळलेला दिसतो.'[१३] ज्या गद्य प्रकाराला दंडी आख्यायिका म्हणतो, तिलाच विश्वनाथ कथा म्हणतो. आख्यायिका हा विषय संशोधनाच्या पातळीवर तसा दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. मराठी आख्यायिका अनेकार्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. विशेषत: प्राचीन मराठी आख्यायिकांचे धार्मिक, सामाजिक, वाङ्मयीन दृष्टीने गुणवत्ता लक्षात घेणे विशेष गरजेचे आहे. भारतातील प्राचीन आचार्यांनी कथांचे दोन भाग केले असून, एक कथा आणि दुसरा आख्यायिका होय. 'अग्निपुराणा' मध्ये कथेचे पाच प्रकार सांगितले असून त्यात 'आख्यायिका' हा कथेचा एक प्रकार मानलेला आहे.

आख्यायिका कथाखंड कथा परिकथा तथा।
कथानिकतेची मन्यन्ते गद्यकाव्येन पंचधा।।
(अग्निपुराण १-१२)

'आख्यायिका', 'खंडकथा', 'कथा', 'परीकथा' व 'कथानिका' हे गद्यकाव्याचे पाच प्रकार होत. दुर्गा भागवतांनी आख्यायिकांमध्ये दिव्यांश नसतो त्या काल्पनिक असतात असे म्हटले आहे, तर वैदेही कोळेकरांनी मांडलेल्या विवेचनात आख्यायिकेत कुठली तरी सत्य घटना, व्यक्ती यांचा आधार असल्याचे मत मांडले आहे. डॉ. प्रभाकर मांडे हे आपल्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या पुस्तकात दंतकथा ही पारिभाषिक संज्ञा ऐतिहासिक आख्यायिकांसाठी वापरतात. डॉ. सरोजिनी बाबर, मालतीबाई बेडेकर इ. अभ्यासकांनी मराठी लोककथेचे अनेक पैलू प्रकाशात आणले आहेत. त्यात आख्यायिकेचाही समावेश आहे.

दंतकथा, आख्यायिका हा लोककथांचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार असून प्रदेश विशिष्टतेच्या दृष्टीने त्यांना मोठे महत्त्व द्यावे लागते. डॉ. शरद व्यवहारे यांनी रचनेच्या दृष्टीने लोककथेचे कथा, आख्यायिका, गीतकथा, कहाण्या असे चार भागांत वर्गीकरण केले आहे. सर जॉर्ज गॉम, स्टिथ थॉमसन ह्यांनी आख्यायिकांना आपल्या वर्गीकरणामध्ये स्थान दिले आहे; परंतु 'भारतात आख्यायिका दोन प्रकारच्या आहेत. १) ग्रंथनिष्ठ आख्यायिका, २) मौखिक परंपरेने चालत आलेली आख्यायिका'[१४] विधिकथा, कहाण्या, शूरवीरांच्या आख्यायिका, स्थलमाहात्म्यकथा गावोगावी प्रचलित असल्याचे दिसून येते. दैवतविषयक आख्यायिका, ऐतिहासिक घटनांविषयक आख्यायिका, धनकथा व संकेत कथा अशा तीन गटांत 'डॉ. अनिल सहस्रबुद्धे'[१५] यांनी आख्यायिकांचा समावेश केला आहे. यासंदर्भातील प्रा. नवनाथ शिंदे यांनी 'माणकेश्वरचे शिव-सटवाई' या शोध ग्रंथात आख्यायिकांची आशयानुसार केलेली

विभागणी महत्त्वपूर्ण आहे. आशयाच्या दृष्टीने आख्यायिकांचे स्वरूप विविध प्रकारचे असून आख्यायिका वैज्ञानिक युगातही रूढ आहेत. प्रादेशिक भागानुसार आढळणाऱ्या अनेक आख्यायिका लोकमानसावर कायमच्या शतकानुशतके अधिराज्य गाजवत आहेत. आख्यायिकेचा निश्चित असा आकार ठरलेला नसतो. ठरीव असे रचनातंत्रही नसते. आशय मात्र ठरलेला असतो. आशयपरत्वे स्वरूप बदलत जाते. प्रारंभ आणि शेवट याविषयीही काही संकेत नसतात. ती आकस्मिकपणे सुरू होते आणि अकस्मात थांबते. मराठी लोककथात आख्यायिकांची व्यापकता निरनिराळ्या अभ्यासकांनी स्पष्ट केली असल्याचे आपण आतापर्यंत पाहिले.

'साडेतीन शक्तिपीठांविषयीची दंतकथा अशी आहे ...' असे म्हणण्याऐवजी लोकसमूहात 'साडेतीन शक्तिपीठाविषयीची आख्यायिका अशी आहे ...' असे म्हटले जाते. ह्या सहज उत्स्फूर्त संवादात 'आख्यायिका' ही संज्ञा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेली, लोकजीवनात रूढ असल्याचे आढळते. आज लोकमानसामध्ये दंतकथा आणि आख्यायिका या दोन्ही शब्दांची सरमिसळ झालेली आढळते. लोकसाहित्याच्या अभ्यासकांनीही लोककथांचे वर्गीकरण करताना दंतकथा आणि आख्यायिका यांना एकाच वर्गात समाविष्ट केलेले आहे व त्यासाठी Legend हा शब्द वापरला आहे. भारतात तीर्थक्षेत्रांच्या आख्यायिका विपुल प्रमाणात असून महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांविषयीच्या वैविध्यपूर्ण गद्य आणि पद्य स्वरूपातील आख्यायिकांच्या संहितांचे आशय विश्लेषण वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने अभ्यासणे महत्त्वपूर्ण आहे.

**३. आख्यायिकांची व्याप्ती :**

आख्यायिकांचे क्षेत्र अत्यंत विशाल, सार्वकालिक व सार्वत्रिक असे आहे. 'जेथे प्रचिती दिव्यत्वाची तेथे निर्मिती आख्यायिकांची' हे आख्यायिकांच्या घडणीमागे सूत्र असल्याने जीवनाची सर्व अंगे आख्यायिकांनी व्यापलेली आहेत. आख्यायिका ह्या अलौकिक कृत्य केलेल्या एखाद्या व्यक्तीशी संबंधित असतात. तशाच राजे-महाराजे यांच्याशीही संबंधित असतात. गावाच्या नावापासून ते डोंगर, दऱ्या, नद्या, ओढे, पर्वत यांच्या स्थान माहात्म्यालाही त्यांनी महत्त्व दिलेले असते. किल्ले, गढ्या, जुने वाडे यांचा इतिहासही त्यांनी जपलेला असतो. तसेच भुतेखेते, पिशाच्च यांसारख्या अतिमानवी योनीविषयी त्यांना वावडे नसते. वृक्ष, प्राणी, पक्षी यांच्याही स्मृती त्या जतन करतात. धार्मिक जीवनात तर आख्यायिकांशिवाय पानही हलत नाही, असे आढळते. देव-देवतांच्या माहात्म्य कथा, संत-महंताची चरित्रे, पुराणे ही आख्यायिकांच्या मूलाधारावरच तयार झालेली असतात. इतिहास, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र यांना आख्यायिकांमुळेच मार्गदर्शन घडत असते. इतर शास्त्रेही आपली पूर्वपीठिका शोधताना आख्यायिकांचा शोध घेत असतात. अशा प्रकारे सजीव, निर्जीव, अतिमानवी घटक व मानवांचे सांस्कृतिक जीवनही आख्यायिकांनी व्यापलेले दिसते.

**४. आख्यायिकांचे प्रयोजन :**

दंतकथांनाच लोकजीवनात आख्यायिका अशी संज्ञा प्रचलित असून तत्कालीन समाजस्थिती, स्थानिक जीवनसंदर्भ, समाजाचा बदलणारा नैतिक, धार्मिक दृष्टिकोन कोणत्या स्वरूपाचा होता याचा शोध आख्यायिकांच्या आधारे घेता येतो. आख्यायिका कुणाचे मनोरंजन, बोध किंवा उपदेश करण्याच्या हेतूने निर्माण झालेल्या नसतात. लोकांच्या मनावर उत्तम संस्कार, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठता, खबरदारी आणि नैतिक गोष्टींची प्रतिष्ठापना करणे तसेच 'मुलांना व्यवहाराची, जगाची जाण व्हावी'[१६] असा हेतू आख्यायिकां पाठीमागे असावा असे वाटते. स्थानमाहात्म्य वाढविण्याच्या हेतूनेही आख्यायिका रचल्या जातात. 'लोकमानसात प्रचलित असणाऱ्या अनेक समजुतींचे, लोकप्रतिभेतून आणि कल्पनेतून निर्माण होणाऱ्या अनेक संदर्भांचे मिश्रण तिच्यात झालेले असते.'[१७] अशा लोकप्रिय आख्यायिका मौखिक परंपरेने संक्रमित होत असल्या तरी त्यामध्ये लोकस्मृतींचे जतन नकळत होत असते. 'लोकांचे जे जगणे अनुभवाला येते ते लोकमानसाचे लोकबंधाच्या स्वरूपातील आत्मप्रकटीकरण असते.'[१८] त्यामध्ये ज्ञानाचे, अध्यात्माचे व नीतिमूल्याचे मोती विस्तारलेले असतात. लोकमानसाची निर्मिती असणाऱ्या आख्यायिकांमधून गतकाळातील मानवी जीवनातील घटनांचे प्रतिबिंब उमटत असते.

प्राचीन काळातील संस्कृती, समजुती, धर्मकल्पना, देवदेवता आणि त्यांच्या उपासना वा विधी आचरणाच्या

पद्धतींचा शोध आख्यायिकांमधून घेता येतो. आख्यायिकांमधून पारंपरिक कल्पना, चमत्कार आणि संचित स्वरूपात चालत आलेली लोकस्मृती जागृत करण्याबरोबरच त्या त्या प्रदेशाच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय जीवनाचे दर्शनही घडते. आख्यायिकांमधील कथानकाची आवरणे बाजूला काढल्यास त्यामागील मानवी विकासाच्या खाणाखुणा सापडतात. आख्यायिकांच्या संदर्भात धार्मिकता, जिज्ञासातृप्ती, लोकाभिरुची, लोकरंजन इ. प्रयोजने दिसून येतात. मराठी आख्यायिकांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्यापाठीमागे मूल्यशिक्षण, लोकरंजनातून लोकशिक्षण हीच भूमिका दृगोचर होते. पारंपरिक लोकजीवनाचा मौखिक आविष्कार आख्यायिकांतून जोपासला जातो. आख्यायिकेतून भूतकालीन तसेच वर्तमानकालीन घटनांच्या जोडीने समाजजीवनाच्या प्रगतीचे टप्पे दृष्टीस पडतात. आख्यायिकांची निर्मिती प्रक्रिया भूतकालीन असली तरी वर्तमान समाजावर त्यांचा प्रभाव टिकून आहे.

आख्यायिका केवळ मनोरंजनासाठी नसून कठीण प्रसंगी कसे वागावे वा कसे वागू नये याचे मार्गदर्शन करतात. आख्यायिकांच्या मागे लोककल्याणाचा हेतू आहे. आपल्यापेक्षा कोणीतरी श्रेष्ठ शक्ती आहे आणि या श्रेष्ठ शक्तीपुढे त्या नम्र व्हायला सांगतात. आपल्या संस्कृतीचे, परंपरेचे वहन करायला लावतात. संकटांना घाबरू नये, कितीही मोठी चूक घडली तरी त्यातून प्रायश्चित्त घेऊन चुका सुधारून नव्याने जीवनाची वाटचाल करावी असे सांगतात. श्रद्धा व सबुरीतून अपेक्षित गोष्टी प्राप्त करता येतात. देवादिकांमध्येही माणसारख्या वृत्ती-प्रवृत्ती असतात. मानवाने काय करावे, काय करू नये ह्यांचे नकळत दिशादर्शन करतात. दानधर्म करून समाज ऋण फेडण्याची शिकवण देतात. कोणीही गैर काही केले, की त्याचे परिणाम त्याला कोणत्यातरी मार्गाने भोगावे लागतात हे सूचित करतात. या सृष्टीतील प्रत्येक अणुरेणूचा दृश्य-अदृश्य रूपात मानवी जीवनाशी संबंध आहे, ह्याचे माणसाने सतत भान ठेवले पाहिजे याची जाणीव करून देतात. तपश्चर्येच्या रूपाने मनाची एकाग्रता साधून शक्ती प्राप्त करून घेता येते. ही शक्ती जनसामान्यांच्या कल्याणासाठी वापरायची असते याचे दाखले देतात. त्यागाशिवाय, कष्टाशिवाय कोणतीच गोष्ट मिळत नाही. प्रत्येकजण स्वतंत्रपणे कर्म करू शकतो. वडीलधाऱ्यांच्या मदतीने, ईश्वरीशक्तीच्या आशीर्वादाने कर्मभोगामध्ये सुसह्यता आणता येऊ शकते. भक्तीच्या, श्रद्धेच्या जोरावर अशक्य गोष्टी शक्य करता येतात, असा दिलासा देऊन चंचल, अस्थिर मन स्थिर करण्याचा मार्ग दाखवतात. आख्यायिकांमध्ये मानवी मूल्यांचा विचार असून आजच्या माणसातले माणूसपण हरवून बसलेल्या जागतिकीकरणाच्या भन्नाट गर्दीत ह्या आख्यायिकांचे पुनरुज्जीवन होऊन नवे संदर्भ लावणे गरजेचे आहे.

**५. आख्यायिकांचे महत्त्व :**

सजीव-निर्जीव घटकांविषयीच्या असंख्य आख्यायिकांचा अभ्यास अनेक दृष्टीने करण्यासारखा आहे. आख्यायिकांमधून जी शिकवण मिळते ती सामान्य माणसाच्या जीवनाला आधारभूत बनवते. 'आख आऱ्यांना धरून ठेवते त्याप्रमाणे आख्यायिका समाजाला धरून ठेवतात.'[१९] काल आणि आजचे लोकमानस समजून घेण्यास त्यामधून मदत होते. लोकरूढी, श्रद्धा, समजुती अशा अनेक धारणांतून आख्यायिकांचा जन्म होत राहतो. त्यांना काहीना काही समाजमूल्य असते. आख्यायिका फार मोठे लोकसंचित असल्यामुळे तो ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने जतन केला जातो. त्यामागे आख्यायिकांच्याबद्दलचा आत्मभाव, भीती, दहशत अथवा परंपरा जतनाचा भावसुद्धा असतो.

आख्यायिकांतून त्या त्या परिसरातील घटना, इतिहास, भूगोल, निसर्ग, लोकमानस, लोकजीवन, विश्वास, रूढी, परंपरा, समजुती, विधीप्रथा, बोलीभाषा, दैवतासंबंधीच्या कल्पना, सांस्कृतिक, धार्मिक संकल्पना ह्यांचे चित्रण आढळते. लोकभाषेच्या वापरामुळे ग्रामीण बोलीच्या अनेक खाणाखुणा आख्यायिकांतून जपलेल्या दिसतात. कथनकाराच्या प्रतिभाशक्तीनुसार आख्यायिकेत कल्पनाविलास, अतिशयोक्ती, अद्‌भुतरम्य घटनाप्रसंग असले तरी त्याच्या मुळाशी अंशरूपाने का होईना वास्तव (सत्य) दडलेले असते. ''वाक्प्रचार, म्हणी, संकेत, प्रतीके यांचे मोठे गुप्तधन भाषेला आख्यायिकांतून प्राप्त झाले आहे.''[२०] लोकजीवन व लोकसंस्कृतीचा अभ्यास करण्याचे एक साधन म्हणून आख्यायिकांकडे पाहिले जाते. प्रदेशपरत्वे आख्यायिकांचे स्वरूप हे भिन्न-भिन्न व वेगळेपण जपणारे असते. 'दंतकथा आणि आख्यायिकांमधून बऱ्याचवेळा एखाद्या गतकालीन व्यक्तीचे किंवा संत महंतांचे, सदाचरणाचे व नीतिमूल्ये

पाठ लोकमानसा समोर ठेवले जातात. यातून समाजास एक प्रकारची अप्रत्यक्षपणे नीतिमत्ता शिकवली जाते. दंतकथांतून सद्‌गुणी व्यक्ती, देव-देवता इत्यादी कथांच्या माध्यमांतून लोकजीवनात नैतिक पाठाची जपणूक केली जाते. अर्थात सामाजिक स्वास्थ्य निकोप व सद्‌भावपूर्ण राखण्याच्या दृष्टीने दंतकथांचे महत्त्व मोलाचे आहे. बिघडत चाललेल्या समाजाची नैतिक बैठक तयार करण्याचे कार्य बऱ्याच वेळा दंतकथांतून किंवा आख्यायिकांतून होते.'[२१] कालानुरूप समाजजीवनात आमूलाग्र असा बदल होत असतो. समाज हा नैतिकतेवर टिकून असतो. ही नैतिकता टिकविण्यासाठी आख्यायिकांचे योगदान महत्त्वाचे ठरते, असे लक्षात येते.

मराठी भाषा, समाज, संस्कृती आणि साहित्य यामध्ये आख्यायिकांचे स्थान आजही अढळ आहे. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, समजुती यांच्या वेष्टनाखाली असलेल्या या आख्यायिका केवळ तात्पुरती करमणूक म्हणून ऐकण्याकडे बहुतेकांचा कल असतो; परंतु संशोधनाच्या पातळीवर आख्यायिकांचा अभ्यास होत राहिला तर, सामाजिक जागृतीचे ते एक साधन म्हणून चांगला उपयोग होईल. श्रोत्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देण्यास आणि त्यांच्या ठिकाणी कुतूहल जागृती करण्यासाठी आख्यायिका कथेपेक्षा अधिक परिणाम घडवून आणू शकतील. आख्यायिका हा आपला अक्षय स्वरूपाचा साहित्यिक, सांस्कृतिक ठेवा आहे. विशिष्ट प्रदेशातले आणि भूभागातले लोकमानस समजून घेण्यासाठी आख्यायिका महत्त्वाच्या ठरतात. वरील चर्चेतून आख्यायिकांचे लोकसाहित्याच्या अभ्यासातील अनन्यसाधारण महत्त्व लक्षात येते.

**६. आख्यायिकांचे कार्य आणि आवश्यकता :**

१) आख्यायिकांद्वारा स्थानिक वैशिष्ट्ये, अस्मिता यांची जोपासना केली जाते.

२) आख्यायिका /दंतकथांद्वारा, ऐतिहासिक घटना कल्पनावगुंठित स्वरूपात का होईना पण जतन केल्या जातात. त्यामुळे इतिहास संशोधनाला दिशा मिळते व खरा इतिहास समाजासमोर येऊ शकतो.

३) इतिहास नेहमी अत्यंत असामान्य मानल्या गेलेल्या व्यक्तींच्या जीवनकार्याचा वेध घेत असतो. स्थानिक पातळीवरील व्यक्तींच्या असामान्य कर्तृत्वाची तो दखल घेतोच असे नाही; पण आख्यायिका मात्र असा दुजाभाव बाळगत नाहीत. स्थानिक पातळीवरच्या व्यक्तीचे असामान्यत्वही त्या जतन करून ठेवतात.

४) नवीन पिढ्यांना आपल्या अवतीभोवती असलेल्या प्रादेशिक (भौगोलिक) वैशिष्ट्यांचे ज्ञान आख्यायिकांमुळे होते.

५) प्राचीन काळातील जीवनाचा वेध घेण्याचे सुलभ व सहज उपलब्ध होणारे साधन म्हणजे आख्यायिका होय.

६) देव-देवतांची निर्मिती कशी घडते आणि त्याचे महत्त्व कसे वाढते हे आख्यायिकांमुळे आपल्याला कळून येते. त्यामधून समाजजीवनातील वृत्ती-प्रवृत्तींचा अभ्यास आपल्याला करता येतो.

७) समाजशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र यांना आख्यायिकांद्वारे काही तथ्यांचा पुरवठा होऊ शकतो हे तत्त्व सर्वमान्य झाले आहे.

८) आख्यायिका ह्या अलिखित स्वरूपात प्रचलित असूनही एखाद्या दस्तऐवजासारखे कार्य करीत असतात. कागद काळाच्या ओघात नष्ट होईल; पण मौखिक स्वरूपातील आख्यायिकांचा आशय नष्ट होत नाही. तो कालसंवादी भाषेत आपले मूळ रूप कायम ठेवून मौखिक परंपरेने पिढ्यान्‌पिढ्या चालत येतो.

९) आख्यायिकांमुळे वाङ्‌मयनिर्मितीलाही प्रेरणा मिळते. संतसाहित्याप्रमाणेच अनेक नाटके, कादंबऱ्या, कथा यांना आख्यायिकांनी कल्पनाबंध पुरविले आहेत. अनेक यशस्वी साहित्यकृती या आख्यायिकांच्या मूलाधारावर उभ्या आहेत.

मानवी जीवनातील सुख आणि दु:ख, जीवन आणि मृत्यू, तृप्ती आणि भीती अशा भावनिक गोष्टींच्या भरण-पोषणासमवेत मानवी जीवनाच्या इतिहासाचे पुराणीकरण करण्याच्या प्रवृत्तीतून समूहमनाला सामाजिक, धार्मिक आणि लोकाचाराच्या दृष्टीने सांकेतिक स्वरूपात बांधून ठेवण्याचे कार्य आख्यायिका करतात. आख्यायिकांची निर्मिती मौखिक परंपरेने एका भारावलेल्या अवस्थेतून घडत असते. एखाद्या व्यक्तीला असामान्य व्यक्तीच्या, स्थळाच्या किंवा घटनेच्या बाबतीतला अद्‌भुतपणा लक्षात येतो किंवा काही वैशिष्ट्यपूर्णता जाणवते. तो आपला असा अनुभव दुसऱ्याला सांगतो. दुसरा आणखी

तिसऱ्याला सांगतो. असे घडत असताना प्रत्येकाची कल्पनाशक्ती कार्य करीत असते. त्यातूनच आख्यायिकांभोवती कल्पनांचे वलय तयार होते. शेवटी लोकमानस अशा अनुभवांचा स्वीकार करते व त्यातून एक पक्की आख्यायिका तयार होते. देवदेवता, संत-महात्म्यांच्या संदर्भातल्या आख्यायिका पाहिल्यास हे स्पष्ट होईल. आख्यायिका केवळ लोकानुरंजन वा करमणूक करण्याच्याच उद्देशाने सांगितल्या जातात असे नाही. तर त्यामागे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक तसेच परिस्थितीसापेक्ष, तात्कालिक, व्यक्तिनिष्ठ, दीर्घकालीन संस्कार रुजविणे, अपेक्षित परिणाम साधणे यांसारखी अनेकविध प्रयोजने असू शकतात. त्यामुळे आख्यायिकांनासुद्धा विशिष्ट मूल्य असते.

**संदर्भ-टिपा :**


१. मालती दांडेकर, लोककथा कल्पकता, वरदा बुक्स, पुणे, पहिली आवृत्ती, १९९२, पृ. २१८.
२. डॉ. विश्वनाथ शिंदे, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृ. १४३-१४४.
३. वा. गो. आपटे (संपा.) विस्तारित शब्दरत्नाकर, वरदा प्रकाशन, प्रा. लि. पुणे, पुनर्मुद्रण, मे ९८, पृ. ३९.
४. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), मराठी विश्वकोश खंड-१, म.रा.सा. संस्कृतिमंडळ, मुंबई, प्रथम प्रकाशन, १९७६, पृ. ९०२.
५. डॉ. प्रतिमा इंगोले, ह्यांनी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार, ता. राहाता येथील राष्ट्रीय चर्चासत्रात वाचन केलेला अप्रकाशित शोधनिबंध, दि. २७ जानेवारी २०११, पृ. ३.
६. डॉ. संजय देशमुख, 'मराठी आख्यायिकांची संकल्पना', मराठी आख्यायिका: स्वरूप आणि परंपरा, (स्मरणिका), डॉ. सी. डी. रुद्राक्ष, प्रा. एन. ए. शिंदे (संपा.), २८ जानेवारी २०११, पृ. ३.
७. प्रा. संजय दरवडे, ह्यांनी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार, ता. राहाता येथील राष्ट्रीय चर्चासत्रात वाचन केलेला अप्रकाशित शोधनिबंध, दि. २८ जानेवारी २०११, पृ. ३.
८. डॉ. वर्षा सिताकांत कीर्तने, ह्यांनी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार, ता. राहाता येथील राष्ट्रीय चर्चासत्रात वाचन केलेला अप्रकाशित शोधनिबंध, दि. २८ जानेवारी २०११, पृ. ९.
९. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश, खंड पहिला, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, पृ. ३९२.
१०. प्रा. डॉ. द. के. गंधारे, 'लोकसाहित्याच्या अभ्यासात मराठी आख्यायिकांचे महत्त्व', लोकसंस्कृती विकास, त्रैमासिक, वर्ष १ ले, अंक २ रा, एप्रिल-मे-जून २०१२, पृ. ३७.
११. प्रा. नवनाथ शिंदे, माणकेश्वरचे शिव-सटवाई, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २७ जानेवारी २०११, पृ. ८२.
१२. गोविंद मंगेश कालेलकर, लौकिक दंतकथा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, पुनर्मुद्रण, जानेवारी २००९, पृ. ९.
१३. दुर्गा भागवत, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७७, पृ. ७५.
१४. नंदकुमार भाऊसाहेब उदार, ह्यांनी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार, ता. राहाता येथील राष्ट्रीय चर्चासत्रात वाचन केलेला अप्रकाशित शोधनिबंध, दि. २९ जानेवारी २०११, पृ. ५.
१५. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, 'आख्यायिकांचे लोकबंधात्मक चलन', मराठी आख्यायिका: स्वरूप आणि परंपरा, (स्मरणिका), डॉ. सी. डी. रुद्राक्ष, प्रा. एन. ए. शिंदे (संपा.), एएससी कॉलेज, कोल्हार, जानेवारी २०११, पृ. २-५.
१६. प्रा. बाळासाहेब दिघे, 'साने गुरुजी ह्यांच्या साहित्यातील आख्यायिका', मराठी आख्यायिका: स्वरूप आणि परंपरा (स्मरणिका), डॉ. सी.डी. रुद्राक्ष व प्रा. नवनाथ शिंदे, (संपा.), एएससी कॉलेज, कोल्हार, जानेवारी २०११, पृ. १.
१७. डॉ. विश्वनाथ शिंदे, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृ. १४४.
१८. अनिल सहस्त्रबुद्धे, लोकबंध, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे, पहिली आवृत्ती, मे १९९२, पृ. ८१.
१९. डॉ. प्रतिमा इंगोले, 'मराठी आख्यायिका', मराठी आख्यायिका:स्वरूप आणि परंपरा (स्मरणिका), डॉ. सी.डी. रुद्राक्ष व प्रा. नवनाथ शिंदे, (संपा.), एएससी कॉलेज, कोल्हार, जानेवारी २०११, पृ. १.
२०. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, 'आख्यायिकांचे लोकबंधात्म चलन', मराठी आख्यायिका:स्वरूप आणि परंपरा (स्मरणिका), डॉ. सी.डी. रुद्राक्ष व प्रा. नवनाथ शिंदे, (संपा.), एएससी कॉलेज, कोल्हार, जानेवारी २०११, पृ. ६.
२१. प्रा. के. के. गितखाने, 'अंबड तालुक्यातील गोदातटीच्या दंतकथा आणि आख्यायिका यांचा विवेचक अभ्यास', एम.फीलची अप्रकाशित शोधप्रबंधिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९९३, पृ. ३५.



**डॉ. नवनाथ शिंदे**
मराठी विभाग, लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील महाविद्यालय सात्रळ, ता. राहुरी, जि. अहमदनगर- ४१३७११,
चलभाषः ९८९०७७७६३९,
email : nshinde70@gmail.com


◆◆

# मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील स्त्री-पुरुष समानता

डॉ. मनीषा खैरे

**मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकांमधील स्त्री-पुरुष समानतेविषयी चर्चा करणारा संशोधन लेख.**

प्रस्तावना - भारतीय राज्यघटनेनुसार १९७६ पर्यंत शिक्षणासंबंधीचे अभ्यासक्रमासहित सर्व निर्णय राज्य सरकारे घेत असत. ४२ व्या घटना-दुरुस्तीने १९७६ मध्ये शिक्षण हे राज्य आणि केंद्र यांच्या सामाईक यादीत समाविष्ट करण्यात आले. त्यानुसार १९८६ मध्ये प्रथमच सर्व देशासाठी एकच शैक्षणिक धोरण स्वीकारण्यात आले. या धोरणात संपूर्ण देशात शालेय स्तरावर अभ्यासक्रमाचा एकच गाभा असावा, अशी शिफारस करण्यात आली. यापूर्वीच्या कोठारी आयोगाच्या (१९६४-६६) शिफारशींवर आधारित १९६८ च्या शैक्षणिक धोरणात अधिकाधिक मुला-मुलींना शिक्षणाची संधी मिळणे आणि सामाजिक मूल्ये जोपासणे यावर भर होता. या सामाजिक मूल्यांची जपणूक अधिक व्यापक स्तरावर करण्यासाठी आणि एक राष्ट्रीय शैक्षणिक व्यवस्था निर्माण होण्यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखड्याची शिफारस राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने केली. मात्र भारत हा बहुभाषक, बहुधर्मीय देश असल्याने एकच एक शैक्षणिक धोरण राबवताना देशाच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेला प्रतिसाद देत समान मूल्यांना संरक्षण देण्याचे आव्हान होते, त्यामुळे राष्ट्रीय शिक्षणव्यवस्था निर्माण करताना ती गाभा समान आणि त्याचे इतर घटक लवचीक असणाऱ्या अभ्यासक्रमाच्या राष्ट्रीय आराखड्यावर आधारित असेल असे ठरवले गेले. त्यानुसार लिंग, भाषा, जात, धर्म, स्थान यांतील भेदामुळे निर्माण होणाऱ्या विषमतेवर मात करून सर्व मुलांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध व्हावी, तसेच प्रत्येक राज्याच्या भौगोलिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक वैशिष्ट्यांनुसार बदलाची लवचीकता राखावी; पण त्याचबरोबर गाभा समान राखून बहुविधतेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मता साधली जावी ह्या हेतूने १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखले गेले. या धोरणाच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अभ्यासक्रमाकरता सुचवलेले तेरा गाभाघटक होय. गाभाघटक म्हणजे भारतातील सर्व राज्यांच्या समान गरजा लक्षात घेऊन आणि भारताची एकात्मता जोपासण्याच्या दृष्टिकोनातून प्राथमिक शालेय अभ्यासक्रम ठरवताना जे घटक अभ्यासक्रमात अंतर्भूत करणे आवश्यक आहे ते होय. विविधतेतून एकात्मता जपण्याच्या गरजेतून सामाजिक मूल्यभान जपणाऱ्या गाभाघटकांची निर्मिती झालेली आहे. हे तेरा गाभाघटक म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या, राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय, भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा, समानतावाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संरक्षण, सामाजिक अडसरांचे निर्मूलन, लहान कुटुंबाचा आदर्श, वैज्ञानिक मनोभावाची रुजवणूक, महिला व अन्य दुर्बल घटकांचे सबलीकरण, बुद्धी, भावना व कृती यांचा

समन्वय, जागतिकीकरण व स्थानिकीकरण यांचा मेळ हे आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अटीनुसार, कोणत्याही राज्याच्या अभ्यासक्रमात हे तेरा गाभाघटक असणे अनिवार्य आहे. गाभाघटक अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टात, आशयात, पाठ्यपुस्तकात विखुरलेले असतात. शिक्षणप्रक्रियेत सर्व मुला-मुलींना सामावून घेऊन सन्मानाची वागणूक देणाऱ्या व आत्मविश्वास प्राप्त करून देणाऱ्या कार्यक्रमाची गरज आहे. त्यादृष्टीने या तेरा गाभाघटकांमधला स्त्री-पुरुष समानता हा गाभाघटक अत्यंत महत्त्वाचा ठरतो. तसेच उर्वरित बारा गाभाघटकांशीही स्त्री-संदर्भ जोडलेला आहेच, त्यामुळे पाठ्यपुस्तकात स्त्री-पुरुष समानता या गाभाघटकाबरोबरच इतर सर्व गाभाघटकांमधील स्त्री-संदर्भालाही पुरेपूर वाव व न्याय दिला गेला आहे का? हे पाहणे अत्यावश्यक आहे; तरच स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वानुसार विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्या वर्तन-परिवर्तनाची शक्यता निर्माण होईल असे म्हणता येते. त्यादृष्टीने स्त्री-पुरुष समानता ह्या गाभाघटकाचे पाठ्यपुस्तकाच्या रचनेतील स्थान शोधताना स्त्री-पुरुष समानतेचा संस्कार करणारे घटक आणि पुरुषप्रधानतेचा संस्कार करणारे घटक, तसेच पुरुषप्रधानतेचा संस्कार करणारी भाषा अशी तीन भागांत विभागणी करावी लागते. ह्या शोधासाठी इयत्ता पहिली ते इयत्ता बारावीपर्यंतची प्रथम भाषा मराठी विषयाची पाठ्यपुस्तके विचारात घेतलेली आहेत. प्रस्तुत निबंधामध्ये हा शोध घेऊ.

**अ) स्त्री-पुरुष समानतेचा संस्कार करणारे घटक**

पाठ्यपुस्तकातील स्त्री-पुरुष समानतेचा संस्कार करणाऱ्या घटकांचा शोध पुढीलप्रमाणे घेता येतो. पुरुषसत्ताक समाजात लिंगभावावर आधारित श्रमविभागणी झालेली दिसते. घरकाम करणे, स्वयंपाक करणे ही मुख्यत्वे स्त्रियांचीच जबाबदारी असल्याचे वर्षानुवर्षांच्या संस्काराने ठसवण्यात आलेले आहे; परंतु 'भेळ'(इ.दु.पृ.२८) या कवितेत मुलांनी भेळ करून दे म्हटल्यानंतर, तुम्हीच भेळ तयार करा असे आई सांगते. कवितेला अनुरूप अशा चित्रात मुलगा आणि मुलगी दोघे मिळून भेळ तयार करत आहेत असे दिसते. तसेच वांग्याची भाजी, चहा, पुरी, सरबत तयार कसे तयार करायचे याविषयीची कृती सांगणे हे वर्गकार्यामध्ये अपेक्षित आहे. यामधून मुलगा असो वा मुलगी; लहानपणापासून त्यांना स्वयंपाकाची सवय लागावी, आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्नशील राहणे, हा संस्कार ह्या पाठातून होतो. हेच सूत्र 'आश्वासक चित्र'(इ.द.पृ.३१) या कवितेमध्ये विस्तार पावलेले दिसते. कवितेमधील खेळाच्या सुरुवातीच्या भागात मुलीने स्वयंपाक व बालसंगोपन करणे आणि मुलाने घराबाहेरील कामात-खेळात कौशल्य मिळवणे अशा लिंगभावावर आधारित श्रमविभागणीचे अनुकरण दिसते. कवितेच्या पुढच्या भागात मुलगा आणि मुलगी खेळांची अदलाबदल करतात. यातून मुलीला घरकाम व खेळाचे कसब दोन्हीही साधेल आणि मुलगाही खेळाबरोबरच घरकामाचे, बालसंगोपनाचे कसब प्राप्त करून घेईल. यातून लिंगभावावर आधारित श्रमविभागणी संपुष्टात येईल आणि स्त्री-पुरुष दोघांनाही घरकाम व घराबाहेरील काम अशी दोन्ही कामे करण्याची मोकळीक असेल असा स्त्री-पुरुष समतेवर आधारित समाजरचनेचा आशावाद या कवितेमधून व्यक्त होतो. 'बंडूची इजार' (इ.पा.पृ.२) ह्या विनोदी कौटुंबिक चित्रकथेमध्ये बंडू नावाच्या शेतकऱ्याला त्याची नवी इजार दुरुस्त करायला बायको, बहीण, आई कामामुळे वेळ नाही म्हणून नकार देतात, तेव्हा तो त्यावरून वर्चस्वभावनेतून त्यांना काही न बोलता शेताकडे जातो. या तिघींपैकी प्रत्येक जण कामातून वेळ मिळाल्यावर त्याची इजार दुरुस्त करून ठेवते. बंडूलाही घरी आल्यावर आपले काम आपणच केलेले बरे असे वाटते आणि पुन्हा घरातल्या स्त्रियांना इजार-दुरुस्तीचे काम न सांगता ते तो स्वत:च करतो, ही बाब त्याच्यातील समतावादी वृत्तीचा प्रत्यय देते. अर्थात चौघांनीही इजार दुरुस्त केल्यामुळे ती गरजेपेक्षा अधिकच छोटी बनते आणि विनोदनिर्मिती घडते. या कथेतून घरातील छोटे-मोठे शिवणकाम हे स्त्रीनेच केले पाहिजे, असे सूचित न होता ज्याला शक्य होईल त्या स्त्री-पुरुष अशा कोणीही करावे असे स्पष्ट दिसते. अशा प्रकारे, ही कथा स्त्री-पुरुष पात्रांमधील संवेदनशीलता, परस्पर-सहकार्य, स्वावलंबन या मूल्यांसह स्त्री-पुरुष समानता अधोरेखित करते.'वहिनींचा 'सुसाट' सल्ला' (इ.अ.पृ.३६) ह्या विनोदी अंगाने लिहिलेल्या कथेमध्ये 'वहिनींचा सल्ला' या कार्यक्रमात आजवर स्त्रियांना स्वतःच्या मताला प्राधान्य देण्याऐवजी कुटुंबाशी जुळवून घेण्याबाबत पारंपरिक सल्ला दिला जात होता; परंतु वहिनींच्या जागी त्यांची बहीण अपघाताने कार्यक्रमात येते आणि स्त्रियांच्या प्रश्नांना उत्तरे

देताना घरकामात पुरुषाची मदत घेणे, आतिथ्यशीलतेचा नको इतका त्रास होत असेल तर स्पष्टपणे पाहुण्यांना सांगणे, स्वतःच्या मताला महत्त्व देणे, आत्मसन्मान जपणे असे सल्ले देते. स्त्रीला समाजात मानाचे स्थान आणि समान हक्क मिळायला हवेत, तसेच तिने स्वतःला सिद्ध करून स्वतःचे महत्त्व समाजाला पटवून द्यायला हवे असा स्त्री–समतेचा संदेश कथेमधून दिलेला आहे; परंतु 'बंडूची इजार' व 'वहिनींचा 'सुसाट' सल्ला' ह्या कथालेखनाची विनोदी शैली असल्यामुळे स्त्री–पुरुष समानता विचारांचे गांभीर्य प्रभावीपणे ठसत नाही. मात्र असे असले तरी ह्या कथांना असलेला स्त्री–पुरुष समानतेचा गाभा महत्त्वाचा मानावा लागतो.

स्वतंत्र बाण्याच्या निर्भय स्त्रीची सक्षम प्रतिमा स्त्री–पुरुष समानतेच्या संदर्भात महत्त्वाची ठरते. 'रानवेडी' (इ.ति.पृ.१) ह्या निसर्गकवितेच्या केंद्रस्थानी असलेल्या ग्रामीण–आदिवासी मुलीचे निर्भयपणे डोंगरात भटकणे, निसर्गातल्या विविध घटकांशी स्वच्छंदीपणे जोडले जाणे चित्रित झालेले आहे. 'एकदा गंमत झाली' (इ.ति.पृ.१५) व 'मुग्धा लिहू लागली' (इ.ति.पृ.२१) या दोन्ही नायिकाप्रधान पाठांमधून मुलीची बुद्धी, भावना व कृती यांचा समन्वय साधत कल्पकता, विचारक्षमता, लेखन कौशल्य यांची सर्जनशील अभिव्यक्ती महत्त्वाची ठरते. स्त्रीचे बुद्धिचातुर्य वा युक्ती आणि निर्भयता 'चतुर हिराबाई' (इ.दु.पृ.१२) व 'वासाची किंमत' (इ.ति.पृ.३) ह्या दोन चित्रकथांमधून प्रत्ययास येते. एका सबल, निर्भय श्रमनिष्ठ शेतकरी स्त्रीच्या हिमतीची कथा 'जनाई' (इ.पा.पृ.२५) ह्या कथेमधून प्रत्ययास येते. जनाईला एक दिवस शेतात काम करत असताना कैक वर्षांपासून शेतात फिरत असलेला भुजंग म्हणजेच नाग दिसतो. सगळी वस्ती चपापते; पण जनाईला कोणाचे पाठबळ नसल्यामुळे, तिच्याशिवाय पुढे येऊन करणारे घरात दुसरे कोणी नसल्यामुळे ती निर्भयपणे शेतावर जात राहते. अशा प्रकारे, अचानक समोर संकट आले म्हणून जनाई दुबळी पडत नाही. आपल्या आत्मसामर्थ्यावर भावनांचे आणि ताणतणावांचे समायोजन करून संकटग्रस्त परिस्थितीला धैर्याने तोंड देते. 'आजी: कुटुंबाचं आगळ' (इ.द.पृ.५) ह्या कौटुंबिक पाठामध्ये ग्रामीण संस्कृतीतील एकत्र कुटुंबाची प्रमुख असणाऱ्या आजीचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. ग्रामीण कुटुंबांमध्ये प्रमुख स्त्रीच्या हातामध्ये बरेचसे हक्क व अधिकार असतात. ते ह्या स्त्रीने कष्टपूर्वक कमावलेले असतात. ते घरातील पुरुषांनाही मान्य असतात. तशीच ही आजी घरातील मुले, स्त्रिया, पुरुष, गडीमाणसे या सर्वांचा आधार, संरक्षक कवच आहे. पतीच्या निधनानंतर एकत्र कुटुंबाचा गाडा हाकण्याचे अवघड काम करताना घरातील नातवंडे, सुना, शेजारच्या आयाबाया, काम करणारे गडी या सगळ्यांवर एकीकडे तिचा वचक आहे, तर दुसरीकडे एकत्र कुटुंबात कोणा एकावर अन्याय होऊ नये यासाठी ती जागरूक आहे. घराचे प्रमुखपण ताकदीने निभावण्याचे सामर्थ्य अंगी असलेली आजी ग्रामीण कुटुंबव्यवस्थेचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणून देता येते. 'निरोप' (इ.न.पृ.६३) ह्या देशभक्तीपर कवितेत एक आई रणांगणावर जाणाऱ्या आपल्या सैनिक मुलाला निर्भयता, शौर्य, साहस अंगी बाणण्याविषयी सांगत आहे. एका आईचे प्रेमळ रूप या कवितेतून दिसतेच, त्याचबरोबर वीराचा धर्म जाणणारी, जीजा–लक्ष्मीशी नाते सांगणारी अशी ही स्वतः धीराने वागून मुलाला बळ देणारी हिंमतवान आई आहे. मानसिक कणखरपणाचे दर्शन घडवणाऱ्या कर्तव्यदक्ष लढवय्या स्त्रीचे चित्रण स्त्री–पुरुष समतेच्या संदर्भात महत्त्वाचे आहे. 'पैंजण' (इ.अ.पृ.५३) या कवितेमध्ये आजी–आई–कवयित्री–तिची मुलगी अशा चार पिढ्यांमधील स्त्रियांचा कौटुंबिक बंधनांचे अडथळे पार करत स्त्रीचा आत्मविकास घडवून आणणारा प्रवास चित्रित केलेला आहे. प्रत्येक पिढीगणिक स्त्रीचे स्वयंपाकघर, माजघर, सोपा, माडी, गच्ची, अंगण ते घराबाहेरील जग असे भावविश्व विस्तारले आहे. या अनुभवविश्वाच्या जोरावर अधिक विचारी, सक्षम, स्वतंत्र आणि ठाम विचारांची बनत गेलेली स्त्री–प्रतिमा कवितेतून समोर येते. या सर्व निर्भय स्त्री–प्रतिमा स्त्री–समानतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

स्वत: पारंपरिक पुरुषप्रधान व्यवस्था आणि सामाजिक विषमतेची बळी असताना आपल्या मुलांच्या बाबतीत मात्र ठाम भूमिका घेणारी स्त्री स्त्री–पुरुष समानतेच्या टप्प्यावर महत्त्वाची ठरते. शिक्षणाचे महत्त्व जाणून ग्रामीण, दलित कष्टकरी स्त्री आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी काबाडकष्ट करते. मुलांच्या शिक्षणाला आर्थिक वा इतर कारणांनी विरोध केला जात असेल तर प्रसंगी नवऱ्याचा विरोध पत्करून वा तळमळीने समजावून सांगून मुलांना शिकू देण्याविषयी आग्रही राहते हे महत्त्वाचे

आहे. शिक्षण हाच दुर्बलतेतून मुक्त होण्याचा मार्ग होय याची जाणीव ह्या स्त्रियांना असलेली दिसते. यादृष्टीने 'माय'(इ.स.पृ.२८) ही ग्रामीण कविता व 'माझं शाळेचं नक्की झालं' (इ.पा.पृ.५७) हा आत्मचरित्रपर पाठ महत्त्वाचा आहे. यामधून ह्या गरीब, अशिक्षित आईविषयीच्या कष्टांची जाणीव ठेवून तिच्याविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त झालेली आहे.

स्त्री-पुरुष लिंगभावापलीकडे जाऊन मानवतावादी दृष्टीतून विचार करणारी स्त्री-पात्रे महत्त्वाची ठरतात. 'नवा पैलू' (इ.स.पृ.९७) या मानवतावादी कथेतील आजी मूकबधिर असलेल्या नातवाबरोबरच आपल्या गावातल्या मूकबधिर मुलांसाठीही प्रसंगी शेत विकून शाळा काढण्याची तयारी दाखवते. आजी आणि वत्सला ह्या स्त्रिया स्वत:पुरता विचार न करता समाजातील इतर गरजू मुलांनाही स्वतःच्या पायावर उभे करण्याचे, स्वावलंबी बनवण्याचे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचे ठरवतात ही मानवतावादी दृष्टीतून महत्त्वाची गोष्ट होय. अत्यंत गरिबीत आणि कष्टात राहत असताना, त्यात जीवघेण्या संकटांनी घेरलेले असतानाही काही माणसे स्वत:ऐवजी दुसऱ्याचा विचार करतात त्या वृत्तीचा परिचय करून देणारी 'सलाम नमस्ते!' (इ.सा.पृ.५५) ही कथा आहे. जात, वर्ण, वर्ग, लिंग, वय या सर्व भेदभावांपलीकडे जात केवळ माणूस म्हणून जगणारी माणसे या कथेत येतात. त्या दृष्टीने ही कथा खऱ्या अर्थाने मानवतावादी ठरते. 'प्रीतम'(इ.न.पृ.८२) कथेमध्ये एक शिक्षक स्त्री आपल्या वात्सल्यपूर्ण वागणुकीने आई-वडिलांच्या प्रेमाला पारखा झालेल्या प्रीतमच्या आयुष्याला उभारी देते. त्याच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच मानसिक, भावनिक भरणपोषणही करते. त्यामुळे तो शिक्षणामध्ये प्रगती करून पुढे चांगल्या प्रकारचे आयुष्य जगतो. 'सोयरा वृक्षवल्लींचा'(इ.बा.पृ.७४) या कथेमध्ये एका दाम्पत्याला मूलबाळ नसते; परंतु या दुःखातच अडकून न पडता ते फुलांना, झाडांना मुलासारखे वाढवतात. शेवटी मातृत्व म्हणजे एक प्रकारचे नवसर्जन होय, आणि फुले, झाडे यांची जोपासना करणे हाही सर्जनाचाच एक भाग होय. या पाठामधून मूल न होणे ही गोष्ट नैसर्गिक सहजपणे स्वीकारलेली असून आपल्या अपत्यहीनतेवर शोधलेला हा सकारात्मक उपाय पुरुषप्रधान समाजसंरचनेमध्ये महत्त्वाचा ठरतो. अशा प्रकारे, ह्या मानवतावादी कथांमधील स्त्री-पात्रांच्या माध्यमातून संवेदनशीलता, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, कष्टाळू वृत्ती, करुणा, मानवता आणि अतूट प्रेम या मूल्यांच्या बळावर स्त्री स्वतःबरोबरच आपल्या सभोवतालच्या लोकांचे आयुष्यही सावरते, त्यांना सक्षम बनवण्यासाठी प्रयत्न करते हे स्त्री-सामर्थ्य प्रत्ययास येते.

समाजसुधारक, विचारवंत यांच्या जीवनचरित्रातून, वैचारिक मांडणीतून स्त्री-पुरुष समानताविषयक विचारांचा प्रत्यय येतो. त्यादृष्टीने म.ज्योतिराव फुले यांनी 'अखंड' (इ.बा.पृ.८५) या मानवतावादी काव्यरचनेची निर्मिती सर्व मानव स्त्री-पुरुषांना उद्देशून केली, हे त्यांच्या स्त्री-पुरुष समानता दृष्टीचे द्योतक आहे. 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज' (इ.पा.पृ.७३) ह्या चरित्रात्मक पाठामध्ये कोल्हापूर परिसरातील १८९६ च्या दुष्काळात राजर्षी शाहू महाराजांनी गरीब रयतेसाठी अनेक उपाययोजना केल्या. त्यामध्ये रोजगार हमीची कामेही सुरू केली. रस्त्याच्या कामावर येणाऱ्या बायकांची लहान मुले झाडाखाली किंवा उन्हात इकडे-तिकडे फिरतात, उपाशी राहतात, रडतात, त्यांच्याकडे लक्ष द्यायला कोणी नसते हे त्यांनी पाहिले; तेव्हा छावण्या उघडा, आया नेमा आणि प्रत्येक कामावर पोराबाळांची व्यवस्था करा असा हुकूम दिला. तेथून पुढे रोजगार हमीच्या प्रत्येक ठिकाणी शिशु-संगोपन गृह चालू झाली. अशा प्रकारे, राज्यातील प्रजा, शेतकरी, कष्टकरी, जनावरे जगवण्यासाठी उपाययोजना करणारे महाराज कामावर येणाऱ्या बायकांच्या लहान मुलांच्या संगोपनाचीही तितकीच काळजी घेतात, हे त्यांच्या समतावादी दृष्टीचे निदर्शक ठरते. 'कर्ते सुधारक कर्वे'(इ.द.पृ.४८) या चरित्रात्मक पाठामधून स्त्री-शिक्षण, महिलांचे सबलीकरण, स्त्री-पुरुष समतेचा विचार अभिव्यक्त होतो.'रमाई भिमराव आंबेडकर' (इ.ति.पृ.७५) यांची माहिती व आठवणी असलेल्या पाठामधून रमाबाईंचे श्रमप्रतिष्ठा, संवेदनशीलता, कर्तव्य दक्षता, स्वसुख-त्याग, जिद्द, निर्भयता या गुणांचे चित्रण व शिक्षणाचे महत्त्व जाणून आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकांच्या शिक्षणासाठी झटणे प्रत्ययास येते.'एक होती समई' (इ.न.पृ.१३) या चरित्रात्मक पाठामधून समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ यांनी पारंपरिक आयुष्य वाट्याला येऊनही प्रतिकूल परिस्थितीवर मात करत समाजसेवेचे व्रत घेतले व स्वकर्तृत्वाने आपले

अस्तित्व निर्माण करून अमीट ठसा उमटवला हे समोर येते. थोडक्यात, वरील व्यक्तींनी सामाजिक अडसरांचे निर्मूलन करत दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे या हेतूने आपले काम केलेले दिसते. संवेदनशीलता, कर्तव्यदक्षता, श्रमप्रतिष्ठा, भूतदया, बंधुभाव, परस्पर सहकार्य, विवेक, सदाचार, समता हे मूल्य-संस्कार करणारे हे चरित्रपाठ लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन मानवतावादी दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरते.

पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेतील पारंपरिक श्रमविभागणीनुसार घराबाहेरील कामाची क्षेत्रे ही पुरुषांसाठी राखीव मानली जात होती. स्त्रियांना तेथे प्रवेशास मज्जाव होता; परंतु शिक्षणाचा प्रसार व समानतेचे कायदे यांमुळे आधुनिक काळातील स्त्रियांना विविध क्षेत्रे खुली झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्त्रियांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाने अस्तित्व निर्माण केले. त्या दृष्टीने 'सावरपाडा एक्सप्रेस : कविता राऊत' (इ.पा.पृ.८) हा क्रीडाविषयक चरित्रपाठ, 'गोष्ट अरुणिमाची' (इ.द.पृ.३९) हा गिर्यारोहक अरुणिमाविषयीचा आत्मचरित्रात्मक पाठ, 'सफर मेट्रोची' (इ.स.पृ.६१) हा पहिली महिलासारथी रूपाली चव्हाण यांच्याविषयीचा मुलाखतपर पाठ, नौसेनेत काम करणाऱ्या 'धाडसी कॅप्टन : राधिका मेनन' (इ.आ.पृ.३२) यांच्याविषयीचा शौर्यात्मक पाठ, वीरांगना (इ.द.पृ.५९) हा लेफ्टनंट स्वाती संतोष महाडिक व सब इन्स्पेक्टर रेखा मिश्रा यांच्याविषयीचा देशभक्तीपर आणि समाजहितविषयक पाठ इ. पाठ महत्त्वाचे आहेत. सर्वसामान्य मुली आपली जिद्द, चिकाटी, मेहनत, दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वावलंबन, आत्मविश्वास, धाडस, शौर्य, प्रसंगावधानता, निर्भयता, कणखरपणा, खिलाडूपणा या गुणांच्या जोरावर विभिन्न क्षेत्रांमधील लक्ष्य साध्य करतात ही प्रेरणा या पाठांमधून मिळते.

पाठ्यपुस्तकातील काही पाठांच्या संवादांमधून मुले व मुली, स्त्री व पुरुष यांना समान स्थान दिलेले आहे. त्यामधूनही स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व समोर येते. त्या दृष्टीने 'आमचा शब्दकोश' (इ.ति.पृ.३३), 'खजिना शोध' (इ.ति.पृ.४७), 'संगणकाची करामत' (इ.दु.पृ.४८), 'प्रवास कचऱ्याचा' (इ.ति.पृ.४१), 'पाण्याची गोष्ट' (इ.पा.पृ.८२), 'बाल सभा' (इ. स. पृ.५६), 'भांड्यांच्या दुनियेत' (इ.सा.पृ.१९), 'शब्दकोश'(इ. आ. पृ. ८९), 'मैत्री तंत्रज्ञानाशी' (इ.आ.पृ.१५), 'मैत्री तंत्रज्ञानाशी' (इ.न.पृ.९३) इ. भाषिक उपक्रमविषयक, उपयोजनात्मक उपक्रमविषयक संवादरूप पाठांची केलेली रचना महत्त्वाची आहे. या पाठांमधून मुला-मुलींनी एकत्रितपणे भाषिक कृती करणे, एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करणे, एखाद्या विषयावर आपापली मते मांडून चर्चा करणे, सामाजिक समस्यांवर उपाय शोधणे, नवे तंत्रज्ञान शिकवणे यांसारख्या समान सहभागाच्या कृती-कार्यक्रमांतून स्त्री-पुरुष समानतेचा संस्कार होतो.

अशा प्रकारे, स्त्री-पुरुष समानतेचा गाभा वरील घटकांमध्ये अंतर्भूतआहे.

**ब)पुरुषप्रधानतेचा संस्कार करणारे घटक**

पुरुषसत्ताक श्रमविभागणीत स्वयंपाक हे स्त्रीचे काम मानले गेले. हाच पारंपरिक संस्कार घट्ट करणारे अनेक पाठ व कविता दिसून येतात. 'अति तिथे माती'(इ.पा.पृ.६८) ह्या विनोदी नाटिकेमध्ये स्वयंपाक बायकोने करणे; पण सामान संपले तर स्वत: खरेदी न करता नवऱ्याला आणायला सांगणे आणि नवऱ्याने पैसे खर्च करून सामान आणून देणे; यामधून नवरा-बायकोतील कामांची पारंपरिक विभागणी दिसते. 'कवितेची ओळख' (इ.सा.पृ.६४)ह्या एकांकिकेतील आशय-संभाषणामधून पुरुषप्रधानतेचा प्रत्यय येतो. घरामध्ये स्वयंपाक मुलाच्या आजीने आणि आईने करणे; पण तो आजोबांच्या आणि वडिलांच्या आवडीचा करणे, आणि ही आवड जपणे हाच माझा ध्यास असे आजीने म्हणणे; आजोबा, वडील यांनी जेवायला वाढा म्हणणे, वडिलांनी पिण्यासाठी पाणी मागणे, शिरा करून मागणे, सांजवात आजीने लावणे, आजोबांच्या कोटाचे तुटलेले बक्कल घरातील स्त्रियांनी लावणे, घरातील स्त्रियांच्याच एकमेकींशी छोट्या-छोट्या कुरबुरी होणे; घरातील मुलांमध्ये भेद करणे, लाडू खाल्लेली बशी मुलीने उचलली नाही यावरून आईने तिला बोलणे, याउलट मुलाने जेवणावर ताव मारणे, बहिणीने भावाला अंघोळ, नाश्ता आवरून घे म्हणून सांगणे, या प्रकारच्या आशय-मांडणीतून लिंगभावी श्रमविभागणीचे प्रतिबिंब उमटते. हेच सूत्र इयत्ता दुसरीतील 'भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण' (पृ.२०), 'चुलीवरची खीर' (पृ.४२), 'कणभर तीळ' (पृ.५४) या घटकांमधून दिसून येते.

कुटुंबव्यवस्थेमध्ये पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेच्या प्रभावाखाली असलेले स्त्री-पुरुष पुरुषप्रधानतेला अनुकूल

वर्तणूक करत असतात, निर्णय घेत असतात. त्याचा कुटुंबातील मुलांना फायदा होतो; पण मुली मात्र या विषमतेच्या बळी ठरतात. 'तोडणी' (इ.सा.पृ.९) ही कथा याचे उत्तम उदाहरण होय. या कथेमधून ऊसतोड मजुरांच्या स्थलांतरामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची होणारी आबाळ प्रत्ययास येते. ऊस तोडणीसाठी तारा आणि शंकर हे दाम्पत्य मीरा व वसंत या मुलांसह परगावी येते. तेथे ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरित मुलांसाठी साखरशाळा असते; परंतु मुलाने हाताखाली काम केले तर चार पैसे अधिक मिळतात म्हणून शंकर त्याला शाळेत घालण्यास नकार देतो. परिस्थिती हलाखीची असली तरी वसंताला मात्र शाळेत घालावे यासाठी त्याची बायको आणि शेजारची स्त्री आग्रह धरते आणि वसंताचे थांबलेले शिक्षण सुरू होते. अशा प्रकारे, या कथेमध्ये गरीब ऊसतोड मजुराच्या मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न शेवटी सुटलेला आहे आणि ते महत्त्वाचेच आहे; परंतु या कथेचा तपशिलात जाऊन विचार करता वसंताला मीरा नावाची एक मोठी बहीण आहे. तिचे शिक्षण आधीच सुटलेले आहे. वसंत जसा उसाच्या मोळ्या वाहण्याच्या कामात मदत करतो तसेच मीरा आई-बापाने तोडलेल्या उसाच्या मोळ्या बांधण्याचे आणि वाहाण्याचे काम करते. याशिवाय वडिलांबरोबर नदीवर जाऊन पाणी भरणे, आईला स्वयंपाकात मदत करणे अशी मुलींनीच करावयाची समजली जाणारी कामेही करते. आई पोराचे शिक्षण अर्धवट राहू नये, त्याच्या पुढच्या आयुष्याचा विचार करा असे नवऱ्याला सांगते; पण मीराचे शिक्षण अर्धवट झाले हे तिने स्वीकारलेले आहे. या पाठातील ऊसतोड मजुराचे कुटुंब हे सामाजिक विषमतेचा बळी ठरते हे खरे आहे. मुलांना शाळेत पाठवणे हे आर्थिक नुकसान करणारे ठरते, त्यामुळे परिस्थितीमुळे मुलांना शाळेत पाठवण्याची टाळाटाळ करावी लागते, हेही समजून घेता येते; परंतु अशा वेळी दोन्ही मुलांच्या शिक्षणाचा समान विचार होत नाही, हा विरोधाभास दिसतो. या पाठातील स्त्री-पुरुष पात्रे कुटुंबातील केवळ मुलाच्या शिक्षणाचा, त्याच्या नुकसानीचाच विचार करताना दिसतात; परंतु त्याच वेळी घरातल्या मुलीचेही शिक्षण थांबलेले असले आणि त्याचा तिच्या पुढच्या आयुष्यावर विपरीत परिणाम होणार असला तरी ती त्यांना आपली जबाबदारी वाटत नाही. यामधून मुलगी लग्न करून सासरी जाणार असते आणि तेवढीच आई-वडिलांची जबाबदारी असते हाच विचार अप्रत्यक्षपणे डोकावतो. या पाठामध्ये वसंताला आपले शिक्षण पूर्ण व्हावे, अशी ओढ जागोजागी व्यक्त झालेली आहे; परंतु मीराला आपले शिक्षण अर्धवट राहिले याविषयी काय वाटते? याचे सूचनही होत नाही. भावाच्या शिक्षणाविषयी चर्चा चालू असताना ती स्वतःच्या अर्धवट शिक्षणाविषयी कोणतीही नाराजी वा तक्रार करत नाही. उलट रुसलेल्या भावाला समजावण्याचा प्रयत्न करते, आणि वडील जेव्हा शंकरला शाळेत घालण्याचा निर्णय घेतात तेव्हा मीराच्या आनंदाला पारावार उरत नाही. तिचे डोळे पाण्याने भरतात.या पाठातील मीराची भूमिका कुटुंबाला कामात मदत करणे, भावाला पाठिंबा देणे, मनासारख्या गोष्टी घडल्या नाहीत म्हणून कसलीही कुरकूर न करणे, भावाच्या सुखात आनंद मानणे अशी परंपरागत समंजस, सोशिक स्वरूपाचीच आहे. एखाद्या घरात जेव्हा मुलगा आणि मुलगी यांच्यासंदर्भात प्रश्न उभा राहतो, त्या वेळी मुलाला त्याच्या भविष्याचा विचार करून झुकते माप दिले जाते आणि मुलीला डावलले जाते, हा पुरुषप्रधान संस्कार रुजवण्यात ही कथा दुर्दैवाने यशस्वी झालेली आहे. अशा प्रकारचे मुलींना दुय्यमत्व देणारे पाठ विद्यार्थी-विद्यार्थिनींवर लिंगभावी मूल्यसंस्कार करतात हे स्त्री-पुरुष समानतेसंदर्भात घातक आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकात समावेशासाठी पाठ निवडताना अत्यंत काळजी घेणे गरजेचे आहे.

पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत निर्णयाचा अधिकार सत्तास्थानी असलेल्या पुरुषाच्या हातात असतो, त्यामुळे स्त्रियांचे मत व स्थान दुय्यम ठरते हे अनेक घटकांमधून दिसून येते. 'कठीण समय येता...' (इ.पा.पृ.३२) या कथेमधून मदतीचे, प्रसंगावधानाचे पुरुषकेंद्री रूप समोर येते. त्यामुळे मानवतावादी कथा म्हणून या कथेचा परिणाम पुसट होतो आणि बारीक-सारीक तपशिलांमधून पुरुषप्रधानतेचा संस्कार प्रबळ होतो. 'आम्हांलाही हवाय मोबाईल!' (इ.चौ.पृ.८) या नाट्यछटेमध्ये मोबाईल घ्यायचा की नाही हे केवळ बाबांच्या मतावर अवलंबून आहे. 'मला शिकायचंय!' (इ.चौ.पृ.१०) या कथेत बायको व मुलीचे ऐकून न घेता मुलीच्या शिक्षणाला आधी नकार आणि नंतर होकार देणे वडिलांच्या अधिकारात आहे. 'धाडसी हाली'(इ.चौ.पृ.३३) या मुलाखत-पाठातील धाडसीपणाबद्दल शौर्य पुरस्कार मिळवणारी हाली सामाजिक

विषमता व पुरुषप्रधानतेमुळे शिक्षणापासून वंचित राहते, अल्पवयीन लग्नाची बळी ठरते.

पालकांविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त करताना स्त्री–पुरुषांविषयीच्या कृतज्ञता–व्यक्ततेनुसार संदर्भ बदलत जातात; ते पुरुषकेंद्री असतात, हे 'माझ्या आज्यानं पंज्यानं' (इ.स.पृ.४२), 'आळाशी' (इ.आ.पृ.७०) व 'माय' (इ.स.पृ.२८) या कवितांमधून दिसून येते. वडील–आजोबांविषयीचा कृतज्ञता–भाव व्यक्त करताना घरातील स्त्रियांविषयीचे, आईविषयीचे संदर्भ येत नाहीत हे माझ्या आज्यानं पंज्यानं व आळाशी या कवितांमधून दिसते, तर आईविषयीचा कृतज्ञता–भाव व्यक्त करताना मात्र वडिलांविषयीचेही संदर्भ येतात, हे माय कवितेमधून दिसते. असे का घडते? यामागच्या कारणांचा शोध घेताना या तिन्ही कविता पितृसत्ताक कुटुंबव्यवस्थेच्या पोटातून येतात हे मान्य करावे लागते. शिक्षण वा तत्सम गोष्टीला वडिलांचा विरोध असतो, तेव्हा मुलाची बाजू घेऊन आई ठामपणे पाठिंबा देते. त्यामुळे मुलगा आईविषयी कृतज्ञताभाव व्यक्त करतो तेव्हा साहजिकच वडिलांबरोबरच्या संघर्षाचे क्षण साहित्यकृतीत टिपले जातात; परंतु जेव्हा एखाद्या गोष्टीसाठी वडील अनुकूल असतात तेव्हा घरातील पुरुषाचा निर्णय अंतिम असल्याने आईचा विरोध असो वा सहमती त्याविषयी घरातील स्त्रियांनी काही बोलणे हे पुरुषसत्तेच्या विरोधात जाते. त्यामुळे संघर्षाचे कारण उरत नाही आणि म्हणूनच आईच्या पाठिंब्याची वा तिचे मत जाणून घेण्याचीही गरज उरत नसल्याने तिचा उल्लेख कवितेत घेणे महत्त्वाचे ठरत नाही, हाही पुरुष प्राधान्याचाच एक भाग म्हणता येईल.

पुरुषप्रधान समाजधारणा वा संकेत यांतून स्त्रीच्या दुय्यमत्वाचे संस्कार होतात. 'माहेर' (इ.पा.पृ.१६) या कवितेमधून पुरुषप्रधान समाजात सासरी नांदणाऱ्या स्त्रीला मोकळेपणाचे, मुक्तपणाचे चार क्षण मिळवण्यासाठी माहेरी येण्याची वाट पाहावी लागते. त्यासाठी सासरच्या कुटुंबाची परवानगी घ्यावी लागते, माहेरून वडील वा भाऊ घ्यायला आल्यानंतरच माहेरी जाणे शक्य होते, हे ह्या कवितेमधून दिसते. माहेराची ओढ स्त्रीला इतकी का लागलेली असते हे 'खांब' (इ.बा.पृ.९३) या कवितेमधून पाहायला मिळते. पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेमध्ये स्त्रीवर असलेली बंधने तिला किती करकचून बांधून टाकतात, याचे चित्रण ह्या कवितेत पाहायला मिळते. लग्न करून सासरी आलेल्या स्त्रीने आपले दुःख आत दाबून इतरांच्या सुखाचा विचार करणे, आल्या गेल्यांचा पाहुणचार करणे, कुटुंबातील आजारी व्यक्तीची सेवा करणे, नवरा–मुले–सासू–सासरे यांच्यासाठी अव्याहत राबणे ह्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणे अपेक्षित असते. घरातले सारे कष्ट मीच करीन असा अट्टहास घेणे हाही पुरुषप्रधान संस्कारांचा परिपाक आहे. त्यासाठी स्त्रीच्या शारीरिक आणि मानसिक सामर्थ्याचा गौरव करीत तिचे एक प्रकारे उदात्तीकरण केलेले आहे. कवितेत स्त्रीचे विवाहित असणे, कुटुंबाच्या वंशसातत्यासाठी मुलगा जन्माला घालणे, कपाळावर कुंकू, गळ्यात काळे मणी आणि हातात हिरवा चुडा ही सौभाग्याची लेणी अभिमानाने मिरवण्याची गोष्ट वाटते. अशा प्रकारे, ह्या कवितेमधून जन्माला आलेल्या मुलीवर सासरचे कुटुंब हेच सर्वस्व मानून स्वतःला त्यात विसर्जित करणे, दुसऱ्यासाठी जगण्यातच आपल्या जीवनाची इति कर्तव्यता मानणे, कुटुंबाला वारस देणे असे संस्कार केले जातात. ह्या पारंपरिक धारणा स्त्रीला आदर्शत्वाच्या जोखडात अडकवून टाकतात; पण स्त्री मूल जन्माला घालण्यास असमर्थ असेल तर तिची अवस्था कशी बिकट होऊन जाते, हे 'ध्यानीमनी' (इ.अ.पृ.७५) ह्या सामाजिक नाटकामधून दिसून येते. या नाटकातून अपत्यहीनतेच्या समस्येचा सामाजिक व मानसशास्त्रीय वेध घेताना पुरुषसत्ताक समाजात निपुत्रिक स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दूषित दृष्टिकोन स्पष्ट होतो. मातृत्व, अपत्यप्राप्ती ही नैसर्गिक बाब आहे; पण पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत मातृत्वाचे इतके उदात्तीकरण केले गेले आहे, की एखाद्या स्त्रीला मूल नसेल तर भोवतालचा समाज तिला कमी लेखतोच; परंतु स्वतः त्या स्त्रीलाही जणू आपल्यातच काही वैगुण्य आहे असा अपराध–भाव वाटत राहतो. ह्या नाटकातील निपुत्रिक स्त्री घालूनपाडून बोलणारे घरचे लोक, मित्रमंडळी, शेजारी–पाजारी यांचे दडपण आणि मुलाविषयीच्या वात्सल्य भावनेने इतकी अगतिक बनते, की काल्पनिक मुलाची कल्पना करून त्यातच गुंतून राहू इच्छिते व मानसिक रुग्ण बनत जाते. मूल असल्याशिवाय आयुष्याची परिपूर्ती नाही हा पारंपरिक समज या दाम्पत्याचे आयुष्य उद्ध्वस्त करतो. 'सुंदर मी होणार' (इ.अ.पृ.८०) या नाट्य–उताऱ्यामध्ये कधी काळी संस्थानिक असणारा पिता आयुष्यभर आपल्या बायकोवर व मुलांवर वर्चस्व गाजवतो. ही मुले आयुष्यभर आपल्या वडिलांना घाबरत

जगतात आणि मोठी झाल्यावर त्यांचा तिरस्कार करतात. पित्याच्या मनाविरुद्ध वागल्यास मुलांना घरात राहण्याची परवानगी नाही, हा पुरुषसत्ताक वर्चस्वभावाचाच परिपाक म्हणता येतो. ह्या नाट्य उताऱ्यातील पात्रे संस्थानिकांच्या सत्ता वर्चस्व-भावनेबरोबरच पुरुषसत्ताक मूल्यांचीही बळी ठरलेली आहेत.

पुरुषप्रधान समाजात स्त्रियांच्या इच्छेला, सुखाला, स्वप्नांना, अस्तित्वाला नेहमी दुय्यमत्व दिलेले आहे; त्याचे प्रतिबिंब पुढील पाठांमधून पडलेले दिसते. 'ज्याचं त्याचं नंदनवन'(इ.बा.पृ.४५) या पाठात एखाद्या व्यक्तीचे सुख म्हणजेच नंदनवन कशात आहे, यासंदर्भात सर्व उदाहरणे ही केवळ पुरुष व्यक्तींची दिलेली आहेत. तसेच 'अशी पुस्तकं'(इ.अ.पृ.११) या पाठामध्ये सर्व उदाहरणे पुरुष लेखकांच्या पुस्तकांची दिलेली आहेत. 'स्वप्न विकणारा माणूस' (इ.सा.पृ.२) या पाठामधून गावातील लोकांना स्वप्न बघायचे शिकवणारा सपनविक्या, सपनविक्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी येणारा त्याचा उत्तराधिकारी मुलगा ही पुरुष-पात्रांची निवड पुरुषांच्या स्वप्नांना महत्त्व देणारी व स्त्रियांची स्वप्ने दुय्यम लेखणारी ठरते.'माझ्या देशावर माझे प्रेम आहे' (इ.आ.पृ.२) या संवादात्मक स्वरूपाच्या पाठामध्ये लेखकाला प्रश्न विचारणारी शाळेतील मुले ही सर्व मुलगेच आहेत. मुलींनी प्रश्न विचारले याचा उल्लेख नसल्याने मुली फक्त श्रवणभक्तीच करत आहेत का? मुलींना प्रश्नच पडत नाहीत का? प्रश्न पडण्याइतकी वैचारिकता किंवा बुद्धिमत्ता मुलींजवळ नाही का? असे वाटते. तसेच वेगवेगळ्या विचारवंतांची अवतरणे देताना पुरुष विचारवंतांचीच अवतरणे दिलेली आहेत. पाठात स्त्री-संदर्भ जाणीवपूर्वक लक्षात घेणे गरजेचे होते असे वाटते.'थेंब आज हा पाण्याचा' (इ.सा.पृ.८०) ह्या कवितेमधील 'या मोत्यांचा संचय कर तू, प्रश्न तुझ्या रे जिण्याचा। दृष्टिकोन तू बदल आता रे, निसर्गास ह्या बघण्याचा' ह्या ओळींमधून ही कविता केवळ मुलग्यांना उद्देशून लिहिलेली आहे असे दिसते. वर्गामध्ये मुले आणि मुली एकत्र शिकत असताना मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व किंवा पाण्याची बचत याविषयीचा संदेश देणाऱ्या कवितेतील संबोधनातून मुलींना अनुल्लेखित ठेवणे पुरुषप्राधान्य स्पष्ट करते.'आवाहन' (इ.बा.पृ.९१) या देशभक्तीपर कवितेतील 'अशा घडीला कोण करंटा तटस्थतेनें दुर पळे', 'सह्यगिरींतील वनराजांना' ओळींमधून केवळ पुरुष सैनिकांनाच आवाहन केले आहे. ज्या काळात ही कविता लिहिली त्या काळात केवळ पुरुष सैनिक असतील; परंतु आताच्या काळात स्त्री सैनिकही सैन्यदलामध्ये सामील होत आहेत. असे असताना केवळ पुरुष सैनिकांना आवाहन करणारी ही कविता पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्याचे प्रयोजन उमगत नाही. यावरून एखादा घटक पाठ्यपुस्तकात समाविष्ट करताना तो काळाशी सुसंगत असणे अत्यंत गरजेचे आहे, हे ध्यानात येते.

पाठ्यपुस्तकातील बहुतांश नायकप्रधान व नायिकाप्रधान पाठांचा आशय-तपशील हा लिंगभावी जाणिवेला, समजांना बळकटी देणारा आहे. नायकप्रधान पाठांमध्ये 'वडिलांस पत्र' (इ.स.पृ.८५) हे एका मुलाने वडिलांना लिहिलेले असून पत्रलेखनाचा विषय गौरवशाली इतिहासाचा आहे; याउलट 'प्रिय बाई....' (इ.पा.पृ.२२) हे एका शाळा सोडून गेलेल्या मुलीने आपल्या बाईंना पुरस्कार मिळाल्याच्या निमित्ताने लिहिलेले अभिनंदनपर पत्र आहे. 'रोजनिशी' (इ.स.पृ.९४) या पाठामध्ये वैभव या मुलाने लिहिलेल्या तीन दिवसांच्या रोजनिशीमधून बसमध्ये प्रसंगावधान दाखवणे, सहलीला जाणे व दंगामस्ती करणे आणि चुकीच्या वागणुकीवरून शिक्षकांची बोलणी खाणे अशा प्रकारच्या प्रसंगांसाठी नायकप्रधान निवड केलेली आहे. याशिवाय इयत्ता दुसरीतील 'चंपकला शाबासकी मिळाली' (पृ.१५),'चिंटू रुसला... चिंटूहसला' (पृ.२६), 'पाऊस फुले' (पृ.३०), 'दिनदर्शिका' (पृ.४४); इयत्ता तिसरीतील 'पाणी किती खोल?' (पृ.१२),'मजेशीर होड्या' (पृ.५८), 'दोस्त' (पृ.७०), 'ट्रॅफिकदादा' (पृ.७८), 'चित्रे' (पृ.८१), 'रोपटे' (पृ.८५), इयत्ता चौथीतील 'मिठाचा शोध' (पृ.४९), 'हें कोण गे आई' (पृ.६७), 'होय, मीसुद्धा!' (पृ.७६) इ. पाठही या संदर्भात महत्त्वाचे आहेत.

नायिकाप्रधान पाठांचा विचार करता 'आपली सुरक्षा, आपले उपाय!' (इ.स.पृ.४९) या पाठामध्ये शेजारी घडलेल्या एका अपघातामुळे घाबरलेली मुलगी आईला येऊन घट्ट मिठी मारते व अपघाताविषयी सांगते ह्या प्रसंगासाठी मुलीची केलेली निवड पुरुषप्राधान्य अधोरेखित करते.'दुखणं बोटभर' (इ.स.पृ.६५) या पाठामधून बोटभर दुखण्याने हैराण झालेली ही एक स्त्री

आहे. स्त्री नाजूक, कोमल असते, छोटेसे दु:खही ती पेलवू शकत नाही हा गैरसमज दृढ करण्यास ही कथा पूरक ठरते.'मले बाजाराला जायाचं बाई!' (इ.स.पृ.७३) या भारूड स्वरूपातील पथनाट्यातून प्लास्टिक प्रदूषण या सामाजिक समस्येवर 'प्लास्टिक वापर टाळा पर्यावरण संरक्षण करा' असा संदेश दिलेला आहे. ह्या संवादरूप पाठात बाई आणि पहिला, दुसरा, तिसरा पुरुष आणि इतर स्त्री-पुरुष यांच्यामधील संवाद आहे. यांपैकी बाईला प्रश्न पडतात, प्रश्नांची उत्तरे तिच्याकडे नसल्यामुळे ती हैराण झालेली आहे व इतर पुरुष तिच्या प्रश्नांची उत्तरे देत आहेत असे संवादाचे पुरुषप्रधान स्वरूप आहे. याशिवाय इयत्ता दुसरीतील 'मुलांचे संमेलन' (पृ.६४), 'मांजरांची दहीहंडी' (पृ.६९), इयत्ता चौथीतील 'बोलणारी नदी' (पृ.२) इ.पाठही यासंदर्भात महत्त्वाचे आहेत. अशा प्रकारे, वरील नायकप्रधान व नायिकाप्रधान अशा दोन्ही प्रकारच्या पाठांमधून पुरुषप्राधान्य सूचित होते.

वैज्ञानिक कथा-आशयासाठी सर्व पाठांमध्ये प्राधान्याने पुरुष-पात्रांची निवड केलेली आहे. स्त्री-पात्रांमध्ये निरीक्षणक्षमता, विचारक्षमता, बुद्धिमत्ता, शोधकता, चिकित्सक दृष्टी, कल्पकता, चाणाक्षपणा नसतो वा विज्ञान-तंत्रज्ञानविषयक बाबी त्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात, अशा अपसमजांना पाठ्यपुस्तके बळी पडलेली दिसतात. अशा प्रकारे, वैज्ञानिक आशयासाठी स्त्री-पात्रांचा समावेश न करणे हे पुरुष प्राधान्याचे लक्षण होय, असे म्हणता येते. त्या दृष्टीने 'मला मोठ्ठं व्हायचंय!'(इ.स.पृ.४६), 'परिवर्तन विचारांचे' (इ.स.पृ.९१), 'धोंडा'(इ.सा.पृ.९०), 'यंत्रांनी केलं बंड' (इ.न.पृ.३६), 'निर्णय'(इ.द.पृ.७४), 'अति काळजीचे परिणाम' (इ.बा.पृ.६७) हे पाठ दिसून येतात.

संत कविता हा घटक इयत्ता चौथीपासून सुरू झालेला दिसतो. चौथी ते बारावीपर्यंत एकूण एकवीस अभंग समाविष्ट केलेले आहेत. त्यामध्ये संत जनाबाईचे तीन अभंग; तर संत बहिणाबाई, संत निर्मळा, संत कान्होपात्रा यांचा एक-एक अभंग असे एकूण सहा अभंग समाविष्ट केलेले आहेत. उर्वरित पंधरा अभंग हे पुरुष-संतांचे आहेत. ह्यातील बहुसंख्य अभंग केवळ भक्तिभावाचे वर्णन करणारे आहेत.

आत्मचरित्रात्मक-चरित्रात्मक घटकांतर्गत समाविष्ट केलेली स्त्रियांची आणि पुरुषांची चरित्रे, माहिती व आठवणी यांचा संख्यात्मक विचार करता मोठ्या प्रमाणात असमतोल आढळून येतो. समाज सुधारकांविषयीच्या चरित्रपाठांमध्ये संत गाडगेबाबा (इ.ति.पृ.३७), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (इ.पा.पृ.४१), कर्मवीर भाऊराव पाटील (इ.चौ.पृ.१५), महर्षी धोंडो केशव कर्वे (इ.द.पृ.४८), महर्षी कर्वे आणि नामदार गोखले यांचे विचार (इ.सा.पृ.९९), सेनापती बापट (इ.पा.पृ.४५), स्वामी विवेकानंद (इ.आ.पृ.४६), सयाजीराव गायकवाड महाराज (इ.चौ.पृ.२२), छत्रपती राजर्षी शाहू महाराज (इ.पा.पृ.७३) या पुरुषांच्या; तर रमाई भिमराव आंबेडकर (इ.ति.पृ.७५), अनुताई वाघ (इ.न.पृ.१३) या केवळ दोन स्त्रियांच्या कार्य-विचारांचा परिचय करून दिला आहे. देशभक्तीविषयक शौर्यात्मक चरित्रपाठांमध्ये जननायक बिरसा मुंडा (इ.चौ.पृ.६५), थोर हुतात्मे-भगतसिंग, राजगुरू, सुखदेव (इ.चौ.पृ.८४), आपले परमवीर (इ.स.पृ.२४), ले. कर्नल श्याम चव्हाण (इ.बा.पृ.६०) या पुरुषांच्या; तर राधिका मेनन (इ.आ.पृ.३२), ले. स्वाती संतोष महाडिक व सब इन्स्पेक्टर रेखा मिश्रा (इ.द.पृ.५९) या स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय करून दिला आहे.साहित्यकार-कलाकारविषयक चरित्रपाठांमध्ये अण्णा भाऊ साठे(इ.आ.पृ.२७), लिओनार्दो दा व्हिंची (इ.आ.पृ.४०), टॉलस्टॉय (इ.अ.पृ.४७), चार्ली चॅप्लीन (इ.न.पृ.७६) या पुरुष लेखकांच्या; तर बहिणाबाई चौधरी (इ.अ.पृ.१९), गिरिजा कीर यांच्या साहित्याची समीक्षा (इ.द.पृ.१६), गिरिजा कीर (इ.बा.पृ.५५) या स्त्री-लेखकांच्या साहित्यिक कारकिर्दीचा परिचय करून दिला आहे. संशोधनविषयक चरित्रपाठांमध्ये डॉ. शंकर आबाजी भिसे (इ.ति.पृ.६६), दादाजी रामजी खोब्रागडे (इ.सा.पृ.२६), डॉ. पांडुरंग खानखोजे (इ.सा.पृ.२६), डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम (इ.स.पृ.७), डॉ. विश्वेश्वरय्या (इ.न.पृ.३०), सुमंत मुळगावकर (इ.न.पृ.५९) या पुरुष-संशोधकांविषयी माहिती दिली आहे. यामध्ये एकाही संशोधक स्त्री-चरित्रकाराचा समावेश केलेला नाही. क्रीडाविषयक पाठांमध्ये सचिन तेंडुलकर (इ.चौ.पृ.७०), खाशाबा जाधव (इ.स.पृ.७९) हे पुरुष खेळाडू; तर कविता राऊत (इ.पा.पृ.८) ह्या स्त्री-खेळाडूविषयी माहिती दिली आहे. याशिवाय गिर्यारोहक अरुणिमा सिन्हा (इ.द.पृ.३९)

यांच्याविषयीचा पाठ आहे. यावरून स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांच्या आत्मचरित्र-चरित्रांची, माहितीपर पाठांची संख्या अधिक भरते. तसेच ह्यातील बहुसंख्य आत्मचरित्रे-चरित्रे ही पारंपरिक वळणाची आहेत. अशाच पद्धतीने इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचे प्रत्येक वर्गाच्या पाठ्यपुस्तकातील स्त्रीलिखित पाठ व पुरुषलिखित पाठ यांचे तुलनात्मक प्रमाण काढले असता पुरुषलिखित पाठ संख्येने अधिक भरतात, हेही पुरुषप्राधान्यच ठरते.

उपयोजित लेखनामधील नमुना उदाहरणांमध्येही पुरुषप्राधान्याचा प्रत्यय येतो. व्याकरणाचा विचार करता, उभयान्वयी अव्ययाची कार्यात्मक ओळख करून देताना आई आणि मुलीचा मंडईत भाजीपाला आणायला गेल्याविषयीचा उतारा आहे (इ.सा.पृ.४७), तर विरामचिन्हांचा वापर करण्यासंदर्भात श्रेष्ठ गणिती म्हणून प्रसिद्ध झालेले श्रीनिवास रामानुजन यांच्याविषयीचा उतारा आहे.(इ.द.पृ.२६) पहिल्या उताऱ्यात भाजीपाला खरेदी हे पारंपरिक स्त्रियांचे काम करण्यासाठी स्त्री-पात्रांची योजना केली आहे, तर बुद्धिमत्तेच्या संदर्भात पुरुषाविषयीचे उदाहरण दिले आहे. तसेच एखाद्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध पुरुष व्यक्तींनाच बोलावणे (इ.सा.पृ.८३, इ.आ.पृ.४५, इ.न.पृ.१११), मुलाखत देणारी सन्माननीय व्यक्ती आणि मुलाखत घेणारा मुलाखतकार हे दोघेही पुरुष व्यक्ती असणे (इ.न.पृ.१०७, इ.बा.पृ.१३०),नमुना अग्रलेख म्हणून तिन्ही लेख पुरुष-लेखकांचे अग्रलेख देणे (इ.बा.पृ.११०), कथालेखन नमुना यामध्ये अपूर्ण कथा पूर्ण करणे यासाठी नायकप्रधान कथांची निवड करणे (इ.न.पृ.१०१, इ.द.पृ.१०९) पुस्तके व संदर्भग्रंथांविषयीच्या एकूण एकोणीस पुस्तकांच्या यादीमध्ये केवळ सात स्त्री-लिखित, तर उर्वरित बारा पुरुष-लिखित पुस्तके समाविष्ट केलेली असणे(इ.न.पृ.११९) यांमधून पुरुषप्राधान्य आढळून येते. एका जाहिरात-लेखनामध्ये प्रसिद्ध, प्रगतिशील शेतकरी म्हणून श्रीमती वत्सलाबाई पानमळे यांचा उल्लेख केलेला आहे. (इ.पा.पृ.६०) हा एकमेव स्त्री-संदर्भ दिसून येतो.

**क) पुरुषप्रधानतेचा संस्कार करणारी भाषा –**

पाठ्यपुस्तकातील चित्रभाषा व शब्दरचना, वाक्यरचना, त्यातील आशय यांमधून पुरुषप्राधान्य सूचित होते. सुरुवातीला चित्रभाषेचा विचार करू. यात काव्य-पाठाचा आशय लिंगभावविरहित असतो; पण विषयानुरूप दिलेल्या चित्रामध्ये मुले/मुली वा स्त्रिया/पुरुष या दोघांनाही समानतेच्या दृष्टीने स्थान देणे अपेक्षित असताना फक्त मुले/पुरुष यांनाच स्थान दिलेले दिसते. उदा. शेतकरी, कामगार, सैनिक पुरुष (इ.दु.पृ.५८), चवदार तळ्याचा सत्याग्रह करणारे पुरुष (इ.चौ.पृ.४६), प्रश्न विचारणारा मुलगा(इ.पा.पृ.६५), पतंग उडवणारे मुलगे (इ.स.पृ.१२), दुःखी मुलाचे चित्र (इ.स.पृ.७०), पोहण्याचा व्यायाम करणारे मुलगे (इ.स.पृ.८९), धावण्याच्या स्पर्धेत बक्षीस मिळवण्यासाठी प्रयत्न करणारे मुलगे (इ.सा.पृ.२), वाहन चालवणारे मुलगे-पुरुष, क्रिकेट खेळणारे मुलगे (इ.सा.पृ.५४), फुटबॉल हातात धरलेला व मातीने माखलेला मुलगा (इ.सा.पृ.५९), स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेले वीर भारतपुत्र पुरुष (इ.न.पृ.१), काळानुसार बदललेले खेळ खेळणारे मुलगे (इ.न.पृ.३४), अभ्यास करणारा, धावणारा मुलगा (इ.न.पृ.८६), मल्लखांबावर कसरत करणारे मुलगे (इ.सा.पृ.९६); या सर्व उदाहरणांमध्ये कविता, पाठ वा एखादा विषय वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना उद्देशून असला तरी चित्रभाषेमधून स्त्री-संदर्भ अनुल्लेखित राहिल्याने पुरुषप्राधान्य सूचित होते.

तसेच वर्गामध्ये मुले व मुली दोघेही उपस्थित असताना स्वाध्याया अंतर्गत केवळ मुलांना गृहीत धरून प्रश्न विचारलेले दिसतात. उदा. मित्रांशी चर्चा करणे, वर्गमित्रांकडून माहिती घेणे व सांगणे, मित्रांशी चर्चा करून एखादा प्रकल्प वा उपक्रम करणे; अशा प्रकारची केवळ मित्रांना उद्देशून शब्दरचना करताना वर्गातील मुली विचाराधीन नसतात. उदा. इ.पा.पृ.४७, इ.सा.पृ. ६६, ६७, इ.स.पृ.७५, इ.द.पृ.८, इ.द.पृ.२२, इ.अ.पृ.३२, इ.बा.पृ.११अशी काही प्रातिनिधिक उदाहरणे देता येतात.

एखाद्या बाबीची उदाहरणे म्हणून दिलेल्या वाक्यांची, वाक्य-आशयाची लिंगभावी घडण प्रत्ययास येते. उदा. आई भाकरी करते, सुरेश समुद्रात पोहू शकतो, आई बाळाला भात भरवते, आई भाजी चिरत आहे, आई उत्तम पदार्थ बनवत असते, दादा सायकल चालवतो, अजय सहलीला जात आहे, शंतनू क्रिकेट खेळत होता, तो नेहमी गाडीत पेट्रोल भरत असे, काल नऊ वाजता सौरभ आकाशाचे निरीक्षण करत होता. (इ.स.पृ.६९, ७२, ७७, ८४); राम मित्राशी बोलतो, रेश्मा पालीला घाबरते, रवीने

पालीला मारले, सुट्टीत तो मित्रांशी खेळतो, ती रोज सकाळी लवकर उठते, तो कसोटी सामन्यात खेळतो, आईने काटकसर केली पण शिल्लक काही उरले नाही. (इ.सा.पृ.७,८,४७,७९); त्याने लाडू व करंज्या खाल्ल्या, आज तू खूप चांगला खेळलास. (इ.द.पृ.५१) गणपतरावांकडे जोपर्यंत प्रतिष्ठेचे पद होते, धनसंपत्ती होती, तोपर्यंत त्यांच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांचा राबता होता, फर्नांडिस खूप बुद्धिमान व प्रसंगावधानी म्हणून प्रख्यात होते. त्यांचा मुलगा फिलीप जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे त्याच्यात हे गुण दिसू लागले. (इ.सा.पृ.६२) या प्रकारच्या प्रातिनिधिक वाक्यांमधून स्त्री-पुरुषांच्या कृतींची/कामांची/भूमिकांची लिंगभावी घडण दिसून येते.

स्त्री-पुरुष समताधिष्ठित भाषेचीही काही उदाहरणे दिसतात; पण ती अपवादात्मकच ठरतात. उदा. चित्रभाषेसंदर्भात शेतीकाम करणाऱ्या पुरुषांबरोबरच स्त्रियांचाही चित्र-संदर्भ देऊन स्त्री-पुरुष समानता जपल्याचा एकमेव अपवाद दिसतो. (इ.चौ.पृ.१९,८०) तसेच काही प्रश्नांमध्ये मुले व मुलींचा संयुक्तपणे उल्लेख दिसतो. इ.चौ.पृ.१८, इ.पा.पृ.६०, इ.सा.पृ.८४, इ.आ.पृ.५,६६,८४, इ.न.पृ.१२ या उदाहरणांमध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी, मित्र-मैत्रीण असे स्पष्ट उल्लेख येतात; परंतु संख्यात्मकदृष्ट्या हा समताधिष्ठित भाषा-वापर पुरुषप्रधान भाषा-वापराच्या तुलनेत अल्प प्रमाणात आहे. परिणामी, मुलांना प्राधान्य देणाऱ्या व मुलींना गौणत्व देणाऱ्या भाषा-वापरातून पुरुषप्रधानतेचा संस्कार रुजत जातो.

**समारोप**

अशा प्रकारे, पहिली ते बारावीपर्यंतच्या पाठ्यपुस्तकांच्या संशोधनातून दिसते की, स्त्री-पुरुष समानता ह्या गाभाघटकामुळे स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार करणारे काही घटक पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेले असले तरी समाजव्यवस्थेच्या अंतर्रचनेत रुजलेले पुरुषसत्ताक-मूल्यव्यूह पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित होऊ नयेत, ह्याची पुरेशी काळजी घेतलेली नाही. त्यामुळे पाठ्यपुस्तकांतील अनेक घटकांमधून कळत-नकळतपणे पुरुषप्रधानतेचा संस्कार दृढ होताना दिसतो, व हे प्रमाण स्त्री-पुरुष समानतेचा संस्कार करणाऱ्या घटकांपेक्षा अधिक आहे, हे अत्यंत उद्विग्न करणारे वास्तव समोर येते. गाभाघटकाने ठरवलेले स्त्री-पुरुष समानता हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भाषिक रचना, तसेच कुठलाही पाठ किंवा कविता हे पाठ्यपुस्तकात समाविष्ट करताना पुरुष प्रथम व स्त्री दुय्यम ह्या लिंगभावी जाणिवांपासून मुक्त असणारे, स्त्रीच्या क्षमतांना वाव देऊन बुद्धिमान, निर्णयक्षम व्यक्ती अशी स्त्री-प्रतिमा चित्रित करणारे, स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व, तिचे माणूसपण अधोरेखित करणारे, काळाचे भान राखत दूरदृष्टी बाळगणारे घटक समाविष्ट करणे व तसे उपलब्ध नसतील तर गाभाघटक डोळ्यासमोर ठेवून त्या पद्धतीने लिहून घेऊन मग त्यांचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे, हे लक्षात येते.

थोडक्यात, शिक्षण हे कोणत्याही बदलाचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. स्त्री-पुरुष समानतेवर आधारित लिंगभावविरहित समाजव्यवस्था अस्तित्वात येण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून पूरक पार्श्वभूमी तयार करायची असेल, तर अभ्यासक्रमात-पाठ्यपुस्तकात स्त्री-पुरुष समानता हा गाभाघटक समन्याय बुद्धीने अंतर्भूत असणे आवश्यक आहे. तरच या शिक्षणप्रक्रियेतून स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये रुजून परिवर्तनशील सामाजिक मानसिकता तयार होईल. मात्र त्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील संबंधित घटकांनी आपापली भूमिका जाणीवपूर्वक व काटेकोर जबाबदारीने निभावणे अत्यंत गरजेचे आहे.

**साधन ग्रंथ-सूची :**

१) मराठी बालभारती-इयत्ता पहिली ते बारावी, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**संदर्भग्रंथ-सूची :**

१) गवस, राजन : मराठीचे आशययुक्त अध्यापन, प्रथमावृत्ती, जुलै, १९९५, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ : गाभाघटक परिचय, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

(प्रस्तुत लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात विद्यावाचस्पत्युत्तर शिष्यवृत्तीधारक (पोस्ट डॉक्टरल फेलो) म्हणून संशोधन करत आहे. सदरचा संशोधन-लेख हा त्यांच्या संशोधन-प्रकल्पांतर्गतच्या काळात लिहिलेला आहे.)

**डॉ. मनीषा खैरे**

शुभम वास्तू, ए-२०३, सर्व्हे नं. १८/२००८,
सुखसागरनगर, कात्रज, पुणे- ४११०४६
चलभाष: ९४०३६४७९७५
email : khaire.manishas@gmail.com

◆◆

# जी.ए. कुलकर्णी यांची कथा : ‘निळासावळा’च्या संदर्भाने

प्रा.नानासाहेब महादेव गव्हाणे

**ख्यातकीर्त कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या ‘निळासावळा’ या कथेविषयी मूलगामी विवेचन करणारा समीक्षा लेख.**

कथा हा वाङ्मय प्रकार मौखिक लोकसाहित्य प्रकाराशी संबंधित आहे. कथेच्या उगमापर्यंत पोहोचले तर असे आढळून येते की, कथा हा स्त्री मुखी आविष्कार आहे. आजच्या सारखी प्रचलित प्रसार व रंजनमाध्यमे ज्या काळी नव्हती त्या काळी लहान मुलांना रमविण्यासाठी स्त्रियांनीच प्रथम काऊ चिऊच्या गोष्टी, पुराणकथा व शूरवीरांच्या कथा ऐकविल्या. या कथा काळाबरोबरच अनेक संस्कार घेत पुढे आल्या. प्राचीन काळात पुराणकथा, मध्ययुगीन काळी उपदेश कथा आणि पेशवोत्तर काळात किंवा त्या कालखंडापासून बोधकथा, ऐतिहासिक कथा आणि कल्पक कथा असा स्वरूप बदल होत गेला. परिणामत: कथा पुढे इंग्रजांच्या प्रभावाखालीही वावरली. मग तिचे स्वरूप वास्तवस्पर्शी झाले व पुढे विसाव्या शतकातील कथांमध्ये, स्वातंत्र्य, गुलामगिरी, विज्ञानकथा, इत्यादी प्रकार हाताळले गेले. परिणामत: कथा पुढे स्वातंत्र्यानंतर अधिकाधिक वास्तव स्पर्शी ठरली. दिवाकर कृष्ण, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, य.गो. जोशी, वि.वि.बोकिल, द.र.कवठेकर, अनंत काणेकर, र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ, इत्यादींनी स्वातंत्र्यपूर्व कालखंड आपल्या कथांनी गाजविला व काव्यामध्ये मर्ढेकरांनी वेगळे प्रयोग करून वेगळ्याच प्रतिमायुगात जसे नेले, तसेच जीएंची कथाही स्वतःला इतरांपेक्षा वेगळं ठेवण्यात यशस्वी झाली. १९४५ ला संपलेल्या दुसऱ्या महायुद्धाचा नरसंहार, माणुसकी व माणूसपण यांचा झालेला ऱ्हास त्या काळच्या बऱ्याच साहित्यात परिणाम साधून गेला. माणसाचे जगणे पराधीन आहे, अस्तित्व क्षुल्लक आहे, तो विवश होऊन आत्मशोध घेतो, असा धागा धरून साहित्य लिहिले जाऊ लागले. खांडेकरांचा उदात्तवाद मागे पडला, फडकेंची योगायोगातून साकारलेली कलावादी कथाही मागे पडली, श्री. म. माटेंचा तटस्थ उपेक्षित अंतरंगशोधही तोकडा पडला आणि पुढच्याच काळात मराठी कथेला वास्तवाचे भक्कम अधिष्ठान मिळाले. त्यात व्यंकटेश माडगूळकर व द. मा. मिरासदार यांनी कथेतून वास्तव चित्रण केले. कथेत आलेला साचेबंदपणा मोकळा झाला. मराठी लघुकथा भाषेच्या, आविष्काराच्या आणि आशयाच्या अंगाने पूर्णतः बदलली. त्या कथेत गंगाधर गाडगीळ, वामन चोरघडे, य. गो. जोशी यांच्या कथा परिणामकारक ठरल्या. तरीही नवी शैली, नव्या अंगाने व नव्या प्रतिमांसह नवकथाकार म्हणून जीएंकडे वेगळ्या दृष्टीनं पाहावे लागते. ओघाने वाचणारा वाचक जी.एं.ची कथा वाचताना स्तंभित होतो, बधीर होतो आणि अभिमन्यूसारखा अडकून बसतो. गुंतता येते पण निघता

येत नाही, असे काही जीएंच्या कथेविषयी सांगता येईल. चाकोरी डावलून, चौकट मोडून, प्रभाव आणि अनुकरण यांना अव्हेरून जीएंची कथा नवे परिमाण आणि नवे परिणाम शोधते. त्या कालखंडात तटस्थ राहून वास्तव उठावदार करण्याकडे बहुतेक कथाकारांचा कल होता. त्याच वेळेस जीएंनी हेच वास्तव प्रतिमांच्या गुंत्यात लपवून अर्थाची सुंदर आणि मुक्त पेरणी केली. जीएंची कथा 'निळासावळा' या कथासंग्रहाच्या अनुषंगाने तपासून पाहूयात.

**जीएंची कथा व शैली :**

जीएंनी साधारणपणे १९५५ पासून कथा लिखाणास प्रारंभ केला. साहित्य प्रकाशनाच्या तारखेवर पाहिले असता ती कथा १९६० च्या आसपासची. मात्र कोणत्याही साहित्यिकाचे साहित्य व त्याची लेखन प्रक्रिया ५-१० वर्षांच्या अगोदरची असते. म्हणजेच निश्चित दुसऱ्या महायुद्धानंतर विवश व बेबस झालेला माणूसच त्यांना दिसला. नियतीच्या व दुर्दैवाच्या एका फटकाऱ्याने त्यांनी रचलेल्या आयुष्याचे वारुळ क्षणात उद्ध्वस्त होते. असाच नायक, असाच माणूस त्यांनी 'निळासावळा'मध्ये उभा केला. पार्थिव व अपार्थिवाची ओढाताण, अस्तित्व आणि नश्वरत्व यातील पराधीनपणा त्यांच्या कथेत अधिक शोधला गेला आहे. त्यांच्या कथेची केवळ शीर्षके जरी पाहिली तरी त्यातील रंग प्रतिमा, गूढता जाणवते. 'निळासावळा', 'पारवा', 'हिरवे रावे', 'रक्तचंदन' व 'काजळ माया' या शीर्षकांमधून जाणिवेच्या पलीकडील अर्थशोध तर घेतला नाही ना, असे वाटते. 'निळासावळा' हा शब्द बालकवींच्या 'औदुंबर'मधील गूढता स्पष्ट करतो. जगणे, जगविणे व वाहणे, यांच्यासह निळा आणि सावळा यातील अथांगपण व अनंतपणही दिसते. या कथासंग्रहातील बहुतेक कथांची कथारूपे अथवा कथा केंद्रे त्यातील व्यक्तीकडे रोखलेली आहेत. तऱ्हेवाईक, भेसूर व भीषण स्वरूपात जसा त्यांचा कथा नायक येतो तसाच संयमाची क्षमता संपून गेल्यावर परिस्थिती विवश झालेला असा हा नायक आढळतो. म्हणून 'निळासावळा' या कथासंग्रहातील कथांचा आढावा घेताना असे म्हणावे वाटते की, मानवी भाव-भावनांचे भोगवटे मनस्वीपणे आणि मनोविश्लेषणात्मक पद्धतीने लेखकाने मांडले आहेत. जीएंचे कथा शिल्प जबरदस्त आहे. त्यांच्या रूपककथांमध्ये आविष्कारापेक्षा नियतीच्या विविध अर्थाच्या रीती दडलेल्या दिसून येतील. त्यांचा ध्यास हा एका संमिश्र यातना संपन्न व्यक्तिमत्त्वाचा ध्यास आहे. त्यात रूढ सामाजिकतेला अवसर मिळत नाही. सामाजिक मूल्ये आणि संदर्भ म्हणजे एक भयावह हास्यास्पद गुंतागुंत आहे, असे त्यांना वाटते. नियतीच्या क्रूर खेळाचा तो केवळ दृश्य भाग आहे. जीएंचे भाव साफल्य या भयावह गुंतवळीत गुरफटलेले आहेत. ही गुंतवळ जीवघेणी ठरते ती तिच्या निरर्थकतेमुळे. या निरर्थकतेची शापित, जहरी छाया अवघ्या मानवी जीवनाला व्यापून उरते व या निरर्थकतेचे सार त्यांनी काही कथांमधून ठळकपणे मांडलेले आहे. त्यांच्या कथांना शापित वात्सल्याचा, अंतःकरण पिळवटून टाकणाऱ्या भावबंधांचा उमाळा लागलेला आहे. हा उमाळा जिवंत स्मृतीरूपाने त्यांच्या कथांमधून एकसारखा झरत असतो. आईच्या, बहिणीच्या, अनाथ वृद्ध नातेवाईकांच्या त्यागातून, वात्सल्यातून, दुःखातून व त्याच्या कोरड्या अश्रद्धेने कोळपलेल्या वृत्तींना संजीवन देत असतो. कधी कधी हे उमाळे अंतःकरण ढवळून टाकण्याइतके अनावर होतात; पण ते कधीच आक्रस्ताळे वाटत नाहीत. या उमाळ्यांना ताज्या, उघड्या जखमेसारखा एक मूक ओलेपणा आहे. या जखमेची दर्शने व स्मृती यांचे अधिष्ठान जीएंच्या कल्पनाविश्वाला लाभलेले आहे. त्यामुळे त्याला असाधारण गंभीर व्याप्ती मिळाली आहे व त्याची सकस भावनेने चिंब झालेली दर्शने जी. ए. आपल्या काही कथांमधून घडवतात.

जीएंची शैली ही विविध भाषांगाचा व वाचांगाचा तोल सांभाळून स्वतःचा असा ताल सहजगत्या साधताना दिसते. हा ताल तिचा अंतर्नाद असतो आणि त्यामुळेही तो काव्याशी जवळीक जोडत असतो. जी.ए. शब्दांचे वाक्यांमधील अपेक्षित जागा अनपेक्षितपणाने बदलून त्याची जातच नव्हे तर अर्थच्छटाही बदलून टाकतात. त्यांची शैली ही कथेची शैली असल्यामुळे कथा निवेदनाला आवश्यक असणारी निवेदनपरता हा तिचा एक विशेष आहे. गोष्ट सांगण्यात या निवेदनपरतेचं बळ खर्ची पडत नाही, तर गोष्ट सांगताना बरंच काही सांगण्याकडे तिचं लक्ष असतं. ते सांगताना एखादे रहस्य, मग ते मानवी मनाविषयी असो अथवा जीवनाविषयी असो, योग्य क्षण येईपर्यंत ते जपणं आणि तो क्षण आल्यावर ते पुरतं 'उलगडणं' हे तिला जमतं. त्यांच्या प्रतिमा इतरांपेक्षा वेगळ्याच आहेत. ऊन, पाऊस, झाडे, आकाश या निसर्ग

प्रतिमा तर आहेतच; पण, माणसाच्या मनातील सूक्ष्म चढ-उतार टिपण्यासाठी गटार, ढुक्करमुंगी, किडे, घाणेरड्या बकाल वस्त्या, चिंध्या, कासव, असेच काही बाही येत राहते. जीएंच्या वाक्यातील काही प्रतिमा अशाच अचानक वाचकांना आश्चर्यचकित करतात. जसे 'चिंध्यांच्या ढिगाखाली लपलेले दुःख,' 'भिजलेल्या मांजराबद्दल सर्वांना सहानुभूती वाटत असते.' 'चंद्रावळ' मध्ये ते म्हणतात, 'पण भिजलेल्या मांजराविषयी वाटावी अशी सहानुभूती वाटते.' एखाद्या बैलाच्या कपाळावर कुलक्षणी भवरा असावा, असे माणसाचे दुर्दैवीपणही त्यांनी वर्णिले आहे. शिवाय आयुष्य म्हणजे 'धुळीत पडलेलं नाणे', 'फाटक्या उशीतून बाहेर पडलेला कापसाचा पुंजका.' असा ते उल्लेख करतात. या प्रतिमा नीट पाहिल्या तर त्यामध्ये माणसाचे नगण्यपण, त्याचे क्षुल्लक व हीन अस्तित्व, कुणालाही आपुलकी न वाटणारे त्याचे जगणे एवढेच आढळते.

जीएंच्या कथातंत्राविषयी असे म्हणता येईल की, जी. ए. सवंग धक्कातंत्र वापरत नाहीत, कथेला नव कथेसारखे नाट्यमय वळणही देत नाहीत, ॲरिस्टॉटलला अभिप्रेत असणारे कथा विकासाचे तंत्रही वापरत नाहीत, तसेच निवेदनाच्या दृष्टीने सोयीस्कर व लोकप्रिय असे फ्लॅशबॅकचेही तंत्र वापरत नाहीत. ते कथेतील मुख्य पात्राला जगाकडे बघणारा तिसरा डोळा मानतात आणि त्या अनुषंगाने माणसांचे अंतर जगभेदक स्वरूपात समोर आणतात. 'हिरवी मखमल गोरा हात' मध्ये सर्वसामान्यांच्या जीवनातील उदात्त स्वप्ने कधीच पूर्ण होऊ शकणार नाहीत, या अर्थाची प्रतिमा त्यामध्ये वारंवार येते. 'कुठेही' मसणांत जा, तिथेही रांग आहेच जर एखादे वेळी लोकलखाली जीव द्यायाची वेळ आली तर तिथेसुद्धा अगदी नंबरप्रमाणे मरावे लागेल. साले हरामखोर आयुष्य! कंगाल!' हे अशा प्रकारे गर्दीत हरवलेले चेहरे जीवनाविषयी असाच विचार करणार कारण, माणूस आणि माणूसपण संपून नीतिशून्य स्वार्थाची ओढाताण चालूच आहे.

अशा जीएंच्या 'निळासावळा' मध्ये एकूण १२ कथा आहेत. सर्वसामान्य माणसांच्या मनातील जीवनाविषयी गढूळ भूमिका या कथांमधून गडद होते. जीएंचा हा मानवी मनाचा शोध व कथेतील माणसांचाही स्वतःच्या अस्तित्वाचा सखोल शोध या कथांमधून घेतलेला दिसतो.

**जीएंच्या कथेतील नायक :**

जीएंच्या कथा या प्रामुख्याने पुरुषप्रधान वाटल्या तरी पुरुषप्रकृती किंवा स्त्री-पुरुष संबंधाशी त्या बांधलेल्या आहेत. जीएंनी जाणीवपूर्वक पुरुषांच्या संवेदनशील अंतःकरणाचा शोध घेतलेला आहे. सर्वसाधारणपणे स्त्रियांविषयी सहानुभूती दाखविली जाते; पण जीए पुरुषांविषयी सहानुभूती दाखवितात. प्रचलितपणे असे म्हटले जाते की, स्त्रियांचे अंतःकरण म्हणजे काचेचे भांडे; पण जीएंच्या कथा असे सांगतात की, या काचेच्या भांड्यातील द्रवपदार्थ म्हणजे पुरुषांचे अंतःकरण. भांडे फुटले तर काचा उचलता येतील; पण द्रव टिपणे अवघड. हे जीएंच्या कथांमध्ये स्त्रियांच्या विचित्र वागण्यामुळे पुरुषांना अनेक दुःखे भोगावी लागतात आणि तो ती सहनही करतो. 'चंद्रावळ'मधील सण्ण्या हा त्याचे उत्तम उदाहरण होय. त्याची तिन्ही रममाण होण्याची ठिकाणे हरवल्यानंतर यांत्रिकपणे स्वतःला दोष देत स्वतःतील न्यूनत्व तो शोधतो. 'राणी' या कथेतील मुलगी जगातून गेली आणि आजोबांचे जीवन उद्ध्वस्त झाले. 'पडदा' या कथेत प्रिन्सिपॉलला हवी असलेली कलासक्त स्त्री मिळत नाही. अशा वेळी त्याची होणारी तडफड दिसून येते. 'अवशेष'मध्ये गोविंदाचार्य पुरुष दुःखाचा कळसच आहेत. 'सांगाडा'मधील नाडगौडा मास्तरांचे कुणीच ऐकत नाही. तसेच 'हिरवी मखमल गोरा हात' या कथेतील दामूला आपण स्वतः नियतीच्या हातातील बाहुले आहोत, असे वाटते. ही कथा चेहरा हरविलेल्या दामूची आहे. नैराश्य, न्यूनत्व, नश्वरपण आणि आपण कोणच नाही, ही भावना त्याला शेवटपर्यंत पछाडून टाकते; पण एक मात्र खरे की, दुसऱ्याला आपल्या दुःखाचे कारण मानूनही कथेतील पुरुष मंडळी कधीच आक्रमक होत नाहीत. उलट आपले दुःख अटळ असूनही दुःखाची झाडे आपणच लावली, असेच म्हणत ती बेबस जिणं जगत राहतात.

**जीएंच्या कथा संग्रहातील नायिका :**

जीएंच्या या कथा संग्रहातील कथेमध्ये सर्व माणसे सर्वसामान्य आहेत. त्यांची नायिका विद्रूप व विकृत अशीच आढळते. पुरुषांचे प्रेम वाट्याला न आलेली स्त्री वारंवार भेटते. अशाच लोकांना जी.ए.कथेत का स्थान देतात? तर अशाच व्यक्ती अस्तित्वाचा शोध घेत असतात. वारंवार नियतीच्या व समाजाच्या दुर्लक्षितपणामुळे ती एकलकोंडी होतात. सर्व चुका

आपल्यातच शोधायला लागतात. प्रस्तुत कथांमधूनही सर्व व्यक्तिरेखा जगण्यातील क्षुल्लकपण शोधून आत्मरत होतात. यातील स्त्री ही स्वतःच्या सुखात स्वार्थ शोधणारी, दुसऱ्यांसाठी त्याग न करणारी एकाकी अशी जीएंना दाखविता आली असती; पण ती त्यांनी स्त्री सुलभ इच्छा आकांक्षेतून दाखविली आहे. आपली जराही उपेक्षा सहन न होऊन प्रिन्सिपॉलशी कधीही जुळवून न घेणारी स्त्री ही 'पडदा' या कथेतून दिसते. 'चंद्रावळ'मधील गौरी तडफडून मरते. सुखाच्या शोधात तिने बाबूला जवळ केले. 'सूड' मधील स्त्री विकल अंतःकरणाने स्वतःलाच दोष देत निघून जाते. या कथेत स्त्री शिक्षिकेने उगविलेला सूड तिने तिच्यावर उगवला की, तेथील अपेक्षाभंग झालेल्या लोकांवर उगवला अथवा आपल्या विद्रुप सर्वसाधारण दिसण्यावर उगवला, हा गुंता तसाच ठेवून कथा वाचकांना गर्दीच्या ठिकाणीही एकांत देते, म्हणजेच विचार करायला भाग पाडते. 'डाग'मधल्या मुलीने स्वतःला दुसऱ्याच्या दुःखाचे कारण करून घेतले. खरे तर जीएंच्या कथेतील स्त्री ही 'बायको' या रूपातच अधिक येते. स्त्री-पुरुष संबंधातील गुंतवळ अधिकच दिसते. भारतीय परंपरेतील स्त्रीचे 'त्यागाची मूर्ती' हे उदात्तीकरण जी.ए. स्वीकारत नाहीत. उलट उदात्ततेच्या नावाखाली तिची होणारी घुसमट जी.ए. कथेतून सोडवितात. परंपरेने जपलेला नीतिमत्तेचा खोटा मुलामा कथेच्या माध्यमातून खोडून आतील भुस्सा व पोकळपणा जी.ए.आपल्या कथेतून मांडतात. एकूणच जीएंच्या कथा स्त्री-पुरुषांच्या भावनांचा अप्रकट तळ शोधतात.

**जीएंच्या कथांचे वेगळेपण :**

थोडक्यात जीएंच्या कथेचे वेगळेपण शोधले तर असे आढळते की, जीएंची पात्रे अपराध गंडांनी गांजलेली आहेत. माणूस सामर्थ्यवान असला तरी तो पराधीन आहे. तसेच त्याच्या मनाच्या तळात चाललेली घुसमट जी.ए. त्या गुंतागुंतीसह मांडतात. त्यांच्यावर कुणाचाही प्रभाव नसला तरी ते गडकरी भक्त होते. बालकवींविषयी त्यांना गाढ प्रेम होते. शिवाय वॉल्टर पॅलर आणि ऑस्कर वाईल्ड या लेखकांच्या शैलीचा अल्पसा अनुनय त्यांनी केला होता. शिवाय त्यांच्या कानडी बोलीभाषेच्या व ग्रामीण विनोदाचा मिश्रित आविष्कार त्यांच्या कथेत सुंदर वाटतो. त्यांच्या कथेतून अतिसामान्यांचे आयुष्य उलगडत - उलगडत त्यांच्याही जीवनातला वैश्विक अर्थ जी.ए.प्रथमच मांडताना दिसतात. तो इतर कुठल्याच कथाकारांमध्ये दिसत नाही.

एकूणच जीएंची कथा माणसांच्या जगण्यातील मरण शोधते. ही माणसे खरंच जगतात, की मरत मरत जगतात? हा प्रश्न घेऊन वाचकसुद्धा अपेक्षित उत्तर न सापडल्याने मतिगुंग होऊन बसतो नव्हे तर तोही अस्तित्वाचे प्रश्न घेऊन एकांत शोधू लागतो. मुळात जीएंची शैली ही त्र्यं.वि.सरदेशमुखांच्या जवळ-जवळ समांतर वाहते. दोघेही एकांत प्रिय. आपल्याच लिखाणावर प्रतिक्रिया न देणारे. एकांत प्रिय व्यक्ती एक तर आत्मशोध घेत घेत लिहितो अथवा कमी अवकाशात जास्त आशय मांडून मनोविश्लेषण करतो. जीएंची वर्णनशैली बेढब आकृतीतून अर्थ शोधणारी आहे, त्या आकृतीतून दिसेल ते किंवा त्याच्यापेक्षाही काहीतरी वेगळं त्यांना दिसत असते. त्यांच्या पात्रांची नावंही सर्वसामान्य व अर्थहीन असतात. जाणीवपूर्वक वेगळे राहण्यापेक्षा सहज वेगळी ठरणारी त्यांची नवकथा मराठी नवकथेतील एक मैलाचा दगडच आहे, असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. त्यामुळे जीएंच्या कथाकृतींना अनेक पैलू पाडून मोठ्या साक्षेपाने घडविलेले, घासून कोरलेले आणि स्वच्छ केलेले आहे, यात शंकाच नाही. त्यामुळे ती लोलकाच्या अनेक तुकड्यांनी जमविलेल्या प्रचंड झुंबरासारखी दिसते.

मग एस.डी. इनामदार त्यांना 'भ्रामक प्रतिमांचा आरसे महाल' म्हणोत, रा. ग. जाधव त्यांना 'अज्ञेयतेशी झगडणारा सृजन' म्हणोत किंवा माधव कृष्ण त्यांना 'एकांताचा शोधक' म्हणोत, मला तर जी.ए. म्हणजे जीवनातील, अनाकलनीय भोवऱ्यातील, संभ्रमी वादळातील आणि चपखल विजेतील संथ अर्थ घेणारा जीवन शोधक वाटतात.

कुलकर्णी जी. ए. । निळासावळा,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

**प्रा. नानासाहेब महादेव गव्हाणे**
सहायक प्राध्यापक, पदव्युत्तर मराठी विभाग,
वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर (स्वायत्त)
भ्रमणभाष : ९९२२५४०२७९
email : gavhanenanasahebcritics@gmail.com

# सातपाटील कुलवृत्तांत: भारतीय समाजजीवनाचा मूळ चेहरा

डॉ.गजानन विठ्ठलराव भोसले

**ज्येष्ठ कादंबरीकार प्रा. रंगनाथ पठारे यांच्या 'सातपाटील कुलवृत्तांत' या कादंबरीवरील समीक्षा लेख.**

'सातपाटील कुलवृत्तांत' ही रंगनाथ पठारे यांची मराठीतील अलीकडची महत्त्वाची कादंबरी आहे. त्यांच्या या आधीच्या सर्वच कादंबऱ्या या महत्त्वाच्या अशाच आहेत . ताम्रपट नंतर मोठी कादंबरी त्यांनी लिहिली ती 'सातपाटील कुलवृत्तांत' हीच होय. प्रखर चिंतनातून त्यांनी सतत आपली एक नवी ओळख मराठी साहित्याला लेखक म्हणून दिली आहे. भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे आणि राजन गवस अशा तीनही लेखकांनी आपापल्या प्रदेशातील चित्रण आपल्या कादंबऱ्यांच्या माध्यमातून सतत मांडले आहे. राजन गवस आणि रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यांतून ते अधिक ठळकपणे आपल्याला दिसते.

रंगनाथ पठारे यांच्या अनुक्रमे दिवे गेलेले दिवस (१९८२), रथ (१९८४), चक्रव्यूह (१९८९), हारण (१९९०), टोकदार सावलीचे वर्तमान (१९९१), ताम्रपट (१९९४), दुःखाचे श्वापद (१९९५), नामुष्कीचे स्वगत (१९९९), त्रिधा (२००४), कुंठेचा लोलक (२००६) , भर चौकातील अरण्यरुदन (२००८), एका आरंभाचे प्रास्ताविक (२०१३), चोषक फलोद्यान (२०१४) या त्यांच्या प्रदीर्घ लेखनातून ते सतत मानवी मनाच्या चिंतनशील अशा नवनव्या अवस्थांचा शोध घेत येतात. महत्त्वाची गोष्ट अशी की, त्यांच्या वरील सर्व कादंबरीलेखनाला एक त्यांची त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची लेखक म्हणूनची मोठी ओळख आहे. ती सतत त्यांच्या या लेखनातून आपल्याला एक वाचक म्हणून जाणवत राहते. तिच्यात येणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचे कंगोरे आपणाला एक वाचक म्हणून सतत एका वेगळ्या अनुभूतीची जाणीव करून देतात. मराठीतील महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारेंच्या लेखनाकडे गांभीर्याने पाहावे लागते. एका विशिष्ट कालखंडाचा विचार करताना आपल्याला वरील लेखकांच्या लेखनाकडे पाहावे लागेल. वरील ज्या कादंबऱ्यांचा आपण येथे उल्लेख केला आहे, त्या कादंबऱ्यांपेक्षा एका वेगळ्या आशय-विषयाची मांडणी त्यांनी त्यांच्या 'सातपाटील कुलवृत्तांत' या कादंबरीत केली आहे .

ते स्वतः या कादंबरीबद्दल व तिच्या लेखकाबद्दल सांगताना म्हणतात की , 'या कादंबरीचा गर्भित लेखक हा मराठीतला आजचा एक महत्त्वाचा लेखक आहे. कोणी कोणत्या जातीत जन्म घ्यावा असे आपल्या हाती काहीच असत नाही अन् जाती तर आहेतच. हा लेखक मराठी जातीत जन्मलेला आहे. आपण कोण, कुठले, आपले पूर्वज कुठून आले, याचे कुतूहल सगळ्यांना असतेच, तसे

या गर्भित लेखकालाही आहे. तसा शोध काळात तो सातशे वर्षे मागे जातो. अशा अनेक टप्प्यांवर शोध घेताना तो जाती, धर्म, मानवी नाती आणि मानवी समूहांचे एकमेकांत मिसळणे अनुभवतो. बौद्धिक पातळीवर तो हजारो वर्षे मागे जातो. तो आपले मराठा असणे, याचा व्यापक अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. ते पुन्हा त्याच्या विश्वभानाच्या उजेडात तपासतो आणि मांडतो. आपल्या कुळाचा शोध घेण्याच्या प्रयत्नाने सुरू झालेली ही गोष्ट एका माणसाची, त्याच्या कुळाची न उरता एकूण मानवी आत्मभानाच्या प्रकाशाची गोष्ट होऊन जाते. हे सारे एका विस्तीर्ण पटलावर एका बृहद् कहाणीच्या रूपात प्रकट होते. ते प्रकटन म्हणजे ही कादंबरी, सातपाटील कुलवृत्तांत या कादंबरीत आलेला सातशे वर्षांचा काळ आपल्याला कादंबरीच्या शेवटापर्यंत कादंबरीच्या कालखंडाची एका वेगळ्या पातळीवरील संगती लावण्यासाठी वाचक म्हणूनचे आपले असणे नव्याने प्रस्थापित करतो.

एवढ्या मोठ्या कालखंडाच्या पातळीवर मराठीत लेखन करणारे लेखक रंगनाथ पठारे हे एकमेव असावेत कारण, सामाजिक पातळीवरील सर्वच अनुषंगाने ही कादंबरी ज्या गोष्टी माणूस असण्याच्या किंवा त्याच्या स्वतःच्या शोधाची गोष्ट म्हणून आपल्या पुढे उभी करत जाते, ती बाब मराठी साहित्यात प्रथमच घडून आलेली आपल्याला दिसून येते. वाचक म्हणूनच्या एका वेगळ्या अभिप्रायाकडे ही कादंबरी ऐतिहासिक दृष्टीने आपल्याला घेऊन जाते. कादंबरीचा गर्भित लेखक जरी मराठा कुटुंबात जन्माला आला असला, तरीही त्या लेखकाच्या कुळाचा इतिहास लेखक ज्या वेळी मांडू लागतो, त्या वेळी आपल्या व त्या गर्भित लेखकाच्याही पुढे एक नवी सामाजिक साखळीची रचनाच उभी राहू लागते. माणूस म्हणूनच्या सर्व सामाजिक ओळखीच्याही पुढची आहे. या सर्व कुळकथेची एकूण गोष्ट आपण अशी पाहिली, तर खोट्या प्रतिष्ठेचे सर्व मानदंड इथे गळून पडतात, आणि उरतो फक्त माणूस असण्याचा प्रवास, अशा अनेक गुंत्यातून कादंबरी पुढे जाताना दिसते.

इथे केवळ पृष्ठसंख्येच्या दृष्टिकोनातून ही कादंबरी 'महाकादंबरी' ठरत नाही. तर या कादंबरीच्या आशयविषयाचा आपण विचार केला तर आपल्याला त्याचा प्रत्यय येतो. भालचंद्र नेमाडे यांच्या 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीचा पहिलाच भाग आलेला आहे. त्या पहिल्या भागाच्या मानाने 'सातपाटील कुलवृत्तांत' या कादंबरीची पृष्ठसंख्या अधिक आहे. नेमाडेंच्या हिंदूला काही ठिकाणी 'महाकथन' असेही म्हटले गेले आहे; परंतु ते हिंदूच्या सांस्कृतिक आशयाला साजेसे असेच आहे. हिंदू कादंबरीचा सगळा जो पट आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो, तो सांस्कृतिक उत्खननाच्याच अंगाने जातो; परंतु 'सातपाटील कुलवृत्तांत' या कादंबरीचा आशयविषय हा सामाजिक आशयाच्या अंगाने उभा राहतो आणि तो हिंदूच्या सांस्कृतिक आशयाएवढाच महत्त्वाचा आहे. किंबहुना सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला तर तो हिंदू कादंबरीच्या सांस्कृतिक आशयापेक्षा अधिक सरस असाच ठरणारा आहे; परंतु असे म्हणताना आपण 'सांस्कृतिक व सामाजिक' अशी गल्लत करता कामा नये, कारण, शेवटी दोन्ही मराठीतील श्रेष्ठ अशाच कादंबऱ्या आहेत. त्यांचा विस्तृत पट हा मराठी साहित्याच्या दृष्टीने ऐतिहासिक असाच आहे. दोन्ही लेखकांच्या महान दृष्टिकोनाची आपल्याला प्रचिती देणारा असाच आहे

या कादंबरीचा नायक हा एकविसाव्या शतकातील आधुनिक जाणिवांचा, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला आहे. तो देव वगैरे मानण्याच्या भानगडीत पडणारा नाही. एक कौटुंबिक कुळाचार म्हणून तो काही गोष्टी करत आलेला आहे. त्याच्या एकूण कुळाचा वृत्तांत तो आपल्यापुढे कथन करतो. या संपूर्ण कुळाचा अगदी बाराव्या शतकापासूनचा जो कुलवृत्तांत तो या कादंबरीत कथन करतो. ते म्हणजेच ही 'सातपाटील कुलवृत्तांत' ही कादंबरी होय.

कादंबरीच्या सुरुवातीला देवगिरीच्या यादवांपासूनच्या म्हणजेच अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणापासून सुरू होते. इथपासून ते आजच्या जागतिकीकरणाच्या युगापर्यंतचा या सातपाटील कुलवृत्तांतचा प्रवास आपल्या समोर उभा राहतो. यामध्ये अगदी आदिलशाही, निजामशाही, शिवकाळ, पेशवाई, इंग्रज, स्वातंत्र्यलढ्याचा काळ ते आज, असा एकूण प्रवास लेखकाने या कादंबरीत विशद केला आहे. यामध्ये या कुळाची सुरुवात श्रीपती, साहेबराव, दसरथ, जानराव, पिराजी, शंभुराव आणि देवनाथ अशी येते. एकूण कथनशैलीचा आपण या वरील पात्रांच्या अनुषंगाने विचार

केला, तर एकातून दुसरे अपत्य जन्माला यावे असाच तो भाग आहे, आणि येथे केवळ ते कथन म्हणून आपल्यापुढे येत नाही. ते त्या काळाचे अपत्य स्थलकाल परिस्थितीनुसार कसे उभे राहते, त्या पात्रांची जडणघडण आणि त्या– त्या काळानुसार त्या पात्रांनी केलेले संघर्ष, त्यांच्या आयुष्यातील यश अपयश, त्यांचा दक्षिणोत्तर असा त्या काळातील भारतीय उपखंडाच्या अंगाने झालेला सर्व प्रवास आपल्याला लेखक घडवून आणतो. या प्रत्येक काळातले बारकावे लेखकाने अत्यंत मेहनतीने टिपले आहेत, त्या– त्या काळाचा अन्वयार्थ म्हणून या पात्रांचे एकूण वागणे, त्यांना साथसंगत म्हणून लाभलेल्या त्यांच्या स्त्रिया या काळाचा मुख्य आशय म्हणून पात्रांतून आपल्यापुढे येत राहतात. कादंबरीचे शीर्षक जरी 'सातपाटील ' असे असले, तरीही या सर्वांच्या आयुष्याला जे त्या – त्या काळानुसारचे महत्त्व प्राप्त होते. ते केवळ त्यांच्या स्त्रियांमुळे मग त्या आई, बहीण, प्रेयसी, आजी असे कुणीही आहेच. या सर्व नायकांचे जीवनपट त्यांच्या त्यांनी त्या – त्या काळात अगदी आदिलशाही, निजामशाही ते ब्रिटिशकाळापर्यंत महायुद्धात त्यांनी केलेल्या लढाया असतील. त्यांचा अंतर्भाव यामध्ये होतो.

या कादंबरीमध्ये जे काही नायक आलेले आहेत, त्या सर्वांचा एक स्वतंत्र जीवनपट आलेला आहे; पण तो केवळ स्वतंत्र अशाच प्रकारचा नाही, तर तो सलगपणे एकमेकांशी पिढ्यानपिढ्या समांतर असा आजपर्यंतच्या म्हणजेच एकविसाव्या शतकापर्यंत तो चालत आलेला आहे. त्याचा सलग असा इतिहास हा त्या –त्या त्यांच्या कथनातून उलगडत जातो. आपल्यापुढे केवळ कथानक म्हणून तो उभा राहत नाही. त्या– त्या काळानुसारचे हे सगळे ऐतिहासिक संदर्भ अगदी मध्ययुगीन, शिवकालीन, पेशवेकालीन, इंग्रजी काळातील, ते स्वातंत्र्यानंतरचा आधुनिक काळ या कादंबरीतून आपल्या पुढे उभा राहतो. त्यातही सातपाटलांच्या काळातील कथानके, उपकथानके आपल्यापुढे मांडताना लेखक अगदी अचूक त्या– त्या कालखंडातील संगती आपल्यापुढे उभी करण्यात यशस्वी ठरतो. हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. याशिवाय या कादंबरीत सांस्कृतिक आणि सामाजिक अशा दोन्ही अंगांची मांडणी लेखकाने उभी केली आहे. विविध प्रकारच्या कथानकांमधील मिथके, देवदेवतांच्या आख्यायिका, त्यांच्याशी निगडित मानवी भावभावना यांचा एक सुंदर मिलाफ रंगनाथ पठारे यांनी आपल्या सातपाटीलमधून जुळवून आणला आहे. प्रथम श्रीपतीपासून ते देवनाथपर्यंत हा सगळा धागा जुळवत तब्बल आठशे पानांपर्यंत वाचक कसा येतो, किंवा लेखक त्याला कसे आणतो. हा सगळा लेखकाचा कसबीपणा आपल्याला सातपाटीलमधून पाहायला मिळतो. या सर्वांतून लेखकाचे मोठेपण आणि अभ्यास आपल्याला जाणवल्याशिवाय राहत नाही.

'दिवे गेलेले दिवस'(१९८२) पासून लेखक म्हणून रंगनाथ पठारेच्या सगळ्या कादंबऱ्यांमध्ये त्यांनी अनेक प्रयोग केले आहेत; परंतु सातपाटील कुलवृत्तांत मधील हा विस्तृत पट अनेकार्थाने वेगळा असाच आहे कारण हा पट केवळ एका कालखंडापुरता मर्यादित नाही. तो सातशे वर्षांचा एक सलग कालखंड आपल्यापुढे उभा करतो. या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे की, या कादंबरीत त्या– त्या कालखंडातील येणारे सूक्ष्म असे तपशील. आपल्याला कुठेही असे वाटत नाही की, आपण वाचक म्हणून त्या कालखंडाची अभिव्यक्ती अनुभवू शकत नाही, तर पात्रांनुसारी जेव्हा कालखंड उलगडत जातात, तेव्हा आपल्याला त्या कालखंडातील तपशिलांची जाणीव होऊ लागते, आणि लेखकाने या सर्व तपशिलांच्या मागे केलेला अभ्यास आपल्या नजरेतून सुटत नाही. कादंबरीत येणाऱ्या या तपशिलांच्या, संदर्भाच्या अनुषंगाने येणारे अन्वयार्थ आपल्याला वाचक म्हणून अधिक संपृक्त करतात.

या कादंबरीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कादंबरीची भाषा होय. या कादंबरीची भाषा आपल्याला कधीही फार मोठी वाक्यरचना असलेली जाणवत नाही. ती अत्यंत सुटसुटीत व सोपी वाटते. पठारेंच्या इतर कादंबऱ्यांची भाषा आपण पाहिली तर आपल्या लक्षात येईल, की काही वेळा ती किती कठीण आणि दीर्घ वाक्यरचना असलेली अशी आहे. त्यांची भर चौकातील अरण्यरुदन किंवा नामुष्कीचे स्वगत अशी कोणतीही कादंबरी घ्या. त्यातील भाषा सामान्य वाचकाला अधिक क्लिष्ट वाटेल. किंवा थोड्याफार फरकाने उत्तर आधुनिक अंगाने लेखक आपली भाषा तिथे विकसित करण्याचा प्रयत्न दिसतो; परंतु 'सातपाटील कुलवृत्तांत' मधील भाषा ही सर्वसामान्य वाचकाची भाषा असल्यासारखे एक वाचक म्हणून आपले मत तयार होत

जाते, आणि सोप्या भाषेत लिहिणे ही एक अवघड गोष्ट आहे, असेही म्हटले जाते. लेखकाने हे सर्व एका सोप्या आणि सुटसुटीत भाषेत लिहिणे हे वाचकाला बांधून ठेवते. ते त्याला गोंधळात टाकत नाही किंबहुना त्याने वाचक कंटाळतही नाही. लेखक आपल्या विविध साहित्याच्या माध्यमातून दीर्घकाळ लेखन करीत असल्यामुळे त्याची भाषा ही सहज आजची नाही. त्यामागे त्याचे एक विशिष्ट प्रकारचे श्रमही आहेत. त्यामुळे आपण ज्या वेळी सातपाटील ही कादंबरी वाचायला घेतो, त्या वेळी त्यात आपल्याला कुठेही भाषिक अर्थाच्या चुका सापडत नाहीत. काळ ज्या – ज्या क्रमानुसार कादंबरीत उभा राहतो. त्या– त्या क्रमाने लेखकाची भाषाही त्या– त्या प्रवाहात सामील होत जाते. मग तो रामदेवरायाचा महानुभाव पंथाचा काळ असो किंवा त्यानंतरचा कुठलाही काळ असो. त्या– त्या काळाच्या प्रवाहाच्या नुसार ती भाषा प्रवाहित होत राहते. त्यात बोलीभाषेतील अनेक शब्दांचाही अंतर्भाव होत राहतो. संगमनेरी किंवा पठारी भागातील बोलीभाषेतील काही शब्द हटकून या कादंबरीत आल्यासारखे वाटतात; परंतु ते अगदी प्रसंगाला अनुरूप असेच भासतात. किंवा त्या काळाचा प्रतिनिधी म्हणून ते बोलीभाषेचे प्रयोजन आपल्याला दिसून येते. या सर्व प्रकारच्या त्या– त्या कालखंडातील परिस्थितीला अनुरूप अशा शब्द सौंदर्यामुळे कादंबरीला एक वेगळेच परिमाण लाभते. वाचकाला लेखक एका अर्थाने वेगळेच भाषिक सौंदर्य बहाल करतो.

आपल्या एकूण पूर्वजांच्या पावलांचा माग घेत लेखक आपल्यापुढे येतो. तो माग अफगाणिस्तान ते इंग्लंडपर्यंत येतो. मग या कुळाचा माग घेताना लेखक वंश, जात, लिंग, प्रदेश, धर्म अशा सर्वांच्या शुद्धतेच्या निकषांना डावलून आपल्यापुढे प्रकट करतो. इथे नमूद करण्याची महत्त्वाची गोष्ट म्हणजे वरील ओळीत आपण उल्लेख केलेल्या अस्मितादर्शक किंवा चारित्र्याची संकल्पना सतत विशद करणाऱ्या शब्दांकडे आपण एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो. यामध्ये येणारी सगळी पात्रे ही अनेक धर्मांची, लिंगांची, प्रदेशांतील, जातीजातीतील, पोटजातींतील अशीच आहेत. ती सध्याच्या लेखकाच्या कुणबी – मराठा अशा जातीची ओळख जरी देत असतील तरी त्याचा कूळ इतिहास त्याला शोधताना ती तशी सापडत नाहीत. ती भारतीय उपखंडात आढळणाऱ्या सर्वच समाजव्यवस्थेचं एक प्रतिबिंब म्हणून आपल्या पुढ्यात उभी राहते. इथे केवळ कुणबी – मराठा जातीचे कादंबरीत प्रतिनिधित्व येत नाही, तर या उपखंडाच्या एकूण असलेल्या सांस्कृतिक आणि पर्यायाने समाजव्यवस्थेचं रूप आपल्या समोर उभं राहतं; परंतु प्रामुख्याने यात महाराष्ट्रीय पातळीवर विचार करायचा झाल्यास इथे कुणबी – मराठा, मुस्लिम, ब्राह्मण आणि पूर्वाश्रमीचे अस्पृश्य या तिन्ही जातिधर्मांचे चित्रण लेखक या कादंबरीत प्रामुख्याने आपल्यासमोर उभे करतो.

या कादंबरीचा वृत्तांत अर्थात कादंबरीचे नावच कुलवृत्तांत असे असल्याने त्यात येणाऱ्या आजतागायतच्या सर्वच पिढ्या या आपल्यापुढे अत्यंत सामर्थ्यशीलपणे लेखक उलगडत जातो. इथे वृत्तांत जरी असला, तरी कादंबरीच्या आशयाचा विचार करता तो केवळ वृत्तांत न राहता आशयाच्या दृष्टिकोनातून आपण पाहत पाहत या कादंबरीकडे एका विस्तृत अशा मानववंश शास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहत जातो. भारतात ज्या जाती वा धार्मिक किंवा वांशिक अस्मितांचा सातत्याने पुकारा केला जातो. त्या तितक्या शुद्ध आहेत का ? याचा विचार कादंबरीत लेखक आपल्याला करायला भाग पाडतो. अमुक एक जात उच्च आणि अमुक एक धर्म त्याची मूल्ये ही उच्च, असा काहीसा हेका घेणाऱ्या लोकांसाठी ‘सातपाटील कुलवृत्तांत ’ ने एक वेगळीच चर्चा उभी केली आहे. कोणता वंश शुद्ध, कोणती जात शुद्ध अशा कुठल्याही विभाजनाला या कादंबरीत थारा मिळत नाही. कादंबरीत महाराष्ट्रातील सामाजिक पर्यावरणाचा विचार उभा राहत असेल, तर तो केवळ एका जातीच्या अंगाने उभा राहत नाही. तो मराठी समाज म्हणून बरेचदा आपल्या पुढे येतो. जागतिकीकरणाच्या व्यवस्थेतून खेड्यात झालेले बदल खूप सूक्ष्मपणे लेखक टिपताना दिसतो. यातून लेखकाच्या समकालीन वर्तमानाच्या संदर्भात उद्‌भवणाऱ्या प्रश्नाकडे कादंबरी हस्तक्षेप करताना दिसते.

जातिअस्मितेच्या वा प्रतिष्ठेच्या ज्या काही प्रतिमा सातत्याने आपल्यापुढे दैनंदिन जीवनात उभ्या केल्या जातात, त्यामागील भावना व राजकारण हे वेगळे असते. या कादंबरीचा कादंबरीतील जो लेखक आहे, तो स्वतः एका लढवय्या पण श्रमसंस्कृतीच्या एका संस्कारातून ज्या

पिढ्या घडल्या आहेत, त्यांतून तो त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या समोर येतो. जातींना जे सहजपणे सरंजामीपण चिकटवलं गेलं, ते इथं उभं राहत नाही. जातींना घेऊन गाव वसवण्याच्या ज्या काही प्रक्रिया कादंबरीत पार पाडल्या जातात, त्यात जातीचं असलेलं स्थान जरी काही काळ आपल्याला दिसत असलं तरीही बदलत्या काळानुसारचे त्याचे जे सांस्कृतिक अंग आपल्याला लेखक दाखवतो. ते कष्टकरी वा श्रमसंस्कृतीच्या अंगानेच आपल्याला पाहावे लागते. आपल्या कुळाचा मूळ पुरुष हा एक पठाण किंवा मुसलमान होता. हे सांगायला लेखक कचरत नाही. आपले आदिबंध नेमके काय आहेत, ते कसे आहेत? हे अगदी सरळ सरळ लेखक आपल्याला सांगतो. ज्या रामदेवराय यादवाच्या कालखंडापासून हे सगळं सुरू होतं, ते सर्वत्र एका वेगळ्या मांडणीचा परीघ आपल्यापुढे उभा केला जातो.

आपण इथे कादंबरीची सुरुवात जरी पाहिली तरी आपल्या लक्षात येते की, पठारे घराण्याचा मूळपुरुष श्रीपती हा मेंढपाळ आहे. एडके देशमुख, देशमुखीन ब्राह्मणकन्या, साहेबरावची अफगाण पत्नी आरेनाबाई, दसरतची सुटका करणारी अफिया, पिराजीची उल्फी, हिमतीनं उभी राहिलेली देऊबाई अशी अनेकार्थाने बऱ्याच अनपेक्षित धक्क्यांच्या आधारे ही कादंबरी भारतीय उपखंडातील समाजव्यवस्थेचं चित्र आपल्यापुढे उभे करत जाते. अगदी वांबोरी गावापासून गावातल्या मित्रांचा हा सातपाटील म्हणून ओळख मिळालेला प्रवास. श्रीपती, साहेबराव, दसरत, जानराव, रखमाजी , पिराजी, शंभूराव, देवनाथ, अशा सगळ्या एकूण नायकांचा आणि त्यांच्या कुटुंबकथेचा प्रवास आपण पाहिला तरी यातील प्रत्येक व्यक्ती ही त्या-त्या काळाच्या अनुषंगाने महत्त्वाची आहे. डोंगरकिन्ही गावाच्या श्रीपतीच्या मेंढीच्या दुधापासून हा सगळा सातपाटलांचा प्रवास सुरू होतो. रामदेवराव जाधवांच्या उदगीर गादीचा प्रमुख बिंबदेव, त्याच्या पदरी सरदार विदुमसेन यांचा मानकरी सोनाजीराव एडके. एडकेंचा मुलगा केशीराज एडके. हे जातीने ब्राह्मण पैठणमधील रामदेवराव जाधवांचा थोरला मुलगा शंकरदेव याच्या पदरी मुद्दाम असलेला कारण तो तृतीयपंथी आहे. हे वडील आणि त्याची बायको रोहिणी यांना सोडून कुणालाही माहीत नाही. रोहिणीचे विद्रुमसेनाचा भाऊ सहस्रसेनावर प्रेम. तिला लग्नाआधीच दिवस गेलेले. यातच सहस्त्रसेन कोकणावर स्वारीवर जातो. तो परत येणार नाही असे तिला वाटते. यातच तिला एडकेचा लग्नाचा प्रस्ताव येतो. ती तिची अडचण एडकेला सांगते. एडके त्याची अडचण तिला सांगतो. पुढे ते पैठणला स्थलांतर करतात, मुलगा होतो; परंतु तब्येत सुधारत नाही म्हणून मेंढीच्या दुधाच्या शोधात ते डोंगरकिन्हीला येतात. तिथे श्रीपती आणि त्याच्या मेंढीची भेट होते. श्रीपतीचं शारीरिक बळ आणि प्रामाणिकपणा पाहून एडके त्याला द्वारपाल म्हणून नेमतो, पुढे सहस्रसेन पैठणमध्ये येतो. द्वारपाल असलेल्या श्रीपतीची आणि त्याची शारीरिक झटापट होते. सहस्त्रसेन मरतो, याच दरम्यान एडके एका किन्नरासोबत निघून जातो. पुढे रोहिणी श्रीपतीच्या कुटुंबासह देशमुखीचे गाव वांबोरी येथे स्थलांतरित होते. पुढे रोहिणी श्रीपतीला आपण दोघे दूर निघून जाण्याचा प्रस्ताव ठेवते; परंतु तो अमान्य होतो, हा श्रीपती आणि रोहिणी यांच्या नात्यातील भाग किंवा सातपाटील कुलवृत्तांतमधील कुळाच्या मुळापासूनची ही सुरुवात सातपाटील कुलवृत्तांतमध्ये अधोरेखित केली आहे.

पुढे सातपाटीलच्या दुसऱ्या भागात वांबोरी हे गाव येते. इथे तिडके पाटलाची गीता नावाची मुलगी पठाण लोक पळवतात. याचा बदला म्हणून गावातले सात तरुण एकत्र येतात. ते पठाणाला मारतात, यात सायबू आपला पराक्रम दाखवतो; परंतु या सातांमधील एकजण फुटतो. सगळे पकडले जातात. दौलतखान सायबूला स्वतःकडे ठेवून घेतो, सात जणांनी पराक्रम गाजवला म्हणून गावाची पाटीलकी ही सात जणांमध्ये विभागली जाते. सातपाटील असणाऱ्या या गावाचा इथे उगम होतो, तिथे सायबूला गीता भेटते. सायबूच्या हातून मारला गेलेला बहरामखान पठाण स्वप्नात येऊन त्याच्या बायकोशी सायबूने लग्न करावे असे म्हणतो. त्याची बायको आर्यानाचा त्याला हाच आग्रह असतो. त्यानंतर ते पुण्याजवळील खराडी येथे जाऊन गाव वसवतात आणि साहेबराव सातपाटील व एक पठाण बाई यांचा संसार सुरू होतो. पुढे तिसऱ्या भागात दसरत पानिपतावर लढाईला गेलेला असतो. तो मराठे हरल्यानंतर अफगाणिस्तानात जातो. झोरावर बनतो, तिथे त्याला आफिया भेटते. तो हुबेहूब तिच्या पतीसारखा दिसतो. ते नंतर साताऱ्याला करंजे गावात येतात. हा तिसरा भाग होय. पुढे जानराव खंडोजी सातपाटील, त्यानंतर

रखमाजी आणि पिराजी, त्यानंतर शंभूराव आणि शेवटी देवनाथ. असा सगळा सातपाटीलचा हा प्रवास लेखक आपल्यापुढे उभा करतो.

यात सातपाटलांच्या रूपाने जरी आपल्याला ही कादंबरी पुरुषप्रधान वाटत असली, तरीही ती तशी नाही. यातील स्त्री व्यक्तिरेखांचा प्रवास हा रोहिणीपासून सरस्वती, यमी, चंद्रसेना, आर्याना, गीता, तुळसाबाई, आफिया, काळूबाई, भीमाबाई, देऊबाई, तेजबाई, समुद्राबाई, उल्फी, महक, रेऊबाई, सरूबाई या अशा असंख्य व्यक्तिरेखांच्या अगदी सशक्तपणे उभे राहण्यातून आपल्याला सातपाटीलचे महत्त्व लक्षात येते. या कादंबरीत येणारी स्त्री पात्रेच या कादंबरीतील सातपाटलांच्या कुळकथेला निर्णायक बनवतात हे ही आपण येथे लक्षात घ्यायला हवे आहे.

आपल्याला सातपाटीलमध्ये सर्व भागांची शीर्षके ही पुरुषांची दिसतात; परंतु त्यांना पुढे नेणाऱ्या या सर्व स्त्रियाच आहेत. अगदी एडकेची बायको आणि श्रीपती यांच्यातील संबंध असोत अथवा साहेबरावाचा सर्वच कायापालट घडवून आणणारी आर्याना असो. मराठी मुलखात रुजलेली आफिया किंवा अफूबाई असो. आयुष्याबद्दल कुठलीच तक्रार नसलेली काळीबाई असो किंवा आफिया व काळीबाई या दोन सवतींमधील संबंध असो. जातीनं कोल्हाटीण असणारी उल्फी पिराजीसोबतही नांदते आणि नंतर ब्रिटिश अधिकाऱ्यासोबतही नांदते. सुरक्षितपणा शोधणारी देऊबाई आणि म्हणून शंभूरावला मला तुझ्यासोबत ठेव म्हणते. त्यानंतर येणाऱ्या तेजबाई, दिपाबाई, तुळसाबाई, अंजी इत्यादी सगळीच स्त्रीपात्रे अगदी कणखरपणे सातपाटीलमध्ये येतात. त्यांच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते, की मातृसत्ताक पद्धतीचा सांस्कृतिक पाया हा जगण्याचा मूलाधार आहे, असे अधोरेखित करतात. यातून मातृसत्ताक व्यवस्थेची ओळख कादंबरी करते. यांसोबत येणारी सर्व पुरुषपात्रेही तितकीच महत्त्वाची आहेत; पण त्यांना या सर्व स्त्रियांमुळे जे महत्त्व येतं ते आणखी महत्त्वाचं वाटतं. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे असे की, इथे जरी मराठा – कुणबी असा संदर्भ येत असला तरीही तो जातीच्या अनुषंगाने न येता प्रदेशाच्या अनुषंगाने येतो. अगदी कादंबरीची सुरुवात मराठवाडा, अहमदनगर, पुणे, अफगाणिस्तान, पानिपत, उत्तर भारत, इंग्लंड, मुंबई असा होत असला, तरीही कादंबरी प्रदेशाचं मराठीपण टिकवूनच कादंबरी शेवटपर्यंत पोहोचते.

कादंबरीत लेखकाने प्रत्येक भागात घेतलेली मेहनत आपल्याला इथे दिसते. सातपाटील हा शब्द आणि त्या अनुषंगाने येणारा 'पाटील ' हा सध्या जातवाचक अंगाने लक्षात घेतला जाणारा शब्द आपल्याला कुठेही खटकत नाही. लेखकाचे समाजभान जितके जागृत दिसते तितकेच किंवा त्याहूनही सरस असे ते सांस्कृतिक भानही या कादंबरीच्या एकूण वर्णनातून आपल्याला सदोदित जाणवत राहते. कुणबी – मराठा, ब्राह्मण, पूर्वाश्रमीचे महार, कोल्हाटी, अफगाणी अशा सर्वच स्तरांतून ती भारतीय उपखंडाची एकूण नाडीच लेखक पकडतो. आणि जातधर्माची अभिनिवेशी गोष्ट आपल्या कादंबरीतून हद्दपार करत जातो. आपल्याला कुठेही ही कादंबरी वाचताना ती कुठल्याही प्रकारच्या अस्मितांचं उदात्तीकरण करताना दिसत नाही. याउलट वाचणाऱ्याच्या मनात एक प्रकारची मानववंशशास्त्राच्या अंगाने जाणारी एक वेगळीच सामाजिक व सांस्कृतिक अनुबंधाची गोष्ट लेखक आपल्या पुढे ठेवतो आहे, असे सतत वाटत राहते. हेच या कादंबरीचं संचित आहे. मराठी कादंबरीच्या दृष्टिकोनातून आपण या कादंबरीचा विचार केला, तर एका वेगळ्या उंचीवर मराठी साहित्याला ही कादंबरी घेऊन जाते. एक वेगळा ठसा आणि तब्बल आठशे वर्षांचा दीर्घ प्रवास या सातपाटलांच्या माध्यमातून लेखक आपल्या पुढे ठेवत भारतीय उपखंडातल्या खऱ्या सांस्कृतिकतेचा परिचय या एकूण त्याच्या कुळकथेमधून आपल्या पुढे उभा करत जातो. हे कथन निर्विवादपणे एका श्रेष्ठ दर्जाच्या अगदी जागतिक कादंबरीच्या इतर मोठ्या लेखकांच्या मांदियाळीत सामावणारं असंच आहे. किंबहुना ते काकणभर सरसच आहे, असंही म्हटलं तरी ते फारसं वावगं ठरणार नाही.

(प्रस्तुत लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात विद्यावाचस्पत्युत्तर शिष्यवृत्तीधारक (पोस्ट डॉक्टरेट फेलो) म्हणून संशोधन करीत आहेत. सदरचा संशोधन– लेख हा त्यांच्या संशोधन प्रकल्पांतर्गतच्या काळात लिहिलेला आहे.)

**डॉ. गजानन विठ्ठलराव भोसले**

मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

चलभाषः ९७३०१६१३०४

email : bhosleg7@gmail.com

◆◆



# रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीतील निवडक प्रमुख केंद्रीय व्यक्तिरेखा

डॉ.जयराम खाडे

**कादंबरीकार प्रा.रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यांमधील प्रमुख केंद्रीय व्यक्तिरेखांवरील समीक्षालेख.**

कादंबरीतील कथानकाला जे महत्त्व येते, ते कादंबरीतील व्यक्तिदर्शनामुळे. मानवी जीवन हा कादंबरीचा विषय असला तरी 'मानव' हे फार मोठे गूढ आहे आणि कादंबऱ्यांतील चित्र विचित्र व्यक्ती मानवी जीवनाच्या अभूतपूर्व आणि अभिनव अंगोपांगाची जाणीव वाचकांच्या मनामध्ये निर्माण करतात.

व्यक्तिचित्रणे वास्तवावर आधारलेली असली तरी ती निव्वळ वास्तवातील जशीच्या तशी प्रतिबिंबे नसतात, तर लेखकाच्या प्रतिभा-सामर्थ्याने अधिक आकर्षक, अधिक कलात्मक आणि अधिक परिणामकारक बनलेली लेखकाची ती मानसचित्रे असतात. कादंबरीकार ही व्यक्तिचित्रणे वाचकाच्या मनावर ठसावीत, अशा रीतीने आपल्यासमोर मांडतो. त्यांच्या विविध प्रकारच्या हालचालींतून आणि बोलण्या चालण्यातून त्या व्यक्तींच्या स्वभावाचे कंगोरे उपड करता करता तो त्यांचे नेमके व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे करतो.

कादंबरीकाराने जणू काही निरनिराळ्या प्रवृत्तींच्या व्यक्तिमात्रांच्या मनोरचनेचे दालनच आपल्यासमोर उघडलेले असते. 'कादंबरीकाराच्या व्यापक, सूक्ष्म आणि सहानुभावी निरीक्षणामुळे ही व्यक्तिमत्त्वे आपल्यासमोर जिवंत साकार होतात आणि त्यांच्या भावविश्वाशी आपण समरस होतो. त्यामुळेच कोणतीही श्रेष्ठ कादंबरी जीवनातील त्रिकालाबाधित सत्याचा व्यापक साक्षात्कार घडवते, असे डॉ. भीमराव कुलकर्णी म्हणतात ते यथार्थ वाटते. कादंबरीकाराला जो परिणाम घडवून आणावयाचा असतो त्यावर त्याची व्यक्तिचित्रणे अवलंबून असतात. त्यामुळेच कादंबरीत मुख्य, गौण, अतिगौण, नाममात्र अशा रीतीच्या निरनिराळ्या व्यक्ती येतात.

कादंबरीकाराच्या धोरणाप्रमाणे व्यक्तित्व प्रधान कादंबऱ्या आणि घटना प्रधान कादंबऱ्या अशा दोन मुख्य प्रकारच्या दिसून येतात; परंतु घटना प्रधान कादंबरीतील जीवन विश्लेषणदेखील व्यक्तिचित्रणाधारेच करावे लागते कारण व्यक्तीकडेच घटनेचे कर्तृत्व असते. प्रा. रंगनाथ पठारे म्हणतात, ''काही वेळा साध्या घटनांमागे असणारे लक्षणीय व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी ठरते. चिंतनाचाही तो विषय बनतो. तरीही घटनांच्या पार्श्वभूमीवर, व्यक्तिमत्त्वाचा पट उलगडला जात असतो. त्यामुळे व्यक्ती आणि घटना यांचा अलग विचार करणे मला योग्य वाटत नाही. वास्तवातील अनुभव हे माझ्या लेखनाच्या बीजस्थानी असतात. आरंभीचे कुतूहल जीवनातील वास्तवासंबंधीचेच असते; पण लिहिताना जे पात्र निर्माण होते त्याचा त्याच्या तथाकथित वास्तवाशी काहीही संबंध

असत नाही. पात्र आणि त्याच्या रूपाने उभे होणारे कथात्मक वास्तव वा त्याचे आकलन हे लिहिणारा म्हणून माझे असते, त्याच्या विविध घटनांमधील क्रिया प्रतिक्रियांवर 'मी' चे नियंत्रण असते.''

श्री. दीपक घारे 'रथ' कादंबरीतील व्यक्तिरेखांविषयी म्हणतात, ''यातली प्रमुख व्यक्तिरेखा आणि इतर काही व्यक्तिरेखा काल्पनिक नावे घेऊन येत असल्या तरी वास्तवातल्या व्यक्तीचेच ते चित्रण आहे.'' जीवनविषयक निरीक्षणाची सामुग्री, एक विशिष्टवृत्ती व दृष्टिकोन, अनुभव व कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाद्वारे व्यक्त ही कादंबरीची पद्धती आहे, हे कुसुमावती देशपांडे यांचे मत येथे मुद्दाम आठवावे. त्याचबरोबर 'कादंबरीत काही विशिष्ट व्यक्तीच फक्त चित्रित होत असल्या तरी त्या व्यक्ती व तत्संबंधी घटनांच्या माध्यमातून लेखक जीवनविषयीच्या काही सामान्य सत्यांची प्रचीती घडवू शकतो, हे डॉ. रवींद्र ठाकूर यांचे निरीक्षणही येथे मुद्दाम ध्यानात घ्यावे. लेखकाचा प्रवास विशिष्टाकडून सामान्याकडे असा असतो. या प्रवासात कादंबरीकाराचा स्वतःचा एक विशिष्ट दृष्टिकोन कादंबरीतील कल्पित विश्वाच्या माध्यमातून व्यक्त होत जातो. जीवन सत्याचा त्याला जो एक भावनिक प्रत्यय आलेला असतो, त्याचाच कादंबरी हा एक आविष्कार असतो. कादंबरी ही विशिष्ट व्यक्तींच्या संदर्भात आणि विशिष्ट कालावधीत घडलेली एक भाषिक घटना असते.

डॉ. राजन गवस प्रा. पठारे यांच्या व्यक्तिचित्रणासंबंधी म्हणतात, ''पठारे यांच्या कथात्मक साहित्यात चित्रित झालेल्या व्यक्तिरेखा या दैनंदिन जीवनात, अवतीभोवती, वावरणाऱ्या वाटाव्या इतक्या जिवंत असतात. याचे कारण त्यांच्या साहित्यात चित्रित झालेल्या असतात.''

**१. निवेदक प्राध्यापक (दिवे गेलेले दिवस)**

निवेदक प्राध्यापक हे कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र आहे. हा निवेदक ग्रामीण भागातील कॉलेजात प्राध्यापक आहे. तो विवाहित असून, कॉलेजच्या आवारातच राहत आहे. तो वाचनाच्या छंदामुळे गॅब्रिएल गार्सिया मार्क्विझच्या कादंबऱ्याही वाचतो; पण त्याला आणीबाणीच्या शिस्तपर्व काळात 'तुमच्यावर लक्ष आहे' असा फोन येतो. या वारंवार येणाऱ्या फोन प्रकरणाने तो अस्वस्थ होतो कारण तो निरुपद्रवी व भेकड आहे. तो बहुजन समाजातील आहे. तो म्हणतो, ''रात्रभर त्या समाजवादी म्हाताऱ्याचे विचार, डोके कुरतडत राहिले, स्वत:ला स्वतःचीच लाज वाटत राहिली, च्यायला क्षुल्लक कुठे कुणी फोन करतो आणि आपण अस्वस्थ होऊन जातो.'' निनावी फोन प्रकरणाच्या चौकशीसाठी ते कॉलेजातील बुराटे या विद्यार्थ्याला घरी बोलवून त्याच्याशी गप्पा मारून चौकशी करतात; परंतु बुराटे ह्या विद्यार्थ्याने फोन केलेला नाही हे लक्षात येताच तो म्हणतो– ''अच्छा अच्छा ! येत जा... ''यावरून तो निनावी फोन प्रकरणाने त्रस्त झालेला आहे असे लक्षात येते. तो प्रा. जोंधळे व प्रा. देवकरचा मित्र आहे. तो प्रा. जोंधळेच्या कविता ऐकतो. तो प्रा. जोंधळ्याचा मित्र असल्यामुळे त्यांच्या कविता इमाने इतबारे एकतो.

समाजवादी म्हताऱ्यांच्या भाषणाने तो प्रेरीत होतो आणि आपणही शिस्त पर्वात (आणीबाणी) काहीतरी केले पाहिजे असे त्याला वाटते. त्या वेळी तो म्हणतो– 'आपण काहीतरी केले पाहिजे? काय करता येईल आपल्याला? कुठे प्रकट काही बोलावे आणि तुरुंगात जावे का? पण त्यात आत्मघातापेक्षा अधिक काय आहे?' असा हा निवेदक प्राध्यापक विचारी व सामान्य पांढरपेशी वर्गाचा प्रतिनिधी आहे.

शिस्तपर्व संपल्यानंतर होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने तो देवकरच्या 'इलेक्शन फोर का स्टींग' प्रोजेक्टमध्ये सहभागी होतो आणि निवडणुकीच्या निमित्ताने होणाऱ्या धामधूमीच्या राजकारणाचे, विविध पक्ष, जनतेच्या निवडणुकीच्या विषयी प्रतिक्रिया त्याच्या दृष्टिकोनातून आपल्यासमोर उभ्या करतो, आणि तो निवडणुकीची डायरी तयार करतो. हे पात्र या कादंबरीचा कणा आहे. या पात्राच्या अंतर्गत संधिता, अंतर्गत लेखकांचे विचार प्रकट झालेले आहेत. तो स्वतःच्या लेखनासंबंधी म्हणतो– 'नुसते डायरी' या फॉर्मला चिकटून राहायचे नाही. त्यासाठी बंधनात अडकून घ्यायचे नाही. मोडतोड करायची ती ही मुद्दामहून नाही. वाटेल तेव्हा बाटेल तसे लिहीत जायचे.' यावरून हा निवेदक प्रा. प्रयोगशील लेखक आहे हे लक्षात येते. हा निवेदक पुरोगामी विचाराचा आहे. म्हणूनच तो म्हणतो– 'जातीच्या जुनाट कल्पना फेका' तसाच तो कुटुंबवत्सलही

आहे. एकूण ही व्यक्तिरेखा, प्रौढ, विचारी, निरुपद्रवी, भेकड; पण प्रसंगी लेखनकृती निर्मिणारी अशी केंद्रवर्ती आहे.

**२. प्रा.गोपीचंद रहाणे (चक्रव्यूह)**

हा या कादंबरीतील निवेदक आहे. तो तीस वर्षांचा आहे. बारामतीसारख्या ग्रामीण भागातील कॉलेजचा टिचरफेलाज म्हणून एम. फिल. पदवीसाठी संशोधन कामी विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागात रुजू होतो. तो आपल्या सूक्ष्म आणि तीक्ष्ण नजरेतून विद्यापीठीय पर्यावरण न्याहाळतो आहे. हा प्राध्यापक सक्सेनाचा वर्गमित्र आहे.

'चक्रव्यूह' या कादंबरीतील गोपीचंद राहाणे हे तितकेच महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे. सक्सेनाची छाया व्यक्ती म्हणून त्यांचे चित्रण आले आहे. सक्सेनाच्या रूपात सर्व तऱ्हेची संदिग्धता प्रत्ययाला येत असेल, तर गोपीचंदच्या रूपाने एक प्रकारची निःसंदिग्धता, वर्तनातला मोकळेपणा, समजूतदारपणा, स्वीकारार्हता, जमवून घेणे, सहानुभूतीशील, स्वागतशीलता आणि उमदा अशी प्रत्ययाला येणारी ही व्यक्तिरेखा आहे.

हा संवेदनशील आहे; पण त्याची संवेदनशीलता इतरांच्या संदभात प्रत्ययाला येते. हे सक्सेनापेक्षा त्याचे वेगळेपण आहे. म्हणून तो म्हणतो–'एखाद्याची नोकरी दुसऱ्यांच्या चुकीमुळे जाणं हे काही बरं नाही' असा चांगुलपणाही त्याचा एक गुणविशेष आहे, आणि त्यामुळेच कुठल्याही भल्या गोष्टीमध्ये आपला हातभार लागत जर असेल तर तो मनापासून लावतो. म्हणूनच तो सक्सेनाच्या थरथरणाऱ्या हाताच्या आजारपणाची कल्पना प्रोफेसर पंतांना देतो.

तो सक्सेनाबरोबर 'न्यूक्लिअर फिजिक्स' विषयी संशोधन काम करण्याचे ठरवून डॉ. तळेकरांकडे नाव नोंदणी करतो. सक्सेनच्या व्यक्तिमत्त्वातील गूढपणाचे आपणास जसे आकर्षण वाटते तसे गोपीचंदाच्या व्यक्तिमत्त्वातील 'भावात्मकता' लक्षणीय वाटते. किंबहुना सक्सेनाही जो आपल्याला जाणवतो तो गोपीचंदामुळेच! तो म्हणतो–'ॲक्सलेटरमधून बाहेर पडणाऱ्या तीव्र शक्तीच्या इलेक्ट्रॉनशी याचा (थरथरणाऱ्या हाताशी) काही संबंध असेल का? आणि असला तर तो याला (सक्सेनाला) नक्कीच माहीत असणार तरीही दुर्लक्ष करतोय की काय? की आपले आपल्यापुरते सगळे ठेवायचे म्हणून लपवतोय? आयुष्यात गूढता असते. हे जितके सत्य आहे तितकेच गूढता समजावून घेणेही शक्य असते, असा एक समंजस शहाणपणा या कादंबरीतील गोपीचंद या व्यक्तिरेखेच्या अंगी दिसून येतो.

गोपीचंद ही तरल व संवेदनशील अशी व्यक्तिरेखा आहे. तो सक्सेनाच्या सर्वस्वी वेगळ्या जगण्याचा सतत शोध घेतो. त्याचा भावनिक ताणतणाव समजून घेऊन त्याच्या जगण्याची संगती लावण्याचा प्रयत्न करीत असतो. सक्सेनाच्या स्वतःभोवती बंदिस्त कडे करून जगण्याविषयीचे गोपीचंदला सतत कुतूहल आहे म्हणून तो सक्सेना व मिस जाखडीतील सुप्त प्रेमाविषयी म्हणतो, 'सक्सेना ज्या अर्थी तिच्या प्रेमात पडला होता, त्या अर्थी तिच्यात चांगले असे काही होते. खास शरीर सौंदर्याइतकेच त्यापल्याडचे आणि दुरूनदेखील ओढ लावणारे' असे काही तरी तो सक्सेनाविषयी म्हणतो… … सक्सेना? तो अजूनही आपल्याला एखाद्या अवघड कोड्यासारखा वाटतो; तिबेटमधल्या एखाद्या पठारासारखा सक्सेनाच्या अपघाती मृत्यूने गोपीचंद विव्हल होतो, आणि त्याला पडणाऱ्या प्रश्नांनी तो भोवंडून जातो तो म्हणतो– तो (सक्सेना) एकटा होता तो अखेरपर्यंत तसाच राहिला होता. तो तसा का होता? त्याला आयुष्याकडून नेमके काय पाहिजे होतं? तो मधल्या रस्त्यानं का गेला? त्याने सगळ्यांनाच गुंगारा का दिला? या प्रश्नांनी गोपीचंद भोवंडून जातो. ही व्यक्तिरेखा प्रौढ, तरल, संवेदनशील, समंजस, सक्सेनाची छाया. व्यक्ती निःसंदिग्ध वर्तन, समजूतदारपणा, स्वागतशील उमदेपणा या व्यक्तिरेखेतून प्रकर्षाने दिसतो. तो कादंबरीच्या संरचनेत स्वतःशी आत्मसंवादही करतो.

**३. प्रा. शंकर सक्सेना (चक्रव्यूह)**

ही कादंबरीची केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. प्रा. सक्सेना हा कुशाग्र बुद्धी लाभलेला गोपीचंदचा मित्र आहे. तो सध्या विद्यापीठातील पदार्थ विज्ञान विभागात विद्यार्थी प्रिय असा तरुण प्राध्यापक आहे. तो विज्ञानाच्या क्षेत्रात काही मूलभूत संशोधन करण्याच्या ईर्ष्येने झपाटलेला आहे. त्यासाठी तो चिकाटीने सतत प्रयत्न करणारा संशोधक आहे. तो रूढ अशा आकांक्षाच्या व्यवहारातून बाजूला राहून संशोधन क्षेत्रात मात्र हुषार आहे. त्या संबंधी

गोपीचंद म्हणतो, ''त्याच्यापेक्षा परीक्षेत अधिक मार्क मिळविणारेही अनेकदा त्याला विचारतात.''

या व्यक्तिरेखेचे शरीर वर्णन कादंबरीत आहे ते असे– 'उंच सडपातळ शरीरयष्टी, कटिंग सलूनमध्ये लावलेल्या फोटोतल्या माणसासारखे कानांच्या भरपूर वरपर्यंत व्यवस्थित कापलेले केस, मधूनच दिसणारी कपाळावर फुगलेली रक्तवाहिनी आणि सतत हसणाऱ्या माणसासारखे दिसणारे नाक! असे मोजक्या शब्दांत व्यक्तिरेखेचे शरीरवर्णन दिसते.

तो स्वभावाने लाजरा, मृदुभाषी पण ताठ. त्याचे हे ताठपण क्वचितच जाणवते. इंग्रजीवर एक भाषा म्हणून त्याची विलक्षण पकड आहे. हिंदी तर त्याची मातृभाषा आहे. फिजिक्स विषयातील मूलभूत गोष्टी त्याला पूर्ण माहीत आहेत. अगदी न्यूक्लिअर फोर्सविषयीचे सैद्धांतिक विवेचन क्लासिकल पद्धतीने सुरू करून नेमकपणाने करतो.

तो प्रोफेसर पंतांच्या मार्गदर्शनाखाली मायक्रोट्रॉन ॲक्सलरेटरवर संशोधन करत आहे. तो गेली चार–पाच वर्षं या मायक्रोट्रॉन सिस्टीमवर काम करीत आहे. सगळे ठीकठाक होते तरी त्याला पार्टिकल बिंम मिळत नव्हता. त्यामुळे तो निराश होण्याच्या मार्गावर आला होता. तो हट्टी स्वभावाचाही आहे, म्हणूनच तो गोपीचंदला म्हणतो. ''चलो, अपनी मायक्रोटॉन सिस्टीम देखेंगे'' त्या वेळी गोपीचंद 'बघू नंतर काय घाई आहे?' असे म्हणतो तेव्हा सक्सेना हट्टीपणाने म्हणतो– 'नही अभी देखेंगे! तो गोपीचंदला तिथे नेऊन तिथले चुंबक, रेडिओ ॲक्टिव्ह सोर्सेस, व्हॅक्यूम सिस्टीम सगळे खुलासेवार दाखवतो.

सक्सेनाला सेक्रेटरी मिस् जाखडीविषयी सुप्त प्रेम भावना असते; परंतु ते प्रत्यक्षात व्यवस्थेमुळे तो व्यक्त करू शकत नाही. तो आतल्या आत कुढत राहतो. त्याचाच परिणाम म्हणून स्वतःला मायक्रोटॉन सिस्टीम संशोधनात गुंतवून घेतो. त्या सिस्टीमचा त्याच्या शरीरावर विपरीत परिणाम होतो, हे होऊनही तो संशोधनात मन गुंतवितो.

तो प्रोफेसराच्या ॲपलाईड रिसर्च संबंधात स्पष्टपणे म्हणतो, की ''आय डिसॲग्री विथ हिम फॉर दॅट मॅटर'' असा त्याचा स्पष्टवक्तेपणा दिसून येतो. त्याला संशोधनाबरोबर, समाजशास्त्र,राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान या विषयांची आवड आहे, म्हणूनच त्याच्या टेबलावर लेनिन ॲंड मार्क्सिझम, दास कॅपिटल, सोशॅलिस्ट रिॲलिझम इ. ग्रंथ आहेत.

सक्सेना व्यक्तिमत्त्वाला व्यापणारे महत्त्व नाकारत नाही. तशी त्याला सामाजिक शास्त्रातही गती आहे. मात्र 'सामाजिकता' हेच एकमेव अंतिम मूल्य असे त्याला वाटत नाही. बांधिलकीपेक्षा विज्ञानातील जो प्रतिभाविलास आहे तो त्याला महत्त्वाचा वाटतो. सक्सेना आत्मसंतुष्ट नाही; पण आत्ममग्न आणि अंतर्मुख जरूर आहे. म्हणूनच तो संशोधनात इतका गुंतून जातो, की बाकीचे सारे संदर्भ त्याला व्यर्थ वाटतात. त्यामुळेच त्याने स्वतःभोवती एक अदृश्य कडे निर्माण केलेले आहे. तो एक प्रकारच्या अबॅना अलीकडे चालला आहे असे जाणवते. तो अंतर्मनात फार एकाकी आहे. असे गोपीचंदला जाणवते लौकिक जगण्याच्या पलीकडे तो गेलेला आहे. म्हणूनच सक्सेनाला एक प्रकारचे 'आध्यात्मिक' रितेपण जाणवते. कादंबरीच्या शेवटच्या भागात सक्सेनाचा एका कड्यावरून मृत्यू होतो असे दाखविले आहे. तो संशोधनाचा काय, जगण्याच्याही मर्यादित चौकटी बाहेर पडतो. या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण वर्गीकरणाच्या पलीकडे वाटावे असे झपाटून टाकणारे व्यक्तिमत्त्व मराठी कादंबरीमध्ये प्रा. पठारेंनी सक्सेनाच्या रूपाने केले आहे.

**४. प्रा. गजानन भांगरे (टोकदार सावलीचे वर्तमान)**

या कादंबरीत नायक–निवेदक प्रा. गजानन भांगरे ही केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. ते मराठी साहित्याचे प्राध्यापक आहेत. त्यांनी खूप सोसलेले आहे. त्यांच्यापाशी सहानुभाव घेण्याची क्षमता आहे. माणसाला त्याच्या गुणदोषांसकट स्वीकारण्याची उदारमनस्कता आहे, आणि येणाऱ्या अनुभवाचा अन्वयार्थ लावण्याची, त्यावर चिंतन करण्याची आणि अलिप्तपणे आत्मपरीक्षण करण्याचीही शक्ती त्यांच्यापाशी आहे.

ही कादंबरी सुरू होते तेव्हा त्यांचे वय ५३ च्या आसपास आहे. गेली वीस वर्षं ते ग्रामीण भागातील महाविद्यालयात अध्यापन करीत आहेत. महाविद्यालयातील अधिक तर प्राध्यापक बहुजन समाजातील आहेत. त्यात तीन–चार प्राध्यापक ब्राह्मणांपैकी आहेत; पण प्रा. भांगरे हे या दोन्ही जातींपैकी कोणाच्याच जवळचे नाहीत. याचे एक कारण, त्यांना स्वतःच्या जातीची खात्री नाही. आपले कुटुंब आणि

आपण या पलीकडे त्यांना विश्व नाही. स्व कोशातच ते जगत आलेले आहेत. त्यांचे सहकाऱ्यांबरोबर संबंध औपचारिक आहेत.

प्रा. भांगरेचा एकाच गोष्टीचा अपवाद करता येण्यासारखा आहे, आणि ती गोष्ट म्हणजे त्यांच्या आईबरोबरचे नाते. सत्तरीच्या आसपास पोचलेली त्यांची आई त्यांच्या संसारात अजून गुंतून आहे. त्यांची आई त्यांच्या कौटुंबिक जीवनात ढवळाढवळ करीत नाही हे जरी खरे असले तरी कुटुंबातील माणसांवर तिचे बारीक लक्ष आहे. प्रा. भांगरे यांच्यासाठी तिने खूप केलेले असल्यामुळे तिच्याविषयी त्यांना आदर आहे. तिच्या शहाणपणावर त्यांचा विश्वास आहे; पण तिच्या त्यांच्या दृष्टीने निरर्थक अशा हाका आणि चौकशा, ती हाक मारून म्हणते 'गजानऽऽन! आरे गजानऽऽन! ' ही हाक आणि चौकशीने सतावतो. या वयातही आपल्या हातांनी केली जाणारी त्यांच्या सर्वांगाची चाचपणी यामुळे मधूनमधून ते वैतागतात खरे; पण त्यामुळे तिच्याबद्दलच्या आदरभाव काही उणेपणा त्यांच्यात आल्याचे दिसतन ाही.

प्रा. भांगरे हे टिपिकल मध्यमवर्गीय गृहस्थ आहेत. भोकरे या त्यांच्या एकमेव मित्राचा अपवाद करता, ते स्वतःकोणाच्या जवळ गेलेले नाहीत वा कोणाला आपल्याजवळ येऊ दिलेले नाही. मित्र गोळा करणे हा त्यांचा स्वभाव नाही. मिळणाऱ्या पगारात संसार चालवण्याकडे त्यांची प्रवृत्ती आहे. अधिक मिळविण्यासाठी धडपडणे हे त्यांच्या स्वभावात नाही. दोन देत, दोन घेत त्यांना जमलेले नाही, म्हणून त्यांना एक तगडा मिशाळ पोरगा दम देतो आणि म्हणतो, ''गल्लीत ऱ्हायचंय् ना! नीट गपचीप ऱ्हावा मंग'' त्या वेळी ते दचकून, दबून माघार घेतात. कोणावर कधी हात उगारण्याची पाळी त्यांच्यावर आलेली नाही. बहुसंख्यांपैकी कोणी लागट बोललेच तर ते काना आड करतात किंवा मचूळ हसून प्रसंग निभावून नेतात कारण ते समंजस असे आहेत, फटकन् काही बोलून तोडणे त्यांना जमत नाही. कादंबरीतील त्यांचे नायकपण हे यांच्या कर्तृत्वाने प्राप्त झालेले नाही. बरेचदा घटना त्यांच्या अंगावर कोसळतात. अशा घटनांचे परिणाम त्यांच्यावर घडतात. या घटनांचे परिणाम क्षेत्र म्हणून ते नेहमी केंद्रस्थानी असतात. या घटनांनी ते मधूनमधून प्रक्षुब्ध होतात हे खरे असले तरी त्यांच्यापासून स्वतःला तोडण्याची, थोडे दूर सरून त्याकडे आणि स्वतःकडे पाहण्याची, त्यांच्या आणि स्वतःच्या वर्तनाचा अलिप्तपणे अन्वयार्थ लावण्याची क्षमता त्यांच्यापाशी आहे. या अन्वयार्थ लावण्याच्या प्रक्रियेत ते कर्ते बनतात. त्या घटनांनी निर्माण केलेल्या भावप्रक्षोभातून सुटतात आणि अधिकाधिक समंजस, शहाणे होत जातात. स्वतःच्या दुबळेपणावरही काही प्रमाणात ते मात करतात. म्हणूनच कमलची चूक लक्षात घेऊन म्हणतात, ''तू एक तडफदार मुलगी आहेस, तू अशी मोडून राहू नकोस... आणि दुर्मुखल्यासारखं बसायचं नाही.'' ते सुशिक्षित व विचारी असे आहेत म्हणूनच ते दुबळेपणावर मात करतात. हे त्यांचे सामान्यातील असामान्यत्व म्हणता येईल.

ही केंद्रवर्ती व्यक्तिरेखा उत्तरोत्तर फार समंजस व विचारी असल्यानेच ते दुबळेपणावर मात करतात. आईविषयी मनात आदरभाव असणारी अशी व्यक्तिरेखा आहे.

**५. प्रा. वालझाडे (दुःखाचे श्वापद)**

प्रा. वालझाडे हे कादंबरीचे महत्त्वाचे निवेदक पात्र आहे. ते प्रथमपुरुषी पद्धतीने निवेदन करीत आहेत. म्हणूनच खऱ्या अर्थाने कादंबरीचा ते नायक ठरतात. ते खेडेगावाच्या एका सामान्य कुटुंबातील आहेत. शिक्षण घेत घेत ते पुढे दादासाहेब नरसाळेच्या संस्थेतील कॉलेजमध्ये प्राध्यापक होतात. ते मराठी विषयाचे प्राध्यापक आहेत. प्रौढ असून वयाने ५३–५४ चे आहेत. ते जातीने तेली आहेत. ते सुरुवातीला आपली पत्नी, मुलगी व धनू फीटर व मुलगी शालिनीसह परंपरागत चाकोरीतील जीवन जगत असतात; पण पुढे श्रीमती गोपाळे यांच्यामुळे ते समाजकार्यात ओढले जातात. ते बुद्धिजीवी, विचारी प्राध्यापक असल्यामुळेच तुकाराम एखंडे या विद्यार्थ्याला कविता करण्यासाठी प्रोत्साहन देताना म्हणतात ''काय, कविता वगैरे लिहिल्यास काही नवीन?''

परित्यक्त्या मेळाव्याच्या निमित्ताने प्रा. वालझाडेंची उल्हासबाई चितारशी तोंड ओळख होते. पुढे सात दिवसांनी उल्हासबाईचे मृत्यू प्रकरण घडते. या प्रकरणाचा किस काढून अखेरीस सत्य उजेडात आणणे कामी ते यशस्वी होतात. अनेक अडथळे पार करून सत्याच्या कवचापर्यंत ते मजल मारतात व पुढे थकलेपणा

व्यक्त करताना म्हणतात, ''सगळी तुमचीच प्रेरणा दादासाहेब. साऱ्या मध्याशी तुम्हीच आहात. माझ्या लक्षात आलंय तुम्ही कर्ते करविते आहात. ही सारी चिल्लर माणसं आहेत. मी ही चिल्लर आहे. तुम्ही थोर आहात दादासाहेब!'' हेच खरे वालझाडें सरांचे सामर्थ्य आहे.

या कादंबरीतील 'मी' पुरोगामी नारी मंचाच्या अध्यक्षा श्रीमती गोपाळे यांच्या निमित्ताने का होईना कुतूहलाने, उत्सुकतेने, समकालीन प्रश्नांवरचे त्यांनी प्रकट केलेले विचार, सामाजिक अस्थैर्य, राजकारणातील भ्रष्टाचार, त्यामुळे सच्च्या माणसाची होणारी ससेहोलपट, लोकांची किंकर्तव्यमूढता, बड्या लोकांच्या गुप्तगोष्टी, समाजकारणी मंडळींचे आतले उद्योग यावरची भाष्ये प्रकटपणे ते व्यक्त करतात. ते म्हणतात, ''पण इथे विचित्रच घडले. अघटित झाले. आत गेलेली स्त्री आपल्या पायानी बाहेर आलीच नाही. दादासाहेबच आले जोरजोराने खुणा करीत बोलावू लागले. तेव्हा आत जाऊन पाहतात तर हे असे झालेले आणि स्त्रीच्या तोंडात बोळादंडाशी बांधलेले गच्च. तसेच ही रीत दादासाहेबांची कधीच नव्हती हे ही आश्चर्यच; पण आता वेळ नव्हता.'' उल्हासबाईच्या मृत्यूच्या बातमीने अस्वस्थ होणारा मी असा या प्रकरणाचा पर्दाफाश करतो व अनेक आडवळणाने त्यातील सत्य तो बाहेर काढतो व एक सच्चा, लढवय्या व्यक्ती म्हणून 'मी' (प्रा.वालझाडे) ची आपणास ओळख होते. तो नैतिक दृष्टीने विजयी होतो. प्रा. पठारेंनी 'मी' प्रति नायक म्हणून चितारलेला आहे. डॉ. नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीतील पांडुरंग सांगवीकर समाजस्थितीवर जसे मार्मिक भाष्य करतो तसाच हा निवेदक 'मी' आहे. प्रतीकात्मक पातळीवर पठारेंनी ही व्यक्तिरेखा साकार केली आहे.

**६. ॲड. नाना सिरूर (ताम्रपट)**

ॲड. नाना सिरूर हे या कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र आहे. ते लहानपणी चोऱ्या, मारामाऱ्या करत असत. पुढे त्यांनी गांधीजीच्या १९४२ च्या चलेजाव चळवळीसाठी ग्रामीण भागात पांडुरंग तिकोने, गुलबा नाईक, दादासाहेब भोईटे, नारायण सोनवणे यांच्यासह संघटनेची उभारणी केली. मुलासमोर भाषण करताना ते म्हणतात, ''युद्धाच्या खाईत होरपळत असतानाही ब्रिटिशांना आपले साम्राज्य सोडायचे नाही हे त्यांनी स्पष्ट केलंय. आपण तरीही संधी का सोडावी? देशभर आंदोलने सुरू झालेली आहेत.''असे वक्तृत्वपूर्ण नेतृत्व त्यांच्या ठिकाणी आहे. ते ग्रामीण भागात तालुक्याच्या पातळीवर स्वातंत्र्य चळवळ उभारतात व सहकाऱ्यांसह भूमिगत होतात. सैन्यातून पळून आलेल्या राधाकिसनचे, गुलबा नाईकचे दरोडा प्रकरण मिटवण्यात ते यशस्वी भूमिका पार पाडतात. स्वातंत्र्य आंदोलनात ते संघ, सेवादलाची मुले व सहकाऱ्यांसह ब्रिटीश सरकारी कचेरी ताब्यात घेतात. नंतर काही दिवसांनी सहकाऱ्यांसह भूमिगत होऊन, ते बुवा साहेब जाधवाच्या मळ्यात, तसेच गोडे पाटल्यांच्या वस्तीवर सहकाऱ्यासह वेषांतर करून थांबतात. असे स्वातंत्र्य सेनानी, नेते, चळवळीचे उभारणी करणारे कुशल व्यक्ती म्हणून कादंबरीच्या प्रथम भागात चित्रण येते.

देश स्वतंत्र झाल्यानंतर ते तुरुंगातून सुटतात. त्यानंतर ते वकिलीचे शिक्षण पूर्ण करून वकिलीचा व्यवसाय करू लागतात. त्यांना पत्नी अनूताई व जयप्रकाश, अरुणा ही मुले आहेत. त्यांची साने गुरुजी व गांधीजी यांच्या विचारांवर अढळ श्रद्धा आहे. गांधीजी व साने गुरुजींच्या मृत्यूच्या घटनेमुळे त्यांना वाईट वाटते म्हणूनच ते म्हणतात ''आपल्या जीवनातील मंगल ते सारे संपले,... काही काही राहिले नाही.'' असे ते मूल्यनिष्ठ जीवन जगणारे आहेत.

आई-वडिलांच्या दुःखद निधनानंतर ते सर्व दुःखे पचवून सेवादलाच्या मुलांसाठी बौद्धिक घेताना म्हणतात, ''कोणताही धर्म माणसाला माणसावर, प्राणिमात्रांवर प्रेम करायला शिकवतो ... माणुसकी हा सगळ्यात मोठा धर्म आहे. ते एक फार महत्त्वाचे मूल्य आहे. सगळ्या धर्माच्या मुळाशी ते असतं... सत्य, अहिंसा, करुणा आदी सत्याग्रह ही गांधीजींची शिकवण सगळ्या धर्माचं सार याच्यात आहे.'' यावरून त्यांना माणुसकीविषयीची तळमळ असून ते गांधीवादी विचारांचे आहेत. ते रिमांड होमचे ट्रस्टी म्हणून काम करतात. तसेच आदिवासींच्या धरणात गेलेल्या जमिनीच्या प्रश्नी आंदोलन करतात. विडी कामगार प्रश्न, सावकारशाहीविरुद्ध आंदोलने, संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढ्यात ते एसेम जोशी, पटवर्धन आदिंबरोबर सहभागी होतात. ते सेवादलाच्या लायब्ररीसाठी मासिके, साधनेचे अंक एकत्रित करण्याचे काम हौसेने करतात. तसेच ते आवडाबाई व तिची मुलगी

लीला यांना स्वावलंबी जीवनाचे कामी मदत करतात. अशी त्यांच्यात समाजशीलवृत्ती दिसून येते.

निवडणूक समितीच्या वतीने उमेदवारी मिळाली नाही. १९५२ च्या निवडणुकीत त्यांना उमेदवारी निश्चित देण्याचे ठरते; पण मोठ्या हिकमतीने त्यांना उमेदवारी मिळू नये म्हणून आमदार शिंदे गुप्त कारस्थान करतात आणि उमेदवारी रद्द झाल्याचे कळते. त्या वेळीही ते संयमाने वागतात. बापूसाहेब देशमुख यांचे बरोबरच्या अटी तटीच्या निवडणुकीत ते ब्राह्मण जातीचे म्हणून ते हरतात. शहरातील शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेत मोलाचा सहभाग ते कॉलेज कमेटीचे पदाधिकारी व कारखान्याचे संचालकही असतात; परंतु तेथील सावळा कारभार लक्षात येताच ते स्वतःहून पदे सोडतात. यावरून ते निःस्पृह, निष्कलंक वृत्तीचे आहेत असे दिसते. निस्सार मोमीन व लीला यांच्या आंतरधर्मीय विवाहास मान्यता देतात व आपली पुरोगामी वृत्ती दाखवून देतात. धरणग्रस्तांच्यासाठी उपोषणास बसतात.

त्यांनी स्वातंत्र्य सेनानीचे सन्मान पत्र व पद्मश्री किताब ही नाकारले. मुलाची शिष्यवृत्तीही नाकारतात. तसेच हिंदू-मुस्लिम दंगलीतही संयमाने प्रश्न हाताळतात. आणीबाणीच्या काळात ते सत्याग्रह करतात. कारागृहातील सत्याग्रहींना तुरुंगात भेटण्यास जातात व तुरुंगातल्या कुटुंबियांसाठी निधी उभारतात.

ते नारायण सोनवणेंना जातीय दंगलीसंबंधाने लिहितात, 'जातीविषयक अहंकार शिक्षणाच्या प्रसाराने का वाढतात? केवळ आर्थिक हितसंबंधाभोवतीच सारं जग फिरत असते का?' अशी जीवन मूल्ये हरवत चालल्याची खंत ते व्यक्त करतात. नानांना कादंबरीच्या शेवटी कमालीची मरगळ व औदासिन्य येते. राजकारणात व समाजकारणात विफलतेचा क्षण माणसाला कसा घेरतो हेच पठारेंनी या व्यक्तिरेखेतून दाखविले आहे. स्वातंत्र्य सेनानी, समंजसवृत्तीची, सेवादलाची, सामाजिक, राजकीय चळवळीचे कार्य व नेतृत्व करणारी, निःस्पृह वृत्तीची, गांधीवादी विचाराची, मूल्यनिष्ठतेला महत्त्व देणारी ही उत्तुंग व्यक्तिरेखा पठारेंनी उभारली आहे.

### ७. खासदार दादासाहेब भोईटे पाटील (ताम्रपट)

या कादंबरीतील दुसरी महत्त्वाची केंद्रवर्ती व्यक्तिरेखा, स्वातंत्र्यसेनानी- त्यांनी नाना सिरूर बरोबर स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. ते बहुजन समाजाचे आहेत. शिक्षणासाठी ते नात्यातील सीता आजीच्या पडळीवर होते. सीता आजींना वृद्धपणी आपल्या मळ्यातील घरी आणतात. ते राजकीय कैदी म्हणून तुरुंगात असताना मार्क्सचे तत्त्वज्ञान, एम.एन.रॉयचा मानवतावाद, साहित्य समाज या विषयाच्या विधायक चर्चेमुळे सामाजिक बांधिलकीविषयी त्यांना आस्था वाटू लागली. त्यांनी तुरुंगातून सुटल्यानंतर कम्युनिस्ट पार्टीचे काम सोडून वडिलांच्या सल्ल्यानुसार शेतीत लक्ष घातले. नव नव्या योजनांची माहिती करून घेण्याची आस होती, त्याने पद्धतशीरपणे शेती सुधारली. शिवाय आसपासच्या शेतकऱ्यांना सल्ला, मार्गदर्शन ह्या गोष्टीही आपोआप झाल्या. स्वतःच्या नकळत तुकाराम त्यांचा नेताही झाला. पुढे त्यांनी शेतकऱ्यांना कर्जे मिळण्यासाठी सहकारी सोसायटी उभी केली. मतपेढीच्या राजकारणातून बाजूला राहून त्यांनी साखर कारखाना उभारणीसाठी प्रयत्न सुरू केले. ते दहा-बारा सोबत्यांना घेऊन मुंबईला जाऊन स्वराज्य खात्याचे मंत्री यशवंतराव चव्हाणांची भेट घेतात. त्यांना सहकारी साखर कारखान्याचे प्रपोजल देतात. नंतर ते शेतकरी सहकारी साखर कारखान्याची उभारणी करतात आणि आमदार दौलतराव शिंदेंना चेअरमन करतात. तसेच नाना सिरूर यांचाही कारखान्याचे संचालक म्हणून समावेश करतात. नंतर सहकारी कारखान्याचे ते चेअरमन होतात. ते साखर कारखाना हुकमतीने, गोडीने, समजदारीने, प्रसंगी थोड्या वेगळ्या पद्धतीने चालवतात. एवढी मोठी व्यवस्था ठीकठाक चालवण्यासाठी ते जबाबदारीने वागतात. म्हणूनच ते कारखान्याच्या सिव्हिल इंजिनिअरला म्हणतात, ''इतका कीस काढून सहकारात जमत नाही. थोडी लवचिकता पाहिजे.'' ते कौशल्याने कारखान्याच्या डायरेक्टर बोर्डात अपेक्षित निर्णय घेत असतात. त्यांचे कुशल नेतृत्व दिसून येते. त्यामुळे त्यांनी पाच वर्षांत कारखाना प्रगतीपथावर आणला.

दादासाहेब सहकारातून समृद्धी मंत्र अंगीकारतात. त्यांनी शेतकऱ्यांचे संघटन, व सहकारातून ताकद उभी केली आहे. त्यांनी विविध समित्या, उपसमित्यांवर आपली सोयीची माणसे बसविली. तत्त्वाच्या राजकारणापेक्षा त्यांनी शक्तीच्या राजकारणाला महत्त्व दिले म्हणूनच ते ॲडजस्टमेंटला महत्त्व देतात. करप्शन

वगैरेचा प्रश्न महत्त्वाचा नाही असे ते मानतात, ते तडजोडी महत्त्वाच्या म्हणतात.

बांगरवाडीच्या भैरवनाथ उपसा जलसिंचन योजनेच्या शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी दादासाहेब म्हणतात, ''तुमच्या चेअरमन साहेबांनी आता सांगितले की आम्ही असं केलं आणि तसं केलं मी म्हणतो, आम्ही विशेष काही केलं नाही.'' यावरून ते अस्सल राजकारणी वाटतात म्हणून ते पांडुरंग तिकोणे गुरुजींना कारखाना कंपाऊंडचे काम देतात.

दादासाहेब भोईटे पाटील जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवडून येतात. नंतर ते काँग्रेसचे खासदार म्हणूनही संसदेत निवडून जातात. तीन एकरांच्या जागेत त्यांचा दुमजली बंगला आहे. तेथेच अनेक प्रकारचे कार्यक्रम, सभा, बैठका होतात. तेथे त्यांची पत्नी, दोन मुली व एक मुलगा आणि सीता आजी राहतात. त्यांच्या बंगल्यात महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्य सेनानी म्हणून त्यांना सन्मानपत्र दिलेले आहे.

दादासाहेबांनी सत्तेच्या, आर्थिक जोरावर दलितांच्या जमिनी बळकावल्या, त्या विरुद्ध नाना सिरूर व कॉलेजातील प्रा. सीताराम वैराट सत्याग्रह करून आवाज उठवितात. त्या वेळी दादासाहेब दिल्लीवरून येऊन त्या प्रकरणाची सारवासारव करतात,असे ते मुरब्बी व कसलेले राजकारणी आहेत. विरोधी गटाने कारखान्याच्या संचालकांनी आणलेला अविश्वासाचा ठरावही तितक्याच कुशलतेने फुसका ठरवितात. दादासाहेबांचा कटाक्ष असतो, डायरेक्टर बोर्डाच्या लोकांना खाण्या पिण्याची सोय चांगली असावी. समजदार व सक्षम एम.डी.हे करतात. नात्यातील आहेत हा योगायोगाचा भाग असेना त्याची सोय पाहतात. ते बडे प्रस्थ असल्यामुळेच त्यांच्या मुलीच्या विवाहासाठी, मंत्री, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, भारताचे गृहमंत्री आले होते.

भोईटे पाटील हेतूपूर्वक फुले-आंबेडकर विचार मंचाची स्थापना करतात व त्यांच्या अध्यक्षपदी प्रा. वैराटाची निवड करतात. अशी कार्यकर्त्यांची फळी उभी करणे कामी त्याचा उपयोग होईल. धन, सत्ता असूनही कादंबरीच्या शेवटी नातू व्यंग घेऊन जन्मल्याने दादासाहेब अंतर्मुख होतात. अशी ग्रामीण भागातील सहकार, राजकारण क्षेत्रातील व्यक्तिरेखा समर्पकतेने साकार झालेली आहे.

### ८. बापूसाहेब देशमुख (ताम्रपट)

या कादंबरीतील तिसरी महत्त्वाची केंद्रवर्ती व्यक्तिरेखा बापूसाहेब देशमुख ही आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी ते नाशिक येथील उधोजी मराठा बोर्डिंगमध्ये शिक्षणासाठी असतात; परंतु त्यांचा स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष सहभाग नाही. स्वातंत्र्य चळवळीमुळे शाळा कॉलेजेस बंद झाल्यामुळे ते गावी येतात. त्यांनी रसज्ञपणे श्रेष्ठ साहित्य वाचणे, व त्यातलं सौंदर्य अनुभवण्यात मन गुंतविले होते. त्यांची आंदोलनाविषयीची भूमिका अशी- 'आता आंदोलनाच्या निमित्ताने देशभर साऱ्या शिक्षणसंस्था बंद पडून गेल्यात ही काही बरी गोष्ट नाही.' बापूसाहेब सरदार भवानराव निकमांच्या खाजगी ग्रंथालयात दुर्मिळ व उत्तम पुस्तकाचे वाचन करीत असत. नंतर ते मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजातून बी. ए. झाले व नंतर सरकारी विधी महाविद्यालयातून ते एल.एल.बी. ची परीक्षा देऊन वकिली व्यवसाय सुरू करतात. त्यांचा विवाह सरदार निकमांची फलटणची नात इंदिराराजे निंबाळकर यांच्याशी होतो. या विवाहासाठी निंबाळकरांचा विरोध असतानाही इंदिराराजे विवाहाचा निर्णय घेतात व तेव्हापासून निंबाळकर घराण्याशी त्यांचा फारसा संबंध राहिला नव्हता.

ॲड. बापूसाहेब देशमुख हे प्रख्यात फौजदारी वकील आहेत. ते इरगावच्या गहिनाजी कोळसे पाटलांची 'रेप'ची केस घेतात. 'देशमुख वकिलांनी केस घेतली म्हणजे जिंकलीच त्यात काही सवालच नाही इतका मशहूर फौजदार वकील झालाच नाही. खुशाल दुपारी खून करा आणि देशमुख वकिलाकडे जा. सुटका हमखास,' अशी त्यांची सगळीकडे प्रसिद्धी होती. त्यांचे नाव तालुक्यात गाजते आहे व पैसाही भरपूर.

बापूसाहेब, पत्नी इंदिराराजे व ढवळ गावचे भुजाडी मामा यांच्याच सल्ल्याने राजकारणात पडायचा विचार करतात म्हणूनच, ते वकिलीचा व्यवसाय हा नुसता व्यवसाय म्हणून न करता जनसंपर्काचे माध्यम म्हणून माणसे जोडण्यासाठी प्रयत्न करतात. म्हणूनच ते भुजाडी मामांची ओळख करून घेतात. तसेच त्यांचा असिस्टंट वकिल काशिनाथ ढोरमलचा विवाह जुळवून आणतात की, ते बुद्धिमान व कर्तबगार आहेत. ते भुजाडी मामाच्या

म्हणण्यानुसार काँग्रेस पक्षाचे काम करण्यास तयार होतात. ते आमदार दौलतराव शिंदे निवडणूक प्रचार सभेत भाषण करताना म्हणतात, ''काँग्रेसविषयी, आमच्या पक्षाविषयी जो पद्धतशीर गैरसमज लोकांत पसरविला जातो आहे तो आम्हाला दूर केला पाहिजे, त्यासाठी ही विनंती आहे.''

प्रचार सभेसाठी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आलेले असतात. त्या वेळी भुजाडी मामा बापूसाहेबांना घेऊन पूंजा पाटलांच्या वस्तीवर जातात. तेथे मुख्यमंत्र्याच्या हस्ते बापूसाहेबांच्या गळ्यात काँग्रेस पक्ष प्रवेशाची माळ घातली जाते. दुसऱ्या दिवशी पेपरात बापूसाहेबांच्या गळ्यातील माळेसह काँग्रेस पक्ष प्रवेशाची बातमी फोटोसह येते. ते बहुजन समाजाचे आहेत त्यामुळेच ते म्हणतात, ''आज बहुजन समाजातून नवे नेतृत्व उभे राहत आहे. खेड्यापाड्यातून आलेला वर्ग राजकारणात उभा राहू लागला आहे. नेतृत्वाच्या रस्त्यावर आहे. त्यामुळे या मंडळींचा (शहरी ब्राह्मणांचा) जळफळाट होत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. दौलतराव शिंदे यांसारखा तुमच्या-आमच्या पाठिंब्यावर उभा असणारा, तुमच्या-आमच्यातला माणूस हवा की समितीने उभा केलेला, पांढरपेशांचे प्यादे असलेला?'' यातून त्यांच्या बौद्धिक क्षमतेचे दर्शन घडते. काशिनाथ ढोरमल फोन करून त्यांना म्हणतात, ''कारखाना, राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या आपला पाया आधिक व्यापक आणि भक्कम करण्यासाठी ते एक फार प्रभावी साधन आहे... ते एक मोठे शक्तिकेंद्र आहे.''

तुकाराम भोईटे म्हणतात, ''उमेदवारी बापूसाहेब देशमुखांना मिळाली पाहिजे.'' त्यानुसार बापूसाहेब देशमुखांना उमेदवारी मिळते. त्या वेळी बुवासाहेब जाधवही उमेदवारी अर्ज भरतात; परंतु नंतर मुख्यमंत्री यशवंतरावांच्या सांगण्यानुसार जाधव उमेदवारी माघारी घेतात. बापूसाहेब निवडणुकीत विजयी होऊन आमदार व नंतर पाटबंधारे खात्याचे उपमंत्रीपदी आरूढ होतात. बापूसाहेब महसूल खात्याचे मंत्री म्हणून दादासाहेब भोईटेंच्या दलित जमिनी प्रकरणी विधान सभेत म्हणाले, ''सदर प्रकरणी तातडीने चौकशी करण्यात येत आहे. ती पुरी होताच योग्य ती कार्यवाही केली जाईल. त्याबाबत कोणाचीही गय केली जाणार नाही.'' यावरून त्यांच्या मातब्बर, व मुत्सद्दी अशा राजकारणी व्यक्तीचा प्रत्यय येतो. मंत्रीपदाच्या जोरावर बापूसाहेब तालुक्यात पंचायती, जिल्हा परिषदा निवडणूक प्रसंगी काळजीपूर्वक आपल्या कार्यकर्त्यांची वर्णी लागावी म्हणूनही प्रयत्न करतात.

१९७६ च्या आणीबाणीत त्यांचे मंत्री पद जाते. ते तेव्हा पोलीस स्टेशनमध्ये जातात. तेव्हा तेथील पोलीसही त्यांना अपमानीत करतो. बापूसाहेबांनी सोईचे राजकारण व समाजकारण करूनही त्यांना कुटुंबस्वास्थ मिळत नाही कारण त्यांचा मुलगा उदयसिंह त्यांच्या पुढे नवे नवे प्रश्न उभे करतो. अशी ही व्यक्तिरेखा बुद्धिमान, समंजस, धूर्त राजकारणी, प्रसिद्ध फौजदारी वकील, आमदार, मंत्रीपद मिळून शेवटी सामान्य व्यक्ती म्हणून त्यांचे चित्रण आलेले आहे.

**९. दादासाहेब नरसाळे पाटील (दुःखाचे श्वापद)**

दादासाहेब नरसाळे पाटील हे निवेदक 'मी' च्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष. संस्थेच्या पुष्कळ शाखा आहेत. माध्यमिक विद्यालय, आश्रम शाळा, अगदी अंगणवाड्याही आहेत. शिवाय नवीन एक इंजिनिअरिंग कॉलेजही चार वर्षांआधी त्यांनी सुरू केलंय. निवेदक म्हणतो- ''फारच मोठा पसारा आहे. एक हाती सारे सांभाळतात. शिक्षण महर्षी आहेत दादासाहेब. लोकही हल्ली प्रेमाने त्यांच्या नावापाठी हे बिरुद लावतात. रोज कैक लोकांशी संबंध. दादासाहेब वृत्तीने फारच सोशिक. या भागाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक पुनरुत्थानाचं कंकण त्यांनी हाती बांधलंय.'' दादासाहेबांच्या कॉलेजमध्ये निवेदक 'मी' नोकरीला आहे. तसेच उल्हासबाई त्यांच्याच संस्थेच्या शाळेत बालवाडी शिक्षिका म्हणून होत्या. शिक्षणसंस्थेचे चालक म्हणून दादासाहेबांची व्यक्तिरेखा कादंबरीत येते. असे हे थोर शिक्षण महर्षी दादासाहेब राजकारणी व खलनायक प्रवृत्तीचे आहेत. ते त्यांच्या संस्थेच्या शाळेत असलेल्या परित्यक्त्या उल्हासबाई चितार या शिक्षकेवर रविवारी सुट्टीच्या दिवशी रेप करून तिचा मर्डर करतात. अर्थात हे सर्व नियोजनबद्धतेने, तिने आत्महत्या केल्याचा बनाव ड्रायव्हरच्या मदतीने रचतात. उल्हासबाईच्या या केसमध्ये प्रारंभी श्रीमती गोपळे रस घेतात. हे लक्षात घेऊन दादासाहेब त्यांना जिल्हा परिषदेच्या राजकारणात आणून त्यांचे तोंड गप्प करतात; परंतु प्रा.वालझाडे सर या केसच्या मुळापर्यंत जाऊन या

प्रकरणाशी दादासाहेबांचा संबंध आहे असा शोध घेतात; पण अस्सल, अट्टल, मुरब्बी दादासाहेब प्रा. वालझाडे यांच्यामागे अनेक ससेमिरे लावून त्यांचे खच्चीकरण करतात. ते वालझाडे यांचा मुलगा धनूला व्हिडिओ सेंटरच्या गैर धंद्यात ओढतात व श्रीमती गोपाळे यांच्यावर निवेदकाने बळजबरी करण्याचा प्रयत्न केल्याचा खोटा आरोपही नामानिराळे राहून केला जातो. तसेच निवेदकाचे उद्योग थांबावेत म्हणून ते त्याला संस्थेचे सेक्रेटरी पद देतात. शाळा तपासणी कामानिमित्त निवेदकाविरुद्ध तेथील शिक्षकांची तक्रारही तयार करतात. तसेच निवेदकाची तरुण मुलगी शालिनीची व तुकाराम एखंडेच्या प्रकरणाचीही ते निवेदकास आठवण करून देतात. असे एक ना अनेक आरोप निवेदकावर घेऊन मर्डर केस खिळखिळी करण्याचा ते प्रयत्न करतात. असे हे भ्रष्ट राजकारणी लोक आपल्या मार्गात आड येणाऱ्या व्यक्तीला नियोजन करून कसे संपवितात याचा सुंदर नमुना म्हणजे दादासाहेब नरसाळे पाटील ही व्यक्तिरेखा होय. ते जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आहेत. तसेच त्यांनी सहकारी क्षेत्रातही कैक पदे भूषवली आहेत.

स्त्रीलंपट दादासाहेबांविषयीचे वर्णन उपरोधिकपणे आले आहे. एका स्त्री मेळाव्याच्या निमित्ताने 'मी' ला दादासाहेबांच्या रगेल व रंगेल व्यक्तिमत्त्वाची ओळख होते. त्या प्रसंगी एक जण म्हणतो, 'या सुमाराला शेजारी बसलेला त्याच्या शेजाऱ्याला म्हणाला, ''नरसाळे पाटील येणार होते त्याचे काय झालं वो?'' त्या वेळी हा शेजारचा म्हणे– की इथं न येऊनही पुष्कळ कार्य पाटीलसाहेब अशा महिलांसाठी करीतच असतात, त्यांना आधार देऊन हर प्रकारे वेळोवेळी अगणित रीतीने.

आपल्या सत्तेचा गैरफायदा घेऊन दादासाहेब उल्हासबाईच्या जीवनाची राखरांगोळी करतात आणि वर साळसूदपणे तिने आत्महत्या केल्याचे सांगतात. केस मधील सत्य बाहेर येऊ नये म्हणून ते फौजदाराची बदली करतात. ड्रायव्हर व साथीदाराचे जवाब फिरवले जातात व प्राध्यापक वालझाडेवर नको ते आरोप ठेवले जातात. या अशा राजकारणी व्यक्तींमुळे शिक्षणक्षेत्र कसे भ्रष्ट केले याचा नमुना आपणाला या व्यक्तिरेखेच्या रूपाने पाहावयास मिळतो.

दादासाहेबांच्या तरुणपणातील काही गंमतीदार कृत्येही निवेदकाच्या निवेदनातून आपणाला कळतात. त्यांचे चरित्र लिहिण्याच्या निमित्ताने 'मी' ला घटना कळतात. त्यांनी एका बलूच्या पोरीला आश्रय देऊन तिच्याशी संबंध ठेवून त्यापासून त्यांना मुले होतात, आणि वरून आपण त्या पोरीचे पुनर्वसन केले असे ते सांगतात. एक अतिशय पाताळयंत्री, कावेबाजी, स्त्रीलंपट म्हणून दादासाहेबांची व्यक्तिरेखा संपूर्ण कादंबरीत वावरताना दिसते.

प्रा. पठारे यांनी ही व्यक्तिरेखा सांकेतिक पद्धतीने कादंबरीत साकार केली आहे. कादंबरीच्या शेवटी 'मी' चे भाष्यातून दादासाहेबांच्या काळ्या कृत्याचे दर्शन होते. एक खलनायक म्हणूनच दादासाहेब नरसाळे कादंबरीत दिसून येतात. निवेदक 'मी', 'दुःखाचे श्वापद' या सत्याचा शोध घेत असताना दादासाहेब, पाताळयंत्री राजकारणी, दहशती व खलनायक दादासाहेब म्हणून आपल्या लक्षात राहतात.

**१०. रावसाहेब निकम (रथ)**

कादंबरीतील ही प्रमुख व केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. वाङ्मयीन पर्यावरणातील साऱ्या घटकांचा फायदा घेऊन इथल्या व्यवस्थेत पुढे सरकू पाहणारे रावसाहेब निकम हे महत्त्वाकांक्षी लेखक आहेत. ते जिद्दीने कष्टपूर्वक, ग्रामीण साहित्य चळवळ उभी करतात. त्याविषयी ते म्हणतात, ''कुणीतरी हे काम केलंच पाहिजे. व्यक्तिगत आकांक्षा आवडी निवडी बाजूला ठेवूनही!''

ते गोदानगरचे आमदार मोरे पाटील यांच्या आर्थिक आधाराने पाचवे ग्रामीण साहित्य संमेलन घेतात. संमेलनाच्या निमित्ताने वार्ताहर पारनेरकर त्यांना मुलाखती नंतर प्रश्न विचारतो– ''तुमची समाजात जाऊन काम करण्याची ऊर्मी नैसर्गिक की अनैसर्गिक? असेल तर कोणत्या स्वरूपात दाब त्या ठिकाणी कार्यरत असतात?'' या प्रश्नांनी त्यांच्या मनात अंतर्द्वंद्व सुरू होते. त्यांना वाटू लागते, की आपण साहित्यात दबाव गट निर्माण करून त्याचे अध्वर्यू बनत आहोत की काय? ग्रामीण भागातील बहीण सुरूबाई घरी (पुण्यास) येते. तिच्या दुःखद कर्म कहाणीने त्यांचे मन व्याकूळ होते. परत गावी निघताना तिने रावसाहेबांच्या पायावर डोके ठेवल्यावर म्हणतात– ''काय आशीर्वाद देऊ बाई तुला? तुझा मी शतशः अपराधी आहे.'' यातून त्यांच्या मनाची व्याकूळता लक्षात येते.

गोदानगराच्या साहित्य संमेलन प्रसंगी विविध

वक्त्यांनी मांडलेले विचार ऐकल्यावर रावसाहेबांच्या मनातील द्वंद्व अधिकच तीव्र होते. ते आपली भूमिका विशद करताना म्हणतात– ''कला निर्मितीच्या वेळी कलावंत हा फक्त कलावंत असतो तो इतर कुणी नसतो.'' अशी ते कलावादी भूमिका मांडतात.

तात्त्विक भूमिका मांडणारे आणि वैचारिक संघर्षाची भाषा करणारे लोक यांचाच रावसाहेबांना संताप येतो. 'कुणीही उठावं आणि आपल्या मनावर वचक ठेवावा! एवढे दुबळे आपण कधीपासून झालो? मला काय करायचं ते ठरवायला मी समर्थ आहे. तुम्ही मला काहीही सांगू नका.' यातून स्फोटकपणे म्हणतात, ''पारनेरकर... माझ्यावर नियंत्रण ठेवण्याचा तुम्हाला काय अधिकार? तुम्ही इमानाच्या गोष्टी काय म्हणून सांगता?'' असे रावसाहेबांच्या या मानसिक उद्रेकांचे, अंतर्द्वंद्वाचे व्यक्तिचित्रण प्रा. पठारे यांनी नेटकेपणाने केलेले आहे. या व्यक्तिचित्रणात ग्रामीण साहित्यिक 'आनंद यादव' यांचे काही अंशी प्रतिबिंब उमटलेले दिसून येते.

**११. हारण (हारण)**

ही व्यक्तिरेखा कादंबरीतील मुख्य व केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. ही व्यक्तिरेखा कादंबरीच्या प्रथम भागापासून ते अखेरपर्यंत विकसित होत जाणारी व्यक्तिरेखा आहे. ती नारायणची पत्नी व समिंद्राची आई आहे. हारण ही रूपवान स्त्री आहे. त्याचे वर्णन कादंबरीत येते. मुळातच हिरामण खाडे हा जो हारणचा बाप ज्याला पुष्कळ संतती होती... त्यातही एवढी गोरीपान लालस देखणी पोरगी त्याच्या घरात... हारणला लाभलेल्या अलौकिक सौंदर्यामुळे तिच्याकडे माणसे वेगळ्या नजरेने बघत. या सौंदर्यामुळेच नारायण खेमनर भरपूर व्याज देऊन 'हारण'शी लग्न करतो; पण मधूच्या हात धरण्याच्या कृतीविषयी दुबळेपणाने म्हणतो, ''हातच धरला ना? काही व्हत नायी'' (पृ.क्र. २९) तिला याचा धक्का बसतो. रात्री... तिचे सर्वांग पेटून निघालेले असताना त्याचे चिरगुटासारखे लोळागोळा होऊन पडणे तिला घृणास्पद वाटत असे. तरीही त्याची सगळी सुखदुःखे, त्याचे दुबळेपण, भलेबुरेपणा, त्याची कंजुषी ह्या सगळ्यासकट तिने त्याला आपला पुरुष म्हणून श्रद्धेने स्वीकारले होते.

ती दुष्काळी कामावर जाते तेथे तिला मस्टर कारकून चित्रकार दिगंबर फडणीसविषयी अंतरीची जाणीव होते; परंतु ती तेवढ्यापुरतीच.दरिद्री, व्यसनी नारायणला सोबले चे ५०० रु. देणे न झाल्यामुळे व तिचा व सोबल्याच्या संबंधाविषयी नवराही शंका व्यक्त करताच ती म्हणते, ''मी जाईन. मी इचारीन त्याला पाचसे रुपये? पाचशे रुपयांत तू बाईला इकाय निघाला? तूऽऽ! तू कोन मला इकनार? तुझा माझ्यावर काय हक्क? मी माझ्या मनाची मालकीन. मी कुठंही जाईन. मी हरिभाऊबरोबर जाईन.'' कंगाल, दरिद्री व दुबळ्या नारायणनेही तिच्या पातिव्रत्याविषयी संशय घेतल्यामुळेच ती नारायणचे घर सोडून निघून जाते आणि त्यामुळे गृहिणी, पत्नी व माता म्हणून असणारे तिचे सामाजिक स्थान कोसळते.

ती हरिभाऊ सोबलेबरोबर निघून जाते व संसार करू लागते. तिथे ती वटसावित्रीचे व्रत, पोथ्यापुराणे, व्रत वैकल्ये, प्रौढ शिक्षण असे सर्व करून प्रतिष्ठित महिला म्हणून वावरत असते; पण मधू खेमनर तेथे येताच ही प्रतिष्ठा गमावून बसण्याची शक्यता निर्माण होते. ती पुन्हा हतबल होते. सरते शेवटी या प्रकरणातूनच हरिभाऊचा खून होतो व ती पुन्हा एकाकी होते.

कादंबरीच्या तिसऱ्या भागात ती मुंबईला बनश्या भावाकडे चाळीत जाते. ती शारदाबाई सबनीसाकडे जात असते. तेथे पुन्हा धनिक चित्रकार दिगंबर फडणीस भेटतो व नंतर ती त्याच्याबरोबर संसार थाटते; परंतु पत्नी म्हणून असणारे समाजातील स्थान ती कादंबरीच्या प्रथम भागाच्या शेवटी गमावून बसल्याने ते सामाजिक महत्त्व तिला नव्याने प्राप्त होऊ शकत नाही. कादंबरीच्या प्रथम भागात दिगंबराविषयी सुरू झालेली अनाकलनीन कलात्मक वृत्ती कादंबरीच्या दुसऱ्या भागात प्रवाहीत राहून तिसऱ्या भागात पूर्णत्वास जाते.

आपल्या मुलीविषयी (समिंद्रा) तिला वाटणारे प्रेम कादंबरीच्या तीनही भागांत दिसून येते म्हणूनच ती तात्या बामणाच्या घरी आपल्या मुलीला भेटते. तिसऱ्या भागात ती मुलीला मुंबईला घेऊन जाण्याचा प्रयत्न करते; परंतु ती येत नाही असे बघून ती दुःखी मनानं निघून जाते. तिला मातृत्वाची इच्छा निर्माण होताना दिसते; परंतु जावयाच्या वाईट वृत्तीला तिचे सौंदर्यच कारण ठरते आणि त्यामुळे तिचे स्थान मुलीच्या नजरेतही कमी होते. तिच्या सौंदर्याच्या मोहात दिगंबर फडणीस तिचे चित्रे काढतो व ते चित्र पाहून तिला तेव्हा एक अनामिक हुरहुर धडधडते हृदय

आणि काही तरी नवे सुंदर, अनाकलनीय, पुष्कळ जगा वेगळे असे होऊ लागले, आणि जेव्हा गाव सोडून दिगंबर फडणीस जाताना तिला माळावर भेटतो तेव्हाही तिला हृदयातले काहीतरी वेगळे, खोल, आतले गमावल्यासारखे वाटले होते. असे स्त्री-पुरुष नाते संबंध कादंबरीत प्रकट होताना दिसतात.

हारण कष्टाळू वृत्तीची असून तिच्यात स्वयंनिर्णय घेण्याची क्षमता आहे. नारायणच्या वक्तव्याने ती त्याचा संसार सोडण्याचा निर्णय घेते. तसेच मुंबईला भावाकडे जाण्याचा निर्णय बापाला न जुमानता घेते. तसेच शारदाबाईच्या सल्ल्याने दिगंबरशी लग्न करण्याचा निर्णय घेते. प्रारंभापासून तारुण्यसुलभ आदिम भावनेने 'हारण' चे जीवन बंदिस्त झालेले आहे. त्यामुळे अखेरपर्यंत ती यातून बाहेर पडू शकत नाही. आदिम भावना व चिरतरुण सौंदर्यवती यामुळे 'हारण' घडते.

असामान्य रूपसुंदर, कलात्मक ओढ, नवऱ्याचे नैतिक अधःपतन व दुबळेपणामुळे ती त्याला सोडते, स्वयंनिर्णयक्षम, श्रद्धाळू, श्रमशील, परिस्थितीशी तडजोड करणारी, जिद्दी, धाडशी, संकटांना संयम व सहनशीलतेने सामोरी जाणारी, मुलीविषयी ममत्व जपणारी अशी 'हारण' ही व्यक्तिरेखा आहे.

प्रा. पठारे यांच्या कथात्मक कादंबरी लेखनात चित्रित झालेल्या व्यक्तिरेखा या दैनंदिन जीवनात अवतीभोवती वावरणाऱ्या वाटाव्या इतक्या जिवंत असतात. याचे कारण त्यांच्या साहित्यात चित्रित झालेल्या व्यक्ती या वास्तवातून निवडलेल्या तपशिलातून चित्रित झालेल्या असतात. त्यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा या विविध जातींतील, धर्मांतील, व्यवसायांतील, स्तरांतील व्यक्ती चित्रित होतात. त्यांच्या कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा ह्या शरीरवर्णनासहित चित्रित होतात; पण ही चित्रणे अत्यंत माफक शब्दांत केलेली असतात. त्यात साचेबंदता नाही. ते व्यक्तींची चित्रणे करत असताना अत्यंत नैसर्गिकपणे करतात. त्यामुळे ते स्वतः अमुक एक व्यक्ती चांगली आणि अमुक एक व्यक्ती वाईट अशी भूमिका व्यक्तिचित्रणात घेत नाहीत. ती व्यक्ती जशी जगते तशीच वास्तव स्वरूपात चित्रित करतात.

त्यांच्या कादंबरीत चित्रित झालेल्या व्यक्ती ज्या कृती करतात त्या कृतीतून आणि त्यांच्या सबंध चित्रणातून लेखक आपला जीवनविषयक दृष्टिकोन आविष्कृत करतो. उदा. 'हारण' या कादंबरीत चित्रित झालेल्या 'हारण' स्त्रीचे घेता येईल. हारण ज्या कृती करते, त्यापाठीमागे स्त्रीचे वस्तुमूल्य झुगारण्याची तिची प्रेरणा आहे, आणि सर्वांच्या पाठीमागे लेखकाचा स्त्रीचा व्यापक सहानुभावाने मानवतावादी विचार करणारा दृष्टिकोन आहे. त्यांनी पुरुष व स्त्री व्यक्तिचित्रे हेतुपूर्वक रंगवलेली जाणवतात. त्यांनी मानवी स्वभावाचे नमुने फक्त चित्रित न करता कादंबरीच्या आशयाची, व्यक्तिरेखांची साखळी निर्माण करून त्यांना आशयद्रव्याचेच रूप प्राप्त करून दिले आहे. त्यांच्या कादंबरीत छोट्याशा अवकाशपटलावर येणारी व्यक्तिरेखा ही कादंबरीच्या कथानकाला गतिमान करणारी असते. उदा. हारण मधील पोलीस.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) डॉ. भीमराव कुलकर्णी - 'कादंबरी घटना व रचना' 'मराठी कादंबरीची वाटचाल विशेषांक' (रौप्यमहोत्सवी वाटचाल १९४६ ते १९७१ ) कुलकर्णी ग्रंथकार पुणे. (पृ.१४९)

२) प्रा. रंगनाथ पठारे- 'रंगनाथ पठारेंची मुलाखत' डॉ. अनिल देवधरअनुष्टुभ मे/जून १९९१ (पृ.९)

३) डॉ. कुसमावती देशपांडे- 'मराठी कादंबरीचे पहिले शतक' १८५०- १९५० मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, दु.आ. १९७५ (पृ.१६)

४) डॉ. रविंद्र ठाकूर- 'मराठी ग्रामीण कादंबरी' (१८८०-१९९०) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे .प्र. आ. नोव्हेंबर १९९३ (पृ.८)

५) डॉ. राजन गवस- 'तिरकसपणातील सरळता' (संपा. डॉ. राजन, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, प्र. आ. १९९५ (पृ.५०)



**डॉ. जयराम खाडे**

सुस्नेह, सर्व्हे नं. ६५६, वारूळवाडी, नारायणगाव,
सिनियर कॉलेज रोड, भालगट हेरिहेजवळ,
ता. जुन्नर, जि. पुणे-४१०५०४,
चलभाषः ९९६०५३५१२७

# बा. द. सातोस्कर यांच्या कादंबरीतील कलावंत समाजाचे चित्रण

शुभांगी अनंत आसोलकर

**गोमंतकीय कलावंत समाजाच्या बा. द. सातोस्कर यांच्या कादंबरीतील चित्रणाविषयी मूलगामी निरीक्षणे नोंदविणारा समीक्षालेख.**

**१. प्रस्तावना**

आधुनिक कालखंडात मराठी साहित्यामध्ये एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीचे स्थान आहे. मराठी कादंबरीत ग्रमीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरीय जीवनातील विविध विषय चित्रित झालेले आहेत. सातोस्करांनी कादंबरी लेखन करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून गोमंतकातील बदलते वर्तमान आविष्कृत केले आहे. गोमंतकातील कलावंत समाजाचे प्रश्न बा. द. सातोस्कर यांनी कादंबरीतून मांडले आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात बा. द. सातोस्कर यांच्या कादंबऱ्यामध्ये चित्रित झालेले कलावंत समाजाचे प्रश्न, समस्या, समाजजीवन, संस्कृती, रूढी-परंपरा, चालीरीती आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांचा शोध घेतला आहे.

**२. बा. द. सातोस्कर यांचे कादंबरी लेखन**

बा. द. सातोस्कर हे १९६० पासून कादंबरीलेखन करीत आहेत. त्यांनी जाई, मेनका, अनुपा, आज मुक्त चांदणे भाग १ व २, अभिराम, वासुदेव इत्यादी कादंबरी लेखन केलेले आहे. त्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून गोमंतकातील राजकीय आणि सामाजिक संघर्ष चित्रित केला आहे. तसेच पौराणिक विषयावरील कादंबऱ्यांतून नवा अर्थ शोधला आहे. चित्रकला, संगीतकला, पुराणपुरुषांची चरित्रे, गोमंतकातील समाजकारण, राजकारण यांचे अचूक संदर्भ त्यांच्या कादंबरी लेखनातून आविष्कृत होताना दिसतात. गोमंतकीय राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक आशय आविष्कृत करताना समकालाचे साम्यक भान ठेवणारी दृष्टी आणि अभ्यासू वृत्तीचा प्रत्यय येतो.

गोमंतकातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय विषयाची नेमकेपणाने मांडणी करणारे कादंबरीकार म्हणून सातोस्कर यांची मराठी साहित्यात ओळख आहे. त्यांच्या 'जाई' आणि 'मेनका' या कादंबऱ्यांमध्ये कलावंत समाजाचे चित्रित झालेले अनुभवविश्व अनोखे आहे. त्यांनी कलावंत समाजाच्या जीवन वास्तवाचा, जीवन सत्याचा आविष्कार घडविला आहे.

**३. कलावंत समाज**

'कलावंत' हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर लोककलावंत येतो. मात्र जुना विशाल गोमंतक हा कणकवलीपासून गंगावळीपर्यंत पसरलेल्या भूभागात कलावंत हा देवालयांच्या आश्रयाने आपल्या कलेची उपासना करणारा एक समूह आहे. गोव्यात देवळांच्या आश्रयाने आणि तेथील विशिष्ट व्यवस्थेचा भाग म्हणून निर्माण झालेला कलावंत समाज हा गोमंतकीय हिंदू

समाजाचा एक वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. देवाची सेवा करून गणिकावृत्तीने राहणारी स्त्री म्हणजे 'देवदासी' होय. देवदासींत कलावंत, भावीण, बंदी अशा पोटजाती आहेत. गोमंतकातील कलावंत समाज हा एका विशिष्ट श्रद्धेतून निर्माण झालेला आहे. ज्या उच्चवर्णीयांनी यांना भोगदासी बनविले त्यातील बहुसंख्य गोव्यात सारस्वत होते हा एक योगायोग आहे. सिंधुसंस्कृतीतील मोहेंजोदडो हडाप्पा या शहरांतल्या स्नानगृहांत आणि आर्य संस्कृतीतील देवालयाच्या परिसरात ज्या देवदासी असत, त्यांचा शरीरसंबंध उच्चकुलीन वर्गाशी होत असे आणि गोव्यातील उच्चवर्ग म्हणजे सारस्वत होत. अगदी अलीकडे 'शेंस' घातलेल्या मुलीला कुलीन सारस्वत यजमान लभावा अशी घरच्या मंडळीची धडपड असे. याची दोन कारणे दिसून येतात. एक कारण हे की सारस्वत हा श्रीमंत व जमीनदार वर्ग असल्यामुळे तो आमरण आपल्या मुलींचा सांभाळ करील, असे त्यांना वाटते. दुसरे कारण सारस्वत समाज सुसंस्कृत, सुशिक्षित, कुलीन होता. त्यामुळे आपल्या रूपगुणयुक्त, गाननृत्य, कलाचतुर, सुशील, शालीन, कुलीन व सुसंस्कृत मुलीला सारस्वत जोडीदार मिळणे योग्य असे वाटे. देवदासी समाजातील कलावंतीण म्हणून जो प्रथम श्रेणीचा वर्ग होता आणि ज्याला पूर्वी गायक, गाण असे संबोधले जाई, हा समाज देवालयाच्या परिसरात राहत होता. उत्सवाच्या वेळी नृत्यगान करीत होता. या कलावंत समाजात मुलगी ही वंशवेल असते कारण तिच्या हातून घराचा खानदानीपणा, सुसंस्कृती, कलाभिरुची, देवतेची सेवा या चांगल्या गोष्टी परंपरेने टिकून राहतात.

गोव्यात श्रीमंत सारस्वतांच्या उपपत्नी किंवा अंगवस्त्रे असणे ही सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने स्वाभाविक गोष्ट समजली जाई. ही गोष्ट जाहीर डांगोरा पिटून केली जात नसली तरी चोरून करण्याइतकी नीच आहे असेही समजले जात नसे. या समाजाने सत्ता, संपत्ती, स्वास्थ्य व प्रतिष्ठा या कारणामुळे देवदासी पद्धतीचा आपल्या शिकारी प्रवृत्तीचे शमन करण्यासाठी फायदा उठविलेला दिसतो. केवळ सारस्वतांनीच देवदासीचे गणिकावृत्तीचे पोषण केले असे म्हणता येणार नाही. याशिवाय देवस्थानातील द्रविड पुजारी, गुरव, उच्चकुलीन मराठा व इतर यांचाही ही गणिकावृत्ती वाढीला लावण्यात आणि शोषण करण्यात हातभार असल्याचे दिसते. या शोषणातून मुक्त होत आज त्यातून एक वेगळा समाजगट तयार झाला असून त्यांना 'गोमंतक मराठा' समाज असे म्हटले जाते. या विषयी बा. द. सातोस्कर 'गोमंतक प्रकृती आणि संस्कृती' या ग्रंथात लिहितात, 'वीसएक वर्षे वेश्यावृत्ती ही निंद्य असल्याची जाणीव या समाजातील नेत्यांना झाली होती व नव्या पिढीवर शिक्षणाचे संस्कार करून त्यांना या व्यवसायातून खेचून बाहेर काढावे व लग्ने करून गृहस्थाश्रमी जीवन जगण्यास उत्तेजन द्यावे, असे प्रयत्न १९११ च्या सुमारास सुरू झाले होते. मुंबईत या समाजातील पिढी आधुनिक शिक्षण घेऊन सुशिक्षित झाली. स्त्रियांनाही देवालयातील महाजनांच्या व भाटकारांच्या मालकशाहीबद्दल घृणा उत्पन्न झाली. त्यांनी देवालयांशी असलेला सेवेकरी म्हणून संबंध सोडला. समाज नेत्यांनी गोव्यात व मुंबईत ज्ञातिसंस्था स्थापन केल्या आणि या सर्वांचा परिणाम 'गोमंतक मराठा' ही जात निर्माण होण्यात झाला.'[१] कलावंत समाजातील स्त्री पुरुषांनी लग्न करून गृहस्थाश्रमी जीवन जगावे म्हणून १९११ ते १९६१ या काळात मुंबईत आणि गोव्यात चळवळ झाली ती आज यशस्वी झालेली दिसते. या समाजाने देवस्थानातील सेवावृत्तीही सोडून दिल्यामुळे नृत्य गायनाऐवजी भजनांचा कार्यक्रम आखणे महाजन मंडळींना भाग पडले आहे. या जातीने आज शेंसविधी, गणिका व्यवसाय, देवालयातील सेवावृत्ती वगैरे जुन्या रूढी फेकून दिलेल्या आहेत.

### ४. कलावंत समाज आणि मराठी साहित्य

मराठी साहित्यिकांनी कलावंत समाजाचे प्रश्न मांडून त्यांची चळवळ बळकट करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. कलावंत समाजातील स्त्रिया मुंबईला जाऊ लागल्या, तेव्हा तेथील गुजराती शेठीयांशी व भाटियाशी त्यांचा संबंध आला. धकाधकीच्या व्यापारी जीवनात या श्रीमंत वर्गास विरंगुळ्याचे स्थान हवे होते. गोमंतकीय गणिकांची यजमानाबद्दलची एकनिष्ठा, ऋजुता, रसिकता, गानकुशलता, कलाप्रियता, बुद्धिमत्ता, वागण्यातील आर्जव आणि उच्चवर्गाला शोभेल अशी राहणी या गोष्टींमुळे गोमंतकीय तरुण कलावंतिणीशी प्रेमसंबंध जोडण्यास उत्सुक असे. 'संशयकल्लोळ' या गो. ब. देवलांच्या नाटकातील रेवती ही नायिका मुंबईतील अशाच एका गोमंतकीय कलावंत घराण्यातील स्त्रीवरून कल्पिलेली आहे, असे दिसते.

ना. के. शिरोडकर यांनी 'पांखर' १९४२ या कादंबरीमध्ये गोमंतकातील रूढीग्रस्त अशा कलावंत समाजाचे चित्रण

केले आहे. अमला या नायिकेचे बालपण, तिची गायनकला, व्यवसायातील तिचे पदार्पण अशी तिच्या जीवनातील परिवर्तने चित्रित केली आहेत. कथनात्मक शैलीतून अमला या कलावंतिणीच्या मुलीचे भयावह वास्तव आविष्कृत केले आहे.

बा. भ. बोरकर यांची 'भावीण' १९५० ही कादंबरी गोमंतकातील भावीण या समाजाची समस्या प्रभावीपणे प्रकट करते. भावीण समाजाकडे पाहण्याचा इतर समाजातील लोकांचा दृष्टिकोन, रूढी, परंपरा, लोकमानसाची घडण याबरोबरच मंदिर परिसरात वावरणाऱ्या लोकांचे रीतीरिवाज, पोषाख, चालणे, बोलणे यातून ही कादंबरी आकार घेते. शेवंती ही या कादंबरीची नायिका आहे. 'भावीण या देवदासी समाजातील स्त्रियांकडे बघण्याचा उच्चवर्गीय तसेच एकूण समाजाचा दृष्टिकोन हा अत्यंत हीन व तुच्छतेचा होता.'[२] भावीण समाजातील स्त्रिया पैशासाठी शरीरविक्रय करणाऱ्या, लोकांचे संसार उद्ध्वस्त करणाऱ्या आहेत या भावनेने लोक त्यांच्याकडे पाहत. मात्र शेवंती आपल्या सोज्ज्वळ वागण्यातून तो समज खोटा ठरवते. उदात्तता, एकनिष्ठा, त्याग ही मूल्ये कोणत्याही तथाकथित हीन समाजगटातसुद्धा असू शकतात हे या कादंबरीतून बोरकरांनी प्रकट केले आहे.

चंद्रकांत काकोडकरांनी 'तेथे कर माझे जुळती' (१९५८) या कादंबरीत कलावंत समाजाचे चित्रण केले आहे. रा. का. बर्व्यांची 'रसमुक्ता' (१९८१) या कादंबरीतही गोमंतकीय देवळांचा परिसर आणि गोमंतकातील सामाजिक प्रश्न मांडले आहेत. बा. द. सातोस्कर यांनी जाई आणि मेनका या कादंबऱ्यांमधून कलावंत समाजाचे प्रश्न मांडले आहेत.

देवल, बोरकर, दळवी, सातोस्कर आदी लेखकांनी कलावंत समाजातील विविध समस्या, त्यांचे शोषण आपल्या साहित्यातून आविष्कृत केले आहे. परिणामी या समाजाच्या समाजसुधारणा चळवळीस सामर्थ्य प्राप्त होऊन आज हा समाज गृहस्थाश्रमी जीवन जगत आहे.

५. बा. द. सातोस्कर यांच्या कादंबरीतील कलावंत **समाजाचे चित्रण**

बा. द. सातोस्कर यांच्या 'जाई' आणि 'मेनका' या कादंबऱ्यांमध्ये कलावंत समाजाचे चित्रण आलेले आहे. त्यांची 'जाई' (१९६१) ही पहिली सामाजिक कादंबरी आहे. लेखकाने कलावंत समाजापुढील अनेक प्रश्न, तत्कालीन गोमंतकातील सारस्वत पुरुषांचे वर्तन, तत्कालीन स्त्रीची स्थिती-गती या सर्व गोष्टींचे चित्रण जाई कादंबरीत अत्यंत प्रभावीपणे केलेले आहे. उपेक्षेच्या गर्तेत जीवन जगणाऱ्या कलावंत समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी भूमिका लेखकाने लेखन करताना घेतलेली आहे. 'जाई' ही कादंबरी लेखकाने केवळ तंत्रदृष्ट्या केलेली नाही तर ती गोमंतकीय प्रदेशातील मानवी जीवन, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा यांचा वेध घेणारी आहे. 'जाई' या कादंबरीत अशारीर प्रेमाचे महत्त्व पटवून दिले आहे. १९६१ हा या कादंबरीच्या कथानकाचा काळ आहे. कादंबरीच्या प्रास्ताविकात लेखकाने, 'ही बव्हंशी सत्यकथा आहे आणि अल्पांशी काल्पनिक आहे' असा दावा केला आहे. एकूण २२ प्रकरणांत विभागलेल्या या कादंबरीचे बहुतेक कथानक मुंबईत घडते. असे असले तरी त्यात गोमंतकाच्या सामाजिक - सांस्कृतिक जीवनाचे अनेक संदर्भ आलेले दिसतात. कादंबरीचे नायक आणि नायिका दोघेही गोमंतकीय आहेत. सुरेश कामत हा गोमंतकीय तरुण निवेदक कादंबरीचा नायक आहे. जाई या कलावंतीण मुलीचे त्याच्यावर उदात्त असे प्रेम आहे. शारीरिक मिलनाची अपेक्षा न ठेवणारी अशी ही नायिका आहे. ती प्रियकराच्या सुखातच आपले सुख मानते. आपण ज्याच्यावर प्रेम करतो तो विवाहित आहे हे माहीत असूनही त्याच्याबरोबरच त्याची पत्नी आणि मुलांवर प्रेम करणारी ही नायिका विलक्षणच वाटते.

जाईच्या शैक्षणिक जीवनातील आदर्श बनलेल्या नायकाच्या जीवनात जाई ही स्फूर्ती होऊन आलेली दिसते आणि म्हणूनच २५ वर्षांनंतर भेटलेली वासंती देशपांडे ही या नायकाच्या पूर्वस्मृती चाळवते. भा. रा. तांबे यांच्या 'पन्नास वर्षांनंतर' या कवितेची आठवण करून देणारे कथानक आधुनिक मूल्यव्यवस्थेशी संबंधित आहे. जुन्या-नव्याच्या संघर्षात सापडलेला नायक जाईसारखे निखळ प्रेम करू शकत नाही. जितकी प्रामाणिक, निष्ठावान, धीट अशी या कथानकातील जाई आहे, तितकाच भित्रा आणि कातडीबचाऊ वृत्तीचा हा नायक आहे. आधुनिक समाजातील नव्या स्त्रीपुरुष नातेसंबंधाचे चित्रण करताना गोमंतकीय समाजातील अनेक वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन घडते. याविषयी डॉ. सोमनाथ कोमरपंत लिहितात, 'गोव्यातील प्रादेशिक वातावरणाची पार्श्वभूमी

असलेली जाई ही दादासाहेबांची लक्षणीय कादंबरी. बदलत्या समाजातील स्त्री-पुरुष नातेसंबंधाचे चित्रण या कादंबरीत त्यांनी केलेले आहे. प्रेमभावनेचा प्रगल्भ आविष्कार जाईमध्ये आढळतो.'[३] कोमरपंत यांचे मत तंतोतंत लागू पडते. अशारीरिक प्रेम हा विषय लेखकाने अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. जाई कादंबरीत लग्नासाठी लावला जाणारा प्रसाद, कौल, कलावंत समाज आणि ब्राह्मण समाज यांचे आपसातील संबंध, गोव्यातील रूढी-परंपरा, संकेतांचे चित्रण करून तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविले आहे. तसेच तत्कालीन समाजव्यवस्थेचा आणि समाजातील प्रवृत्तींचा विचार केल्यास शिक्षणाने प्रगल्भ झालेली पिढी दिसून येते. त्या काळात स्त्री-पुरुष संबंधाला एक नवा अर्थ प्राप्त झाला होता. साहजिकच या काळाच्या पार्श्वभूमीवर सातोस्करांची 'जाई' ही कादंबरी साकार झालेली दिसते. या कादंबरीत कलावंत समाजाचे नेमके आणि वास्तववादी चित्रण आले आहे.

सातोस्कर यांची जाईची पूर्वपीठिका सांगणारी 'मेनका' (१९७८) ही दुसरी सामाजिक कादंबरी आहे. एकोणतीस प्रकरणांच्या या कादंबरीमधून एका गानतपस्विनीला गायनाची कला प्राप्त करून घेताना कोणकोणत्या अडचणी आल्या आणि तिने आपल्या जिद्दीने या अडचणीवर कशी मात केली हा विषय आला आहे. मंगेशीची देवदासी असलेल्या आवडूची कन्या मेनका तिने गानतपश्चर्येसाठी घेतलेले परिश्रम, तिला आलेले अनुभव आणि त्यातून स्वरसम्राज्ञी म्हणून तिला मिळालेली प्रसिद्धी असा तिचा एकूण संगीतजीवनाचा प्रवास कादंबरीतून आविष्कृत झाला आहे. गोमंतकातील सामाजिक विषमता व्यक्त झाली आहे.

गोमंतकातील कित्येक कलाकारांनी गोव्याबाहेर जाऊन अथक परिश्रम घेऊन कलाक्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. गोमंतकात असताना तथाकथित उच्चकुलीन समाजाची त्यांच्याकडे आणि त्यांच्या कलेकडे पाहण्याची हीन दृष्टी होती. आपली संपूर्ण हयात संगीत कलेसाठी घालवणारी, या क्षेत्रातील अनेक बरेवाईट अनुभव घेत आणि शेवटी आश्रयाशिवाय कलेचा विस्तार अशक्य आहे याची जाणीव होऊन तडजोड म्हणून विक्रमसिंहचा आश्रय घेणारी ही मनस्वी गानतपस्विनी मेनकाचे जीवन हा या कादंबरीचा विषय आहे. लेखकाने गोमंतकातील कलावंत समाजातील कलाकारांच्या वाट्याला येणारी सामाजिक अवहेलना आविष्कृत केली आहे. या विषयी डॉ. विद्या प्रभुसरदेसाई लिहितात, 'कादंबरीचे कथानक जरी एका संगीतजीवनाचा आलेख दाखवीत असले तरी लेखकाचा रोख गोमंतकातील एका विशिष्ट समाजगटातील कलाकाराच्या वाट्याला येणारी अवहेलना चित्रित करण्याकडेच असलेला दिसतो.'[४] प्रभुसरदेसाई यांचे निरीक्षण तंतोतंत लागू पडते. तसेच लेखकाने गोमंतकातील कलावंत आणि ब्राह्मण समाजाच्या पूर्वपार चालत आलेल्या संबंधावरही प्रकाश टाकला आहे.

जाई कादंबरीमध्ये देवदासी समाजाच्या मनात ब्राह्मण समाजाविषयी असणारी चीड व्यक्त होते. जाईच्या मावशी मेनका मंगेशकर या गानतपस्विनीला भेटायला गेलेल्या सुरेश कामतला मेनका म्हणते, "ते पूर्वीचे दिवस विसरा आता कामतसाहेब. आमच्या मुली या तुमच्या रखेल्या म्हणून एके काळी तुमच्या पायावर लोटांगण घालीत. आज लग्नाची तयारी दाखविली तरी त्या तुम्हाला पत्करणार नाहीत. ...राग तुम्हा बामणांचा. आमच्याकडं तुम्ही येता तेव्हा काही तरी लुटायचा तुमचा विचार असतो. तुमच्या वाडवडिलांनी आतापर्यंत आमची शरीरं लुटली. तुमच्या तावडीतून सुटका व्हावी म्हणून आम्ही मुंबईला आलो. आम्ही 'सेवेकरी' आणि तुम्ही महाजन, ब्राह्मण म्हणून तुम्ही देवाचे मालक! आम्ही सेवेकरी का झालो? केव्हातरी त्रेतायुगात जमिनीचा एक तुकडा आमच्या अंगावर फेकला होता म्हणून ! म्हणून आम्ही वंशपरंपरा तुमचे गुलाम? पण आम्हाला गुलाम कुणी केलं? आम्हांला अनीतीच्या मार्गाला कुणी लावलं? तुम्हीच ना? तुम्हा लोकांचा मला असा तिटकारा येतो."[५] जाईची गानतपस्विनी मावशी मेनका कलावंत समाजाची पिढ्यांपिढ्याची वेदना, मनातील खदखद व्यक्त करते. गोमंतकीय समाजव्यवस्थेत कलावंत समाजाचे असलेले स्थान, त्यांना दिली जाणारी हीन वागणूक, त्याच्याकडे पाहण्याचा भोगवादी दृष्टिकोन, परंपरेने चालत आलेली गुलामगिरी मेनकाबाई सुरेश कामतासमोर बोलून दाखवते. हा केवळ एकट्या मेनकाबाईवरचा अन्याय, अत्याचार नव्हता तर युगायुगांचा कलावंत समाजावरील अन्याय ती व्यक्त करीत होती. यातून कलावंत समाजाची ब्राह्मण समाजाविषयीची चीड, आकस प्रकट होतो.

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन 'मेनका' कादंबरीतून व्यक्त होतो. मेनका तळ्यात पडलेल्या साजूला वर काढते; परंतु साजूचे वडील गणूबाब मेनकेच्या थोबाडीत मारतात, तर आई साजूच्या मुस्कटात मारते आणि म्हणते, ''गाढवा, तुला हजार वेळा सांगितलं, त्या कलावंताच्या पोरीशी खेळू नकोस. तिच्या घरी जाऊ नकोस. ती कोण, आपण कोण, काही विचार! आज दिवसाढवळ्या जातोस. मोठा झाल्यावर काय करशील हे दिसतंच आहे.''[६] ब्राह्मण समाजातील स्त्रीच्या या व्यक्त होण्यातून कलावंत समाजाकडे उच्चवर्गीयांचा पाहण्याचा तुच्छतेचा दृष्टिकोन जसा व्यक्त होतो, तसा भारतीय समाजव्यवस्थेतील पुरुषप्रधान संस्कृतीत समस्त स्त्री जातीकडे पुरुषांचा पाहण्याचा दृष्टिकोन प्रकट होतो, तर कलावंत स्त्रीची पुरुषांविषयीची प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे, ''म्हारासारखे आम्हाला वागवणारे हे लोक रात्रीच्या वेळी आमच्या शेजेवर झोपतात, गोडगोड बोलतात.''[७]

कलावंत समाजातील स्त्रियांप्रमाणे पुरुषांच्या वाट्याला आलेली अवहेलना सातोस्करांनी चित्रित केलेली आहे. मेनका कादंबरीत ब्राह्मण समाजाकडून कलावंत समाजाचे होणारे शोषण लेखक व्यक्त करतो. गोमंतकीय समाजातील देवदासींचा उद्धार करून 'शेंस'विधी बंद करण्याची चळवळ उभारणाऱ्या समाजसेवकाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोलयेकरांचा भाटकारांचा अनुभव अत्यंत दाहक आहे. गोमंतकीय समाजव्यवस्थेत कलावंत समाजाची होत असणारी घुसमट लोलयेकर या पात्राच्या माध्यमातून लेखक आविष्कृत करतात. यात परखडपणा आणि तळमळ आहे. त्यांच्या मनात प्रस्थापित समाजव्यवस्थेविषयी प्रचंड चीड, असंतोष आहे. कलावंत समाजातील स्त्रियांनी समाजव्यवस्थेने दिलेले जिणे नाकारून जातीपाती नष्ट करून, शिक्षण घेऊन, लग्न करून गृहस्थधर्म स्वीकारला पाहिजे असे त्यांचे स्वप्न आहे.

कलावंत समाजातील स्त्रियांनी आपल्या वाट्याला आलेल्या जीवनापासून दूर राहावे, अशी अपेक्षा या समाजातील स्त्री करताना दिसते. पिढ्यान्‌पिढ्या हे रखेलपण सांभाळणे म्हणजे किती मानहानी आहे हे या स्त्रीजीवनाकडे पाहिल्यावर कल्पना येते. कधी नशिबाला दोष देत वाट्याला आलेले जिणे व्यथित करताना तर कधी बंड करताना हा कलावंत समाज दिसतो. प्रस्थापित विषमतेविषयी दुःख, वेदना, चीड, संताप कादंबऱ्यांतून व्यक्त झाला आहे.

गोमंतकीय समाज जीवनात जातिव्यवस्थेनुसार वर्गभेद असलेले दिसतात. प्रामुख्याने जुन्या काळी पैसेवाले जमीनदार ज्यांना गोव्यात 'भाटकार' असे म्हटले जाते,या वर्गातील बहुतेक पुरुष हे कामधंदा न करता मुंडकारांनी (कुळांनी) आपल्या श्रमाने मिळवून दिलेल्या संपत्तीवर सुखासीन जीवन जगतात. 'सुशेगाद' जीवन जगणारा हा समाज कुलवृद्धीसाठी घरातील वडीलधाऱ्या विचारानुसार आपल्या कुळाला साजेशा घराण्यातील स्त्रीशी लग्न करतात. मात्र आपल्या आवडीनिवडीनुसार रंगेलपणासाठी खुशाल एखादी कलावंतीण ठेवत असे. या समाजातील पुरुषांनी कलावंतीण ठेवणे ही गोष्ट समाजमान्य नसली तरी समाजबाह्य नव्हती. याउलट कलावंतीण ठेवणे हे श्रीमंती, प्रतिष्ठा आणि कर्तबगारीचे लक्षण मानले जाते.

'शेंस' म्हणजे नारळाच्या नवऱ्याला देव ब्राह्मणांच्या साक्षीने माळ घालण्याचा सोहळा असतो. 'शेंस' झालेल्या कलावंतिणीच्या वयात आलेल्या मुलीची 'हातलावणी' करून तिला कायमची पदरी बाळगत. गोमंतकीय समाजजीवनात पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव असलेला दिसतो. सातोस्करांच्या कादंबरीत कुटुंबात दबलेली मध्यमवर्गीय स्त्री जशी दिसते तशी खाणेपिणे, दागदागिने मिळाले म्हणजे सुखात राहावे, हे तत्त्व अंगात बाणवलेली उच्चवर्गीय स्त्रीही आढळते. तसेच अपमानित जीवन वाट्याला आलेली कनिष्ठ वर्गातील स्त्रीजीवनही चित्रित झाल्याचे दिसते.

मेनका कादंबरीतील गणूबाबची पत्नी ही उच्चवर्गीय स्त्री दागिन्यांनी मढवलेली स्वकेंद्रित अशी आहे. नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणाविषयी कधी मनातल्या मनात तर कधी उघडपणे विरोध दर्शविणाऱ्या तरीही प्राप्त परिस्थितीत सुख मानून राहणाऱ्या प्रातिनिधिक उच्चवर्गीय स्त्रियांचे प्रतिनिधित्व करताना दिसते. साजूला मारताना ''...बाप, आजा, पणजा यांनी केलं तेच तू करणार आहेस मला माहीत आहे. आमचा हा जन्म असाच''[८] असे म्हणून हुंदके देणारी गणूबाबची पत्नी उच्चवर्गीय स्त्रीजीवनाचे दर्शन घडविते. तसेच भारतीय समाजव्यवस्थेतील पुरुषप्रधान संस्कृतीत समस्त स्त्री जातीकडे पुरुषांचा

पाहण्याचा दृष्टिकोन यातून प्रकट होतो.

गोव्यात कलावंत समाज मंदिरात सेवेकरी म्हणून आहे. या समाजातील वयात आलेल्या मुलीची 'हातलावणी' प्रतिष्ठित व्यक्तीकडून केली जाते. त्यामुळे मुलींना इच्छा नसताना गणिका व्यवसायाच्या प्रवाहात ओढले जाते. मुलींची इच्छा शिक्षण घेऊन आपला नवा संसार करावा अशी असते. मात्र रूढी परंपरेनुसार भाटकार समाजातील श्रीमंत, प्रतिष्ठित यजमान पाहून तिला स्वाधीन केले जाते. गोमंतकातील उच्चकुलीन समाज यांचा अंगवस्त्रे म्हणून सांभाळ करीत. कलावंतिणी त्यागी, एकनिष्ठ, व्रती भावनेने जीवन जगतात. याविषयी बा. द. सातोस्कर लिहितात, 'नृत्य, गायन, वादन यात कुशल अशा कलावंतिणी होत. या वर्गातील स्त्रिया अतिशय बुद्धिमान, सुस्वरूप, प्रामाणिक व देवभोळ्या असतात. त्यातील काही स्त्रिया एकाच पुरुषाशी संबंध ठेवून नैतिक दृष्टीने चांगले जीवन जगतात.'[९] अशा समाजाचे उच्चवर्गीयांकडून केल्या जाणाऱ्या शोषणाचे चित्रण सातोस्करांनी केले आहे. एकंदर गोमंतक समाजजीवनातील पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे स्त्रियांचे शोषण झालेले दिसते. सारस्वत, भाटकार यांच्या धर्मपत्नींना सर्व काही माहीत असूनही आपल्या पतीविषयी कोणत्याही प्रकारची तक्रार करताना त्या दिसत नाहीत. भाटकार समाजातील सोशिक, संयमी स्त्री कादंबरीतून चित्रित करतात. कलावंत समाजाच्या शोषणाचे चित्रण सातोस्करांच्या कादंबऱ्यांतून आलेले आहे.

### ६. समारोप व निष्कर्ष

गोमंतकीय राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक आशय आविष्कृत करताना समकालाचे सम्यक भान ठेवणारी कादंबरी सातोस्करांनी लिहिली आहे. यातून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा वेध घेतला आहे. सातोस्करांनी कलावंत समाजापुढील अनेक प्रश्न, तत्कालीन गोमंतकातील सारस्वत पुरुषांचे वर्तन, तत्कालीन स्त्रीची स्थिती-गती, या सर्व गोष्टींचे चित्रण जाई कादंबरीत अत्यंत प्रभावीपणे केले आहे. मेनका कादंबरीमध्ये गोमंतकातील कलावंत समाजातील कलाकारांच्या वाट्याला येणारी सामाजिक अवहेलना आविष्कृत केली आहे. यातून लेखकाने गोमंतकातील कलावंत आणि ब्राह्मण समाजाच्या पूर्वपार चालत आलेल्या संबंधांवरही प्रकाश टाकला आहे. गोमंतकीय कलावंत समाजाचे प्रश्न, अडचणी, संस्कृती आदींचे सातोस्कर यांनी केलेले चित्रण लक्षवेधी आहे. गोमंतकीय रूढी-परंपरा, जातीभेद, उच्चनीचता हे विषय सातोस्कर यांनी नेमकेपणाने आणि हेच त्यांच्या लेखणीचे वेगळेपण आहे. त्यांनी पुरुषप्रधान संस्कृतीमुळे होणारे स्त्रियांचे शोषण चित्रित केले आहे. मराठी साहित्यविश्वात सातोस्करांचे कादंबरी लेखन महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण आहे असे वाटते.

### ७.संदर्भ

१. सातोस्कर, बा. द., गोमंतक प्रकृती आणि संस्कृती, खंड १ ते ३, पणजी गोवा, शारदीय प्रकाशन, पृष्ठ - २२५

२. डॉ. प्रभुदेसाई, विद्या, कादंबरी (लेख), डॉ. प्रभुदेसाई, विद्या, व रवींद्र घवी (संपा), २००३, (प्र. आ.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, पणजी, गोवा, गोमंतक मराठी अकादमी, पृष्ठ - ३३८

३. डॉ. सोमनाथ कोमरपंत, २००९, लोकभूमी, बोरकर-सातोस्कर-लोहिया विशेषांक, पृष्ठ- ३५

४. डॉ. प्रभुदेसाई, विद्या, कादंबरी (लेख), नाडकर्णी, एस. एस. व डॉ. कोमरपंत सोमनाथ,(संपा), २००३, (प्र. आ.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, पणजी, गोवा, गोमंतक मराठी अकादमी, पृष्ठ - १००

५. सातोस्कर, बा. द., १९६१, (प्र. आ.) जाई, पणजी, सागर प्रकाशन, पृष्ठ - २९-३०

६. सातोस्कर, बा. द., १९७८, (प्र. आ.) मेनका, पणजी, सागर प्रकाशन, पृष्ठ - ४४

७. सातोस्कर, बा. द., मेनका, तत्रैव, पृष्ठ - १६४

८. सातोस्कर, बा. द., मेनका, तत्रैव, पृष्ठ - ४४

९. सातोस्कर, बा. द., गोमंतक प्रकृती आणि संस्कृती, खंड १ ते ३, उनि, पृष्ठ - २१६

**शुभांगी अनंत आसोलकर**


अभ्यासक, गोवा विद्यापीठ, गोवा

चलभाषः ९५४५०४४२६४

email : parihoonmain1980@gmail.com

◆◆







पुण्यातील गेल्या पिढीतील
जुन्या, दुर्मिळ पुस्तकांचे विक्रेते
गनीभाई यांचे नुकतेच निधन झाले.
महाराष्ट्र साहित्य परिषदेने
त्यांच्या कार्याची दखल घेऊन
त्यांचा सत्कार केला होता.
मा. गनिभाईंना
म. सा. परिषदेच्या वतीने
भावपूर्ण आदरांजली.

# तमोहरा - अंधारातील प्रकाशधारा

**विजय शेंडगे यांच्या तमोहरा या कादंबरीचा परिचय करून देणारा लेख.**

**डॉ. रामचंद्र देखणे**




पुस्तकाचे नाव : **तमोहरा**
लेखक : **विजय शेंडगे**
प्रकाशक : **यशोदीप पब्लिकेशन्स**
पृष्ठे : **१७६**
किंमत : **२०० रुपये**

**श्री.** विजय शेंडगे यांची तमोहरा ही एक वेगळ्या धाटणीची कादंबरी आहे. साधारणपणे कादंबरीला एखादा नायक असतो आणि त्याच्याभोवती कादंबरीची कथा गुंफलेली असते. तमोहरा या कादंबरीचा नायक पुरुष नसून स्त्री आहे. ती पण एक स्त्री नाही तर तमोहरा या तत्त्वाने जोडल्या गेलेल्या तीन पिढ्यांच्या तीन स्त्रिया या कादंबरीच्या मुख्य नायकाच्या भूमिकेत उभ्या आहेत. त्या स्त्रिया आहेत म्हणून त्यांना नायिका म्हणता येत नाही तर त्या तिघीही कथानकाचा मुख्य प्रवाह असल्याने त्याच कादंबरीच्या नायक झाल्या आहेत. आजी, मुलगी आणि नात अशा तीन व्यक्तिरेखा तीन भूमिकांमधून कथेचा आत्मा ठरल्या आहेत. माधवी, साधना आणि गौरी ही तीन पिढ्यांमधली तीन रूपे लेखकाने वेगवेगळ्या अंगाने उभी केली आहेत आणि तमोहरा हे तिघींच्याही जीवनाचे एकात्मिक रूप आहे. तमोहरा म्हणजे अंधाराचा पराभव करणारी, अंधाराला हरवणारी, अंधारातही प्रकाशाचे कवडसे शोधणारी. अंधारावर मात करीत स्वतःची वाट धुंडाळणारी एक आत्मनिर्भरता होय. तीन व्यक्तिरेखांमधून तीन पिढ्यांमध्ये समर्थपणे उभी राहिलेली आत्मनिर्भरता अंधारातही पुढे जाण्याचा मार्ग शोधत आहे आणि तो मार्ग तिला गवसतो आहे. अंधार हा नियतीचा असो, परिस्थितीचा असो, वास्तवातील अन्यायाचा असो, संशयाचा असो, की

अज्ञानाचा, त्याला आपल्या कर्तृत्वाने, इच्छाशक्तीने, परिश्रमाने आणि दृढ निष्ठेने जी पराभूत करते तीच तमोहरा होते. एका कुटुंबातील तीन पिढ्यांशी जोडलेल्या तीन तमोहरांची ही एक सुंदर गुंफण आहे.

विदग्ध साहित्याची अभिव्यक्ती म्हणून वैश्विक साहित्याच्या भव्य प्रासादात काव्य, कथा आणि कादंबरी ही समृद्ध दालने आहेत. त्यातही वैश्विक साहित्याचे खूप मोठे दालन कादंबरी या साहित्यप्रकाराने व्यापले आहे. भाषा हा माणसाचा सर्वोच्च आणि सर्वोत्तम शोध आहे. माणसाला जेव्हा वाणी आली तेव्हा ती स्वरातून प्रकटली आणि नंतर शब्दातून. स्वरातूनही जे पहिले शब्द बाहेर पडले ते काव्य होऊनच जन्माला आले. साहित्याची निर्मिती ही काव्यामधून झाली आणि विस्तार कादंबरीतून. म्हणूनच भाषेचा उद्‌गार जेव्हा अंकुरतो तेव्हा कविता जन्म घेते आणि तो उद्गार जेव्हा विस्ताराने प्रसवतो तेव्हा कादंबरी अवतरते. भारतीय साहित्यातील एक आद्य कादंबरी ही देखील एका महाकवीची आहे. त्याचे नाव बाणभट्ट. इ.स. ६०० ते ६५० हा त्याचा कालखंड समजला जातो. दिव्य लोक भूतलावर आणून उभी करणारी एक महान कलाकृती 'कादंबरी' या नावाने बाणभट्टाने लिहिली. तिला दीर्घ कथानक असल्याने पुढे गद्य कथात्मक साहित्यालाच कादंबरी या नावाने संबोधले गेले. एखाद्या वाङ्मयकृतीचे नाव एखाद्या वाङ्मयप्रकाराला रूढ व्हावे हे मोठेपण बाणभट्टाच्या कादंबरीला लाभले आहे. कादंबरी हे सुद्धा प्रदीर्घ असे गद्यकाव्यच आहे. श्री. विजय शेंडगे हे वृत्तीने कवी आहेत. अनेक वर्षांच्या काव्यसाधनेनंतर त्यांना कादंबरी लिहावी वाटली आणि त्यांच्या सर्जनशीलतेचा एक वेगळा आविष्कार घडवावा असे त्यांना वाटले. संगीताच्या मैफलीत जसे एखाद्या रागातून दुसऱ्या रागात संचार करावा, यमनातून 'तोडी' किंवा जोगिया गाठावा आणि त्यातून रंगांच्या मिश्रतेचा आनंद मिळवावा असे गायकाला वाटते. तसेच लेखकालाही कविता लिहितानाच कथा, कादंबरी, ललित असा गद्य लेखनाचा राग आळवावा असे वाटते. तसे वाटणे नैसर्गिक आहे. विजय शेंडगे यांचा कविता ते कादंबरी हा प्रवास साहित्यातील मिश्र रागाच्या सौंदर्याची एक प्रशंसनीय अभिव्यक्ती ठरतो.

तमोहरा या कादंबरीचे कथानक एकीकडे तत्त्व, तर दुसरीकडे भावना अशा आडव्या उभ्या धाग्यांनी विणले आहे आणि जाणिवेचा पट उभा केला आहे.

माधवी ही अनाथाश्रमात वाढलेली मुलगी आहे. अगदी लहान असताना ती अनाथाश्रमात दाखल झाली आहे. ती तिथे कशी आली? कोणी आणून सोडली? हे कुणालाच ज्ञात नाही. जसं तिला कळू लागलं तसं या जगात आपल्याला कोणी नाही याची तिला जाणीव झाली. अनाथाश्रमातील बाईंनीच तिच्या नावापुढे स्वतःची जात लावली. वडिलांच्या जागी स्वतःच्या नवऱ्याचं नाव लावलं आणि आडनाव म्हणून स्वतःचं आडनाव दिलं. 'तुला कोणीही नसल्याने चाळीतल्या लोकांनीच तुला इथं आणून सोडलं.' हीच तुझी कहाणी असं आश्रमातल्या बाईंनी तिला सांगितलं. ती हुशार होती. आपल्या पार्श्वभूमीची आणि परिस्थितीची तिला जाणीव होती. आश्रमशाळेतील स्वयंपाकघरात काम करीत करीत ती मोठी झाली. तिच्या बाईंनी तिच्यावर संस्कार केले. माधवीने त्या संस्कारांचं सोनं केलं. आपल्या पाठीशी आर्थिक पाठबळ नसल्याची जाणीव असल्यामुळे तिने नर्सिंगचा कोर्स केला. तिला नोकरी लागली, आणि नियमाप्रमाणे अनाथाश्रम सोडावा लागला. तिचे लग्न ठरलं, आणि तिची माहिती घेण्यासाठी तिच्या सासरचे लोक आश्रमात आले. माधवीच्या बाई तिच्याविषयी संपूर्ण माहिती देतात आणि मुलाविषयी जेव्हा विचारतात तेव्हा, 'मुलाचे आई वडील दोघेही अपघातात दगावल्याचे समजते.' बाई तिला जाताना मायेचे दोन शब्द सांगतात, ''माधवी, घाबरू नकोस. तू हुशार आहेस. नियतीने नाही पण माणसांनी तुझ्या आयुष्यात अंधार पेरला आहे; पण तुझ्या आयुष्यातील अंधार तुलाच दूर करायचा आहे. तुलाच तुझ्या आयुष्याची तमोहरा व्हायचं आहे.''

माधवीच्या नवऱ्याचं नाव भास्कर. त्यालाच कादंबरीत पुढे 'अण्णा' या टोपणनावाने संबोधलं गेलं आहे. माधवीचं भास्कर बरोबर लग्न होतं; पण काही दिवसांतच माधवीला समजतं, की भास्करची आई दुसऱ्याचा हात धरून पळून गेली आणि त्या धसक्याने भास्करच्या वडिलांनी रेल्वेखाली आत्महत्या केली. याचा भास्करच्या मनावर विपरीत परिणाम झाला. काकाने त्याला वाढवलं; पण तरीही काहीसा मनोरुग्ण असल्याप्रमाणे भास्कर एकांगी विचार करू लागला. एकलकोंडा झाला. तो जगातील सगळ्याच स्त्रियांकडे संशयी नजरेने बघू लागला. माधवी नोकरी करत होती. दोघांच्या संसाराला माधवीचा हातभार लागत होता; परंतु भरलेला संसार अर्ध्यावर सोडून पळून गेलेल्या आपल्या आईची भास्करला आठवण व्हायची आणि आपली बायकोदेखील कुणाबरोबर पळून तर जाणार नाही ना अशी शंका यायची. त्या भयाने पछाडलेला भास्कर माधवीला नोकरी सोडायला सांगतो. माधवी नकार देते तेव्हा भास्कर

आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न करतो, आणि आपल्या नोकरीपेक्षा आपला संसार महत्त्वाचा मानून माधवी नोकरी सोडते. पुढे अनेक अरिष्टांची मालिका उभी राहाते. दारिद्र्य, तुटपुंजा पगार, उपेक्षा, तिच्या शिक्षणाची कुणालाच चाड नसणे, अशा अनेक बाबतीत माधवी आहे त्या स्थितीशी जुळवून घेते. प्रपंच रेटत राहाते. पुढे अनेक विपरीत प्रसंग घडतात. अंधाराचे ढग दाटून येतात; पण आश्रमशाळेतील संस्कारांमुळे आणि मनाच्या दृढतेमुळे ती स्वतः तमोहरा बनून संकटांवर मात करत राहते. दुःखाचा संसार आनंदी करते. तिला तीन मुली होतात. त्यातली थोरली साधना. माधवीने मुलींना गरिबीची जाणीव करून दिलेली असते आणि त्यांच्यावर उत्तम संस्कार केलेले असतात. तरीही तारुण्यसुलभ भावनेतून कॉलेजात शिकणारी साधना एका तरुणाच्या प्रेमात पडते. त्याच्यासोबत फिरताना अण्णा म्हणजे साधनाचे वडील बघतात. ही पण माझ्या आईप्रमाणेच त्या मुलाचा हात धरून पळून जाणार आणि तसं झालं तर मी नक्कीच आत्महत्या करीन, रेल्वेखाली जीव देईन असा माधवीला दम भरतात. माधवी साधनाची समजूत काढते, आणि साधना आई-वडिलांपेक्षा प्रेम मोठं नाही असं म्हणत तिच्या प्रियकराला नकार देते. अण्णांनी दाखवलेल्या मुलाशी लग्न करते; पण भविष्यातील सुखी संसाराची स्वप्ने बघणाऱ्या साधनाची सारीच स्वप्ने कोलमडून पडतात. तिची फसवणूक झालेली असते आणि तिच्या आयुष्याचाही खडतर प्रवास सुरू होतो. त्या परिस्थितीचं वर्णन लेखकाने फार मार्मिक शब्दांत केलं आहे. लेखक लिहितात - 'डोळ्याला दिसणारा प्रकाश प्रत्येकवेळी पायाशी असणाऱ्या अंधारापर्यंत पोहोचतोच असं नाही. काहीवेळा तो प्रकाश मृगजळ ठरण्याची शक्यता असते. प्रकाशाच्या मृगजळाच्या मागे धाव घेणाऱ्या मृगाचा धावता धावता छातीचा भाता फुटायची वेळ येते, आणि प्रकाशाचा अंदाज न येता निव्वळ अंधाराच्या पखाली वहाण्यात जीव जातो.' अशीच काहीशी अवस्था साधनाची होते; परंतु आईच्या संस्कारांची भक्कम शिदोरी तिच्या कामी येते. सासुरवास, शारीरिक कष्ट, प्रेमाच्या ओलाव्याचा अभाव आणि कुठल्याही भूमिकेतून सुसंगत नसणाऱ्या नवऱ्याबरोबर करावा लागणारा प्रपंच, तिच्या सौंदर्याकडे आणि तारुण्याकडे वेगळ्याच भूमिकेतून पाहणाऱ्या लोकांची दृष्टी, मुलगी झाली म्हणून सासू-सासऱ्यांनी केलेला अमानवी छळ, त्या छळाला कंटाळून साधनाचे घर सोडणे, स्वतंत्र राहणे, जॉब करून मुलीला वाढवणे, तिच्यावर संस्कार करणे अशा रीतीने माधवीनंतर साधनाच्या रूपात तमोहराचे दुसरे रूप प्रत्ययास येते.

एकीकडे आपण नोकरी सोडली नाही तर नवरा आत्महत्या करेल, त्यामुळेच नोकरीपेक्षा संसार अधिक महत्त्वाचा असे मानून आपल्या नोकरीवर तुळशीपत्र ठेवणारी माधवी भेटते, तर दुसरीकडे संसार कडेला नेण्याचा आटोकाट प्रयत्न करून देखील अपयश पदरी पडतं आहे हे लक्षात आल्यावर संसारावर लाथ मारून नोकरी करणारी आणि स्वतःच्या पायावर उभी राहणारी साधना भेटते. ही तमोहराची दोन रूपं दोन टोकाची आहेत; पण अवास्तव नाहीत. स्त्रीने परिस्थितीनुरूप निर्णय घ्यायला हवा याची जाणीव लेखकाने या दोन रूपांतून करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

तिसऱ्या पिढीतील तमोहरा म्हणजे साधनाची मुलगी गौरी. अत्यंत प्रतिकूलतेतही साधना गौरीला जपते. शिकवते, उत्तम संस्कार देते. उपजत हुशार असणारी गौरी पदवी परीक्षेत कॉलेजमध्ये पहिली येते. स्पर्धा परीक्षेतही उत्तम यश मिळवते. प्रशासकीय अधिकारी होते. तिच्या कॉलेजात असणाऱ्या तरुणाच्या प्रेमात पडते. तोही स्पर्धापरीक्षा देतो. अधिकारी होतो. साधनाच्या प्रेमात अण्णा खोडा घालतात; पण तीच साधना प्रेमात पडलेल्या गौरीच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. एक तमोहरा आई वडिलांच्या प्रेमासाठी आपल्या प्रेमावर तुळशीपत्र ठेवते; तीच साधना पुढल्या पिढीतील तिच्या मुलीच्या प्रेमाला पाठबळ पुरवते; परंतु गौरी ज्या डोळसपणे प्रेमात पडते तशाच रीतीने मुली प्रेमात पडल्या तर आई-वडील नक्कीच मुलांच्या प्रेमाला पाठबळ देतील हे विजय शेंडगे यांना सुचवायचं आहे.

एव्हाना गौरीचे आजी आजोबा म्हणजेच माधवी आणि अण्णा हे जग सोडून गेलेले असतात. आनंदाची बरसात होत असतानाच साधना आपल्या नातवासाठी म्हणजेच गौरीच्या मुलाचा सांभाळ करण्यासाठी व्हॉलेंटरी रिटायरमेंट घेते, आणि एका आनंदाच्या क्षणी नातवाला मांडीवर झोपवताना साधना या जगाचा निरोप घेते. आजी आणि आई या दोन पिढ्यांमधील तमोहरांनी भोगलेल्या कष्टाचे खरे चीज होते. माधवी आणि साधना या दोन तमोहरांनी अंधाराच्या वाटेवरून केलेला प्रवास गौरीच्या रूपात उजेडाच्या गावाला जाऊन पोहोचलेला असतो. आत्यंतिक गरिबी, प्रतिकूलता, उपहास या साऱ्या अंधारातून संस्कार आणि मूल्ये घेऊन प्रकाशाची वाट जणू उजळून निघते. कृतज्ञतेची किरणे अंगावर घेत गौरी आजीच्या आश्रमशाळेला मोठी देणगी देते. त्या आश्रमशाळेवर 'तमोहरा आश्रमशाळा' असा बोर्ड

झळकू लागतो आणि कादंबरी संपते.

ही तीन पिढ्यांची जीवनकथा मांडताना अनेक लहान मोठे प्रसंग लेखकाने अत्यंत खुबीने मांडले आहेत. ही कथा जेवढी सरळ वाटते तेवढी त्या तमोहरांची वाटचाल सरळ नाही. ती खडतर वाटचाल उभी करताना श्री. शेंडगे यांनी अनेक प्रसंगांची सुंदर गुंफण केली आहे. कुठलाही प्रसंग कथानकात ओढून ताणून आणला आहे असे वाटत नाही. सगळेच प्रसंग अत्यंत स्वाभाविक आणि कथानकाचा अविभाज्य भाग वाटतात. त्यामुळेच संपूर्ण कथानकात वाचकाला बांधून ठेवणारा एकजिनसीपणा आला आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी, स्वतःच्या उपभोगासाठी, स्वतःच्या सुखासाठी थोडीसुद्धा सहनशीलता न दाखविणारी आणि भावना बोथट करणारी अनेक स्त्री पात्रे कथा-कादंबऱ्यांमधून, मालिकांमधून आपण बघत असतो. थोडेसे पटले नाही किंवा मनासारखे घडले नाही तर लगेच घटस्फोट घेऊन मोकळे होणारे स्त्री-पुरुष पाहिले की आपली लग्नसंस्था, कुटुंबसंस्था इतकी कमकुवत आहे का? असा प्रश्न उभा राहतो. कदाचित वास्तवात अशा कथा फार कमी प्रमाणात घडत असतील; पण साहित्यातून किंवा कलाकृतींमधून अशा मूठभरांचेच चित्रण करणाऱ्यांना समाजातील तमोहरा का दिसत नाहीत? सहनशीलता हे जणू स्त्रीला नियतीने बहाल केलेले एक मोठे तत्त्व आहे. सहनशीलता आणि क्षमा या बाबतीत स्त्री ही पृथ्वीइतकी व्यापक आहे. एका अर्थाने स्त्री ही सहनशीलतेची आणि क्षमेची क्षिती आहे. सहनशीलतेच्या बळावर जगातल्या कोणत्याही अंध:कारातून वाट काढणारी 'स्त्री-क्षिती' लेखकाने तमोहरामध्ये उभी केली आहे. म्हणजे स्त्रीने नेहमीच सर्व आघात सहन करीत सहनशीलतेचा आदर्श उभा करावा आणि पुरुषांनी मात्र संवेदनाशून्य व्हावे असा त्याचा अर्थ नाही. साधनाच्या रूपात एका मर्यादेपर्यंत अन्याय सहन करणारी आणि असह्य झाल्यावर संसाराला ठोकर मारणारी स्त्री लेखक विजय शेंडगे यांनी समर्थपणे उभी केली आहे.

ही कथा उभी करताना काही प्रश्न अनुत्तरित रहातात. उदाहरण द्यायचे तर साधनाच्या वडिलांना आपल्या मुलीचे प्रेम आणि तिने एखाद्या तरुणाबरोबर पळून जाऊन लग्न करणे मान्य नसल्याने ते त्यांच्या दूरच्या नात्यातील एका मुलाशी तिचे लग्न लावून देतात. त्यात त्यांची आणि तिची फसवणूक होते. मुलगा दाखवताना मुलाचा फ्लॅट दाखवलेला असतो, मुलगा बँकेत नोकरीला आहे असं सांगितलेलं असतं. प्रत्यक्षात मात्र लग्नानंतर साधनाला नववधू म्हणून चाळीतल्या खोलीत प्रवेश करावा लागतो. मुलाला कायमस्वरूपी नोकरी नसते, जी असते ती शिपाईवजा नोकरी असते. साधना ही पदवीधर पण तरीही तिला घरात चालवल्या जाणाऱ्या खानावळीत पोळ्या लाटण्याची, पंगतीला वाढण्याची, पंगतीतल्या लोकांच्या नजरा झेलण्याची, भांड्यांचा पाळा घासण्याची वेळ येते. त्या प्रसंगाचे शब्दचित्रही लेखकाने अत्यंत ताकदीने उभारले आहे; परंतु आपल्या मुलीने पळून जाऊ नये असं वाटणाऱ्या तिच्या वडिलांनी मुलीसाठी स्थळ निवडताना पुरेशी माहिती का घेतली नाही? किंवा साधनाला मुलगी झाली हे समजल्यावर तिची सासू लगेच स्वतःच्या मुलाच्या दुसऱ्या लग्नाचा विचार कशी करते? सोन्यासारखी सून घरी असताना मुलगा व्हावा म्हणून कोणतीही वाट न पाहता सासूने स्वतःच्या मुलाच्या दुसऱ्या लग्नाचा केलेला विचार पटत नाही; पण कथा पुढे सरकण्यासाठी ते प्रसंग उपयुक्त ठरत असावेत आणि म्हणूनच लेखकाने त्या प्रसंगांची योजना केलेली असावी.

जीवन जगताना दाटून येणारे अंधकार हे स्त्रियांसारखेच पुरुषांच्याही पुढे उभे राहत असतील; पण मुळातच काही अंशी मुक्तता लाभलेल्या पुरुषाला समाज, भाऊबंध, मित्र, आप्त यांच्याकडून तसा फारसा त्रास होत नाही. जो त्रास त्याच परिस्थितीत वाटचाल करणाऱ्या स्त्रीला मात्र प्रकर्षाने होत असतो. तरीही आयुष्यातला अंधार दूर करण्याचा प्रयत्न करणारी एक तमोहरा आपल्या हातातील ही ज्योत पुढच्या पिढीच्या हाती देत आहे आणि 'तमोहरांची' म्हणजे सहनशीलता आणि प्रयत्नवादाच्या स्त्री शक्तीची एक परंपरा उभी राहत आहे. ही कादंबरी केवळ व्यक्तीदर्शी नसून तत्त्वदर्शी आहे म्हणून कोणत्याही संकटात न डगमगता संस्काराच्या बळावर अशा अंधकाराला 'मागे हो' असे ठामपणे बजावणारी तमोहरा, समाजाचा एक खरोखरीचा पुरुषार्थप्रधान आदर्श आहे हेच लेखकाला सांगायचे आहे. या वाङ्मयकृतीबद्दल श्री. विजय शेंडगे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**डॉ. रामचंद्र देखणे**
पुणे.
दूरध्वनी : ०२०- २४४६७८९९

◆◆

# शतकभरातील काव्यसमीक्षेचा चिकित्सक व सर्जनशील आविष्कार

डॉ.सुजाता शेणई

**काव्यसमीक्षक डॉ. नीलिमा गुंडी यांच्या 'काव्याचा भावार्थ' या समीक्षाग्रंथावरील समीक्षा लेख.**




पुस्तकाचे नाव : **काव्याचा भावार्थ**
लेखक : **नीलिमा गुंडी**
प्रकाशक : **शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.**
प्रथम आवृत्ती : **२०२०.**
पृष्ठे : **२१०**
मूल्यः **३२५ रुपये**

**क**विता, बालकविता, समीक्षा, संपादन व अन्य साहित्यप्रकार सक्षमतेने हाताळत मराठी साहित्यात नीलिमा गुंडी यांनी स्वतःची विशेष ओळख निर्माण केली आहे. सातत्याने नवनवीन विषयांचा धांडोळा घेत अभ्यासपूर्ण लेखन करणे किंवा केलेल्या लेखनावर पुन्हा वाङ्मयीन संस्करण करून ते अद्ययावत करणे, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे साहित्यिक पैलू आहेत. या पैलूंतूनच 'काव्याचा भावार्थ' या पुस्तकाची निर्मिती झाली. काव्याचा विविध अंगाने विचार करणारे सतरा लेख ( जे पूर्वप्रसिद्ध होते.) यामध्ये समाविष्ट केलेले असून गेल्या शंभर वर्षांतील महत्त्वाचे कवी आणि काव्यप्रवाह यावर लेखिकेने यात भाष्य केले आहे. 'गतकाळाची गाज'(२०१९) या स्त्रियांच्या आत्मचरित्रावर आधारित असलेल्या त्यांच्या समीक्षात्मक पुस्तकाचा आवाकाही शंभरपेक्षा अधिक वर्षांचा आहे. 'गतकाळाची गाज' पुस्तकाला नुकताच महाराष्ट्र शासनाचा पुरस्कारही मिळाला आहे. काळाचा विस्तृत पट अभ्यासणे, समकालीन साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृतींचा अन्वयार्थ लावणे आणि त्यातील सामाजिक-सांस्कृतिक वीण समजून घेऊन सर्जनशील समीक्षा लिहिणे ही चांगल्या

समीक्षकाची वैशिष्ट्ये असतात, ती नीलिमा गुंडी यांच्यापाशी आहेत.

'काव्य' या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ 'प्रतिभास्पर्शित गेयरचना' तर 'भावार्थ'चा अर्थ 'तात्पर्य', 'सारांश' असा आहे. कवीने रचलेल्या काव्याचा, काव्यावर आधारित काव्यमीमांसेचा, वेगवेगळ्या काळात निर्माण झालेल्या काव्यप्रवाहांचा समीक्षकाच्या विविधांगी दृष्टिकोनातून व व्यासंगातून काढलेला मर्मग्राही सारांश म्हणजे 'काव्याचा भावार्थ' असे या पुस्तकाचे विश्लेषण केले तर ते यथार्थ ठरेल. यातील सतरा लेखांतून काव्याची, समीक्षेच्या विविध पद्धतींची ओळख तर होतेच; पण काव्याचा आस्वाद डोळसपणे घेता यावा यासाठी वाचकाने स्वतःला कसे समृद्ध करावे याचेही संस्कार नकळत होतात. ते तसे होत असल्याने समीक्षेविषयीची वाचकाची भीती दूर होण्यास हातभार लागतो. शतकभरातील काव्य आणि काव्यसमीक्षा यांच्या वळणवाटांच्या गतीची स्पंदने यात टिपलेली असून समीक्षेच्या नव्या दिशांची नांदीही यात वर्तवली आहे. कवितासंग्रह केंद्रस्थानी ठेवून केलेले समीक्षण, काव्याची सांस्कृतिक तसेच तौलनिक अंगाने केलेली समीक्षा, कवितेचे अनेक पैलूंनी केलेले रसग्रहण काव्याच्या आकलनाचे विविध घटक समजून घेण्यास मदत करतात. हे आकलन करून देण्यासाठी नीलिमा गुंडी यांनी विविध समीक्षा प्रणालींचे गरजेनुसार केलेले उपयोजन व संशोधन अभ्यासकांनी आवर्जून समजून घ्यावे असे आहे.

'गोल्डन ट्रेझरी' (१८६१) हे इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट गीते व भावकविता यांचे फ्रान्सिस टर्नर पालग्रेव्ह यांनी केलेले संकलन होय. या संकलनाचा आधुनिक मराठी काव्याच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. कवी वि.मो.महाजनि, केशवसुत, माधव ज्युलियन यांच्या काव्यावर आणि परिणामी या कालखंडावर 'गोल्डन ट्रेझरी' चा प्रभाव कसा पडला हे मांडताना या संग्रहातील प्रेमभाव, निसर्गसंवेदन, कवित्वशक्तीचे भान, नादसंमोहन, जीवनविषयक चिंतन या आशयसूत्रांचा मराठी काव्यावर उमटलेला ठसा कवी व त्यांच्या कवितांसह लेखिकेने विशद केला आहे. हे विशद करताना इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांच्या वाङ्मयाचा अभ्यास असणे गरजेचे आहे, तो नीलिमा गुंडी यांचा असल्याने ससंदर्भ विश्लेषण वाचल्याचा आनंद व 'गोल्डन ट्रेझरी' आणि आधुनिक काव्य यांचा सहसंबंध समजल्याचे समाधान वाचकाला मिळते. संशोधकाला तौलनिक समीक्षेचा वस्तुपाठ उलगडतो.

इंदिरा संत आणि पद्मा गोळे यांची स्त्रीकेंद्री ते स्त्रीवादी होत गेलेली कविता याचा आलेख मांडत असताना त्यांच्या व्यक्तिगत जीवनाचा त्यांच्या काव्यावर झालेल्या परिणामांची लेखिका सोदाहरण चर्चा करते. इंदिरा संत यांचे काव्यलेखन १९३१ पासून तर पद्मा गोळे यांचे लेखन १९४७ पासून सुरू झाले. त्या काळी जेव्हा स्त्रियांचे कवितालेखन म्हणजे 'एका खाजगी अवकाशाचा शोध' होता, तेव्हा स्वतःची ओळख फक्त इंदिरा किंवा पद्मा अशी ठेवून वैयक्तिक वेगळेपणाची नोंद घेण्यास या कवयित्रींनी भाग पाडले होते, त्या काळाच्या पार्श्वभूमीवर ते धाडसच म्हणावे लागेल. या तीनही कवयित्री कवितालेखन अतिशय गांभीर्याने करत होत्या. सुचले, स्फुरले, लिहिले अशी त्यांची कवितालेखनामागची धारणा नव्हती, तर 'स्व' आणि 'स्वेतर' चे अवकाश पकडण्याचा आणि त्याची प्रामाणिक कलात्मक निर्मिती करण्याचा त्यांचा ध्यास होता. वैयक्तिक जीवनाचे कंगोरे, अत्यंत मनःपूत केलेली काव्यनिर्मिती, त्यात अंतर्भूत असलेली सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये, समकालीन स्त्रीवर असलेली दडपणे व मर्यादा या व यांसारख्या आशयसूत्रांसह या तीनही कवयित्रींची कविता 'काव्याचा भावार्थ' मधून उलगडून दाखवली आहे. यातून काळाचा पट तर उभा राहतोच; परंतु तत्कालीन सामाजिक वातावरणही समजते. सुशिक्षित स्त्रीमनावर परंपरेचे असलेले संस्कार आणि त्याचवेळी असलेले नवविचारांचे आकर्षण ही द्वंद्वावस्था या कवयित्रींच्या कवितेतून येते. स्त्रीवाद हा वाद किंवा स्त्रीमुक्ती ही चळवळ नंतर चर्चेत आली; पण पद्मा यांनी त्यांच्या 'नीहार' (१९५४ ) या कवितासंग्रहात 'नाही मी नुसती मादी मी माणूस माणूस आधी' असा स्वतःच्या अस्मितेचा हुंकार व्यक्त केला आहे. हा हुंकार म्हणजे मराठी काव्यपरंपरेतील नव्या युगाची नांदी ठरला. 'ही नांदी का?' या प्रश्नाचे उत्तर लेखिका शोधते, आणि 'पद्मा यांची कविता तत्कालीन

सांस्कृतिक विश्वातील अनेक कंगोरे लक्षात आणून देत स्त्रीकाव्याच्या महत्त्वाच्या वळणाशी आपले नाते जोडून देते व तेच तिचे मोठे योगदान आहे,' असे भाष्यही करते.

पद्मा यांच्या कवितेने उद्धृत केलेल्या स्त्रीवादी काव्यप्रवाहाने पुढे चांगलाच जोम धरला. नीलिमा गुंडी या स्वतः कवयित्री असल्याने या काव्यप्रवाहाचा प्रभाव त्यांच्याही कवितांवर आहे. 'जगण्याच्या कोलाहलात'(२०१२) या त्यांच्या या दशकातील काव्यसंग्रहात याच्या छटा दिसतात. स्त्रीवादाच्या अनुषंगाने या पुस्तकात 'स्त्रीवादी काव्यप्रवाह', 'स्त्रीत्वाची तीन दर्शने', 'स्त्रीची परिदृष्टी आणि दोन कविता' आणि 'नव्वदोत्तरी बदलते सामाजिक संदर्भ आणि स्त्रीलिखित कविता' हे लेख आहेत. स्त्रीवादी जाणिवांचा प्रभावी आविष्कार कवयित्री मलिका अमर शेख यांच्या 'वाळूचा प्रियकर'(१९७९) या कवितासंग्रहातून ठळकपणे अधोरेखित झाला. स्त्रीवर धर्म-संस्कृतीने प्रक्षेपित केलेल्या सांस्कृतिक प्रतिमेचे मूर्तिभंजन करण्याचे काम या कवितासंग्रहातून केले गेले. स्त्रीच्या आत्मभानाचा प्रखर स्फुल्लिंग तर दिसलाच; परंतु स्त्री-पुरुष नात्यात 'प्रेम' या भावनेच्या नावाखाली झाकले गेलेले सत्तेच्या राजकारणाचे पवित्रे या कवितांमधून समोर आले. स्त्रीवादी कवितेने समाजमनाच्या नेणिवेपर्यंत पोहोचलेल्या मिथकांचे नव्या दृष्टिकोनातून पुनर्वाचन, अर्थनिर्णयन केले. सावित्री, अनसूया, रेणुका, अहल्या, सीता, द्रौपदी यांच्या पुराणकथांना नवे परिप्रेक्ष्य दिले. अगदी संत कवयित्री जनाबाईलाही संतत्व न देता तिचे मानुषीकरण केले. हे सारे करण्यामागे मुळात धर्म संस्कृतीला प्रश्न विचारण्याची धीट कलात्मक प्रवृत्ती लागते. ती वृत्ती व ते धाडस नीरजा, प्रज्ञा दया पवार, कविता महाजन, अंजली कुलकर्णी, शैला लोहिया, सिसिलिया कार्व्हालो या कवयित्रींमध्ये कसे आहे, याचे सोदाहरण विवेचन नीलिमा गुंडी करतात. स्त्रीवाद, स्त्रीवादी कवयित्री, स्त्रीवादी कवितेची आशयसूत्रे, एकूण काव्यपरंपरेवर झालेला त्याचा परिणाम या साऱ्याचा सोदाहरण ऊहापोह यानिमित्ताने या पुस्तकात एकत्रित वाचायला मिळतो. स्त्रीवादाचे महत्त्वाचे पैलू सांगतानाच त्याच्या मर्यादांचाही उल्लेख नीलिमा गुंडी यांनी केला आहे. त्या लिहितात, 'आजची स्त्रीवादी कविता आशयदृष्ट्या महत्त्वाची असली तरी तिच्या काही मर्यादाही आहेत. विशिष्ट केंद्रबिंदू ठरवून हेतुपूर्वकरीत्या लिहिताना काव्यातील आवश्यक त्या स्वाभाविकतेला झळ पोहोचताना दिसते. काही वेळा अभिव्यक्तीचा बाज काव्यात्म चिंतनाऐवजी केवळ विचारप्रक्षेपणाचा राहतो. कवितेत एकसुरीपणा येतो.' (पृष्ठ १२७) स्त्रीवादी कवितेच्या मर्यादा लक्षात घेऊनही स्त्रीच्या जगण्याच्या अवकाशातून तिला गवसलेली नवी जीवनदृष्टी आणि काव्यसृष्टी यामुळे स्त्रीवादी कवितेचा प्रवाह संपन्न होत आहे, पर्यायाने मराठी काव्यपरंपरा समृद्ध होत आहे.

'स्त्रीत्वाची तीन दर्शने' या लेखात स्त्रीविषयक जाणिवांचे मध्यवर्ती सूत्र घेऊन, तिच्या शारीर अनुभवांशी संबंधित असलेल्या हिंदी कवयित्री पद्मजा घोरपडे यांची 'एक स्त्री',(अनुवाद रश्मी हेबाळकर) हिंदी कवी चंद्रप्रकाश देवल यांची आसावरी काकडे अनुवादित कविता ( कवितेला शीर्षक नाही) आणि अनुराधा पाटील यांची 'खूपदा आपण' या तीन कविता घेतल्या आहेत. या तीन कविता एकत्रित घेऊन समकालीन भारतीय साहित्यपरंपरेत स्त्रीच्या मनोविश्वात व भावविश्वात काय खळबळ आहे याची जाणीव नीलिमा गुंडी करून देतात. वाचकाला स्त्रीप्रश्नाचे समकालीन तरीही शाश्वत रूपाचे दर्शन घडवतात. वाचकाची स्त्रीप्रश्नाकडे पाहण्याची संवेदनशीलता व सम्यक दृष्टीही वाढवतात. संशोधकाने किंवा अभ्यासकाने केवळ एकाच वर्तुळाचा विचार न करता अधिकाधिक वर्तुळांचा विचार करून त्याचा तौलनिक पट अभ्यासावा ही शिकवणही यातून मिळते.

कुसुमाग्रज हे मानवतेचे कवी होते. त्यांचा हा विशेष त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहात विशेषत्वाने जाणवला व पुढे वृद्धिंगत होत गेला. काळाची जिवंत स्पंदने पकडणे आणि स्थलकालातीत कवितेची निर्मिती करणे हे कुसुमाग्रजांनी कवितेतून रुजवले. या संग्रहातील 'कोलंबसाचे गर्वगीत' या कवितेच्या आधारे कुसुमाग्रजांनी मानवी संस्कृतीच्या विकासप्रक्रियेत समर्पणशील, ध्येयवादी आणि विजिगीषु वृत्ती किती आवश्यक असते हे दाखवून दिले आहे. 'विशाखा' ने काय दिले यापेक्षा मराठी काव्यपरंपरेत काय रुजवले हे महत्त्वाचे

आहे, त्याचाच शोध नीलिमा गुंडी यांनी 'विशाखा' मधील कुसुमाग्रज' या लेखातून घेतला आहे. कुसुमाग्रजांप्रमाणेच काव्यपरंपरेत बा.भ.बोरकर, विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर हे अतिशय महत्त्वाचे कवी आहेत. बोरकरांनी चितारलेल्या स्त्रीप्रतिमांचा वेध घेताना 'उर्वशी' दिव्य प्रतिमा', 'शरीरिणी स्त्रीप्रतिमा','भावजीवनाशी संबद्ध स्त्रीप्रतिमा' यांचा आढावा घेतला आहे. बोरकरांनी दीर्घ काळ लेखन केले; परंतु प्रतिमांमधली रोमँटिक प्रवृत्ती मात्र लौकिकापासून चार अंगुळे वरच राहिली असा निष्कर्ष यात दिसतो. 'एक कविता विंदांची' या लेखात त्यांची 'संसार' ही सोळा ओळींची कविता विश्लेषणासाठी घेतलेली असून संसारी स्त्रीबरोबरच संसारी पुरुषही मूक आणि सोशिक असतो हे वास्तव उलगडून दाखवले आहे. कवीला अस्वस्थ करणारे समाजवास्तवाचे एक अंशरूप दर्शन कवीने सूक्ष्मपणे व सखोलतेने रेखाटले, तर नीलिमा गुंडी यांनी त्याचे यथार्थ विवेचन करत विंदांच्या भूमिकेला न्याय दिला. 'सौंदर्यवादी कवी पाडगावकर' ज्यांच्या कवितांनी आणि गीतांनी निराश होणाऱ्या मनात चैतन्य पेरले, ज्यांच्या शब्दांनी आंतरिक श्रीमंती दिली ती आजच्या काळातही मोलाची आहे, हे या लेखातून जाणवते.

साठोत्तरी कवितेने एकूणच मराठी काव्यप्रवाहाला वेगळेच वळण दिले. दलित आणि ग्रामीण साहित्याने आतापर्यंत अलक्षित राहिलेले समाजजीवन शब्दांकित केले. वेदना आणि विद्रोह हे शब्द वास्तवात कसे जगले जात आहेत, ते दलित साहित्याने दाखवून दिले. या विद्रोहाची तीव्र जाणीव नामदेव ढसाळ यांच्या 'गोलपीठा' या काव्यसंग्रहात दिसली. 'नामदेव ढसाळांचे अंधारदर्शन' या लेखात हा कवी केवळ 'सामाजिक जगण्यातील अभावरूप अंधार पाहून थांबत नाही तर अनादिसिद्ध अंधारही आरपार न्याहाळतो' हे दाखवून दिले आहे. काव्यप्रवाह बदलले की त्याची समीक्षापद्धतीही बदलते. लेखक किंवा कवी समीक्षापद्धती डोळ्यासमोर ठेवून लिहीत नाही. आशयाला पूरक सहजस्फूर्त अभिव्यक्ती जेव्हा होते तेव्हा ती साहित्यकृती निर्माण होते. त्याचे समीक्षण करणे ही समीक्षकाची जबाबदारी असते. 'विसाव्या शतकातील आधुनिक काव्यसमीक्षा' यात केशवसुत-मर्ढेकर यांच्या काव्याची समीक्षा-स्वरूप आणि विश्लेषण यावर चिंतन करतानाच साठोत्तरी काव्यसमीक्षा, समीक्षाप्रणालींची विविधता, समीक्षेचे पर्यावरण या त्या अनुषंगिक महत्त्वाच्या मुद्द्यांचाही विचार केला आहे. एखाद्या शतकातील समीक्षा तपासणे हा खरे तर प्रबंधाचा विषय ठरू शकतो, त्याचा थोडक्यात आढावा येथे पाहावयास मिळतो. 'कवयित्री 'संजीवनी' ची स्वप्नसृष्टी' आणि 'एका सनातन प्रश्नाचा काव्यात्म शोध' हे लेख अजून सविस्तर व सखोल हवे होते, असे मात्र निश्चित वाटते. 'विडंबनपर काव्यःवाङ्मयीन टीकेचा नमुना' या लेखातून काव्यप्रवाहाची समीक्षा वाचावयास मिळते.

'काव्याचा भावार्थ' या पुस्तकातील मनोगतात लेखिकेने काव्याचा आस्वाद घेण्यासाठी वाचकाची बौद्धिक, भावनिक बैठक समृद्ध असणे आवश्यक असते, व ते समीक्षेपुढचे आव्हान ठरते, असे नमूद केले आहे. या सतरा लेखांमागील उद्देश वाचकांचे काव्यविषयक संवेदन अधिक तल्लख, अधिक सूक्ष्म व अधिक सखोल व्हावे हा आहे. हा उद्देश सफल ठरेल एवढे सकस लेखन यात झाले आहे. या पुस्तकाची अर्पणपत्रिका 'काव्याची अभिज्ञता वाढवण्यासाठी उपकारक ठरणाऱ्या सर्व घटकांना' अर्पण केली आहे. 'अभिज्ञ' म्हणजे जाणकार, विषयाशी परिचित असलेला. काव्याची अभिज्ञता वाढवणारे उपकारक घटक म्हणजे अनुवाद, भाषांतर, रूपांतर, काव्यसंवेदना, काव्यजाणिवा, काव्यप्रवाह, प्रतिमा इत्यादी आहेत. या साऱ्यांचा प्रत्यय या पुस्तकातून पुनः पुन्हा येतो व वाचकाची रसिक या पदापर्यंत उन्नती होते, हेच याचे यश आहे.


**डॉ. सुजाता शेणई**
चलभाष : ९०११०१७९१६
sujata.shenai@gmail.com

◆◆

# मनाचा तळ शोधणारा 'डोहतळ'

राजेंद्र भोसले

**मारुती कटकधोंड यांच्या 'डोहतळ' हा काव्यसंग्रहावरील परिचय लेख.**




पुस्तकाचे नाव : **'डोहतळ'** (काव्यसंग्रह)
लेखक : **मारुती कटकधोंड**
प्रकाशक : **शिवप्रज्ञा प्रकाशन, सोलापूर**
प्रथमावृत्ती–**१२ सप्टेंबर २०२०**
पृष्ठ संख्या– **१२८**
मूल्य –**१६०/–**

कवी मारुती कटकधोंड हे साहित्यक्षेत्रातील एक परिचित नाव. काव्यक्षेत्रात त्यांनी आपली विशिष्ट अशी नाममुद्रा उमटवली आहे. दरवर्षी अनेक दिवाळी अंक व नामवंत वर्तमानपत्रांतून त्यांच्या अनेक कविता रसिकांना मंत्रमुग्ध करतात. अनेक मानाच्या व प्रतिष्ठित साहित्य पुरस्कारांनी ते सन्मानीत आहेत.

नुकताच त्यांचा 'डोहतळ' हा काव्यसंग्रह प्रकाशित झालेला आहे. कोणत्याही कवीचं जगणं हे दुसऱ्यांची दु:खं व वेदना टिपण्यात व अभिव्यक्त करण्यात व्यतीत होतं. त्यामुळे कवी हा कोणा एका व्यक्तीचा, घराण्याचा किंवा जातसमूहाचा राहत नाही. कविता हीच त्याची जात व साहित्य हा त्याचा धर्म होतो कारण तो संपूर्ण मानव जातीचे प्रतिनिधित्व करत असतो. तो सर्वांच्याच हृदयात आपले स्थान निर्माण करतो. सर्वसामान्यांची दु:खे कवी अभिव्यक्त करत असल्यामुळे प्रत्येकाला कवी हा आपलाच वाटतो.

'डोहतळ' हा काव्यसंग्रहातील अनेक कविता पीडित, वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित घटकांचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. चंदन या पहिल्याच कवितेत ते म्हणतात, ज्यांचे जीवन अंधार

तयांसाठी व्हावे दीप
त्यांच्या काळोख्या मनाला

द्यावा उजेडाचा लेप

एखाद्याच्या वाट्याला अंधकारमय जीवन येते. केवळ दृष्टी नसलेल्या व्यक्तीस अंधार दिसतो असे नाही तर काहींच्या आयुष्यात अनेक संकटे येतात व त्याला आपल्या आयुष्याचा रस्ता अंधारमय भासू लागतो. त्याचा धीर खचतो. जगणे मुश्किल होते. पुढे जावे की येथेच थांबावे, अशी त्याची अवस्था निर्माण होते. कवीला अशा अंधारमय जीवन जगणाऱ्या व्यक्तींविषयी करुणा आहे. त्या संभ्रमावस्थेत सापडलेल्या व्यक्तीच्या जीवनात उजेड पेरण्यासाठी आपण दीप होऊन त्याला मार्ग दाखवावा, असे त्यांना वाटते. त्या व्यक्तीच्या काळोख्या मनाला उजेडाचा लेप देऊन त्याला उत्साह, दिशा, प्रेरणा व प्रोत्साहन देऊन त्यांची लेखणी त्यांच्या मनाचा ठाव घेते.

मेंदीचा रंग या कवितेत त्यांनी आजच्या तरुणी व स्त्रीजातीविषयी चिंता व्यक्त केली आहे. आज आपण वाचतो, निर्भयाप्रमाणेच अनेक बलात्काराची व विनयभंगाची प्रकरणे रोजच अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात घडत आहेत. तरुण मुलींना घराबाहेर पडणे काही ठिकाणी मुश्कील होत आहे. जागोजागी त्यांच्या सौंदर्यावर व तारुण्यावर घाला घालण्यासाठी श्वापदे टपून आहेत. अशा भीतीयुक्त व अस्थिर परिस्थितीत मुलींनी जगायचे तरी कसे? अशी काळजी कवीला सतावत आहे. म्हणूनच

ते म्हणतात,

पोरींना... बाहेर पाऊल टाकताना
मोकळ्या हाताने बाहेर पडू नका
काही दगड असू द्या
तुमच्या नाजूक हातामध्ये

आजच्या तरुणींना कवीला इतकेच सांगायचे आहे की, आता तुम्हाला संकटकाळी कोणी मदत करेल अशी अपेक्षा करू नका. कोणावर विश्वास ठेवावा अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. आता तुम्हीच तुमचे रक्षक व्हा. घराबाहेर पडताना हातात एखादा दगड असू द्या. अर्थात दगड हा प्रतीकात्मक असला तरी एखादे हत्यार तुमच्याजवळ असू द्या. ते तुमच्या बिकट प्रसंगी कामी येईल. एखाद्या मोठ्या संकटातून तुम्ही वाचू शकाल. तुमच्या चारित्र्यावर टपून बसलेल्या गिधाडांना प्रत्युत्तर देण्याची तुमची क्षमता तुमच्यात तयार होईल.

'संवाद... बापूंच्या पुतळ्याशी' ही कविता विशेष अभ्यासण्याजोगी आहे. ते म्हणतात,

बुरा मत देखो, बुरा मत सुना, बुरा मत बोलो
आज त्याच्या उलट चित्र–
अवतीभोवती माकडेच–माकडे
ताठ मानेने वावरतात
तोंड, नाक, डोळ्यांवर आता आमचाच
हात असतो

समाजाची झालेली पडझड कवीला पाहवत नाही. जेव्हा समाजात मानवी जीवन मूल्यांचा ऱ्हास होतो तेव्हा माणूस पशू होतो. माणुसकीची भिंत कोसळते तेव्हा समाजव्यवस्था विस्कटली जाते. कोणी कोणाला जुमानत नाही, मानत नाही, ऐकत नाही अशी अवस्था येते. माणूस स्वार्थ, लोभ व मोहाने आंधळा होतो. अशा समाजप्रवाहाला थोपवण्याचे अथवा बदलण्याचे सामर्थ्य कोणा एका व्यक्तीत नसते. त्या वेळी कवी हतबल होताना दिसतो. एखादी मनाला न पटणारी गोष्टही त्याला नाइलाजाने पाहावी लागते. महात्मा गांधी यांनी बुरा मत देखो, बुरा मत सुनो, बुरा मत बोलो... हा संदेश तीन माकडांच्या प्रतिकृतींद्वारा दिला आहे. नको त्या गोष्टी घडतील त्या वेळी डोळे झाकता येतील, कानही झाकता येतील प्रसंगी तोंडही बंद ठेवता येईल; पण अंतरंगात चाललेल्या भावनांचे काय? त्यांना वाट कशी करून द्यायची? असा प्रश्न कवीला पडतो. अवतीभोवती अशी अनेक मुकी, बहिरी व आंधळी माकडे कवीला दिसतात. त्यांच्या डोळे, तोंड व कानावर त्यांचे स्वत:चे हात नसून आपलेच हात आहेत, इतके आपण संवेदनाशून्य झालो आहोत, असे कवी उपहासाने म्हणतो. समाज व्यवस्थेबद्दल प्रचंड अशी नाराजी कवीच्या काव्यपंक्तींतून दिसून येते.

'सुखाची सकाळ' या कवितेत ते म्हणतात,

तेहतीस कोटी देवांपुढे रोज किती फोडावेत नवसाचे नारळ
कोणत्या दगडात अडकली आहे चैतन्याची सुखी सकाळ

माणूस मन:शांती किंवा आपल्या आयुष्यात सुख येण्यासाठी ईश्वराचे पूजन, मनन, चिंतन करतो. काहीजण नवसही बोलतात. तरीही संसारात संकटे व दु:ख येतेच. मानवी जीवनाचे भोग आस्तिकांनाही चुकले नाहीत व नास्तिकांनाही चुकले नाहीत. ईश्वर हा जगात आहे का? असाही प्रश्न कवीच्या मनात डोकावून जातो. ईश्वर असता तर समाजात संकटे व कोरोनासारखा हाहाकार माजला असता का? टाळेबंदीच्या काळात ईश्वराची सर्व मंदिरे बंद होती. शेवटी संकटकाळी विज्ञानच धावून आले. ते थेट देवालाच प्रश्न विचारतात की– रोज कितीही नारळ

फोडले किंवा नवसे केली तरी ती सुखाची व चैतन्याची सकाळ मला केव्हा दिसेल?

'शिकवण' या कवितेत आईच्या संस्काराबद्दल कृतज्ञतेचे भाव दिसून येतात. ते म्हणतात,

मक्याची कणसं भाजणारी
जर्जर म्हातारी बघून
डबडबल्या डोळ्यांनी तू
चटकन माझा हात धरलास
तुझ्या त्या कापऱ्या स्पर्शाने
माझ्या काळीज डोहात
तरंग उठले

कवीचे काळीज हळवे असते. तो स्वत:च्या दु:खापेक्षा दुसऱ्यांच्या दु:खाने अधिक व्याकूळ होतो. 'बुडती हे जन, न देखवे डोळा, म्हणूनी कळवळा येत असे' असे तुकाराम महाराज म्हणतात. त्याच प्रकारचा कळवळा कवीच्या कवितांत उतरताना आपणास दिसून येतो. रस्त्याच्या कडेला एखादी जर्जर म्हातारी मक्याची कणसं भाजून विकते; त्या वेळी कवीला तिची दया येते. आयुष्याच्या संध्याकाळी शारीरिक क्षमता नसतानाही ती म्हातारी उन्हातान्हात, पावसात, वाऱ्याकावदानात, पोलिसांच्या धाकात पोटाची खळगी भरण्यासाठी मक्याची कणसं विकून चार पैसे मिळवते. कवीला ती कणसं खायची इच्छा असो अगर नसो कवी तिच्याकडून काही कणसे विकत घेतो व गल्लीतील मुलांना देतो कारण कवीला कणसे खरेदी करताना त्या वृद्ध स्त्रीच्या चेहऱ्यावरील आनंद पाहिल्यावर समाधान मिळते. अर्थात ही परोपकाराची शिकवण त्यांना आईनेच दिल्याचे ते आवर्जून सांगतात.

'रांगोळी' या कवितेत ते म्हणतात,

सकाळी उठून अंगणात आलो
समोर बायको अनेक ठिपक्यांना जोडून
एक सुंदर, मोहक, रंगीत रांगोळी काढत होती
जणू ती मला रांगोळीच्या ठिपक्यासम
आई-बाबांशी जोडत होती

संसाराच्या सागरात बऱ्याच वेळा घरगुती कारणांवरून वाद निर्माण होतात. आपलीच माणसं दुखावली जातात. धनुष्यातून गेलेला बाण व मुखातून गेलेला शब्द परत घेता येत नाही. कर्ता पुरुष या नात्याने कवी कुटुंबियांना घालून-पाडून बोलतात. आपण रागाच्या भरात बोललेले बोल चुकीचे होते, ही खंत कवीला जाणवते. पश्चात्तापही होतो; परंतु पत्नी मात्र हा प्रसंग संयमाने घेते. आपल्या सासू-सासऱ्यांना हवे नको ते पाहते. दुसऱ्या दिवशी पत्नी दारात रांगोळी काढताना ठिपक्याला-ठिपका जोडत असते. म्हणजेच जणूकाही ती नाती जोडत असते, आपली पत्नी समंजसपणे आपल्याला आई-बाबांशी जोडत असल्याचे जाणवते. या रांगोळीतील जोडणे हे कवीला आकर्षित करते कारण एकदा विस्कटलेली रांगोळी आणि संसार पुन्हा पूर्वीसारखा होतोच असे नाही म्हणून, रांगोळीच्या दोन ठिपक्यांतील रेषा व नात्यातील धागे बळकट असावे लागतात.

अशा अनेक सुरेख रचना आपणास 'डोहतळ' मध्ये वाचायला मिळतात. याशिवाय चौकट, बाईच्या कविता, कलियुगाची रेघ, रेषांची नक्षी, दखल, तटस्थ, जगण्याचे सोने, प्रचंड गर्दी जमते, कुंकू पुसलेले घर, उपासना अशा एकाचढीत एक सरस कविता मारुती कटकधोंड यांच्या डोहतळमध्ये समाविष्ट आहेत. प्रत्येक कविता वाचताना शब्दनशब्द अंत:करणाला भिडतो. विचार करायला लावतो. आत्मचिंतन करायला लावतो. मारुती कटकधोंड यांनी दु:खाचा व व्यथांचा वेध घेताना स्वत:च्या मनाबरोबरच वाचकांच्याही मनाचा तळ गाठलेला आहे. सर्वसामान्यांच्या व्यथा मांडल्यामुळे प्रत्येकाला ही कविता आपली वाटते. 'डोहतळ' मधील मारुती कटकधोंड यांची कविता मनाचा तळ गाठणारी आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.


'डोहतळ' मध्ये एकूण १०७ कविता समाविष्ट आहेत. या काव्यसंग्रहाला ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक प्रा. डॉ. राजेंद्र दास यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना व आशीर्वाद लाभले आहेत. प्रख्यात कवी माधव पवार यांचा मलपृष्ठ मजकूर कटकधोंड यांच्या कवितेचा दर्जा व महती दर्शविणारा आहे. चित्रकार शिरीष घाटे यांचे समर्पक मुखपृष्ठ लक्ष वेधून घेते. अंतरंगाबरोबर बाह्यांगानेही सुंदर झालेल्या डोहतळचे रसिक वाचक नक्कीच स्वागत करतील अशी माझी खात्री आहे. मारुती कटकधोंड यांच्या पुढील साहित्यप्रवासास मन:पूर्वक शुभेच्छा.

**राजेंद्र भोसले**
ब/९३, आनंदयात्री, राजस्वनगर, विजापूर रोड,
सोलापूर-४१३ ००४ मो.-९८८१७८६४६६
email : bhosale.rajendra.b@gmail.com

# निमित्त
# अवस्थांतराच्या कविता

दा.गो.काळे

**रवीन्द्र लाखे यांच्या**
**'अवस्थांतराच्या कविता' या**
**काव्यसंग्रहाची सौंदर्यस्थळे उलगडून**
**दाखवणारा  समीक्षा लेख.**




पुस्तकाचे नाव : **अवस्थांतराच्या कविता**
लेखक : **रवीन्द्र दामोदर लाखे**
प्रकाशक : **कॉपर कॉइन पब्लिशिंग**
पृष्ठसंख्या : **१९६**
मूल्य : **३५०/-**

रवीन्द्र दामोदर लाखे ऐंशीच्या दशकातील महत्त्वाचे कवी आहेत. त्यांचे जिव्हार, जीवेलागणीच्या कविता, संपर्कक्षेत्राच्या बाहेर आणि अवस्थांतराच्या कविता हे संग्रह प्रसिद्ध आहेत.'अवस्थांतराच्या कविता' साठी त्यांना महाराष्ट्र शासनाचा केशवसुत पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. 'जिव्हार'(१९८३) नंतर आपली कविता सातत्याने लिहित असलेला हा कवी आहे. त्यांचे एकदम दोन भरीव संग्रह २०१८ ला आलेले आहेत. नाटकांबरोबर आपली कविता त्यांनी कसोशीने सांभाळली, वाढविली आहे. ही गोष्ट येथे नमूद करावी वाटते. त्यांनी कवितेबरोबर कथालेखनही केले आहे. त्यांचा 'रीलया' नावाचा कथासंग्रह नुकताच प्रकाशित झालेला आहे. या शिवाय त्यांनी 'चिं. त्र्यं. खानोलकर : ललित चरित्र', लेखक दीपक घारे यांना या पुस्तकासाठी संशोधन साहाय्य केलेले आहे. ते नाट्यचिंतक असण्याने नाटक या विषयावरील चर्चा करणारे 'नाटक : एक मुक्त चिंतन' नावाचे पुस्तकही प्रकाशित झालेले आहे. 'आरभाट नोंदींचे प्रकरण' हे डायरी सदृश्य आत्मपर लेखनही त्यांनी केले आहे. या विविध वाङ्मय प्रकारांतून, अभ्यासातून जगाकडे पाहण्याची त्यांची म्हणून एक दृष्टी आहे. त्याचा प्रत्यय या लेखनाच्या माध्यमातून येतो.

कविता, कवीला आपल्या आड लपण्याची संधी देत नाही. कवितेतील शब्दांच्या धुक्यांचे आवरण हटले की, कवितेच्या अर्थासह कवीचे असणे आपसूकच मनाच्या प्रतलावर वस्तीला येते. मग ती अवस्था नुसत्या कवितेपुरती मर्यादित असत नाही. ती जगण्यासाठीचा जीवनमार्ग म्हणून पुढे येते. या अर्थाने ती साधन नसली तरी, सधन करून नक्कीच सोडत असते. ही कलेच्या, कवितेच्या इतिहासात निर्माण झालेली समृद्ध अशी समज आहे, असे मला साधेपणाने कोणत्याही चांगल्या कवितेबद्दल वाटत आलेले आहे. तसेच जगण्याकडे, आपल्या लौकिक व्यवहाराकडे सतत कवितेच्या दृष्टिकोनातून पाहणे या गोष्टीचे कमालीचे अप्रुपही मला आहे, असा अनुभव या कवितांमधून आलेला आहे. आपल्या जगण्यातील अनुभवाच्या अवकाशात नसलेले शब्दांनी ध्वनित केलेले अदृश्य प्रदेश काही कवितांमधून येतात. 'मी पुढे पाहत राहिलो  मागचा अंदाज घेत आणि मागचा अंदाजच  केवळ चालत राहिलो.' ही गंमत कुठे तरी या कवितेतून जाणवायला लागते.

मी कवितासंग्रह सलगपणे वाचण्याचा प्रयत्न करून पाहतो; पण कवितांच्या काही भागात गुंतून पडल्याने ही शिस्त टिकत नाही. मग कवितांच्या वेगवेगळ्या भागात सैर करून कविता समजावून घेण्याचा प्रयत्न करतो. कवितेचे वेगवेगळे बदललेले मूड्स आपला एकसंघ असा जीवन–जाणिवांचा प्रवास मांडत असतात. तो प्रवास सलग आणि निरंतर असतोच असेही नाही. कवितागत अनुभवांचे उंचसखल प्रदेश न्याहाळताना आपलापण एक अनुभव त्या प्रवासात सोबत करीत असतो. हा सोबत चाललेला प्रवास म्हणजेच एखाद्या कवीला, त्याच्या कवितेला समजून घेणे असे म्हणता येते. या प्रमाणे थोडेफार या कवितेला समजून घेण्याचा प्रयत्न मी करतो आहे. सबंध कवितेला दिलेले शीर्षक म्हणजेही वेगवेगळ्या जाणिवांना एकसंघतेने एकत्र पाहणे म्हणता येते. त्या दृष्टीतून या कवितांमधील अवस्थांतराकडे पाहता येणे शक्य आहे. अवस्थांतर म्हणजे आपली बदललेली, आपल्या असतेपणाची भिन्न अवस्था असे म्हणतात. ही भिन्नता म्हणजे काय? लौकिक जीवन जगत असताना आपल्या सभोवतालच्या वास्तवाचा एक अर्थ आपण लावत असतो. त्या अर्थाचा चाललेल्या जीवन प्रवाहाशी काही एक निकटचा संबंध असतो. त्यात आपली आपल्या सभोवतालात जगणाऱ्या माणसांची लहानसहान स्वप्ने असतात. जगण्यासाठी प्रवृत्त करणारे किंवा जगणे सुलभ करण्यासाठीचे एक साधे सुलभ असे तत्त्वज्ञान असते. तो ते लोकांनी अवलंबवावे म्हणून क्रांती करू शकत नाही. साधे निरूपणही करू शकत नाही. त्या अवस्थेचे अलिप्तपणे केलेले चिंतन म्हणजे अवस्थांतर असा एक साधा अर्थ आपण ह्या आयुष्यात घडणाऱ्या छोट्या छोट्या घटितांच्या माध्यमातून देतो. कवी व्यवस्थेला, आपल्या जगण्यातल्या अभावग्रस्ततेला पर्याय देऊ शकत नाही; परंतु सांगण्याची परंपरा आपल्या परंपरेप्रमाणे खंडीतही करू शकत नाही. ही परंपरा निर्बंधाच्या काळातही अनंत मार्गांनी सुरू असते. कलावंत नेहमी वेगवेगळ्या आयामातून आपल्या अस्तित्वाचा, असण्याचा एक समंजस दृष्टिकोन पुढे ठेवत जात असतो. त्याचा विस्तार करून आपल्या जगण्याचे काही तुकडे त्यात विरघळवून पुढे जात असतो.

'तुझ्यानंतर कुणीतरी बोलणारच.
कुणानंतरही कुणीतरी बोलणार.
तुझ्या आधी
कुणीतरी बोललेलं आहेच.
कुणीतरीच्या आधीही
कुणीतरी बोललं आहे.

तू कुणीतरी आहेस.'

कुणीतरी असण्याच्या, बोलणे प्राप्त झाल्याच्या अधिकारातून, स्वत्त्वातून ह्या अवस्थांतराला काही एक अर्थ प्राप्त झालेला आहे. या अवस्थेला हा कवी कलेचे प्रयोजन मानत असला तरी, भाषेची अवगतता असली तरीही, 'माझ्यासमोर असलेल्या जगाचा नि काळाचा मला जो अर्थ लागत असतो त्यात मला सुरक्षित वाटत नाही.' ही गोष्टही तेवढीच खरी आहे. या सगळ्या अस्वस्थतेच्या गर्भात मानवी अभावग्रस्ततेची बीजंही आहेत. ही गोष्ट नाकारता येत नाही. ह्या सगळ्या दृष्टिकोनातून पसरलेल्या अभावाची सूत्रे आपण केवळ शब्दांच्या हाती देऊन एक अवस्था अनुभवत असतो. सामान्य माणसांच्या स्वप्नांसाठीची, त्याच्या जगण्यापाशी अडणाऱ्या साध्या तत्त्वज्ञानाची निर्मिती तो करताना दिसतो. आहे त्या अवस्थेत आपल्या असण्याची बीजं सकारात्मक जाणिवांच्या जमिनीत रुजवल्याशिवाय जगण्याला अर्थ

प्राप्त करून घेता येत नाही. मग आपल्या जीवनाला अर्थ मिळवून देणारी जाणीव कोणती? तिच्या असण्याची सांकेतिकता कोणत्या निकषावर उभी राहते? अशा प्रश्नांतून जीवनातील गुंतागुंतीच्या परंपरागत आत्मग्लानीला आपल्याच असण्याचे, आपल्या सार्थकतेचे परिमाण देतो. आत्मशोधाऐवजी आपले लौकिकात असणे याची देही याची डोळा तो पाहतो. त्या दृष्टीने त्यांची 'सार्थक' नावाची कविता अनुभवण्यासारखी आहे.

अवस्थांतराच्या कवितांकडे जातानाचा मार्ग जगण्याच्या पार्श्वभूमीवर असणाऱ्या औत्सुक्यातून जातो. त्याला कार्यकारण भावाच्या विविधावस्था आहेत. जन्म, मृत्यू, देह आणि वासनांच्या पलीकडे आपले असणेही महत्त्वाचे आहे. कारण ह्या असण्याला आपल्यासहित अशाच जाणिवांचे आवरण आहे. त्या जाणिवांच्या सापेक्षतेची ही कविता आहे. आपण जगत असताना आपला मूर्त-अमूर्त असा भोवताल, वस्तूंचे आपल्यासहित असणे, त्यातील चलनवलन व भावा-अभावाची आंदोलने या कवितेतून जिवंत होऊन पृष्ठभागावर येतात. त्यातील भावनिक अंतर कवितेपर्यंत न्यायला पुरेसे ठरते. दोन घटितांमधील कार्यकारण भावाची एक अवस्था ही कविता अनुभवाच्या पातळीवर आणते. तिला स्वतःचा एक अवकाश प्राप्त करून देते. या दृष्टिकोनातून या संग्रहातील 'ताल' नावाची कविता, आणि या प्रकारच्या काही कविता या संग्रहात येतात. त्यातील वस्तुगत असलेली जाणीव मानवी पातळीवर काहीतरी निर्माण करणारी, आपल्या बरोबरीने, सोबत जगणारी वस्तू वाटते. 'ताल' या कवितेत एका अमूर्ताशी जीव जमा करताना निर्माण होणारा तिसरा अवकाशनिर्मितीच्या अथवा सृजनाच्या अवस्थेला पोहचतो. त्यामुळेच आपल्या जगण्याचे संकेत ह्या वस्तुगततेत अधिक गुंतलेले आहेत. त्याच्या अनेक अवस्थांचा विचार करणारी भारतीय परंपरा आपल्यात अजूनही जिवंत आहे. 'टेबल' म्हटले की, आपण त्याच्या समूर्त-मूर्त अशा संबंधतेचा विचार करतो. आपण त्याला आपल्या परिप्रेक्ष्यात विगम-निगमाच्या परिमाणात त्याच्या सगळ्या अवस्था जाणून घेण्याचाही विचार करीत करतो. आपण 'टेबल' संबोधले, की त्याच्या जिवंतपणातील 'वृक्ष' असण्याच्या उलट दिशेनेही प्रवासत असतो, असेही म्हणता येते. शरीर, मन, देह, त्याच्या क्रिया आणि प्रतिक्रियांचा अवकाशही काही कवितांमधून या प्रकारच्या अवकाशनातून जातो. तो संवाद तत्त्वज्ञानाच्या पातळीवरील जड नाही; परंतु परस्परांना जाणून घेण्याच्या पोकळीत निर्माण होणारे आवर्तन नक्कीच म्हणता येईल. त्यात आपले असणे म्हणजे, 'स्वतःच्या परकेपणात आपलेपणाने वाहणे,' असेही समजायला हरकत नाही.

ह्या कविता वाचत असताना नेमकेपणाने जगण्याच्या पार्श्वभूमीवर आपली म्हणून एक दुसरी व दुखरी बाजू दाखवताना दिसतात. त्यात आपण विचारात न घेतलेली; पण आयुष्याकडे गंभीरपणे सरकणारी गोष्ट असते. तसा त्या गोष्टींना जगताना अर्थही नसतो; पण माणसाच्या अडगळीत पडलेल्या काही मान्यता असतात. त्यात जर-तर च्या काही संकल्पना नांदत असतात. त्याचा येणारा प्रत्यय आपल्या आयुष्यातील स्पेस भरून काढणारा असतो. त्यातून येणारी निरर्थकता आज आपल्या एकंदर असण्याला लगडलेली मानसिक अवस्था होय. ह्या निरर्थकाच्या दृष्टिकोनातून काही एक निर्देश या कवितेतून कवी आपल्याला देताना दिसतो. आयुष्य म्हणजे जगण्याच्या अंतरातील आपले असणे असते. त्या असण्याला आपल्या आध्यात्मिकतेचा दिलेला आधार म्हणजे ही चर्चा आहे. भारतीय आध्यात्मिक मानसिकतेत सरळसोट जगण्याला असलेली पालुपदे म्हणजे निरर्थकाच्या दरवाज्यात विनाकारण उभे करणे आहे.

'तू उभा आहेस.
रस्त्याच्या आयुष्यात तू आहेस.

माझं आयुष्य, माझ्या आयुष्यात
ही तुझी भाषा म्हणजे तुझं आयुष्य नव्हे.'

ह्या पडणाऱ्या प्रश्नांच्या काही मालिका या कवितेत अनेक ठिकाणी विखुरलेल्या आहेत. हे पडलेले प्रश्न गुंतागुंतीचे व अवकाशात विरणारे वाटत असले तरी जगण्याच्या पार्श्वभूमीवरील आहेत.

खरे तर लौकिक अर्थाने गंभीरपणे जगण्याविषयीचा भोवताल समजून घेणारे आहेत. त्यात जगण्या-जगविण्याविषयीच्या आस्था लपलेल्या आहेत. त्यातून येणारी भीतीग्रस्तता आपल्यात अंगोपांगी असल्याची खूण आहे, आणि त्यातून कवितेला, कवितागताला पडलेले प्रश्न माणसाचे लौकिकपण विसरायला लावणारे आहेत.

कुठेतरी आपल्या आतील ओलीकडे, विचारांच्या खोलीकडे निर्देश करणारे आहेत, असा एक अर्थ या कवितेच्या माध्यमातून प्रवाही होतो. आपल्या अवस्थांतराची एक पाकळी या निमित्ताने येथे उलगडली जाते, असे म्हणता येते.

या कवितेला आपले म्हणून एक समाजभान आहे. त्यात आपण जेथे आहोत, त्या ठिकाणाहून सभोवतालाकडे पाहण्याची एक दृष्टी आहे, आणि आपल्या अस्तित्वाची जाणीवही आहे. आपल्या जन्माबद्दल असलेले कमालीचे आश्चर्य व मृत्यूबद्दलची गाढ अशी समज या कवितेतून येताना दिसते. जन्माआधीच्या जन्माबद्दलचे कोणत्याही प्रकारचे औत्सुक्य त्याच्या स्मरणातून झरत नाही; परंतु जन्म-मृत्यूच्या अवकाशात त्याचे असणे त्याला महत्त्वाचे वाटते. त्यातही मरणाच्या भीतीपोटी जगण्याच्या भवितव्यापेक्षा ठाम असलेल्या मृत्यूवर त्याची श्रद्धा आहे. मृत्यूचा सन्मान करणारी आपली परंपरा असली तरी, त्याबद्दलची असणारी आपली समज रोगग्रस्त मानसिकतेतील आहे. खरेतर हा बागेकडे जाणारा रस्ता व्हायला हवा, असे सूचन ते आपल्या 'बाग' या कवितेतून करताना दिसतात. यापेक्षाही काही कवितांमधून त्यांनी जन्म, मृत्यू या दोन्हीमधला अवकाश चपखलपणे पकडला आहे. मृत्यू असण्याचा, त्याच्या ठामपणाचा प्रत्यय त्यांच्या सांगण्याच्या शैलीतून प्रतलावर येतो. जन्म मयतेपेक्षा मृत्यूमयता त्याला मोलाची वाटते आहे. त्यात आपल्या अवस्थांतराच्या सगळ्या जाणिवा-नेणिवांचे विघटन होते. तेथून खरे तर जन्मापर्यंतचा आपल्या अस्तित्वाचा प्रवास तुकड्यां-तुकड्यांमध्ये विखुरलेला असतो.

'जन्म आश्चर्य आणि मृत्यूही.
जन्म ठाम नसतो.
मृत्यू ठाम असतो.
मला वाटतं मी ठाम आहे.
माझी तत्त्वे
माझे नियम ठाम आहेत.
मी मृत्यू आहे?
ठाम असलेले लोक मृत्यू आहेत.'

या कवीची कविता म्हणजे आयुष्यातील तगमग आणि कासाविशीचीही आहे. आपल्या दुःखाच्या आड लपविलेल्या सामाजिक भानाचीही आहे. आपला सभोवताल समंजसपणे तो कवितेतून समजून घेतो. त्यातून आलेलं तुटलेपण, आतून येणारा जाळ, आपल्या असते-पणाच्या तडजोडी स्वीकारून काळाला ओढत पुढे जात असतो. 'माझ्या मनाला, सगळ्या समाजाला आहेत पृथ्वीच्या कक्षा. दुसऱ्या ग्रहावरच्यांशी असेल आपला जातिभेद.' असा विचारही तो आजच्या पार्श्वभूमीवर करून पाहतो. त्यात त्याचा एक मानवतावादी दृष्टिकोन डोकावतो, आणि आपल्या आतआत चाललेल्या कासाविशीचा या गोष्टींशी समन्वय साधण्याचा प्रयत्न तो करतो.

'माझ्याजवळ असते माझ्या कमाईची
वडिलांची म्हातारी थरथर
पिचक्या आवाजातले आईपण
मी कमावलेले
आपलं उरलेलं लांबलचक
आयुष्य पाहून घाबरलेल्या
न फिटलेल्या कर्जासारख्या बहिणी.'

अशा आपल्या असतेपणात आणि सभोवतालच्या सामाजिक परिवेषात आपल्या जगण्याच्या कक्षा रुंदावत ही कविता आपला स्वतःचा एक दृष्टिकोन पुढे ठेवताना दिसते. त्यातच तिचे असणे आज महत्त्वाचे वाटते. हे विवेचन म्हणजे कवितेकडे जाण्यासाठीची एक खिडकी असेही म्हणता येते.


**दा. गो. काळे**
रोकडीया नगर, शेगांव, जि. बुलडाणा-४४४२०३
चलभाषः ९४२१४६७६४०
email : dgkale.atirikta@gmail.com

◆◆

# ‘तूर्तास तरी’ या कवितेची प्रवर्तक बाजू दुर्लक्षित राहू नये म्हणून...!

**अरविंद सुरवाडे**

**‘तूर्तास तरी’, या बुद्धभूषण साळवे यांच्या काव्यसंग्रहावरील परिचय लेख.**




पुस्तकाचे नाव : **तूर्तास तरी...**
लेखक : **बुद्धभूषण साळवे**
प्रकाशक : **ठसा प्रकाशन गृह, नाशिक.**
प्रथम आवृत्ती : **१९ फेब्रुवारी २०२१**
पृष्ठेः **८८**
मूल्यः **१५०/–**

बुद्ध भूषण साळवे हे नाव आता त्या कवींच्या नामावलीत समाविष्ट झालेले आहे की, ज्यांच्यासाठी कविता हे जगण्याचे तत्त्वज्ञान आहे, ज्यांच्या गाठीशी तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानातून रोजमर्राच्या जगण्यातील शब्दांचा संदर्भासह अर्थ शोधण्याची सखोल अंतर्दृष्टी आहे. ‘तूर्तास तरी...’ हा बुद्धभूषण साळवे यांचा माझ्या वाचनातील हा पहिलाच संग्रह. यापूर्वी त्यांचा ‘बाजार’ हा एक कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्याचे संग्रहातील प्रस्तावनेत डॉ. युवराज सोनटक्के यांनी म्हटलेले आहे. ‘तूर्तास तरी...’ ह्या कविता वाचताना आणि समजून घेताना, त्यांचे अर्थान्वयन करताना माझी बरीच दमछाक झाली असली तरी पुन्हा पुन्हा वाचल्यानंतर जे जाणवले ते इथे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

‘तूर्तास तरी...’ या संग्रहातील बुद्धभूषण साळवे यांच्या कवितांमधून मानवी जीवनातील संघर्ष त्याच्या मूळ स्वरूपात समोर येतो. अस्तित्वात असलेल्या जगातील मानवी कल्याणाच्या विरोधातील गोष्टी नष्ट व्हाव्यात या उद्देशाने आजच्या जगाची पुनर्रचना करणे गरजेचे असल्याबद्दलचा, आदर्श समाज आणि सर्वांगसुंदर जग निर्माण करण्यासाठी किंवा पर्यायी जगाच्या निर्मितीसाठीचा सूर आणि स्वर त्यांच्या कवितांमधून ऐकू येतो. जगाची ही पुर्नरचना बुद्धाच्या करुणा, शांती, दया आणि मानवता ह्या तत्त्वांशिवाय शक्य नाही आणि त्यासाठी समाजातील प्रचलित विद्रूपता/ कुरूपता समजून घ्यायला हवी, समाजातील विसंगतींकडे केवळ अंगुलीनिर्देश करून

भागणार नाही तर त्या विसंगतींना नेस्तनाबूत करणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणारे धाडस बुद्धभूषणच्या या कवितांमध्ये दिसून येते.

बऱ्याचदा डोळ्यांना दिसणारं सत्य हे आभासीसुद्धा असू शकतं किंवा ते अनेक पदरीसुद्धा असू शकतं. अशा वेळी कवी तीक्ष्ण दृष्टीने जर ते पदर, तो आभास समजून घेऊ शकला, कवीच्या तीक्ष्ण दृष्टीला हा आभास, हे विविध पदर जाणवले आणि सत्याच्या मुळापर्यंत पोहोचता आले तर ते मानवी हिताच्या दृष्टीने लाभदायक असते. भाषिक कशिदागिरी आणि शब्दांचे अवडंबर माजवून कवितांची रचना करणे खरे तर तो कविता लिहिण्याचा चोर मार्गच आहे; परंतु त्या मार्गाने कवितेतून सत्यापर्यंत पोहोचता येत नाही. खरा कवी या चोर रस्त्यांपासून लांब राहत सत्यापर्यंत पोहोचतो. 'तूर्तास तरी...' या आपल्या कविता संग्रहातील अनेक कवितांमधून कवी

''स्थगिती देता येणार नाही मला
या अपूर्ण संघर्षाला'' (तूर्तास तरी, पृ. २७)

असा सत्याच्या मुळाशी जाऊन मानवी कल्याणासाठीच्या लढ्यात आपला सरळ सरळ सहभाग नोंदवतो.

भारतीय समाजातील जात वास्तवाची चिकित्सा करत त्यावर सरळ सरळ कठूराघात करणाऱ्या सक्षम कवींमध्ये बुद्धभूषणचा समावेश करावा लागेल. आपला आंबेडकरवादी दृष्टिकोन आणि स्पष्टवादिता यांच्या बळावर बुद्धभूषण वंचित समुदायाचा आवाज अत्यंत दृढ संयमाने; परंतु कणखरपणे आपल्या कवितेतून मांडतो. त्यासाठीचे प्रयत्न त्याच्या वैचारिक बांधिलकीतून स्पष्टपणे डोकावतात. कवीची वैचारिक बांधिलकी त्याच्या कवितांमधून स्पष्टपणे जाणवते.

''खरं तर हे
तुझ्याच क्रांतीचं
अथांग गीत आहे
भयमुक्त डोळ्यातून
पृथ्वीतलावर पसरलेलं.''
(आमच्या रक्तातून वाहणारा, पृ. ५७)

अशा शब्दांमधून बुद्धभूषण साळवे यांची सर्जनात्मकता त्यांच्यातील आंबेडकरवादाला सहजपणे विस्तृत करते, प्रशस्त करते. त्यांच्या कवितेतून येणारी वैचारिकता ही आयात केलेली बांडगुळी वैचारिकता नाही आणि छद्म वैचारिकता तर मुळीच नाही.

बुद्धभूषण साळवे हा धारेचा, काठावरचा किंवा काठाला लागलेला कवी नसून तो प्रवाहातील कवी आहे, प्रवाहाविरुद्ध जाणारा कवी आहे; नदीची धार जी दिसते परंतु प्रवाह जो असतो तो दिसत नाही, त्याची केवळ अनुभूतीच घेता येते. हवेचा प्रवाह, पाण्याचा प्रवाह हे अनुभूतीचे विषय आहेत, ते डबक्याचे, साचलेपणाचे, अवरुद्ध झाल्याचे विषय नाहीत. या अर्थाने बुद्धभूषण साळवे हे आपल्या कवितांमधून अशा काही अनुभूती वाचकांच्या पुढ्यात ठेवतात की, ज्यात सातत्य आहे, गतिमानता आहे.

बुद्धभूषणच्या या प्रस्तुत कवितासंग्रहातील कविता अभ्यासल्यानंतर माझं मन एका शंकेने ग्रासलेले आहे, ती म्हणजे इतर आंबेडकरी कवींप्रमाणे बुद्धभूषणच्या कवितांनासुद्धा केवळ 'विद्रोही कविता' म्हणूनच पुढे तर केले जाणार नाही ना? जे पूर्वसुरींच्या कवितेबाबत घडलं ते बुद्धभूषणच्या कवितेबाबत तर घडणार नाही ना? 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा मानून जे काही साहित्य निर्माण झाले त्यात 'विद्रोही' आणि 'प्रवर्तक' अशा दोन्ही प्रकारच्या प्रवृत्तींच्या साहित्याचा समावेश होता; परंतु 'विद्रोही' साहित्याची बाजूच विचारवंतांनी अधिक लक्षात घेतली. त्यावर अधिक प्रतिक्रिया व्यक्त केली. त्या तुलनेत 'प्रवर्तक' बाजूकडे जितकं लक्ष दिलं जाणं आवश्यक होतं, ते दिलं गेलं नाही. त्यामुळे काही असंतुष्ट दलितेतरांच्या बाबतीत मात्र असं घडलं की, त्यांनी विद्रोही साहित्याला व विद्रोही प्रवृत्तीला नाके मुरडली. त्याचे कारण असे असू शकेल की, बुद्ध– आंबेडकर विचार हा समता प्रस्थापित करू पाहणारा अहिंसेचा विचार आहे, हे या असंतुष्टांच्या कधी लक्षात आले नसावे.

तर काही दलित कवींच्या बाबतीत असे घडले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्रोहाचा पुरस्कार केला म्हणजे नेमके काय सांगितले? हे त्यांनी चाणाक्षपणे लक्षात न घेतल्याने डॉ. बाबासाहेबांच्या विद्रोहाच्या विचारसरणीत स्वतःच्या कल्पनांचे रंग मिश्रित करून तो विद्रोह हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याच विचारात अनुस्यूत असलेला आहे, असे भासविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्या ज्या अभ्यासकांना डॉ. बाबासाहेबांचा विद्रोहाचा विचार ठाऊक होता ते या काही विद्रोही कवींच्या भूमिकेच्या संदर्भात हेतुपुरस्पर मूक राहिले. काहींनी त्याविरुद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न केला; परंतु ज्या ज्या दलितेतरांना डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचा विचार समजला नव्हता त्यांच्याप्रत, डॉ. आंबेडकरांच्या विचारात स्वतःच्या कल्पनांचे रंग मिश्रित करून झालेला विद्रोही काव्यविष्कार पोहोचला तेव्हा त्यांच्या मनात डॉ. आंबेडकरांच्या विद्रोही

विचारांसंबंधी अकारण संभ्रम निर्माण झाला. दलितांविषयी, प्रामुख्याने बौद्धधर्मियांविषयी नवी तेढ निर्माण झाली.

या परिस्थितीत 'समतेचे उद्‌गान करणारा बुद्धविचार-आंबेडकरविचार ज्या ज्या आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्यातून प्रसारित झाला आहे तो जनसामान्य व रसिक वाचकांसमोर अभ्यासपूर्णतेने येण्याची आवश्यकता होती कारण त्या विचाराकडे साहित्य समीक्षकांनी हेतुपुरस्पर लक्ष दिलेले नव्हते, आणि ज्या समीक्षकांनी लक्ष देण्याचा प्रयत्न केला, त्यांनी तो विचार योग्य त्या प्रकारे उलगडून दाखवण्याचा प्रयत्नच केला नव्हता.' या चार दशकांपूर्वी 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग' या हरीश खंडेराव यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत रमेश कुबल यांनी नोंदवलेल्या निरीक्षणात पुलाखालून कितीही पाणी वाहून गेलेलं असलं तरी काडीचाही बदल झालेला दिसत नाही. त्यामुळे आजही बुद्धभूषण यांच्या कवितेतील केवळ विद्रोही बाजूवरच फोकस करून तिची प्रवर्तक बाजू हेतुपुरस्पर दुर्लक्षित केली जाण्याचीच शक्यता अधिक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मचक्र प्रवर्तन करून भारतीय समाजजीवनात समता प्रस्थापित करण्याचे पाऊल उचलून जिथे जिथे जातीयता दिसेल तिथे तिथे विद्रोहाचा पवित्रा आणि जीवनाच्या इतर क्षेत्रांतील बदलांसाठी प्रवर्तनाचा मार्ग स्वीकारला कारण विद्रोहालासुद्धा काही मर्यादा असतात हे बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्णपणे ओळखलेले होते. बुद्धभूषणची कवितासुद्धा जिथे आवश्यक आहे तिथे विद्रोह आणि जिथे आवश्यक आहे तिथे प्रवर्तनाचा मार्ग स्वीकारते हे विशेषत्वाने अधोरेखित होण्याची आवश्यकता आहे. असे झाले नाही तर आजपर्यंतच्या कवींप्रमाणे या कवीवरसुद्धा अन्याय केल्यासारखे होईल. कवितासंग्रहाच्या ब्लर्बमध्ये रावसाहेब कसबे यांनी या प्रवर्तक बाजूकडे केलेला अंगुलीनिर्देश त्यादृष्टीने महत्त्वाचा आहे. रावसाहेब कसबे ज्याला विद्रोहाबरोबरच मानवतेचा नितळ झरा, विज्ञाननिष्ठेचे गीत, नव्या समाजव्यवस्थेचे स्वप्न म्हणतात ते या कवितेची प्रवर्तक बाजूच अधोरेखित करण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

जगण्याबद्दलचा अतूट विश्वास आणि संघर्षाची अपरिहार्यता, रचनात्मक ऊर्जेने ओसंडून वाहणारी सृजनशीलता हे बुद्धभूषणच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'तूर्तास तरी...' या कवितासंग्रहातील कविता अभ्यासताना जाणवलेले आणखी एक वैशिष्ट्य इथे नमूद करणे अपरिहार्य आहे, ते म्हणजे नामदेव ढसाळ, अरुण काळे, भुजंग मश्राम आणि अविनाश गायकवाड या कवींच्या कवितांचे वाचन आणि अर्थान्वयन करणे म्हणजे माझ्यासाठी एक बौद्धिक कसरतच असते. यात आता नव्याने बुद्धभूषणच्या कवितेची भर पडलेली आहे. चांगल्या प्रकारे कविता वाचणं हा आपल्या विचार करण्याची दिशा आणि कौशल्याचा भाग असतो. कविता काय आहे आणि काय असावी? हे जेव्हा पूर्वकल्पनात्मक विचारांनी मुक्त असते तेव्हा यात जिज्ञासा असणं अतिशय आवश्यक असते. कवितेचे प्रभावी तंत्र आपल्या जिज्ञासेला प्रश्न विचारण्यासाठी उद्युक्त करीत असते, आणि ते आपल्याला कवितेशी संवाद साधण्याच्या स्थितीकडे घेऊन जाते. हे माझ्याबाबतीत वरील कवींच्या बाबत जे घडलेले आहे तेच बुद्धभूषणची कविता वाचताना आत्ताही घडलेले आहे.

साहित्याचा उद्देश हा अनुभवांची देवाण-घेवाण करणं, माणसांच्या समूह जीवनाबद्दल मानवी समज विकसित करणं, त्यांच्यात प्रेम, करुणा यांसारख्या जीवनमूल्यांची प्रस्थापना करणं हा आहे आणि तसा तो नेहमीच राहिलेला आहे. बुद्धभूषण हे भान या कवितांमध्ये जपताना दिसतो. त्याच्या या संग्रहातील जवळजवळ सगळ्याच कवितांमधून ही मानवी समज विकसित करण्याचे प्रयत्न दृष्टीस पडतात.

कवितेचे शिल्प आणि भाव यांच्यात योग्य संतुलन साधतो तो श्रेष्ठ कवी असतो आणि त्याच्या कवितांमध्ये जादुई गुण असतात. कवितेच्या ओळी वाचून जो अर्थ ध्वनित होतो, त्यातील भाव हा त्याहीपेक्षा अधिक काही सांगू इच्छितो, इतकं की, हे भाव स्पष्ट करणं अशक्य असते. हीच या कवितेची ताकत आहे.

सुप्रसिद्ध इंग्रजी कवी एजरा पाउंड यांचा 'हाऊ टू रीड ए पोएम' या प्रसिद्ध निबंधाचा अनुवाद मागे एकदा वाचण्यात आलेला होता. त्यात त्याने कवितेची भाषा ही मुख्यत्वे तीन घटकांनी आकाराला येत असल्याचे म्हटलेले आहे. त्याने प्रतिपादन केलेले हे तीन घटक म्हणजे-'मेटपोइया'-अर्थात कवितेचे असे तत्त्व की जे रूपकांशी संबंधित आहे. 'फोनापोइया'- जो ध्वनि या घटकाशी संबंधित आहे, आणि 'लोगोपोइया'- जो शब्दांमधील बुद्धी तत्त्वाचा विन्यास आहे. ही तीनही तत्त्वं 'तूर्तास तरी...' या कवितासंग्रहातील कवितांमध्ये आढळतात.


**अरविंद सुरवाडे**
चलभाषः ९८६९९२१६०३

◆◆

# गंमत गाणी ते जीवनाचं सूत्र सांगणाऱ्या कविता

**नामदेव माळी**

**डॉ. सुरेश सावंत यांच्या 'नदी रुसली नदी हसली' या बाल– काव्यसंग्रहाचा परिचय करून देणारा लेख.**




पुस्तकाचे नावः **नदी रुसली नदी हसली**
(बालकुमारांसाठी कवितासंग्रह)
लेखक : **डॉ. सुरेश सावंत**
प्रकाशक : **ग्रंथाली प्रकाशन, मुंबई**
पृष्ठे : **६४**
मूल्य : **१२०/–**

**बा**लकथासंग्रह, बालकवितासंग्रह, चरित्र या साहित्य प्रकारांमध्ये डॉ. सुरेश सावंत यांनी बालकुमारांसाठी विपुल लेखन केले आहे. 'नदी रुसली नदी हसली' ह्या कवितासंग्रहाची पहिल्या दहा संग्रहांमध्ये भर पडली आहे. साधारणपणे इयत्ता चौथी ते दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या वयातील मुलांसाठीच्या ह्या कविता आहेत. रंजकता, कल्पनारम्यता, ताल, लय आणि या मुलांच्या भावविश्व आणि अनुभवविश्वातील विषय, आशय असल्यामुळे ह्या कविता मुलांना नक्की भावतील. ह्या कविता फक्त रंजक नसून रंजकतेबरोबर विचार करायला लावणाऱ्या आहेत. यातून प्रबोधन आणि संस्कार मूल्यांचं बीजारोपण बालमनामध्ये व्हायला मदत होईल.

तहानलेले पाणी खारे
श्वास रोखूनी बघती सारे
किंवा
झाडांना वेलींना
मी माझा श्वास देतो
रोज नव्या पिकांतून
मी पुन्हा जन्म घेतो

अशा ओळींमधून कविता म्हणजे र ला र आणि ट ला ट जोडून यमक जुळवलेले नसते, तर मनातले भाव आणि

विचार सांगण्यासाठी त्यात काव्य असावं लागतं, हे मुलांना कळेल. तहानलेले पाणी किंवा झाडांना वेलींना मी माझा श्वास देतो ह्या कल्पना कवितेला वेगळा, अधिकचा अर्थ प्राप्त करून देतात. या अर्थाने अशा ओळी मुलांना कवितेचा अर्थ, कविता काय असते अशी नवी ओळख करून देतील.

कवितेला व्यापक अर्थ प्राप्त होण्यासाठी वाक्प्रचारांचा आणि वेगळ्या/नवीन शब्दांचा वापर कसा उपयुक्त ठरतो याची उदाहरणे या कवितांमध्ये खूप आहेत. कविता वाचताना शब्द सहज आलेत असं वाटतं; परंतु हा वापर अत्यंत कल्पकतेनं आणि खुबीनं केला आहे. यामुळे कवितेची उंची आणि खोली वाढते, त्याचबरोबर मुलांना नवीन शब्दसाठा गवसेल, त्यांची भाषा अधिक समृद्ध होईल. गटारगंगा, नागवणारी, सजग, दिक्काल, आम्रतरू, मनोविकल, आनंदघन असे शब्द तसेच मस्तक उन्नत होणे, कानोसा घेणे, कानांची ओंजळ करणे, अशी काही उदाहरणं देता येतील.

खाद्यजत्रा ह्या कवितेत असे वाक्प्रचार येतात. चापटपोळ्या मिळणे, तिळपापड होणे, पाठीचे धिरडे होणे हे वाक्प्रचार खाण्याशी संबंधित पदार्थांचे शब्द घेऊन तयार होतात; पण वाक्प्रचाराचा अर्थ वेगळाच निघतो ही गंमत ठरवून केली आहे.

या संग्रहात शाळा, शेतकरी, पुस्तक, निसर्ग, मोबाईल ह्या मुलांच्या अनुभवविश्वातील व आवडीच्या विषयांवरील कविता आहेत. चंद्र, नदी, प्राणी, पक्षी हे मुलांचे आणखी जवळचे विषय. चंद्रावरची प्रयोगशाळा ह्या कवितेमधून चंद्रावर भटकंती होते.

चंद्रावरचे गुरुत्वाकर्षण
आहे फारच कमी
वजन कमी करण्याची
संधी आहे नामी

यांसारख्या कडव्यांमधून तर्क आणि विज्ञानाला बरोबर घेऊन कल्पनेच्या भराऱ्या मारल्या आहेत.

चंद्रावरच्या सश्यासोबत
खूप करीन मस्ती
पृथ्वीवरची गर्दी टाळून
तिथेच करू वस्ती

अशा ओळींमधून वास्तव आणि कल्पना यांचा मेळ घातला आहे. होडी चालली ह्या कवितेत अशीच समुद्रावरची सैर घडवली आहे.

सईताई ह्या कवितेची रचना लोकगीताच्या जवळ जाणारी आहे.

सईताई सईताई किती बाई धाक
मला नाही धाक मी करते ताक

दोन ओळींचे कडवे, चार ओळींचे कडवे, मुक्तछंदाच्या जवळ जाणारी कविता, गेयता असणारी कविता अशी रचनांची विविधता आहे. चालढकल या कवितेत मुक्तछंदासारखी रचना असली तरी यमकांच्या रचनेमुळे कवितेला ताल आणि वेग प्राप्त झाला आहे. ही कविता रचनेच्या दृष्टीने विंदा करंदीकर यांच्या माझ्या मना बन दगड ह्या कवितेची आठवण करून देते.

चिंतोबा, अक्षरांच्या गमती जमती, कागदाची कमाल या कविता गंमतगाणी वाटाव्यात अशा आहेत. कागदाची कमाल ह्या कवितेची सुरुवात

कागदाचा उंदीर केला
खाऊ खाऊन बिळात गेला

अशी गमतीची आहे तर शेवटच्या भागात

कविता लिहिली कागदावर
कोरून बसली काळजावर

काळजावर कोरणे हा वाक्प्रचार काळजावर कविता कोरणे अशा अर्थाने येतो, तेव्हा शब्दांना कवितेचा अर्थ प्राप्त होतो. रंजक वाटणारी कविता वेगळी उंची गाठते, तर वाचनपेटीसारखी कविता पुस्तके वाचून थांबायचे नसते, तर

आवडलेल्या पुस्तकावर
निबंध लिहून झाले
पुस्तकाशी मैत्री होता
मस्तक उन्नत झाले

वाचनाला कृतीची जोड दिली, तर मस्तक उन्नत होण्याचा मार्ग ही कविता दाखविते. डॉ. सुरेश सावंत मुख्याध्यापक असताना मुलांनी लिहिते, वाचते व्हावे म्हणून विविध उपक्रम राबवत होते. त्यांचा हा अनुभव, वाचनसंस्कृती-लेखनसंस्कृती संवर्धनाचा ध्यास त्यांच्या पुस्तक माझा मित्र, वाचनपेटी ह्या कवितांमधून दिसून येतो. आनंदाने जगण्याचा मंत्र, चालढकल, पुस्तक माझा मित्र, विज्ञानसाक्षर, वाचनपेटी, मानवतेचे मंदिर, पर्यावरणपूरक गणपती या कवितांमधून विचारांची पेरणी केली आहे.

माझी शाळा, आमचा परिपाठ, विद्यालय गीत,

स्वर्गासारखा वर्ग या शाळेच्या अंतरंगात शिरायला लावणाऱ्या कविता आहेत. विद्यालय गीत ही कविता डॉ. सुरेश सावंत यांनी मुख्याध्यापक म्हणून काम केलेल्या राजर्षी शाहू विद्यालय या नांदेडच्या शाळेचं गीत आहे; परंतु वाचणाऱ्या प्रत्येकाला हे माझ्या शाळेचं गीत आहे, असं वाटल्याशिवाय राहणार नाही.

टीव्हीमधला राक्षस, कर्णपिशाच, सेल्फी या कवितांमधून सध्याच्या काळात टीव्ही आणि स्मार्टफोन यांचा माणसांच्या आयुष्यात झालेला अतिरेकी शिरकाव मांडला आहे.

सेल्फिश लोकांचा सेल्फिश गाव
सेल्फीला आला भलताच भाव
असे सांगता सांगता
वेळीच आपण शिकू या धडा
आभासी जगातून बाहेर पडा

अशा प्रकारे या कविता संदेश देतात.

धुळवडीच्या रंगात रंगून माकडं होणाऱ्या, गमती जमती करणाऱ्या, मुलांना आनंद देणाऱ्या, रमविणाऱ्या कवितेपासून ते कोरड्या नदीपात्राला एकदा नांगरून तर पाहा, तिची हक्काची वाळूची शाल पांघरून तर पाहा अशा ओळींतून किंवा

पेरल्याशिवाय उगवत नाही
जीवनाचे सूत्र आहे

अशी जीवनसूत्रांची ओळख करून देणारी कविता असा प्रवास या संग्रहात मांडला आहे. बालांपासून कुमारांपर्यंत सर्वांनाच या कविता नक्कीच आवडतील.

चौसष्ट पानांचा हा संग्रह संपूर्ण रंगीत आहे. त्यामुळे तो अधिक आकर्षक झाला आहे. ज्ञानेश बेलेकर यांनी चितारलेली चित्रे कवितांचा आशय बोलका करणारी आहेत. बालकुमारांनी हा संग्रह अवश्य वाचून आनंद घ्यावा.

**नामदेव माळी**
सांगली । चलभाष : ९४२३८६९४०४
email : namdeosmali@gmail.com

◆◆

## जाहिरातीचे दरपत्रक

**सप्रेम नमस्कार!**

महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मुखपत्र असून मराठी साहित्य-संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे त्रैमासिक आहे. म.सा.पत्रिकेला १०४ वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे. म.सा.पत्रिकेत मराठी साहित्याच्या विविध प्रवाहांचा आणि प्रकारांचा परामर्श घेतला जातो. पत्रिकेने विशेषांकही प्रकाशित केले आहेत. साहित्यसंशोधनविषयक लेख पत्रिकेतून नियमितपणे प्रकाशित केले जातात.

ग्रंथपरीक्षणे आणि वाङ्मय समालोचन करणारे लेख पत्रिकेमध्ये प्रसिद्ध होतात. समकालीन साहित्य व्यवहारावर म. सा. पत्रिकेतून भाष्य केले जाते. संशोधक, विद्यार्थी आणि मराठी रसिक यांनी सदैव पत्रिकेला उदंड प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्रातील सर्व थरांतील रसिक वाचक पत्रिका वाचतात. १३,५०० प्रती इतक्या संख्येने पत्रिका छापली जाते आणि आजीव सभासदांना अंक मोफत पाठविला जातो. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेला आपल्या व्यवसायाची, प्रकाशनांची अथवा शुभेच्छापर संदेशांची जाहिरात देऊन पत्रिकेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे, ही विनंती.

**– प्रकाशक आणि संपादक**
**(म. सा. पत्रिका)**

| जाहिरातीचे दरपत्रक | |
|---|---|
| कव्हर २ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| कव्हर ३ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| मलपृष्ठ ४ (रंगीत) | रु. १०,०००/- |
| आतील पान (कृष्णधवल) | रु. ४,०००/- |
| आतील अर्धे पान (कृष्णधवल) | रु. २ ,०००/- |
| आतील पाव पान (कृष्णधवल) | रु. १,०००/- |

# विवेकवेलीची लावणी

प्रा. केदार जोशी

**आयन रँडच्या 'ॲटलास श्रग्ड' या कादंबरीची मर्मज्ञ चिकित्सा करणारा समीक्षा लेख.**

साहित्य सोनियाचिया खाणी ।
उघडवी देशियेचिया आक्षोणी ।
विवेकवेलीची लावणी । हों देई सैंधा ।। १२ ।।
ज्ञानेश्वरी अध्याय १२ वा

जागतिक साहित्यात प्रचंड पृष्ठविस्तार असूनसुद्धा वाचकप्रिय असणारी पुस्तके मोजकीच असावीत. त्यांच्या कालातीत लोकप्रियतेचे प्रमुख कारण म्हणजे त्यांतील चिरंतन, शाश्वत अशी मध्यवर्ती कल्पना, तिला असणारे अर्थांचे बहुविध स्तर, तिची प्रतीकात्मता इ. त्यातील एखाद्या तत्त्वज्ञानातील सिद्धांताला सांगू पाहणारी पुस्तके तर खूपच कमी. कोणत्याही काळातील मानवसमाजाला लागू होणारी तिची उचितता या कसोटीवर त्यांतील खूपच कमी साहित्य उतरत असेल. हजार-पंधराशे पानांचा विस्तार असूनसुद्धा प्रचंड खपाच्या पुस्तकांत टॉलस्टॉयचे वॉर अँड पीस , सर्वांतीसचे डॉन क्विगझोट, जे आर आर टोल्किन्सचे लॉर्ड ऑफ द रिंग्स, डोस्टोयव्हस्कीचे द ब्रदर्स करमॅझॉव्ह यांचा समावेश आपण सहज करू शकतो. मराठी साहित्यातील मानबिंदू ठरलेल्या कादंबऱ्यांपैकी अधिकतर दीर्घ कादंबऱ्या असून त्या पौराणिक कथांतील प्रतीकात्मक सार्वकालिक संदर्भांना स्पर्श करतात. आयन रँडच्या 'ॲटलास श्रग्ड' (१९५७) या दीर्घ आणि प्रचंड खपाच्या पुस्तकाचे वेगळेपण दिवसेंदिवस जगभरच्या वाचकांना खुणावते आहे. विवेकाचे मानवी जीवनातील अधिष्ठान ह्या एका मूलभूत मध्यवर्ती कल्पनेवरचे हे पुस्तक उद्योगप्रधान होणाऱ्या देशांतील नवउद्यमींना तत्त्वज्ञानात रस असणाऱ्यांइतकेच भावते आहे. आयन रँड Objectivism ही (वस्तुनिष्ठतावाद) या तत्त्वज्ञानाची पुरस्कर्ती. तिला तिच्या लेखनातून जाणीवपूर्वक या वादाचा पुरस्कार करायचा आहे; पण म्हणून काही ॲटलास श्रग्ड ही कादंबरी ऑब्जेक्टिव्हिजमचा जाहीरनामा ठरत नाही. चांगल्या कादंबरीला साजेशी कथावस्तू, प्रभावी पात्ररचना, लक्षवेधी संवाद आणि तृतीय पुरुषी सर्वव्यापी निवेदकाचे खिळवून ठेवणारे कथनकौशल्य ह्या या पुस्तकाच्या जमेच्या बाजू आहेत. काहीही सैद्धांतिक पार्श्वभूमी माहीत नसलेला सामान्य वाचकसुद्धा ही हजारभर पाने वाचून काढील असा रहस्यप्रधान आकृतिबंध या पुस्तकाला आहे. आजपर्यंत ३१ भाषांत भाषांतरे, काही कोटींच्या घरात विक्री आणि या एकाच पुस्तकावर आधारित काही साहित्यिक व्यासपीठे असा लौकिक जसा याला लाभला आहे तशीच

समाजविरोधी, भांडवलशाहीची तळी उचलणारे पुस्तक म्हणून विखारी टीकाही या पुस्तकाच्या वाट्याला आलेली आहे.

आयन रँड (१९०५-१९८२) एक तत्त्वज्ञ कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध असून तिच्या साहित्य आणि वैचारिक निबंधांतून तत्त्वज्ञान, ज्ञानमीमांसा (epistemology) आणि कलाविषयक सिद्धांतांची मांडणी केलेली दिसून येते. द फाऊंटेन हेड या पहिल्या कादंबरीमुळे तिचे नाव साहित्यिक जगतात सर्वतोमुखी झाले आणि ॲटलास श्रग्ड या तिच्या शेवटच्या कादंबरीमुळे तिच्या लेखनावर लोकमान्यतेची मोहोर उमटली. अशा जगाची निर्मिती करणे, की जिथे मानवी परिपूर्णतेची प्रचिती यावी हा आपला जीवनोद्देश प्रतिपादित करणे, असा आपल्या लेखनाचा हेतू असे ती सांगते. तिच्या तत्त्वज्ञानाचा सारांश तिच्याच शब्दांत सांगायचा झाला तर : माझे तत्त्वज्ञान हे मूलत: माणूस हे एक थोर अस्तित्व आहे ही संकल्पना होय. त्याचा स्वत:चा आनंद हेच त्याच्या जीवनाचे नैतिक उद्दिष्ट. उत्पादक कार्ये हेच त्याचे उदात्त कर्म आणि विवेक हेच चिरस्थायी वैशिष्ट्य. भांडवलवाद हीच या तत्त्वज्ञानाला सुसंगत असणारी राजकीय आर्थिक व्यवस्था आहे कारण व्यक्तीला साधन आणि साध्य म्हणून केवळ याच व्यवस्थेत प्रतिष्ठा असते. वैयक्तिक हक्कांचे रक्षण हीच एक विवेकाधिष्ठित बाब समजणारे, किमान शासकीय हस्तक्षेप असणारे आणि उदार बाजारपेठेचा पुरस्कार करणारे राज्य ही अशा माणसाच्या विकासाला पोषक जागा.' तिचा दृष्टिकोन समजावून घ्यायला तिचे साहित्य वाचायला लागते. वर्तमानातली संस्कृती, नैतिकता आणि राजकारण यांवरची तिची समीक्षा अधिक अस्सल, विचारवर्धक आणि अनेकदा विवादास्पद किंवा प्रक्षोभक म्हणून पाहिली गेलेली आहे. तत्त्वज्ञानाचे व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातील महत्त्व तिच्या लेखनातून सातत्याने मांडलेले दिसते. एक चांगले मानवी जीवन जगण्यास आणि ते जगण्यासाठी पोषक वातावरण तयार करण्यासाठी तत्त्वज्ञानाची गरज असते. रँडच्या मते, प्रत्येकासाठी तत्त्वज्ञान गरजेचे असतेच. कोणत्या तरी एका स्पष्ट तत्त्वज्ञानाच्या मार्गदर्शनातच प्रत्येक जण आपापली वाटचाल करीत असतो. तिच्या लेखनातून हे सतत प्रतिपादित केलेले आहे, की जितके आणि जसे आपले हे तत्त्वज्ञान अचूक, तेवढी आणि तितकीच आपल्या जीवनाची यशस्वीतता. जर आपले तत्त्वज्ञान अधिक भरकटलेले असेल, तर आपले जीवन म्हणजे स्वत:साठी व इतरांसाठी संकटकारकच.

ह्या विस्ताराने आणि आशयाने प्रचंड असणाऱ्या पुस्तकाच्या मागे तिचे एका तपाचे लेखनश्रम आहेत. ॲटलास श्रग्ड हे थोडक्यात तिच्या अस्तित्वविषयक आणि माणसाच्या अचाट क्षमतेबाबतच्या दृष्टिकोनाचे नाट्यमय सादरीकरण आहे. या कादंबरीतून साहित्यविश्वात प्रथमच नैतिकतेच्या अधिष्ठानावर कार्यरत असलेल्या उद्योगजगताचा सन्मान तर मूल्यनिर्मितीची चोरी करणाऱ्या त्याच जगाच्या मोठ्या भागावर आघात केलेला दिसतो.

ह्या पुस्तकाचे शीर्षक प्रतीकात्मक आहे आणि ग्रीक पुराणकथांतील नायकांचे काही संदर्भ या पुस्तकातून अनेकदा आढळतात. ॲटलास हा ग्रीक पुराण कथेतील एक नायक ज्याने पृथ्वीचा भार आपल्या खांद्यावर पेललेला आहे. ॲटलास हे एक प्रतीक आहे या कादंबरीतील हेन्री रियार्डन आणि डॅग्नी टॅगार्ट सारख्या उद्योगपतींसाठी योजलेले. अशा लोकांच्या परिश्रमांवर आणि बौद्धिक बळावर अनेक परोपजीवी तरलेले असतात. ह्या परोपजीवी लोकांनी आपल्या स्वत:च्या उत्पादक क्षमता वापरणे केव्हाच सोडून दिलेले असते. या कादंबरीत नायक म्हणावीत अशी चार पात्रे आहेत. हेन्री रियार्डन, डॅग्नी टॅगार्ट, फ्रान्सिस्को आणि जॉन गाल्ट. ह्या अशा ॲटलासना अशा बांडगुळांनी भरलेले हे जगाचे ओझे जरासे झटकून टाकण्याचे आवाहन जॉन गाल्ट आणि फ्रान्सिस्को करतात. ही बांडगुळी व्यवस्था मोडण्याचा मार्ग म्हणजे हे उत्पादक, सर्जक कार्य अशा लोकांसाठी करणे सोडून देणे असा विश्वास फ्रान्सिस्को आणि जॉन गाल्टचा आहे.

रँडचे हे सारे तत्त्वज्ञान एका खिळवून ठेवणाऱ्या रहस्यकथेद्वारे उलगडत जाते. हे सारे रहस्य 'कोण आहे जॉन गाल्ट?' या एका प्रश्नाभोवती केंद्रित झालेले आहे. कादंबरीची कथावस्तू थोडक्यात: परिस्थिती अशी की

मोठमोठ्या कारखान्यांना टाळे लागताहेत, वाहतूक आणि दळणवळण जवळजवळ थांबलंय, धान्य कोठारे रिकामी पडलीत आणि देशभरातील ज्या प्रमुख व्यक्ती ज्यांच्या कर्तृत्वामुळे देश संपन्नता उपभोगतोय त्या व्यक्ती एकामागोमाग एक अदृश्य होत आहेत. आघाडीची अर्थव्यवस्था असणाऱ्या या देशात वीजपुरवठादेखील दुर्मिळ होऊ लागलाय. शहरे उणिवेच्या थंडीने गोठून गेली आहेत. सर्वत्र दुःख, दैन्य, विफलता. हे दुष्टचक्र कसं थांबवावं हे ना कुणाला माहीत, ना कुणाला ठाऊक, की हे सारं का घडतंय. हे सारं कुणीतरी जाणूनबुजून घडवून आणतंय याचा सुगावा एकाच स्त्रीला लागलाय–डॅग्नी टॅगार्ट. ती आहे काही खंडांत पसारा असणाऱ्या रेल्वे कंपनीची कार्यकारी प्रमुख. तिला जाणवतंय, की या सर्व समस्यांचं उत्तर एका अत्यंत अद्‌भुत शोधात दडलेलं आहे आणि या साऱ्या समस्या त्या शोधकर्त्याने नियोजनपूर्वक घडवून आणलेल्या आहेत. जो एकदा म्हणाला होता, की तो या जगाचे इंजिन बंद पाडेल म्हणून. या समस्यांची उत्तरे त्या माणसाला शोधल्यानंतरच मिळणार आहेत. त्या माणसाचे अस्तित्व सर्वांच्या ओठांवर एक प्रश्न बनून वावरते आहे– कोण आहे जॉन गॉल्ट ?

या संघर्षाच्या काळात तिने आणि हेन्री रियार्डन या पोलाद उद्योजकाने न डगमगता ह्या भरकटलेल्या देशाची गाडी रुळावर आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न चालवलाय. हे करताना त्यांना गॉल्टच्या जगाचे इंजिन बंद पाडण्याच्या अघोरी हेतूचे अनेक पदर उलगडतायत. सार्वजनिक हित ही संकल्पना कशी तकलादू आहे, ऐतखाऊंच्या फायद्याची आणि राबणाऱ्यांच्या विनाशाची आहे ह्याची उदाहरणे त्यांना इथे तिथे सापडतात. स्पर्धात्मक वातावरणाच्या विरोधातले सरकारी कायदे डोईजड झाल्याने आघाडीचे उद्योग बंद पडतानाचे विदारक सत्य त्यांना सापडते. निर्मिती करणारे हर क्षेत्रातले हात निवृत्त होताना दिसताहेत. जगाचे इंजिन बंद पडण्यास सरकारी पोलादी चौकटीच्या आतले तितकेच जबाबदार वाटताहेत. देशातील सर्वश्रेष्ठ बँकर, आघाडीचा तेल उत्पादक, विद्वजन आणि देशाला नेतृत्व देतील असे विद्यार्थी घडविणारे प्राध्यापक, एक अत्यंत प्रतिभावान संगीतकार आणि आपल्या निःस्पृहतेसाठी देशभरात प्रसिद्ध असणारे न्यायमूर्ती– कोणताही मागमूस न ठेवता एकापाठोपाठ एक असे अदृश्य होतात. तांब्याच्या खाणींचा गर्भश्रीमंत मालक आणि उद्योगक्षेत्रात हात लावेल तिथे सोने काढणारा फ्रान्सिस्को सारखा अवलिया त्याच्या सगळ्या पिढ्यांचे संचित मागे टाकून एक फालतू गुलहौशी म्हणून जगासमोर येतो. एक तत्त्वज्ञ समुद्री चाचा बनून चारी खंडांत लुटालूट करतो. जगाचे व्यवहारचक्र वेगाने फिरवू शकले असते असे शोध बंद पाडलेल्या कारखान्यांतून भंगारात जाऊन पडतात. असं एकाएकी या जगाला काय होतं? जीवनरस संपून पोखरून जाऊन कणाकणाने ढळणाऱ्या झाडाप्रमाणे हे जग का भासू लागते? अशा या जगाला वाचविणार कोण?

हे सारे बुद्धिमान, कर्तृत्ववान लोक सामाजिक जीवनातून अदृश्य झाल्यानंतर अटलांटिस नावाच्या खोऱ्यात, मानवी हस्तक्षेपापासून दूर त्यांना अभिप्रेत असणारे आदर्श सामाजिक जीवन जगताहेत. डॅग्नीला समजते, की जॉन गॉल्टच ह्या कर्तृत्ववान लोकांच्या संपाचा सूत्रधार आहे, घडणाऱ्या घटनांचा कर्ता आहे. गेली काही वर्षे गॉल्ट जगाचे हे बंद पडलेले इंजिन पूर्ववत करण्याचे डॅग्नीचे प्रयत्न लपून जवळून पाहतो आहे. एका प्रकारे त्याच्या हेतूंना सुरुंग लावणाऱ्या डॅग्नीच्या क्षमतेविषयी त्याच्या मनात आदर आहे, आकर्षण आहे.

हे भ्रष्ट सरकार जेव्हा देशाचा ऱ्हास थांबविण्यात सपशेल अपयशी ठरते तेव्हा गॉल्टला देशाचा आर्थिक हुकूमशहा होऊन आर्थिक घडी बसविण्याची लालूच दाखविते. ह्या प्रस्तावास त्याने नकार देताच त्याचा अमानुष छळ करते. संपावर गेलेले लोक आणि डॅग्नी त्याला सुखरूप सोडवितात. सरकार त्याच्या कर्माने कोसळते आणि संपावर गेलेले लोक मुक्तपणे या नव्या जगात निर्मितीक्षम कार्ये करण्यासाठी पुन्हा अवतरतात.

जॉन गाल्ट हे पात्र कादंबरीच्या अखेरच्या भागात प्रत्यक्ष अवतरते तोपर्यंत त्याच्याविषयीच्या अफवा, दंतकथा आणि समज गैरसमज अनेक पात्रांच्या विचार–बोलण्यातून त्याच्याविषयीचे रहस्य गडद करतात. Who is John Galt? हा तोवरचा अनुत्तरित प्रश्न लोकांसाठी अटळतेचे, मानवी दुःखांच्या अटळतेचे प्रतीक बनलेला आहे. फ्रान्सिस्को जॉन गाल्ट म्हणजे कोण हे विचारले असता सांगतो:

"John Galt is a Prometheus who changed his mind. After centuries of being torn by vultures in payment for having brought to men the fire of the Gods, he broke his chains and he withdrew his fire-until the day when men withdraw their vultures."

जॉन गाल्ट हा एक आधुनिक प्रोमेथियस आहे ज्याने आपल्या मूळ स्वभावात बदल केलेला आहे. (प्रोमेथियस हा ग्रीक पुराणकथांतील अत्यंत तल्लख बुद्धीचा मनुष्यजातीचा साहाय्यक ज्याने माणसासाठी स्वर्गातील देवतांना फसवून अग्नी पृथ्वीवर आणला आणि मानवी संस्कृतीचा उदय झाला अशी दंतकथा.) पृथ्वीवर अग्नी आणण्याच्या बदल्यात इथल्या गिधाडांनी त्याचे लचके तोडणे सुरू ठेवले. आता या युगाच्या छळाला कंटाळून त्याने इथला अग्नी परत घेतला आहे जोवर माणसे आपल्यातील गिधाडे परत घेणार नाही तोवर.

उद्यमांच्या यशासाठी कोणतीही ठोक सूत्रे यात नसूनही हे पुस्तक पूर्वी उद्योजकांमध्ये आणि आता नव उद्यमींमध्ये लोकप्रिय आहे. यातली बहुतांश प्रमुख पात्रे उद्योजक आहेत. त्यांनी त्यांच्या व्यवसायात लक्षणीय प्रगती केलेली आहे. त्यांचे उद्योग ही त्यांची passion आहे. त्यातल्या काहींच्या घराण्यांत उद्योगांचा काही पिढ्यांचा इतिहास आहे. राष्ट्रउभारणीत या घराण्यांचा मोलाचा वाटा आहे. महत्त्वाचे म्हणजे, खलनायकी गटातील बरीच पात्रेसुद्धा उद्योजकच. फरक एवढाच की त्यांनी उद्योगाच्या मूलभूत स्वरूपाशी बेईमानी केलेली आहे. त्यांच्यासाठी उद्योग म्हणजे असे क्षेत्र जिथे मूल्यनिर्मितीसाठी स्वत:च्या मनाशी/विवेकाशी एकनिष्ठ राहायची गरज नसते. उलट, इतरांनी स्वकष्टाने एखाद्या उत्पादनाला मूल्य प्राप्त करून दिले असेल, तर ते बळकवायचे हा त्यांचा यशाचा मंत्र. त्यांच्यापैकी जेम्स टॅगार्ट त्याच्या बहिणीच्या डॅग्नीच्या कर्तृत्वावर मिरवत आहे आणि ओरेन बॉईलसारखा सरकारी कृपेवर मोठा झालेला उद्योजक आहे. सूर्यास्त जवळ आला, की खुज्या माणसांच्या सावल्या लांब भासू लागतात. अशा सावल्यांना स्वत:ची वास्तव उंची म्हणून नाचणारे moochers (इतरांच्या चांगुलपणाचा वापर करून आपली पोळी भाजून घेणारे) सर्वच क्षेत्रांत असतात. संधीसाधूंना एकत्र बोलवण्यासाठी आमंत्रणाची गरज नसते. ते आपसूकच होत असते. उथळ तत्त्वज्ञ, नकारात्मकता पसरविणारे विचारवंत, कवडे कवी आणि सरकारी कृपेसाठी लेखण्या झिजवणारे साहित्यिक, सामान्य प्रतिभेचे पण महान होण्याची लालसा बाळगणारे तथाकथित शास्त्रज्ञ, स्वार्थासाठी देश विकायला तयार असणारे राजकारणी, समाजकल्याणाचे मुखवटे चढविलेले निष्क्रिय समाजसेवी आणि त्यांच्या बाजारू संस्था, ढोंगी आदर्शांचे परम ढोंगी चेले, काहीतरी पदरात पडावे म्हणून लाळघोटी प्रशंसा करणारे बुणगे आणि तसल्याच फॅशनेबल बाहुल्या इ.इ. सारे या कळपात यथावकाश सामील होतात. ह्या साऱ्या मनुष्यस्वभावांचे प्रदर्शन आयन रॅंडने सजविलेले आहे.

यातले नायक आपल्या सिद्धांतावर ठाम असणारे विचारवंत होत. सरकारी मुखवट्याआडून कितीतरी आत्मघातकी, राष्ट्रद्रोही योजनांना समाजहितैषी अशा रूपात सादर केले गेल्यावर ते त्याचा न डगमगता विरोध करतात. निर्णयकर्त्यांच्या अतिरेकी स्वार्थलोलूपतेमुळे अर्थव्यवस्थेचे ढासळणे ही अटळता माहिती असूनही तिला सावरण्याचे प्रयत्न या नायकांनी सुरूच ठेवलेले असतात. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यांना जवळच्या लोकांनीच वेदनादायक बनविले; पण वास्तवाला समजावून घेऊन भिडण्याचाच पर्याय त्यांनी निवडला. त्यांच्या दृष्टीने विवेक हीच वैयक्तिक आणि सामाजिक निर्णयातील अंतिम कसोटी आहे. त्यांना स्वातंत्र्य हवे आहे: विचारांचे, कष्टसाध्य ते कमावण्याचे, नवनव्या आणि अज्ञात बौद्धिक प्रांतांत अनिर्बंध संचाराचे, बौद्धिक आणि शारीरिक कष्टाच्या जोरावर जे काही मिळविले आहे त्याचे तोलून मापून मोल देणाऱ्या शुद्ध व्यापाराचे, आपला वैयक्तिक आनंद साध्य करण्याच्या मार्गात यशस्वी आणि अयशस्वी होण्याचेही. कादंबरीतील सर्व नायक विचार करणारे आहेत. त्यांचे जे काही व्यावसायिक कर्म आहे त्याला अधिकाधिक जाणून घेण्याची बांधिलकी त्यांच्यात आहे. त्यातून ते स्वत:चा आणि भवतालाचा शोध घेतात. विचारांती ते आपली ध्येये आणि मूल्ये ठरवितात. महत्त्वाकांक्षेच्या अधीन जाऊन नव्हे, की वास्तवापेक्षा वैयक्तिक भावनांना डोईजड करून नव्हे.

याउलट यातली खलनायकी पात्रे विवेकाचे, बुद्धीचे अंतिम अधिष्ठानच नाकरतात. त्यांना त्यांच्या भावनेवर चालणारे जग हवे आहे. ते तसे निर्माण करण्याची त्यांची इच्छा आहे. असे जग नैसर्गिकरीत्या अस्तित्वात येत नसते. बळाचा, बुद्धिभेदाचा वापर करूनच हे घडू शकते हे त्यांना ठाऊक आहे. ते तार्किकता आणि वास्तव यांना पद्धतशीरपणे बाजूला करतात. हे दोन्ही संपल्यावर जे उरते त्यावर त्यांचे कर्तृत्व- म्हणजे भावनांवर. यामुळे ते नेहमीच वास्तवाशी विरोधी पवित्र्यात असतात आणि निर्माण तर काहीच करू शकत नाहीत. आयन रँडच्या मते, ॲटलास श्रग्डची मध्यवर्ती कल्पना आहे, माणसाच्या अस्तित्वातील मनाची म्हणजेच विवेकाची भूमिका. ह्या साऱ्या कथेतून हे दिसतेच, की मानवी जीवनातील सर्व प्रकारच्या ज्ञानाचे आणि मूल्यांचे मूळ विवेकातच आहे आणि त्याचे नसणे म्हणजे सर्व खळांची व्यंकटी. यातल्या नायकांना त्यांच्या आत्मकेंद्रिततेबद्दल टीका सहन करावी लागते; पण त्यांची ही आत्मकेंद्रितता त्यांच्याकडून फसवणूक, शोषण, आततायी भौतिकता किंवा पाषाणहृदयी कृती घडवित नाही, तर खलनायकांनी त्याग आणि समाजाप्रतिच्या समर्पणाची झूल पांघरलेली आहे. नायकांचा रस उदात्त अशा सद्गुणांत किंवा मूल्यांत आहे. बेडर प्रामाणिकपणा, स्वतंत्र निर्णय घेण्याची वृत्ती, वैयक्तिक मिळकत हे त्यांचे अर्जित गुण आहेत. इतरांकडून जेव्हा त्यांना काही घ्यायचे असते तेव्हा ते योग्य सौद्याच्या पातळीवर घेण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांचा हा पारदर्शक व्यवहार परोपजीवी व्यक्तींच्या नेहमीच पथ्यावर पडतो. ह्या नायकांसाठी स्वत:ला कुर्बान करून केलेला त्याग हा केवळ आत्मनाश असतो, क्रूरता असते.

या पुस्तकात चांगल्या वाईटाच्या अनेक पारंपरिक कल्पनांना आव्हान दिलेले दिसते: पैसा हे सर्व वाईटाचे मूळ आहे, माणूस हा जन्मत:च अध:पतित आहे आणि कोणताही स्वार्थ वाईटच, आत्मत्याग चांगला. असले पारंपरिक वरपांगी आदर्श वाटणारे; पण ज्यांच्या बाबतीत माणसाचे वर्तन वेगळेच असते असले निकष चिंतनपर संभाषणांद्वारे खोडून काढलेले आहेत. या कादंबरीचा अवकाश मोठा त्यामुळे अनेक पाने चालणारे दोन पात्रांतील संवादही यात येतात. एवढेच काय जॉन गाल्टचे रेडिओवरील भाषण पुस्तकातील सुमारे ६० पाने व्यापते; पण हे तत्त्वज्ञान कुठेही रटाळ वाटत नाही. त्याग या बेगडी संकल्पनेचे शवविच्छेदन अनेक प्रसंगांतून इथे केलेले दिसते. अशा प्रकारे ॲटलास श्रग्डमध्ये विवेकाधीन स्वकेंद्रितता आयुष्याची नैतिकता असते, तर पारंपरिक नि:स्वार्थीपणा आणि आत्मत्याग म्हणजे मृत्यूची नैतिकता. ज्यावर सर्व क्षेत्रांतील भोंदूंची पोटे चालतात, फुलतात अशा संकल्पनांना असे रोखठोक नाकारणे हेच या पुस्तकाच्या समाजवादी, साम्यवादी, मानवतावादी इ. क्षेत्रातील लोकांच्या विरोधाचे कारण असावे.

या पुस्तकाची जादू आजही का कायम आहे? तर मानवी अस्तित्वाच्या काही मूलभूत प्रश्नांशी ते झटते- झोंबते आणि त्यांची तर्कसंगत उत्तरे सादर करते म्हणून. हे मूलभूत प्रश्न कोणते? तर नफ्याची प्राप्ती हे एक आदर्श कृत्य आहे की सर्व पापांचे मूळ? लैंगिक भावना हा एक उन्नत आत्मिक सद्गुण आहे, की घाणेरडा पाशवी दुर्गुण? विवेक हेच सत्याचे परिमाण आहे, की केवळ श्रद्धा हा सत्याचा पर्यायी स्रोत आहे? आत्मप्रतिष्ठा नेहमी जपावीच का आपले जीवन आत्मदोष आणि आत्मश्लाघेने पछाडलेले असावे? व्यक्तिविकास कोणत्या प्रकारच्या समाजात शक्य आहे आणि कोणत्या समाजात व्यक्तीचे अध:पतन ठरलेले असते? या प्रश्नांचा सारासार विवेकाधारित विचार जोवर आपल्याला करावा लागणार आहे तोवर ॲटलास श्रग्डसारख्या पुस्तकांची उपयुक्तता संपणे शक्य नाही.

**प्रा. केदार जोशी**

बालाजी हाईटस् ६०३, आंबेगाव(खु.) जांभूळवाडी रोड,
पुणे ४११०४३
चलभाष : ७८२१८७५७०५
email : prayatnkaj@gmail.com


◆◆



# माझ्यातला कवी मरत चाललाय : उजेडाचे चारित्र्य बदलविणारी कविता

**डॉ. अक्रम. ह. पठाण**

**इरफान शेख यांच्या 'माझ्यातला कवी मरत चाललाय' या काव्यसंग्रहावरील समीक्षालेख.**




पुस्तकाचे नाव :
**'माझ्यातला कवी मरत चाललाय'**
लेखक : **डॉ. अक्रम. ह. पठाण**
प्रकाशक : **संवेदना प्रकाशन, पुणे**

प्रतिभा ही कोणाची गुलाम नसते. प्रतिभेला गुलामीच्या जंजिरेत अडकविणेही शक्य नसते. ती उत्स्फूर्त असते. ती सभोवताल निर्माण झालेल्या वातावरणाला पर्याय निर्माण करते. ती अवतीभवती घडणाऱ्या माणूस विरोधी घटकांवर लक्ष केंद्रित करते आणि त्या घटकांवर तुटून पडते. तिचे अन्यायावर तुटून पडणे हे नवनिर्मितीसाठीच असते, नवा पर्याय देण्यासाठीच असते. तिचा एक प्रकारचा तो हस्तक्षेप असतो. तो हस्तक्षेप समाजाने अधिक गंभीर होण्यासाठी असतो. कवी इरफान शेख यांनी अवतीभवतीच्या ताणतणावाच्या सूक्ष्म निरीक्षणांच्या नोंदी आपल्या कवितेतून नोंदविल्या आहेत, जी संवेदना भावनेवर आधारित असेल ती काळाच्या कसोटीवर टिकत नाही; पण ज्या संवेदनांत प्रामाणिकपणा असेल त्या संवेदना समाजाचे संतुष्टीकरण करण्याचे काम करतात. समाजाला त्या सत्य सांगण्यासाठी जीवाचे रान करतात. इरफान शेख यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून समाजाला सत्य सांगण्याचा विडा 'माझ्यातला कवी मरत चाललाय' या कवितासंग्रहातून उचलला आहे. 'माझ्यातला कवी मरत चाललाय' हा कवितासंग्रह २०१८ ला पुणे येथील संवेदना प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. कवी इरफान शेख यांचे यापूर्वी 'कोवळे पाषाण' २००३,

‘वेदनांच्या खोलीत’ २००४ आणि ‘मुक्ताछंद’ २००५ इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित आहेत.

इरफान शेख या तरुण कवीचा साहित्य चळवळीत सक्रिय सहभाग आहे. चंद्रपूर येथे ‘सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच’ या संस्थेची स्थापना करून अनेक राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन त्यांनी केले आहे. या संस्थेद्वारे चंद्रपूर येथे विविध वाङ्मयीन चळवळींना ऊर्जा दिली. या क्षेत्रात सर्वच वाङ्मयीन प्रवाहांना समृद्ध करण्यात सूर्यांशचा मोलाचा वाटा आहे. विविध साहित्यप्रवाहांवर स्वतंत्र परिसंवादाचे आयोजन करून या संस्थेने आस्वादकांची बौद्धिक भूक भागविली आहे.

इरफान शेख यांचा ‘माझ्यातला कवी मरत चाललाय’ या कवितासंग्रहाला अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. साहित्य अकादमीच्या प्रवास योजनेचा लाभ या कवितासंग्रहाने कवीला मिळवून दिला आहे. शिवाय या कवितासंग्रहातील कविता ‘गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली’ च्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे.

‘माझ्यातला कवी मरत चाललाय’ या कवितासंग्रहामधून आपल्या मनातील घुसमटीला कवीने अत्यंत जबाबदारीने व्यक्त केले आहे. अवतीभवती घडणाऱ्या घडामोडींचे स्वरूप त्यांनी आधी नीट समजून घेतले. त्यामुळे त्यांच्या कवितेचे आणि घडामोडींचे आंतरिक नाते ‘माझ्यातला कवी मरत चाललाय’ या कवितासंग्रहात पाहावयास मिळते. या घडामोडींची कवीने उलटतपासणी केली. ही तपासणी म्हणजे समग्र जीवनाची फेरतपासणी होय. या तपासणीत ज्या बाबी समाजाला विघातक आहेत त्या बाबी कवी बाजूला सारतो म्हणून कवीच्या कवितेला सामाजिक जीवनाची मर्मदृष्टी प्राप्त झाली आहे. या कवितासंग्रहात एकूण साठ कवितांचा समावेश आहे. या कवितासंग्रहाचे विशेष म्हणजे या कवितासंग्रहाचे प्रवेशद्वार उघडणाऱ्या कवितेचे शीर्षक आहे. ‘कपाटात बंद पुस्तके पाहतात काचे आडून’ आणि ‘आठवण’ ही कविता या कवितासंग्रहाची शेवटची कविता. या दोन्ही कविता अर्थपूर्ण आहेत. पहिल्या कवितेत पुस्तकांवरील प्रेमाचा धबधबा कोसळतो तर शेवटच्या कवितेत प्रेयसीवरील प्रेमाचा! कवीने पुस्तकांवरील प्रेम आणि प्रेयसीवरील प्रेम अत्यंत काळजीपूर्वक हृदयात जपले आहे. या दोन्ही प्रेमांनी कवीला सावरले आहे. कवीला जपले आहे. कवीची आबाळ होऊ दिली नाही. या दोन्ही प्रेमांनी कवीला कंगाल होऊ दिले नाही. या दोन्ही प्रेमांनी कवीला नवनव्या भराऱ्या घ्यायला लावले. या दोन्ही प्रेमांनी कवीला नवनव्याने उगविणे शिकविले. या दोन्ही प्रेमांमुळे कवीच्या कवितेला नवनवी पालवी आली. हे निर्विवाद सत्य आहे. या दोन्ही प्रेमांनी कवीची खूप काळजी घेतली. त्यामुळे कवी कधी विझला नाही. कवीच्या जीवनात खूपदा अंधाराने प्रवेश करण्याचा प्रयत्न केला; पण या दोन्ही प्रेमांनी त्याला ‘गेटपास’च दिला नाही. कवीने अंधाराला शरण यावे, त्याने अंधारदास व्हावे यासाठी अंधाराने खूप प्रयत्न केले; पण पुस्तकांवरील आणि प्रेयसीवरील प्रेमाने हे घडू दिले नाही. ‘कपाटात बंद पुस्तके पाहतात काचे आडून’ या कवितेत कवीने वाचनसंस्कृतीचे महत्त्व विशद केले आहे.

‘याच पुस्तकांनी लावला जीव माझ्या धगधगत्या आयुष्यात म्हणूनच मी जिंकू शकलो लढाई जगण्याच्या समरभूमीत, मी ऐकतो कधी कधी अर्ध्या रात्री कपाटातून येणारे हुंदके, फडफडणारी पाने जेव्हा हिरमुसतात, स्फुंदतात अन् रडतात...’ (पृ.क्र. ३१)

पुस्तकांच्या भावना कवीला कळतात याचा अपार आनंद होतो. कवी पुस्तकांना जीवापाड जपतो आणि पुस्तकेही कवीला जीवापाड जपतात. येथे जपण्याची प्रक्रिया ही समांतर चालते. जेव्हा कवीवर संकटे कोलमडतात तेव्हा संकटांपुढे उधाणत धावण्याचे बळ पुस्तके कवीला देतात.

काय वाचावे आणि काय वाचू नये याची स्पष्ट कल्पना कवीला आहे. कवीने याची आचारसंहिताच तयार केली आहे म्हणून तो जीवनाच्या युद्धातील योद्धा होतो. ज्या पुस्तकांतून जीवनाची नवी रचना कळते, ज्या पुस्तकांतून जीवनाचे मर्म कळते, ज्या पुस्तकांच्या निर्मितीचे केंद्र सर्वहितैषी असते, जी पुस्तके जीवनात यशस्वीपणे पाऊल टाकण्याचे तंत्र शिकवितात ती पुस्तके कवी वाचतो.

'रणरणत्या उन्हात याच पुस्तकांनी धरली डोक्यावर सावली वेदनेवर असहायतेच्या घातली फुंकर माझ्या सदाच बहरून आणलं माझं जगणं अनुभवाच्या फळाफुलांनी परसदार केलं हिरवगार याच पुस्तकांमधल्या अक्षरांच्या वेलींनी...' (पृ.क्र. ३१)

पुस्तकांमुळे कवी स्वातंत्र्याचा निर्भय प्रवक्ता झाला. या पुस्तकांनी कवीला आपल्या जीवनाची पुनर्रचना करायला लावली. पुस्तकांनी कवीला आपल्या जीवनाचे परिष्करण करायला लावले. या परिष्करणाच्या प्रक्रियेमुळे कवीचे जीवन अधिक मोहरत गेले. या पुस्तकांनी कवीला अधिक समृद्ध आणि अधिक गहन व्हायला शिकविले.

पुस्तकांनी कवीला सर्वप्रथम स्वतःच्या जीवनाचे पुनर्वाचन करायला लावले आणि दुसऱ्या पातळीवर अवतीभवतीच्या सांस्कृतिक पर्यावरणाचे वाचन करायला लावले आणि तिसऱ्या पातळीवर सत्य आणि असत्य, सौंदर्य आणि कुरूपता, समता आणि विषमता, स्वतंत्र आणि पारतंत्र्य, विवेक आणि अविवेक यांच्यातील द्वंद्वांचे वाचन करायला लावले. जेव्हा कवी तिसऱ्या पातळीचे वाचन करतो तेव्हा पुस्तके कवीवर उज्ज्वलतेचे शीतल चांदणे शिंपडतात.

**कवी आणि कविताविषयक भूमिका**

'माझ्यातला कवी मरत चाललाय' या कवितासंग्रहात एकोणीस कविता या कवी आणि कविताविषयक भूमिका विशद करणाऱ्या आहेत. या सर्व कवितांमधून कवीने मानवी जीवनाला बंदिस्त करणाऱ्या विचारशैली आणि आचारशैलीविरुद्ध युद्ध पुकारले आहे. या सर्वच कवितांमधून कवीच्या मनातील अस्वस्थतेचा जाळ उफाळून येतो. जीवनातील शाश्वत मूल्यांचे नीट आकलन करून कवीने या सर्व कवितांमधून कवी आणि कविताविषयक भूमिका मांडली आहे.

'मित्रा, पण तू जगलास शेवटी तुझ्याच मनासारखंच घरातल्या दारालाही ठेवलंच कब्ज्याविना मनासारखंच मी विचार करतो आहे मेंदूच्या शेवटच्या टोकावरून कवितेला चळवळ समजू की चळवळीला कविता समजू?' (पृ.क्र.४२)

वरील ओळींतील 'कब्ज्याविना मन, कवितेची चळवळ आणि चळवळीची कविता' या तिन्ही संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या तिन्ही संकल्पनांमधून मानवी मनाचा नितळपणा प्रवाहित होतो. कवीला आणि कवितेला कोणत्याच आवर्तात बंदिस्त करता येऊ शकत नाही. त्याचप्रमाणे माणसाच्या मनालाही बेड्या ठोकता येत नाहीत. या तिन्ही बाबींना त्यांच्याभोवती कुणी कुंपण घालणे मंजूर होत नाही. या तिन्ही घटकांच्या कवेत दुनिया असते. या तिन्ही घटकांना इतरांचे गुलाम होणे मान्यच नसते. हे तिन्ही घटक उजेडाच्या गगनात स्वैर भराऱ्या घेतात.

कविता माणसाला स्वतःभोवती निर्माण केलेल्या बंधनांच्या शृंखला तोडायला लावते, माणसाला स्वयंप्रकाशित व्हायला लावते. ती मानवी जीवनापुढे वैश्विक मुक्तीचा जाहीरनामा पेश करते. म्हणजे कविता ही माणसाला 'माणूस' करण्यात कोणतीही तडजोड न स्वीकारणारी चळवळ आहे. कवी इरफान शेख यांनी वरील ओळींमधून कवितेच्या नितळपणाची ग्वाही दिली आहे. मानवी जीवनाचे सौंदर्यशास्त्र कविता कशी मांडते याचे विश्लेषण केले आहे. 'एका अनाम मित्रासाठी' ही कविता माणसाच्या मनाला अधिकाधिक सुंदर करणारी अभियान कविता आहे.

'मात्र पाण्याचा पेला हातात देताना
काल मुलगी म्हणाली,
'बाबा, तुम्ही करा पाण्यावर कविता,
पण मी सांगते तुम्हाला तुमच्या कवितेतले
पाणी वेदनेवर फुंकर घालणारे असू द्या!'
मी माझ्या मुलीत पाण्याचा खळाळणारा
झरा पाहतो अन् कवितेतही'
(पृ.क्र.४७)

या ओळींमधून कवीची समाजाविषयीची बांधिलकीची मूल्यवत्ता आस्वादकांपुढे येते. 'कशी लिहू पाण्यावर कविता' या कवितेतून कवी इरफान शेख यांच्या चिकित्सकदृष्टीचा परिचय होतो. या कवितेतील आशय विचार करायला लावणारा आहे. कविता लिहिणे म्हणजे

मानवी जीवनातील दुःखांना मानवी जीवनातून वजा करण्याची धडपड होय. मानवी जीवनातील माणुसकीच्या नात्याला अधिकाधिक सुंदर करण्याचा प्रकल्प म्हणजे कविता लिहिणे होय. माणसातील माणूसपण, समाजाचे समाजपण आणि देशाचे देशपण पराभूत होऊ नये याची काळजी घेणे म्हणजे कविता लिहिणे होय. म्हणजे कवितेतील जाणीव ही समग्रलक्ष्यी आणि सर्वांच्या हिताचीच असते, हेच कवी इरफान शेख यांनी सांगितले आहे. ज्या कवितेला पीडितांची, शोषितांची बाजू घेता येत नाही त्या कवितेला कविताच होता येत नाही. वरील ओळींना दुसरीही बाजू आहे. ती म्हणजे वेदनेवर फुंकर घालण्याची, वेदनेवर फुंकर घालणे म्हणजे मानवी जीवनातील सर्वच कुरूपता जाळणे होय. समाजातील कुरूपतेला जाळून पर्यायी संस्कृतीची निर्मिती करण्यासाठी कवितेचा संघर्ष असतो. अशा संघर्षातूनच कवी इरफान शेख यांची कविता उगविली आहे.

'जोपर्यंत मी लिहित नाही एखादी कविता
नकळत लागत नाही अक्षरांच्या नादी,
तोपर्यंत मनात साचत राहते अस्वस्थता
विचारांचा कोळी विणतो जाळे बेमालूमपणे...'
(पृ.क्र.५७)

कविता न लिहिणे ही प्रक्रिया बेचैन करणारीच असते. खरे पाहता कविता लिहिणे म्हणजे नव्या सृजनाला जन्माला घालणे होय; पण जेव्हा सृजनाची प्रक्रिया थांबते तो क्षण कवीसाठी त्रासदायक असतो. तो क्षण कवीला अस्वस्थ करणाराच असतो.

'पण तरीही शब्दांच्या पायांत बेड्या
ठोकणे जमणार नाही
वा बांधता येणार नाही कधीच तिचे हात,
अथवा दाबताही येणार नाही मला
कवितेचा आवाज
कवितेने सतत बोलत राहिलं पाहिजे'
(पृ.क्र. ५८)

या ओळींमधून कवीने कवितेविषयीचे केलेले भाष्य अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहे. कवितेची खरी भूमिका ही समाजाला सजग करण्याची असते, संभाव्य धोक्याची सूचना समाजाला देण्याची असते. ही समाजाविषयीची अटळ भूमिका तिला कोणत्याही परिस्थितीत टाळता येत नाही. कवीला आणि कवितेला प्रत्येक क्षणाला सजगच असावे लागते. कवी आणि कविता या दोघांच्या भूमिकेत बेजबाबदारपणाला जागा नाही. समाजातील क्रौर्याविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध दोघांनाही बोलावेच लागते. या दोघांना समाजाचे पुनर्वाचन करावेच लागते. 'कवितेने सतत बोलत राहिलं पाहिजे' या ओळीतून कवी इरफान शेख यांनी सुचविले आहे की, कवितेने सभोवतालच्या अमानुषतेविरुद्ध, सभोवतालच्या विषमतेविरुद्ध सतत बोलत राहायला हवे. समाजाला घायाळ करणाऱ्या अरिष्टांविरुद्ध सतत बोलत राहायला हवे. हे कशासाठी? तर या अरिष्टांनी सर्वसामान्यांचे जीवन हैराण केले आहे. या सर्व अरिष्टांच्या मरणमिठीतून मानवी समाजाला बाहेर काढण्यासाठी कवितेने आणि कवीने सतत या अरिष्टांविरुद्ध बोलायलाच हवे, तेव्हाच मानवी समाजाचा सन्मान होईल. ही कवी इरफान शेख यांची भूमिका मोठी मोहक वाटते. या भूमिकेचे स्वागत व्हायलाच हवे. ही भूमिका मानवी जीवनाच्या उन्नयनाशी नाते जोडणारी आहे म्हणून ती सर्वहितैषी आहे.

वरील ओळींमधील बंडखोरी दुहेरी स्वरूपाची आहे. सभोवतालच्या दूषित पर्यावरणाच्या विरुद्ध कवीने आपल्या कवितेमधून अभियान सुरू केले आहे, तर दुसऱ्या बाजूने कवीची कविताच अन्यायाचे निर्मूलन करण्यासाठी अभियान झाली आहे.

'या साऱ्यांविषयी केले कवितेने सवाल जबाब
अन् मला करता आला नाही साधा बचावही,
मला कळलंच नाही अजूनही की...
माझ्यातला कवी मरत चाललाय की काय?'
(पृ.क्र. ५६)

वरील ओळींतील भावना अत्यंत तीव्र आहेत. कवीला समाजाच्या दुःखांचे ओझे कमी करता आले नाही. त्याचे कारण असे, की समाजाने आपआपल्या जातीच्या, धर्माच्या कप्प्यात स्वतःला बंदिस्त करून ठेवणे पसंत केले.

यामुळे समाज आपला मूळ चेहराच गमावून बसला. समाज जेव्हा परस्परांतील सामंजस्य विसरून परस्परांतील मानवी सौंदर्य गमावून बसतो तेव्हा तो आपल्या माणूसपणाचे घर स्वतः पाडून घेतो. माणूस स्वतःच्या आवडीनिवडीने माणुसकी गुदमरून टाकतो. हे जेव्हा कवी आपल्या उघड्या डोळ्यांनी बघतो तेव्हा त्याच्या लक्षात येते, की आपण आपल्या समाजासाठी काही करण्यास असमर्थ होत चाललोय. अशा वेळी त्याला वाटते, की त्याच्यातला आता कवी मरत चाललाय आहे.

वरील ओळी काळजीपूर्वक वाचल्या तर आपल्या लक्षात येईल की, कवीचे कर्तव्य सत्य सांगणे हेच असते. तो कधीही सत्तेची गुलामी पत्करत नाही. उलट सत्तेच्या शोषणाचे वाचन करून समाजाला सत्तेच्या शोषणातून मुक्त करण्याची भूमिका घेतो. विषमतेच्या दमनयंत्रातून तो मानवी जीवनाला मुक्त करण्याची भूमिका घेतो. त्याला शोषणसत्ताधिशांचे आमिष मान्य नसते. जर अशी भूमिका कवीला घेता आली नाही तर तो कवी मरत जातो. ही इरफान शेख यांची कवी आणि कविताविषयक भूमिका माणसांच्या नजरेपुढे महाउजेडाचे स्वप्न मांडणारी आहे. कवी इरफान शेख हे वैयक्तिक पातळीवर आणि सामाजिक पातळीवर कोणत्याही प्रकारचा अंतर्विरोध करीत नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कोणत्याही प्रकारची दोनता नाही. त्यांच्या चारित्र्यात आणि स्वभावातही दोनता नाही.

समाजाच्या जिद्दीला कोणी जर निकामी करत असेल, समाजातील सौहार्दाला कोणी विस्कटून टाकण्याचा प्रयत्न करीत असेल, अशावेळी कवी जर शांत बसत असेल तर त्याचे शांत बसणे म्हणजे त्याच्यातील कवी मरत जाणे होय. वरील ओळींमध्ये कवी इरफान शेख यांनी कवी आणि कविता यामधला समाज यामध्ये कोणत्याही प्रकारचा अंतर्विरोध केला नाही. समाजाच्या भावसंवेदनांच्या विश्लेषणाचा तपशील, समाजाची विशिष्ट संरचना, या संरचनेत असलेले सत्तासंघर्ष, या संरचनेत होणारे बदल, या संरचनेतील सामाजिक चळवळ, या संरचनेतील सामाजिक शोषणव्यवस्था या सर्वांचे आघात कवीच्या मनावर कसे होतात आणि तो आपल्या कवितेच्या माध्यमातून पर्यायी संस्कृतीची निर्मिती कशी करतो याचे विश्लेषण कवीने मोठ्या ताकदीने मांडले आहे.

'माझ्यातला कवी मरत चाललाय' या कवितासंग्रहात कवी इरफान शेख यांनी कवी आणि कविता याविषयीचे गंभीर चिंतन मांडले आहे. कवीला अवतीभवतीच्या दुःखांकडे पाठ फिरवताच येत नाही. अवतीभवतीच्या दुःखाची आसवे कवी आपल्या डोळ्यांत साठवतो. अवतीभवतीच्या जखमा कवी आपल्या शरीरावर वागवितो. आपल्या वागण्याने माणुसकीची अवहेलना होणार नाही याची कवी काळजी घेतो. अवतीभवतीच्या वातावरणात कवी स्वतःला नष्ट होऊ देत नाही आणि समाजालाही नष्ट होऊ देत नाही. इरफान शेख यांची कविता ही तत्त्वनिष्ठ कविता आहे कारण त्यांनी कविताविषयक भूमिकेशी प्रामाणिक राहून कविता लिहिली आहे.

'माझ्यातला कवी मरत चाललाय' मधील आशयविचार–

कवी इरफान शेख यांचे व्यक्तिमत्त्व हे संवेदनशील स्वरूपाचे आहे. त्यामुळे समाजातील असंख्य प्रश्नांची भेदक मांडणी त्यांनी आपल्या कवितेतून केली आहे. या देशात कोणालाही वाऱ्यावर सोडले जाऊ नये. प्रत्येक भारतीयाची सामाजिक आणि सांस्कृतिक प्रतिष्ठा जपली जावी; पण आज विशेषतः मुस्लिम समाज आपला आत्मविश्वास गमावत चालला आहे. स्वतःवरील विश्वास गमविण्याने आज तो या देशात कंगाल होत चालला आहे. त्याच्या कंगाल होण्याने देशाची प्रतिष्ठा वाढेल का? हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे म्हणून, मानवी संबंधांमध्ये नव्याने अभिसरणाची प्रक्रिया सुरू व्हायला हवी. परस्परातील सौहार्दाच्या संबंधांची गाठ अधिक मजबूत व्हायला हवी. नफरतीची जीवनशैली आता आपल्याला त्यागावी लागेल असे कवी इरफान शेख यांना वाटते. कुठल्याही पातळीवरच्या दहशतीचे समर्थन करताच येऊ शकत नाही. दहशतीचे समर्थन करणारा विचार हा समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मानवी मूल्यांना नाकारणाराच विचार असतो. हा विचार मानवी

जीवनाचे अहित करणाराच असतो.

'त्याने माझ्याकडे पाहिले
एकटक आणि म्हणाला–
मुझे डर लगता है पप्पा गायवर लिखने को
कोई मुझे भी मार डालेंगा क्या
अगर मै लिखू या कोई चित्र निकालू तो?'
(पृ.क्र. ४२)

गायीच्या दहशतीने या देशात अखलाख, पहलुखान यांची निर्घृण हत्या केली. या घटनांनी अधिकच पाशवी रूप धारण केले. या घटनांचे पडसाद लहान मुलांवरही पडतात. लहान मुलांचेही भावविश्व करपून जाते. हा नफरतीचा वणवा थांबायला हवा. द्वेषाची भावना थांबायला हवी, असे कवीला वाटणे स्वाभाविक आहे.

'सोबत असणारेही कित्येकदा करत असतात
नजरेतून अस्पर्श देवाण घेवाण कुत्सितपणे
वागताना बांधला गेलेला संवादसेतू
कोसळतो पार मनाच्या भावनदीवर
मी जरी ठेवत असलो जात घरी माझ्या
तरी कित्येक मेंदूतून ती कशी करावी हद्दपार?
इथे जातिनिहाय संवेदनांचे भूखंड विकले गेलेले
मी कसे खोडू शकतो जातीला या
सातबाऱ्यावरून' (पृ.क्र. ५२)

द्वेषाच्या व्याधीने ग्रस्त समाजाच्या अंतरंगाचे दर्शन घडविणाऱ्या या ओळी आहेत. या देशात मुस्लिम म्हणून जीवन जगताना रोजच नवनव्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. मुस्लिमांकडे सातत्याने परकीय नजरेने पाहिले जाते. यामुळे मुस्लिमांना 'मी कोण' आणि 'माझे कोण?' याची सतत तपासणी करावी लागते. नकळत कुत्सितपणे मुस्लिमांच्या देशप्रेमावर प्रश्न निर्माण केला जातो. यामुळे मुस्लिमांच्या मनात सतत असुरक्षिततेची भावना निर्माण होते. कवी म्हणतो, की घराबाहेर निघताना मी आपली जात घरातच ठेवतो. घराबाहेर वावरताना मी आधी आणि अंती भारतीय म्हणूनच वावरतो. तरीही माझ्याकडे संशयाने पाहिले जाते. माझ्याकडे पाहणारी मानसिकता बदलायला हवी ही अपेक्षा कवी इरफान शेख यांनी व्यक्त केली आहे.

या देशात मुस्लिमांना खलनायक ठरवणारी यंत्रणा कार्यरत आहे. मुस्लिम म्हणजे देशद्रोहीच अशी भावना सर्वसामान्यांमध्ये रुजविण्यात ही यंत्रणा यशस्वी झाली आहे. या यंत्रणेमुळे मुस्लिमांकडे सर्वसामान्यांच्या संशयी नजरा वळलेल्या आहेत. सर्वसामान्यांकडूनही मोठ्या प्रमाणात मुस्लिमांना लक्ष्य केले जाते हे आता नजीकच्या काही घटनांवरून दिसून येते. मुस्लिमांना गुन्हेगाराप्रमाणे वागविले जाते. त्यामुळे मुस्लिम भावजीवन उद्ध्वस्त होत आहे. भेदभावाची, सापत्न वर्तनाची शिकार रोजच मुस्लिम समाज ठरतो आहे. खरे पाहता मुस्लिमांना आपल्या देशाविषयी अभिमान आहे. त्यांचे या देशावर अपार प्रेम आहे. या देशावर त्यांची निष्ठा आहे. मुस्लिमांच्या देशनिष्ठेवर प्रश्न निर्माण करणे म्हणजे त्याला जखमी करण्यासारखेच आहे. एकविसाव्या शतकात वावरताना आपल्याला बदलणे अपरिहार्य आहे. आता जातींच्या चौकटींचे सीमोल्लंघन करण्याची खरी आवश्यकता आहे. या चौकटींनी समाजाच्या विकासाच्या गतीला ब्रेक लावला आहे. ही चौकटच आता उद्ध्वस्त करायला हवी. ही सुंदर जीवनलालसा कवीने व्यक्त केली आहे.

'नवरा कमवत नसला तरी चार बाय सहाच्या खोलीत
संसाराच्या दारावर लावत तोरण अव्यक्त भावनांचे,
चेहऱ्यावर न दाखवता दुःख हसता हसता मरणारी
उमरा बी कशी तगली असेल
उसन्या श्वासांवर?' (पृ.क्र.९७)

मुस्लिम जीवनातील हलाखी, दारिद्र्य, अज्ञान, बेरोजगारी अशा नाना प्रश्नांच्या अव्यक्त कहाण्या 'लिहिता न आलेल्या कहाण्या' या कवितेतून कवीने मांडल्या आहेत. या सर्व कहाण्या आस्वादकांना अंतर्मुख करणाऱ्या आहेत. मुस्लिम समाजातील वास्तवतेच्या अस्सल कहाण्या या कवीने आपल्या कवितेच्या माध्यमातून आस्वादकांपुढे मांडल्या आहेत. मुस्लिम समाजातील जटीलता फारच वेगळी आहे; पण या सर्व जटील प्रश्नांच्या गुंतागुंतीविरुद्ध मुस्लिम स्त्रिया लढल्या,

म्हणून त्या जिवंत आहेत. त्यांनी आपले जीवन मरू दिले नाही. स्वतःच्या परिस्थितीशी त्या या ना त्या पद्धतीने लढत राहिल्या. या अशिक्षित स्त्रिया परिस्थितीपुढे हतबल झाल्या नाहीत. हतबलता हे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नाही हे त्यांना चांगल्या प्रकारे माहीत आहे. त्यांच्यापुढील परिस्थिती ही अवसानघातकी आहे याची त्यांना जाणीव आहे. निराश होऊन प्रश्न सुटणार नाहीत याची जाणीव त्यांना आहे. त्यांनी दुःखाचे आभाळ पेलत जगण्याची लालसा सोडली नाही. दुःखांना तुडवित त्या जीवन जगत आहेत. हे कवीने वरील ओळींमधून सुचविले आहे.

'त्याने दोन माणसे काढल्यावर मला म्हटले–
बाबा, मी या माणसांचे हात हातात देऊ का?
मी अवाक् क्षणभर...
म्हणालो, बघ तुला जमत असेल तर!
(पृ.क्र. ३८)

वरील ओळींमधून देशाचे देशपण टिकवून ठेवण्यासाठी माणसांना जोडणारे सेतू बांधण्याची नितांत गरज आहे. या सेतूमुळे बंधुत्वाची भावना वृद्धिंगत होईल. बंधुत्वाच्या भावनेला नवी पालवी फुटेल. अशी पालवी फुटावी म्हणून कवीची होणारी तडफड मोठी वेधक वाटते.

'ते बोलले मीही तसंच बोलत राहिलो तेव्हा
त्यांनी बांधले माझ्या प्रशंसेचे पूल जागोजागी
पण जेव्हा मी नाकारलं सारंच यातलं तेव्हा
मी शून्य झालो त्यांच्यासाठी सारीकडून'
(पृ.क्र. ३२)

आजची वास्तव परिस्थिती कवीने वरील ओळींतून मांडली आहे. हा अनुभव तत्त्वनिष्ठ माणसाच्या वाट्याला नेहमीच येतो. आज समाजाला खोट्या प्रसंशेची सवय झाली आहे. आपल्या हो मध्ये हो करावे. आपण सांगू ती पूर्व दिशा. आपल्या सांगण्यात कोणी शंका उपस्थित करू नये अशी अपेक्षा आज इतरांकडून ठेवली जाते. खरे बोलणे कोणालाही पटत नाही. निर्भयपणे वागणे कोणाला पटत नाही; पण जेव्हा कवी अशा मानसिकतेसमोर न वाकणारी भूमिका घेतो. आपला बाणेदार कणा वाकू देत नाही. कोणत्याही तडजोडीशी हस्तांदोलन करीत नाही. कवी काचेसारखा पारदर्शक आणि पाण्यासारखा नितळ वागण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण केला जातो.

'काढतात मशिदीच्या दानपेटीसाठी
चिल्लर खिशातली असली नसली,
हे पाहून सर्व मनात पडतो प्रश्न–
आताची पिढी हरवतेय, असं कसं म्हणावं?'(पृ.क्र.५१)

एकीकडे देशात धार्मिक उन्मादाची लाट पसरत आहे. धार्मिक ध्रुवीकरणाने या देशात ज्वलंत प्रश्न निर्माण केला आहे; पण त्याचवेळेस देशात सहिष्णुतेचीही भावना पाहावयास मिळते. अशा सहिष्णुतेमुळे देशात सद्‌भावना निर्माण होते. अशा सहिष्णुतेमुळेच देशाचे सौंदर्य टिकून आहे; या सहिष्णुतेच्या भावनेमुळेच देशात जीवनाचे महोत्सव साजरे होताना दिसतात. या देशातील तरुणांनी माणुसकीला थक्क करून सोडणाऱ्या मानवी सौंदर्याच्या असंख्य भेटी दिल्या आहेत याची जाणीव कवी इरफान शेख यांच्या वरील ओळी करून देतात. मानवी जीवनातील सद्‌भाव जेव्हापर्यंत टिकेल तेव्हापर्यंत माणुसकीला अंत नाही याची ग्वाही वरील ओळींमधून कवीने दिली आहे.

'कसे कुणाला समजावू की आमच्या घरात सर्व
धर्म एकत्र राहतात
अन् मी निश्चिंत झालो मुलाच्या उद्याच्या
धर्मरहित भविष्यासाठी' (पृ.क्र. ७६)

कवी इरफान शेख यांनी आपल्या जीवनाचा ताणाबाणा 'माणूस' या भूमिकेतूनच विणला आहे. सर्व जातिधर्मांचा सन्मान करणे हेच कवीला ठाऊक आहे. जातिधर्मांचे लेबल बाजूला केले तर उरतो फक्त 'माणूस'! कोणताही धर्म इतरांचा द्वेष करायला शिकवित नाही. जर धर्म इतरांचा द्वेष करायला शिकवित असेल तर तो धर्म नव्हे अधर्म आहे. कवीने वरील ओळींमधून दुसरा मुद्दा उपस्थित केला आहे. तो म्हणजे संस्काराचा. मुलांच्या आईवडिलांनी मुलांना कोणते संस्कार द्यावे? तिसरा मुद्दा असा की, मुलांवर संस्कार करणारी पाठशाळा म्हणजे आई. मुलांची आई जर सर्व धर्मांचा आदर करणारी असेल

तर तिची मुलंही सर्व धर्मांचा आदर करतील. हा संदेश कवीने दिला आहे.

'माझ्यातला कवी मरत चाललाय' मधील

प्रेम कविता–

'माझ्यातला कवी मरत चाललाय' या कवितासंग्रहात काही सुंदर अशा प्रेम कविता आहेत. या प्रेमकवितांमधील प्रेयसी ही कवीची पत्नीच आहे. कवी आपल्या प्रेयसीमध्ये प्रचंड ऊर्जास्त्रोत पाहतो. प्रेयसी सोबत असली की आपण सर्वच जगाची मुशाफिरी करू शकतो याचा कवीला पूर्ण विश्वास आहे. त्याच्या मुशाफिरीत येणाऱ्या प्रत्येक संकटाचा सामना करण्याची ताकद कवीला त्याची प्रेयसी देते. कवीने आपल्या प्रेयसीबद्दलची उत्कट भावना या प्रेमकवितांमधून प्रकट केली आहे.

'मी उभा भर पावसात
तुझी वाट पाहत
चिंब चिंब देहासह
मुका मुका राहत' (पृ.क्र. १०२)

येथे कवी सर्व विसरून आपल्या प्रेयसीची वाट पाहतो. कवीला वाटते, की या भेटीमुळे आपल्या जीवनाला निर्णायक दिशा मिळेल. कवीने आपल्या भेटीच्या तन्मयतेला शब्द दिला आहे. कवीला वाटते, की आपल्या प्रेयसीची भेट ही जीवनाला सर्जनशील करणारी ठरेल.

'काठ नदीचे ओले अजूनी सांगे मला कहाणी
अजून सरती कानांमध्ये त्या दिवसांची गाणी
राहिले ना दिवस ते अन् राहिले ना वय सोळा
अजूनी देहावरूनी उडतो
आठवणींचा पाचोळा' (पृ.क्र. १००)

येथे कवी आपल्या प्रेमाच्या प्रारंभिक जीवनाच्या आठवणीची उजळणी करतो. कवी आपल्या प्रेयसीला ज्या नदीच्या काठावर भेटत होता त्या नदीचा काठ आजही कवीला त्यांच्या प्रेमाची ग्वाही देतो. त्या भेटीतला ताजेपणा आजही कमी झाला नाही. त्या भेटीतील प्रेमाचा प्रामाणिक भाव आजही आपल्या प्रेयसीत कवी पाहतो. या ओळींमधून कवीने आपल्या प्रेमाविषयीचा अभिमान व्यक्त केला आहे.

कवी इरफान शेख यांच्या 'माझ्यातला कवी मरत चाललाय' हा कवितासंग्रह अत्यंत दर्जेदार आहे. कवीने आपल्या कवितेशी इमान राखून आपल्या वेदना सशक्तपणे या संग्रहामधून मांडल्या आहेत. कवीने या संग्रहातून आपल्या जगण्याविषयीची भूमिका विशद केली आहे. त्याच्या वास्तव जीवनाचे अदृश्य पदर सहज या संग्रहातील कवितेतून उलगडत गेले आहेत. वर्तमानाने सनातनी उजेडाचा चेहरा धारण केला आहे. या उजेडाने मूलतत्त्ववादाचे सदस्यत्व स्वीकारले आहे. अशावेळी इरफान शेख यांची कविता सनातनी उजेडाला आपले चारित्र्य बदलायला भाग पाडते. 'माझ्यातला कवी मरत चाललाय' या कवितासंग्रहातील कविता अशी सशक्त आहे. तशीच या कवितासंग्रहाची प्रस्तावनाही सशक्त स्वरूपाची आहे. डॉ. किशोर सानप यांनी अत्यंत दर्जेदार प्रस्तावना लिहिली आहे. या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत डॉ.किशोर सानप यांचा बौद्धिक कस पाहावयास मिळतो. कवी इरफान शेख यांना त्यांच्या पुढील काव्यप्रवासाला हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. अक्रम. ह. पठाण**
अंजूमन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय नागपूर, सदर, नागपूर.
चलभाष : ८६००६९९०८६

◆◆

# मिथक : स्वरूप आणि संकल्पना

**डॉ. राजश्री देशपांडे**

**लोकपरंपरेने जतन केलेल्या कथेविषयीचा आणि मिथकाविषयीचा संशोधनलेख.**

निसर्गातील विविध जीवसृष्टीचे, वृक्षवल्लींचे, आकाशातील ग्रह नक्षत्रांचे गूढ तो वैज्ञानिक पद्धतीने शोधत आहे. त्यांच्या अस्तित्वाची रहस्ये उलगडून दाखवीत आहे; पण अजूनही संपूर्ण निसर्गाच्या, मानवी जीवनाचा शोध पूर्णत्वास गेल्याचा दावा तो करू शकला नाही. निसर्गातील विविध कुतूहलांकडे तो आजही कौतुकाने पाहतो आहे. आश्चर्यचकित होत आहे; पण जेव्हा मानव समाज अप्रगत, प्राथमिक अवस्थेत होता, तेव्हाही तो निसर्गातील चमत्कारांनी कधी आनंदित होत होता, तर त्याच्या रौद्ररूपाने भयभीतही होत होता. त्याला वाटणाऱ्या सर्व चमत्कारांचे, अनाकलनीय शक्तींचे गूढ उकलण्याचा प्रयत्न तो करीत होता. या प्रक्रियेतून पुरातन काळात मिथकांची निर्मिती होत राहिली. अशा मिथकांच्या आश्रयाने घडलेल्या कलांचा, तत्त्वाबोधांचा संचार जगभरातल्या सांस्कृतिक परंपरांमध्ये आढळतो. त्यांच्या संस्कृतीतील विविध कला, साहित्य, शिल्प, नृत्य, संगीत या कथांवरच विकसित होत आले आहे. भारतातील विविध देवालये, लेण्या, त्यात कोरलेले सुंदर प्रसंग उदा. वेरूळ, अजिंठा येथील लेण्या व शिल्पे इ. उदाहरणे प्रामुख्याने सांगता येतील.

मिथक म्हणजे काय?

मिथ या इंग्रजी शब्दाचा अर्थ पवित्र कथा असा आहे. मुखावाटे जे काही उच्चारले गेले असेल ते या अर्थाच्या मुथॉस या ग्रीक शब्दापासून इंग्रजी मिथ हा शब्द बनला आहे. मुथॉस कथा असाही अर्थ पुढे या संज्ञेस प्राप्त होऊन कोणतीही कथा मिथ्यकथाच ठरत होती. काळाच्या ओघात मिथ, कल्पितकथा, पवित्रकथा, दिव्यकथा इत्यादी अर्थ प्राप्त झाले. दुर्गा भागवत यांनी मिथसाठी पुराकथा हा समर्पक शब्द वापरला आहे कारण त्यातून आदिम कथांची संकल्पना स्पष्ट होते. तसेच प्रा.दि.के.बेडेकर यांनी दैवतकथा या संज्ञेला जवळची अशी दिव्यकथा ही संज्ञा वापरली आहे. माणसाची प्रकृती मिथक-निर्माणक असल्यामुळे मिथ हा केवळ कालचा विषय नसून, ती आज उद्याही निर्माण होऊ शकते. तसेच ती दैवत मंडला बाहेरचे विश्वही स्वतःत सामावू शकते. त्यामुळे पुराणकथा, प्राक्कथा, पुराख्यान किवा दैवतकथा या प्रचलित संज्ञांनी तिचे त्रिकालव्यापी स्वरूप केवळ भूतकाळापुरते किवा दैवतांच्या विश्वापुरते मर्यादित होत असे. ती मर्यादाही तोडण्याची गरज होती. मिथक या नव्या संज्ञेने या मर्यादाही संपून जातात. थोडक्यात मिथक या संज्ञेतून स्वरूप आणि काल या दोन्हींचा आशय दिसतो.

मिथक या संकल्पनेची व्याख्या वेगवेगळ्या

अभ्यासकांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

१) रा. चिं. ढेरे यांच्या मते, अलौकिकाचा रंग ल्यालेली, लोकानुभूती व्यक्त करणारी कथा म्हणजे मिथक होय.

२) राजीव नाईक यांच्या मते ज्या मध्ये आदिबंधात्मक पात्र, आदिबंधात्मक प्रसंग आणि आदिबंधात्मक विषय आहेत, जी एखाद्या मोठ्या महाकाव्याचा एक भाग होऊ शकते किंवा स्वतंत्रही राहू शकते, तिच्यात काव्यात्मकतेवर, सार्वत्रिकतेवर व चिंतनावर आणि धूसरतेवर भर दिला असेल, अशी गोष्ट म्हणजे मिथक होय.

**मिथकाचे स्वरूप:**

आदिमानवाला त्याच्या भोवताली दिसणाऱ्या नैसर्गिक चमत्काराचे, वर्णन भाषेत करता येत नव्हते. ते उलगडण्यासाठी अनेक कल्पनारम्य कथा रचल्या. या कथा देव-देवतांच्या, वीरनायकांच्या अतिमानवी शक्तीने भरलेल्या कल्पनांच्या असत. या प्राचीन कथांनाच मिथक-पुराकथा म्हणता येईल.

मिथकांना जसे अंतिम सत्य सांगणाऱ्या कथा असे म्हटले गेले, तसे त्या कथा खोट्या असेही म्हटले आहे. मिथ म्हणजे काल्पनिक कथा असतात आणि त्या विलक्षण अनुभवांच्या असतात, त्यांच्या सत्याचा पुरावा देता येत नाही म्हणून त्या काल्पनिक खोट्याही असू शकतात.

मिथके तर्काच्या आधारे समजून घेता येत नाहीत किंवा त्याचे वास्तव जीवनात शोधायचे नसते. हत्तीच्या तोंडाचा देव अतिमानुषीच असणार. नारद, तुंबर, हयवदन यांच्याही बाबतीत हेच म्हणावे लागेल. अशी असंख्य मिथके भारतीय संस्कृतीत आहेत. त्या कथा आहेत तशा मान्य करायच्या असतात, आणि हजारो वर्षे मान्य केल्या गेल्या आहेत. ही मिथके काल्पनिक असली, खोटी असली तरी त्यात काहीतरी शाश्वत दडलेले असते म्हणून या विज्ञान युगात मिथके माणसाला आधार वाटतात. उदा.रामायण, महाभारत ही महाकाव्ये. अशी मिथके विचारांना चालना देतात. निर्णय प्रक्रियेत दिशा देतात. ती जिवंत असतात. मिथक हे अतिमानवी विश्‍व असले तरी ते मनुष्याच्या आकांक्षांचे प्रतिबिंब असते.

मराठीतील समीक्षक म. सु. पाटील यांनी मिथक साठी मांडलेला दृष्टिकोन खूप वेगळा व महत्त्वाचा वाटतो. मिथ या इंग्रजी संकल्पनेसाठी प्रक्कथा, मिथ्यकथा, पुराकथा, दिव्यकथा या संज्ञाही रूढ आहेत. या संज्ञांतून मिथकात असलेली कथात्मकता ठशठशीतपणे व्यक्त होते. मिथक म्हणजे ऐतिहासिक घटितांचे कथन करणारी गोष्ट. परंपरा, महान तत्त्वे, धर्म अशा संकल्पना कशा निर्माण झाल्या ते मिथकाद्वारे विशद केले जाते. मिथक ही निसर्गघटितांची स्पष्टीकरणे देण्यासाठी निर्माण झाल्याची शक्यता आहे. दुसरीकडे विज्ञान, इतिहास यांचा आधार नसलेली घटना, ऐतिहासिक घटना, देव, वीरनायकांच्या असामान्य कृतींच्या बाबतीत लोककल्पना ग्रंथित करणारी कथा. वरील विचारातून मिथकाची कथात्मकता व्यक्त होतेच; पण प्राधान्याने मिथकातून वैश्‍विक सत्य, निसर्गघटितांचे स्पष्टीकारण, ऐतिहासिक वीरांचा पराक्रम, दैवतांचा असामान्य,अतिमानवी कृती सांगताना वास्तवाचे भान होत जाते. ही प्रतीकात्मकता कल्पनांनी साकारलेली असते.

**मिथक विषयक संकल्पना:**

भारतीय संस्कृती-कोशात, सृष्टीची उत्पत्ती कशी झाली, सृष्टीतील विविध घटकांची नानाविध वैशिष्ट्ये कशी निर्माण झाली, कोणकोणत्या शक्तींमुळे सृष्टीचा व्यवहार चालतो? यासंबंधीच्या प्राथमिक जिज्ञासेतून आदिम मानवांनी चिंतन केले व ते कथारूपात मांडले. या कथांना दैवतकथा म्हणतात. हा लोकसाहित्याचा अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष आहे. दुर्गाबाई भागवतांच्या मते, मानवी स्वरूपातील अमानवी किंवा दैवी कृतींचे आदिमानवाला झालेले जे दर्शन त्या दर्शनाचे प्रतीक म्हणजे दैवत कथा होत. त्यांनी दैवतकथा, शास्त्रात उत्पत्तीकथा, दैवादिकांच्या कथा, आदिमानवाच्या आणि वीरांच्या कथा यांचा समावेश केला आहे.

पुढे त्या म्हणतात, दैवतकथा हा शब्द मिथ या इंग्रजी शब्दाचे प्रतिरूप म्हणून वापरला आहे. वास्तविक पुराकथा हा शब्द अत्यंत प्राचीन असून अतिशय समर्पक असतानाही त्याचा त्याग करणे भाग पडले कारण, भारतीय सांस्कृतिक व साहित्य परंपरेत पुराण या शब्दाने एक विवक्षित साहित्य विभाग दिग्दर्शित केला जातो. या धर्म कथांचा संबंध पुराणांप्रमाणे देवता, स्वर्ग, महामानव, धर्मसंस्थापक इत्यादी पुराणोक्त कल्पनांशी येतोच; पण अनेक प्रकारची जाती पुराणे आहेत. त्यामुळे दैवतकथा हे नाव त्याला देणे सयुक्तिक वाटते. धर्मकथा हा शब्ददेखील

संस्कृतमध्ये व विशेषतः बौद्ध आणि जैन वाङ्मयात वारंवार येतो; परंतु दैवतकथांचा समग्र आशय त्यात नाही, यासाठी कहाणी हा शब्द अत्यंत समर्पक आहे; परंतु रचनेचा काटेकोरपणा पाळण्यासाठी दैवतकथा हा शब्द योग्य वाटतो. दैवत कथेला पुराकथेचा पर्याय म्हणून त्या स्वीकारतात.

मिथ म्हणजे कल्पित कथा, दंतकथा, लोककथा, हा आणखी एक शब्द प्रचलित आहे. मिथकाचे मुख्य वैशिष्ट्य हे, की कल्पित असोत वा सत्य, ऐतिहासिक वा दंतकथा या कथा लोकांच्या फार आवडीच्या असतात. मानवेतिहासाची सुरुवात भाषेपासून होते. भाषेची सुरुवात झाल्यानंतर प्राथमिक अवस्था ओलांडल्यानंतर दुसऱ्या अवस्थेत विविध निसर्ग दृश्यांची सुसंगती लावून त्यांच्या भाषेत कथारूपाने अनुवाद करण्याची कला मानवाने साध्य केली. या कथा म्हणजे दैवतकथा होय. पुराकथा, मिथ्यकथा, मिथ म्हणजे जे अस्तित्वात नव्हते किंवा ज्याला वस्तुनिष्ठ अशा सत्याचा आधार नाही अशी दिव्य कथा. यातील व्यक्ती अतिमानवी असतात. पशुपक्ष्यांसारख्या अमानवीय व्यक्तींच्या कथा या मिथककथा होत. मिथकांची निर्मिती मानवी संस्कृतीच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यावर झाली असे म्हटले जाते. माणसाला भाषेचा शोध लागला आणि त्यामुळे तो निसर्गाची गूढे उकलू लागला. त्याचा अन्वयार्थ लावू लागला. संस्कृती विकासाच्या या दुसऱ्या टप्प्यात भाषेच्या साधनामुळे माणसाने आदिमानवाचा प्रारंभीचा प्राकृतिक टप्पा ओलांडला आणि त्याने सृष्टीतील विविध घटितांचा अन्वय लावला. त्यातून मिथकांची निर्मिती झाली. यामुळे सृष्टीतले घटित आणि त्याचा अनुभव घेण्याची पद्धती या दोन्हीतून मिथक जन्मले हे स्पष्ट होते. मानवेतिहासाच्या प्रारंभीच्या काळातील इतिहास हा मिथकाच्या माध्यमातून उलगडता येतो. बऱ्याच वेळा मिथक म्हणजे असत्य, अविश्वसनीय, खोटे, दिशाभूल करणारे, ओढून ताणून रचलेले, गारुड, भूलथापा अशा अर्थाने या संज्ञेचा उपयोग होतो. अर्थात मिथक हे इतिहासातल्या सत्यासारखे सत्यही नसते आणि वास्तवही नसते. मिथक ही कथा असते. या कथेत इतिहास किवा ऐतिहासिक सत्य नसते; पण इतिहासकालीन माणसाच्या मनातील सत्याची प्रतिमा व आजूबाजूच्या घटनांचा कल्पित अर्थ दडलेला असतो. मानवी ज्ञान आणि बाह्यसृष्टी या विषयीच्या गूढांचे आकलन करून घेताना मिथकाची निर्मिती झाली त्यामुळे मिथकामध्ये नैसर्गिक व सृष्टीतील घटना घडामोडींचे मिश्रण झालेले दिसते. पुराणकथांचा आशय हा तत्त्वतः मानवाच्या उत्क्रांती काळात समाजाने बाह्य जगातील घटनांच्या आधारे व संवेदनांच्या आधारे स्वतःच्या आंतरिक जाणिवांचा करून घेतलेला शोध असतो. धर्माचे अधिष्ठान देऊन, आणि काव्य कलेची कल्पकता घेऊन त्या आंतरिक जाणिवा दृश्य घटना रूपांनी आविष्कृत केल्या जातात, म्हणून पुष्कळदा या कथा मानवी उत्क्रांती क्रमातील निसर्ग जीवन व मानवी जीवन यांच्या घटकांच्या प्रतीकही ठरतात. ही प्रतीकात्मकता लक्षात येण्यासाठी धर्मशास्त्र, मानववंश शास्त्र, मानसशास्त्र आणि काव्यशास्त्र यांचा आधार घ्यावा लागतो.

विविध संशोधकांनी लोकसाहित्याच्या ज्या व्याख्या कथन केल्या आहेत, त्यात त्यांनी दैवतकथेला प्राधान्य दिले आहे. लोकसाहित्याची व्याप्ती स्पष्ट करताना डॉ. प्रभाकर मांडे यांनी मौखिक आविष्कार, भौतिक संस्कृती, लोकरूढी विधी समजुती व प्रयोगसिद्ध लोककला हे चार विभाग केलेले आहेत. मौखिक आविष्कारात त्यांनी लोककथा आणि लोकगीतांना प्राधान्य दिलेले आहे. त्यातच दैवतकथांचा सामावेश त्यांनी केला आहे. तसेच दुर्गाबाई भागवतांच्या मते लोकसाहित्य हे पुरातन समजुतीच्या आणि चालीरीतींच्या आजमितीस उपलब्ध असलेल्या उत्तरावशेषांची चर्चा करणारे शास्त्र आहे. यांत पारंपरिक कथने, पारंपरिक चालीरीती आणि लोकभ्रम व पारंपरिक समजुती, इत्यादींचा समावेश होतो. अनेक दैवत कथा या माणूस आणि देव कसे अस्तित्वात आले हे स्पष्ट करणाऱ्या आहेत. दैवतकथेतून मानवी जीवनाचा दंतकथात्मक इतिहास डोकावतो; परंतु जग हे आधी अस्तित्वात येते आणि त्यानंतर त्या विषयीची कथा जन्म घेते. लोकसाहित्य आणि दैवतकथा यांमध्ये अनेक बाबींचे साम्य आढळून येते. त्याचा संबंध हा अतिमानवी प्रसंगाशी येतो. उदा. परीकथा. त्याचा संबंध हा महाकाव्याशी येतो. त्यातील घटनाप्रसंग रमणीय आणि अद्भुत असतात.

मिथक मनुष्याच्या चेतनेचा आदिम प्रवाह आहे.

मिथक वास्तवाचे कलात्मक चित्रण आहे. वास्तवता ही साहित्याचे अनिवार्य तत्त्व आहे, तर मिथक त्याचे सहभागी तत्त्व आहे. मिथक आणि वास्तव यांचा जसा संबंध आहे तसाच मिथक आणि कल्पना यांचा आहे. मिथकाचा संबंध सामाजिक वास्तवतेशी आहे. मिथक ही कल्पना आणि वास्तवता यांचा स्वीकार करणारी प्रक्रिया आहे. मिथक कल्पना आणि यथार्थता यांचा संगम आहे. मिथक हे साहित्य आणि संस्कृतीचे संचित आहे. आदिम काळापासून आधुनिक काळापर्यंत मानवी जीवनात धर्माचे अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. मनुष्याची नैतिकता ही धर्मावर अवलंबून आहे. धर्मात परमेश्वराला सर्वशक्तिमान मानण्यात आले आहे. तसेच धर्मात मिथकांना महत्त्व देण्यात आलेले आहे. आदिम मिथकांचे अर्थ म्हणजे दोन विरुद्ध तत्त्वांना एकत्र आणणे होय. उदा: स्वर्ग-भूमी, आकाश-पृथ्वी, देवता-मनुष्य, जल-भूमी इत्यादी.

साहित्य आणि ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रांत मिथक एक विकसनशील कल्पना ठरलेली आहे. आधुनिक युगात ही कल्पना अधिक विस्तारित झालेली आहे. जितकी ती विस्तारित आहे तितकीच ती अस्पष्ट आणि गुंतागुंतीची देखील आहे. आधुनिक साहित्यात मिथक असत्य, रहस्यवादी, स्वप्नकथा, मानवी मनाचा इतिहास, आदिम विद्या, अचेतन प्रेरणांचा परिणाम आहे.

ॲरिस्टॉटलच्या काव्यशात्रात मिथकाचा अर्थ कथानक, कथाबंध कल्पकथा असा दिलेला आहे. मिथकाची कल्पकता ही अन्य आधुनिक कथांपेक्षा वेगळ्या स्वरूपाची असते. ज्यामध्ये सृष्टीसंबंधी आणि ब्रह्मांडाविषयी काही सत्य मानले गेलेले असते. मिथकांमध्ये वीरनायक, ऐतिहासिक पुरुषांच्या चरित्र कथांना प्राधान्य देण्यात आले आहे.

मिथक हे सामाजिक चेतनेने युक्त असते. मिथकांचा निरंतर सामाजिक विकास झालेला आहे. मिथक एक सामाजिक प्रक्रिया आहे. मिथकात मानवी जीवनाचा अनुभव, प्रक्रिया समाविष्ट असतात. मिथकांची निर्मिती आणि विकास हा मानवाच्या सामाजिक जीवनातून शक्य झाला आहे. सामाजिक दृष्टीने मिथकांना जनमानसाचा व्यापक आधार मिळालेला आहे. मिथक साहित्याचे असे माध्यम आहे जे संस्कृतीचे मूळ, गहन आस्था, विश्वास यांची अभिव्यक्ती करीत असते. मिथक हे कालसापेक्ष असतात. मिथक समाजातील विभिन्न समस्या, आस्था कलात्मक रूपात मांडणारे समर्थ माध्यम आहे.

**समारोप**

मिथक म्हणजे लोकपरंपरेने जतन केलेली कथा आहे. आदिम काळातील मानवी समूहाने सृष्टीरहस्ये आणि निसर्गनियम यांच्यातील कारणमीमांसा स्पष्ट करण्यासाठी मिथक कथांची रचना केलेली असते. मिथके ही सनातन संदेहातील, संस्कारक्षम समाजप्रिय संकेत बनतात, आणि समाजात खोलवर रुजतात. एक प्रकारे मिथके ही सांस्कृतिक व्यवस्थेला आकार देतात. त्यामुळे कला व साहित्याचे स्त्रोत बनतात.

मिथके ही लोकविलक्षण शक्ती आहे. सृष्टीच्या आणि व्यक्तीच्या अंतरंगातील अनाकलनीय रहस्याचा वेध घेऊ पाहणारी प्रतिमा, प्रतीके, रूपकांनी युक्त असलेली आदिम, मूलभूत, सर्वस्पर्शी स्वरूपाची असल्यामुळे संदेहातीत मानली गेली. अद्भुत जादुई चमत्कारांच्या व्यक्ती, वस्तू घटनांचा तपशील असलेली, चिरंतन मानवी मूल्यांचा आविष्कार करणारी, समाज मनावर प्रभाव टाकणारी लोकप्रिय स्वरूपाची कथा आहे.

**संदर्भ सूची**

मिथकांचा रंगाविष्कार - डॉ. दिनेश वाघुंबरे
१२ जुलै २०१८ गोदावरी प्रकाशन
नाटकातील मिथक-राजीव नाईक - पद्मगंधा प्रकाशन
मिथक-देवदत्त पटनायक, अनुवाद- वेदवती उरणकर - मंजुळ प्रकाशन
लोकसाहित्याची रूपरेषा-दुर्गा भागवत
२४ जुलै २०२० वरदा प्रकाशन
( चौथी आवृत्ती )
लोकसाहित्याचे अंतःप्रवाह- डॉ. प्रभाकर मांडे
गोदावरी प्रकाशन

**डॉ. राजश्री पराग देशपांडे**
सहायक प्राध्यापक मराठी विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे
चलभाष : ८६०५५२७७४४
email : dr.rpdeshpande9@gmail.com

◆◆

# मराठी भाषा, साहित्य निर्मिती आणि व्यावसायिक संधी समृद्ध करणारे
## ‘मराठी व्याकरण समग्र आणि सोपे’

डॉ. अशोक नामदेव शिंदे

**प्रा.माधुरी दाणी यांच्या**
**‘मराठी व्याकरण समग्र आणि सोपे’**
**या पुस्तकावरील परिचय लेख.**




पुस्तकाचे नाव : **मराठी व्याकरण समग्र आणि सोपे**
लेखक : **प्रा. डॉ. सौ. माधुरी दाणी**
प्रकाशक : **फडके प्रकाशन, कोल्हापूर**
पहिली आवृत्ती : **ऑक्टोबर २०२०**
पृष्ठे : **१७४**
मूल्य : **१५०/-**

जगाच्या पाठीवर हजारो भाषा बोलल्या जातात.

प्रत्येक भाषेने स्वत:चे अस्तित्व आणि वेगळेपण टिकवत आपले महत्त्व आणि उपयुक्तता सिद्ध केली आहे. संपर्क, संप्रेषण या बरोबरच मानवाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रशासकीय व्यवहारात सुलभता निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भाषेच्या माध्यमातून होत असते. मानवी भाव-भावना, विचार, कल्पना सहज अन् स्वाभाविकपणे अभिव्यक्त करण्याचे प्रमुख माध्यम म्हणून भाषेचे महत्त्व मानवी जीवनात अनन्यसाधारण आहे. थोडक्यात समग्र मानवी व्यवहार सुलभ अन सुस्पष्ट करण्याचे सर्व श्रेय भाषेलाच जाते, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अनादी कालापासून भाषा ही मानवाच्या सर्वच व्यवहारांचे प्रमुख माध्यम बनून राहिली आहे. विशिष्ट व्यक्ती, जाती, जमाती, प्रदेश यानुसार भाषेचे वेगळेपण जाणवते. मातृभाषा, बोलीभाषा, प्रादेशिक अन् प्रशासकीय भाषा अशा स्वरूपात भाषांचे वर्गीकरण केले जाते. दोन व्यक्ती, गट, समाज, प्रदेश यांच्यातील भाषिक व्यवहारामध्ये सुलभता व स्पष्टता आणण्याचे कार्य भाषा करते. प्रत्येक भाषेची विशिष्ट रचना तथा ठेवण असते. प्रत्येक भाषेची एक सूत्रबद्ध, नियमबद्ध मांडणी केली जाते. यालाच त्या भाषेचे व्याकरण असे म्हटले जाते. या व्याकरणास संबंधित भाषेच्या विनियोगाचे सर्वमान्य शास्त्र

समजले जाते.

भाषा ही सातत्यपूर्ण प्रवाही सामाजिक संस्था असल्याने कालानुरूप तिच्यामध्ये काही बदल घडत असतात. काही तज्ज्ञ किंवा अभ्यासक वेळोवेळी त्या अनुषंगाने सुधारित नियमांची मांडणी करत असतात. भाषेचा विनियोग योग्य रीतीने व सुस्पष्टपणे व्हावा तसेच भाषिक व्यवहारात नेमकेपणा यावा यासाठी संबंधित भाषेच्या व्याकरणाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. म्हणूनच व्याकरणाला भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र असे संबोधले जाते. भाषेचा मागोवा घेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य व्याकरण करते. एकूणच मानवी भाषा व्यवहार नीटनेटका, व्यवस्थित, शुद्ध ठेवण्याच्या दृष्टीने व्याकरणाची खूप मदत होते. वर्ण, शब्द, पद आणि वाक्य इत्यादी घटकांची सूत्रबद्ध आणि नियमबद्ध मांडणी व्याकरणामध्ये केली जाते. एकूणच सूत्रबद्ध, सुस्पष्ट, सुलभ आणि सुयोग्य भाषा विनियोगासाठी व्याकरण अतिशय उपयुक्त ठरते.

या दृष्टीने विचार करता डॉक्टर माधुरी दाणी यांच्या मराठी व्याकरण:समग्र आणि सोपे या ग्रंथाच्या निर्मितीकडे लक्ष वेधावे वाटते.

मराठी व्याकरण  समग्र आणि सोपे या ग्रंथाच्या रूपाने डॉ. माधुरी दाणी यांनी केवळ मराठी व्याकरणपर साहित्यात मोलाची भर घातली असे नव्हे तर मराठी व्याकरणा- संबंधी नव्याने काही संकल्पना आणि नियमांचा मागोवा घेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. आजच्या प्रचलित मराठी भाषा व्यवहाराचा आवाका आणि व्याप्ती पाहता या ग्रंथाची निर्मिती अत्यंत उचित अन् उपयुक्त वाटते. मराठी भाषेच्या उगमापासून आजपर्यंतचा प्रवास विशिष्ट टप्प्याने झालेला दिसून येतो. इंडो युरोपीय भाषा कुळातील ही भाषा महाराष्ट्री-प्राकृत या प्राचीन रूपातून आधुनिक मराठी भाषेत रूपांतरीत झालेली दिसून येते. या भाषेचे स्वत:चे वेगळेपण असले तरी संस्कृतचा तिच्यावर प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. संस्कृतमधील नपुंसक लिंगाचा वापर मराठीमध्ये कायम ठेवल्याने अन्य इंडो- आर्य भाषांपेक्षा तिचे वेगळेपण सिद्ध झालेले दिसते. आजवर अनेक भाषा अभ्यासकांनी मराठी व्याकरणाचे महत्त्व आणि उपयुक्ता विविध ग्रंथांच्या माध्यमातून विशद केली आहे. आधुनिक मराठी भाषेच्या  व्याकरणाचे पहिले पुस्तक विल्यम कॅरी यांनी इ.स. १८०५ मध्ये प्रकाशित केले. इंग्रजी भाषिक गटासाठी त्यांनी या ग्रंथाची निर्मिती केली होती. त्यानंतर आधुनिक काळात कृष्णशास्त्री चिपळूणकर, गो.ग.आगरकर, वि.का.राजवाडे, न.चिं. केळकर, दादोबा पांडुरंग, मो.के.दामले, मो.रा.वाळंबे, इत्यादी मान्यवर अभ्यासकांनी अनेक लेख, ग्रंथ यांच्या माध्यमातून मराठी व्याकरणाचे स्वरूप आणि उपयोगिता स्पष्ट केली. तसे पाहता व्याकरणपर ग्रंथांची निर्मिती इतर साहित्य प्रकारांच्या तुलनेत अगदीच नगण्य झालेली दिसते कारण व्याकरण शिकणे, शिकवणे आणि समजावून घेणे हे अतिशय जिकीरीचे, त्रासाचे काम समजले जाते. त्यामुळे व्याकरणाकडे सर्वसामान्यांचा फारसा ओढा दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर डॉ. माधुरी दाणी यांनी या ग्रंथ निर्मितीचे केलेले धाडस कौतुकास्पद वाटते.

कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी,  ३० ऑक्टोबर २०२० रोजी फडके प्रकाशन, कोल्हापूर यांनी हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. या ग्रंथाच्या माध्यमातून डॉ. दाणी यांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांचा व्याकरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न केला आहे. व्याकरण म्हणजे भाषेचे गणित. यामुळे बहुतांश विद्यार्थी आणि शिक्षकदेखील याकडे कानाडोळा करतात. आवश्यक तेवढेच, किंबहुना गुण मिळवण्याच्या दृष्टीने उपयुक्त, तेवढ्याच घटकांचा अभ्यास  करून बाकी व्याकरणाच्या खोलात शिरण्याचा त्यांचा प्रयत्न नसतो. अर्थात काही अपवाद आहेतच. विद्यार्थ्यांची अशी प्रतिकूल मानसिकता लक्षात घेऊन त्यांची व्याकरणाबाबतची ही भीती कमी करून, मराठी व्याकरण सोपे करून सांगण्याचा प्रयत्न डॉ.दाणी यांनी या ग्रंथातून केलेला आहे. प्रत्यक्ष शिक्षक समोर बसूनच विद्यार्थ्यांना व्याकरणाचे धडे देत आहेत अशी या ग्रंथाची मांडणी त्यांनी केली आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावरील व्याकरणाच्या अभ्यासाचे स्वरूप लक्षात घेऊन एकूण सव्वीस प्रकरणांची मांडणी या ग्रंथात केली आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक, अभ्यासक आणि स्पर्धा परीक्षार्थी यांना अत्यंत सुगमपणे, सुलभपणे समग्र मराठी व्याकरण समजावण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न या ग्रंथात केला आहे.

मराठी भाषा आणि व्याकरण या पहिल्या प्रकरणात भाषा, लिपी आणि त्यांचे व्याकरण या बाबतची महत्त्वपूर्ण माहिती असून भाषिक व्यवहारासाठी व्याकरणाची आवश्यकता व उपयुक्तता स्पष्ट करण्यात आली आहे.

वर्णविचार, शब्दजाती, लिंग विचार, वचनविचार, काळ या प्रकरणांमधून संबंधित व्याकरणीय घटकांचे सूक्ष्म विश्लेषण केले आहे. स्वर, व्यंजने, शब्दजाती, लिंग व वचन आणि काळ या व्याकरणीय घटकांचे मुख्य व उप प्रकारात वर्गीकरण करून त्या अनुषंगाने विविध उदाहरणे देऊन संबंधित संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. या प्रमुख व्याकरणीय घटकांचे अत्यंत सखोल चिंतन या प्रकरणात मांडले आहे. पूर्वसुरींच्या विचारांचे, अवतरणांचे संदर्भ देऊन या मांडणीला आधार, पुष्टी देण्याचा उत्तम प्रयत्न या प्रकरणांमध्ये साधला आहे. प्रामुख्याने प्रत्येक घटकांच्या स्पष्टीकरणानंतर ठळक टाईपमध्ये त्या विषयीचे निष्कर्ष सारांश रूपाने मांडण्याचा प्रयत्न डॉ.दाणी यांनी उत्तमपणे केला आहे. उदाहरणार्थ ऱ्हस्व आणि दीर्घ स्वरांचे उच्चारानुसार वर्गीकरण करून त्याचे सविस्तर स्पष्टीकरण केल्यानंतर मराठीत अ ऱ्हस्व आणि आ हा दीर्घ उच्चार आहे असे नसून ते दोन्ही मूलध्वनी आहेत, स्वतंत्र स्वर आहेत असे म्हणता येईल (प्रकरण ६ ) असा सारांश ठळक अक्षरात मांडला आहे.

काळ या प्रकरणामध्ये पुरुषानुसार आणि सर्वनामानुसार तिन्ही काळातील क्रियापदाची रूपे कशी बदलत जातात हे तालिकेच्या माध्यमातून अत्यंत सोप्या पद्धतीने मांडले आहे. म्हणून विद्यार्थ्यांना त्याचे सहज आकलन होऊ शकेल. (पृष्ठ ४३) याच प्रकरणामध्ये साधा, अपूर्ण, पूर्ण, आणि रिती या काळाच्या उप प्रकारानुसार एकच वाक्य बारा प्रकारे कसे बदलत जाते याचीही अत्यंत सोप्या पद्धतीने तालिकेच्या रूपात मांडणी केली आहे.

विभक्ती विचार, प्रयोग विचार, वाक्यांचे प्रकार, वाक्य पृथ:करण, संधी विचार, समास विचार आणि सामान्यरूप या प्रकरणांमध्येही संबंधित व्याकरणीय घटकांची सखोल आणि सुगम पद्धतीने मांडणी केली आहे. विभक्ती प्रत्ययांचे स्पष्टीकरण करताना एक वचन व अनेकवचनानुसार पुस्तक या शब्दाचे प्रत्ययानुरूप बदलत जाणारे रूप अतिशय सोप्या पद्धतीने आकलीत होणारे आहे. प्रयोगविचार आणि वाक्य प्रकार या प्रकरणांमध्ये संबंधित घटकांचे प्रकार, उपप्रकार, व्याख्या आणि उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले आहेत. वाक्य पृथ:करण हा व्याकरणाचा कठीण घटकदेखील केवल, मिश्र व संयुक्त या वाक्यांच्या विविध प्रकारानुसार उद्देश्य व विधेय विभागात एक उदाहरण देऊन तक्त्याच्या स्वरूपात मांडल्यामुळे वाक्य पृथ:करणातील विभाजन नेमकेपणे व सोप्या पद्धतीने समजून येते. (पृष्ठ ६२) संधी विचार, समास विचार व सामान्यरूप ही प्रकरणे देखील मुख्य, उप प्रकारांच्या व्याख्या उदाहरणांसह सविस्तरपणे मांडली गेली आहेत.

अलंकार, वृत्ते आणि शब्दशक्ती या प्रकरणांसाठी लेखिकेने विशेष मेहनत घेतली आहे हे स्पष्टपणे दिसते. शब्दालंकार आणि अर्थालंकार या मुख्य प्रकारांचे उप प्रकार, त्यांच्या व्याख्या व उदाहरणांसह सुलभपणे विवेचित केले गेले आहेत. त्यामुळे या प्रकरणाचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वापार चालत आलेली उदाहरणे तर लेखिकेने दिली आहेतच शिवाय काही नवी उदाहरणेही दिली आहेत. यामुळे आजच्या काळातही व्याकरणाचे महत्त्व अधोरेखित झालेले दिसते. पृष्ठ क्रमांक ९० वरील श्री.मिलिंद शिंत्रे यांची प या अक्षरातून उतरलेली सुमारे १७५० शब्दांची अनुप्रासात्मक कथा तसेच पृष्ठ १०२ वरील कवी अशोक शिंदे यांची आई ही रूपकात्मक कविता अशी काही उदाहरणे येथे वानगीदाखल सांगता येतील.

वृत्ते या प्रकरणामध्ये पद्यरचनेच्या अक्षरगणवृत्त, मात्रावृत्त, छंद आणि मुक्तछंद या मुख्य प्रकारांचे उप प्रकार, व्याख्या आणि विशिष्ट उदाहरणे देऊन मांडणी केली आहे. काव्यरचनेच्या दृष्टीने या वृत्तांची उपयोगिता व महत्त्व येथे वेळोवेळी निर्देशित केले गेले आहे. अक्षरगणवृत्तातील लघु-गुरूनुसार अंकाच्या स्वरूपात गण स्पष्टीकरण अत्यंत सुगमपणे व आकलनास सोपे होईल अशा पद्धतीने मांडलेले आहे. या प्रकरणामध्ये वृत्त, गण, अक्षरे व यती यांची एकत्रित तालिका (पृष्ठ क्रमांक १२०) विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेणारी आहे. दिंडी, आर्या, साकी या प्रमुख मात्रावृत्तांसह एकूण सोळा मात्रावृत्तांचा सविस्तर आढावा या प्रकरणामध्ये घेतला गेला आहे. भृंग आणि पद्म यानुसार काव्य पंक्तींची मात्रा रचना उदाहरणासह स्पष्ट केली आहे. मुख्य प्रकाराबरोबर उप प्रकारांसह अनेक उदाहरणे देऊन छंद व मुक्तछंद हे काव्यरचना प्रकारही अत्यंत नेमकेपणाने व सोप्या रीतीने सांगितलेले आहेत. अभिधा, लक्षणा व व्यंजना या शब्द शक्तींचेही उप प्रकार उदाहरणांसह विश्लेषित केले गेल्याने ते आकलनास सोपे असल्याचे जाणवते. अलंकार व वृत्ते या संकल्पना अधिक

स्पष्ट केल्या गेल्यामुळे साहित्य निर्मितीसाठी ही प्रकरणे अत्यंत उपयुक्त ठरतील अशी अपेक्षा आहे. विशेषत: काव्य रचनेच्या दृष्टीने ही प्रकरणे आजच्या नवकवींना विशेष प्रेरणादायी आहेत.

शुद्धलेखन, विरामचिन्हे या प्रकरणामध्ये संबंधित व्याकरणीय घटक उच्चार व लेखनासह सुलभपणे व सुसूत्रपणे मांडले गेले आहेत. अनुस्वार व ऱ्हस्व दीर्घ यांचे विवेचन सोदाहरण आहे, तर काही शुद्ध शब्दांची यादी देऊन शुद्ध लेखनात नेमकेपणा तथा अचूकता दाखविण्याचा लेखिकेचा प्रयत्न स्तुत्य वाटतो.(पृष्ठ १४३) विरामचिन्हे व त्यांचे प्रकार उदाहरणांसह असलेली तालिका (पृष्ठ १४६) लक्षवेधक आहे. या बरोबरच समानार्थी, विरुद्धार्थी शब्द, शब्द समूहाबद्दल एक शब्द, समूह दर्शक शब्द, विविध अर्थी शब्द, अलंकारिक शब्द, वाक्प्रचार, म्हणी व पारिभाषिक शब्द या प्रकरणातून संबंधित व्याकरणीय घटकांचे महत्त्व, उपयुक्तता तर अधोरेखित होतेच; परंतु त्या संबंधी विद्यार्थ्यांना आणि अभ्यासकांना अधिक ज्ञान प्राप्त होऊ शकते.

अशा एकूण सव्वीस प्रकरणांतून समग्र व्याकरणीय घटक सोप्या तथा सुगमपणे मांडण्याचा यशस्वी प्रयत्न ग्रंथ-लेखिका डॉ.दाणी यांनी केलेला दिसून येतो. समग्र व्याकरणीय संकल्पनांचे ज्ञान व आकलन विद्यार्थ्यांपुढे अत्यंत सोप्या पद्धतीने मांडले गेल्याचे येथे दिसते. हा ग्रंथ अनेक दृष्टीने इतर व्याकरणीय ग्रंथांपेक्षा वेगळा व स्वतंत्र असल्याचे जाणवते. या ग्रंथांमध्ये अनेक तज्ज्ञांचे वा अभ्यासकांचे विचार, अवतरणे, व्याख्या आणि उद्गार संदर्भ रूपाने मांडले गेले आहेत. या ग्रंथात लेखिकेने समग्र व्याकरणीय घटकांची अद्ययावत तथा नवी माहिती नव्या उदाहरणांसह देऊन संबंधित व्याकरणीय कल्पना सोप्या रीतीने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ग्रंथामध्ये प्रत्येक मुख्य व उप व्याकरणीय घटकांची संकल्पना स्पष्ट करताना विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित होईल अशा विचारातून काही आशय ठळक अक्षरांमध्ये छापला गेला आहे.

या ग्रंथाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक व्याकरणीय घटक तालिकेच्या स्वरूपात मांडला गेल्याने तो आकलनास अत्यंत सुलभ आणि सोपा असल्याचे जाणवते. या शिवाय प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय व उत्तरांसह अधिक स्वाध्यायाची योजना करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञान आणि आकलनाची पडताळणी करणे सोपे झाले आहे.

व्याकरणाशिवाय कोणत्याही भाषेचा विनियोग अपुरा ठरतो. मराठी भाषाही याला अपवाद नाही. आजच्या स्थितीत मराठी भाषेची व्याप्ती व वापर अतिशय झपाट्याने वाढताना दिसत आहे. जगातील बहात्तर देशांत आणि भारतातील छत्तीस घटक राज्यांमध्ये मराठी भाषिकांची वस्ती आढळते. भारतासह मॉरिशस व इस्त्रायल या देशांमध्येही मराठी भाषा अधिक प्रमाणात बोलली जाते. भारतामध्ये मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या सुमारे नऊ कोटीहून अधिक आहे. भारतातील इतर भाषांच्या वापराच्या तुलनेत मराठी भाषेचा तिसरा क्रमांक लागतो, तर जगातील भाषा वापराच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मराठी भाषा दहाव्या क्रमांकावर आहे. भारतातील बावीस प्रमुख भाषांपैकी एक अधिकृत भाषा म्हणून मराठीचे स्थान महत्त्वपूर्ण असलेले दिसते. आज मराठी भाषा महाराष्ट्र राज्याची अधिकृत प्रशासकीय भाषा असून या बरोबरच ती गोवा, दीव, दमण, दादरा नगर हवेली या राज्य तथा केंद्रशासित प्रदेशांचीही सह अधिकृत प्रशासकीय भाषा म्हणूनही तिला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. एकूणच या सर्व पार्श्वभूमीवर मराठीचा वापर सर्व स्तरांवर वाढताना दिसत आहे. त्यामुळे मराठी व्याकरणाचीही आवश्यकता तितक्याच प्रमाणात असलेली दिसते. आज शालेय, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शैक्षणिक स्तरावर मराठी भाषा अधिक प्रमाणात शिकवली जात आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्येही मराठी भाषेचा विषय अनिवार्य केला आहे. अनेक स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमात मराठी विषयाला प्राधान्य दिले गेले आहे. केंद्रीय आणि राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमध्ये मराठी विषयाला इतर विषयांच्या बरोबरीने किंबहुना अधिक स्थान दिलेले दिसून येते. महाराष्ट्र शासनाच्या समग्र राज्य व्यवहारात मराठीचा वापर अनिवार्य आणि आवश्यक केला गेला आहे. रोजगारांच्या नवनवीन संधी निर्माण होत असतानाच त्यामध्ये मराठी विषयाचे सखोल ज्ञान असणे अनिवार्य ठरले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर डॉ.माधुरी दाणी यांचा हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त ठरल्याशिवाय राहणार नाही.

डॉ.दाणी यांचा मराठी या विषयाचा अध्यापनाचा

सुमारे तीस  वर्षांचा अनुभव विचारात घेता व्याकरणाच्या अध्यापनाबाबत त्यांना आलेले अनुभव तसेच विद्यार्थ्यांची मानसिकता यातूनच या ग्रंथाची निर्मिती झालेली दिसते. स्वत: डॉ.दाणी यांना व्याकरणाबाबत विशेष रुची असलेली दिसते. पुण्यातील नामवंत अशा हुजूरपागा शाळेत शिक्षण घेत असताना आशाताई खानोलकर आणि शांताताई जोगळेकर या शिक्षिकांनी त्यांच्या व्याकरणाचा पाया पक्का केला. त्यानंतर मुधोजी महाविद्यालयात मराठी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून काम करताना डॉ. ह. बा.कुलकर्णी, डॉ. प्र.ना. दीक्षित, प्राचार्य वि.मु.देशमुख यांसारख्या ज्ञानसंपन्न आणि ज्येष्ठ सहकाऱ्यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले म्हणून व्याकरणाची गोडी अधिकच वाढत गेली. विद्यार्थ्यांना शिकवता शिकवता स्वत:ला खूप काही शिकायला मिळाले. निवृत्तीनंतर हे ज्ञानाचे पाथेय पुन्हा विद्यार्थी व अभ्यासकांच्या यशस्वी प्रवासामध्ये  शिदोरी ठरावी या विचारातून तथा प्रेरणेतून या ग्रंथाची निर्मिती झाली असल्याचे दिसते.

एकूणच अत्यंत परिश्रमपूर्वक व निष्ठेतून हा ग्रंथ साकारला गेला असल्याचे जाणवते. मराठी भाषा, साहित्य निर्मिती प्रक्रिया व व्यावसायिक क्षेत्रातील समृद्धीसाठी डॉ.दाणी यांचा हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त ठरेल असे मला प्रामाणिकपणे वाटते.

वाचक, विद्यार्थी, पालक, शिक्षक, अभ्यासक आणि संशोधक या ग्रंथाचे मनापासून स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

**डॉ. अशोक नामदेव शिंदे**
(सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, मुधोजी महाविद्यालय, फलटण.) आस्वाद,  बिरदेव नगर, फलटण
मोबा: ९८६०८५०३४४
shindeashok044@gmail.com

◆◆

**'वाचनसंस्कृती लेखनसंस्कृती'**
**लेखक: डॉ. सुरेश सावंत**




'वाचनसंस्कृती लेखनसंस्कृती' ह्या पुस्तकात डॉ. सुरेश सावंत यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात चालत असलेल्या चाकोरीबाहेरच्या उपक्रमांचा संशोधनपूर्वक आढावा घेतला आहे. ह्या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी  शिक्षणप्रक्रियेतील महत्त्वाच्या आणि अलक्षित अशा अवांतर वाचन आणि सर्जनशील लेखन ह्या दोन पैलूंकडे लक्ष वेधले आहे. शिक्षण हा डॉ. सावंत यांच्या निदिध्यासाचा विषय असल्यामुळे त्यांनी हे लेखन अतिशय समरसून, आत्मीयतेने आणि जिवीच्या जिव्हाळ्याने केले आहे. आनंददायी शिक्षणाचे पुरस्कर्ते असलेल्या  डॉ. सावंत यांनी बालसाहित्य आणि बालशिक्षण यांचा आंतरिक अनुबंध ह्या ग्रंथात अधोरेखित केला आहे. त्यांनी अभ्यासपूर्वक नोंदविलेली निरीक्षणे ह्या दोन्ही क्षेत्रांसाठी मार्गदर्शक ठरतील, अशीच आहेत. वाचनसंस्कृती आणि लेखनसंस्कृतीच्या विकासासाठी धडपडणाऱ्या सेवाव्रती शिक्षकांच्या प्रयत्नांना बळ देणारे आणि शिक्षणक्षेत्राशी संबंधित सर्वच घटकांच्या डोळ्यांमध्ये झणझणीत अंजन घालणारे हे पुस्तक प्रत्येक शिक्षणप्रेमी वाचकाच्या संग्रही हवेच!

पृष्ठसंख्या ३३६ मूल्य रु. ४००/-
रजिस्टर्ड पार्सलने घरपोच मिळेल. ॲमेझॉनवरही उपलब्ध.
प्रकाशकाचा संपर्क : **9881745605**
लेखकाचा संपर्क : **8806388535**

**साकेत प्रकाशन,**
**औरंगाबाद/पुणे**

# झोळी आत्मकथन : डवरी गोसाव्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक दस्तावेज

डॉ. सुदाम राठोड

**कालिदास शिंदे यांच्या 'झोळी' या आत्मकथनावरील समीक्षा लेख.**




पुस्तकाचे नाव : **झोळी** (आत्मकथन)
लेखक : **डॉ. कालिदास शिंदे**
प्रकाशक : **समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर**
पहिली आवृत्तीः **१४ मे २०२१**
पृष्ठसंख्या : **१३५**
मूल्य : ५००/-

लेखनाच्या प्रेरणा मूलभूत असल्या, की अपोआप श्रेष्ठ साहित्य जन्माला येते. केवळ मराठीच नाही, तर जागतिक साहित्याचा अवकाश पाहिला तरी त्यामागच्या मूलभूत प्रेरणांची तीव्रता आपल्याला नीटपणे समजू शकेल. मुळाकडे जाण्यापेक्षा मुळाकडून पुढे येणे हे उत्क्रांतीचे लक्षण असते. असे साहित्य मराठीत फारसे आढळत नाही. त्याचं कारण या लेखनाच्या प्रेरणाच मूलभूत नाहीत हे आहे. उच्च मध्यमवर्गीय जाणिवा केंद्रस्थानी असेपर्यंत मराठी साहित्य एका मर्यादित वर्तुळात गोलाकार फिरत राहिले. ते साहित्य भाषिक कलाकुसरींनी भलेही नटलेले होते. भावनिक-बौद्धिक नेतृत्व करणारेही होते, मात्र ते आक्रमक आणि क्रांतीप्रवण नव्हते. क्रांती ही नेहमी तळागाळातून येते. मराठी साहित्यात पहिल्यांदा दलित साहित्याच्या आगमनाने क्रांती झाली. प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' हे पहिले दलित आत्मकथन प्रकाशित झाले आणि आत्मकथनांची जणू काही रीघच लागली. या आत्मकथनांना भाषिक कलाकुसरीची, लेखन शास्त्राची गरज पडली नाही. तरीही ते मोठ्या प्रमाणात वाचले गेले, प्रसिद्ध पावले कारण त्यामागच्या प्रेरणा या मूलभूत स्वरूपाच्या होत्या.

दलित साहित्याने अखिल शोषित, पीडित घटकांना आत्मभान दिले. त्यांच्या अभिव्यक्तीला वाट करून दिली. नंतर साठोत्तरी काळात या घटकांनी स्वतःचे स्वतंत्र साहित्य प्रवाह विकसित केले. या पार्श्वभूमीवर भटक्या विमुक्तांचं साहित्य कुठे आहे? प्रवाहाचं साहित्य म्हणून त्याच्याकडे

स्वतंत्रपणे पाहता येईल का ? भटके विमुक्त साहित्य म्हणजे नेमकं कुठलं साहित्य? आज ज्याचा भटके विमुक्त साहित्य म्हणून निर्देश केला जातो ते खरोखरीच भटक्या जाणिवा व्यक्त करणारं साहित्य आहे काय ? असे अनेक प्रश्न आहेत. त्याचे उत्तर शोधायचे असेल तर भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिप्रेक्ष्यात असणारं भटक्या विमुक्तांचं स्थान लक्षात घ्यावं लागेल.

भारतीय समाजाच्या विशाल सांस्कृतिक पटावर भटक्या विमुक्तांच्या संस्कृतीचे बारीक आणि सुटे सुटे संदर्भ शोधणे ही तशी प्रचंड गुंतागुंतीची गोष्ट आहे. त्याची दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे भारताच्या बहुसंख्यांकाच्या सांस्कृतिक कोलाजात छोट्या समूहांचा सांस्कृतिक आवाज एकतर विरून गेला किंवा लिखित साहित्याची निर्मिती करण्याइतके अक्षरज्ञान नसल्याने त्यांच्या सांस्कृतिक खुणा रैखिक स्वरूपात नोंदवल्याच गेल्या नाहीत. मात्र या जमातींकडे मौखिक वाङ्मयाचे मोठे भांडार असल्याने तेच संशोधनाचे प्रमुख साधन आहे. लिखित साहित्य ही फारच अलीकडची गोष्ट आहे. शासनाने भटके विमुक्त म्हणून उद्‌धृत केलेल्या जाती जमातींमध्ये मोठा गोंधळ आहे. मुळात भटके विमुक्त ही संकल्पनाच एकरेषीय नाही. ज्या भटक्या जातींना ब्रिटिशांनी १८७१ च्या क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्टनुसार जन्मजात गुन्हेगार ठरवले होते आणि १९५२ साली भारत सरकारने त्यातून ज्यांची मुक्तता केली त्या जाती विमुक्त जाती मानल्या जातात, तर ज्या भटक्या जमातींवर गुन्हेगारीचा शिक्का पडला नाही आणि ज्या उपजीविकेसाठी सतत भटकत असतात त्या भटक्या जमाती मानल्या जातात. महाराष्ट्रात ज्या जाती जमाती भटक्या विमुक्त प्रवर्गात मोडतात त्या बाहेरच्या राज्यात अनु.जाती, अनु.जमाती, ओबीसी किंवा खुल्या प्रवर्गात मोडतात. इतकेच नाही तर महाराष्ट्राच्या एका जिल्ह्यातील भटके दुसऱ्या जिल्ह्यात अनु.जमातीच्या प्रवर्गात मोडतात. तेव्हा त्यांच्या साहित्याचा अभ्यास करताना केवळ या प्रवर्गात आहेत म्हणून त्यांच्यात सांस्कृतिक साम्य आहे म्हणणे धाडसाचे ठरेल. भारतात अशा अनेक छोट्या मोठ्या भटक्या जाती जमाती असून प्रत्येकीची स्वत:ची एक स्वतंत्र संस्कृती आहे. त्यामुळे 'उपरा' तले अनुभव आणि 'तांडा' तले अनुभव वेगळे वाटतात. 'कोल्हाट्याचं पोर' तर या दोहोंपेक्षा अत्यंत वेगळी अनुभवसृष्टी घेऊन अवतरते. याचाच अर्थ ते सांस्कृतिकदृष्ट्या एकत्र बांधले गेले नाहीत; परंतु राजकीयदृष्ट्या ते एकत्र बांधता आले असते; पण हळूहळू प्रत्येकाच्या जातीय अस्मिता टोकदार होऊ लागल्या. अखिल भारतीय गोर बंजारा साहित्य संमेलन वेगळं होऊ लागलं, तर वडारांचं साहित्य संमेलन वेगळं होऊ लागलं. त्यातच चळवळीच्या धुरिणांनी वैयक्तिक राजकीय लाभाच्या आणि श्रेयाच्या भांडणात आख्खी चळवळच खर्ची घातली. त्यामुळे चळवळीचं साहित्य म्हणून उदयाला येऊ पाहणारा भटक्या विमुक्तांचा साहित्य प्रवाह त्यांच्यासोबतच आटून गेला. आता निव्वळ विद्यापीठांमध्ये मायनर, मेजर प्रोजेक्ट किंवा एमफील, पीएचडी मिळवण्यापुरता, जास्तीत जास्त चर्चासत्रात निबंध वाचण्यापुरताच हा विषय उरला आहे. बाकी प्रवाह म्हणून त्यात कितीसं लिहिलं गेलं आणि आज कितीसे नवे लेखक लिहीत आहेत हा प्रश्नच आहे.

खरेतर हा प्रवाह प्रस्थापित करणं आणि तो प्रवाहित ठेवण्यासाठी पुढची पिढी तयार करणं ही भटक्या विमुक्तांच्या पहिल्या फळीतील साहित्यिकांची नैसर्गिक जबाबदारी होती; पण ती जबाबदारी त्यांनी पाळली नाही. उलट दलित साहित्यिकांच्या पंक्तीत बसून स्वतः प्रस्थापित झाले. शिवाय भटक्या विमक्तांच्या साहित्याची पहिली नोंद दलित साहित्य म्हणूनच घेण्यात आली होती. त्यामुळे त्यांना साहित्यिक म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी विशेष कष्ट पडले नाहीत. दलित आत्मकथनाच्या लाटेत सगळं निभावून गेलं; पण पुढे काय? सहानुभूतीचा भर ओसरल्यानंतर आपली साहित्यिक गुणवत्ता सिद्ध करणे, तिचा विकास करणे गरजेचे होते कारण आत्मकथनात वाङ्मयीन मूल्यांपेक्षा अनुभवाची दाहकता प्रभावी असते; पण हे दाहक अनुभव किती दिवस पुरणार? कुठल्याही दुःखाचं भांडवल फार काळ टिकत नाही. नंतर त्यात वारंवारता येऊ लागते. करुणाही शेवटी दयाभावाकडेच घेऊन जाते. तेव्हा दु:ख आणि अनुभवाला सर्जनशीलतेची जोड नसेल तर मोठमोठे साहित्यिक एकेका पुस्तकात संपून गेलेले आपण पाहिलेत. आत्मकथने आणि काही प्रमाणात कविता वगळल्या तर कथा, कादंबरी, नाटक, ललित अशा विविध वाङ्मयप्रकारात कितीसे लेखन झाले आहे हा प्रश्नच आहे कारण आता कौतुकाचा काळ सरला आहे हे भटक्या विमुक्त साहित्यिकांनी लक्षात घेणं गरजेचं आहे. लहान मूल पहिल्यांदा बोबडं बोललं तरी कौतुक वाटतं; पण पाच पंचवीस-वर्षं उलटूनही ते बोबडंच बोलत असेल तर काहीतरी घोळ आहे असं समजायला हरकत नाही. आता भटक्या विमुक्तांच्या साहित्यात काहीतरी नवं क्रिएटीव्ह होणं गरजेचं आहे. नवे लोक लिहिती झाली पाहिजेत. त्यासाठी अभिव्यक्तीच्या नवनव्या वाटा धुंडाळल्या गेल्या पाहिजेत. आशय आणि रचनेच्या अनुषंगाने नवनवे प्रयोग झाले पाहिजेत.

या पार्श्वभूमीवर कालिदास शिंदे यांचे 'झोळी' हे आत्मकथन प्रसिद्ध होत आहे. झोळी हे शीर्षक या आत्मकथनाच्या आशय आणि विषयाशी एकदम सुसंगत असेच आहे कारण लेखक कालिदास शिंदे हे स्वतः डवरी गोसावी या भिक्षा मागून उदरनिर्वाह करणाऱ्या भटक्या

जमातीपैकी आहेत. डवरी गोसावी ही जमात नाथभक्त म्हणून महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. नाथांप्रमाणे काखेत झोळी घेऊन घरोघरी भिक्षा मागणे हा त्यांचा पिढीजात व्यवसाय आहे; परंतु ज्या कारणासाठी काखेत झोळी आली होती ते कारण कधीच मागे पडले, मात्र झोळी अजूनही तशीच आहे. आधुनिक काळात झोळी भोवती असणारे आध्यात्मिक वलय नाहीसे झाले आहे. आता ही झोळी समाजाच्या दृष्टीने लाचारीचे प्रतीक बनली आहे. परंपरेचे ओझे वाहून थकलेले खांदे आता आधुनिकतेचे वाहक बनू पाहत आहेत. अलख निरंजनाचा गजर करणारे आता भिके ऐवजी हक्क मागत आहेत. ही हक्काची भाषा ज्या शिक्षणाने, ज्या वैचारिक अधिष्ठानातून मिळाली तिला खऱ्या अर्थाने झोळीचे पावित्र्य ठाऊक आहे. ते पावित्र्य लेखकालाही नष्ट करायचे नाही. फक्त तिला चिकटलेली लाचारीची, दयाभावाची जळमटं लेखकाला झाडून टाकायची आहेत. त्यासाठीची लेखकाची प्रामाणिक धडपड म्हणजे झोळी हे आत्मकथन.

भटक्या विमुक्त जाती जमातीतील अनेक जातींचे जगणे आजही साहित्यात उतरलेले नाही. भटक्या विमुक्तांची जेवढी म्हणून आजपर्यंत आत्मकथनं आलेली आहेत त्यात बहुतांशी विमुक्त जातींचीच आत्मकथने आहेत. डवरी गोसावी ही भटकी जमात आजवर दुर्लक्षित होती. त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे चित्रण करणारे हे पहिले आत्मकथन आहे. या आत्मकथनात डवरी गोसावी जमातीचा संपूर्ण इतिहास आलेला आहे. या समाजाची उत्पत्ती आणि विस्तार लेखकाने विस्तृतपणे सांगितलेला आहे. बहुतांशी आत्मकथने ही आत्मवृत्तात्मक स्वरूपाची असतात; परंतु झोळी हे आत्मकथन याला अपवाद आहे. त्यात फक्त लेखकाचे वैयक्तिक जीवन नसून हा अखिल डवरी गोसावी समाजाचा कुलवृत्तांत आहे. त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनाचा संघर्ष या आत्मकथनाच्या शीर्षस्थानी आहे. मुळात नाथपंथ हा इथल्या बहुजनांचा पंथ आहे. तो वैदिक धर्मापेक्षा वेगळा असून बौद्ध, शाक्त, शैव, योग अशा वेगवेगळ्या परंपरांना सामावून घेणारा आहे. हा पंथ भौतिक जीवन आणि अध्यात्म यात द्वैत मानत नाही. अध्यात्माला भौतिक जीवनाचे साधन मानून त्यांनी प्रापंचिक धर्माचा स्वीकार केला. स्थळ काळ परिस्थितीनुसार त्यात वेळोवेळी बदलही केले. हे सगळे बदल या आत्मकथनात आलेले आहेत. लेखकाचे आडनाव शिंदे असले तरी त्यांची समाजातली ओळख सुरेनाथ शिंदे अशी आहे. त्यामागची कथा सांगताना लेखकाने समनाथ महाराज आणि त्यांचा शिष्य परिवार, त्यांच्या पूजेची ठिकाणं, एका संन्यासी बालकाच्या तोंडात सुरीने धुनीचा अंगारा टाकून समनाथ महाराजांनी दिलेली दीक्षा, त्यामुळे त्याचे सुरेनाथ असे पडलेले नाव, त्यानंतर समनाथ महाराजांनी गृहस्थाश्रमात आपल्या शिष्यगणांसह केलेला प्रवेश आणि त्यानंतर सुरेनाथचा झालेला आपला वंशविस्तार अशा पद्धतीने हे कथानक पुढेपुढे सरकत जाते. या आध्यात्मिक तेजाने तळपणाऱ्या भूतकालीन तपशिलानंतर मात्र त्यांच्या वर्तमानकालीन जगण्यातलं कारुण्य दिसू लागतं. दर रविवारी पतार भरण्यासाठी लेखक बापासोबत घरोघरी हिंडायचा तेव्हाचे त्याचे अनुभव आध्यात्मिक हिंसा नेमकी काय असते याची तीव्र जाणीव करून देणारे आहेत. पतार भरण्याची पद्धत, ती भरताना गावातील सामाजिक उतरंडीचे पाळावे लागणारे नियम, त्यांच्या जपाव्या लागणाऱ्या प्रतिष्ठा, एखाद्या रविवारी पतार भरली नाही तर डवऱ्युला 'का मस्ती आली का' अशी केली जाणारी दमबाजी आणि त्या सगळ्याच्या बदल्यात मिळणारे फक्त मूठभर पीठ हे अत्यंत केविलवाणे चित्र या आत्मकथनात आलेले आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेत एकीकडे ब्राह्मण पुरोहितांना दिला जाणारा सन्मान आणि दुसरीकडे डवरी गोसाव्यांना दिली जाणारी मानहानीकारक वागणूक या आत्मकथनात अधिक ठळकपणे दिसते. तसे तर दोघेही पुरोहितगिरीच करतात. मात्र भटक्यांची दैवते, त्यांच्या उपासना पद्धती इथल्या वैदिक व्यवस्थेत दुय्यम ठरवल्या गेल्याने त्यांचे उपासक देखील दुय्यमच राहिले. बाजार मागताना लेखकाची होणारी मानसिक घुसमट, पदोपदी होणारी मानहानी त्याला या सगळ्या अपमानित जगण्यातून बाहेर पाडण्यासाठी प्रेरणा देत राहिल्या. लेखकाचं बालपण रम्य नव्हतं. त्याचं जगही सुंदर नव्हतं. सततच्या भटकंतीने त्याला कधीही स्थिर आयुष्य जगता आलं नाही. आईवडील बिऱ्हाड पाठीवर घेऊन गावोगावी हिंडत होते आणि तो एखाद्या शेळीच्या पिल्लासारखा त्यांच्या मागे फरपटत जात होता. अर्थात तेव्हा त्याला आपल्या अभावांची दुनिया कळत नव्हती. आपल्याच वाट्याला हे जगणं का आलेलं आहे याची कारणमीमांसा करण्याएवढी प्रगल्भताही त्याच्याकडे नव्हती म्हणून लहानपणी बाजार मागणे हा त्याचा आनंदोत्सव असायचा; पण पुढे जेव्हा वय आणि विचार वाढले तेव्हा मात्र त्याला आपल्या जगण्यातील दाहकता कळू लागली. लेखकाचे शालेय अनुभव वाचनीय आहेत. विशेषतः आश्रमशाळेचे अनुभव तर फार करुण आहेत. भटक्या विमुक्तांच्या आश्रमशाळांनी भटक्यांच्या अनेक पिढ्यांना शिक्षण दिलेलं आहे; पण त्यांचे ज्या प्रकारचे शोषण इथल्या व्यवस्थापनाने केले आहे त्याला कुठेही तोड नाही. लेखक या अशा अत्यंत खडतर परिस्थितीत शिक्षण घेतो. ज्या अपेक्षेने आई वडलांनी त्याला शाळेत घातलेले असते त्याला खरे उतरत तो मेहनतीने शिकतो, अभ्यास करतो. शिक्षकांचा लाडका विद्यार्थी बनतो; पण आपलं जोगी असणं त्याला जिथे तिथे नडत राहतं. केवळ

जातीमुळे त्याला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तरीही तो जिद्दीने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करतो; पण त्याचे खरे शिक्षण सुरू होते ते टीसमध्ये आल्यानंतर. टीसपर्यंत पोचण्याचा त्याचा प्रवास तसा फार खडतर आहे. तिथूनच लेखकाचा सामाजिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. तिथे एमफील आणि पीएचडी करताना त्याचे अधिकाधिक सामाजिकीकरण होत जाते. सामाजिक जाणिवा विकसित होत जातात. भटक्या समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधात तो आवाज उठवू लागतो, असे अनेक तपशील या आत्मकथनभर विखुरलेले आहेत. त्यातच हे आत्मकथन संपून जाते; पण लेखकाचा आणि त्याच्या समाजाचा संघर्ष अजूनही संपलेला नाही. झोळीत हा संघर्षच केंद्रस्थानी आहे. बहुतेक आत्मकथने ही संघर्षाचा प्रवास संपल्यानंतर लिहिली जातात. आपला यशापर्यंतचा प्रवास कथन करणारी असतात; पण झोळी याला अपवाद आहे. किमान व्यक्तिगत पातळीवर तरी लेखक अजूनही कथित यशापर्यंत पोहोचलेला नाही. त्याला नोकरी नाही. नोकरीसाठी लागणारी वशिलेबाजीही त्याच्याकडे नाही. अशा परिस्थितीत येणारे नैराश्य लेखकाला लपवता आलेले नाही. यशाची व्याख्या नेमकी काय असते? हा प्रश्न वाचकांना पडल्याशिवाय राहत नाही. हे आत्मकथन जिथे संपते तिथून खऱ्या अर्थाने वाचकांच्या डोक्यात ते सुरू होते. हीच या आत्मकथनाची खरी ताकद आहे.

झोळीतली भाषाशैली अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. माणदेशी भागातील बोलीभाषेचा प्रभाव तीवर जाणवत असला तरी डवरी गोसावी जमातीच्या स्वतंत्र बोलीचा लहेजा या आत्मकथनात उमटलेला आहे. भटक्या जमाती नागर समाजापासून जरा फटकून असल्यामुळे त्यांनी स्वतःची सांकेतिक बोली जन्माला घातलेली आहे. ती समाजाबाहेरच्या लोकांना कळू नये हा हेतू त्यामागे असतो. या आत्मकथनात असे अनेक सांकेतिक बोलीतले शब्द आलेले आहेत. खपाळणे, खैदुळ, चिबवणे, लुगाव, चाणकाय, गरकावणी, चगाळं, बैन्दाळ, खोसकांड, मेकाळ, किरवं, वैतने, चानकून खोण वैताला घालणे, पतार भरणे, गोताई करणे, फाकांड, दडगीचं, फतऱ्या देणे, रंगाळ बुरसा चारणे, बा च्या गोणीवर राहणे, गिराणी बाटणे, गरसूळ, चिंगवाचं घर, बारा पंचवीस घेणे अशा अनेक शब्दांचा येथे निर्देश करता येईल. भटक्या विमुक्तांच्या बोली भाषेचा मोठा ऐवज या आत्मकथनात दडलेला आहे. यात आलेल्या घटना आणि प्रसंगांमध्ये सुसूत्रता नाही. कथात्म साहित्यात कथेचं सूत्र सुटता कामा नये. मात्र झोळीत लेखकाला स्वतःची कथा संगतवार सांगायची नाही असे दिसते कारण त्यात आठवतील तशा आठवणी, आठवतील तसे विचार आणि आठवतील तसे अनुभव अघळपघळ लिहून काढलेले आहेत. त्यामुळे यात घटना प्रसंगांची सुसूत्र अशी साखळी दिसत नाही. मात्र साखळीची विखुरलेली प्रत्येक कडी ही एक स्वतंत्र कथा विषय आहे असे वाटते. अशा अनेक कथांच्या शक्यता या आत्मकथनात दिसतात. कदाचित लेखकाने या आत्मकथनाऐवजी हा ऐवज कादंबरीसाठी वापरला असता तर नक्कीच एक महा कादंबरी लिहून झाली असती. भटक्या विमुक्त साहित्य प्रवाहात आत्मकथनाच्या तुलनेत कादंबरी हा साहित्यप्रकार फारच कमी प्रमाणात लिहिला गेला आहे. या लेखकाने लेखन सातत्य टिकवलं तर पुढे मागे कादंबरीही लिहिली जाऊ शकते अशी अपेक्षा करायला हरकत नाही.


या आत्मकथनात आलेला काळ नव्या जुन्याच्या सीमारेषेवरचा आहे. लेखकाचं बालपण ज्या काळात गेलेलं आहे त्यापेक्षा त्याच्या तारुण्याचा काळ प्रचंड वेगाने बदललेला आहे. नव्या जुन्याला जोडणारा हा संधिकाळ लेखकाला पकडता येणं फार गरजेचं आहे कारण आज समाजमाध्यमोत्तर काळात संपूर्ण साहित्यव्यवहारच बदलून गेला आहे. या समाजमाध्यमांनी साहित्यावरची अभिजनांची मक्तेदारी संपुष्टात आणली आहे. केवळ साहित्यच नाही, तर भटक्यांकडे असणाऱ्या विविध कलांना, गुणांना अभिव्यक्तीची दारं खुली झाली आहेत. ही खरेतर भटक्या विमुक्त लेखकांना, कलावंतांना मोठी संधी आहे; पण त्यासोबतच काळाची आव्हानेदेखील ओळखता आली पाहिजेत. याच समाजमाध्यमांमध्ये अफवा पसरून राईनपाडामध्ये बहुरूप्यांना पोरधरी समजून जिवंतपणी ठेचले गेले. त्याचा संदर्भ या आत्मकथनात आलेलाच आहे. लेखकाच्या पालासमोर राहणाऱ्या पारध्यांना चोर समजून झुंडीने मारहाण केली जाते. भटक्या स्त्रियांबद्दल अतिशय हिणकस बोलले जाते. या सबंध वास्तवाचा नवा अन्वयार्थ लावत भटक्या विमुक्त लेखकांनी अभिव्यक्तीचे नवे दालन उभे करणे गरजेचे आहे. झोळी हे आत्मकथन या नव्या काळाच्या परिप्रेक्ष्यात बसते किंवा नाही हे काळच ठरवेल; परंतु कालिदास शिंदे यांची झोळीकार म्हणून भटक्या विमुक्तांच्या साहित्य प्रवाहात नक्कीच दखल घेतली जाईल याबद्दल खात्री वाटते.

**डॉ. सुदाम राठोड**
मु. शेकुचा तांडा, पो. जाटदेवळे, ता. पाथर्डी,जि. अहमदनगर
मो. ९७६७५३८६९५
email : sud.rath@gmail.com

# परिवर्तनाची दिशा सूचित करणाऱ्या कथा

**डॉ. वासुदेव मुलाटे**

**वि. दा. पिंगळे यांच्या 'चौकट' या कथासंग्रहावरील परिचय लेख.**




पुस्तकाचे नाव : **'चौकट'**
लेखक : **वि. दा. पिंगळे**
प्रकाशक : **अथर्व पब्लिकेशन, जळगाव**
पहिली आवृत्ती : **जुलै २०१७**
मूल्य : **१७५/-**

'चौकट' हा वि. दा. पिंगळे यांचा कथासंग्रह. श्री. पिंगळे यांचं व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. अध्यापन, साहित्य निर्मिती, सूत्रसंचालन, वक्तृत्व, विविध साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सेवाभावी संस्थांचे ते पदाधिकारी आहेत. विविध उद्योगक्षेत्रांतील यशस्वी उद्योजकांच्या भेटी घेऊन व माहिती घेऊन नवतरुणांना मार्गदर्शन ठरतील असे लेखन करणे, त्यांचे ग्रंथरूपात सादर करणे इ. कामे त्यांची सातत्याने चालू असतात. शब्दाई फाऊंडेशनच्या वतीने शब्दाई या त्रैमासिकाचे संपादनही ते करतात. त्यांनी जमवलेला मनुष्यसंग्रह लक्षणीय आहे. आपल्या उत्साही व लाघवी बोलण्यातून नवनवीन माणसं जोडण्याचं त्याचं कार्य अव्याहत चालू असतं. जोडीलाच माणसांचं, सभोवती घडणाऱ्या घटनांचं सूक्ष्म निरीक्षण चालू असते. आपल्या विनम्र व्यक्तिमत्त्वाने माणसांची मनं जिंकण्याची प्रचंड किमया त्यांना लाभलेली आहे. समाजात सतत चेहऱ्यावरचं हास्य जपत वावरताना त्यांच्या अदम्य उत्साहाचं दर्शन घडतं. या सगळ्यांमध्ये त्यांचं कवीमन जागं असत. म्हणजे ते कविता लिहितात म्हणून नव्हे परंतु त्यांची एकूणच दृष्टी बोलण्यात, गद्य लेखनात काव्यमय असल्याचे जाणवते.

त्यांचा हा काहीसा विस्ताराने वाटणारा परिचय इथे यासाठी सांगितला की, त्यांच्या या पहिल्यावहिल्या 'चौकट' या कथासंग्रहातील कथांमधून जाणवते. उपरोक्त

परिचयात न दिलेला आणखी एक त्यांचा सद्‌गुण मला सांगावासा वाटतो, नव्हे सांगितलाच पाहिजे, तो म्हणजे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, तो विलक्षण सकारात्मक आहे. कवीच्या ठिकाणी प्रामुख्याने असणारी रसिकता, भावासक्ती यांचे प्रत्ययकारी दर्शन त्यांच्या कथा लेखनामधूनही होते. कथात्म साहित्याच्या निर्मितीसाठी लेखकाला माणसं वाचता आली पाहिजेत. त्यांचे वागणे, बोलणे, त्यांची एकूण देहबोली, त्यांचे सूक्ष्मनिरीक्षण त्यांच्या साहित्यनिर्मितीला बळ पुरवते. एखाद्या व्यक्तीचं वागणं आणि कृती त्यांच्या भोवतीची कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, आणि कधी राजकीय परिस्थिती यांचा अनुबंध असतो. तो लेखकाला पडताळून पाहता आला पाहिजे, तरच त्याला आपल्या साहित्यातील निर्मित व्यक्तिरेखांना न्याय देता येऊ शकतो.

'चौकट' या वि.दा. पिंगळेच्या कथा संग्रहातील कथांचे वाचन या परिप्रेक्ष्यात केले पाहिजे.

या संग्रहात एकूण बारा कथा समाविष्ट केलेल्या आहेत. त्यातील कथांचे विषयही वेगवेगळे आहेत. पैकी 'चौकट' या शीर्षकाचीच पहिली कथा आहे. जहागिरदार घराण्यातील सामंतशाही, घराण्याच्या प्रतिष्ठेबाबतच्या पारंपरिक कल्पना, गरीब, श्रीमंत, जातीनिष्ठ दृष्टिकोन, स्वतःचे कुटुंब आणि गाव यांच्यावर हुकूमत चालवणाऱ्या नारायणराव जहागिरदारांचा मुलगा अमर आणि त्याची प्रेयसी सीमा यांच्या अतूट प्रेमाची ही कहाणी सर्व रूढ कल्पनांना छेद देऊन खरे प्रेम, मानवता यांचे दर्शन घडवते. 'कचरापेटी' कथेतील आयुष्यभर कचरा गोळा करून मुलांना शिकवणाऱ्या आशा मावशीचा एक गुणी मुलगा डॉक्टर होतो, तर दुसरा आय.ए.एस. परीक्षा पास होऊन कलेक्टर होतो. जिद्द, चिकाटी, सद्‌गुण आणि दृष्टी असली तर सामान्य माणसाच्या जीवनातही केवढी क्रांती होते याचे उदाहरण या कथेत पाहायला मिळते. त्याच बरोबर आपण आयुष्यात कितीही मोठे झालो तरी आपला भूतकाळ, पायाखालची जमीन विसरता कामा नये म्हणून मुलगा कलेक्टर झाला तरी त्याचा बंगला स्वतः झाडून साफ करून कचरा रोज घंटागाडीत टाकणारी आशा मावशी वाचकांच्या मनात एक आदर्श म्हणून घर करते.

'संसार' ही कथा मात्र वेगळ्या विचारधारेची आहे. अतिशय प्रामाणिक, गरीब स्वभावाचा एका प्रायव्हेट कंपनीत अकाऊंटंट असलेला नवरा विनोद आणि त्याची देहाने सुंदर असलेली परंतु कुसंस्कारित असलेली, दाग दागिने, कपडेलत्ते, हौसमजा यात रमणारी, त्यासाठी नवऱ्याला हीन लेखणारी, आपल्या परिस्थितीचे भान नसणारी त्याची बायको रेश्मा यांच्या विसंवादाची, आत्मघाताकडे नेणारी परिस्थिती यांचे चित्रण करणारी कथा आहे. पती-पत्नी ही संसाराची दोन चाके आपण समजतो; पण ती सारख्या वेगाने फिरत नसतील तर आयुष्याचे कसे मातेरे होते ते सांगणारी कथा.

स्वतःच्या घराचीच नव्हे तर गावातल्या कुणाही गरजवंताच्याही अडचणीची काळजी करून 'शेवंता आजी' ही एक व्यक्तिचित्रणाच्या पातळीवर जाणारी कथा. दादासाहेबांनी त्यांना आवडली म्हणून भरल्या संसारात तिला दुसरी बायको म्हणून आणली. त्यांनी, त्यांच्या पहिल्या बायकोने त्यांना स्वीकारले; पण मुलांनी, वाड्यातल्या आप्तांनी त्यांना स्वीकारले नाही. दादासाहेबांच्या माघारी त्यांना बाहेर पडून जातीने मातंग असलेल्या बाळू बरोबर आई म्हणून राहावे लागते. 'विवेक' कथेचा नायक, विवेक एका गरीब सुताराचा अपंग मुलगा आणि राधा दोघांचे प्रेम; पण व्यवहारी जग त्याची ताटातूट करते. राधेचे इतरत्र लग्न होते. विवेकचे दोघे भाऊ शिकून मोठे झाले; पण आई-बापाला विसरले म्हणून राधेचे प्रेम व हतबलता समजून घेऊन तो आई-वडिलांची सेवा करू लागतो.

महारू तात्याकडे पन्नास वर्षे इमाने इतबारे सालगडी म्हणून राहिलेल्या बारकूनानांची मुलं शिकून मोठी झाली. गावात टोलेजंग घर बांधले; पण बारकूनाना महारूतात्यांच्या वाड्याला विसरले नाहीत. (सालदार-सालगडी) अशीच काहीशी कथा तीस वर्षे वॉचमन म्हणून नोकरी केलेल्या सखारामची आहे. (वॉचमन) भ्रष्ट पुढारी नानासाहेबांचा मुलगा, त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी वडिलांच्या भ्रष्टाचाराबद्दल जाहीर बोलतो आणि राजकारणात प्रामाणिक राहूनही काम करता येते व जनतेचे खरे प्रेम मिळवता येते हे दाखवून देतो. (पुढाऱ्याचा दशक्रिया विधी). साठ माणसांचे मोठे खटले, शेकडो एकर जमीन; पण भाऊबंदकीमुळे कोर्टकचेऱ्यात सगळे गेले. सगळी वाताहत झाली. त्यांची बहीण नम्रताने आंतरजातीय विवाह केला हे ही एक कारण त्यासाठी घडले

(खटले). ज्या गावात शिक्षक कधी टिकत नसे, तिथे आपल्या कार्यातून गणू गुरुजींनी गाव बदलले. विकास घडवून आणला. लोकांनी त्यांच्याहस्ते ध्वजारोहण केले; पण त्याच गुरुजींचा मुलगा आदित्य मुंबईला घातपात घडवून आणणाऱ्या आतंकवाद्यांत सामील झाला. याचे गणू गुरुजींना खूप क्लेश होतात, व ते स्वतः शाळेत जाऊन झेंड्याच्या दोरीनेच फाशी घेतात (गणू गुरुजी).

'दप्तर' ही रस्त्यावर, सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलांविषयीची कथा. राघव हा रंगकाम करून पोट भरणाऱ्या रंगाऱ्याचा मुलगा. त्याची तीन वर्षांची बहीण एक टोळी पळवून नेते. दोन वर्षांनंतर नववीत शिकणारा तिचा भाऊ तिला पोलिसांच्या मदतीने सोडवतो. तसेच तीनशे मुलांना पकडून भीक मागायला लावणाऱ्या टोळीलाही पकडून देतो. त्याला राष्ट्रपतींच्या हस्ते शौर्यपुरस्कार मिळतो. पुढे तो एम. एस. डब्ल्यू.ही पदवी मिळवतो व निराधार अनाथ मुलांसाठी संस्था काढतो.

चित्रकार ही शेवटची कथा एका कलावंत प्रेमिक मनाची शोकांतिका रेखाटणारी आहे. या सर्वच कथा नैतिकता, प्रामाणिकता आणि पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. तसेच अनिष्ट पारंपरिक व भ्रष्ट विचारांना विरोध केला पाहिजे हे सांगणाऱ्या आहेत. 'चौकट' कथेतील अमर आपल्या आंतरजातीय प्रेयसीशी ती विधवा व अपंग झाल्यानंतरही लग्न करतो. पुढाऱ्याचा दशक्रियाविधी मधील विनायक याच पंथातला. खरे प्रेम हे किती उदात्त असते हे सांगणाऱ्या अमर-सीमा, (चौकट) विवेक-राधा (विवेक), देव-शालू या प्रेमी जोड्या आहेत. संस्कार, सचोटी आणि गुणवत्ता असेल तर माणूस उच्च ध्येय प्राप्त करू शकतो, हे सांगणारी आशा मावशीची मुलं अजय आणि विजय (कचरापेटी), बारकूनानाची मुलं (सालदार), सखाराम वॉचमनची मुलं (वॉचमन), राघव (दप्तर) या व्यक्तिरेखा भेटतात.

संसार ही कथा मात्र स्त्रीमुक्तीचा पुरस्कार करणाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचे सूचित करते. सालदार, खटलं यातून पारंपरिक गावगाड्याच्या संस्कृतीचे चित्र उमटले आहे. शेवंता आजी, कचरापेटी, दप्तर या कथांच्या विषय निवडीचे वेगळेपण कौतुकास्पद आहे, तर चित्रकार ही एका सरल, कलाप्रेमी मनाची आगळी वेगळी निर्मिती आहे.

या सर्व कथांचे आकृतिबंध बघितले, तर यांत संवाद असे जवळ जवळ नाहीतच. या कथा प्राधान्याने घटना प्रधान कथा आहेत, आणि त्यात नाट्यात्मकता आहे. क्वचित लेखकाला भाष्य करण्याचा मोह होतो. वास्तव काय आहे, त्यापेक्षा वास्तव कसे असावे याला इथे अधिक महत्त्व दिल्याने कथा ही प्रबोधनाच्या मार्गाने जाते.

वि. दा. पिंगळे यांच्या या कथा वाचकांना निश्चितच भावणाऱ्या आहेत. त्यांच्या पुढील लेखनास शुभेच्छा!

**डॉ. वासुदेव मुलाटे**
औरंगाबाद, ।चलभाषः ९८२२६३४४३४

◆◆




**भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य**

प्रकाशक : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
पृष्ठे : ४६०
मूल्य : ८००/-

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## मुख्य शाखा कार्यवृत्तांत

**१) ८ जून २०२१ : शरणकुमार लिंबाळे यांचा सत्कार समारंभ**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने भारतीय साहित्य विश्वातील प्रतिष्ठेचा सरस्वती सन्मान सनातन या कादंबरीला जाहीर झाल्याबद्दल डॉ. शरणकुमार लिंबाळे आणि कादंबरीचे प्रकाशक दिलीपराज प्रकाशनाचे संचालक राजीव बर्वे यांचा माजी साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, पत्रिका संपादक डॉ. पुरुषोत्तम काळे, कार्यवाह प्रमोद आडकर, उद्धव कानडे, बंडा जोशी, दीपक करंदीकर, माधव राजगुरू, शिरीष चिटणीस उपस्थित होते. रांगोळ्या आणि फुलांच्या पायघड्या घालून तसेच समारंभात पुष्पवृष्टी करून हा सत्कार करण्यात आला. रमा जोगदंड यांनी 'माणसाने माणसांशी माणसांसम वागणे' हे गीत सादर केले. उद्धव कानडे यांनी आभार मानले.

**२) २५ जून २०२१ : 'स्पंदन' या बहुभाषिक त्रैमासिकाच्या अंकाचे प्रकाशन**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी 'स्पंदन' या बहुभाषिक त्रैमासिकाच्या अंकाचे प्रकाशन केले. परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, स्पंदन बहुभाषी त्रैमासिकाचे संपादक इंतेखाब फराश, कार्यवाह दीपक करंदीकर, प्रमोद आडकर, मंजूर देशमुख, सिकंदर पठान, शगुफ्ता दंडोती, बशीर काजी, प्रा. डॉ. शाकिर शेख, अबुल कलाम खान, सलीम शेख, अ. कय्युम दंडोती यावेळी उपस्थित होते. दीपक करंदीकर यांनी कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले. स्पंदन बहुभाषी त्रैमासिकाचे संपादक इंतेखाब फराश यांनी आभार मानले.

**३)१० जुलै २०२१ : मसाप दिवाळी अंक स्पर्धेचे पारितोषिक वितरण**

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या दिवाळी अंक स्पर्धेतील (२०२०) विजेत्यांना डॉ. देखणे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार,दिवाळी अंक स्पर्धेचे समन्वयक वि. दा. पिंगळे उपस्थित होते. या स्पर्धेत उत्कृष्ट दिवाळी अंकासाठीचे अ. स. गोखले स्मृतिप्रीत्यर्थ 'रत्नाकर पारितोषिक' 'आंतरभारती' या दिवाळी अंकाला, चंद्रकांत शेवाळे पुरस्कृत 'विविध ज्ञानविस्तारकर्ते रावसाहेब मोरमकर पारितोषिक 'ऋतुरंग' या दिवाळी अंकाला, 'मासिक मनोरंजनकार का. र. मित्र पारितोषिक' 'चपराक' या दिवाळी अंकाला, 'शं. वा. किर्लोस्कर पारितोषिक' 'महाराष्ट्र नामा' या दिवाळी अंकाला, डेलिहंट पुरस्कृत उत्कृष्ट ऑनलाईन दिवाळी अंकाचे पारितोषिक 'सायबर साक्षर' या दिवाळी अंकाला, तर 'जानकीबाई केळकर' स्मृतिप्रीत्यर्थ 'उत्कृष्ट बालवाङ्मय दिवाळी अंकाचे पारितोषिक' 'छावा' या दिवाळी अंकाला तसेच दिवाळी अंकातील उत्कृष्ट कथेसाठीचे 'दि. अ. सोनटक्के पारितोषिक' 'साहित्यदीप' या दिवाळी अंकातील डॉ. भारती पांडे यांच्या 'प्रेम सेवा शरण' या कथेला आणि उत्कृष्ट ललित लेखासाठीचे 'अनंत काणेकर पारितोषिक' 'साप्ताहिक सकाळ' या दिवाळी अंकातील आदिती पटवर्धन यांच्या 'विलक्षण ब्रह्मपुत्र' या लेखाला देण्यात आले. विविध विषयांना वाहिलेले दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित

करणाऱ्या 'छंद' या दिवाळी अंकाचे संपादक दिनकर शिलेदार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सुनिताराजे पवार यांनी आभार मानले. वि. दा. पिंगळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**४) १३ जुलै २०२१ : नातवाने केला साहित्यप्रेमी आजोबांच्या अखेरच्या इच्छेचा सन्मान**

आजोबा वासुदेव वि. जोशी ऐंशीच्या दशकात महाराष्ट्र साहित्य परिषदेत कार्यक्रमाच्या निमित्ताने नियमित येत. त्यांचा परिषदेवर विशेष लोभ होता. ते लेखक होते. त्यांच्या कथा रोहिणी, माहेर या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. शं. ना. नवरे, वि. ग. कानिटकर आणि रंगा मराठे या साहित्यिकांशी त्यांचा स्नेह होता. त्यांची तीन-चार पुस्तकेही प्रकाशित झाली. त्यांनी त्यांच्या मुलालाही परिषदेचे आजीव सभासद केले होते. त्यांनी आजीसाठी तरतूद केलेल्या रकमेतील २५,५५१/- रु. ची रक्कम तिच्यानंतर साहित्य परिषदेला देणगी म्हणून द्यावी अशी त्यांची अंतिम इच्छा होती. २००५ साली आजोबांचे निधन झाले. दरम्यान त्यांच्या मुलाचेही निधन झाले आणि एक वर्षापूर्वी आजीचेही निधन झाले. आजोबांच्या इच्छेचा सन्मान राखण्यासाठी त्यांचा नातू ओमकार जोशी याने परिषदेत येऊन २५,५५१/- रु. देणगीचा धनादेश कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्याकडे सुपूर्द केला आणि या देणगीमागची कथाही सांगितली. तेव्हा ती देणगी स्वीकारताना पदाधिकारीही गहिवरले. ओमकार जोशी आयटी क्षेत्रात कार्यरत आहेत.

**५) २३ ऑगस्ट २०२१ : मसापचा डॉ. गं. ना. जोगळेकर पुरस्कार डॉ.अंजली सोमण यांना प्रदान**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृती पुरस्कार डॉ. सोमण यांना साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, कार्यवाह बंडा जोशी, पराग जोगळेकर आणि उज्ज्वला जोगळेकर यावेळी उपस्थित होते. प्रकाश पायगुडे यांनी आभार मानले. बंडा जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

**६) २६ ऑगस्ट २०२१ : लेखक आणि विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान जन्मशताब्दीनिमित्त कार्यक्रम**

समाजशिक्षक, साक्षेपी लेखक आणि विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभाचेनिमित्ताने महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, साधना साप्ताहिक, साहित्य शिवार दिवाळी अंक आणि अक्षरधारा बुक गॅलरी यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रा. ग. प्र. प्रधान यांची विचारसृष्टी आणि समकालीन राजकारण' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी, साधना साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ, ज्येष्ठ पत्रकार अरविंद गोखले, एस. के. कुलकर्णी त्यात सहभागी झाले होते. मसापचे प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, साहित्य शिवार दिवाळी अंकाचे संपादक जयराम देसाई, अक्षरधारा बुक गॅलरीच्या संचालिका रसिका राठिवडेकर उपस्थित होते. प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' आणि 'माझी वाटचाल' या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जयराम देसाई यांनी प्रास्ताविक केले. प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले. रसिका राठिवडेकर यांनी आभार मानले.

**७) ३१ ऑगस्ट २०२१ : ८१ व्या जयंती निमित्त 'मृत्युंजय' च्या ३० व्या आवृत्तीचे प्रकाशन**

महाराष्ट्र साहित्य परिषदेत शिवाजी सावंत यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त कॉन्टिनेन्टल प्रकाशनाच्या वतीने 'मृत्युंजय' या कादंबरीच्या तिसाव्या आवृत्तीचे आणि मृत्युंजय, छावा आणि युगंधर कादंबऱ्यांच्या डिलक्स आवृत्तीचे प्रकाशन प्रा. जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, कॉन्टिनेन्टलच्या अमृता कुळकर्णी, कार्यवाह उद्धव कानडे, बंडा जोशी, दीपक करंदीकर, सतीश देसाई, लक्ष्मण राठिवडेकर यावेळी उपस्थित होते.

**८) ८ सप्टेंबर २०२१ : 'मराठीच्या भल्यासाठी'**

'जून २०१९ मध्ये मराठी सक्तीने शिकवण्याचा कायदा करणे, मुंबईत भव्य मराठी भाषा भवन उभारणे, मराठी विद्यापीठ, आदी मराठी भाषा विकासाच्या

मागण्या, शासनाशी संवाद, पाठपुरावा व प्रसंगी संघर्ष करण्यासाठी 'मराठीच्या भल्यासाठी' या मराठी संस्थेच्या शिखर संस्थेची स्थापना करण्यात आली व एक अस्थायी समिती गठीत करण्यात आली.

सदर 'मराठीच्या भल्यासाठी' समितीची; राज्यातील सर्व भागांच्या साहित्य व कला संस्था समाविष्ट आणि काही मान्यवर व्यक्तींना सहभागी करून; पुनर्रचना नुकतीच करण्यात आली आहे. सदर पुनर्रचित समितीची बैठक दिनांक ८ सप्टेंबर बुधवारी पुणे येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात संपन्न झाली.

सदर बैठकीत 'मराठीच्या भल्यासाठी' समितीचे संस्थापक अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांचा; प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी दिलेला; राजीनामा मंजूर करण्यात आला व त्यांच्या जागी सर्वानुमते प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांची निवड करण्यात आली. तथापि सर्वांच्या आग्रहास्तव मधु मंगेश कर्णिक यांनी सल्लागार मार्गदर्शक म्हणून समितीवर राहण्यास व काम करण्यास मंजुरी दिली. त्यांचा जनस्थान पुरस्कार मिळाल्याबद्दल ठाले पाटील यांच्या हस्ते व ठाले यांचा 'मराठीच्या भल्यासाठी' समितीचे अध्यक्ष झाल्याबद्दल प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

**'मराठीच्या भल्यासाठी' ची नवी कार्यकारिणी**

मार्गदर्शक/ संस्थापक अध्यक्ष– मधु मंगेश कर्णिक)

१) अध्यक्ष– कौतिकराव ठाले पाटील – औरंगाबाद

२) कार्याध्यक्ष– लक्ष्मीकांत देशमुख

**उपाध्यक्ष**

३) प्रा. मिलिंद जोशी – कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ४) प्रा. उषा तांबे – कार्याध्यक्ष, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई ५) डॉ. दादा गोरे – मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद ६) डॉ. रविंद्र शोभणे – विदर्भ साहित्य संघ, नागपूर ७) डॉ. अशोक ठाकूर –अध्यक्ष, कोकण मराठी साहित्य परिषद ८) विजय चोरमारे – अध्यक्ष दक्षिण मराठी साहित्य परिषद ९) कोषाध्यक्ष : रेखा नार्वेकर – विश्वस्त कोकण मराठी साहित्य परिषद

**प्रमुख कार्यवाह**

१०) चंद्रशेखर गोखले – जिल्हा अध्यक्ष, कोकण मराठी साहित्य परिषद

**विभागीय कार्यवाह**

११) प्रकाश पायगुडे – प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे १२) रामचंद्र काळुंके–मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद १३) विलास मानेकर विदर्भ साहित्य संघ, नागपूर १४) भीमराव धुळूबुळू – दक्षिण मराठी साहित्य परिषद १५) **सहसचिव :** प्रसाद मसुरकर – मराठी एकीकरण समिती १६) **समन्वयक :**– रमेश कीर – विश्वस्त, कोकण मराठी साहित्य परिषद

**संस्थात्मक सदस्य**

१७) नरेश गाडेकर – अध्यक्ष, मराठी नाट्य परिषद नागपूर १८) मेघराजराजे भोसले – अध्यक्ष, मराठी चित्रपट महामंडळ पुणे १९) रामेश्वर पवार – अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ

**मान्यवर सदस्य**

२०) नागनाथ कोतापल्ले २१) चिन्मयी सुमित २२) सुनिताराजे पवार २३) डॉ. विवेक सावंत २४) अनिल गोरे २५) सुबोध कुलकर्णी–सांगली २६) नवनाथ गोरे – सांगली २७) हृषीकेश कांबळे २८) डॉ. प्रा. महेंद्र कदम – टेंभुर्णी २९) डॉ. प्रकाश चौधरी–पुणे ३०) उन्मेष गायधनी–नाशिक ३१) डॉ. रणधीर शिंदे–कोल्हापूर ३२) डॉ. शमसुद्दीन तांबोळी–पुणे ३३) डॉ. प्रकाश चौधरी – पुणे ३४) डॉ. सिसिलिया कार्व्हालो–वसई ३५) नीलम माणगावे – जयसिंगपूर ३६) प्रा. संध्या देशपांडे – बेळगाव सुमारे दोन तास चाललेल्या समितीच्या बैठकीत पुढील ठराव मंजूर करण्यात आले.

१) मराठी ही सर्वार्थाने सर्वदूर पसरलेल्या तमाम लोकांच्या दैनंदिन व्यवहाराची भाषा खऱ्या अर्थाने व्हावी यासाठी कर्नाटक सरकारने जसा कन्नड भाषा विकास प्राधिकरणाचा कायदा केला व प्राधिकरणास अर्ध न्यायिक दर्जा दिला, त्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने पण मराठी भाषा विकास प्राधिकरणाचा कायदा करून सदर संस्थेस अर्धन्यायिक दर्जा द्यावा अशी महाराष्ट्र शासनाकडे समितीने तयार केलेल्या कायद्याचा मसुदा पाठवून आग्रही मागणीवजा विनंती करण्याचा ठराव एकमताने संमत झाला. सदर कायदा डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनात आणण्यासाठी

मराठी भाषा व विधी विभागास मा. मुख्यमंत्र्यांनी निर्देश द्यावेत अशी विनंती करण्यात यावी.

२) मराठीच्या भल्यासाठी,'ने सातत्याने पाठपुरावा केलेली मराठी विद्यापीठाची मागणी तत्त्वतः मान्य केली म्हणून शासनाचे आभार मानत अशी मागणी केली, की हे विद्यापीठ पुढील शैक्षणिक वर्ष म्हणजे २२-२३ च्या प्रारंभी १५ ऑगस्टपर्यंत सुरू करावे, त्यासाठी घोषणा केल्याप्रमाणे तज्ज्ञ व्यक्तींची सल्लागार समिती त्वरित नेमून विद्यापीठाचे स्वरूप व उपक्रम आदींची निश्चिती करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. 'मराठीच्या भल्यासाठी'चे सर्व पदाधिकारी यासाठी शासनास सर्वतोपरी सहकार्य करतील.

३) शालेय विद्यार्थ्यांत वाचन संस्कृती विकसित होऊन ते बहुश्रुत व विवेकी वाचक व नागरिक व्हावेत म्हणून कार्याध्यक्षांनी तयार केलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली व तो संमत करून शासन निर्णय जारी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागास पाठविण्याचा ठराव संमत करण्यात आला.

४) मराठी शाळांची गुणवत्ता वाढविणे अत्यंत महत्त्वाचे आहे, त्याशिवाय ग्रामीण व बहुजन विद्यार्थ्यांस दर्जेदार शिक्षण मिळणार नाही, यावर सर्वांचे एकमत झाले. याबाबतच्या तयार केलेल्या प्रारूपास मंजुरी देऊन तो शासनास पाठवावा असे ठरविण्यात आले.

५) 'मराठीच्या भल्यासाठी' समिती केवळ शासनास मागणी करत नाही, तर स्वतःही आपल्या स्तरावर काम करते. या अनुषंगाने आजच्या बैठकीत पुढील विषयाचा अभ्यास करून शासनाला अहवाल सादर करण्यासाठी पुढील अभ्यासगट नियुक्त करण्यात आले.

अ) ई-मराठी अध्यक्ष - डॉ. विवेक सावंत

ब) मराठी विद्यापीठाचे स्वरूप व उपक्रम ठरविणे

अध्यक्ष - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

सहअध्यक्ष - डॉ. महेंद्र कदम

क)विज्ञान तंत्रज्ञानाचे महाविद्यालयीन/ विश्व विद्यालयीन शिक्षण मराठीत उपलब्ध करून देण्यासाठी पाठ्यपुस्तके निर्माण करण्यासाठी राज्यस्तरीय अनुवाद अभियान सुरू करणे

अध्यक्ष - डॉ रणधीर शिंदे

या तिन्ही अभ्यास गटांचे निमंत्रक व समन्वयक लक्ष्मीकांत देशमुख असतील.

'मराठीच्या भल्यासाठी' ही महाराष्ट्रव्यापी संघटना मराठी साहित्य, कला व भाषा विकासासाठी काम करणाऱ्या २४ संस्थांची शिखर संस्था आहे. ती महाराष्ट्र शासनाशी मराठीच्या विकासासाठी सातत्याने संवाद करीत राहणार आहे. ज्या बाबी शासनच करू शकते अशा विषयांचा अभ्यास करून त्यांची आवश्यकता अहवालाद्वारे मांडणे व पाठपुरावा करणे हे समितीचे धोरण आहे; पण प्रसंगी लोकशाही मार्गाने शांततापूर्ण आंदोलन व संघर्ष करण्याची तयारी ठेवली आहे. शासनाचा कोणत्याही प्रकारे अधिक्षेप न करता मराठीच्या विकासासाठी सातत्यपूर्ण काम करण्याचे व त्यासाठी सर्वांनी आपला वेळ देण्याचे मान्य केले आहे. समितीने मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी एक रोडमॅप तयार केला असून आजच्या बैठकीतले विषय हा त्याचा दुसरा टप्पा आहे, असे अध्यक्ष ठाले पाटील व कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी पत्रकार परिषदेमध्ये जाहीर केले.

**९) १ ऑक्टोबर २०२१ : महाराष्ट्र साहित्य परिषदेत गदिमा जीवनगौरव सन्मान प्रदान**

गदिमांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र साहित्य परिषद, गदिमा कुटुंबीय आणि महाराष्ट्र कामगार परिषद यांच्यावतीने आयोजित २९ व्या राज्यस्तरीय गदिमा कविता महोत्सवात श्रीधर फडके यांना 'गदिमा जीवनगौरव सन्मान' साहित्यिक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. गदिमांचे नातू सुमित्र माडगूळकर, नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे उपस्थित होते. पुरुषोत्तम सदाफुले यांनी प्रास्ताविक केले. उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.

**१०) ६ ऑक्टोबर २०२१ : साहित्य परिषदेत द.मा. मिरासदारांना साहित्यिकांची आदरांजली**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्यावतीने ज्येष्ठ साहित्यिक आणि मसापचे माजी अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांना

श्रद्धांजली वाहण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. मिरासदारांच्या कन्या सुनेत्रा मंकणी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, उपस्थित होते. सुधीर गाडगीळ, रविमुकुल, राजीव बर्वे, रमेश राठिवडेकर, उद्धव कानडे, दीपक करंदीकर, श्याम भुर्के, सुनिताराजे पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

**११) ९ ऑक्टोबर २०२१ : साहित्य परिषदेत नवरात्र महोत्सवानिमित्त 'दुर्गेच्या कविता' या कार्यक्रमाचे आयोजन**

महाराष्ट्र साहित्य परिषद, आणि साहित्यदीप प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र महोत्सवानिमित्त आयोजित 'दुर्गेच्या कविता' या कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे होत्या. मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, कार्यवाह प्रमोद आडकर, उद्धव कानडे, साहित्यदीप प्रतिष्ठानच्या ज्योत्स्ना चांदगुडे, धनंजय तडवळकर उपस्थित होते.

'दुर्गेच्या कविता' या कविसंमेलनात अंजली कुलकर्णी, प्रिया जामकर, ज्योत्स्ना चांदगुडे, सुनीति लिमये, प्राजक्ता पटवर्धन, योगिनी जोशी, प्रतिभा पवार, निरुपमा महाजन आणि अमिता सामंत या कवयित्री सहभागी झाल्या होत्या. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन वैशाली मोहिते यांनी केले. प्रमोद आडकर यांनी आभार मानले.

**१२) ११ ऑक्टोबर २०२१ : साहित्य परिषदेत शांता शेळके यांना जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन**

प्रतिभासंपन्न कवयित्री शांता शेळके यांच्या साहित्याचा आणि आठवणींचा जागर महाराष्ट्र साहित्य परिषदेत करण्यात आला. निमित्त होते, शांता शेळके यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभाचे. या निमित्ताने महाराष्ट्र साहित्य परिषद व गोल्डन मेमरीज प्रस्तुत 'आठवणीतल्या शांताबाई' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची संकल्पना-निर्मिती चैत्राली अभ्यंकर यांची होती आणि हेमंत वाळुंजकर आणि चैत्राली अभ्यंकर यांनी गीत गायन केले. सांगीतिक साथ केदार परांजपे, प्रसन्न बाम, राजेंद्र हसबनीस, ऋतुराज कोरे यांनी केली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, प्रमोद आडकर, दीपक करंदीकर, वि. दा. पिंगळे, उद्धव कानडे, राजीव बर्वे, सतीश देसाई, आनंद देशमुख, माजी आमदार मेधाताई कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले.

**१३) १३ ऑक्टोबर २०२१ : राजहंस प्रकाशनाला पुष्पा पुसाळकर स्मृती पुरस्कार प्रदान**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने, उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठीचा सुविचार प्रकाशन मंडळ पुरस्कृत 'कै. पुष्पा पुसाळकर स्मृती पुरस्कार' राजहंस प्रकाशनाच्या 'समग्र जयंत नारळीकर' (लेखक जयंत नारळीकर) या ग्रंथाला राजेंद्र बनहट्टी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, राजहंस प्रकाशनाचे डॉ. सदानंद बोरसे, उपाध्यक्ष राजीव बर्वे, चैतन्य बनहट्टी, बंडा जोशी, उद्धव कानडे, दीपक करंदीकर, बाळासाहेब घोंगडे उपस्थित होते.

**१४) १४ ऑक्टोबर २०२१ : साहित्य परिषदेत वाचनप्रेरणा दिनानिमित्त चोखंदळ वाचकांचा सन्मान**

'वाचनप्रेरणा दिनानिमित्त' महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कै. वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयात गेल्या ४२ वर्षांपासून नियमित येणारे वाचक रत्नाकर वाघ, २२ वर्षांपासून येणारे मधुकर महाजन, २५ वर्षांपासून येणाऱ्या श्यामला पानसे, विद्यार्थी साईराज घाटपांडे आणि निकिता शेंडगे या चोखंदळ वाचकांचा ग्रंथभेट आणि सन्मानचिन्ह देऊन प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, कार्यवाह वि. दा. पिंगळे, माधव राजगुरू, बंडा जोशी उपस्थित होते. वि. दा. पिंगळे यांनी प्रास्ताविक केले. प्रकाश पायगुडे यांनी आभार मानले.

◆◆

# महाराष्ट्र साहित्य परिषद,

## इतर शाखा कार्यवृत्तांत

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

### धुळे शाखा

**दि. २७ फेब्रुवारी २०२०** रोजी झेड. बी. पाटील महाविद्यालय आणि मसाप धुळे जि. शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने कवी कुसुमाग्रज यांची जयंती 'मराठी राज भाषा दिन' म्हणून साजरी करण्यात आली. या निमित्ताने काव्यवाचनाच्या आयोजित कार्यक्रमात उस्मानाबाद येथे आयोजित अ. भा. म. सा. संमेलनाच्या कवी कट्ट्यावर कविता गाजवलेले कवी पापालाल पवार, कवी चंद्रशेखर सोनार, निमंत्रित कवींमध्ये आपल्या कवितेने रसिकांची दाद-मिळविलेले कवी प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी याशिवाय प्रा. रमेश राठोड, प्रा. डॉ. योगिता पाटील, श्री. रमेश बोरसे या सर्वांनी आपल्या विविध विषयांवरील कविता सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक धुळे-नंदुरबार जि. प्रतिनिधी डॉ. शशिकला पवार यांनी केले. मसाप, धुळे शाखेच्या अध्यक्ष यांनी सूत्रसंचालन केले.

■ **दि. १७ ऑक्टोबर २०२० ते २५ ऑक्टोबर २०२०** पर्यंत मसाप, धुळे जि. शाखा आणि नंदुरबार जि. शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शारदीय व्याख्यानमाला नवरात्र उत्सवाचे झूम ॲपवर ऑनलाईन आयोजन करण्यात आले. या व्याख्यामालेत मसाप, पुणेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी (विवेकानंदांची धर्मकन्याः भगिनी निवेदिता), प्रमुख कार्यवाह श्री. प्रकाश पायगुडे (साहित्य संमेलनांचा इतिहास), कोषाध्यक्ष सौ. सुनिताराजे पवार( ग्रंथालय चळवळ- आणि वाचन संस्कृती), पिंपरी चिंचवड मसाप शाखेचे अध्यक्ष व पुणे जि. प्रतिनिधी श्री. राजन लाखे (गदिमा : प्रतिमा आणि प्रतिभा) दिल्ली येथील डॉ. सच्चिदानंद जोशी (नवरात्र उत्सव आणि कोरोना परिस्थिती), धुळे येथील अहिराणी भाषेचे अभ्यासक, साहित्यिक श्री. सुभाष अहिरे (अहिराणी कथाकथन), चाळीसगावचे जळगाव जि. प्रतिनिधी प्राचार्य तानसेन जगताप (बहिणाबाईची गाणी) नंदुरबारचे इतिहास अभ्यासक व संशोधक डॉ.सर्जेराव भामरे (खानदेशचा वैभवशाली इतिहास) नंदुरबार स्थित प्रा. हिंमतराव चव्हाण (भारतीय सांस्कृतिक कलांचा वारसा) इ. सर्व सहभागी होऊन या वक्त्यांनी वरील विविध विषयांवर आपले विचार मांडले. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील मसाप सभासदांचा व्याख्यानमालेस उत्तम प्रतिसाद मिळाला. या व्याख्यानमालेचे संयोजन धुळे- नंदुरबार जि. प्रतिनिधी- डॉ. शशिकला पवार आणि सूत्रसंचालन नंदुरबार शाखेचे कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. उमेश शिंदे यांनी केले.

**३)दि. २७ जानेवारी २०२१** रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने मसाप, धुळे जि. शाखेने काव्यवाचनाचा कार्यक्रम झूम ॲपवर ऑनलाईन आयोजित केला होता. या काव्यवाचनाच्या कार्यक्रमात प्राचार्य रत्नाताई पाटील (फोन पार्वतीने केला, नही मी मुगीच ऱ्हायनू (अहिराणी कविता), त्रिशला साळवे (संदर्भ, वांझोटं चित्रत्व) श्री. संदीप सोनवणे (सांग बाप्पा माझया बापानं काय गुन्हा केला. शेतकरी मना बाप, अहिराणी), श्री. एन. एच. महाजन (परिवर्तन, लेक), प्रा. विनय पाटील (बाबा,-समाज), प्रा.डॉ.सूर्यवंशी (मायबाप, स्त्रीचं-जगणं) या कविता सादर करून रसिक श्रोत्यांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शशिकला पवार यांनी केले, समारोप प्रा. उषा पाटील आणि उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांनी केले. काव्यवाचनाला श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

**४) दि. २७ फेब्रुवारी २०२१** रोजी ज्ञानपीठ पारितोषिकाने सन्मानीत कविवर्य कुसुमाग्रजांच्या जयंती निमित्ताने मसाप, धुळे जि. शाखा आणि नंदुरबार जि. शाखा या दोघांच्या संयुक्त विद्यमाने ' मराठी राज्यभाषा दिन' गुगल मीटवर ऑनलाईन साजरा करण्यात आला. या प्रसंगी जळगाव येथील दीपस्तंभ फाऊंडेशनचे संचालक मा. प्रा. यजुर्वेंद्र महाजन यांचे 'मराठी वाचक... वाचन संस्कृती' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. दीपस्तंभाच्या

माध्यमातून त्यांनी अंध व अपंग विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण तर केलीच; पण मुलांना काय वाचावेसे वाटते हे पाहून त्यांनी पुस्तक निर्मिती केली. वाचनाने चित्त एकाग्र होते; जग समजते; नीतिमूल्ये आदर्श समजतात; सामान्य वाचक उत्तम नागरिक म्हणून घडतो, हे वाचनाचे फायदे त्यांनी सांगितले. नंदुरबार जि. शाखेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शशिकला पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन आणि सूत्रसंचालन प्रा. डॉ. उमेश शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाला धुळे मसापचे कार्याध्यक्ष डॉ. चुडामण पगारे व इतर पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमासही रसिक श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

**दि. १६ जून २०२१:** रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने आणि त्यांची नात स्व. पद्माराजे रघुजीराव कदमबांडे (धुळे) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मसाप, धुळे जि शाखा आणि नंदुरबार जि शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने इतिहास संशोधक आणि अभ्यासक प्रा. डॉ. अनिल बैसाणे (धुळे) यांचे 'लोकराजे राजर्षी शाहू महाराज व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या विषयावर गुगल मीट ॲपवर ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी राजर्षी शाहू महाराज हे केवळ करवीर संस्थानचे राजे नव्हते, तर महाराष्ट्राचे अनभिषिक्त सम्राट होते, असे मत डॉ.अनिल बैसाणे यांनी मांडले. झेड. बी. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एच. पवार यांनी अध्यक्षीय समारोप करताना म्हटले, 'राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त केवळ प्रतिमापूजन न करता त्यांचे कार्य समाजापुढे आणणे काळाची गरज आहे.' धुळे शाखेच्या अध्यक्षा प्रा. उषा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

**दि. ६ ऑगस्ट २०२१:** रोजी मसाप धुळे जि. शाखा आणि नंदुरबार जि शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने कथाकथनकार डॉ.एस. के. पाटील (दाभाडी, ता. मालेगाव) यांचा अहिराणी कथाकथनांचा गुगल मीट ॲपवर ऑनलाईन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यांनी 'गैब्यानी गोष्ट' ही अहिराणी कथा कथन करून शेती उत्पन्नाचे स्वप्न भंगणाऱ्या शेतकऱ्यांची शोकांतिका मांडली. प्रा. डॉ. संजीव शिरासे यांनी अध्यक्षीय समारोपकेला.

**दि. ३ सप्टेंबर २०२१** : रोजी मसाप, धुळे जि. शाखा आणि नंदुरबार जि. शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन कट्टा' आयोजित करण्यात आला. गुगल मीट वरील ऑनलाईन 'वाचन कट्ट्यात' प्रा. डॉ. संजीव गिरासे यांच्या 'पायखुटी' पुस्तकावर चर्चा करण्यात आली. चर्चेक म्हणून प्रा.डॉ. सुनिल पवार(धुळे), प्रा. डॉ. माधव कदम (नंदुरबार), प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी (धुळे) प्रा. डॉ. उमेश शिंदे (नंदुरबार) यांनी 'पायखुटी' या पुस्तकावरील आपली समीक्षणात्मक मते मांडली. 'पायखुटी' पुस्तकातील ग्रामीण जीवन. त्यातील वातावरण, व्यक्तिचित्रण, संघर्ष, मानवी स्वभाव, त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती यांची उदाहरणे देऊन सांगोपांग चर्चा झाली.

वरील दोन्ही कार्यक्रमांचे प्रास्ताविक धुळे नंदुरबार जि. प्रतिनिधी डॉ. शशिकला पवार यांनी केले.

**दि. ४ सप्टेंबर २०२१** : रोजी रिमझिम श्रावण कवी संमेलनाचे आयोजन गुगल मीटवर ऑनलाईन धुळे व नंदुरबार शाखांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. या कवी संमेलनात महाकवी कालिदास कवी कट्टा साहित्य मंडळ, धुळे यांचा सहभाग होता.

या कवीसंमेलनाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. विद्या पाटील यांनी केले. या प्रसंगी महाकवी कालिदास कवी कट्ट्याचे प्रमुख मुरलीधर पांडे यांनी आपली भूमिका मांडली. या कवी संमेलनात कवयित्री मनिषा अग्निहोत्री, प्रा. डॉ. मनोज शेवाळे, श्री. अशोक शिंदे, प्रा. प्रशांत बागुल, प्रा. डॉ. उमेश शिंदे (सर्व नंदुरबार), श्री. चंद्रशेखर कासार, श्री. रामदास धोंडगे (म्हसदी, ता. साक्री) श्री. नारायण भदाणे, प्रा.डॉ. मोरेश्वर नेरकर, प्रियांका मेश्राम, प्रा.डॉ. सदाशिव सूर्यवंशी, (सर्व धुळे), श्री. नागोराव डोंगरे (दोंडाईचा) कवयित्री अस्मिता पुष्पांजली (भंडारा) आणि इतरही कवी सहभागी झाले.

या ऑनलाईन कार्यक्रमांच्या आयोजनात नंदुरबार शाखेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील, धुळे शाखेचे कार्याध्यक्ष डॉ. चुडामण पगारे, कार्यवाह डॉ. सुरेंद्र मोरे, डॉ. वाल्मीक आढावे, नंदुरबारचे कार्याध्यक्ष डॉ. गिरीश महाजन, कार्यवाह राम दाऊदखाने, प्रा. प्रशांत बागुल, श्री. संतोष पाटील, वृत्तसंकलक प्रा. डॉ. प्रवीण गिरासे यांचे सहकार्य लाभले. या ऑनलाईन कार्यक्रमांना धुळे व नंदुरबार जि शाखेचे सभासद व मान्यवर रसिक श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

## मसाप शाखा डोंबिवली

**१) दि.२४ एप्रिल २०२१,** सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. अरुण हरकारे यांनी त्यांच्या खास शैलीत पोलीस कथा सांगितल्या. या कथा श्रोत्यांना खूप आवडल्या. सौ. प्रज्ञा जोशी यांनी हरकारे यांचा परिचय करून दिला.

**२) २२ .०५.२०२१** पुण्याचे अनुवादकार श्री. सुनील भागवत यांनी भाषांतर कौशल्याविषयी माहिती सांगितली.

शासकीय नियमांचे भाषांतर करताना कोणत्या अडचणी येतात, गमतीजमती घडतात, विविध अनुभव कसे येतात, हे सांगितले. त्यांच्याशी चर्चा डॉ.धनश्री साने यांनी केली.

**३) २०.०६.२०२१** नागपूरच्या सुप्रसिद्ध कवयित्री नेहा भांडारकर यांच्या अनेक कविता आंतरराष्ट्रीय मासिकात वेगवेगळ्या भाषांतून अनुवादित झाल्या आहेत. त्यांनीही अनेक परकीय भाषांतील कविता मराठीत आणल्या आहेत. अशा कवयित्रीशी आनंद गोसावी यांनी संवाद साधला. नेहा भांडारकर यांनी अतिशय सुंदर पद्धतीने काव्यविषयक विचार मांडले.

**४) ११.०७.२०२१** प्राध्यापक आणि संस्कृत नाटक लिहिणारे डॉ. प्रसाद भिडे यांनी आषाढस्य प्रथम दिवसे म्हणत कालिदासाच्या साहित्य सृष्टीतील नाटकांवर अतिशय सुंदर रसाळ, विवेचन केले. विशेषत: कालिदासाच्या नाटकांची रचनाच अशी आहे, की ती रंगमंचावर सादर करताना कोणतीही अडचण येत नाही. प्रा. भिडे यांनी श्रोत्यांना खिळवून ठेवले होते. डॉ.भिडे यांचा परिचय दीपाली काळे यांनी करून दिला.

५) एक ऑगस्ट म्हणजे प्रखर राष्ट्रवादी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी. या निमित्ताने प्रतिभा बिवलकर यांनी टिळकांच्या 'गीता रहस्य या ग्रंथातील कर्मवाद' यावर सुंदर माहितीपूर्ण असे भाषण केले. विषय गंभीर, तो त्यांनी खूप सोप्या पद्धतीने मांडला. कुठेही कंटाळवाणेपणा आला नाही.

**६) २८.०८.२०२१** रोजी डॉ. राणी खेडीकर यांनी एका अत्यंत वेगळ्या विषयावर भाष्य केले. 'रेड झोन' विभागातील बालकांचे भवितव्य काय? इथे शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या मनात आपणही माता व्हावे ही इच्छा असते, आणि मग इथे जन्माला येणारी मुले कोणत्या परिस्थितीत वाढतात, त्यांना शिक्षण द्यायला हवे, हा विषयही समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्याकरिता शासन आणि संस्था काय करू शकतात असा विषय त्यांनी मांडला. डॉ.वृंदा कौजलगीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

## मसाप शाखा सावेडी, उपनगर

**१) नगर–** महाराष्ट्र साहित्य परिषद, सावेडी उपनगर शाखा व शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने मे महिन्यात घेण्यात आलेल्या काव्य व लेखन स्पर्धेस स्पर्धकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून जिल्ह्यातून, राज्यातून, देशातूनच नव्हे तर परदेशातूनही या स्पर्धेसाठी ४०० हून अधिक कविता, लेख आले आहेत. शाखेच्या वतीने यापुढे दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन होणार असून साहित्यिकांच्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार असल्याची माहिती म. सा. प. च्या सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष श्री. नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

श्री. फिरोदिया यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला, त्या वेळी ते बोलत होते. स्पर्धेचे परीक्षक सर्वश्री चंद्रकांत पालवे, सतीश डेरेकर, प्रा. शशिकांत शिंदे, नंदकुमार आढाव, शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## मसाप शाखा सोपाननगर

**१)** महाराष्ट्र साहित्य परिषद सोपाननगर शाखा व स्वरानंद सासवड यांच्या संयुक्त विद्यमाने कै. टी. एन. मुरकुटे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सत्कार समारंभ व कथाकथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यकारी मंडळ सदस्य रावसाहेब पवार, कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखेचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब पवार यांनी केले. या प्रसंगी जितेंद्र पाणबुडे, युसूफ सय्यद, प्रा. दीपक जांभळे, सुरेश कोडीतकर, भगवान होले, सिताराम भुजबळ, ऋषिकेश मुरकुटे, इंदिरा पवार, गंगाराम जाधव, कैलास भेलेकर, शरद पांडसे, कौशल्या ताकवले, दत्तात्रय जगताप आदी उपस्थित होते.

**२) दि. ५ सप्टेंबर २०२१**

मसाप शाखा सोपाननगरचे आदर्श 'शिक्षक पुरस्कार वितरण' करण्यात आले. सासवड नगरपालिकेचे नगरसेवक अजित जगताप, रावसाहेब पवार, डॉ. नानासाहेब पवार प्रमुख उपस्थित होते.

डॉ. संजय झगडे, सूर्यकांत खैरनार, माणिक चव्हाण, मिलन जाधव यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी प्रा. नंदकुमार सागर, प्रा. अरुण सुलगेकर, युसुफ सय्यद, डॉ. संपत जगदाळे, डॉ. सुभाष व्हळ, डॉ. नाना झगडे, नाना भोंगळे, विलास पवार, ऋषिकेश मुरकुटे, इंदिरा पवार, शरद पांडसे, जितेंद्र पाणबुडे उपस्थित होते.

## मसाप शाखा सोलापूर

**१) दिनांक :– २२/९/२१–** मसाप शाखा सोलापूर यांच्या वतीने पूर्वी महिलांसाठी लेखन स्पर्धा घेतली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण करोनामुळे झाले नव्हते. या स्पर्धेचा विषय मराठी साहित्य कृतीतील 'मला आवडलेली स्त्री व्यक्तिरेखा' हा होता. या स्पर्धेत एकूण पस्तीस महिलांनी आपले लेख पाठवले होते. त्यात सौ. आशा पाटील यांना प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक सौ. सुलेखा आराध्ये व डॉ. मीरा शेंडगे यांना विभागून देण्यात आला. तृतीय क्रमांक मानसी वैद्य तर उत्तेजनार्थ मृणालिनी पंडित व ऋतुजा दिवाणजी यांना मिळाला आहे. या स्पर्धेच्या परीक्षक अक्कलकोटच्या सौ. आरती काळे या होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मसापचे अध्यक्ष डॉ. सुहास पुजारी होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी केले तर सूत्रसंचालन सौ. वंदना कुलकर्णी यांनी केले, कवी मारुती कटकधोंड यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमात मसापचे कार्यकारणी सदस्य श्री. किशोर चंडक यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास अत्यंत दुर्मिळ अशी नाणी भेट दिली. त्यानिमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास मसापचे उपाध्यक्ष श्री. दत्ता अण्णा सुरवसे, कार्यवाह श्री. बाबुराव मैंदर्गिकर, श्री. किशोर चंडक, प्रा.डॉ. नरेंद्र काटीकर(युवा विभाग प्रमुख), डॉ. नसीमा पठाण, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले, श्री. नितीन वैद्य, डॉ. सतीश वळसंगकर, श्री. दिलीप अत्रे, श्री. संतोष पवारसह अनेक मान्यवर व रसिक श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

**२) दिनांक: ६–१०–२०२१ सरस्वती सन्मान पुरस्कार प्राप्त, ज्येष्ठ साहित्यिक मा. शरणकुमार लिंबाळे यांचा सत्कार**

सरस्वती सन्मान पुरस्कार प्राप्त, ज्येष्ठ साहित्यिक माननीय शरणकुमार लिंबाळे यांच्या सपत्नीक सत्काराचे आयोजन केले होते. व्यासपीठावर माजी केंद्रीय गृहमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे साहेब, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूरचे विद्यमान अध्यक्ष डॉ. सुहास पुजारी, साहित्यिक ना.म शिंदे, सुनील शिनखेडे, कवी मारुती कटकधोंड. डॉ. माधवी रायते,ॲड.जे.जे कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष ॲड. जे.जे. कुलकर्णी यांनी उत्स्फूर्त दिलखुलासपणे केले. सोलापूर आकशवाणी केंद्राचे निवृत्त साहाय्यक संचालक व ज्येष्ठ साहित्यिक मा. सुनील शिनखेडे यांनी 'सनातन' या कादंबरीचे विवेचन केले.

यावेळी कवी मारुती कटकधोंड यांच्या 'डोहतळ' काव्यसंग्रहास सलग आठ साहित्यिक प्रतिष्ठित पुरस्कार लाभल्यामुळे त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी केले. आभार प्रदर्शन मा. जे. जे. कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमास म.सा.प.शाखेचे उपाध्यक्ष मा. दत्ताअण्णा सुरवसे, प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर व महाराष्ट्र साहित्य शाखा सोलापूरचे पदाधिकारी, साहित्यिक, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## मसाप शाखा जुळे सोलापूर

**१)** महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखा व प्रिसिजन फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने स्व.दत्ता हलसगीकर श्रेष्ठ साहित्य राज्यस्तरीय पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक आणि सोलापूर आकाशवाणीचे साहाय्यक संचालक सुनील शिनखेडे यांना प्रदान करण्यात आला.

या वेळी व्यासपीठावर प्रा. मिलिंद जोशी यांच्यासह पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, प्रिसीजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, मसाप शाखेच्या कार्याध्यक्षा डॉ. सायली जोशी, पुरस्कारमूर्ती सुनील शिनखेडे, मसाप जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, स्नेहा शिनखेडे उपस्थित होते.

◆◆



# मिरासदारांच्या निधनाने साहित्यातील निखळपणाचे आनंदपर्व लोपले

## साहित्य परिषदेत मिरासदारांना साहित्यिकांची आदरांजली

अस्सल ग्रामीण बाजाच्या विनोदी कथा लिहून द. मा. मिरासदार यांनी कथेचे वर्तुळ व्यापक केले. ते लेखक म्हणून जितके मोठे होते तितकेच त्यांचे माणूसपणही भावणारे होते. ते आनंदयात्री होते. त्यांच्या निधनाने साहित्यातील निखळपणाचे आनंदपर्व लोपले अशी भावना मिरासदारांच्या आठवणींना उजाळा देत मान्यवरांनी व्यक्त केली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्यावतीने ज्येष्ठ साहित्यिक आणि मसापचे माजी अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते. मिरासदारांच्या कन्या सुनेत्रा मंकणी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार उपस्थित होते.


शि. द.फडणीस म्हणाले, ''प्रसंगनिष्ठ विनोदाची श्रीमंती लाभलेले साहित्यिक द. मा. मिरासदार यांच्या वीसहून अधिक पुस्तकांची मुखपृष्ठं रंगविण्याचा योग मला लाभला. साहित्याच्या शेजारी चित्रं हा शेजारधर्म आम्ही दोघांनी प्रत्यक्ष अनुभवला. अनेक वर्षे आम्ही एका बंगल्यात शेजारीच राहत होतो.''


प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, ''अस्सल ग्रामीण बाजाच्या विनोदी कथा लिहून मिरासदारांनी मराठीतील विनोदी कथांचे वर्तुळ व्यापक केले. ते अंतर्बाह्य निर्मळ आणि सच्चा माणूस होते. आपल्या राजकीय भूमिकेबाबत ठाम असलेल्या मिरासदारांनी वाङ्मयीन सौहार्द जपताना ती भूमिका कधीही आड येऊ दिली नाही. त्यांनी मराठी माणसांना खळखळून हसवले आणि भरभरून आनंद दिला. त्यांच्या निधनाने निखळपणाचे आनंदपर्व लोपले.''


रामदास फुटाणे म्हणाले, ''एक चांगला अस्सल लेखक आपल्यातून निघून गेला आहे. मिरासदार हे साहित्यातील चैतन्य होते.'' ''मंगला गोडबोले म्हणाल्या, ''मिरासदार शिक्षकी पेशात असूनही शिकविण्याचा आविर्भाव कधीही त्यांच्या लेखनात आला नाही.'' न. म. जोशी म्हणाले, ''मिरासदारांनी गंभीर विचार अवखळ आविष्कारातून आणि नर्म विनोदातून मांडला.''

सुधीर गाडगीळ म्हणाले, ''बोलणे आणि लिहिणे'' या दोन्ही गोष्टींवर त्यांचे प्रभुत्व होते. ग्रामीण आणि शहरी असे दोन्ही जीवन अनुभव कारुण्य आणि विनोद यांच्या साह्याने त्यांनी साहित्यातून मांडले. '' रविमुकुल म्हणाले, ''मिरासदारांनी निरागसता अखेरपर्यंत जपली.'' राजीव बर्वे म्हणाले, ''ते पापभीरू होते. त्यांच्या मनात कसलेही किल्मिष नव्हते.''
रमेश राठीवडेकर म्हणाले, ''मिरासदारांनी लेखक म्हणून ग्रंथ प्रदर्शनांना कायम पाठबळ दिले.'' सुनेत्रा मंकणी म्हणाल्या, ''प्रेम, जिव्हाळा त्यांनी एकत्र कुटुंबात जपला. तो त्यांच्या लेखनातही उतरला. घरात ते नेहमी तंद्रीत असत.
ते कृतार्थ जीवन जगले.''

Maharashtra Sahitya Patrika Quarterly : September 2021
Registered with the Register of Newspaper for India under No 6398/57
Book Pkt. Periodical category. Publishing Date : September 2021


# पुस्तक सूची

- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : रु. ५००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : रु. ४००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : रु. ३००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : रु. ८००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : रु. ७००/-
- भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : रु. ८००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड १ : रु. ५००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड २ : रु. ३००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : रु. २००/-
- म. सा. पत्रिका लेख - सूची : रु. ४००/-

## सर्व खंड २५ टक्के सवलतीत !

## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

**मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०**
**दूरभाष : ०२०- २४४७ ५९ ६३**


प्रेषक ।
**प्रमुख कार्यवाह,**
**महाराष्ट्र साहित्य परिषद,**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०,
दूरभाष : ०२०-२४४७ ५९ ६३